## माध्यमिक पाठ्यक्रम

# २१३ - सामाजिक शास्त्र

## पुस्तक - १


पाठ्यक्रम समन्वयक

श्रीमती तरुण पुनिया

डॉ. चुन्नु प्रसाद

डॉ. अझमत नुरी

प्रकल्प समन्वयक

श्रीमती आसिमा सिंग



विद्याधनम् सर्वधनं प्रधानम्

राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान

ए-२४-२५. इंस्टीटयूशनल एरिया, सेक्टर-६२, नोएडा-२०१ ३०९ (उ.प्र.)

Website: www.nios.ac.in, Toll Free No. 18001809393

एनआईओएस वाटरमार्क 80 जीएसएम पेपर पर मुद्रित।

© राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान

मुद्रण : दिसंबर, 2013 (2,000 प्रतियाँ)

सचिव, राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थान, ए–24–25, इंस्टीट्यूशनल एरिया, सेक्टर–62, नोएडा–201309 द्वारा प्रकाशित एवं मैसर्स अरावली प्रिन्टर्स एण्ड पब्लिशर्स, (प्रा.) लि., डब्ल्यू–30, ओखला इंडस्ट्रियल एरिया, फेस–II, नई दिल्ली–110020 द्वारा मुद्रित

## राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था सल्लागार समिती

**डॉ. सितांशु स. जेना**
चेअरमन
रा.मु.शा.सं., नवीन दिल्ली

**डॉ. कुलदीप अगरवाल**
निर्देशक (शैक्षणिक)
रा.मु.शा.सं., नवीन दिल्ली

**डॉ. वेंकटेश श्रीनिवासन**
साहायक प्रतिनिधी
UNFPA नवी दिल्ली

**श्रीमती गोपा विश्वास**
सह.संचालक (शैक्षणिक)
रा.मु.शा.सं., नवीन दिल्ली

**डॉ. सोनिया बहल**
सह. संचालक (शैक्षणिक)
रा.मु.शा.सं., नोईडा

## पाठ्यक्रम समिती अध्यक्ष

**प्रा. सी. एस्. आर. मूर्ति**
CIPOD, SIS जवाहरलाल नेहरू विद्यालय,नवी दिल्ली

### सदस्य

**प्रा. निविदीता मेनन**
प्राध्यापक
SIS, JNUनवी दिल्ली

**प्रा. मोहमद कुरेशी**
प्राध्यापक (भूगोल)
CSRD, SSS, INU नवी दिल्ली

**प्रा. नूर मोहमद**
निवृत्त प्राध्यापक
दिल्ली विद्यापीठ दिल्ली

**प्रा. सलील मिश्रा**
इतिहास विभाग SSS,
IGNOU नवी दिल्ली

**प्रा. अनिल सेठी**
DEESH,
NCERT नवी दिल्ली

**डॉ. कृष्ण मेनन**
प्रपाठक (राज्यशास्त्र) लेडी सीताराम
महाविद्यालय दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. बी. एल. गुप्ता**
निवृत्त उपप्राचार्य
दिल्ली प्रशासन दिल्ली

**श्रीमती अपर्णा पांडे**
व्याख्याती DEESH,
NCERT नवी दिल्ली

**कै. श्रीमती चित्रा श्रीवास्तव**
पदव्युत्तर प्राध्या. (इतिहास) सरदार
पटेल विद्या. लोधी कॉलनी,नवी दिल्ली

**डॉ. टी. एन्. गिरी**
विभागीय संचालक राष्ट्रीय मुक्त विद्या.
शिक्षणसंस्थान, पाटना

**श्री. विवेक सिंह**
एस्. ई. ओ. (ॲकॅडमिक) राष्ट्रीय
मुक्त विद्यालयशिक्षण संस्थान, नोईडा.

## संपादक मंडळ

**प्रा. जे. आय्. पांडे**
NCERT, निवृत्त प्राध्यापक
नवी दिल्ली

**श्री. भगवतिप्रसाद ध्यानी**
व्याख्याताशिक्षण संचालनालय,
दिल्ली प्रशासन

**डॉ. अनिता देवराज**
प्राचार्या डी.ए.व्ही. पब्लिक
स्कूल,बहादूरगड, हरियाना

**डॉ. बी. एल. गुप्ता**
निवृत्त उपप्राचार्य
दिल्ली प्रशासन, दिल्ली

**डॉ. टी. गीता**
सहाध्यायी प्राध्यापक, CIE
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. एस् के. मोहापात्रा**
प्रपाठक (भूगोल)
IGNOU
नवी दिल्ली

**श्रीमती तरुण पुनिया**
शैक्षणिक अधिकारी (भूगोल)
रा.मु.वि.शि.संस्थान,
नोईडा, (उत्तर प्रदेश)

**डॉ. चुन्नु प्रसाद**
शैक्षणिक अधिकारी,राज्यशास्त्र
रा.मु.वि.शि.संस्थान,
नोईडा, (उत्तर प्रदेश)

**डॉ. अझमत नूरी**
शैक्षणिक अधिकारी,इतिहास
रा.मु.वि.शि.संस्थान,
नोईडा, (उत्तर प्रदेश)

**श्रीमती रिता ठोकचोम**
४/३३, ए. पहिला मजला,
विजय नगर,
दिल्ली

**श्रीमती उर्मिल महेंदू**
G १४६, एल्. वाय्.
कालनी पश्चिम विहार, दिल्ली

**श्रीमती एस्. के. अरोरा**
GH4/१९०, मीरा अपार्ट.
पश्चिम विहार, दिल्ली

**डॉ. आर्. के. श्रीवास्तव**
व्याख्याता SCERT, दिल्ली

## पाठ लेखक

**डॉ. अनिता देवराज**
प्राचार्या, डी. ए. व्ही.
वहादूरगड, हरियाणा

**डॉ. एस्. के. मोहपात्रा**
प्रपाठक (भूगोल)
IGNOU नवी दिल्ली

**डॉ. रामसहाय प्रसाद**
सहयोगी प्राध्यापक
डॉ. आंबेडकर महाविद्यालय,
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. व्ही. एस्. नेगी**
सहयोगी प्राध्यापक
शहीद भगतसिंग महाविद्यालय,
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. स्वाती रजपूत**
सहायक प्राध्यापक
शहीद भगतसिंग महाविद्यालय,
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**डॉ. अल्पना तापरिया**
TGT (समाजशास्त्र) DPS
इंदिरापूरमम गाझीयावाद

**डॉ. भुवन झा**
सहयोगी
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**श्री प्रेम ओझा**
TGT (समाजशास्त्र) द हेरिटेज
स्कूल, सेक्टर ६२, गुरगाव

**श्रीमती नसरीन रिझवी**
TGT (समाजशास्त्र)
DPS इंदिरापूरम् गाझियावाद

**डॉ. शालिन जैन**
सहायक प्राध्यापक S.G.T.B.
खालसा महाविद्यालय, दिल्ली

**श्रीमती समिता दास**
TGT (समाजशास्त्र) DPS
इंदिरापूरम् गाझियाबाद

**श्री. चंदन श्रीवास्तव**
रिसर्च स्कॉलर, CIE
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

**श्रीमती मनिया सुब्बा**
रिसर्च स्कॉलर, CIE
दिल्ली विद्यापीठ, दिल्ली

## रेखाचित्र सल्लागार समिती

**प्रा. जे. आय. पांडे**
निवृत्त प्राध्यापक NCERT नवी दिल्ली

**डॉ. अनिता देवराज**
डी. ए. व्ही. पब्लिक स्कूल,वहादूरगड, हरियाणा

**डॉ. एस्. के. मोहपात्रा**
प्रपाठक (भूगोल) IGNOU नवी दिल्ली

**श्रीमती अशीमा सिंग** (प्रकल्प समन्वयक) (AEP)
रा.मु.वि.शि.संस्थान, नोईडा, (उत्तर प्रदेश)

**डॉ. जया** (राष्ट्रीय कार्यक्रम अधिकारी)
(UNFPA) ५५, लोधी इस्टेट नवी दिल्ली

**प्रवाह**
मेंटॉरिंग एजन्सी, C – 24b कालकाजी नवी दिल्ली

## समन्वयक

**श्रीमती तरुण पुनिया** (शैक्षणिक अधिकारी)
(भूगोल) रा.मु.वि.शि.संस्थान,नोईडा, (उ.प्र.)

**डॉ. चुन्नु प्रसाद** (शैक्षणिक अधिकारी)
(राज्यशास्त्र) रा.मु.वि.शि.संस्थान, नोईडा

**डॉ. अझमत नुरी** (शैक्षणिक अधिकारी)
(इतिहास) रा.मु.वि.शि.संस्थान, नोईडा

## मराठी भाषांतर

**प्रा. मानसिंग सदाशिव साळुंके**
माजी प्राध्यापकमॉडर्न कॉलेज पुणे ५

**डॉ. नीता मिलिंद बोकील** (सहध्यायी प्राध्यापिका)
हरिभाई व्ही. देसाई, महाविद्यालय, पुणे २

**श्री. अ. गं. कडेकर** (माजी प्राचार्य)
नेताजी सुभाषचंद्र बोस उच्च माध्य.विद्यालय,पुणे ६

## रेखाचित्रकार

**श्री. महेश शर्मा**
रेखाचित्रकार रा.मु.वि.शि.संस्थान,नोईडा, (उ.प्र.)

**श्री. रुपेश खरकवाल**
मुक्त रेखाचित्रकारनवी दिल्ली

**वेदिका एन्टरप्रायजेस**
टाईपसेट और डिझाईन, पुणे

# अध्यक्षांचा संदेश

प्रिय विद्यार्थ्यांनो,

काळानुसार जशा जशा समाजाच्या साधारण गरजा आणि विशेषत: काही गटाच्या गरजा बदलत जातात, त्याचप्रमाणे महत्त्वाकांक्षाही बदलत जातात त्या पूर्ण करण्यासाठी त्याच्या पद्धती व तंत्रामध्ये त्याप्रमाणे बदल केले जातात. शिक्षण हे बदल करण्याचे उपकरण आहे. योग्य प्रकारचे शिक्षण योग्य वेळेला मिळाले तर समाजाच्या सकारात्मक दृष्टीकोन तयार होतो; नवीन व आधुनिक आव्हानाला तोंड देण्यास आपल्या वागणुकीत बदल होतो आणि कठीण प्रसंगाना तोंड देण्यासही धैर्य मिळते. हे नियमित अभ्यासक्रम नवीन बदल केल्याने हे धाडस परिणामकारकरित्या मिळविता येते. स्थिर अभ्यासक्रमाने कुठलेही उद्देश साध्य होत नाही कारण तो वर्तमानातील व्यक्तीगत व सामाजिक गरजा व महत्त्वाकांक्षा पूर्ण करू शकत नाही.

फक्त हा हेतू साध्य करण्याकरिता पूर्ण देशातील शिक्षण तज्ञ नियमित काळाने मुद्दाम भेटतात आणि त्या बदलांची नितांत गरज व आवश्यकता आहे त्यावर विचार करतात. ह्याच चर्चा व मसलतीचे परिणाम म्हणून राष्ट्रीय अभ्यासक्रमाची मांडणी बाहेर आली, ह्यामध्ये योग्य असा / आवश्यक असलेला व शिक्षणाच्या विविध पातळीवर म्हणजेच प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक पातळीवर सविस्तर प्रकारचे शिक्षण तयार झाले.

ही मांडणी आणि इतर राष्ट्रीय व सामाजिक संबंध लक्षात घेऊन आम्ही माध्यमिक पातळीवर सर्व विषयांचा प्रचलित अभ्यासक्रमात दुरुस्ती केली; व हा अभ्यासक्रम प्रचलित गरजांवर आधारित आहे. पाठ्यपुस्तक तयार करणे हा राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्थेचा महत्त्वाचा व आवश्यक कार्यक्रम आहे. आणि त्यामुळे मुक्त व दूर शिक्षण पद्धत ही देऊ केली आहे. म्हणूनच हे शैक्षणिक साहित्य वापरणाऱ्या मैत्रीपूर्ण व लवकर आत्मसात होईल अशी मनोरंजक व आकर्षक होईल याची आम्ही विशेष काळजी घेतली आहे.

हे सर्व साहित्य आकर्षक व तुमच्या गरजेप्रमाणे तयार करणाऱ्या सर्व तज्ञ व्यक्तींचे आभारी आहे. मला आशा आहे की हे साहित्य तुम्हाला आवडेल आणि तुम्ही ते आत्मसात कराल.

राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थेच्या वतीने आपणास शुभेच्छा देते की तुमचे भावी आयुष्य उज्वल व यशस्वी होवो.

**डॉ. एस.एस.जेना**

अध्यक्ष (एनआयओएस)

# संचालकांचा अभिप्राय

प्रिय विद्यार्थ्यांनों,

राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थेची विद्यालयीन शाखा तुमच्या महत्त्वाच्या गरजा व आवश्यक तत्प्रमाणे नेहमीच नवीन कार्यक्रम आरण्याचा प्रयत्न करते. माध्यमिक पातळीवरील अभ्यासक्रमातील सर्व विषयांची उजळणी आम्ही करीत आहोत. देशातील इतर शैक्षणिक मंडळाच्या बरोबरीने हा अभ्यासक्रम आणण्यासाठी आम्ही शिक्षण मंडळाचा आणि विविध राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा सर्व विषयांसाठी सल्ला घेतला. राष्ट्रीय अभ्यासक्रम मांडणी ही राष्ट्रीय सल्लागार मंडळाचे शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण विभागाने विकसित केली आहे व ती संदर्भग्रंथ म्हणून ठेवली आहे. बहुव्यापक व तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर आम्ही असा अभ्यासक्रम तयार केला आहे की जो कार्य क्रम आणि आपल्या जीवनातील विविध स्थितींशी संबंधीत व (सुलभ) साधा असेल. आपल्या देशातील प्रमुख शिक्षणतज्ञ यामधे गुंतलेले आहेत आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार आम्ही हा अभ्यासक्रम पुन्हा तयार करून अद्ययावत केला आहे.

ह्याचवेळी आम्ही शैक्षणिक साहित्याकडेही बघीतले. ह्या अभ्यासक्रमातून जुने व अप्रचलित माहिती काढून टाकली आहे आणि त्यामध्ये नवीन व समर्पक गोष्टी साहित्याचा समावेश केला आहे आणि हा अभ्यासक्रम आकर्षक व सगळ्यांना आवडेल असा तयार करण्यासाठी आम्ही प्रयत्न केला आहे.

मला आशा आहे की हे नवीन साहित्य, जे आता तुमच्या हातात आहे ते मनोरंजक आणि उत्तेजक असे वाटते. यामध्ये अधिक सुधारणा करण्यासाठी काही सूचना असतील तर त्या आनंदाने स्विकारल्या जातील.

तुमच्या सुखी व यशस्वी भविष्यासाठी माझ्या शुभेच्छा आहेत.

**(डॉ. कुलदीप अग्रवाल)**
**संचालक (शैक्षणिक)**

# आपल्याशी हितगुज

**प्रिय विद्यार्थी मित्रहो,**

नुकतेच तुम्ही तुमचे ध्येय मिळविण्यासाठी पहिली पायरी घतली आहे. पुष्कळदा सुरू कुठलीही सुरुवात करणे ही फार कठीण गोष्ट आहे. तरीही जेव्हा तुम्ही सुरुवात करता तेव्हा तुम्हाला तुमच्याबद्दलच (छान) चांगले वाटते आणि त्यात सुधारणा करून तुम्ही जितके उत्तम बनु शकता तितके उत्तम होता. ह्या तुमच्या व्यक्तीगत वाढीसाठी, तुमच्या असे लक्षात येईल की तिथे भरपूर माहिती, ज्ञान व हुशारी मिळविण्यासारखे खूप काही आहे, त्याच बरोबर तुमच्या स्वत:बद्दल, इतरांबद्दल, जीवनाबद्दल आणि ज्या गोष्टी तुमच्या आसपास आहेत त्याबद्दल पूर्ण ज्ञान मिळते. (परिचय होतो.) तर आनंदाने ह्या शिक्षणाच्या प्रवासाला आपण सुरुवात करू या.

पूर्ण जगामधे शिक्षण पद्धतीमधे एकूण प्रवेशामधे आणि उद्दिष्टांच्या दृष्टीने बरेच बदल होत आहेत. तुमच्या अधिक फायद्यासाठी ने जीवनकौशल्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने साहित्य अधिक संपन्न करण्याचा पुढाकार घेतला आहे. आम्ही, फक्त तुम्हाला शिक्षणाचे सामर्थ्य द्यायचे नाही तर पण तुमची व्यक्तीगत व सामाजिक पात्रतासुद्धा वाढवण्याची आमची दूरदृष्टी आहे. सर्व विषयांच्या माहितीबरोबरच तुम्हाला ताण व तणाव यांचा सुद्धा सामना करता आला पाहिजे. तुमच्यामधे बरोबर की चूक, चांगले की वाईट, ह्यातील फरक ओळखण्याची क्षमता असली पाहिजे आणि तसेच तुमच्या जीवनातील कारकिर्दीविषयी योग्य निर्णय घेण्याची क्षमता असावी. ही संस्था तुम्हाला आव्हानात्मक स्थितीशी सामना करण्याच्या कौशल्यासाठी तयार करण्याकरिता प्रयत्न करीत आहे आणि अशा संधी निर्माण करते की जेणे करून तुम्ही अशा स्थितीमध्ये तुमचे स्वत:चे व समाजाचे नुकसान न करता तर्कशुद्ध, संवेदनशील आणि सकारात्मक मार्गाने त्याला प्रतिसाद देऊ शकाल.

NIOS ने ह्याकरिता अशी पद्धत वापरली आहे की ज्यामुळे जीवनकौशल्ये कोणत्याही आधाराशिवाय कोणत्याही विषयाचे समाधान देऊ शकतात तुमच्यासारख्या राष्ट्रीय मुक्त विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी हे साहित्य आहे; हे "एक छापील शिक्षकच आहे;" हे तुमच्याच जीवनातील अनुभवाच्या आधारीत लिहिलेले आहे.

नुसते माहीत असणे पुरेसे नाही; ती माहिती उपयोगात आणली पाहिजे. नुसती इच्छा असणे पुरेसे नाही. आपण काही कारणे आवश्यक आहे.

हे अभ्यासाचे साहित्य वाचताना इतर अनेक कृतीही सापडतील ज्यामधे पाठाच्या मधे मधे अंतर्गत प्रश्नही असतील. ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा. ह्या कृती तुम्हाला शिकण्याची व त्याचा सराव करण्याची संधी देण्याच्या दृष्टीने काळजीपूर्वक तयार केल्या आहेत. तुमचे शिक्षण अधिक चांगले होण्यासाठी व त्याचा विस्तार करण्यासाठी हे अंतर्गत प्रश्न तुम्हाला मदत करण्याचे यंत्र आहे. जीवन कौशल्ये ही अशी क्षमता आहे की ती प्रत्येकामध्ये असतेच; पण ती क्षमता वाढविण्यासाठी दक्षतेने सतत प्रयत्न केले पाहिजेत. ह्यातील पाठाचा अभ्यास करताना काही अधिक प्रयत्न न करतासुद्धा तुमच्या जीवन कौशल्याचा विकास होतो. आता तुम्ही पुढाकार घेणारे वाटसरू आहात आणि आमचा हा प्रयत्न यशस्वी करण्यात तुम्ही महत्त्वाची भूमिका करीत आहात.

आपल्यातील क्षमतेच्या सर्व गोष्टी केल्या तर, आपण स्वत:लाच चकीत करू.

प्रिय विद्यार्थ्यांनो, तुम्ही ह्या देशातील करोडो किशोरवयीन मुलांपैकी एक आहात. तुम्ही ह्या देशाचे भविष्य आहात. तुमच्यामधे अशी अंतर्गत क्षमता आहे की तुम्ही गर्दीमधे उभे रहाल आणि अधिक शोभून दिसाल. तुमच्या भूमिकेतील तुम्ही कशाची प्रशंसा कराल? पुढारीपणा / नेतृत्व संप्रेषण, कल्पकता, मनाची जागरूकता व लोकांशी तुमचे संबंध, ह्या सर्व क्षमतेमुळे तुम्ही सर्व गर्दीमधे उठून दिसता. म्हणूनच तुमच्या हातातील विषयाचा उच्च शिक्षीत होण्यासाठी खूप कष्ट करा. त्याचबरोबर तुमच्या व्यक्तीमत्वाच्या इतर बाबींचाही विकास करण्याचा प्रयत्न करा.

मला आशा आहे हे कि हे जीवनकौशल्याचे संपन्न साहित्य तुम्हाला बक्षिस देणारे आणि तुमच्या दैनंदिन जीवनात मदत करणारे असे वाटेल. हे जीवन कौशल्याचे संकलन करण्याचा उद्देश म्हणजे अनुकूल व सकारात्मक विचार करणे भावना व तुमच्यातील वागणूक ही हळूहळू तुमच्या मनात भरण्याचा आहे.

**अशीमा सिंग**
योजना समन्वयक
(किशोर शिक्षण योजना)
asheemasingh@nios.ac.in

# आपल्याशी हितगुज

**प्रिय विद्यार्थी मित्रांनो,**

माध्यमिक स्तरावरील सामाजिकशास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान आपले स्वागत करीत आहे. या अभ्यासक्रमाची दोन पुस्तके आहेत. पहिल्या पुस्तकामध्ये इतिहास व भूगोल हे विषय आहेत. तर दुसऱ्या पुस्तकामध्ये राज्यशास्त्र हा विषय आहे. समाजशास्त्रामध्ये मानवी समूहाचा अभ्यास केला जातो. मानवी समूहाची उत्क्रांति कशी झाली याची माहिती आपणास मिळते. जगभरातील मानवी संस्कृतींचा माहितीपट आपल्या समोर उलगडला जातो. या पुस्तकामध्ये प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन जगाची तसेच भारताची ही माहिती दिलेली आहे. भारतावर ब्रिटिश राजवटीचा झालेला परिणाम, त्यामुळे झालेले सामाजिक बदल आणि भारतीयांनी ब्रिटिश राजवटीला केलेला विरोध यासंबंधी तपशीलवार माहिती आपणास अभ्यासावयास मिळेल.

यानंतरच्या पाठातून आपणास भूगोल या विषयामधील सर्व संकल्पनांचा आणि माहितीचा परिचय करून दिला आहे. या पाठातून तुम्हला निसर्ग, पर्यावरण, साधनसंपत्तीचे स्त्रोत आणि मानवी उत्क्रांती यांच्यामधील परस्परसंबंधांचा उलगडा होईल. आपल्या जीवनकौशल्य पद्धती पर्यावरण संतुलन राखण्यास कशा उपयोगी पडतात याची माहिती आपणास मिळेल. पाठामध्येच आपल्यासाठी काही उपक्रम दिले आहेत. एखाद्या विषयाची माहिती गोळा करणे, एखाद्या घटनेचा सर्वांगीण अभ्यास करणे, समस्यांची उकल करणे यासारखे उपक्रम दिलेले आहेत. हे उपक्रम विषय अधिक चांगल्या तऱ्हेने समजावा यासाठी उपयुक्त आहेत. तसेच आपली वैचारिक पातळी उंचविणे, संपर्क कौशल्य वाढविणे आणि यासारखी अनेक कौशल्ये विकसित करण्यासाठीसुद्धा उपक्रमांचा उपयोग होईल. हे उपक्रम समजावून घ्या आणि ते पार पाडण्यासाठी पुरेसा वेळ काढा. ज्यायोगे आपले अनुभवविश्व आणि आयुष्य समृद्ध होण्याला मदत होईल.

हे पुस्तक आपल्याला केवळ परीक्षेसाठीच उपयोगी पडणार नसून ते आपल्याला आदर्श नागरिक बनण्यासाठीसुद्धा उपयुक्त ठरेल.

या पुस्तकाबाबतीत काही अडचण आली किंवा कोणतीही शंका आली तरी त्यावाबत आमच्याशी आवश्य संपर्क साधा. अभ्यासक्रमाबाबतच्या आपल्या प्रतिसादाची आम्ही वाट पाहत आहोत.

**श्रीमती तरुण पुनिया**
शैक्षणिक अधिकारी (भूगोल)
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण संस्थान, नोईडा (उत्तर प्रदेश)

**डॉ. चुन्नु प्रसाद**
शैक्षणिक अधिकारी (राज्यशास्त्र)
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण संस्थान, नोईडा (उत्तर प्रदेश)

**डॉ. अझमत नूरी**
शैक्षणिक अधिकारी (इतिहास)
राष्ट्रीय मुक्त विद्यालय
शिक्षण संस्थान, नोईडा (उत्तर प्रदेश)

# पाठयपुस्तक कसे वापराल ?

अभिनंदन, तुम्ही स्वत:च शिकण्याचे आव्हान स्विकारले आहे. प्रत्येक पायरीला NIOS तुमच्या बरोबर आहे आणि तज्ञाच्या गटाच्या मदतीने हे साहित्य तुम्हाला लक्षात ठेऊन इग्लीशमधे विकसित केले आहे. ह्या पुस्तकाचे स्वरूप स्वतंत्रपणे अभ्यास करण्याकरिता तयार केले आहे. ह्या पुस्तकाचे स्वरुप स्वतंत्रपणे अभ्यास करण्याकरिता तयार केले आहे. ह्यामधील दिलेल्या सूचना तुम्ही जर पाळल्यात तर ह्यामधून तुम्हाला जास्तीत जास्त चांगले ज्ञान मिळेल व ह्यामधे वापरलेले समर्पक व ठळक मुख्य मुद्दे तुम्हाला योग्य मार्गदर्शन करतील.

**शिर्षक :** ह्यामध्ये कशाचा समावेश केला आहे त्याची माहिती देईल ते वाचा. (त्याचे वाचन करा.)

**ओळख :** हे तुम्हाला त्या पाठाची ओळख करून देईल आणि ह्या पाठाचा आधीच्या पाठाशी काय संबंध असेल ते सांगेल.

**उद्दिष्टे :** हा पाठ वाचल्यानंतर ते तुमच्या शिकण्याचा काय परिणाम होईल याचे विधान असते. तुम्ही तो परिणाम मिळविणे अपेक्षित आहे म्हणून ते वाचा आणि तपासा की तो परिणाम तुम्ही मिळवला आहे.

**शब्दकोश :** तयार संदर्भ मिळविण्यासाठी

**नोट्स टिपण :** प्रत्येक पानावर कडेच्या समासामधे मोकळी जागा ठेवली आहे, त्यामध्ये तुम्ही महत्त्वाचे मुद्दे लिहून ठेवू शकता किंवा टिपण तयार करू शकता.

**आता आपण करू या :** ह्या साहित्याची कल्पना नीट समजावण्यासाठी काही विशिष्ठ कृती दिल्या आहेत.

**आता आपण ऐकू या :** काही ऐकण्याच्या कृती ह्यामध्ये दिल्या आहेत. त्या तुमची ऐकण्याची क्षमता विकसीत करण्यासाठी दिल्या आहेत.

**आतर आपण बोलू या :** ही कृती तुमचे संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी दिली आहे. सूचना दिलेल्या सूचनेप्रमाणे प्रामाणिकपणे ह्याचा सराव करा.

**अंतर्गत प्रश्न :** खूप लहान उत्तरे असलेले, स्वत:च तपासण्यासारखे प्रश्न ह्याच्या प्रत्येक भागात विचारले आहेत, पाठाच्या शेवटी ह्या प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. तुमची प्रगती तपासून घेण्यासाठी याची मदत होईल. ते प्रश्न तुम्ही सोडवा. यशस्वीपणे ते पूर्ण केले तर तुम्हाला ठरविता येईल की पुढच्या पाठाकडे वळायचे की पुन्हा तोच पाठ परत शिकायचा.

**आता आपण व्याकरण शिकूया :** भाषा शिकण्याचा प्रमुख व महत्त्वाचा भाग म्हणजे व्याकरण हे आवश्यक ती माहिती देतानाच तुमची क्षमता वाढविण्यास ही उपयोगी ठरते.

**आता आपण लिहू या :** तुमचे लिखाणाचे कौशल्य अधिक उत्कृष्ट होण्यास हे लिहिणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक पाठाच्या प्रत्येक मुद्यामुळे (प्रश्नोत्तरामुळे) लिहिण्याची संधी तुम्हाला मिळते. परिणामकारक व सर्वबाजूने लिहिण्याचे कौशल्य साधण्यासाठी लिखाणाच्या कृतीचा सराव करा.

**तुम्ही काय शिकलात? :** ह्यामध्ये पाठातील सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांचा सारांश दिला असतो. ह्याची उजळणी करण्यास आणि सारांश तयार करण्यास मदत होईल. तुम्ही त्यामध्ये तुमचे स्वत:चे मुद्दे घातलेत तर त्याचे स्वागतच होईल.

**चाचणी परीक्षेचे प्रश्न :** हे दिर्घ व लघु प्रकारचे प्रश्न असून ते तुम्हाला पाठातील प्रकरण समजून घेण्यास व त्याचा सराव करण्याची संधी देते.

**तुम्हाला माहीत आहे काय? :** ह्या चौकोनी रकान्यात ठळकपणे या विषयाची अतिरिक्त माहिती दिलेली असते. हे चौकोनी रकाने फार महत्त्वाचे असून त्याकडे विशेष लक्ष द्यावे. ते तुमचे मूल्यांकन करण्यासाठी नसून तुमचे सामान्य ज्ञान वाढविण्यासाठी उपयुक्त आहेत.

**उत्तरे :** तुम्ही तुमच्या प्रश्नांची उत्तरे किती बरोबर लिहिली आहेत हे माहीत करण्यासाठी ह्या उत्तरांचा उपयोग होतो.

**वेब साईट :** ह्या वेबसाईटमुळे तुमच्या शिक्षणात वाढ करण्यास मदत होते. आवश्यक ती माहिती त्या पाठाच्या विषयात समाविष्ट केली असते, आणि तुम्ही आणखी जास्त माहिती मिळविण्यासाठी याचा संदर्भ घेऊ शकता.

# अभ्यासघटक
# १

**विभाग - १**

**जग आणि भारत -समग्र इतिहास मानवी समाजाची उत्क्रांती**

१ प्राचीन जग
२ मध्ययुगीन जग
३ आधुनिक जग - १
४ आधुनिक जग - २
५ भारताच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर ब्रिटिश राजवटीचे परिणाम (१७५७-१९५७)
६ वसाहतकालीन भारतातील धार्मिक व सामाजिक चळवळी
७ ब्रिटिश राजवटीला जनतेचा विरोध
८ भारतीय राष्ट्रीय चळवळ

**विभाग - २**

**भारत नैसर्गिक पर्यावरण, साधन संपत्ती आणि प्रगती**

९ भारताची प्राकृतिक रचना
१० हवामान
११ जैव विविधता
१२ भारतीय शेती
१३ वाहतूक व संदेशवहन
१४ लोकसंख्या : आपली सर्वोच्च संपदा

# २

**विभाग - ३**

**सद्यस्थितीतील कार्यरत लोकशाही**

१५ भारतातील संविधानात्मक मूल्ये आणि राजकीय व्यवस्था
१६ मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये
१७ भारत-कल्याणकारी राज्य
१८ स्थानिक सरकार व त्यांचे प्रशासन
१९ राज्य शासन व्यवस्था
२० केंद्रशासन
२१ राजकीय पक्ष आणि दबाव गट
२२ लोकशाही प्रक्रियेतील जनतेचा सहभाग

**विभाग - ४**

**सद्यस्थितीतील भारत-समस्या आणि उद्दिष्टे**

२३ भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने
२४ राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मनिरपेक्षवाद
२५ सामाजिक, आर्थिक विकास आणि दुर्बल गटांचे सबलीकरण
२६ पर्यावरणाचा ऱ्हास आणि आपत्ती व्यवस्थापन
२७ शांतता आणि सुरक्षा

# अनुक्रमणिका

**विभाग - १ जग आणि भारत-समग्र इतिहास मानवी समाजाची उत्क्रांती**


| पाठ क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| | सामाजिक शास्त्र - प्रस्तावना | १ |
| १ | प्राचीन जग | २४ |
| २ | मध्ययुगीन जग | ४५ |
| ३ | आधुनिक जग - १ | ६३ |
| ४ | आधुनिक जग - २ | ८२ |
| ५ | भारताच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर ब्रिटिश राजवटीचे परिणाम (१७५७-१९५७) | १०४ |
| ६ | वसाहतकालीन भारतातील धार्मिक व सामाजिक चळवळी | १२५ |
| ७ | ब्रिटिश राजवटीला जनतेचा विरोध | १४३ |
| ८ | भारतीय राष्ट्रीय चळवळ | १६५ |


**विभाग - २ भारत नैसर्गिक पर्यावरण, साधन संपत्ती आणि प्रगती**


| पाठ क्र. | पाठाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| ९ | भारताची प्राकृतिक रचना | १८७ |
| १० | हवामान | २०८ |
| ११ | जैव विविधता | २२७ |
| १२ | भारतीय शेती | २४५ |
| १३ | वाहतूक व संदेशवहन | २६६ |
| १४ | लोकसंख्या : आपली सर्वोच्च संपदा | २८९ |

# सामाजिक शास्त्र - प्रस्तावना

समजा तुम्ही कालयांत बसला आहात आणि १०० वर्षे मागे म्हणजे तुमचे आजोबा जेव्हा लहान होते, त्या काळात गेला आहात, तर त्या काळची परिस्थिती (आजच्या परिस्थितीच्या तुलनेत) अगदी वेगळी आहे, हे तुमच्या लक्षात येईल. याहीमागे अजून ३००४०० वर्षे गेलात तर सर्वच परिस्थिती घरे, कपडे, खाद्यपदार्थ, अगदी बोलीभाषासुद्धा पूर्णपणे बदलल्याचे तुमच्या लक्षात येईल.

पूर्वी काय घडले यासंबंधी तुम्हाला कुतूहल वाटते ना? भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टींविषयीचे रहस्य तुम्हाला उलगडावेसे वाटले ना? त्यासाठीच माहितीचे काही स्त्रोत वापरून. प्राचीन काळापासून आजतागायत मानवी जीवनाची प्रगती कशी झाली, ते आपण पाहू या.

## उद्दिष्टे :


या पाठाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला खालील गोष्टी समजतील.

- ❖ सामाजिक शास्त्रामध्ये इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र यांचा समावेश होतो, हे लक्षात येईल.
- ❖ वरील सर्व विषय परस्परांशी संबंधित आहेत आणि सर्व विषयांची माहिती एकत्रित होऊन सामाजिक शास्त्राचे ज्ञानाचे भांडार तयार होते, हे समजेल.
- ❖ मानवी समाजाच्या प्रगतीच्या टप्प्याविषयी चर्चा करता येईल.
- ❖ आजच्या समाजापुढे असणाऱ्या संधी आणि आव्हाने यांची माहिती घेता येईल.

## ०.१ सामाजिक शास्त्रे ˆ एक अभ्यास विषय :

विषयाच्या नावावरूनच हा विषय समाजाशी संबंधित आहे, हे आपल्या लक्षात येते. समाजाचा सर्व अंगांनी अभ्यास करणे आणि सामाजिक समस्यांवर उपाय शोधणे, हा हेतू या विषयाचा अभ्यास करण्यामागे आहे. या विषयाचा आवाका फार मोठा असून अनेक विषयांचा या विषयाच्या अभ्यासात समावेश होतो. त्यापैकी अभ्यासाच्या या टप्प्यावर तुम्हाला खालील विषयांची माहिती आवश्यक आहे.

- ❖ इतिहास आणि पुरातत्वशास्त्र
- ❖ भूगोल



टिपा



- राज्यशास्त्र
- समाजशास्त्र
- अर्थशास्त्र

सामाजिक शास्त्राच्या अभ्यासक्रमातील पाठ्यघटक आणि उपघटक या विषयांशी संबंधित आहेत. या भागामध्ये आपण इतिहास या विषयाची माहिती घेणार आहोत. सामाजिक शास्त्र शिकण्याची आवश्यकता का आहे आणि हा विषय आपल्या जीवनाशी किती जवळून निगडीत आहे. हेही आपण पाहणार आहोत. गुहेत राहणाऱ्या आदिमानवापासून आजच्या काळात गगनचुंबी इमारतीत राहणाऱ्या मानवापर्यंत मानवी संस्कृती अनेक टप्प्यांतून गेलेली आहे. आपण इतिहास शिकताना फक्त या टप्प्यातील घटनांची माहिती घेणार नसून, त्या माहितीतून काही बोधही घेणार आहोत. सामाजिक शास्त्राच्या अभ्यासातून हे विषय परस्परांशी कसे संबंधित आहेत, हे सुद्धा आपल्याला समजेल. आपण हे संबंध समजावून घेणार आहोत आणि कालानुरूप कशी प्रगती झाली आहे, हे पाहणार आहोत. यामुळे आपल्याला आपला भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांची सांगड घालता येणार आहे. या विषयांचा आपल्या जीवनावर काय परिणाम झाला आहे हे आपण आता या अभ्यासातून समजावून घेऊ.


माध्यमिक स्तरावर सामाजिक शास्त्राचा अभ्यास केला तर त्या अभ्यासाचा उपयोग आपल्याला भोवतालचा समाज समजावून घेण्यासाठी कसा होईल, यासंबंधी आपण काही विचार केला आहे का?

याचे स्पष्टीकरण कमीत कमी दोन कारणे देऊन करा.

## ०.२ सामाजिक शास्त्राचा अभ्यास :

एखादा विषय किंवा त्या विषयातील माहिती म्हणजे ज्ञानवृक्षाचीच शाखा असते, या ज्ञानवृक्षाच्या शाखेचा अभ्यास वेगवेगळ्या शैक्षणिक स्तरावर होत असतो आणि या विषयातील संशोधन विद्यापीठ पातळीवर होत असते. प्रत्येक विषयाच्या शाखेला अनेक विषयांच्या उपशाखा असतात. (म्हणजेच प्रत्येक विषयामध्ये अनेक घटक, उपघटक असतात.) या उपशाखा परस्परात गुंतलेल्या असतात. (विषयांचे घटक उपघटक एकमेकात मिसळलेले असतात, एकमेकांवर अवलंबून असतात.) सामाजिक शास्त्राच्या प्रमुख उपशाखा पुढील प्रमाणे आहेत.

- इतिहास आणि पुरातत्वशास्त्र
- भूगोल





- राज्यशास्त्र
- समाजशास्त्र
- अर्थशास्त्र

तुम्हाला हे ऐकून नक्कीच आश्चर्य वाटेल की प्राचीन काळी एकच अभ्यासविषय (विद्याशाखा) होता, तो म्हणजे तत्वज्ञान. तत्वज्ञान म्हणजे ज्ञान आणि बुद्धिमत्ता याविषयी असणारा जिव्हाळा होय. त्यामुळे आजसुद्धा कोणत्याही विषयात उच्च दर्जाचे / कोटीचे प्राविण्य मिळविल्यानंतर त्या विद्वानाला Ph. D. (Doctor of Philosophy) ही सर्वात उच्च कोटीची पदवी प्रदान करण्यात येते. जसजसा ज्ञानाचा विस्तार होत गेला, तसतसे ज्ञानाचे वर्गीकरण करण्याची गरज भासू लागली. सुरवातीला सामाजिक शास्त्रे आणि विज्ञान असे वर्गीकरण करण्यात आले. या दोन्ही ठिकाणी भिन्न भिन्न प्रकारच्या ज्ञानाचे एकत्रीकरण करण्यात आले. विज्ञान म्हणजे निसर्ग आणि भौतिक जगासंबंधीचे ज्ञान होय. समाजशास्त्र म्हणजे मानवाच्या आणि समाजाच्या इतर सर्व बाबींसंबंधी विचार करणारे शास्त्र होय.

आता आपण इतिहासापासून सुरवात करू या.

## ०२.१ इतिहास आणि पुरातत्वशास्त्र :

इतिहास म्हणजे काय? (इति + अ + हास) हे असे घडले म्हणजेच भूतकाळात घडलेल्या गोष्टींची समग्र माहिती होय. ही माहिती भूतकाळातील खऱ्या व्यक्ती आणि खऱ्या गोष्टी याविषयी असते. ही माहिती काल्पनिक किंवा वैचारिक नसते. तर घडून गेलेल्या घटनांसंबंधी असते. इतिहासाला व्यक्तीगत माहितीत रस नसतो. इतिहास हा समाजाशी व राष्ट्राशी संबंधीत असतो. इतिहास फक्त राजा, राणी, राजघराणी यांची दखल घेत नाही. तर तो सर्व मानव जातीची दखल घेतो. इतिहास धर्म, जात, प्रांत, गरीब, श्रीमंत असा कोणताही भेद न करता सर्व मानव जातीचा विचार करतो. प्राचीन काळी आपल्या पूर्वजांच्या आयुष्यात काय घटना घडल्या याविषयी आपण कुतूहल असेलच. याच गोष्टींविषयी आपण या पुस्तकात वाचणार आहात. वाचता वाचता आपल्याला ज्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात, ज्या गोष्टींविषयी कुतूहल निर्माण झाले, अशा सर्व गोष्टींची नोंद करा. या गोष्टींची अधिक माहिती घेण्यासाठी ग्रंथालयाचा वापर करा किंवा ती माहिती इंटरनेटवर शोधण्याचा प्रयत्न करा. अधिक ज्ञान मिळविण्याच्या प्रयत्नात आम्ही तुम्हाला जरूर साथ देऊ.

### आपण इतिहास या विषयाचा अभ्यास का करतो?

आपण इतिहासाचा अभ्यास केल्याने आपल्याला आपल्या पूर्वजांची माहिती मिळते. त्यांनी मोठ्या कष्टाने केलेल्या प्रगतीची व अडचणींची कल्पना येते. त्यांच्याबाबती आपल्याला अभिमान वाटतो. तसेच पुढच्या प्रगतीची दिशाही स्पष्ट होते. आपल्याला भूतकाळाची जाण नसल्यास आपण प्रगतीची संकल्पना स्पष्ट करू शकणार नाही.

इतिहास फक्त भूतकाळच विचारात घेतो, असा सर्वसाधारण समज आहे. परंतु प्रत्यक्षात इतिहासापासून आपणास वर्तमानकाळासाठी तसेच भविष्यकाळासाठीही उत्कृष्ट मार्गदर्शन मिळते. ऐतिहासिक परंपरांचा आपल्या आयुष्यावर परिणामकारक प्रभाव पडतो. इतिहासाचा अभ्यास केल्याने गतकाळातील स्त्रीपुरुषांनी उत्तम जीवन जगण्यासाठी परस्पर सहकार्याने काय प्रयत्न केले, याचा चित्रपटच आपल्यासमोर

उलगडत जातो. गतकाळाची माहिती कशी मिळवावी. याचा विचार करता पुरातत्वशास्त्र आपल्या डोळ्यापुढे येते. गतकाळातील घटना आणि संपादणूक याचा आपल्याला गर्व वाटतो. हा ठेवा आपण पुढील पिढ्यांसाठी सांभाळून ठेवू या.

पुरातत्वशास्त्र म्हणजे प्राचीन काळातील समाजरचना व संस्कृती यांचा मागोवा घेण्याचे शास्त्र होय. याचा सुगावा आपणास प्राचीन वस्तू व उत्खननात सापडलेले अवशेष प्राचीन मोडकळीस आलेल्या इमारती, स्मारके यांच्यामुळे लागतो. यांचा अभ्यास पुरातत्वशास्त्रज्ञ करतात. हे अवशेष ज्या काळातील आहेत, त्या काळाविषयी माहिती हे शास्त्रज्ञ आपणास देऊ शकतात. अतिप्राचीन काळातील लेखी नोंदी आणि कागदपत्रे तसेच लेखी दस्ताऐवज (कधीकधी या नोंदी ओळखणे व त्याचा अर्थ लावणे कठीण जाते.) यापासून आपणास त्या काळाविषयी खात्रीशीर माहिती मिळते.

बऱ्याच वेळा या गोष्टी जमिनीखाली खोलवर असतात आणि त्यांना खणून काढावे लागते. या प्रक्रियेला पुरातत्व उत्खनन असे म्हणतात. मोहेंदोजडो, हरप्पा आणि नालंदा या ठिकाणी अशी उत्खनने केली गेली आणि त्या काळासंबंधी बहुमोल माहिती हाती आली. या प्रकारच्या उत्खननाची समग्र माहिती वर्तमानपत्रातूनसुद्धा जाहीर केली जाते. गुजराथच्या किनाऱ्यावर नुकतेच समुद्रात उत्खनन केले गेले आणि एका उत्तम शहराचे अवशेष त्या ठिकाणी आढळून आले. हे शहर म्हणजे भगवान कृष्णाचे द्वारका असावे असा अंदाज आहे. हरियानामध्ये राखीगढी येथेसुद्धा महत्त्वाचे उत्खनन चालू आहे.

या उत्खनन क्षेत्रांना शक्य असेल तर अवश्य भेट द्या. उत्खननातील वस्तू तुम्हाला त्या काळात घेऊन जातील. इतर देशात चालू असलेल्या उत्खननांची माहिती घ्या.

उत्खननात सापडलेले शिलालेख, स्तूप, धातू, पट्ट्या, नाणी, शिक्के, स्मारके, हत्यारे, मातीच्या भांड्याचे तुकडे किंवा भांडी, खेळणी, चित्रे हे माहिती देणारे अतिमहत्त्वाचे स्त्रोत आहेत. त्या काळातील चित्रे, शिक्के, बांधकामे, बांधकामांचे अवशेष आपल्याला त्या संस्कृतीविषयी विशेष माहिती देतात. यासाठी आपल्या शहरातील वस्तूसंग्रहालयाला भेट द्या किंवा आपल्या गावातील ज्या व्यक्तीला अशा प्रकारच्या वस्तू जमविण्याचा छंद आहे. त्याच्या घरी जाऊन अशा वस्तूंची माहिती घ्या. अशा वस्तुंची यादी करा. त्या कोणत्या कालखंडातील आहेत, याची माहिती घ्या. माहितीसाठी ग्रंथालय किंवा माहितीजालाचा (internet) वापर करा. सध्यासुद्धा अशा प्रकारची माहिती वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके यामधून उपलब्ध आहे.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या अखत्यारीत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण संस्था (ASI The Archaeological Survey of India) कार्यरत आहे. या संस्थेकडे देशातील पुरातत्वीय संशोधन व सांस्कृतीक स्मारकांचे संरक्षण ही कामे आहे. प्राचीन स्मारके उत्खनन क्षेत्रे आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या पुराणवस्तू याबाबतीत काळजी ही संस्था घेते. या कामासाठी संस्थेने संपूर्ण देशाचे चोवीस उपविभाग केले आहेत. उत्खनन क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी संस्थेकडे तज्ञ लोक, प्रशिक्षित, पुरातत्वशास्त्रज्ञ, काळजीवाहूतज्ञ, शिलालेखवाचक, स्थापत्यतज्ञ आणि शास्त्रज्ञांचा फार मोठा ताफा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संस्थेच्या www.asi.nic.in या महाजालशाखेला (website) भेट द्या.

## पाठ्यांशावरील प्रश्न ०.१

१. सामाजिक शास्त्रामध्ये कोणकोणत्या विषयांचा समावेश होतो?

२. इतिहासाचा अभ्यास करणे जरूरीचे आणि महत्त्वाचे आहे का? आपल्या म्हणण्याला पुष्टी देणारी दोन कारणे सांगा.

३. इतिहास आणि पुरातत्वशास्त्र यामध्ये कोणता फरक आहे?

४. भूतकाळाचा अभ्यास करताना उपयोगी पडणारे कोणतेही पाच स्त्रोत सांगा.

५. पाठात वर्णन केल्याव्यतिरिक्त भारतातील इतर कोणतीही चार उत्खनन क्षेत्रे सांगा.

## ०२.२ भूगोल

ज्या विभागातील उत्खननाची, पुरातत्वशास्त्राची आणि इतिहासाची माहिती आपण घेत आहोत, त्या विभागाची भौगोलिक माहिती आपण घेतली नाही, तर आपला वरील अभ्यास अपूर्णच राहील.

भूगोल म्हणजे पृथ्वीवरील भूस्वरूपे, रहिवासी, स्थळे आणि पर्यावरणाचा अभ्यास होय. थोडक्यात ज्या जगात आपण राहतो, त्याची सर्वांगीण माहिती म्हणजे भूगोल होय. भूगोलामुळेच सामाजिक शास्त्र आणि नैसर्गिक शास्त्र यामधील दरी मिटविण्यास मदत झाली आहे. त्यासाठी मानवी भूगोलाचा भौतिकी भूगोलावरोबर अभ्यास केला जात आहे.

कोणत्याही समाजाची जीवनशैली आणि इतिहास यामध्ये भूगोलाचा अतिशय महत्त्वाचा वाटा आहे. भूगोलामुळे आपणास भूस्वरूपीय, पर्यावरणीय, सांस्कृतिक, अर्थशास्त्रीय आणि राजकीय प्रणालीमधील फरक कळू शकतात. या सर्वांमधील परस्परसंबंध जाणण्यासाठीसुद्धा भूगोलाचा उपयोग होऊ शकते. भूगोलाचा उपयोग आपल्याला इतर क्षेत्रातील ज्ञान मिळविण्यासाठी होतो. जर एखाद्या देशाची भौगोलिक परिस्थिती आपणास माहित असेल, तर त्या देशाच्या इतिहासाचीसुद्धा आपण कल्पना करू शकतो.

आदिमानवाने धनुष्य, बाण आणि इतर आयुधे तयार का केली याचा उलगडा आपणास तो ज्या भौगोलिक परिस्थितीत (पर्यावरणात) राहत होता, त्याचा अभ्यास केल्यानंतर होईल.

हिमयुगानंतर पर्यावरणात पुष्कळ बदल झाला, त्यामुळे घनदाट अरण्य परिसरांचे गवताळ प्रदेशात रूपांतर झाले. त्यामुळे काय झाले असेल याचा अंदाज करा. तुमचा अंदाज बरोबर आहे. त्यामुळे शेळ्या, मेंढ्या, हरणे या तृणभक्षक प्राण्यांची संख्या बेसुमार वाढली. हे प्राणी अतिशय जलद गतीने पळणारे होते. त्यामुळे अवजड शस्त्रांनी त्यांची शिकार करणे शक्य नव्हते. यामुळे बाण, भाला या सारख्या हलक्या शास्त्रांचा शोध आदिमानवाने लावला. त्याला शिकार मिळू लागली आणि त्याची उपजीविका होऊ लागली.

गंगेचे खोरे अतिशय सुपीक आहे. कारण गंगा नदीमुळे पिण्यासाठी आणि शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध होते. त्यामुळेच गंगा नदीच्या खोऱ्यात मौर्य, गुप्त, मोगल ही घराणी उदयास आली. या

खोऱ्यात लोहखनिजाचा मोठा साठा आहे. त्यामुळेसुद्धा या घराण्यांच्या राज्यविस्तारास मदत झाली. तुम्ही या बाबतीत काही तर्क करू शकता का? याबाबत अधिक माहिती आपणास चौथ्या पाठात मिळेल.

### अभ्यास ०.१

आग्रा, नाशिक, पटणा, कलकत्ता यासारखी शहरे मोठ्या नद्यांच्या तीरावरच वसली आहेत. यामागे मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमीसुद्धा आहे. या शहरांची व्यापारीपेठा व राजधानीची शहरे (प्रशासन केंद्रे) म्हणून वाढ का झाली, या संदर्भात कोणतीही तीन कारणे सांगा.

### ०.२.३ राज्यशास्त्र :

प्रशासन हा शब्द आपल्या परिचयाचा आहे. हा शब्द आपण रोज वाचतो, रेडिओवर ऐकतो, दूरदर्शनवर पाहतो. प्रशासन म्हणजे काय याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? आपल्या दैनंदिन जीवनात प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रशासन लोकांच्या भल्यासाठी काम करते. देशाचे प्रशासन कायदा करते, हा कायदा प्रत्येक नागरिकासाठी बंधनकारक असतो. लोकशाहीमध्ये आपणच मतदान करून शासनाची (म्हणजेच लोकप्रतिनिधींची) निवड करतो. अशा तऱ्हेने नागरिकच प्रतिनिधीगृहाला (भारतात लोकसभेला) कायदा करण्यास मदत करतो. राजेशाहीमध्ये राज्य करणारा राजा किंवा राणी कायदा करते व तो लोकांवर लादला जातो. आपले राज्यकर्ते कसे असावेत, यासंबंधीचा उहापोह सामाजिक शास्त्र करते.

देश आणि प्रशासन चालविण्यात लोकांची भूमिका काय असावी हेसुद्धा समाजशास्त्राच्या अभ्यासावरून कळते. या विद्याशाखेस राज्यशास्त्र असे म्हणतात. राजकीय गृहितके, त्याची अंमलबजावणी, राजकीय शासनप्रणालीची जडणघडण, पृथक्ककरण आणि वर्तणूक यांचा अभ्यास म्हणजे राज्यशास्त्र होय. शासन कसे निवडले जाते, हे आपणास राज्यशास्त्र सांगते. राजकीय तज्ज्ञ राजकीय घटना आणि परिस्थिती यांचे विश्लेषण करतात. त्यामधील परस्परसंबंध स्पष्ट करतात. जागतिक पातळीवर चालणाऱ्या राजकारणामधील कार्यकारभाव जाणतात. यामध्ये जगातील सर्व देशांच्या राजकीय विचारधारा, प्रक्रिया, पद्धती आणि वर्तणूक यांचा अभ्यास असतो.

उच्च माध्यमिक पातळीवर राज्यशास्त्राच्या राजकीय गृहीतके, राजकीय तत्वज्ञान आणि राजकीय अर्थकारण या तीन महत्त्वाच्या शाखांचा अभ्यास होतो.

### ०.२.४ समाजशास्त्र :

सामाजिक शास्त्राची समाजशास्त्र ही फार महत्त्वाची शाखा आहे. सामाजिक दृष्टीकोणातून व्यक्तीच्या वर्तमानाचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय. मानवी समूहाचा, वर्तणुकीचा अभ्यास हा समाजशास्त्राचा मुख्य गाभा आहे. इंग्रजीमधील sociology (समाजशास्त्र) हा शब्द मूळ लॅटीन शब्द Sociologie पासून आला आहे. या लॅटीन शब्दाचा अर्थ आपल्या सहकाऱ्याचा अभ्यास असा होतो. समाजरचना आणि समाजाची वर्तणूक यासंबंधी समाजशास्त्र विचार करते. आपल्या समाजाच्या घडणीस कोणकोणते घटक कारणीभूत होतात, ते समजावून घेणे, ते निश्चित करणे. हे समाजशास्त्राचे काम आहे. हे घटक

म्हणजे वंश, लिंग, संस्कृती, धर्म, चालीरिती आणि शासन होत. वैयक्तिक वर्तणूक आणि समूहाच्या वर्तणूकीचा समाजावर काय परिणाम होतो, याचासुद्धा अभ्यास समाजशास्त्र करते.

### ०.२.५ अर्थशास्त्र :

समाजात राहून आपल्या चरितार्थ कसा चालवावा, यासंबंधी आपल्या संकल्पना स्पष्ट असल्याच पाहिजेत. आपले उत्पन्न, वेळ आणि साधनसामुग्री यांचा योग्य उपयोग कसा करावा, हे आपण शिकलेच पाहिजे, कारण या तीनही गोष्टी मर्यादित स्वरूपातच उपलब्ध आहेत. आपल्याला आवश्यक असणाऱ्या गोष्टी करण्यासाठी वेळेचे नियोजन करता आले पाहिजे. आपल्याला उपलब्ध असणाऱ्या पैशामधेच आपल्या घरचे अंदाजपत्रक (खर्च) बसवता आले पाहिजे. त्यामुळे खूप अनावश्यक गोष्टी टाळता येतील. यालाचा अर्थशास्त्र असे म्हणतात.

अर्थशास्त्र म्हणजे फक्त अंदाजपत्रक तयार करणे एवढेच नाही तर उत्पादन, उपभोग आणि संपत्ती बाबतीत मानवाची वर्तणूक कशा प्रकारची आहे, याचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे अर्थशास्त्र होय. ज्यावेळेस आपल्याकडे मर्यादित साधनसामुग्री असते त्यावेळेस तर ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची ठरते. आपल्या गरजा आणि उपलब्ध साधनसामुग्री यामध्ये संतुलन साधणे सामाजिक शास्त्राचे काम आहे. या विषयाचा अभ्यास करताना या विषयाची गृहीतके आपल्या रोजच्या जीवनातील घटनांशी पडताळून पाहणे मनोरंजक ठरेल. त्या दृष्टीने आपले अंदाजपत्रक किंवा वेळापत्रक तयार करून पहा.

मानवी समाजाची जडणघडण बदलाचे टप्पे या समजण्यासाठी समाजशास्त्रातील सर्व विषयांचा अभ्यास आवश्यक आहे. त्यासाठी आपण आदिमानवाच्या काळापर्यंत जाऊ या. आदिमानवापासून आजपर्यंत झालेल्या प्रगतीचे टप्पे आपण पाहू. विज्ञानामध्येसुद्धा मानवाचे उत्क्रांतीचे टप्पे आहेत, हे आपणास माहिती आहेत. निसर्गात प्राणी आणि वनस्पती यांची उत्क्रांती कशी झाली हे पाहणे मनोरंजक आहे. मानवाचे जीवशास्त्रीय नाव Home sapiens (मानवप्राणी) हे आपणास माहिती आहे का? या मानवप्राण्याबद्दल अधिक माहिती आपण पुढच्या विभागात घेऊ.

### पाठ्यांशावरील प्रश्न ०.२


१. इतिहास समजावून घेण्यासाठी भूगोलाचा कसा उपयोग होतो ते सांगा.

२. राज्यशास्त्राचा अभ्यास म्हणजे काय?

३. समाजशास्त्राचा मुख्य गाभा कोणता?

४. अर्थशास्त्राचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे काय?

५. सामाजिक कार्यपद्धती अधिक चांगल्या रीतीने समजण्यासाठी राज्यशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा कसा उपयोग होतो?







## ०.३ मानवाची उत्क्रांती :

सुमारे २० लाख वर्षांपूर्वी मानवसदृश्य प्राणी पृथ्वीतलावर वावरू लागला. हा प्राणी एप जातीच्या माकडासारखा दिसत असे. जीवशास्त्रज्ञ त्याला Homo sapiens (लॅटिन भाषेतील या शब्दाचा अर्थ मानवासारखा असा होतो.) या नावाने ओळखतात. या मानवसदृश्य प्राण्याला शेती करता येत नव्हती. घरे बांधता येत नव्हती. हा प्राणी गुहेत किंवा झाडावर राहत असे.

त्यानंतर पुष्कळ वर्षांनी लेखन कलेचा शोध लागला. लेखनकलेचा शोध हा मानवी उत्क्रांतिमधील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. कारण त्या त्या काळातील लिखित स्वरूपातील मजकुरामुळेच त्या काळची अधिकृत माहिती कळते. लेखन कलेचा शोध लावण्या अगोदरच्या काळासंबंधी अधिकृत स्वरूपातील काहीच माहिती उपलब्ध होत नाही. या काळात अलिखित इतिहास काळ (prehistory) असे म्हणतात. लिखित इतिहास काळापेक्षा अलिखित इतिहास काळ खूपच मोठा आहे. या दोघांना मिळून आपण इतिहास म्हणतो. अलिखित इतिहास काळातील समाजजीवनाचा शोध इतिहासतज्ञ आणि पुरातत्वशास्त्रज्ञ त्या काळातील सापडलेली औजारे, हत्यारे दागिने, गुहेत त्यांनी काढलेली चित्रे याद्वारे घेतात. लिखित स्वरूपातील उदा.ʻ शिलालेख, स्तूप, ताम्रपत्र आणि अगदी अलिकडच काळात कागद यावरून मानवी उत्क्रांतीची अत्यंत खात्रीशीर माहिती मिळते.

### ०.३.१ अश्मयुग

आदिमानव हा भटकणारा प्राणी होता. तो अन्नासाठी स्थलांतर करीत असे. आदिमानव कळप करून हिंडत होता. कळप केल्याने आदिमानवाचा जंगली प्राण्यांपासून बचाव होत असे. त्याला सामाजिक सुरक्षा व साहचर्यही मिळत असे. आदिमानवाने दगडांची हत्यारे बनविण्यास सुरवात केली. म्हणून या काळाला अश्मयुग असे म्हणतात. प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यात मानवाने दगडाचा उपकरण म्हणून वापर केला आणि प्रत्येक टप्प्यावर मानवाने दगडापासून पहिल्या टप्प्यातल्या उपकरणापेक्षा पुढच्या टप्प्यात अधिक प्रगत उपकरण बनविले. त्याचा उपयोग चांगले आणि सुरक्षित जीवन जगण्यासाठी झाला. अश्मयुगाचे प्रमुख टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) अतिप्राचीन अश्मयुग ʻ (पॅलिओलिथिक काळ इ. स. पूर्व ५ लाख ते इ. स. पूर्व ५ हजार वर्षे) ʻ**

अतिप्राचीन अश्मयुग काळात मानव प्राणी डोंगर उतारावर व शक्यतो नदीजवळ वस्ती करत असे. नदीमुळे त्यांना पाणी मिळत असे. तसेच पाणी पिण्यासाठी आलेल्या जनावरांना मारून अन्न ही मिळत असे. डोंगरउतारावर असणाऱ्या गुहांचा वसतिस्थान म्हणून उपयोग करता येत असे. त्यामुळे त्यांच्या पाणी, अन्न आणि निवारा या प्राथमिक गरजा भागत असत. आदिमानव गुहेमध्ये राहणाऱ्या अस्वलसारख्या प्राण्यांना हाकलून देऊन ती गुहा स्वत:चे वसतिस्थान म्हणून वापरत असे. यावरून आदिमानव किती प्राथमिक अवस्थेत आणि असुरक्षित स्थितीत जीवन जगत होता, हे आपल्या लक्षात येईल.

शरीर झाकण्यासाठी आपण थंडी वा गरमीपासून बचाव करण्यासाठी मानव प्राणी झाडांच्या साली किंवा वाळवलेली मृत प्राण्यांची कातडी वापरत असे. भारतीय संघराज्यातील अंदमान आणि निकोबार या बेटावर अजूनही काही जमाती अतिअप्रगत अवस्थेत राहत आहेत.

गुहेमध्ये राहणाऱ्या मानवाने गुहेमधील भिंतीवर शिकारीची चित्रे काढली आहेत. मध्य प्रदेशातील भीमबेटका गुहांमधील भिंतींवर मानव डुक्कर आणि हरीण यासारख्या जनावरांचा पाठलाग करत आहे, अशी चित्रे आहेत. शिकारीमध्ये यश मिळावे म्हणून भिंतीवर अशा प्रकारची चित्रे काढण्याचा रिवाज असावा किंवा शिकारीची चित्रे काढून परिसर (गुहा) सुशोभित करावा, अशी मानवाची संस्कारात्मक भावनासुद्धा असावी.






**आकृती ०.१ भीमबेटका गुहेतील चित्रे**

### तुम्हास हे माहित आहे का ?

मध्यप्रदेशातील रायसिन जिल्ह्यातील भीमबेटका हे पुरातत्वीय क्षेत्र जागतिक वारसा (world Heritatage) म्हणून जाहीर केले गेले आहे. प्राचीन अश्मयुगातील मानवी संस्कृतीच्या खुणा या ठिकाणी आहेत. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार सुमारे एक लाख वर्षापूर्वी या ठिकाणी मानवी वस्ती होती. भीमबेटका क्षेत्रात आढळून आलेली काही शिलाचित्रे तीस हजार वर्षापूर्वीची असावीत असा अंदाज आहे.

अतिप्राचीन काळातील मानवाच्या काही धार्मिक चालीरीती होत्या, असे वाटते. उदा. ते मृतांना अवजारे व खाद्यवस्तू यासकट पुरत असत. अवजारे व खाद्यवस्तू यामुळे त्यांचा पुढचा प्रवास सुखकर होतो, अशी त्यांची श्रद्धा होती. ते आपल्या पूर्वजांचे स्मरण करीत. वादळ आणि आकाशात चमकणाऱ्या विजा या नैसर्गिक घटकांना ते घाबरत असत. सूर्याच्या उदय आणि अस्तासंबंधी त्यांना कल्पना नव्हती. परंतु सूर्य उगवला असता उष्णता मिळते. हे त्यांना माहित होते. रात्रीच्या वेळी चंद्रामुळे शीतलता व शांतता मिळते, हेही त्यांना माहीत होते. त्यांच्या आकलन शक्तीला या मागची कारणे कळत नसल्यामुळे, ते या गोष्टी दैवी गोष्टी आहेत, असे मानत. त्यामुळे त्यांनी सूर्य, चंद्र, वादळ आणि आकाशातील वीज यांची उपासना करण्यास सुरवात केली. निसर्गाचे संतुलन विघडू न देण्याइतपत त्यांची वर्तणूक चांगली होती. निसर्गाकडून आवश्यक तेवढेच घेणे आणि निसर्गाशी मिळतेजुळते घेणे. त्यांना माहीत होते. आदिमानव ज्या प्रकारे निसर्गाशी संतुलन साधून राहीला, तशाच प्रकारचे संतुलन आजच्या मानवाने साधले तर जग राहण्यासाठी अधिक सुंदर बनेल, असे आपणास वाटत नाही का?



टिपा



अतिप्राचीन अश्मयुगानंतर आलेल्या युगास मध्य अश्मयुग किंवा मेसोलिथिक युग असे म्हणतात. मध्य अश्मयुग (मेसोलिथिक युग) हे अतिप्राचीन अश्मयुग (पॉलिओथिलिक युग) अश्मयुग (निओलिथिक युग) यांना साधणारा दुवा आहे, असे समजतात.

## २) मध्य अश्मयुग (मेसोलिथिक युग) इ. स. पूर्व १0,000 ते इ. स. पूर्व ८,000 वर्षे

मध्य अश्म युगातील मानवांनी अग्निचा शोध कसा लावला ते पाहू. चकमकीचे दोन दगड परस्परांवर घासल्यास ठिणगी उडते, हे त्यांच्या लक्षात आले. ही ठिणगी वाळलेल्या पानावर पडली असता आग लागते हेही त्यांनी पाहिले, हे पाहून त्यांना भीतियुक्त आश्चर्य वाटले. बुद्धिवान मानवांनी यागोष्टीचा फायदा घेतला. आगीची जनावरांना भीती वाटते हे त्यांना लक्षात आले. त्यामुळे त्यांनी गुहेजवळ अग्नि प्रज्वलित केला. अग्निमुळे त्यांना रात्री प्रकाशही मिळाला. ज्वालांवर अन्न भाजले असता ते मऊ आणि चवदार लागते. हेही त्यांना कळाले. उष्णतेमुळे गुहासुद्धा उबदार झाली. आजही आपण थंडीच्या दिवसात शेकोटीभोवती बसतो ना!

अग्निचा शोध ही आदिमानवाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाची घटना आहे. झाडावर राहणाऱ्या आदिमानवापासून अग्निचा शोध लागेपर्यंत मानवाची प्रगती कशी होत गेली, यासंबंधी आपणास काही कल्पना करता येईल का? ही काही एका रात्रीत घडून आलेली जादू नाही. यासाठी हजारो वर्षांचा कालावधी लागला. म्हणूनच अग्नि हा मानवाच्या उपासनेचा विषय झाला, यात नवल वाटायला नको.

### अभ्यास 0.२

ज्या ठिकाणी वीज नाही, अशा जागी तुम्ही आहात, अशी कल्पना करा. ती थंडीची अंधारी रात्र आहे. या ठिकाणी स्वत:ला उबदार ठेवण्यासाठी आदिमानवाने काय केले असते? आता तुम्ही स्वत:ला उबदार ठेवण्यासाठी कोणकोणते पर्याय वापरणार त्याचा विचार करा. असे तीन पर्याय सांगा.

अग्निप्रमाणेच अवजारांचा शोधसुद्धा आदिमानवाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. या कालखंडातील जी अवजारे सापडली, त्यांना मायक्रोलिथ (microliths) असे म्हणतात. हे हत्यारे तीक्ष्ण आणि जास्त परिणामकारक होती. जनावरांच्या हाडांचा उपयोगसुद्धा अवजारे बनविण्यासाठी होऊ लागला. जनावरांच्या हाडांपासून बाण, बाणांची टोके, हातोडा, छिद्र पाडणारे अवजार, पृष्ठभाग घासणारे अवजार इ. अवजारे तयार होऊ लाकली. त्यांनी हातोडे, चोपण्या (choppers) आणि कुऱ्हाडी तयार केल्या. कुऱ्हाडीच्या साहाय्याने ते लहान झाडे पाडत असत. प्राण्यांना मारणे किंवा लहान घरे बांधणे यासाठी अवजारांचा उपयोग होऊ लागला. लहान दगडांना ते चाकूसारखी धार लावत. हे दगड धनुष्याला, भाल्यांना लावून ते त्या अवजाराची मारक क्षमता वाढवित असत. त्यामुळे सुरक्षित अंतरावरून त्यांना जनावरांची शिकार करता येऊ लागली. पंजाब आणि काश्मिर खोऱ्यात तसेच नर्मदेच्या खोऱ्यात डोंगरउतारावर अशा प्रकारची अवजारे सापडली आहेत.

ग्रंथालयातील पुस्तकांच्या मदतीने किंवा महाजालाचा वापर करून अशा प्रकारची अवजारे जगभर कोठेकोठे सापडतात, याची नोंद घ्या.



**आकृती ०.२ ः मध्य अश्मयुगातील दगडी हत्यारे**

### ३) अर्वाचीन अश्मयुग ´ निओलिथिक युग (इ. स. पूर्व ८००० ते इ. स. पूर्व ४००० वर्षे) :

सुरवातीच्या काळात मानव प्राणी फक्त शिकार करणारा व अन्न गोळा करणारा होता. त्यानंतर हजारो वर्षांनी त्याला अन्न उत्पादनाची प्रक्रिया समजली. ही अर्वाचीन अश्वयुगाची सुरवात मानली जाते. (निओलिथिक युग) आता मानवाला शिकारीची आणि अन्न गोळा करण्याची गरज राहिली नव्हती. कारण अन्न उत्पादन प्रक्रियेवर त्याने तावा मिळविला होता. हे कसे घडले असावे? मानवाला अग्निचा शोध जसा अपघातानेच लागला तसाच अन्न उत्पादनाचा शोध देखील अपघातानेच लागला असावा. काही बिया जमिनीवर पडल्या. त्यातून रोपे उगविली आणि मानवाला अन्न मिळाले. हे पाहून मानवाने पेरणी करण्यास सुरवात केली. त्यांनी पिकाकडे काळजीपूर्वक लक्ष दिले. ही काळजी त्यांनी सलग सहा महिने घेतली. कारण पेरणी व कापणीमद्ये सहा महिन्याचे अंतर होते. नंतर त्यांना अन्न मिळाले. ही शेतीची सुरवात होती. ही मानवी वस्तीची सुरवात होती. कारण त्यांना एका जागी राहूनसुद्धा मुबलक धान्य मिळत होते. शिकारीसाठी किंवा अन्नासाठी वणवण करणे थांबल्यामुळे त्यांना स्थैर्य प्राप्त झाले. शेतीमुळे मानवी जीवनात खूप बदल आणि सुधारणा झाली. त्यांनी भिंती असलेल्या झोपड्या राहण्यासाठी बांधल्या. या झोपड्या शेताला लागूनच असत. राहण्याचे स्थैर्य निर्माण झाल्यामुळे गाव तयार झाले. गावामध्ये अनेक कुटुंबे राहत व एकमेकांच्या संरक्षणाला मदत करत. याच कालावधीत माणसांना प्राणी पाळण्याची कल्पना सुचली असावी. हे केवळ शेतीमुळेच शक्य झाले. ते धान्याचे दाणे स्वत:साठी ठेवत आणि धान्याचे फोलपट व भुसा प्राण्यांना देत. प्राणी पालन कला त्यांना अवगत झाली. माणसांनी प्रथम पाळलेला प्राणी कुत्रा होता, हे आपणास माहित आहे का? त्यानंतर माणसांनी शेळ्या, मेंढ्या व इतर जनावरे पाळण्यास सुरवात केली. या जनावरांचा उपयोग दूध व मास यासाठी होत होता. जनावराची लोकर आणि कातडी याचा उपयोग वस्त्र म्हणून होऊ लागला. मिश्रशेतीची ही सुरवात होती. शेतीमुळे माणसांना अन्न आणि पाळीव प्राण्यांमुळे दूध, मास आणि लोकर मिळू लागली.

आई जशी मुलाला पाजून मोठे करते, त्याप्रमाणे भूमिसुद्धा बियांपासून झाडे निर्माण करून मानवजातीला पोसते. हा संदर्भ लक्षात घेऊन मानवांनी भूमिला माता मानण्यास सुरवात केली. व तिची आराधना करण्यास सुरवात केली. अतिप्राचीन युगातील मानवाप्रमाणेच अर्वाचीन युगातील माणसंसुद्धा निसर्गा तील शक्तींची उपासना करणारा होता.

पर्यावरणाची ओळख झाल्यानंतर मानवाला सुखासीन आयुष्य जगण्याची इच्छा निर्माण झाली. त्यासाठी सुधारित अवजारे आणि हत्यारे यांची गरज मानवाच्या लक्षात आली. त्यांनी अवजारे व हत्यारे अणकुचीदार बनविली. झाडे तोडण्यासाठी कुऱ्हाड वापरली जाई. कुऱ्हाड दगडापासून बनविली जाई. त्यासाठी दगडास एक बाजू घासून धारदार केले जाई. नंतर कुऱ्हाडीला लाकडी दांडा बसवत. धान्य कापण्यासाठी विळा वापरत. जास्त दिवस टिकण्यासाठी या अवजारांना धार केली जाई. अशी धारदार अवजारे त्यांना जमिनीसाफ करण्यासाठी तसेच आलेले पीक कापण्यासाठी उपयोगी पडत आजसुद्धा अल्पभूधारक शेतकरी याच प्रकारची अवजारे वापरतात, हे आपणास माहीत आहे का?

या काळातील आणखी एक अत्यंत महत्त्वाचा शोध चाकाचा होय. मानवाच्या आयुष्यात सर्वांगीण बदल घडवून आणणारा शोध म्हणजे चाकाचा शोध होय. विहीरीतून पाणी काढण्यासाठी वापरण्यात येणारी कप्पी, सूत काढण्यासाठी वापरण्यात येणारा चरखा, कुंभाराचे चाक ही सर्व चाकेच आहेत. कुंभाराच्या चाकामुळेच गाडगी, मडकी तयार झाली त्यांना उपयोग अन्न शिजविण्यासाठी होऊ लागला. गाडगी वेगवेगळ्या आकारात तयार होऊ लागली. परंतु चाकाचा सर्वात मोठा उपयोग वाहतुकीसाठी झाला. चाकामुळे मानवाला सामानासकट एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करता येऊ लागले. आजसुद्धा असंख्य ठिकाणी चाक वापरले जाते.



**आकृती ०.३ : अर्वाचीन अश्मयुगातील मातीची भांडी**

## अभ्यास ०.३

अतिप्राचीन अश्मयुगातून प्राचीन अश्मयुगाकडे मानवाची वाटचाल कशी झाली, हे आपल्या लक्षात आले असलेच. आता त्या युगातील मानवाची आधुनिक मानवाशी तुलना करा. ही तुलना खालील मुद्द्यांवरून करा.

अग्नी, अवजारे, शेती, संमिश्र शेती, चाक, धर्म निसर्गाशी एकरूपता.

## पाठ्यांतर्गत प्रश्न ०.३a

१. प्राचीन मानवाला भटका मानव का म्हणत?


२. अतिप्राचीन अश्मयुग आणि अर्वाचिन अश्मयुग यामध्ये वापरात असणाऱ्या अवजारांच्याबावतीत फ रकाचे कोणतेही दोन मुद्दे सांगा.

३. अर्वाचीन अश्मयुगातील दोन महत्त्वाचे शोध सांगा.


४. मानवाने चाक कोठे कोठे वापरले? (तीन मुद्दे)

### ०३.२ धातूचा वापर करणारे युग-ताम्रपाषाणयुग, चालकोलिथिक युग :

अन्न गोळा करणे व दगडाची हत्यारे वापरणे यासारख्या प्राथमिक पायरीपासून मानवाने प्रगतीचा मोठाच पल्ला गाठला. तरीसुद्धा मानव समाधानी नव्हता. अनेक प्रयत्न करून मानवाने तांबे या धातूचा शोध लावला. म्हणून या युगाला ताम्र पाषाण युग असे म्हणतात. या युगातील लोक अवजारे बनविण्यासाठी तांब्याचा वापर करीत. मातीची भांडी भाजण्यासाठी आगीचा वापर करतात हे आपणास माहीत आहेत. मानवी इतिहासातील तांबे हा पहिलाच धातू असून मानवाने तो वितळवून त्यापासून अवजारे बनविली.



**आकृती ०.४ : ताम्रपाषाण युगातील धातूची हत्यारे**





एखादे नवीन द्रव्य सापडले की त्यावर प्रयोग करण्याचा मोह त्याकाळीसुद्धा मानवाला होता. तांबे आणि जस्त आणि शिसे यांच्याबरोबर मिश्रण करून कासे (ब्रॉन्झ) हे संमिश्र तयार करण्यात मानवाला यश मिळाले. म्हणून ज्या काळात काशापासून बनविलेले अवजारे वापरत. त्या काळास कासे युग (Bronze Age) असे म्हणतात. दगडापासून बनविलेल्या हत्यारांपेक्षा धातूपासून बनविलेली हत्यारे जास्त परिणामकारक, धारधार होती. टिकाऊ धातूच्या कुऱ्हाडी आणि कोयते झाडे तोडण्यासाठी व शेतीसाठी जमिन तयार करण्यासाठी उपयुक्त ठरली. ज्या कालखंडात मानव प्राणी धातूची अवजारे आणि लहान दगड यांचा वापर होता त्या कालखंडास ताम्रपाषाण युग असे म्हणतात. या युगात वापरण्यात आलेली अवजारे म्हैसूर येथील ब्रम्हगिरी, नर्मदा नदीच्या खोऱ्यातील नवाबटोळी आणि छोटा नागपूरच्या पठारावर सापडली आहेत. जर आपण या भागात कधी गेला तर उत्खनन स्थळाला अवश्य भेट द्या. सापडलेल्या वस्तूंचे निरीक्षण करा. येथील माहितीची तुलना इतर ठिकाणच्या उत्खनन स्थळाच्या माहितीशी करा.

### ०.३.३ समाजजीवनाची सुरवात (Beginning of Community Life)

शेती संमिश्र शेती, अवजारातील सुधारणा आणि चाकाचा शोध यामुळे मानवाला स्थैर्य लाभले. गाव ही संकल्पना प्रत्यक्षात आली. मानवाचे स्थिर गट आकाराने वाढले आणि अशा गटांना प्रशासन, शिस्त आणि कायदा याची गरज भासू लागली. त्यासाठी गटातील योग्य व्यक्तीला त्यांनी आपला पुढारी बनविले. प्रत्येक गटाने निवडीसाठी वेगवेगळी पद्दत वापरली. सामान्यपणे हा पुढारी म्हणजे गटातील वृद्ध गृहस्थ असे किंवा गटातील सर्वात सशक्त व्यक्ती असे. हा पुढारी प्रशासनाकडे लक्ष देत असे. जर गटातील दोन व्यक्तीत काही वाद उद्‌भवला, तर पुढारी मध्यस्थाचे काम करीत असे. हळूहळू गटांचा आकार प्रचंड झाला. यातून नगरे आणि महानगरे उदयास आली. इ. स. पूर्व २५०० या काळात सरस्वती आणि सिंधु नदीच्या खोऱ्यात भारतातील सुरवातीची नगरे उदयास आली. या संस्कृतीला सिंधु संस्कृती असे म्हणता. हडप्पाचा शोध लागल्यानंतर काही संशोधक या संस्कृतीला सिंधु सरस्वती संस्कृती असे म्हणू लागले.

#### धर्म :

मानवाला ज्या गोष्टी समजत नाही, त्या गोष्टींची भिती वाटते. जी घटना समजली नाही, त्यबाबत श्रद्धा युक्त भय वाटते आणि लोक तिची पूजा करतात. आदिमानवाच्या बाबतीतही असेच घडले असावे. अन्न पुरविणारी पृथ्वी भूमाता व मानव प्राणी तिची लेकरे झाली. सूर्यामुळे उष्णता व प्रकाश मिळतो. त्यामुळे सूर्याला देवत्व प्राप्त झाले. हाच प्रकार चंद्र, तारे, पाऊस यांच्या बाबतीत घडून आलो. लोक त्यांची पूजा करू लागले. त्यांची प्रार्थना करू लागले. समाजात काही जादूगार लोकांचा उदय झाला. ते आपण लोकांना देवतांच्या कोपापासून वाचवू शकतो, असा दावा करू लागले. काही लोकांनी पूजा अर्चा, बळी देणे आणि समाजासाठी प्रार्थना करण्याचे ठरविले. हे लोक आचार्य (पुजारी) म्हणून ओळखले जाऊ लागले.

मृत्यू हा जीवनाचा शेवटचा टप्पा आहे. याचे ज्ञान लोकांना झाले. मृतांसाठी त्यांनी कबरी खणण्यास सुरवात केली. ते कबर मोठ्या दगडांनी झाकत असत. या दगडांना मेगालिथ (megaliths) असे म्हणत. काही वेळा मृताच्या वापरासाठी रोजच्या वापरातल्या वस्तूदेखील त्याच्या बरोबर ठेवत असत.

असाच मृतांबद्दलचा आदर आपण आजही दाखवितो का? आपल्या पूर्वजांच्या आणि आपल्या चालीरितीमध्ये खूपच साम्य आहे.

### ०.३.४ लोहयुग आणि त्यानंतरचे युग (Iron Age and begond)

मानवी संस्कृतीमध्ये झालेल्या प्रगतीचे टप्पे आपण पाहिले. आदिमानव दगडी अवजारे वापरत होता. त्यानंतर त्याने धातूचा शोध लावला. त्यापासून बनविलेली अवजारे जास्त उपयुक्त होती. मानवाने तांबे, कासे आणि लोखंड या क्रमाने धातूंचा शोध लावला.

मानवी संस्कृतीमधील लोखंडाचा शोध हा फार क्रांतिकारी शोध होता. कारण लोखंडापासून बनविलेली अवजारे जास्त टिकाऊ आणि जास्त उपयोगी होती. नंतर इतर द्रव्यांचा (धातूचा) शोध लागला. ठराविक प्रमाणात धातू एकत्र करून संमिश्रे तयार करण्यात आली. पितळ हे सर्वपरिचित संमिश्र आहे. नंतर लोखंडात कार्बन मिसळून पोलाद तयार करण्याची प्रक्रिया समजली. त्यानंतर अगदी अलीकडच्या काळात प्लॅस्टिकचा शोध लागला. सर्व प्रकारची अवजारे आणि रोजच्या वापरातील वस्तू बनविण्यासाठी प्लॅस्टिकचा वापर होऊ लागला. इतर पदार्थांपेक्षा प्लॅस्टिपासून बनविलेल्या वस्तू वापरणे खूप फायदेशीर आहे. परंतु या प्लॅस्टिकचा आपल्या पर्यावरणावर घातक पसिरणाम होत असल्याचे लक्षात आले आहे म्हणून सध्या प्लॅस्टिकच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. प्लॅस्टिक पिशव्या वापरण्यावर बंदी असल्याचे तुम्हास माहितच असेल. सध्या शास्त्रज्ञ विघटन होणारे प्लॅस्टिक (पर्यावरणाला हानीकारक नसणारे) तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यावरून आपल्या लक्षात आलेच असेल की मानवी संस्कृतीच्या प्रत्येक टप्प्यावर नवनवीन आव्हाने समोर उभी असतात. यांच्याशी सामना करूनच प्रगतीचा पुढील टप्पा गाठावा लागतो. आता आपण मानवी संस्कृतीच्या प्रगतीच्या टप्प्यांचा अभ्यास करू.

#### अभ्यास ०.४

आपण नेहमी करत असणाऱ्या धार्मिक विधींची एक यादी तयार करा. या विधींविषयी आपल्या कुटुंबियावरोबर आणि सहकाऱ्यांबरोबर चर्चा करा. या चर्चेचा निष्कर्ष, या विधीविषयी आपल्याला मिळालेली नवी माहिती दुसऱ्या शहरातील आपल्या मित्राला पत्राद्वारे कळा. आजच्या काळात या विधींची उपयुक्तता कितपत आहे, यासंबंधी विचार करा.

#### पाठ्यांशावरील प्रश्न ३b

१. ताम्र पाषाण युगातील अवजारे अतिप्राचीन अश्मयुगातील अवजारांपेक्षा चांगली होती, हे स्पष्ट करा.

२. मानवी वस्ती स्थिरावण्यासाठी कोणते घटक कारणीभूत ठरले त्याची यादी करा. आजच्या काळासाठीसुद्धा या घटकांचे महत्त्व स्पष्ट करा.

३. सुरवातीच्या काळातील मानव समाजावर सामाजिक जीवन आणि धर्म यांचा काय परिणाम झाला?

४. लोखंडाच्या शोधामुळे ताम्रपाषाण युगातील मानवी जीवनावर कोणता परिणाम झाला?

## ०.४ मानवी प्रगतीचे टप्पे (Different Stages of Human Development)

वरील माहितीवर आधारीत सर्व जगातील सर्व मानव गटांमध्ये सामाईक असणाऱ्या प्रगतीच्या टप्प्यांचा आपण विचार करू. तसेच फार प्राचीन काळी (अश्मयुग) लागलेल्या शोधांचा आजच्या जगातसुद्धा किती उपयोग होतो, ते आपण पाहू. उदा. चाकाचा शोध.

### अ) शिकारीचा टप्पा :


अतिप्राचीन काळातील मानवसमूहाची सुसंगत माहिती मिळण्याच्या दृष्टीने पुरातत्वशास्त्र मोलाची मदत करते. या काळाला प्राथमिक अवस्थेतील काळ असे म्हणतात. कारण या काळातील मानव आपल्या उदर निर्वाहासाठी संपूर्णपणे निसर्गावरच अवलंबून होता. या काळातील मानवाने जंगलातील हिंस्त्र पशू जशी आपल्या उदरनिर्वाहासाठी शिकार करतात. त्याप्रमाणेच आपल्या उदरनिर्वाहासाठी प्राणी, पक्षी, मासे आणि कीटक यांची शिकार केली. हजारो वर्षे मानवी प्राणी हा शिकारी प्राणीच होता. इतिहासातील या कालखंडाला अश्म-युग असे म्हणतात. या काळात मानवाने प्राण्यांना माणसावळ्याला सुरवात केली. पशू पालनामुळे मानवाला खात्रीचा अन्नपुरवठा होऊ लागला आणि दूध, दही, चीज यासारखे नवीन अन्नपदार्थ मिळाले. मानव शिकारीसाठी फिरत असतानाच्या काळापेक्षा या काळात मानवाला जास्त स्थैर्य प्राप्त झाले. कारण शिकारीपेक्षा पशुपालन हा अगदी सोपा व बिनधोक व्यवसाय होता. मानवाला इतर गोष्टींबाबत विचार करण्यासाठी वेळ मिळू लागला. तरीसुद्धा मानव अजून अन्नशोधात भटके जीवन जगतच होता. पहिल्या ठिकाणच्या कुरणामधील चारा संपल्यानंतर मानव जनावरांना घेऊन नवीन कुरण शोधण्यासाठी भटकत असे.

### ब) ग्रामीण जीवन :

शेतीमुळे मानवाला स्थैर्य प्राप्त झाले. जमिनीत बी पेरले की झाडे उगवतात व त्यापासून आपल्याला अन्न मिळविता येते, हे तंत्र कळल्यानंतर मानवाने एकाच जागी शेती करावयास सुरवात केली. स्थिर शेतीमुळे मानवाचा रहिवाससुद्धा स्थिर झाला. स्थिर रहिवासाचेच पुढे खेडेगावात रूपांतर झाले आणि खऱ्या अर्थाने मानवी संस्कृतीचा जन्म झाला. या टप्प्याला ग्रामीण जीवन टप्पा म्हणता येईल.

### क) नागरी जीवन :

ग्रामीण जीवन आणि शेतीकडून मानव नागरीकरणाकडे वळाला. या टप्प्यामध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती. मानव प्राणी अन्न गोळा करणारा न राहता तो अन्न उत्पादक बनला. मानवाच्या कुटुंबाचा आकार देखील वाढत गेला. त्यामुळे समाज आकार घेऊ लागला. प्रत्येक कुटुंबाला शेतात काम करण्याची व स्वत:चे अन्न पिकविण्याची गरज उरली नाही. विणकर, कुंभार, सुतार काम करणारे आपल्या कौशल्याच्या बदल्यात धान्य मिळवू लागले. मानवाच्या राहणीमानात पुष्कळ बदल झाला. धातूचा शोध लागल्यामुळे अवजारात आणि पर्यायाने व्यवसायात प्रमाणीकरण झाले. विशेष प्रकारचे





कौशल्य निर्माण झाले. इतरांपेक्षा काही जणांकडे उच्च प्रतीचे व्यवसाय कौशल्य उपजतच होते. त्यामुळे कुशल आणि अर्धकुशल व अकुशल हे वर्ग निर्माण झाले. तोपर्यंत तांबे आणि कासे यांचादेखील शोध लागला होता. हे धातू सुखासीन आयुष्य जगण्यासाठी लागणाऱ्या वस्तू तयार करण्यासाठी वापरण्यात येत असत. (उदा. स्वयंपाकाची भांडी) मानवाने कौशल्याचा वापर कुंभारकाम, चर्मकाम आणि बांधकाम हे व्यवसाय विकसित करण्यासाठी केला. या व्यवसायातील उत्पादनांची देवाणघेवाण करण्यासाठी करागीर. एका विशिष्ट ठिकाणी जमत असत. शेतकरीसुद्धा आपल्याजवळील जादा असलेले धान्य विकण्यासाठी व इतर जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी येथे जमत असत. ही प्रक्रिया गावामधील मुख्य केंद्राच्या ठिकाणी चालत असे. संस्कृतीच्या या टप्प्यात मानवाने फक्त अन्नाची गरज भागविली असे नाही तर त्याने विणकाम, कुंभारकाम आणि धातूकाम याकडे लक्ष दिले. या काळात लोखंडाचा शोध नुकताच लागला होता. आता समाजाची लहान लहान आणि विशिष्ट गटात विभागणी करण्याची गरज भासू लागली. काम करण्याच्या क्षमतेवरून कामाची वाटणी केली गेली.

मानवजात आता प्रगतीचा पुढचा टप्पा गाठण्यासाठी तयार झाली होती. लेखनकलेचा शोध ही प्रगतीची फारच मोठी झेप होती. लेखनकलेमुळे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान संक्रमित करता येणे शक्य झाले. लेखनकलेचा उपयोग व्यापाऱ्यांना हिशोबाकरिता आणि गावातील प्रशासन पाहणाऱ्या व्यक्तींना नोंदी ठेवण्यासाठी होत होता.




**आकृती ०.५ : हडाप्पाकालीन शिलालेख**

### ड) शहरी जीवन :

नंतरच्या काळात मानवाने अधिक असलेल्या धान्याचा पुढील उपयोगासाठी साठा करण्यास सुरवात केली. त्यामुळे मानवाला पुष्कळच रिकामा वेळ मिळाला. त्याचा वापर सामाजिक व सांस्कृतिक कारणांसाठी केला गेला. चित्रकला, संगीत, शिल्पकला, वास्तुकला यांचा उदय आणि विकास याच काळात झाला. नाजूक कलाकुसर असणारी दागिने तयार करण्याची कला आणि धातूवस्तू कला (मूर्ति कला) सुद्धा याच काळाची देणगी आहे. आता लोकांच्या प्राथमिक गरजा भागल्या होत्या व त्यांना सुरक्षित देखील वाटत होते. आता लोकांना उच्च दर्जाच्या सामाजिक आणि सौदर्यवादी गोष्टींची गरज भासत होती. याच काळात सामाजिक दर्जा आणि जात या संकल्पनांचा शिरकाव झाला. गावांचे

प्रगतीशील आणि जास्त सुखसोई असलेल्या शहरात रुपांतर झाले. हडप्पा आणि मोहेंजोदडो ही काळातील उत्खननात सापडलेली शहरे आहेत. सध्या ही उत्खननस्थळे पाकिस्तानात आहेत. चंदिगढजवळील रोपार, अहमदाबादजवळील लोथल आणि राजस्थानमधील कालीबंगम ही सुद्धा त्याकाळची शहरे आहेत. या शहरांची रचना अगदी आखीव अशी होती आणि या सर्व शहरांमध्ये सर्व आधुनिक सुविधा होत्या. उदा. बांधकामात भाजलेल्या विटा वापरल्या आहेत. रस्ते परस्परांस काटकोनात छेदत होते आणि संपूर्ण शहराला सांडपाण्यासाठी गटारांची व्यवस्था होती.



**आकृती ०.६ : सिंधु संस्कृतीमधील लोथल शहराचे अवशेष**

विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये जसजशी प्रगती होत गेली, तसतशी भौतिक सुविधांमध्ये प्रचंड प्रमाणावर वाढ झाली. मानवाचे जीवन सुरवातीला सुखकारक आणि नंतर ऐषारामी झाले. अर्थात हा बदल समाजातील काही व्यक्तींपुरताच मर्यादित होता. शहरांचे महत्त्व वाढतच गेले. त्यापैकी काही शहरे महानगरे होण्याइतपत मोठी झाली. उंच इमारती, कारखाने, महत्त्वाची कार्यालये प्रचंड व्यवसाय केंद्रे ही महानगरांची ठळक वैशिष्ट्ये होती. मानवी आयुष्यसुखी आणि अर्थपूर्ण व्हावे यासाठी अनेक, शोध, नव्या कल्पना, नव्या रीती शोधण्यात आल्या. परंतु अजूनसुद्धा आपल्यापैकी अनेकांना पिण्यासाठी पाणी, वीज, प्राथमिक आरोग्य सेवा आणि शिक्षण या मूलभूत गोष्टी उपलब्ध होत नाहीत. या मानवापुढे असणाऱ्या समस्या आहेत. यावर तोडगा निघणे आवश्यक आहे. याबाबतीत आपण पुढच्या पाठात जास्त माहिती घेऊ.

## पाठ्यांशावरील प्रश्न ०.४

१. मानवी प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यातील दोन प्रमुख बाबी सांगा.

२. आजच्या काळातील शिकारीची पद्धत व अश्मयुगीन काळातील शिकारीची पद्धत यातील फरक स्पष्ट करा.

३. गाव ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी कोणते घटक कारणीभूत ठरले?

४. मानवाच्या प्रगतीसाठी लेखनकलेचा कसा उपयोग झाला?

## ०.५ सामाजिक शास्त्र आणि आजच्या समाजापुढील समस्या (Social Science and Problems of Present Day Society)

मानवाची शिकार करणाऱ्या आदिमानवापासून उपग्रह पाठविण्यापर्यंतची प्रगतीची भरारी थक्क करणारी आहे. प्रचंड माहितीचा साठा आपणास अत्यंत थोड्या जागेत करता येतो, तसेच तो क्षणार्धात दुसरीकडे संक्रमित करता येतो. संगणक आणि रोबो ही कामे चुटकीसरशी करू शकतात. आजचे युग माहिती आणि तंत्रज्ञान युग आहे. नगराची महानगरे झाली आहेत. आपण या युगातदेखील बदलत आहोत, नवनवीन शोध लावत आहोत आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहोत.

मानवाची शिकाऱ्यापासून अंतरिक्षयाचीपर्यंत झालेल्या प्रगतीमध्ये अनेक टप्पे आहेत. प्रत्येक टप्प्यामध्ये वेगळी आव्हाने, वेगळ्या संधी आणि वेगवेगळे शोध लागले आहेत. मानवाचा स्वत:शी समाजाशी आणि निसर्गाशी घनिष्ट संबंध असतो. या घनिष्ठ संबंधाचा सकारात्मक उपयोग करून सध्या समाजातील काही व्यक्तिंच्याच वाट्याला येणारे आदर्श (सुखकारक) जीवन सर्वांच्याच वाट्याला यावे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आपण जरी पुष्कळ प्रगती केली असली तरीसुद्धा आपल्याला अजून काही आव्हांनाना सामोरे जावेच लागते. यापुढील भागात अशा प्रकारची आव्हाने व त्यावर उपाय आपण पाहणार आहोत.

**आपल्यापुढील काही आव्हाने खालीलप्रमाणे आहेत.**

१) गरीबी आणि भूक

२) संपत्तीचे असमान वाटप

३) बेकारी आणि श्रमाचा कमी मोबदला

४) समांतर अर्थव्यवस्था, करचुकवगिरी आणि काळा पैसा

५) सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार

६) प्रदूषण आणि पर्यावरणाचा ऱ्हास

७) राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय बाण्याचा प्रभाव

८) लिंगभेदावर आधारित समस्या – स्त्रीजातीविषयी दुजाभाव, स्त्रियांवरील अत्याचार, हुंडापद्धती, बालिकाबळी, स्त्रियांचा व्यापार आणि
वेश्या व्यवसाय.

९) हिंसाचार, दहशतवाद नक्षलवाद

१०) राष्ट्रीय एकात्मतेला धोका – भाषावाद, प्रांतवाद, जातीवाद, धर्मवाद

### पाठ्यांशावरील प्रश्न ०.५

१. या पाठात न सांगितलेल्या परंतु समाजात वावरताना तुम्हाला आलेल्या समस्यांची (अडचणींची) आव्हानांची यादी करा.

२. तुमच्या समस्यांवर मात करण्यासाठी सामाजिक शास्त्रांमधील विषयांचा (त्यामधील ज्ञानाचा) तुम्ही कसा उपयोग कराल?

३. मानवी संस्कृतीच्या प्रगतीबरोबरच समस्यांची पण वाढ झाली आहे हे विधान शहरीकरण व औद्योगिकीकरण झालेल्या भागांमधील समस्यांच्या बाबतीत कसे लागू पडते, याची चर्चा करा.

## आपण काय शिकलो?

- ❖ सामाजिक शास्त्र या विषयाचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा आहे. या अभ्यासामुळे आपणास सामाजिक शास्त्र विषयाअंतर्गत असलेल्या विषयांचा परस्पर संबंध काय आहे, हे लक्षात येते.
- ❖ आदिमानवापासून आजतागायत मानवाने स्वत:च्या सुखासाठी केलेल्या खटपटीची कथा इतिहास हा विषय सांगतो.
- ❖ पुरातत्वशास्त्रज्ञ उत्खननात सापडलेले अवशेष मोडकळीस आलेल्या इमारती, स्मारके, प्राचीन वस्तू यांचा अभ्यास करतात तर भूगोलामध्ये पृथ्वीवरील भूस्वरूपे, रहिवासी, स्थळे आणि पर्यावरणाचा अभ्यास केला जातो.
- ❖ राजकीय गृहीतके, शासनप्रणाली, राजकीय पृथक्करण यांचा अभ्यास म्हणजे राज्यशास्त्र होय.
- ❖ समाजशास्त्र समाज रचना आणि समाजाची वर्तणूक यांचा अभ्यास करते.
- ❖ उत्पादन उपयोग आणि संपत्ती संबंधीचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे अर्थशास्त्र होय.
- ❖ अश्मयुगात मानवाने अग्नि शोधून काढला त्याने हातोडा, विळा आणि कुऱ्हाड ही अवजारे तयार केली. याच्या साहाय्याने तो झाडे तोडणे, शिकार करणे आणि स्वसंरक्षण करीत असे.
- ❖ मानव मृतांना अवजारे व खाद्यवस्तू यासकट पुरत असत. अवजारे व खाद्यवस्तू यामुळे त्यांचा पुढचा प्रवास सुखकर होतो अशी त्यांची श्रद्धा होती. ते आपल्या पूर्वजांचे स्मरण करीत. त्यांनी आपली अवजारे तीक्ष्ण आणि जास्त परिणामकारक बनविली.
- ❖ अर्वाचीन अश्मयुगात (निओलिथिएस) मानवाने आपले जीवन अधिक सुखकर बनविले. मानवाने चाकाचा शोध लावला आणि चाकाचा उपयोग वेगवेगळ्या ठिकाणी करण्यास त्याने सुरवात केली. शेतीत सुधारणा होऊन संमिश्र शेती अस्तित्वात आली आणि मानवाला स्थैर्य प्राप्त झाले. हे स्थैर्य म्हणजे सामाजिक जीवनाची सुरुवात करण्याचा पाया होय. त्यामधून खेड्याचा व खेड्यामधून नगराचा शहराचा विकास झाला.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. सामाजिक शास्त्रामधील घटक विषय परस्परांमध्ये कसे गुंतलेले असतात, हे उदाहरणांसह स्पष्ट करा.

२. इतिहासाचा अभ्यास करणे जरूरीचे आणि महत्त्वाचे आहे का? आपल्याला म्हणण्याला पुष्टी देणारी चार कारणे सांगा.

३. इतिहास आणि पुरातत्वशास्त्र यामधील परस्परसंबंध स्पष्ट करा.

४. मानवी संस्कृतीची माहिती होण्यासाठी सामाजिक शास्त्रातील सर्व विषयांचा कसा उपयोग होतो, ते स्पष्ट करा.

५. ताम्र पाषाण युग (चालकोलिथिक) आणि कासे (ब्रॉन्झ) युगात समाजजीवनाची सुरवात कशी झाली, याबद्दल टीप लिहा.

६. अग्निच्या शोधाचे महत्त्व स्पष्ट करा.

७. अर्थशास्त्र या विषयाची व्याप्ति स्पष्ट करा.

८. अर्थशास्त्रज्ञ ही देशातील महत्त्वाची व्यक्ति असते. या विधानाशी आपण सहमत आहात का? कारणासहीत स्पष्ट करा.

९. प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी का घालावी? धातू व प्लॅस्टिक यांचे फायदे तोटे स्पष्ट करा.

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

**0.१**

१) इतिहास, पुरातत्वशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र

२) इतिहासामुळे आपल्याला आपल्या पूर्वजांची, त्यांनी केलेल्या कष्टाची, प्रगतीची माहिती मिळते, तसेच पुढच्या प्रगतीचीही दिशा स्पष्ट होते.

३) इतिहास भूतकाळात मानवी संस्कृतीमध्ये कोणत्या घटना घडल्या याची नोंद घेतो. पुरातत्वशास्त्र प्राचीन अवशेषांचा शास्त्रीय अभ्यास करून भूतकाळातील विषयाची माहिती जमा करतो.

४) शिलालेख, नाणी, स्मारके, शिक्के आणि उत्खननस्थळे.

५) हडप्पा, मोहेंदोजडो, राखीगड, द्वारका आणि नालंदा.

## ०.२

१) कोणत्याही भूप्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीवर त्या भूप्रदेशात घडणाऱ्या घडामोडी अवलंबून असतात. याचाच इतिहास बनतो.

उदा. सिंधू संस्कृती सिंधू नदीच्या खोऱ्यात उदयास आली.

२) राजकीय गृहीतके, त्याची अंमलबजावणी, राजकीय शासनप्रणालीची जडणघडण, पृथक्करण आणि वर्तणूक यांचा अभ्यास म्हणजे राज्यशास्त्र होय.

३) मानवी समूहाचा, वर्तणुकीचा अभ्यास हा समाजशास्त्राचा मुख्य गाभा आहे.

४) उत्पादन, उपभोग आणि संपत्ति याबाबतीत मानवाची वर्तणूक कशा प्रकारची आहे, याचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे अर्थशास्त्र होय.

५) राज्यशास्त्र, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. त्यांच्या अभ्यासामुळे आपल्याला सामाजिक कार्यपद्धतीचा सर्वांगीण दृष्टिकोन समजतो.

## ०.३a

१) कारण हा मानव अन्नाच्या शोधार्थ सगळीकडे भटकत असे.

२) अतिप्राचीन अश्मयुगातील हत्यारांपेक्षा अर्वाचीन अश्मयुगातील हत्यारे अणकुचीदार (जास्त परिणामकारक) व दीर्घकाळ टिकणारी होती.

३) संमिश्र शेतीचा शोध व चाकाचा शोध.

४) कुंभाराचे चाक, चरखा, गाडीचे चाक


## ०.३b

१) अतिप्राचीन युगातील दगडी युगातील हत्यारांपेक्षा ताम्रपाषाण युगातील हत्यारे अतिशय धारदार आणि परिणामकारक व टिकाऊ होती.

धातुचे विळे आणि कुऱ्हाडी यांच्या साहाय्याने झाडे जलद कापता येत होती. त्यामुळे शेतीसाठी जास्त जागा उपलब्ध होत होती.

२) धातू, अग्नि आणि चाकांचा शोध शेतीचा शोध ज्यामुळे मानव स्थिरावला. आजच्या काळामध्येसुद्धा शास्त्रीय प्रगतीसाठी वरील पायाभूत शोधांचा उपयोग वेगवेगळ्या व्यवसायात अजूनसुद्धा होतो. यापुढेही होत राहील.

३) मानवाने कुटुंबसंस्था निर्माण केली. धार्मिक रुढी निर्माण झाल्या. व्यापार, राजकारण, संरक्षण यामधील प्रक्रियेत परस्परावलंबन सुरू झाले.



टिपा

४) ताम्रपाषाण युगातील अवजारे शक्तीशाली आणि टिकावू होती. त्यामुळे काम करण्याचा वेग वाढला.

**०.४**

१) घटक ३.२, ३.३, ३.४ पहा.

२) आजच्या काळातील शिकार फक्त हौस म्हणून होते. अश्मयुगीन काळातील शिकार अन्नाची गरज म्हणून होत होती.

३) व्यापारासाठी गावातील समाईक मध्यवर्ती जागा.

४) दूर अंतरावरील लोकांशी संपर्क साधणे. हिशोब आणि नोंदी ठेवण्यासाठी.

**०.५**

१) मुलींचे शिक्षण, समाजातील दुर्बल घटकांवरील अत्याचार इ.

२) आमच्या समस्या सोडविण्यासाठी सामाजिक शास्त्रातील ज्ञानाचा उपयोग करता येईल. आपल्याला आलेल्या समस्यांचे पृथक्करण करून समस्या दूर करण्यासाठी सामाजिक शास्त्रातील ज्ञानाचा उपयोग करून मार्ग काढता येईल.

३) प्रगतीचे फायदे आणि तोटे यांचे पृथक्करण करा व त्या आधारे उत्तर तयार करा.

# १

# प्राचीन जग

आपल्या घरात आणि आजूबाजूला आपण अनेक धातूच्या वस्तू पाहतो. तांब्यापासून, लोखंडापासून बनविलेल्या अनेक वस्तू आपल्या वापरात असतात. स्टील लोखंडाचीच सुधारित आवृत्ती आहे. धातूंच्या शोधामुळे मानवी जीवनात अनेक क्रांतिकारक बदल झाले आहेत.

यापूर्वीच्या पाठात म्हणजे सामाजिक शास्त्र` प्रस्तावना या पाठात तुम्ही वाचलेच आहे की, अश्मयुगीन मानव दगड, लाकूड आणि हाडांपासून अवजारे आणि शस्त्रे तयार करत होता. तो गुहेत राहत होता. आणि अन्न मिळविण्यासाठी आणि शिकारीसाठी सतत भटकत होता. त्यानंतर त्याला शेती करायचे ज्ञान झाले. जनावरे पाळण्याचे कसबही तो शिकला आणि त्याच्या आयुष्यात स्थैर्य आले. अश्मयुगानंतर ताम्र पाषाण युग आले. धातूंच्या शोधामुळे मानवी संस्कृती अतिशय प्रगल्भ झाली. ताम्रपाषाण युगात काशाचा (तांबे व लोखंड यांचा संमिश्र धातू) शोध लागला. याकाळात मेसापोटेमिया, चीन, इजिप्त आणि भारत या देशात संस्कृतीचा उदय झाला. या संस्कृतीबद्दल आपण या पाठात माहिती घेणार आहोत. तसेच लोह युगातील ग्रीस, रोम, पर्शिया आणि भारत येथील संस्कृतीचीही आपण माहिती घेणार आहेत.

आज सगळीकडे वापरात असलेल्या लोखंडाचा शोध या काळात लागला. स्वयंपाकघरातील भांडी (स्टील), कपाटे, टेबले, खुर्च्या, दारे, खिडक्या, यंत्रसामग्री सर्व प्रकारची वाहने यामध्ये लोखंड किंवा स्टील वापरले जाते.

या भागात आपण प्राचीन भारतीय संस्कृतीची, त्यामधील साम्राज्यांची, महाराजांची माहिती घेणार आहोत. मानवी संस्कृतीमध्ये भारतीय संस्कृतीचे मोठेच योगदान आहे. आपल्या वैभवशाली भूतकाळाचा आणि परंपरांचा मागोवा घेणे हे मोठे रंजक काम आहे. चला तर आपण आदिमानवापासून सुरवात करून ज्या टप्प्यांनी संस्कृतीत बदल होत गेले त्या सर्व टप्प्यांची माहिती घेऊ आणि आजच्या युगातील अतिप्रगत, सुसंस्कृत मानव कसा घडला ते जाणून घेऊ.

## उद्दिष्टे :

या पाठाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास खालील गोष्टी समजतील.

- तार्म्रपाषाण युगातील मेसापोटेमिया, चीन, इजिप्त आणि भारत या संस्कृतीचे योगदान समजेल.

❖ लोहयुगातील ग्रीक, रोमन, पर्शियन संस्कृतींचे योगदान समजेल.

❖ भारतामध्ये वैदिक काळापासून सम्राट हर्षवर्धनच्या काळापर्यंत घडलेल्या महत्त्वाच्या गोष्टी समजतील.

❖ जागतिक संस्कृतीमध्ये सर्व क्षेत्रात भारतीय संस्कृतीचे किती मोठे योगदान आहे, हे समजेल.

## १.१ कासे युग (The Bronze Age)


अर्वाचीन अश्म युगाच्या शेवटी शेवटी मानवाने धातूचा वापर करण्यास सुरवात केली. सर्वात प्रथम मानवाने तांबे या धातूचा शोध लावला व तो वापरण्यास सुरवात केली. या युगात दगड आणि तांबे या दोन्हीपासून अवजारे व हत्यारे तयार करत. या युगामध्ये तांबे आणि त्यापासून कासे हे संमिश्र तयार करण्याचे ज्ञान मानवाला झाले होते. म्हणून या युगाला कासे युग (Chalcolithic Culture) असे म्हणतात. हळूहळू अवजारे व हत्यारे यांच्यासाठी होणारा दगड, लाकूड, हाडे यांचा वापर कमी झाला आणि त्याची जागा तांबे आणि कासे या धातूंनी घेतली. मानवाने विटा तयार करावयाचे ज्ञान प्राप्त करून त्यांचा वापर बांधकामात करण्यास सुरवात केली. या विटा उत्तमपैकी भाजलेल्या आणि सूर्य प्रकाशात वाळविलेल्या असत. वेगवेगळ्या नद्यांच्या खोऱ्यात गावांची वाढ होऊन नवीन संस्कृती उदयाला आली. हीच गावे पुढे व्यापार उद्योग आणि प्रशासनाची केंद्रे झाली. या युगातील लोकांनी संस्कृती प्रगतीकडे नेण्याचे मोठेच काम केले आहे. त्यांचे या बाबतीत महत्त्वाचे योगदान आहे.

या पाठात आपण ताम्रपाषाण युगातील मेसापोटेमिया, इजिप्त, चीन आणि भारत येथे उदयास आलेल्या संस्कृतींचा अभ्यास करणार आहोत.

### १.१.१ मेसापोटेमिअन संस्कृती :

तायग्रिस आणि युफ्राटेस या दोन नद्यांमध्ये मेसापोटेमिया हा प्रदेश वसला आहे. हा प्रदेश सध्याच्या इराक या देशात आहे. या नद्यांना नेहमी पूर येत असत. पुराबरोबर आलेला गाळ दोन्ही तीरांवर पसरला जाई. त्यामुळे हा प्रदेश अतिशय सुपीक झाला होता. त्यामुळे धान्यउत्पादन वाढले होते. त्यामुळे साहजिकच तेथे विणकर, लोहार, कुंभार, सोनार, सुतार या कारागिरांची वाढ झाली. हे कारागिर आपल्या वस्तूंच्या बदल्यात जीवनावश्यक वस्तू मिळवत. त्यांनी आपला व्यापार भारतापर्यंत वाढविला होता. हा व्यापार खुष्कीच्या आणि समुद्रामार्गेसुद्धा होत होता. बैलगाड्या, गाड्या, बोटी आणि जहाजे यांचा वापर व्यापारासाठी होत होता. या संस्कृतीत लेखनकलाही विकसित झाली. त्यांची लिपी चित्रे आणि चिन्हे यांनी तयार झाली होती. (बाणाकृती लिपी)

मेसोपोटेमिया संस्कृतीत प्रत्येक गाव स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे होते. प्रत्येक गावाची प्रशासनव्यवस्था स्वतंत्र होती. राज्यकर्ते राजे, धर्मगुरू आणि उच्चवर्गीय लोक असत. याखेरीज गावामध्ये सामान्यलोक, व्यापारी, गुलाम असत. हे लोक सूर्य, चंद्र, नभ, सुपीकता इ. देवतांची पूजा करीत. प्रत्येक गावाची स्वतंत्र देवता असे.




**आकृती १.१ ः बाणाकृती लिपी**

### १.१.२ इजिप्ताशिअन संस्कृती :

नाईल नदीच्या सुपीक खोऱ्यात इजिप्तशिअन संस्कृती वसली होती. इजिप्तच्या राजांना फॅरोह असे म्हणत. त्यांच्या हाताखाली मंत्री आणि अधिकारी असत. ते प्रशासकीय व कर गोळा करण्याचे कार्य करीत असत. धर्मगुरुंना समाजात फार मान असे प्रत्येक गावात एका विशिष्ट देवतेचे मंदिर असे. या संस्कृतीतील लिपीला हिरोग्लिफिक्स या नावाने ओळखतात. व्यापारी खुष्कीच्या आणि समुद्राच्या मार्गाने व्यापार करत. दगड घडविणारे (मूर्तिकार) आणि सुतार हे कुशल कारागिर होते. या संस्कृतीतील लोकांना वजनांचे आणि मापनाचे सखोल ज्ञान होते.

फॅरोह राजांनी पिरॅमिड ही भव्य स्मारके वांधली. या संस्कृतीतील लोकांचा मरणोत्तर जगावर विश्वास होता. म्हणून ते मृतांची शरीरे सुरक्षित ठेवत. या शरीरांना ममी असे म्हणतात. मृत राजांची शरीरे सुस्थितीत ठेवण्यासाठी पिरॅमिड वांधले गेले.




**आकृती १.२ : हिरोग्लिफिक्स लिपी**

## १.१.३ चिनी संस्कृती :

उत्तर चीनमधील व्हांग व्हो नदीच्या खोऱ्यात चिनी संस्कृतीचा उदय आणि वाढ झाली. येथील राजसत्ता शँग या घराण्याची (इ. स. पूर्व १५२३ ते इ. स. पूर्व ११२२) होती. यांनीच चीनमधील पहिली शहरे उभी केली. या राजसत्तेचे कला आणि संस्कृती यामधील योगदानही मोठे होते. चिनी लिपीची निर्मिती याचकाळात झाली. या काळात कारागिरी करणारे कारागिर अत्यंत कुशल होते. झाऊस या राजघराण्याने शँग या राजघराण्याची सत्ता उलथून टाकली. शत्रूपासून बचाव व्हावा म्हणून झाऊस सत्तेने अभेद्य किल्ले बांधले. गावांना वेशी बांधल्या या राजघराण्याच्या अखेरच्या काळात लोखंडाचा चीनमध्ये शिरकाव झाला आणि चीनमधील कासे युगाची समाप्ति झाली.

इ. स. पूर्व २२१ मध्ये चिन राजघराण्याची सत्ता आली. त्यांनी त्यांच्या साम्राज्यात समान लिपी, समान कायदा आणि समान वजन मापे यांची अंमलबजावणी केली. चिनची भिंत (Great wall of China) याच राजसत्तेने बांधली.

### आपल्यासाठी एक उपक्रम १.१

जगातील सर्व मानवी संस्कृतींचा उदय नद्यांच्या काठीच का झाला? नद्यांच्या काठी वसलेली काही मोठी शहरे सांगा. नदीकाठापासून दूर असलेल्या शहरांपेक्षा नदीकाठी असलेली शहरे जास्त भरभराटीस का आली? याची कमीतकमी दोन कारणे सांगा.

## १.२ भारत ʻ सिंधू संस्कृती :

जागतिक पातळीवर उदयास आलेल्या कासे युग संस्कृतीपैकी एक संस्कृती भारतात नांदत होती, हे तुम्हास माहीत आहे का? ही संस्कृती सिंधू नदीच्या खोऱ्यात भरभराटीस आली. इ. स. १९२0 च्या

सुमारास या खोऱ्यात उत्खनन करताना पुरातत्वशास्त्रज्ञांना सिंधु संस्कृतीचा पुरावा मिळाला. मोहेंजोदडो आणि हडप्पा ही पहिली दोन उत्खननस्थळे होत. त्यामुळे या संस्कृतीला हडप्पा संस्कृती असेही म्हतात. आतापर्यंत या संस्कृतीची पुष्कळ स्थळे शोधण्यात आली आहेत. या संस्कृतीतील महत्त्वाची शहरे हडप्पा (पश्चिम पंजाब), मोहेंजोदडो (सिंध), लोथल (गुजरात), कालीबंगन (राजस्थान) रोपार (पंजाब) बानवळी आणि राखीगढ (हरयाना) आणि ढोलावीरा (गुजरात) ही आहेत.

### १.२.१ शहर रचना :

दक्षिण आशियातील पहिली नागरी समाजव्यवस्था या शहरांमध्ये आढळून येते. शहर रचना, कला आणि संस्कृती या तीनहीमध्ये सिंधु संस्कृती अत्यंत पुढारलेली होती. अतिशय सुनियोजित शहरात लोक राहत होते. भक्कम जोती बांधून त्यावर इमारती बांधल्या होत्या. रस्ते अत्यंत प्रशस्त आणि एकमेकांना काटकोनात छेदणारे होते. घरे पक्क्या विटांची व दोन मजली होती. प्रत्येक घरामध्ये विहीर, न्हाणीघर आणि सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था होती. रस्ते पक्के होते आणि रस्त्यांवर प्रकाश व्यवस्था पण होती. मोहेंजोदडोमध्ये तर राहत्या घरांखेरीज मोठ्या आकाराची अनेकखांबी सभागृहेपण होती. येथील वैशिष्ट्यपूर्ण इमारत म्हणजे भव्य स्नानगृह होय. (१८ फूट लांब, १०८ फूट रुंद व खूप उंच) यामधील पोहोण्याचा तलाव ३९ फूट लांब २३ फूट रुंद व ८ फूट खोल होता. हडप्पा शहरातील भव्य धान्य कोठार ही आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण इमारत होती. या कोठाराचा उपयोग शेतकऱ्यांकडील जादा उरलेले धान्य साठविण्याकरिता केला जात असे.

### १.२.२ समाजरचना आणि अर्थकारण :

या संस्कृतीतील लोक शेती, पशुपालन, कलाकुसरीचे काम, व्यापार आणि इतर व्यवसाय करत असत. शेतीतील मुख्य पिके गहू, बार्ली, राय, वाटाणा, तीळ ही होती. लोथाल आणि रंगपूर या उत्खनन स्थळांवर तांदूळाचा नमुना सापडला आहे. कालीबंगन या उत्खननस्थळावर जमिनीवर नांगराचे ओरखडे आढळले आहेत. त्यावरून त्यांना नांगर माहीत होता, हे लक्षात येते. कापणीसाठी विळ्यांचा वापर होत होता. जलसिंचनाचा वेगवेगळ्या पद्धती अस्तित्वात होत्या. कापसाचे उत्पादन होत होते. गायी, शेळ्या, मेंढ्या, बैल, कुत्री, उंट आणि गाढव हे पाळीव प्राणी होते. लोकांच्या जेवणात गहू, डाळी, मास, मासे, दूध, अंडी आणि फळे याचा समावेश होता. तांबे आणि कासे यापासून तयार केलेली अवजारे आणि हत्यारे वापरली जात. सोने, चांदी, मूल्यवान खडे (हिरे) शंख आणि हस्तीदंत यापासून दागिने बनवित. कुंभार, विणकर, गवंडी, सुतार, लोहार, सोनार, शिल्पकार, पाथरवट, विटा तयार करणारे आणि मूर्तिकला जाणणारे कारागिर समाजात होते. व्यवसाय आणि व्यापार या प्रमुख आर्थिक घडामोडी होत्या. हा व्यापार देशांतर्गत व देशाबाहेरही होत होता. हडप्पा व मेसापोटेमिया या दोन संस्कृतीत व्यापार होत असल्याचे अनेक पुरावे सापडले आहेत. सोने, कथिल, तांबे हे धातू आणि मौल्यवान रत्ने यांची हडप्पा येथे आयात होत होती. तर शेतीमाल, कापूस, कापड, मातीची भांडी, दागिने, हस्तीदंती वस्तू यांची निर्यात होत होती. हडप्पामधील नाणी व्यापारामध्ये वापरली जात. येथील समाज निरनिराळ्या वर्गात विभागला होता.

### १.२.३ धर्म आणि संस्कृती ः

देवीला माता मानण्याचा प्रघात होता. देवीचे अनेक पुतळे सापडले आहेत. एक पुरूष देवतेचा पुतळा मोहेंजोदडो येथे सापडला आहे. हा पुतळा म्हणजे भगवान शंकर (पशुपति) या देवतेची प्रतिकृति आहे. ही देवता पशूंच्या सानिध्यात ध्यानमग्न अवस्थेत एका शिक्क्यावर कोरलेली सापडली.

लिंगपूजा आणि वृक्षपूजा प्रचलित होती.

आजच्या भारतातील हिदूंच्या धार्मिक परंपरात आणि या परंपरात पुष्कळच साम्य आढळून येते. मंदिरात शिवलिंगाची पूजा केली जाते. तसेच पिंपळासारखी झाडेही पूजली जातात.

### १.२.४ तांत्रिक कौशल्य :

या संस्कृतीतील लोकांचे तांत्रिक कौशल्य वाखाणण्यासारखे होते. त्यांना शहर नियोजन तंत्रज्ञान, वजने आणि मापे आरोग्य आणि शरीरस्वास्थ यांचे उच्च दर्जाचे शास्त्रीय ज्ञान होते. त्यांना लेखनकलाही अवगत होती. परंतु त्यांची लिपी अजून आपल्याला वाचता आली नाही.

### १.२.५ संस्कृतीचा अस्त :

या संस्कृतीचा अस्त का झाला, याविषयी अजूनही माहिती मिळत नाही. काही नैसर्गिक प्रकोपामुळेच ही संस्कृती नष्ट झाली असावी. वारंवार येणारे पूर आणि दुष्काळ, जमिनीची नापीकता, सततच्या वापरामुळे जंगलांचा नाश, धरणीकंप, बराच काळ अपुरा पाऊस, वाळवंटाचे शेतीवर आक्रमण यासारख्या नैसर्गिक आघात या संस्कृतीवर झाले असावेत. काही शोधकांच्या मते मेसापोटेमिया बरोबर होणाऱ्या व्यापारात घट झाल्यामुळेसुद्धा संस्कृतीवर अनिष्ट परिणाम झाला असेल. याबरोबर भारतातील सुसंस्कृत संस्कृती लयाला गेली.

### पाठ्यांशावरील प्रश्न १.१

**१. रिकाम्या जागा भरा.**

अ) सिंधु संस्कृतीत समाज निरनिराळ्या .......... विभागला होता.

ब) काही .............. मुळेच सिंधु संस्कृती नष्ट झाली असावी.

क) सिंधु संस्कृतीतील लोकांचा ........... देशाशी व्यापार होता.

२. मानवाने सर्वात प्रथम कोणता धातू वापरला?

३. मेसापोटेमिया संस्कृती कोणत्या दोन नद्यांमध्ये वसली होती?

४. इजिप्त संस्कृतीमधील लिपीचे नाव सांगा.

५. सिंधु संस्कृतीतील (हडप्पा संस्कृतीतील) चार महत्त्वाच्या शहरांची नावे सांगा.

## १.३ लोह युग संस्कृती :

सुमारे ३००० वर्षापूर्वी लोहयुग सुरू झाले. या काळापासून लोखंडाचे उत्पादन व उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. तांबे किंवा कासे या धातूपेक्षा लोखंड हा धातू अधिक दणकट आणि स्वस्तपण होता. त्यामुळे आपल्या वंशजांनी लोखंडापासून बनविलेली दणकट अवजारे वापरून जंगलतोड केली व शेती योग्य जमीन तयार केली. त्यामुळे शेती उत्पादनात लक्षणीय वाढ झाली. त्यामुळे समाजजीवनामध्ये मोठ्या प्रमाणावर सामाजिक आणि आर्थिक बदल घडून आले.

लोखंडाचा सर्वात मोठा परिणाम वाहतूक आणि दळणवळण व्यवस्थेवर झाला. लोखंडी भट्टी व तारा वापरून दणकट चाके तयार केली. लोखंडी तक्ते आणि खिळे वापरूनच जहाजे तयार करतात. यामुळे व्यापार वाढण्यास मदत झाली. त्यामुळे संपन्नता आली. लढण्यासाठी लोखंडापासून लांब तलवारी, भाले, बरच्या आणि ढाली बनविल्या गेल्या. त्यामुळे लढाईची संपूर्ण पद्धतीच बदलून गेली.

लोहयुगात बौद्धिक ज्ञानामध्येही प्रगती झाली. यातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे मूळाक्षरांचा शोध होय. त्यामुळे चित्रलिपीचा वापर संपुष्टात आला. लोह युगात भरभराटीस आलेली संस्कृती ग्रीस, रोमन, पर्शियन आणि भारतीय या होत. या संस्कृती पहिल्या संस्कृतीपेक्षा पुष्कळच सुधारलेल्या होत्या. या संस्कृतीबद्दल तपशीलवार माहिती पाहू.

### १.३.१ ग्रीक संस्कृती :

सुमारे २००० वर्षापूर्वी ग्रीस या देशात ग्रीक संस्कृती भरभराटीस आली. या संस्कृतीत स्वतंत्र नगर राज्ये होती. त्यांनी अतिशय उत्तम प्रशासन व्यवस्था विकसित केली. नगर राज्यांचे विकसन हे ग्रीक संस्कृतीचे वैशिष्ट्य होते. प्रत्येक नगरा भोवती संरक्षणासाठी तट बांधलेला असे. त्यास अक्रोपोलिस असे म्हणत. ग्रीक संस्कृतीतील नगर राज्यांमधील प्रसिद्ध नगर राज्ये अथेन्स आणि स्पार्टा ही होती. अथेन्स हे नगर राज्य श्रीमंत आणि सुसंस्कृत होते. या नगरात लेखक तत्वचिंतक, कलाकार आणि विचारवंत यासारखे विद्वान लोक राहत होते. समाजात गुलामगिरी होती. परंतु तेथे लोकशाहीप्रधान प्रशासन होते. स्पार्टा हे नगर राज्य मात्र लष्करी तळासारखेच होते. या ठिकाणी वरिष्ठांची आज्ञा प्रमाण होती. ग्रीसमधील सर्वात उत्तम सेना स्पार्टाचीच होती. युद्धाचे शिक्षण घेणे हे येथे महत्त्वाचे समजले जाई.

अथेन्स आणि स्पार्टा या दोन नगरराज्यात परंपरागत शत्रुत्व होते. तरीसुद्धा ही दोन राज्ये एकत्र येऊन त्यांनी त्याचा समाईक शत्रू असलेल्या पर्शियन राजे दारियस पहिला आणि झेरझेक्स यांच्याशी युद्ध केले. पेरिक्लेस राजाची कारकीर्द म्हणजे अथेन्सचे सुवर्ण युगच होते. परंतु अथेन्स आणि स्पार्टा यामध्ये तब्बल सत्तावीस वर्षे युद्ध सुरू होते. या युद्धाला पेलोपोनेशिअन युद्ध असे म्हणतात. या युद्धात शेवटी अथेन्सचा पराभव झाला.

प्राचीन ग्रीस पाश्चिमात्य संस्कृतीचे जन्मस्थान आहे असे म्हणतात. अथेन्सनेच कला, साहित्य, विज्ञान, शिक्षण आणि शिल्पकला यांचा पाया घातला. सॉक्रेटिस, प्लेटो आणि ॲरिस्टॉटल हे अत्यंत थोर विचारवंत होते. त्यांच्या विचारांचा आजही अभ्यास होत आहे. हिरोडोटस् आणि थुडियास हे प्रख्यात इतिहासकार होते. आर्किमिडीज, ॲरिस्टारचस, डेमोक्रिटस हे नामवंत शास्त्रज्ञ होते. आशिलस,

सोफोक्लेस आणि ॲरिस्टोफेनस हे गाजलेले नाटककार होते. होमर या महाकवीने इलियाड आणि ओडिसी ही दोन महाकाव्ये लिहिली.

ग्रीक लोकांना वास्तुकलेचेही सखोल ज्ञान होते. त्यांनी अनेक सुंदर मंदिरे आणि महाल बांधले. ग्रीक लोकांची अनेक देवतांवर श्रद्धा होती. प्रत्येक नगराला त्या नगराचे संरक्षण करणारे दैवत होते. माऊंट ऑलेपस हे देवतांचे वसतिस्थान आहे, असा समज होता. जगातील पहिली ऑलेंपिक स्पर्धा इ. स. पूर्व ७७६ मध्ये ऑलिंपिया या ठिकाणी घेतली गेली. देवतांचा राजा झिअस याच्या सन्मानार्थ ऑलिंपिक या खेळ आणि शर्यतीच्या स्पर्धा भरवल्या जात.

ग्रीसमधील शहरे, गावे प्रशासकीय तसेच सांस्कृतिक आणि व्यापारी केंद्रे असत. शेतकरी मुख्यत धान्य, द्राक्षे आणि ऑलिव्ह फळे यांचे उत्पादन घेत. द्राक्षापासून मदिरा व ऑलिव्हपासून ऑलिव्ह तेल ही मुख्य उत्पादने होती. ग्रीकांनी मोठी साम्राज्ये निर्माण केली होती. मॅसेडोनिआचा राजा अलेक्झांडर याने आपले सैन्य युरोपबाहेर नेऊन सिरीया, मेसापोटेमिया, इजिप्त, अफगाणिस्तान, मध्य आशियाचा काही भाग आणि पश्चिम उत्तर भारत हा भाग जिंकला होता. याला अलेक्झांडर द ग्रेट या नावाने इतिहासात ओळखले जाते. अलेक्झांडरच्या स्वाऱ्यांमुळे जगाला ग्रीक विचार आणि विचार यांची माहिती झाली. अलेक्झांडर वयाच्या ३३ वर्षी वारला. त्याच्या मृत्युनंतर त्याच्या साम्राज्याचे विभाजन झाले. त्यानंतर रोमन लोकांनी ग्रीसवर स्वारी करून त्यावर कब्जा केला.

### १.३.२ रोमन संस्कृती :

मध्य इटलीमधून वाहत जाणाऱ्या टायबर नदीच्या काठावर असणाऱ्या रोम शहरामध्ये इ. स. पूर्व ५१० मध्ये रोमन लोकांनी रोमन संस्कृतीची स्थापना केली. या साम्राज्यात लोकशाही होती. प्रतिष्ठित आणि विद्वान लोक प्रतिनिधी (सिनेटर) म्हणून निवडले जात. त्या सर्व प्रतिनिधींची मिळून प्रतिनिधीसभा (सिनेट) तयार होई. त्यामधून दोन प्रमुख (कौन्सल्स) निवडले जात. त्यांच्यामार्फत राज्यप्रशासन चालविले जाई. इ. स. पूर्व २०० मध्ये रोम इटलीमधील बलाढ्य राज्य होते. मेडिटेरेनियम जगावर वर्चस्व मिळविण्यासाठी त्यांनी कार्थेज साम्राज्याचा पराभव केला. सुरवातीच्या रोमन संस्कृतीत लोकसंख्या तीन वर्गात विभागली होती. उच्चवर्गीय, सामान्यजन आणि गुलाम हे तीन वर्ग होते. रोमन अर्थ व्यवस्था गुलामांवर आधारित होती. श्रीमंत रोमन लोकांकडे गुलामांची मालकी असे. या गुलामांना हिंस्त्र प्राण्यांबरोबर लढण्याचे शिक्षण देण्यात येई. गुलाम लोकही बंड करून उठत. इ. स. पूर्व ७४ मध्ये गुलामांच्या बंडाचे नेतृत्व स्पार्टाकसने केले होते.

जरी रोममध्ये लोकशाही प्रशासन होते, तरीसुद्धा उच्चपदस्थलोक सत्तेसाठी आपापसात भांडत असत. ज्युलियस सिझर हा असाच प्रभावशाली पुढारी होता. त्याच्या हातात सत्ता आल्याने तो हुकूमशहा बनला. इ. स. पूर्व ४४ मध्ये सिझरचा खून झाला आणि यादवी युद्ध सुरू झाले. युद्धानंतर ऑगस्टस सीझर हा रोमचा पहिला सम्राट बनला. रोमन साम्राज्य युरोप, आशिया आणि आफ्रिका या तीनही खंडात पसरले होते. ऑगस्टस सीझरच्याच काराकीर्दीत येशू ख्रिस्ताचा उदय झाला. त्याने ख्रिश्चन धर्माची स्थापना केली. येशू ख्रिस्त बेथलेहेम येथे जन्मला. त्याच्या शिकवणुकीनुसार सर्व पुरुष आणि स्त्रिया ईश्वराचीच लेकरे आहेत. लोकांना त्याने एकमेकांवर प्रेम करण्यास शिकविले. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या शिष्यांनी ख्रिश्चन धर्माचा, प्रसार केला. रोमन साम्राज्य ऐन बहरात असताना पूर्वेकडे मेसापोटेमिया ते दक्षिणेकडे गाऊल आणि ब्रिटन ह्या संपूर्ण पट्टा रोमन साम्राज्यात सामील होता

आणि पट्ट्यातील सर्वांनी रोमन संस्कृतीचा स्वीकार केला होता. गावामध्ये देवळे, महाल, नाट्यगृहे, सार्वजनिक स्नानगृहे बांधली गेली. रोमन लोकांनी शहरालगतच्या ग्रामीण भागात भव्य आणि सर्व सुखसोयींनी युक्त अशी कृषीघरे (फार्म हाऊसेस) बांधली. त्यांना व्हिला असे म्हणत. धार्मिक समारंभ, खेळांचे सामने, नाट्यगृहातील नाटके, विजय कवायती प्रसंगी रोमन राज्यकर्ते अध्यक्षस्थान स्वीकारीत असत. गुलाम आणि हिंस्त्र प्राणी यामधील लढत, रथशर्यती, नाटके ही करमणुकीची साधने होती.


रोमन साम्राज्य अनेक प्रांतात विभागले होते. प्रत्येक प्रांताचा प्रमुख राज्यपाल (गव्हर्नर) असे. त्याच्या हाताखाली प्रशासनाच्या प्रत्येक विभागाचे काम पाहण्यासाठी अधिकारी नियुक्त केलेले असत.



**आकृती १.४ : रोमन नाट्यगृह (कलोसियम/ॲम्फीथिएटर)**

रोमन साम्राज्याची सेना प्रबळ होती. सेनेच्या प्रत्येक विभागात ५००० सैनिक असत. त्यांच्या प्रमुख कमांडर असे. सम्राटाच्या मर्जीनुसार अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या होत असत. परंतु त्याची सत्तासुद्धा सेनेवरच अवलंबून असे. बऱ्याचदा प्रबळ सेनापती दुबळ्या सम्राटावर मात करून स्वत: सत्ता ताब्यात घेत असे.

इ. स. ३९५ मध्ये प्रचंड आवाराच्या रोमन साम्राज्याचे प्रशासन सुकर व्हावे म्हणून दोन भाग करण्यात आले. त्यापैकी पूर्व भागाची राजधानी बिझांटियम ही होती. इ. स. ४७६ मध्ये बार्बारियन लोकांनी केलेल्या स्वारीमुळे पश्चिम साम्राज्य नष्ट झाले. पूर्व साम्राज्याचा सम्राट कॉन्स्टन्स हा होता. त्याने बिझांटियम या शहराला कौन्स्टन्टिनोपाल हे नाव दिले. कॉन्स्टन्टिनोपाल हे शहर पूर्व परंपरावादी ख्रिश्चन लोकांचे मुख्य ठिकाण झाले आणि पूर्व साम्राज्याच्या सम्राटांच्या राजधानीचे शहर झाले.



टिपा

### आपल्यासाठी एक उपक्रम १.२

या पाठात तुम्ही गुलाम व हिंस्त्र प्राणी यांच्या लढतीबद्दल वाचले आहेत. काही लढती तुम्ही चित्रपटांमध्ये किंवा दूरदर्शनवर पाहिल्यासुद्धा असतील. हे पाहताना तुम्हाला बरे वाटले का? मानव आणि हिंस्त्र पशू यामधील अमानुष लढत मनोरंजनाचे साधन आहे का? याबावतीत तुम्हास काय वाटते, ते सुमारे ५० शब्दात लिहा.

### १.३.३ पर्शियन संस्कृती :

लोहयुगात पर्शिया (म्हणजे आजचा इराण) या देशात आर्य जमातीचे लोक राहत. त्यांची एक उपजात मेडेस जमातीतील लोक देशाच्या पश्चिम भागात राहत होती. दुसरी उपजात पर्शियन या नावाने ओळखली जात होती आणि ती देशाच्या पूर्व आणि दक्षिण भागात वस्ती करून होती. मेडेस जमातीने प्रबळ साम्राज्य उभारले. या साम्राज्यात देशाचा बहुतेक भाग समाविष्ट होता. सुरवातीला पर्शियन या उपजातीनेसुद्धा मेडेस उपजातीचे वर्चस्व मान्य केले. इ. स. पूर्व ५५० मध्ये सायरस् या पर्शियन राजाने प्रबळ सैन्य उभे केले आणि बॅबिलोन, असिरीया आणि आशियामायनर हा भूभाग जिंकला. दरियास पहिला हा सर्वात प्रबळ पार्शियन सम्राट होता. हा सम्राट अचिमेनियन वंशातील होता. त्याचे साम्राज्य सिंधू नदीपासून भूमध्य समुद्रापर्यंत पसरले होते. इ. स. पूर्व ५१८ मध्ये याने पर्सेपोलिस शहर राजधानी केले. त्याच्या कारकीर्दीतच पर्शियन कला, शिल्पकला, साहित्य, वास्तुकला यांना उर्जितावस्था आली. त्याने प्रबळ आरमाराची उभारणी केली.

पर्शियन सम्राट अतिशय चांगले प्रशासक होते. त्यांना साम्राज्याचे प्रांतांमध्ये विभाजन केले. प्रत्येक प्रांत राज्यपाल किंवा सत्राप यांच्या अधिपत्याखाली असे. पर्शियन लोक अतिशय चांगले योद्धे होते. त्यांच्याकडे पायदळ, नौदल आणि लोखंडी शस्त्रे होती. जरी इ. स. पूर्व ३३१ मध्ये अलेक्झांडरने या साम्राज्याचा पराभव केला तरी पर्शियन संस्कृती मात्र लयाला गेली नाही. ही संस्कृती पर्शियन आणि सासनियन सम्राटांच्या साम्राज्यात फुलतच राहिली. परंतु इ. स. सातव्या शतकात अरबांनी त्यांच्यावर आक्रमण केले. त्यांचा पराभव केला.

हिंदू संस्कृतीप्रमाणेच पर्शियन संस्कृतीमधील लोकसुद्धा निसर्गशक्तीचे उपासक होते. ते सूर्यदेव, आकाशदेव आणि इतर अनेक देव मानीत. अग्निला ते पावित्र्याचे प्रतिक मानत. ते अग्निपूजा करीत आणि पशूबळीसुद्धा देत असत. काही काळानंतर झरतृष्ट या धर्मगुरुने पारशी धर्माची स्थापना केली. त्याने लोकांना अहुरा मझदा (स्वर्ग आणि प्रकाशाचा देव) ची माहिती दिली. त्याच्यापासून मानवाला शक्ती आणि स्फूर्ती मिळते असे झरतृष्टांचे मत होते. त्यांच्या सांगण्यानुसार जीवन म्हणजे सत (प्रकाश) आणि असत् (काळोख) यामधील झगडा आहे. पारशी लोकांच्या पवित्र ग्रंथाचे नाव झेंदअवेस्ता हे आहे.

### पाठ्यांशावरील प्रश्न १.२

१. कोणत्याही तीन व्यवसायांमध्ये लोखंडी अवजारांचा खूप फायदा झाला?

२. ग्रीसमधील दोन महत्त्वाची नगरराज्ये सांगा.

३. रोम शहर कोणत्या नदीच्या तीरावर बसले होते?

४. **वाक्ये पूर्ण करा.**

अ) कॉन्स्टन्टिनोपाल ही ........... ची राजधानी होती.

ब) पर्शियन लोकांना एकत्र आणणारा सम्राट ............. हा होता.

क) भारतीय संस्कृतीमधील आणि पार्शियन संस्कृतीमधील लोक ......... पूजा करीत.

## १.४ भारत ´ वैदिक संस्कृती ः

वैदिक संस्कृती हा प्राचीन भारतीय इतिहासामधील नवीन टप्पा होता. इ. स. पूर्व १५00 या काळात आर्य लोक भारतात आले. त्यानंतरही हजार वर्षे ते येतच होते. या कालावधीत अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक घटना घडल्या. वैदिक युगाचे साधारणपणे दोन भाग होतात. (१) सुरवातीचा काळ (२) नंतरचा काळ.

तुम्ही वेदांविषयी ऐकलेच असेल. वैदिक काळातील माहितीचा वेद प्रमुख स्त्रोत आहे.

सुरवातीच्या काळातील वैदिक जमाती भारतीय उपखंडाच्या उत्तरपश्चिम भागात म्हणजे पंजाब, अफगाणिस्तान येथे राहत होत्या. या काळात सर्वात पहिला वेद म्हणजे ऋग्वेदाची निर्मिती झाली. या काळासंबंधी पुरातत्वशास्त्रीय पुरावा उपलब्ध होत नाही. याचे कारण असे असावे की सुरवातीच्या काळातील वैदिक लोक भटकते असावेत आणि ते एका जागी जास्त दिवस वस्ती करत नसावेत. चराऊ कुरणांवरच त्यांचा चरितार्थ अवलंबून होता. गुरे चारणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता. घोडे, शेळ्या आणि मेंढ्या यांना सुद्धा फार महत्त्व होते. थोड्या प्रमाणावर शेती केली जात होती. कुटुंब आणि जन ही सामाजिक एकके (social units) होती. जाती अस्तित्वात नव्हत्या. टोळीप्रमुखाला राजा असे म्हणत. जन एकत्र आले असता सभा किंवा समिती तयार होत असे सार्वजनिक निर्णयात सभा किंवा समितीच्या मताला किंमत असे. अनेक देवतांची उपासना होत असे. इंद्र हा देवांचा प्रमुख होता.

नंतरच्या वैदिक काळाविषयी आपणास इत्थंभूत माहिती मिळू शकते. कारण वेदातील माहिती तसेच त्याकाळातील पुरातत्वशास्त्रीय साहित्यदेखील आपणास उपलब्ध झाले आहे. नंतरच्या काळातील वैदिक साहित्य खालीलप्रमाणे आहे. ´ तीन वेद ´ सामवेद, यर्जुवेद आणि अथर्ववेद, ऋग्वेद धरून या चार वेदांवरील टीका ग्रंथ ´ ब्राह्मणके, अरण्यक आणि उपनिषदे.

याकाळातील संबंधित अनेक उत्खननस्थळे सापडली आहेत. या सर्व उत्खननस्थळांवर रंगीत मातीची भांडी सापडली आहेत. (Painted Grey Pottery) म्हणून या सर्व उत्खननस्थळांना 'रमाभां स्थळे' किंवा PGW स्थळे असे म्हणतात.

नंतरच्या वैदिक काळातील जमाती मोठ्या संख्येने गंगेच्या खोऱ्यात पसरू लागल्या. या काळाच्या शेवटी पूर्वेकडे तीन महत्त्वाच्या राज्यांचा उदय झाला. काशी, कोशल, विदेह, या काळात शेती हा

महत्त्वाचा व्यवसाय झाला. तांदूळ, गहू आणि ऊस यासारखी पिके पिकत. सर्व प्रकारच्या कलांचा उदय आणि वाढ झाली. लोखंड अवजारे आणि शस्त्रे तयार होऊ लागली. लोक गावात राहून स्थिर आयुष्य जगू लागले. हळूहळू जातिसंस्थेचा उदय होऊ लागला. सुरवातीला जाती संस्था वर्णसंस्थेच्या स्वरूपात प्रकट झाली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे ते वर्ण होते. राजाची सत्ता अधिकार वाढत गेले आणि लोकांच्या सभेचे अधिकार त्या प्रमाणात कमी होत गेले. पशूहत्त्या सार्वत्रिक झाली होती. इंद्रदेवाचे महत्त्व कमी होऊन नवीन देव प्रजापतिचे महत्त्व वाढले होते. उपनिषदांमध्ये बळी प्रथेबद्दल टिप्पणी करण्यात आली आहे.

### आपल्यासाठी एक उपक्रम १.३

खाली दिलेला उतारा वाचून त्यावरून प्रश्नांची उत्तरे द्या.

**उपजीविकेची निरनिराळे मार्ग :** (९, ११२, ऋग्वेदातील उतारा)

आपले सर्वांचे विचार, मार्ग, योजना वेगवेगळ्या आहेत. ब्राह्मण भक्तांकडे लक्ष देतो, सुतार तुटलेल्या लाकडाकडे (दुरुस्तीसाठी) लक्ष देतो. तर वैद्य जखमीची (उपचारासाठी) वाट पाहतो. लोहार मोठ्या, जुनवान आणि पक्ष्यांची पिले असलेल्या झाडाकडे (कापण्यासाठी) लक्ष देतो. तर एखादा अग्नि पेटवून आणि दगड घेऊन (संरक्षणासाठी) सोन्याच्या साठ्याकडे लक्ष देतो.

मी स्वत: कवी, माझे वडील वैद्य व आई जात्यावर दळण दळते आहे.

१) उताऱ्यात कोणकोणते व्यवसाय सांगितले आहेत?

२) हा कोणत्या प्रकारचा समाज असावा, असे वाटते.

३) व्यवसाय अनुवंशिक होता का? असल्यास का नसल्यास का नाही?

४) स्त्रिया कोणत्या प्रकारचे व्यवसाय करीत?

### १.४.१ वैदिकोत्तर युग :

इ. स. पूर्व ६ व्या शतकामध्ये उत्तर आणि पूर्व भारतात १६ मोठी राज्ये महाजनपद निर्माण झाली.

**ती पुढीलप्रमाणे :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) अंग | २) मगध | ३) वज्जी | ४) काशी |
| ५) कोशला | ६) मल्ला | ७) कुरु | ८) पांचल |
| ९) वत्स | १०) अवंती | ११) कंबोज | १२) गांधार |
| १३) अस्साका | १४) चेडी | १५) मत्स्य | १६) शूरसेन |

या महाजनपदांपैकी मगध, कोशला आणि अवंती ही तीन महाजनपदे अत्यंत प्रवळ होती.

शेतीचा विस्तार, उद्योगधंदे आणि व्यापार याची वाढ, प्रादेशिक राज्य निर्मिती आणि प्रादेशिक नागरिकरणाची सुरवात यामुळे समाजात जागृती आणि ताकद निर्माण झाली. इ. स. पूर्व ६ वे शतक हे सामाजिक आणि धार्मिक बदलाचे युग होते. वैदिक कर्मकांड आणि ब्राह्मणत्व याबद्दल लोकांमध्ये नाराजी होती. त्यामुळे अनेक पंथ आणि सुधारणावादी चळवळी उदयास आल्या. याच काळात दोन मुख्य धर्म उदयास आले. ते म्हणजे बौद्ध आणि जैन हे होत.

### १.४.२ बौद्ध धर्म :

गौतम बुद्धाचा जन्म भारत-नेपाळ सीमेवर असलेल्या लुंबिनी या गावी इ. स. पूर्व ५६३ मध्ये झाला. कपिलवस्तू नगरीचा राजा शुद्धोधन याचा गौतमबुद्ध हा पुत्र होता. वयाच्या २९ व्या वर्षी त्याने गृहत्याग केला. त्याला बोधगया येथील पिंपळाच्या झाडाखाली आत्मज्ञान प्राप्त झाले. वाराणशीजवळील साझनाथ या गावी बुद्धाने आपले पहिले प्रवचन दिले. बुद्धाच्या शिकवणुकीमध्ये चार महान सत्ये आणि आठ मार्ग (अष्टांगिक मार्ग) यांचा समावेश होतो.

गौतमबुद्धाच्या शिकवणुकीतील चार सत्ये व आठ मार्ग पुढीलप्रमाणे आहेत.

**चार सत्ये**

१) जगात सर्वत्र दु:ख भरले आहे.

२) हाव (तृष्णा) यामुळे दु:ख निर्माण होते.

३) तृष्णेवर विजय मिळविला, तर सर्व दु:खे दूर होतील.

४) त्यासाठी अष्टमार्गाचा अवलंब करावा.

| | |
|---|---|
| १) उचित प्रगती | २) उचित ध्येय |
| ३) उचित संभाषण | ४) उचित कृती |
| ५) उचित जीवनचर्या | ६) उचित प्रयत्न |
| ७) उचित बुद्धी | ८) उचित ध्यानधारणा |

बुद्धाने आत्यंतिक डामडौल आणि आत्यंतिक साधेपणा यातून मध्यम मार्ग सुचविला. त्याने आपल्या अनुयायांना आचारधर्म सांगितला. त्याने हिंसेचा आणि चौर्यकर्माचा त्याग करण्यास सांगितले. बुद्धाचे महानिर्वाण ८० व्या वर्षी उत्तर प्रदेशातील कुशीनगर येथे इ. स. पूर्व ४८३ मध्ये झाले.

### १.४.३ जैन धर्म :

पहिला तीर्थंकर वृषभनाथ याने जैन धर्माची स्थापना केली. पार्श्वनाथ हा तेवीसावा तीर्थंकर होता आणि वर्धमान महावीर हा चोवीसावा तीर्थंकर होता.

महावीराचा जन्म बिहारमधील वैशाली नगराजवळील कुंडाग्राम येथे इ. स. पूर्व ५४० मध्ये झाला. त्यांचे वडिल क्षत्रियांचे मुख्य होते. त्याने ३० व्या वर्षी दीक्षा घेतली. त्याचे महानिर्वाण राजगृह गावाजवळील पावापुरी येथे इ. स. पूर्व ४६८ मध्ये झाले. त्याच्या अनुयायांना जैन असे म्हणतात.

जैन समाजात सर्वशक्तिमान परमेश्वराला स्थान नाही. मात्र ते ईश्वराचे अस्तित्व मान्य करतात. परंतु त्यांच्या दृष्टीने ईश्वराचे स्थान मुनींच्या खालचे आहे. जगाच्या पाशातून सुटका करवून घेणे, हे जैन धर्माचे मुख्य ध्येय आहे. बौद्ध धर्माप्रमाणेच जैन धर्मामध्येही कर्मकांडाला विरोध केला आहे. तसेच वेदामध्ये सांगितलेल्या ब्राम्हणत्वाला विरोध केला आहे. जैन धर्मामध्ये जाती भेदाला थारा नाही. त्यांचा कर्मावर आणि पुनर्जन्मावर विश्वास आहे. जैन धर्माची पाच मुख्य तत्वे आहेत. (१) अहिंसा (२) सत्य (३) चौर्यकर्मापासून दूर (४) संसारापासून अलिप्तता (५) ब्रम्हचर्य

जैन धर्माची तीन रत्न (यिरत्न) खालीलप्रमाणे आहेत. (१) सम्यक दर्शन (२) सम्यक ज्ञान (३) सम्यक चरित्र

## आपल्यासाठी एक उपक्रम १.४

गौतमबुद्ध आणि महावीर याचंया शिकवणुकीवर विचार करा. तुम्हाला रोजच्या जीवनात उपयोगात आणता येणारी त्यापैकी कमीत कमी तीन तत्वे शोधा. त्या तत्वांवर मनन करा. आपल्या कुटुंबियांना व मित्रांना आपले विचार स्पष्ट करून सांगा.


## १.५ मौर्य साम्राज्य (इ. स. पूर्व ३२२ ते १८४) :

१६ महाजनपदापैकी मगध महाजनपाद हे अत्यंत प्रबळ राज्य होते. बिंबिसार, अजातशत्रू , महापदमनंद या सम्राटाच्या काळात या साम्राज्याचा प्रचंड विस्तार झाला. चंद्रगुप्त मौर्याने इ. स. पूर्व ३२२ मध्ये नंद साम्राज्यातील शेवटच्या राज्याचा पराभव केला. अशा तऱ्हेने गंगेच्या खोऱ्यातील नंद साम्राज्याचा आणि पंजाबमध्ये ग्रीकांचा पाडाव करून चंद्रगुप्ताने मौर्य साम्राज्याची मुहूर्त मेढ रोवली. सतत लढाया जिंकून आणि सीमेवरील प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडून चंद्रगुप्ताते जवळजवळ सर्व भारत त्याच्या अमलाखाली आणला. चंद्रगुप्ताने इ. स. पूर्व ३२२ ते इ. स. पूर्व ३९७ इतकी वर्षे राज्य केले. भद्रवहू या मुनीच्या प्रभावामुळे त्याने जैनधर्म स्वीकारला. त्याचे निधन म्हैसूरजवळील श्रवणबेलगोळा येथे झाले. त्यानंतर चंद्रगुप्त मौर्य याचा मुलगा बिंदूसार गादीवर आला. (इ. स. पूर्व २९७ ते इ. स. पूर्व २७२) त्याला मित्रघात (शत्रूंचा नाश करणारा) असे म्हणत त्याने दक्षिण भारत जिंकला आणि मौर्य साम्राज्य म्हैसूरपर्यंत वाढविले. त्याचे ग्रीसचा राजा अँटीओकस एक याच्याबरोबर मैत्रीपूर्व संबंध होते. बौद्ध धर्मग्रंथामध्ये असलेल्या वर्णनावरून बिंदूसाराच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्ये गादीसाठी संघर्ष झाला असे लक्षात येते.

या लढाईत अशोकाचा विजय झाला आणि तो मगध देशाचा सम्राट झाला. (इ. स. पूर्व २७२ ते इ. स. २३६), त्याच्या कारकीर्दीतील सर्वात मोठी घटना म्हणजे कालिंग देशावरोबर केलेले युद्ध होय. (इ. स. पूर्व २६0) या युद्धाचा उल्लेख शिलालेख क्र. १३ मध्ये आला आहे. नंतर अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला आणि युद्ध करणे सोडून दिले. तो अतिशय परोपकारी राजा होता आणि लोकांच्या भल्यासाठी त्याने अनेक चांगल्या गोष्टी केल्या. त्याचे धर्मविषयक धोरण सर्वधर्मसमभाव, वरिष्ठांबद्दल आदर व त्यांची निगा, दया, सत्य आणि पावित्र्य यावर आधारित होते. अशोकाच्या प्रयत्नामुळेच बौद्ध

धर्म भारताबाहेर पसरला. त्याने उभारलेल्या स्तूपांवर आणि शिलालेखांमध्ये त्याच्या कारकीर्दीविषयी माहिती मिळते.

अशोकाच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्याचे तुकडे झाले. परकीय आक्रमणाचा धोका निर्माण झाला. देशाची आर्थिक परिस्थिती खालावली. मौर्य घराण्यातील शेवटचा राजा बृहदरथ हा होता.




**आकृती १.४ : सम्राट अशोकाचे साम्राज्य**

## १.६ संगम युग (इ. स. पूर्व ३०० ते इ. स. २००) :

संगम युग दक्षिण भारतात अवतरले. संगम या शब्दाचा अर्थ विद्वान लोकांचा समुदाय असा होता. हा संगम मदुराई येथे राज्य करणाऱ्या पंड्या राजघराण्यात घडून आला. प्राचीन तामीळ साहित्यामध्ये तोलकपियम, आठ कवितासंग्रह (इट्टुटोगाई) दहा वर्णनात्मक, प्रेमकाव्ये (पट्टूपट्टू) अठरा लघुग्रंथ आणि तीन महाकाव्ये (शिलापाडीकरम, मणिमेखलाई, शिवगा सिंदमणी) यांचा समावेश होतो. संगम युगाचा कालावधी इ. स. पूर्व ३०० ते इ. स. २०० असा ५०० वर्षांचा होता. संगम साहित्य मुख्यत: पंड्या राजघराण्याशी संबंधित आहे. परंतु या साहित्यात चोला आणि चेरा या राजघराण्यांचीदेखील माहिती मिळते. पंड्या राजघराण्याचा राज्यविस्तार दक्षिण तामिळनाडू पुरता मर्यादित होता. मदुराई ही

त्यांची राजधानी होती. चेरा राजघराण्याने केरळवर राज्य केले आणि चोला राजघराण्याने उत्तर तामिळनाडू आणि दक्षिण आंध्रप्रदेशावर राज्य केले.

## १.७ कुशाण युग :

मौर्य साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर ग्रीक, शक, पार्थियन आणि कुशाण या परदेशी लोकांनी भारतावर हल्ला केला. त्यांनी भारताच्या पश्चिम आणि उत्तर पश्चिम भागावर राज्य केले. कुशाल लोक मध्य आशियामधील युची या टोळीमधील होते. कुशाणांचा पहिला राजा कुजुला काडफिसेस हा होता. त्यानंतर विमा काडपिसेस हा राजा सत्तेवर आला.

विमा काडपिसेस नंतर कनिष्क सत्तेवर आला. हा कुशाणांचा सर्वात सामर्थ्यवान राजा होता. कुशाण राजाने काश्मिर जिंकून घेतले आणि त्याने गंगेच्या खोऱ्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली. मध्य आशियातील कारगर, यारखंड आणि खोतून हे भूभाग घेतले. पंजाब आणि अफगाणिस्तान ही त्याच्या साम्राज्याची घटक राज्ये होती. कनिष्क बुद्ध धर्माचा चाहता होता. त्याच्या प्रयत्नामुळेच मध्य आशिया, चीन आणि इतर देशांमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार झाला. तो कला आणि विद्वता यांना मान देत असे. पुरुषपुरा (सध्याचे पेशावर) ही त्याची राजधानी होती. कनिष्कानंतर वशिष्क, हविष्क, कनिष्क दुसरा आणि वासुदेव हे गादीवर आले. वासुदेव हा कुशाणांचा शेवटचा सामर्थ्यवान राजा होता. त्याच्या मृत्यूनंतर कुशाण साम्राज्य मोडकळीस आले. कुशाण साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर उत्तर हिंदुस्थानात यादवी माजली. ती जवळजवळ शंभर वर्षे सुरू राहिली.

## १.८ गुप्त युग (इ.स . ३१९ ते इ. स. ५५०) :

चौथ्या शतकातील गुप्त युगाचा उदय हे भारताच्या इतिहासातील नवीन पान ठरले. राजकीय यादवी आणि फुटीरतेचे युग संपून एकतेचे आणि सचोटीचे युग आले. सामर्थ्यमान गुप्त सम्राटांच्या कारकीर्दीत भारतीय जीवनामधील वेगवेगळ्या अंगांची झपाट्याने प्रगती झाली. या काळामधील फाहिएन हा चिनी यात्रेकरू भारतात आला होता. त्याने भारतात सर्व समाजात सुख समृद्धी आणि वैभव नांदत होते, असे लिहून ठेवले आहे.

गुप्त साम्राज्याचा संस्थापक श्री गुप्त हा होता. त्यानंतर घटोत्कच गुप्त गादीवर आला. परंतु त्यानंतर आलेला चंद्रगुप्त पहिला (इ. स. ३१९ ते ३५५) हा गुप्त साम्राज्याचा खरा पहिला सम्राट होता. त्याला महाराजाधिराज ही विरुदावली (पदवी) होती. समुद्रगुप्त हा सुद्धा प्रभावी सम्राट होता. त्याच्या दरबारात हरिसेना नावाचा कवी होता. त्याने सम्राटासंबंधी वर्णिलेला प्रशंसापर मजकूर आपल्याला अलाहाबाद येथील स्तुपावर वाचावयास मिळतो. या मजकुरात कवीने सम्राटाच्या विविध स्वाऱ्यांचे वर्णन केले आहे. तो शूर लढवय्या आणि कुशल प्रशासक होताच. त्याबरोबरच तो प्रतिभावान कवी, संगीतकार आणि कला आणि विद्वत्ता यांचा चाहता होता. त्याने स्वत:चे सार्वभौमत्व जाहीर करण्यासाठी अश्वमेध यज्ञ केला.

समुद्रगुप्तानंतर चंद्रगुप्त दुसरा (इ. स. ३८० ते ४१५) गादीवर आला. त्याने पश्चिम भारतातील शक राजांवर विजय मिळविला आणि स्वत:ला विक्रमादित्य ही उपाधी घेतली. स्वत:ची सत्ता वळकट

करण्यासाठी त्याने इतर राज्यांशी नातेसंबंध जोडले. त्याने आपली मुलगी प्रभावली हिचे लग्न वाकाटक टोळीचा राजा रुद्रसेन दुसरा याच्याबरोबर लावले.

यानंतर त्याचा मुलगा कुमारगुप्त (इ. स. ४१५ ते ४५५) हा सत्तेवर आला. त्याच्या कारकीर्दीत सर्व च सुख समृद्धी आणि शांतता नांदत होती. त्यानंतर त्याचा मुलगा स्कंदगुप्त (इ. स. ४५५ ते ४६७) हा सत्तेवर आला. त्याने हूण लोकांचे अनेक हल्ले परतावून लावले. स्कंदगुप्तानंतरचे पुरुगुप्त, बुद्धगुप्त, नरसिंह गुप्त हे सम्राट तेवढे लायक आणि सामर्थ्यवान नव्हते. त्यामुळे हळूहळू गुप्त युग लोप पावले.

### १.८.१ गुप्तोत्तर युग (इ. स. ५५0 ते इ. स. ७५0) :

गुप्त युगाचा पाडाव झाल्यानंतर सगळीकडे अराजक आणि दुफळी माजली. हे अराजक सुमारे २00 वर्षे चालले. या कालावधीत सर्व साम्राज्याचे तुकडे होऊन स्वतंत्र राज्ये निर्माण झाली. या कालावधीत उत्तर भारतात पाच स्वतंत्र राज्ये नांदत होती. ती पुढीलप्रमाणे (१) हूणांचे राज्य (२) मगधचे गुप्त (३) कनौजचे मौखरी (४) ठाणेश्वरचे पुष्पभूती आणि (५) वल्लभीचे (गुजरातमधील) मित्रक.

या कालावधीत दक्षिण भारतात बदामीचे चालुक्य साम्राज्य आणि काचीचे पल्लव साम्राज्य, ही दोन साम्राज्ये नांदत होती. पुलकेशी दुसरा (इ. स. ६0९ ते ६६४) हा चालुक्य वंशातील सर्वात सामर्थ्य वान सम्राट होता तर नर सिंहवर्मन पहिला (इ. स. ६३0 ते ६६८) हा पल्लव वंशातील सर्वात सामर्थ्य वान सम्राट होता.

२00 वर्षानंतर ठाणेश्वरला सम्राट हर्षवर्धन गादीवर आला. त्याने राज्याचे साम्राज्यात रुपांतर करण्याचे प्रयत्न केले. त्याने संपूर्ण उत्तर भारतावर कबजा केला म्हणून त्याला सकलोत्तरपथनाथ असे म्हणतात. त्याच्या काळात भारत राजकीयदृष्ट्या एक झाला. सम्राट हर्षवर्धनाच्या पदरी बाणभट्ट हा कादंबरी आणि हर्षचरित या ग्रंथांचा लेखक होता. हर्षवर्धनाच्या कारकीर्दीत ह्यू-एन-संग हा चिनी विद्वान भारतात आला होता. बंगालचा राजा शशांक हा हर्षवर्धनचा समकालीन होता.

या कालावधीत हिंदू धर्माचा पाया भक्कम झाला. भारतता जातिव्यवस्था अस्तित्वात होती, असे ह्यू-एन-संगने लिहून ठेवले आहे. याच कालावधीत अनेक मिश्रजाती व पोटजाती निर्माण झाल्या. समाजामध्ये अस्पृश्यता नांदत होती. असे ह्यू-एन-संगाला दिसले व त्याने त्याच्या लेखात तो उल्लेख केला. या कालावधीत स्त्रियांची अवस्था अगदी दयनीय होती. ब्राह्मणत्वाला महत्त्व आल्यामुळे बौद्ध धर्माचा ऱ्हास होण्यास सुरवात झाली.

वेष्णवधर्म, शैवधर्म आणि जैनधर्म या धर्मांचेही पालन होत होते.


## १.९ भारतीय संस्कृती एक दृष्टिक्षेप :

जागतिक इतिहासात भारतीय संस्कृतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन काळी ग्रीक, रोम आणि भारत या सर्व ठिकाणी लोकशाही शासनव्यवस्था अस्तित्वात होती.

त्याकाळात आपली निरनिराळ्या विद्याशाखात, विज्ञानशाखात आणि तत्त्वज्ञानात खूप प्रगती झाली होती. गणित, खगोलशास्त्र, रसायनशास्त्र, धातुशास्त्र आणि वैद्यकशास्त्र यामध्ये जागतिक पातळीवर

भारतीय संस्कृतीचे योगदान डोळ्यात भरण्यासारखे आहे. आर्यभट्ट आणि वराहमिहीर हे प्रसिद्ध गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ होते. चरक आणि सुश्रुत हे उच्च दर्जाचे वैद्य आणि शल्यकर्म कारागिर होते. नागार्जुन हा औषधनिर्माणतज्ञ आणि रसायन शास्त्रज्ञ होता. शून्याचा संवोध आणि दशांश चिन्हाची संकल्पना ही भारताची जगाला देणगी आहे.

प्राचीन भारतीय लोक कला, चित्रकला, शिल्पकला, वास्तूकला प्रवीण होते. सम्राट अशोकाचे स्तूप, अजंठावेरुळ येथील लेण्या दक्षिण भारतीय देवळे, साचीचा स्तूप, मथुरा येथील बुद्धशिल्प ही भारतीय कलेच्या अगणित कलाकृतींपैकी काही उदाहरणे आहेत. प्राचीन भारतातील तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी, काशी आणि कांची ही ज्ञानकेंद्रे (विद्यापीठे) प्रसिद्ध होती. या ठिकाणी देशातील आणि विदेशातील विद्यार्थी शिक्षण घेत होते. अतिशय विद्वान असा अद्यापकवर्ग येथे अद्यापन करत असे. अरब देशामधील विद्वान भारतीय विद्वानांची फारच वाखाणणी करीत.



**आकृती १.५ : साची स्तूप**

प्राचीन भारतात अनेक उत्तम साहित्यकृतींची निर्मिती झाली. त्यापैकी ऋग्वेद ही पहिली साहित्यकृती होती. चार वेद, सूत्रे, रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये, स्मृती, पुराणे, त्रिपीटके, जैन आगम आणि अनेक धर्मग्रंथ त्या काळी लिहिले गेले. त्याखेरीज अनेक नाटके, गद्य साहित्य, काव्य यांची सुद्धा निर्मिती झाली होती. कालिदास, वाणभट्ट, हरीसेना, विशाखादत्त, भास, भैरवी, शूद्रक हे त्या काळातील प्रतिभावान साहित्यिक होते. संस्कृत, पाली आणि प्राकृत भाषेमध्ये मोठ्या प्रमाणावर साहित्य लिहिले गेले.

## पाठ्यांशावरील प्रश्न १.३

१. वैदिकेत्तर युगातील लोकांचे व्यवसाय कोणते होते?

२. कलिंगच्या युद्धानंतर सम्राट अशोकाने कोणता धर्म स्वीकारला?

३. प्राचीन भारतातील चार ज्ञानकेंद्रे (विद्यापीठे) सांगा.

४. प्राचीन भारतातील थोर शास्त्रज्ञ सांगा.

५. रिकाम्या जागा भरा.

१) तामिळ भाषेतील लोककाप्पियम ही साहित्यकृती .......... युगातील आहे.

२) पंड्या साम्राज्याची राजधानी ......... ही होती.

३) कनिष्क हा ........... युगातील सम्राट होता.

## आपण काय शिकलो?

- मानवी संस्कृतीच्या विकासाचे अनेक टप्पे आहेत. या प्रत्येक टप्प्याचे योगदान एकमेवद्वितीय असेच आहे.
- मानवी संस्कृतीमध्ये अश्मयुगानंतर धातु युग आले. तांबे, कासे आणि लोखंड या क्रमाने मानवी संस्कृतीमध्ये धातूंनी शिरकाव केला.
- कासे युगामध्ये नगररचनेची संकल्पना अस्तित्वात आली.
- कासे युगामध्ये लेखनकलेचा शोध लागला.
- सिंधु संस्कृतीमधील नगररचना कला आणि सांस्कृतिक गोष्टी वाखाणण्यासारख्या होत्या.
- लोह युगात लोखंडामुळे समाजजीवनामध्ये मोठ्या प्रमाणावर सामाजिक आणि आर्थिक बदल घडून आले. हे बदल वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या काळात घडून आले.
- ग्रीक, रोमन, पर्शियन आणि भारतीय संस्कृतींनी तत्त्वज्ञान, कला, शिल्पकला, वास्तुकला आणि इतर ठिकाणी मोलाचे योगदान दिले आहे.
- इ. स. पूर्व ६ व्या शतकात बौद्ध आणि जैन हे सुधारणावादी पंथ उदयास आले.
- भारतीय संस्कृतीला प्रचंड कालावधीचा इतिहास असून ही संस्कृती सतत प्रवाही (बदलती) राहिली आहे.
- भारतीय संस्कृतीचे गणित, खगोलशास्त्र, रसायनशास्त्र, धातूशास्त्र, कला, वैद्यकशास्त्र, वास्तु शिल्पकला, साहित्य आणि अभ्यास यात मोलाचे योगदान आहे.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. मानव अर्वाचीन अश्मयुगातून कासे युगात आल्यानंतर कोणते बदल घडले?

२. हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये सांगा.

३. लोखंडाच्या शोधामुळे समाजात कोणते मूलभूत बदल घडून आले?

४. इ. स. पूर्व ५ व्या शतकातील रोमन समाज व त्यांचे अर्थकारण याविषयी माहिती द्या.

५. सुरवातीच्या वैदिक संस्कृतीमधील सामाजिक, धार्मिक आणि अर्थशास्त्रीय जीवनाची सविस्तर माहिती द्या.

६. अशोकाच्या म्हणण्यानुसार धम्मा म्हणजे काय?

७. जगाच्या नकाशात खालील गोष्टी भरा.

१) नद्या ं तैग्रिस, युफ्राटिस, होत्सांग, सिंधु

२) पठारे ं इजिप्त, ग्रीस, रोम, इराण, नालंदा



जगाचा प्राकृतिक नकाशा

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

**१.१**

१) अ) वर्गात

ब) नैसर्गिक आपत्ती

क) मेसापोटेमिया

२) तांबे

३) टायग्रीस आणि युफ्रॅटिस

४) हिरोग्लाफिक्स

टिपा

५) लोथल (गुजराथ) कालीबागन (राजस्थान) बानावळी (हरियाना) ढोलावीरा (गुजरात) रोपार (पंजाब)

**१.२**

१) शेती, वाहतूक, युद्धशास्त्र

२) अथेन्स आणि स्पार्टा

३) टिबर

४) अ) बिझांटाईन साम्राज्य

ब) सायरस

क) निसर्गशक्तीची

**१.३**

१) शेती आणि कला

२) बौद्ध

३) तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी, काशी, कांची

४) चरक, सुश्रुत

५) अ) संगम

ब) मदुराई

क) कुशाण

# २

# मध्ययुगीन जग

आपण यापूर्वीच्या पाठात प्राचीन जगातील वेगवेगळ्या संस्कृतींचा अभ्यास केला आहे. प्राचीन संस्कृतीचे काय झाले, असा आपणास प्रश्न पडला असेल? त्या नष्ट झाल्या का? त्यांची जागा मध्ययुगातल्या तितक्याच क्षमतेच्या संस्कृतींनी घेतली का? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करू या. या पाठात आपण रोमन साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर युरोपियन संस्कृतीत झालेले बदल पाहणार आहोत. तसेच आपण इस्लाम धर्माचा उदय आणि त्याचा पश्चिम आशिया आणि जगभर झालेला प्रसार पाहणार आहोत. सम्राट हर्षवर्धननंतर मध्ययुगीन भारतात काय घडले. याचाही आढावा आपण घेणार आहोत.

## उद्दिष्टे :

या पाठाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला खालील गोष्टी समजतील.

- मध्ययुगीन कालखंड हा मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीचा महत्त्वाचा टप्पा आहे, हे समजेल.
- रोमन साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर झालेल्या राजकीय संघटनांच्या कामगिरीचा आढावा घेता येईल.
- पश्चिम युरोपातील सामंतशाहीच्या कारकीर्दीतील राजकीय लष्करी आणि सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे स्वरूप समजेल.
- पश्चिम आशियातील इस्लाम धर्माचा उदय, सामाजिक परिस्थिती आणि राज्यव्यवस्था समजेल.
- मध्ययुगीन भारतातील राजकीय संघटनांचे स्वरूप समजेल.
- मध्ययुगीन भारतातील अर्थव्यवस्थेचे विवरण करतायेईल.
- मध्ययुगीन भारतातील सांस्कृतिक आणि धार्मिक समाजजीवनाची परंपरा एकमेवद्वितीय आहे, हे पाहता येईल.

## २.१ मध्ययुगीन कालातील युरोप :


मध्ययुगीन काल म्हणजे प्राचीन काल व आधुनिक काल यांना जोडणारा दुवा होय. मानवी समाजाच्या उत्क्रांतीमध्ये हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण मध्ययुगीन कालातील संपादणुकीवरच आधुनिक युगाचा डोलारा उभा आहे.

१७ व्या शतकातील युरोपियन लोकांनीच या कालाला मध्ययुगीन काल असे म्हटले आहे. कारण त्यांना ग्रीक आणि रोमन संघकाल माहिती होता आणि (त्यांचा दृष्टीने) त्यांचा काळ आधुनिक होता. म्हणून या दोन्हीमधील (अंधारयुगाला) काळाला त्यांनी मध्ययुगीन काळ म्हटले आहे. परंतु वस्तुत: मध्ययुगीन काळ हा अंधारयुगीन काळ नव्हता. कारण याच काळात अरबस्तानात इस्लाम धर्माचा उदय आणि प्रसार झाला. भारतापुरते बोलावयाचे झाले तर हे युग जुन्या आणि नव्या राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीच्या एकत्रीकरणाचे युग होते. या एकत्रीकरणामधून एक नवीन सांस्कृतिक स्वीकाराचे, सहकाराचे युग जन्माला आले. युरोपमधील स्थितीसुद्धा अगदी वाईट नव्हती. मध्ययुगाच्या सुरवातीला युरोपची आर्थिक आणि सांस्कृतीक स्थिती खालावलेली असली तरी नंतरच्या काळात युरोपच्या राहणीमानाचा स्तर बराच उंचावला होता. त्यांनी ज्ञानप्रसारासाठी नवीन संस्था उभ्या केल्या. नवीन विचारसरणी आत्मसात केली. कला आणि साहित्य यात फार मोठी मजल मारली. या कालावधीत युरोपमध्ये ज्या नवीन संकल्पना अस्तित्वात आल्या. त्याने युरोपचाच नव्हे तर पुढील कालावधीत जगाचादेखील चेहरामोहरा बदलला. मध्ययुगीन कालात जगाच्या वेगवेगळ्या भागात घडलेल्या घटनांचा आढावा घेऊ या.

### २.१.१ रोमन साम्राज्याचा ऱ्हास :

गेल्या पाठात आपण रोमन साम्राज्य किती सामर्थ्यवान आणि प्रभावशाली होते, हे पाहिले आहे. रोमन साम्राज्याचे पूर्व आणि पश्चिम तुकडे झाले, याची आपल्याला कल्पना आहेच. पूर्व साम्राज्याची राजधानी कॉन्स्टनटिनोपाल व पश्चिम साम्राज्याची राजधानी रोम होती. रोमन सम्राट कॉन्स्टनटाईन याने पूर्व भागात बिझांटाईन या शहरात इ. स. ३३० मध्ये राजधानी हलविली. सम्राटावरून या राजधानीचे नाव कॉन्स्टनटिनोपाल हे पडले. रोमन साम्राज्याच्या पाडाव झाला तरी त्यानंतर सुमारे हजार वर्षे रोमन सम्राट कॉन्स्टनटिनोपाल या शहरात राहत होते. या साम्राज्याच्या तुकड्याला पूर्व रोमन साम्राज्य अथवा बिझाटाईन साम्राज्य असे म्हणत. ज्या काळात पश्चिम युरोप सर्वच बाबतीत अतिशय मागासलेला होता. त्या काळात ग्रीक भाषा बोलणारे पूर्व रोमन साम्राज्यातील लोक मात्र आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय पुढारलेले होते. पश्चिम रोमन साम्राज्यावर गोथ, व्हँडाल्स, व्हिसीगोथ, फ्रँक्स या जर्मन टोळ्यांनी हल्ले केले व साम्राज्याचा नाश केला. इ. स. ४७६ मध्ये पश्चिम रोमन साम्राज्याच्या सम्राटाला पदच्युत करून या टोळ्यांनी साम्राज्याचे तुकडे करून स्वतंत्र प्रांत निर्माण केले.

या उलथापालथीत संपूर्ण बदल झाला का? रोमन लोकांनी बसविलेली राजकीय आणि आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटली का? नवीन आलेल्या जर्मन टोळ्यांनी ही घडी पूर्णपणे विस्कटली नाही तर ग्रीक आणि जर्मन समाज एकत्र येऊन एकमेकात विलीन झाल्यासारखे झाले. त्याचा आणि इतर सर्व घडामोडींचा परिपाक म्हणून एक नवीन पुनर्रचित समाज उदयाला आला. या समाजातील चालीरिती, पद्दती, संस्था रोमन किंवा जर्मन समाजापेक्षा वेगळ्या होत्या. या सर्व घडामोडीमध्ये युरोपमध्ये सामंतशाहीचा





उदय झाला. सामंतशाहीमुळे युरोपचा सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, सर्वच बाबतीत नक्षा बदलला. या सामंतशाहीचा उदय आणि कार्यपद्धती यांची माहिती घेऊ या.


## २.२ सामंतशाही ' राजकीय, लष्करी, सामाजिक आणि आर्थिक स्वरूप :

पश्चिम रोमन साम्राज्याच्या पाडावानंतर जर्मन टोळ्यांनी राजकीय स्थैर्य राखण्याचा प्रयत्न केला. यापैकी एका प्रांताने सम्राट चार्लमॅग्ने याच्या अधिपत्याखाली साम्राज्य राखण्याचा प्रयत्न केला. परंतु नवव्या शतकामध्ये वारंवार झालेल्या आक्रमणामुळे हे साम्राज्य पण लयाला गेले. या राजकीय अराजकामधून एक नवीन कार्यपद्धतीचा उदय झाला. या राजकीय प्रणालीला सामंतशाही असे म्हणतात. राजकीय सार्वभौमतत्वाची ही व्यवस्था टप्प्याटप्प्यांची होती. ही व्यवस्था समजून घेण्यासाठी शिडीच्या पायऱ्या डोळ्यासमोर आणा. शिडीच्या सर्वात वरच्या पायरीवर राजा, त्याखालच्या पायरीवर सरदार (ड्यूक्स व लॉर्डस) त्याखालच्या पायरीवर सुभेदार (बॅरन) आणि सर्वात शेवटी शिलेदार (नाईट) असत. यातला प्रत्येक जण आपल्यावर असलेल्या व्यक्तीकडून आपले अधिकार ग्रहण करी व त्याच्याशी एकनिष्ठ राही. या लोकांना कुळ (vassal) असे म्हणत. हा मालक कुळ साचा वरपासून खालपर्यंत एकाच पद्धतीचा असे. मालक (लॉर्डस्, बॅरन, नाईट) हे आपल्या विभागात सत्ताधारी असत. रोमन साम्राज्यात राजकीय शक्ती फक्त सम्राटाकडेच असे. मात्र सामंतशाहीमध्येही राजकीय शक्ती वाटली गेली होती. ही सामंतशाहीची महत्त्वाची बाब होती.

या सामंतशाहीचे वैशिष्ट्य असे होते की सरदार व कुळांना जोडणारे संबंध त्यांच्यातील नातेसंबंधच असत. कूळ ते सरदार व सरदार ते राजा अशा प्रकारचे साखळीच्या स्वरूपातील संबंध टिकविण्यासाठी समारंभ साजरे केले जात. या समारंभात कुळे सामंतांची सेवा आयुष्यभर करण्याची शपथ घेत असत. त्याबदल्यात सामंत कुळांचे संरक्षण करीत असत. सामंतांना गरज लागली असता कुळांना लष्करीसेवा देखील द्यावी लागे. त्या बदल्यात कुळांना कसण्यासाठी जमीन मिळत असे त्याला fief किंवा fiefdom असे म्हणत. त्यावरूनच सामंतशाहीला इंग्रजीत Feudalism असे म्हणतात. सामंत आपल्याप्रदेशाचे रक्षण करण्यासाठी फिरते सैनिक ठेवत. ते सामंताशी निष्ठावान असत. राजाला ज्यावेळी गरज लागेल त्यावेळी हे सैन्य पुरविले जाई. या सैन्याच्या जोरावर सामंत आपल्या प्रदेशाचे हुकूमशहा बनत आणि राज्यशासनसुद्धा त्यांची सत्ता मान्य करीत असे.

हा काळ राजकीय अस्थैर्याचा होता. सामंतांनी दिलेल्या संरक्षणाच्या मोबदल्यात शेतकऱ्यांनी त्यांची कामे केली. शेतकऱ्यांकडे स्वत:च्या मालकीच्या जमिनी नव्हत्या. त्यांच्याकडे शेतीची अवजारे नव्हती. शेतीसाठी लागणारे बीबियाणे ते विकत घेऊ शकत नव्हते. यामुळे शेतकरी सामंतांकडे गेले. सामंतांनी त्यांना मदत केली. याबदल्यात ते संपूर्णपणे शेतीशी बांधले गेले आणि ही सामंतांचे दास किंवा गुलाम (Serf) झाले या काळात निर्माण झालेली संपत्ती गुलामांचे शोषण करूनच मिळविली होती. या काळातील शेतीची पद्धती आपण पाहू. सामंतांच्या वर्चस्वाखाली आलेल्या जमिनीवरील नियंत्रणाचे केंद्र मॅनॉर म्हणजे सामंताची गढी असे. गढीभोवताली असलेल्या जमिनीचे तीन भाग असत. पहिला भाग जमिनीदारांनी स्वत:कडे ठेवलेला असे दुसऱ्या भागातील लागवडीयोग्य जमीन शेतकऱ्यांना कसण्यासाठी दिली जात असे. त्यांना कुळे असे म्हणत. तिसरा भाग जनावरांना चरण्यासाठी कुरण म्हणून वापरला जाई. कुळांना जमिनीचे भाडे द्यावे लागे. हे भाडे शारीरिक श्रमाच्या स्वरूपात दिले जाई. ते सामंतांच्या घरी आठवड्यातील काही दिवस काम करीत. गुलाम शेतकऱ्यांना हंगामाच्या काळात जास्त

वेळ काम करावे लागे. हेच गुलाम बांधकाम करणे, लाकूड तोडणे या अतिश्रमाच्या कामासाठी वापरले जात. नंतरच्या काळात या श्रमाचा मोबदला पैशांच्या स्वरूपात देण्यात येऊ लागला.




**आकृती २.१ : सामंताची गढी**

या कुळांला त्यांच्या उत्पन्नापैकी काही भाग कराच्या स्वरूपात द्यावा लागे. सामंतांना ज्यावेळी पैशाची गरज लागे त्यावेळी वारंवार कर द्यावा लागत असे. सामंत तरीसुद्धा देणग्यांच्या स्वरूपात आणखी पैसे अप्रत्यक्षरित्या गोळा करत असत. गढी आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण होती. याचाच अर्थ दैनंदिन जीवनात लागणाऱ्या सर्व वस्तू गढीमध्येच तयार होत. या वस्तूंचे उत्पादनासाठी गढीमध्येच लोखंडी भट्टी, पिठाच्या गिरण्या, पाव भाजण्याच्या भट्ट्या, द्राक्षापासून मद्यार्क बनविणारी रासायनिक सुविधा आणि रोजच्या उपयोगासाठी वेगवेगळ्या वस्तू तयार करणारे कारखाने असत. या सर्वांची मालकी सामंताकडेच असे. या सर्व गोष्टी वापरण्याची सक्ती शेतकऱ्यांवर केली जाई. त्याचा मोबदला सामंताच्या मर्जीवर अवलंबून असे.

### आपल्यासाठी एक उपक्रम २.१

रोमन साम्राज्यातील गुलामगिरीविषयी आपण माहिती घेतली आहे. भारतातील भूमिहीन मजुरांची माहिती गोळा करा. आता गुलाम सामंताकडील कुळे आणि भूमिहीन शेतमजूर यांची तुलना करा. काय निष्कर्ष निघतो? त्याबावत एक छोटेसे टिपण तयार करा.

### २.३.१ सामंतशाहीतील आर्थिक बदल मध्ययुगीन युरोप ' उत्कर्ष व अडथळे :

आपण सामंतशाहीतील परिस्थितीचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास केला. मध्ययुगीन युरोपात ही परिस्थिती कायम अशीच राहिली का? याचे उत्तर नाही असे आहे. सामंतशाही ही कायम स्थिर राहिलेली पद्धत नव्हती. सामंतशाहीतील आर्थिक परिस्थितीत प्रचंड चढउतार झाले. याचा आपण मागोवा घेऊ या.

रोमन साम्राज्याच्या ऱ्हासानंतर तेथील आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावलेली होती. हा कालावधी राजकीय अराजकाचा होता. या काळात राहणीमान, व्यापार आणि आर्थिक परिस्थिती ढासळली होती. रोमन साम्राज्यातील काही शहरे टिकून होती परंतु त्या ठिकाणी आर्थिक उलाढाल चालू नव्हती. तेथील रस्ते खराब होते. वस्तुविनिमय जाऊन पैशात व्यवहार होत होते. युरोपातील संपूर्ण अर्थ व्यवस्था शेतीवर आणि काही प्रमाणात व्यापारावर अवलंबून होती.

अर्थव्यवस्थेचा पायाभूत घटक म्हणजे स्वयंपूर्ण असलेली गढी हा होता. शेतीत जुनीच अवजारे वापरत. त्यामुळे शेतीतून अगदी कमी उत्पन्न मिळे. इ. स. दहाव्या शतकापर्यंत ती परिस्थिती कायम राहिली.

दहाव्या शतकानंतर मात्र उत्पादनपद्धतीत महत्त्वाचे परिवर्तन घडून आले. शेतीयोग्य जमीन वाढली. उत्पादनात वाढ होण्यासाठी कारणीभूत ठरलेला दुसरा घटक म्हणजे शेती करण्याच्या तंत्रात झालेली सुधारणा होय. चाके असलेला जड नांगर वापरात आला. त्याला ओढण्यासाठी बैल जोडीची गरज असे. त्यमुळे उत्तर युरोपमधील  टणक आणि चिकट जमीन नांगरणे सोपे झाले.

शेतीमध्ये त्रिक्षेत्रीय पद्धत वापरात आली. शेतीचा १/३ भाग खरीप पिकासाठी वापरला जाई, १/३ भाग रब्बी पिकासाठी वापरला जाई आणि उरलेला १/३ भाग पडीक ठेवीत. त्रिक्षेत्रीय पद्धती, जड नांगर आणि शेतीच्या तंत्रातील इतर बदल यामुळे शेतीचे उत्पन्न अनेक पटींनी वाढले.

शेतीमधील उत्पन्नवाढीबरोबरच १० वे शतक ते १२ वे शतक या दोनशे वर्षात व्यापार व शहरी जीवनातही सुधारणा व वाढ झाली. लहान प्रमाणावर व स्थानिक पातळीवर बाजारपेठेत व्यापार होत असे त्यात शेतकरी स्वत: जवळचे जादा धान्य, अंडी इ. विकत असत. त्या व्यापारातही सुधारणा झाली. दूरच्या बाजारपेठेपर्यंत दारू, कापड यांचा व्यापार होऊ लागला रस्तेबांधणीत सुधारणा झाली. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीत वाढ झाली. सागरी वाहतूकही वाढली. वस्तूविनिमयाची जुनी पद्धत जाऊन तिच्या जागी खरेदी विक्रीची नवी पद्धत आली. वस्तुविनिमय बंद होऊन पैशाचे व्यवहार सुरू झाले. त्यामुळे अर्थव्यवस्थेची प्रगती झाली. शहरांची वाढ झपाट्याने होऊ लागली. त्यामुळे व्यापाराला व शेती व्यवसायाला फार मोठे उत्तेजन मिळाले. मोठी शहरे विशिष्ट व्यवसायांची केंद्रे बनली. काही शहरांमध्ये कापड व्यवसाय हा मोठा व्यवसाय झाला होता. सोनारांचा व्यवसाय वाढला. कापड व सुवर्ण अलंकार बनविणाऱ्या व्यापारी संघटना निर्माण होऊ लागल्या. या संघटनांना महत्त्व मिळू लागले. या संघटनांमुळे सामंतशाहीच्या वर्चस्वाला धक्का बसला.

बाराव्या शतकाच्या अखेरीस आर्थिक प्रगती पूर्णत्वाला पोचली. तेराव्या शतकात झालेल्या काही बदलांमुळे प्रगतीऐवजी अधोगती होऊ लागली. लोकसंख्येत वाढ झाल्याने कालांतराने आर्थिक विकासाला पुन्हा एकदा चालना मिळाली. लोकसंख्या वाढीमुळे मजूर पुरवठा वाढला. त्यामुळे जमिनदारांना जमिनीचा ताबा स्वत:कडे ठेवण्याची गरज वाटेनाशी झाली. गढीतील जमिनीचा ताबा छोट्या जमिनदारांकडे गेला. त्यांनी शेतकऱ्यांना खंडाने जमिनी दिल्या. काही काळानंतर मजूरी, शेतीचे तंत्र यामध्ये उतार होण्यास सुरवात झाली. त्यामुळ उत्पन्नात घट होऊ लागली. अन्नधान्यात होणारी घट, दुष्काळ, प्लेगची साथ या सर्वांमुळे आर्थिक परिस्थिती घसरण होऊ लागली. असे असले तरी युरोपियन समाज या संघर्षातून सहजपणे बाहेर पडला. इ. स. १४५० च्या सुमारास युरोपियन समाजाची आर्थि क परिस्थिती सुधारण्यास सुरवात झाली.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

आपल्या संपूर्ण जहागिरीमधील जी जमिन जहागिरदार स्वत: कसत असे त्या जमिनीस डेमेस्ने DEMESNE असे म्हणत.

आता आपल्याला मध्ययुगीन काळातील युरोपातील लोकांच्या परिस्थितीची कल्पना आली असेल. तसेच आपल्याला कित्येक वर्षातील युरोपात झालेल्या बदलांचा मागोवा घेता येईल. मध्य युरोपातील या भौतिक बदलांचा समाजावर व संस्कृतीवर कोणता बदल झाला? हे आपण समजावून घेऊ.

दहाव्या शतकाच्या आधी कमी प्रतीची अर्थव्यवस्था असल्यामुळे शिक्षणाचा किंवा कलेच्या विकासाला वावच मिळाला नाही. याचे आपल्याला आश्चर्य वाटण्याची आवश्यकता नाही. या काळात फारच थोड्या लोकांना शिक्षणाची सोय उपलब्ध होत असे. सर्वसामान्यांना चाकोरीबद्ध शिक्षण (चांगल्या पद्दतीचे शिक्षण) मिळत नसे. काही सरदार घराण्यातील काही लोकही अशिक्षित असत. धर्मगुरुंपैकी काही वर्गातील लोक शिक्षण घेऊ शकत असत. लॅटिन भाषाच फक्त शिक्षणाची भाषा होती. धर्म गुरुंच्या उच्च वर्गातील लोकांनाच ती भाषा येत होती. त्यामुळे शिक्षण फारच बंदिस्त स्वरूपाचे होते. का व कसे याची उत्तर शोधणारे शिक्षण नव्हते, कारणांची मिमांसा करणारे शिक्षण नव्हते. शिक्षण पद्धतीत स्मरणशक्तीवर व पाठांतरावर भर दिला जात असे. शिक्षण अंधश्रद्धेवर व निष्ठेवर आधारित होते. अशा परिस्थितीत शास्त्रीय प्रगतीला वाव नव्हता. या काळात ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाचे काही प्रयत्न झालेही. परंतु ते बौद्धिक नवनिर्मिती करण्यास पुरेसे नव्हते. असे असले तरी धर्मगुरु व राजघराण्यातील शिक्षित व्यक्तींनी रोमन वाङ्मयातील काही भागांचे पुनर्लेखन करणे आणि जपून ठेवणे याबाबत बरेच कार्य केले. अशा रीतीने ११ व्या व १२ व्या शतकातील शिक्षणात सुधारणा होऊन त्याचे पुनरुज्जीवन होण्याचा पाया घातला होता. शिक्षणाची कमी पातळी असल्यामुळे या काळात वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयाची निर्मिती होऊ शकली नाही. हीच परिस्थिती कलेच्या प्रांतातही होती. या काळात या क्षेत्रात हस्तलिखिताची पद्धती विकसित झाली. एकंदरीत संपूर्ण युरोपात काही अतिविशिष्ट लोकांव्यतिरिक्त लोक हे शिक्षणाच्या बाबतीत अत्यंत कठीण अवस्थेतच जगत होते. सांस्कृतिक पातळीवर फार दुर्लक्षच केले जात होते. युरोपातील संस्कृतीच्या समकालीन असलेल्या बायझन्टाईन व अरबइस्लाम संस्कृतीच्या तुलनेत युरोपीय संस्कृती खूपच मागासलेली होती.

इ. स. दहाव्या शतकानंतरच्या काळात युरोपीय संस्कृतीत सलगपणे विकासाचे व शांततेसाठी संबंधित असे बदल होऊ लागले. या काळात प्राथमिक शिक्षण, साक्षरता आणि काही विद्यापीठांची स्थापना व विकास झाला. या काळात कला व शास्त्रीय ज्ञान व अरब संस्कृतीतील ज्ञान यांची जोपासना करण्यासाठी प्रयत्न केले गेले. हा कालावधी युरोपातील ज्ञान व विचार यांच्या प्रगतीचा काळ होता. आधुनिक काळातील वैचारिक विकासाच्या वाटचालीतील हा पहिला टप्पा होता.

## पाठांतर्गत प्रश्न २.१

१) सामंत आणि कुळ यामधील संबंधांचे ३० शब्दात वर्णन करा.

२) गुलाम कोण होते?

३) खालील विधानांचे कारणासहित स्पष्टीकरण करा.

अ) दहावे शतक ते बारावे शतक या दरम्यान व्यापारात आणि शहरी वस्तीत वाढ झाली.

______________________________________________

ब) तेराव्या शतकात आणि त्यापुढील काळात सामंतशाहीच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीला उतरली कळा लागली.

______________________________________________

क) दहाव्या शतकापूर्वीचा काळ शिक्षण आणि कला यांच्या भरभराटीचा होता का?

______________________________________________

## २.३ मध्ययुगीन काळातील अरब संस्कृती :

अरेबिया हे वाळवंटी प्रदेशातील द्वीपकल्प होय. अरब संस्कृतीच्या अगोदर पुष्कळसे अरब हे उंटांचे कळप राखणारे भटके, बदायुनी म्हणजे गुराखी होते. त्यांनी पाळलेल्या जनावरांचे दूध विकणे आणि वाळवंटी प्रदेशातील खजूर विकणे हे त्यांच्या चरितार्थाचे साधन होते. कारागिरीचे उत्पादन फारच मर्यादित होते, व्यापार गळाठलेला होता आणि नागरी विकास नगण्य होता.

इ. स. सहाव्या शतकाच्या उत्तरार्धात लांब अंतरांच्या व्यापारी मार्गाच्या शोधांमुळे या प्रदेशातील आर्थिक परिस्थितीत सुधारणा होऊ लागली. अरब साम्राज्याच्या शेजारील रोमन आणि पार्शियन साम्राज्यांमध्ये सतत युद्धे होत राहिली. त्या कारणामुळे आफ्रिका, आशियाकडे अरेबियातून जाणारे व्यापारी मार्ग इतर व्यापारी मार्गापेक्षा सुरक्षित मार्ग आहेत, असे व्यापारी काफिल्यांना वाटत होते. यामुळे अरेबियात काही महत्त्वाच्या शहरांची वाढ झाली. त्याचा व्यापारवाढीस फायदा झाला. या शहरापैकी मक्का हे शहर अत्यंत महत्त्वाचे केंद्रस्थान होते. मक्का शहराला त्या प्रदेशातील काबा या धार्मिक स्थळामुळेही वेगळेच महत्त्व होते. कारण काबा हे यात्रेकरूंचे तीर्थस्थानही तेथेच होते. अरबांच्या वंशाच्या व टोळ्यांच्या उपासनेचे केंद्र काबा हे मंदिर होते. मक्केच्या आर्थिक जीवनावर प्रमुख वर्चस्वाची भूमिका असलेल्या कुरेशी टोळीचे या तीर्थस्थानावर नियंत्रण होते.

इ. स. ५७० मध्ये कुरेशी टोळीत इस्लाम धर्माचे संस्थापक, महंमद यांचा जन्म झाला. महंमदांचा त्यांच्या लहानपणी काकांनी सांभाळ केला. मोठेपणी ते खादिजा या श्रीमंत विधवा स्त्रीकडे नोकरीस राहिले. नंतर तिच्याशी त्यांनी विवाह केला. त्यानंतर ते एक श्रीमंत व प्रसिद्ध व्यापारी बनले. सुमारे इ. स. ६१० मध्ये मुहंमदांना आध्यात्मिक अनुभव आला. त्यांचा विश्वास असा होता की त्यांना आतील आवाजाने सांगितले की जगात अल्लाशिवाय देव नाही. आजपर्यंत अरबांची अशी श्रद्धा आहे की अल्लाह ही अत्यंत शक्तीशाली व श्रेष्ठ शक्ती आहे, तिच्या इतकी प्रभावी श्रेष्ठ, शक्तीशाली दुसरी कोणतीही शक्ती नाही. अनेकेश्वरवाद किंवा अनेक देवता मानणे यांच्याऐवजी एकेश्वरवाद किंवा एकच देव मानणे हा मुहंमदांचा आध्यात्मिक अनुभव होता. त्यानंतर मुहंमदांनी संदेश व आविष्कारांमुळे नवीन धर्माची स्थापना केली. हा नवीन धर्म म्हणजेच इस्लाम होय. मुहंमद हे ज्ञानी पुरुष मानले जाऊ लागले. सुरुवातीला कुरेशी लोकांपैकी फारसे अनुयायी त्यांना मिळाले नाहीत. परंतु त्यांची पत्नी खादिजा हिच्यासह काही अनुयायी मिळाले.

यानंतर उत्तरेकडील एक शहर यास्रिब येथील काही लोकांनी मुहंमदांना या शहरात येण्याचे निमंत्रण दिले. मुहंमद व त्यांच्या अनुयायांसह इ. स. ६२२ मध्ये या शहरात स्थलांतरित झाले. यानंतर त्यांना यश मिळत गेले. म्हणून या स्थलांतराच्या वर्षाला हिजरा असे अरेबिक भाषेत म्हटले गेले. इस्लामिक पंचागांत (कॅलेंडरमध्ये) हा महिना सर्वप्रथम असतो. मुहंमदांनी या शहरावर सत्ता प्रस्थापित केली आणि त्या शहराला मदिना असे त्यांनी नाव दिले. त्यानंतर त्यांनी आत्मविश्वासाने त्यांच्याअनुयायांची संघटना बनविली. ही संघटना राजकीय व धार्मिक संघटनेत रुपांतरित झाली. त्यांच्या या श्रद्धेचा मक्का शहरात प्रसार झाला. त्यांनी व त्यांच्या अनुयायांनी कुरेशी टोळ्यांवर या धर्माचा प्रभाव गाजविला. त्यांनी कुरेशी टोळ्यांवर हल्ले केले. शेवटी इ. स. ६३० मध्ये मुहंमदांनी कुरेशींचा पराभव करून मक्केत प्रवेश केला. कुरेशींनी या नव्या कल्पनांचा व तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला. यानंतर काबा हे मंदिर इस्लाम धर्माच्या लोकांचे उपासना केंद्र बनले. मक्केच्या पराभवानंतर अरेबियातील इतर टोळ्यांतील लोकांनी या नव्या तत्त्वज्ञानाचा (श्रद्धेचा) स्वीकार केला.

इस्लाम धर्माचे तत्त्वज्ञान साधे व सोपे आहे. इस्लामचा अर्थ इस्लामला शरण जाणे व इस्लामवर संपूर्ण निष्ठा ठेवणे, इस्लामवर निष्ठा, श्रद्धा ठेवणे याचा अर्थ ईश्वराला म्हणजेच अल्लाहला संपूर्णपणे शरण जाणे असा आहे. याचे जे अनुयायी आहेत त्यांना मुस्लिम असे म्हणतात. इस्लाम अशी शिकवण देतो की जगात फक्त एकच देव आहे. मुस्लिम असे मानतात की मुहंमद हे देवाचे शेवटचे आणि सर्वात श्रेष्ठ ज्ञानी पुरुष आहेत. ते ज्यूंचा व ख्रिश्चनांच्या प्रेषितांना श्रेष्ठ ज्ञानी म्हणून मान्यता देतात. मुस्लिमांची अशी श्रद्धा आहे की, जगात एक दिवस न्यायनिवाड्याचा असेल त्यावेळी धार्मिक निष्ठावंत लोकांना स्वर्गात जागा मिळेल आणि उत्तम आयुष्य मिळेल. परंतु पापी व धर्मावर निष्ठा न ठेवणाऱ्यांना नरकातील यातना व अग्नीचे चटके हे सहन करावे लागेल. धार्मिक जीवनासाठी प्रत्येकाने इस्लामच्या पवित्र ग्रंथाचे म्हणजे कुराणाचे तत्त्व प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणले पाहिजे. कुराण हे मुहंमदांना देवाकडून मिळालेल्या अविष्कारांचा, अनुभवाचा एकत्रित संग्रह आहे. नैतिकता, दया, धर्म यांच्याशी निष्ठावंत राहिले पाहिजे. त्यासाठी प्रार्थना, विशिष्ट काळात उपवास करणे, मक्केची यात्रा करणे, कुराणाचे वारंवार पठण करणे असे मार्ग सांगितले आहे. कुराणाशिवाय हिदीस, सुन्ना, ज्ञानी पुरुषांचे वर्तनाचे आदर्श, ज्ञानी पुरुषांची वचने हे सुद्धा इस्लाम धर्माबाबतचे वर्तमानाचे नियम आणि वागणुकीबाबतचे प्रमाणभूत नियम सांगतात. परमेश्वर आणि व्यक्तीमध्ये मध्यस्थांची गरज नाही असे मानले आहे. धर्म

गुरुंऐवजी धर्माच्या अभ्यासकांना हेच धर्माबद्दल आणि धार्मिक कायद्यांबाबत बोलण्याचा अधिकार आहे. इस्लाम गुणांचे श्रेष्ठत्व सांगतो. यहुदी व ख्रिश्चन धर्मात आणि इस्लाम धर्मात अनेक बाबतीत समान धर्मतत्त्वे व श्रद्धास्थाने आहेत.

## २.३.१ समाज आणि संस्कृती :

अरबांचे तत्त्वज्ञान हे प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानावर आधारलेले होते. ग्रीक तत्त्वज्ञान हे वास्तववादी ग्रीक तत्त्वज्ञानी विकसित केले होते. हे ग्रीक तत्त्वज्ञ तत्त्वज्ञानातील विशिष्ट विचार प्रणालींवर विश्वास ठेवणारे असले तरी त्याशिवाय वेगळ्या नैसर्गिक शास्त्रांवरही विश्वास ठेवणारे होते. त्यांनी खगोलशास्त्राचा व वैद्यकशशस्त्राचाही अभ्यास केला होता. त्यांचे खगोलशास्त्रातील ज्ञान खगोलाच्या अचूक निरीक्षणांवर आधारलेले होते. वैद्यकशास्त्राच्या बाबतीत त्यांनी केवळ ग्रीक वैद्यकशास्त्राचाच अभ्यास केला नव्हता तर त्याच्याही पुढे जाऊन त्यांनी या विषयाचा अभ्यास केला होता. इब्नसिन्ना हा पाश्चात्य युरोपात अविसेन म्हणून प्रसिद्ध होता. त्याने क्षय हा संसर्गजन्य रोग आहे व स्नायूंची विकृती यांचा शोध लावला. अर्ल्राझी हा पाश्चात्य युरोपात व्हाझेस् या नावाने ओळखला जातो. तो मध्य युगातील शल्य चिकित्सक वैद्य म्हणून प्रसिद्ध होता. त्याने गोवर आणि देवी या रोगातील फरक शोधला. इतर अरब शल्यचिकित्सक पोटाच्या कर्करोगाचे निदान करीत तसेच विषबाधेच्या रुग्णांना विषविरोधी औषधे देत असत. एक संस्मरणीय वैशिष्ट्य असे आहे की इतर मध्ययुगीन संस्कृतींना मागे टाकून अरबांनी इस्पितळांची (हॉस्पिटलांची) संघटना तयार केली होती. आधुनिक काळाप्रमाणे अरबांनी पर्शिया, सिरिया, इजिप्त या देशांमधील प्रमुख, महत्त्वाच्या शहरांमध्ये जवळपास चौतीस मोठी इस्पितळे बांधली होती, ही गोष्ट लक्षणीय आहे.

अरबांनी दृकशास्त्र (दृष्टीशास्त्र), रसायन, गणितशास्त्र या विषयांमध्येही खूप प्रगती केली होती. भौतिकशास्त्रज्ञांनी दृकशास्त्राचा पाया घातला होता. त्यांनी वेग (गती), प्रेरण (वहन), प्रकाश किरणांचे वक्रीभवन या बाबतीत आश्चर्यकारक अशी निश्चित अनुमाने शोधली होती. सोड्यातील प्राणवायू व कर्बद्विप्राणील (कार्बनडायऑक्साईड) वायुमुळे निर्माण होणारा गॅस / वायू, तुरटी, सोरामीठ, नत्रआम्ल, गंधकाम्ल = तेजाब इत्यादी रसायनशास्त्रातील मिश्रणे शोधण्याचे श्रेय अरबांनाच आहे. त्यांनीच सर्वप्रथम अर्क काढणे, गाळणे, शुद्धिकरण करणे या रसायनशास्त्रातील प्रक्रिया शोधून काढल्या. गणिताच्या क्षेत्रातील अरबांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी ग्रीक लोकांची भूमिका आणि भारतीयांचे संख्याशास्त्र हे एकत्रित आणले. भारतीयांचे संख्याशास्त्र अरबांमुळे सर्वत्र प्रसारित झाले. पाश्चात्य देशांमध्ये ते अरब संख्याशास्त्र म्हणून प्रसिद्ध झाले. आताच्या या ज्ञानाच्या एकीकरणात अरबांनी अंकगणिती, भूमिती व त्रिकोणमितीत फार प्रगती केली होती.

**अंकलेखन**

| युरोपियन | 0 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अरेबिक | ٠ | ١ | ٢ | ٣ | ٤ | ٥ | ٦ | ٧ | ٨ | ٩ |
| पार्शियन आणि उर्दू | ۰ | ۱ | ۲ | ۳ | ۴ | ۵ | ۶ | ۷ | ۸ | ۹ |
| देवनागरी | ० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ताभिळ | | ௧ | ௨ | ௩ | ௪ | ௫ | ௬ | ௭ | ௮ | ௯ |

**आकृती २.२ : अंकलेखन पद्धती**

अरब संस्कृती साहित्यासाठी विशेषत: काव्यासाठी फार प्रसिद्ध आहे. उमर खय्यामच्या रुबाया आजच्या काळातही स्मरणीय आहेत हे त्याचे उदाहरण आहे. इतर क्षेत्रात अरब कला हे विविध वास्तुशिल्पांचे अत्यंत सुंदर असे मिश्रण आहे. या अरबांच्या वास्तुशिल्पांबाबत बायझेंटियम, पर्शियन इत्यादी कलांचे मिश्रण आढळते. वास्तुकला हे अरबांच्या कलेचे महत्त्वाचे अंग आहे. अरब वास्तुकलेची मशिदी, राजवाडे, शाळा इत्यादी उदाहरणे आहेत. घुमट, मनोरे, कमानी ही अरब वास्तुकलेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की, पाश्चात्य देश ज्यावेळी फार मागे पडलेले होते. त्यावेळी अरब संस्कृती ही बौद्धिक क्षेत्रात व कलेच्या क्षेत्रात अत्युच्च शिखरावर होती. अरब साम्राज्याच्या प्रसारामुळे अरब विविध संस्कृतीच्या संपर्कात आले. यामुळे अरब, पर्शिया, तुर्क, भारतीय, आफ्रिकन, इत्यादी ठिकाणच्या विविधरंगी संस्कृती एकत्रित येण्यास मदत झाली. या विविधरंगी घटकांमुळे अरब संस्कृतीने एक विलक्षण समाजाची निर्मिती केली. मूलगामी शोध आणि उपलब्धी यांचा वारसा तिला प्राप्त झाला.

### आपल्यासाठी एक उपक्रम २.२

चित्रात किंवा प्रत्यक्षात पाहिलेल्या अरब वास्तूशिल्प असलेल्या पाच इमारतींची नावे सांगा. या इमारती भारतातल्या किंवा भारताबाहेरच्यासुद्धा चालतील. या इमारती कोठे आहेत? या इमारतींची वैशिष्ट्ये कोणती आहेत? या इमारती पाहिल्यानंतर तुम्हाला काय वाटले? या इमारतींचे जतन करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सांगा.

## २.४ मध्ययुगीन भारतीय संस्कृती

मागील पाठात आपण गुप्त साम्राज्य व हर्षवर्धनाच्या कारकिर्दीबद्दल माहिती मिळविली. इ. स. ८ ते इ. स. १0 या काळात राजकीयदृष्ट्या अनेक लहान मोठ्या राज्यांमध्ये राजकीय सत्ता विभागली गेली. छोटे मोठे राजे साम्राज्य विस्तारासाठी आपापसात झगडत होते. उत्तर भारतात तीन मुख्य मोठी राज्ये होती. पलास, प्रतिहार, राष्ट्रकूट या तीन महासत्ता होत्या. यांच्यापेक्षा लहान राज्ये व अनेक छोटी संस्थाने राजपूत काळात निर्माण झाली. चौहान, परमार, गढवाल इत्यादी संस्थाने तेथे अस्तित्वात होती. दक्षिण भारतात चोल घराण्याची सत्ता मोठ्या प्रदेशावर म्हणजे देशाच्या द्वीपकल्पावर अंमल गाजवीत होती. राजकीयदृष्ट्या अशा अनेक तुकड्या तुकड्यांच्या सत्ता गाजविण्याच्या प्रवृत्तीमुळे गझनी या महंमदासारख्या आक्रमणांना आक्रमणे करण्यास सोयीची परिस्थिती लाभली. पश्चिम व मध्य आशियात अनेक विजय मिळविल्यावर महमद भारताकडे वळला. महमदाला सप्टेंबर १000 च्या सुमारास भारतात काही ठिकाणी विजय मिळाले. त्यानंतर त्याने पुन्हा भारतातवर आक्रमण करून पंजाब, काश्मीर, पूर्व राजस्थान आणि गंगेच्या सुपीक खोऱ्यातील काही प्रदेश हे जिंकले. तथापि, प्रदेश जिंकून तेथे सत्ता स्थापन करणे हा त्याच्या स्वाऱ्यांचा उद्देश नव्हता.

### २.४.१ राजकीय घडामोडी :

महंमदानंतर त्याच्या मागून तुर्कांनी भारताच्या काही उत्तरेकडील प्रदेशांवर आपली सत्ता स्थापन केली. तुर्की राजकर्त्यांना सुलतान म्हणत. त्यांनी दिल्लीवर ताबा मिळवून आपली राजधानी दिल्ली येथे स्थापन

केली. तुर्कांचे साम्राज्य दिल्ली सलतनत म्हणून प्रसिद्ध आहे. तुर्कांची अत्यंत प्रबळ साम्राज्ये खलजी घराणे व तुघलख घराणे यांच्या काळात प्रसिद्धीला आली. तुर्क सम्राटांच्या सत्तेला मोंगलांच्या वारंवार आक्रमणांमुळे फार मोठा धक्का बसला. त्याच सुमारास भारताच्या दक्षिण भागात विजयानगर व बहामनी दोन बलाढ्य साम्राज्यांमध्ये राजकीय सत्तेसाठी फार मोठी स्पर्धा सतत चालू होती. भारतीय इतिहासात सोळाव्या शतकाच्या प्रारंभी मुघलांच्या प्रवेशामुळे नवाच कालखंड सुरू झाला. राजकीयदृष्ट्या असे दिसून येते की भारतात एकत्रित असे भारताचे साम्राज्य प्रदीर्घ कालावधीत स्थापन होऊा शकली नाही. राजकीय एकत्रीकरण, प्रदीर्घकाल शांतता व स्थैर्य यामुळे आर्थिक विकास व प्रगती होऊ शकते. सामाजिकदृष्ट्या व सांस्कृतिकदृष्ट्या हा कालावधी निरनिराळ्या प्रथा, परंपरा, चालीरीती यांच्या एकत्रीकरणाचा होता. या एकत्रीकरणाव्यतिरिक्त सामाजिक जीवनात, धार्मिक चालीरीतींमध्ये श्रद्धांमध्ये, विविध कलांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण वेगळाच मिलाफ झाला. हा मिलाफ सहिष्णुता, समतोल समकालीन परंपरांचा पाया बनला.

दिल्ली सलतनत, मुघल साम्राज्य या मोठ्या सत्तांना समांतर अशा अनेक प्रांतिक व विभागीय अशा स्वतंत्र राज्यांचाही भारतात उदय झाला होता. इलियासशाही व हुसेनशाही बंगालमध्ये, अहम आसाममध्ये, गाजापती (गजपती) ओरिसामध्ये, मेवाड व मारवाड येथील राजपूत राजवटी राजस्थानात, शराकी जैनपूरमध्ये अशा निरनिराळ्या प्रदेशात छोटीमोठी राज्ये अस्तित्वात होती. या निरनिराळ्या प्रांतांमध्ये व विभागांमध्ये स्वतंत्र राज्यांना स्वतंत्र अस्तित्व होते. तेथे भाषा, साहित्य व संस्कृतींचा वेगळा ठसा उमटलेला होता.

## २.४.२ राजकीय संस्था :

तुर्कांच्या आगमनाच्या आणि मुघलांच्या काळात सार्वभौमत्वाच्या व शासनाच्या नव्या कल्पना अस्तित्वात आल्या. सर्वात प्रथम इस्लामिक राज्यशास्त्रात राजेशाहीबद्दल सुस्पष्ट कायदेशीर कल्पना, स्थान नव्हते. त्यात सर्वांना राष्ट्रात समान मानण्याची मूलभूत कल्पना होती. मूलत: सत्ता सुलतान व सामर्थ्यशाली तुर्कांचा प्रमुख किंवा सरदार यांच्यात विभागली गेली होती. परंतु बल्बनच्या कारकिर्दीत सुलतानाच्या अधिकारात वाढ झाली. ती इतकी की, राज्याच्या आणि शासनाच्या सर्वच बाबतीत सुलतान ही सर्व शक्तीशाली व निरंकुश सत्ताशक्ती बनली. तुर्कांची उमरावशाही लक्षात घेण्यासारखी दुर्बल बनत होती. मुघलांनी राजाची शक्ती व प्रतिष्ठा अभूतपूर्व उंचीवर नेली होती.

दिल्लीच्या सुलतानांनी आणि मुघल सम्राटांनी प्रशासनात फेरबदल केले. दिल्लीच्या सुलतानांनी लष्करी अधिकाऱ्यांना इक्ताचे काम नेमून दिले जाई. इक्ता हा प्रादेशिक भाग होता. या इक्ताचे काम नेमून दिलेल्या लष्करी अधिकाऱ्यांना इक्ताची मालकी दिली जात असे, परंतु इक्ताचा महसूल गोळा करण्याचे, नियंत्रण ठेवण्याचे काम दिले जात असे. हा महसूल गोळा करणाऱ्यास इक्तिदार म्हणत. त्या महसूलाचा वापर इक्तिदार त्याच्या स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी व त्याच्या लष्कराच्या देखभालीसाठी वापरत असे. इक्ता किंवा महसूल बदली करता येत असे. त्यामुळे सम्राटाला आवश्यक असेल तेव्हा त्याच्या जवळील लष्कराच्या सहाय्याने तो लष्करी मदत करीत असे. तथापि, पूर्वीपासून चालत आलेली जमिनीवरील नियंत्रणाची पद्धती आणि साऱ्याची, जमिनीच्या मालकीची, वारसाची खेडेगावातील पद्धती अविचलपणे तशीच चालू राहिली. मुघल व्यवस्था ही जास्त अंतर्गामी होती. म्हणजे असे की तिच्यामध्ये महसूल पद्धतीवर नियंत्रण व जमिनीचे कार्यक्षेत्र हे खेडेगावापर्यंत खोलवर रुजलेले होते. मुघल सम्राटांनी मनसबदार या अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. ते लष्करी आणि मुलकी कामे

करीत. खरे म्हणजे, मनसब म्हणजे एक पद होते. त्याअनुसार मुघल अधिकारश्रेणी व अधिपत्याखालील सैन्य ठरत असे. मनसबदारांचे पगार (वेतन) जहागिरीच्या स्वरूपात दिले जाई. जहागिरीचा महसूल गोळा करण्याचा हक्क त्यांना मिळत असे. जहागिरी हस्तांतरित केल्या जाऊ शकत. हे इक्ताप्रमाणे अंमलात येई. फरक इतकाच की इक्तामध्ये प्रशासनाच्या मोबदल्याचा समावेश असे, जो जहागिरीमध्ये नसे. मुघल साम्राज्यातील राज्यकारभाराची पद्धत मनसबदारी व जहागिरीच्या पद्तींच्या सुरळीत कार्य वाहीवर आधारलेली होती.

### २.४.३ अर्थव्यवस्था :

दिल्ली सलतनत व मुघल साम्राज्य व्यवस्था ही शेतीतील अतिरिक्त उत्पादनावर आणि त्यांच्याकडून वसूल केल्या जाण्याच्या शेतसाऱ्यावर आधारलेली होती. मुगल साम्राज्यात, विशेषत: अकबराच्या कारकिर्दीत महसूल वसुलीच्या पद्धतीत दीर्घकालीन, मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आले. जमिनीचा महसूल जमिनीची प्रत्यक्ष मोजणी करून जमिनीच्या आकारमानानुसार निश्चित ठरलिलेल्या दराप्रमाणे आकारला जात असे. त्यावेळी जमिनीची सुपिकता किती प्रमाणात आहे हेही ध्यानात घेतले जात असे. पिकाच्या उत्पादनातील बाजरातील चालू दरानुसार राज्याचा वाटा किती आहे याचाही हिशेब केला जात असे. त्यानुसार महसूल रोखीच्या स्वरूपात निश्चित ठरविण्यात येत असे. राज्यशासन रोखीने महसूल देण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित करीत असे. या काळात शेतीचे व्यापारीकरण झाले होते. राज्यशासन शेतकऱ्यांना व्यापारी पिके घेण्यास प्रोत्साहित करीत असे. राज्यशासन शेतीच्या विस्तारीकरणात विशेष:लक्ष देत असे. आतापर्यंत विगर शेतजमीन व अरण्ये या क्षेत्रामध्ये शेती वाढविण्याविषयी राज्यशासन प्रयत्नशील होते. या प्रयत्नांमुळे शेतीविषयक मूळ व्यावसायिकांना बराच फायदा मिळू लागला. ज्यावेळी पीक कमी येत असे त्यावेळी राज्यशासन जमिनींच्या महसुलात सूट देत असे. तसेच शेतकऱ्यांना राज्यशासन कर्जपुरवठाही करीत असे.

गुप्तांच्या अखेरीच्या काळात व्यापार व व्यवसायात बरीच घट झाली होती. परंतु या काळात त्यात बरीच सुधारणा झाल्याचे दिसून आले. या काळात व्यापाऱ्याच्या घसरणीला आळा बसून व्यवसाय व व्यापारात सुधारणा झाल्यमुळे नवीन शहरांचा उदय झाला. या नव्या शहरीकरणाच्या उदयामुळे तेराव्या व चौदाव्या शतकांमध्ये भारतातील अंतर्गत व्यापारात वाढ झाली. निरनिराळ्या शहरांना जोडणाऱ्या रस्त्यांचे जाळे तयार झाले. त्यामुळे व्यापारविषयक सोयींमध्ये वाढ झाली. दिल्ली, आग्रा, लाहोर, मुलतान, ढाका, अहमदाबाद, सुरत, कॅम्बे इत्यादी महत्त्वाची शहरे उदयाला आली. भारतातील व्यापारीमाल पंजाबमधून पश्चिम व मध्य आशियातील बाजारांमध्ये पाठविण्यात येत असे. मुघल साम्राज्यात स्थैर्य व विशिष्ट मर्यादेपर्यंत शांतता इतकी होती की, साम्राज्यातील कोणत्याही दोन शहरांमध्ये प्रवास किंवा व्यापारी वाहतूक पुरेशा प्रमाणात लक्षात घेण्याइतपत सुरक्षित होती. समुद्रकिनाऱ्याजवळून जलमार्गाने होणाऱ्या व्यापाराचाही या काळात उदय झाला. या काळात व्यापारी मार्ग व्यावसायिकांचे संबंध सलोख्यांचे, एकात्म भावनेचे व उच्च पातळीवरचे (स्तरावरचे) होते. शेठ, बोहरा, मोदी हे व्यापारी वर्गातील लोक लांब पल्ल्याच्या व्यापारात कार्य करीत होते. बेपारी व बनिक हे व्यापारी अंतर्गत व किरकोळ व्यापार करीत असत. बंजारा लोक हा व्यापाऱ्यांमधील विशिष्ट वर्ग मोठ्या प्रमाणावर माल, विशेषत: धान्याची वाहतूक करीत असे. सराफ किंवा श्रॉफ हे पैशाच्या देवघेवीचा व्यवहार करीत असत. हुंडी किंवा बिल ऑफ एक्स्चेंज स्वीकारणे, वटविणे असे व्यवहार ते करीत असत. हुंडी किंवा बिल ऑफ एक्स्चेंज म्हणजे पतपत्र होय. विशिष्ट तारखेला (दिनांकाला) विशिष्ट

ठिकाणी पैसे देण्याचे वचनपत्र (वचनचिठ्ठी) म्हणजे पतपत्र होय. या पतपत्रामुळे रोख पैसे न देताही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल नेणे-आणणे यात सवलत मिळते. तसेच लांबच्या अंतरावरील पैशाची देवघेव सुलभ होते.

## २.४.४. सांस्कृतिक व धार्मिक जीवन :

धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात मध्ययुगीन काळात रुढींचा सारांश घेऊ या. धार्मिक क्षेत्रात भक्ती आणि सूफी पंथाच्या चळवळी या काळात सुरू झाल्या. भक्ती आणि सूफी पंथाने एकेश्वरवादावर (देव एकच आहे) भर दिला. व्यक्तिगत ईश्वरनिष्ठेमुळे सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यात ईश्वराजवळ पोहोचणे शक्य असते, याची शिकवण या पंथाने दिली. भक्तिपंथाने प्रेमावर व व्यक्तिगत भक्तीवर अधिक महत्त्व दिले. परंतु रुढी व अत्यंत त्यागास, तपश्चर्येस फार महत्त्व दिले नाही. त्यांनी जातीयतेवर आणि ब्राह्मणांच्या वर्चस्वावर टीका केली. भक्ती पंथातील रामानंद, कबीर, रविदास, मीराबाई, गुरुनानक, तुकाराम आणि चैतन्य इत्यादींचा सर्वसामान्य लोकांवर फार प्रभाव होता. आजही त्यांचा प्रभाव टिकून राहिलेला दिसून येतो. खरे तर यापैकी काही संतांनी एक मोठा मार्ग दाखविला. उदाहरणार्थ पंजाबमधील लोकांवर गुरुनानकांचा प्रभाव फार मोठा होता. गुरुनानक यांनी नवीन शीख धर्माचे अनेक अनुयायी मिळवून शीख धर्माचा प्रसार केला. त्या धर्माच्या अनुयायांना शीख असे म्हणतात. याच प्रकारे सूफी संतांनीही ईश्वरनिष्ठा आणि प्रेम हा स्वर्गाकडे नेणारा एकमेव मार्ग आहे असे प्रतिपादन केले व त्यावर भर दिला. त्यांनी सहनशिलतेची व करुणेची शिकवण दिली. ते तपश्चर्येचा मार्ग अनुसरित असत. सर्वसामान्य लोकांची दु:खे व काळजी यांच्यात सहभागी होत असत. त्याचा परिणाम म्हणून हिंदी व मुस्लिम समाजावर त्यांचा विशेष जोरदार / भारी प्रभाव पडत असे. सूफी व भक्ती पंथांच्या संतांमध्ये वैचारिक देवाण घेवाण होत असे. त्यांच्यात तात्विक कल्पनांची देवाणघेवाण होत असे. दोघांमधील प्रथा हिंदू-मुस्लिमांमध्ये ऐक्य निर्माण करणाऱ्या, दुव्याचे कार्य करणाऱ्या होत्या.



चित्र क्र. २.३ : गुरुनानक

## तुम्हास हे माहित आहे का ?

**कबिराचे दोहे**

दुख में सुमिरन सब करे, सुख में करे ना कोय।

जो सुखमे सुमिरन करे, तो दुख काहे को होय।

दु:खात सर्वच प्रार्थना करतात, सुखात कोणीच करत नाही।

जो सुखात प्रार्थना करतो, त्याला दु:खच होत नाही।

## आपल्यासाठी एक उपक्रम २.३

आपल्याला माहीत असलेल्या भक्तीमार्गातील संत किंवा सुफी संत यांची माहिती गोळा करा। त्यांच्या स्मृतिस्थळांना भेट द्या। आपल्या भेटीचा वृत्तांत ८०/१०० शब्दात तयार करा।

कमीत कमी ३ भक्तीमार्गातील संत व सुफी संत यांची चित्रे जमा करा। त्यांची आणि त्यांच्या शिकवणुकीची माहिती गोळा करा। प्रत्येकाची थोडक्यात माहिती लिहा। दोघांच्या शिकवणुकीतील साम्य व भेद स्थळे शोधा। तुम्ही काय बोध घेतला? सद्यस्थितीत त्यांची शिकवण योग्य आहे का? आपली मते आपले कुटुंबिय व मित्रांना सांगा।


भारतात निरनिराळ्या परंपरा आसल्या तरी भाषा, साहित्य, कला, वस्तुकला, संगीत, नृत्य यामुळे त्यांचे एकत्रीकरण झाले होते। साहित्य किंवा वाङ्मयाच्या क्षेत्रात आणि भाषा क्षेत्रात पर्शियन व संस्कृत यासारख्या शास्त्रशुद्ध भाषा अधिक समृद्ध झाल्या। त्यांच्यामध्ये लक्षणीय सुधारणा झाली। त्यामुळे प्रांतिक भाषाही समृद्ध होण्यात मदत झाली। भारतात हिंदी, बंगाली, उडिया, राजस्थानी, गुजराथी इत्यादी विविध भाषांमध्ये वैचारिक सामंजस्य वाढले। त्यामुळे त्या भाषांमध्ये विविध वाङ्मयात त्याचे प्रत्यंतर येऊ लागले। तुलसीदासांचे रामायण, मलिक, मुहंमद जायसीचे पद्मावत, बंगाली कवी मुकुंदराम व माणिकदत्त यांचे मंगलकाव्य, बंगाली भाषेतील आतोलचे निबंध, तसेच एकनाथ, तुकाराम यांच्यासारख्या मराठी कवींचे काव्य हे सर्व त्या काळात प्रसिद्ध होते।

मध्ययुगीन काळात कला व वास्तुकला यांचाही उदय झाला। मुघलांच्या आश्रयाने चित्रकार सरकार दरबारी असत। त्यांनी शाही संग्रहालय उभारून निरनिराळी चित्रे संग्रहित केली। मुघल काळातील चित्रकला म्हणजे पार्शियन व भारतीय परंपरांचे संपूर्ण मिलाफ झालेली चित्रकलेची शैली होय। काही मर्यादिपर्यंत असे म्हणता येईल की, या शैलीतील कलाकारांनी आपल्या विविध शैलीतील राजपुताना, गुजरात, माळवा इत्यादी वैशिष्ट्ये एकत्र करून ही शैली समृद्ध केली। याकाळात दासवंत, बसावन, मुकुंद, केशव असे प्रसिद्ध चित्रकार होते। अब्दुल सामाद, सय्यिद अली अशा पर्शियन कुशल चित्रकारांनी त्यांच्या शैलीतील काही चित्रे व साहित्य हे विशिष्ट छाप पाडणारी उदाहरणे म्हणून दाखविता येतील।

मुघल काळातील अत्यंत आकर्षक सांस्कृतिक मिलाफाचे दृष्य स्वरूप म्हणजे भारतीय व मुस्लिम यांच्या एकत्रित वास्तुशिल्पाचे नमुने होत. भारतीय कलाकारांनी भारतीय व पर्शियन शैलीचे एकत्रीकरण केले. नक्षिकाम, गायन, कलाकौशल्य याबाबतीत दोन्ही शैलींचा सुरेख संगम झाला होता. कमानी, घुमट यासारख्या पर्शियनशैलीमध्ये बांधकामात हिंदूशैलीची घंटा, स्वस्तिक, कमळ, कलश यांचा उपयोग करवून घेतलेला दिसतो. कुतुबमिनार, अलाई, दरवाजा, तुघलखाच्या काळातील तुघलखाचे स्मारक, घियासुद्दीन तुघलखाने वसविलेले शहर ही या दोन्ही शैलींच्या मिलाफाची उत्तम उदाहरणे दिल्ली सलतनतच्या काळातीलच आहेत. मुघलांच्या काळातील स्मारकांच्यामुळे भारतीय व इस्लामिक पद्धतीच्या एकीकरणावर  एकरूपतेवर चांगला प्रकाश पडतो. फत्तेपूर शिक्री, पंचमहाल, बिरबलचा महाल, इबादतखाना, दिल्लीची हुमायूनची कबर, सिकंदरा येथील अकबराची कबर, आग्रा येथील इत्यारदुल्ल्याची कबर आणि सर्वात महत्त्वाची इमारत ताजमहाल ही मुस्लिम वास्तुशिल्पाचे अप्रतिम नमुने आहेत.

भारतीय मध्ययुगीनकाळात भारतीय संगीतालाही मुघल बादशहांकडून सर्वात चांगला आश्रय मिळाला. भारतीय संगीतात गायन व वाद्ये वादनाच्या क्षेत्रात अरबी, इराणियन, मध्य आशियातील परंपरांचा शिरकाव झाला. नवीन रागांची निर्मिती झाली. सूफी व भक्ती मार्गातील परंपरांनी भारतीय संगीताला नवीन प्रकारच्या दिशा देऊन उत्तेजन दिले.

भारतीय इतिहासात मध्ययुगीत काळात राजकीय, आर्थिक, सांस्क्रातिक क्षेत्रात वेगळ्याच प्रकारची वैशिष्ट्ये दिसून येतात. प्राचीन युगानंतर ही महत्त्वाची व अतिविशिष्ट व भिन्न भिन्न असे पूर्णपणे वेगळ्या स्वरूपाचे बदल मध्ययुगीन काळात झालेले दिसून येतात.



आकृती २.४ : कुतूब मिनार

## पाठांतर्गत प्रश्न २.२

१. मक्का या शहराचे महत्व सांगा.

२. अरब संस्कृतीचे योगदान असलेली पाच क्षेत्रे सांगा.

३. खालील विधानांमधील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

अ) भारताच्या दक्षिणेकडील द्वीपकल्पाच्या प्रदेशात ......... या राजघराण्याची सत्ता होती.

ब) मुघल साम्राज्य ............ व ........... पद्धतीचे चांगल्या कार्यावर आधारलेले होते.

क) विशेषत: अन्नधान्याचा घाऊक व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांचा ............... हा विशिष्ट वर्ग होता.

ड) भक्ती मार्गाने .............. चा पुरस्कार केला.

## आपण काय शिकलो?

- मध्ययुगीन काळात हा अंध:कारमय काळ होता असे मानावयाचे कारण नाही. कारण अनेक महत्त्वाच्या सुधारणा व विकास जगाच्या विविध भागात व विविध क्षेत्रात झाल्या.
- मध्ययुगीन काळात युरोपातील समाजात सामंतशाही ही सर्वात महत्त्वाची संस्था / संघटना होती.
- सामंतशाही ही धर्मसत्तेचा समावेश असलेली किंवा विविध वर्ग असलेली संघटना होती.
- सामंतशाही ही गुलामगिरी असलेली, गढी (मॅनॉर) ही वैशिष्ट्ये असलेली पद्धती निर्माण करणारी आर्थिक दृष्टिकोनातून विशिष्ट अशी पद्धती होती.
- सामंतशाही ही स्थिर राहणारी पद्धती नव्हती. ती एक उत्कर्षाची व संकटांची पद्धती होती.
- इ. स. दहाव्या शतकाच्या आधी युरोपात सांस्कृतिक विकास फारच संथ होता. दहाव्या शतकानंतर सांस्कृतिक विकास वेगाने होऊ लागला. ज्ञान व प्रज्ञा यांच्या उदयाला सुरुवात झाली.
- सुमारे इ. स. सातव्या शतकात मुहंमदांनी नवीन इस्लाम धर्माची स्थापना केली. त्यांचे तत्त्वज्ञान अगदी साधे, सोपे होते.
- इस्लाम धर्माचा प्रसार जगाच्या मोठ्या भागात झाला.

- इ. स. १५०० च्या सुमारास इस्लाम संस्कृती व समाज जगात सर्वत्र व वेगाने पसरला.
- तुर्क व मुघलांच्या आगमनामुळे भारतात सार्वभौमत्व व प्रशासन या कल्पना भारतात आल्या. इक्ता पद्धती, जहागीरदारी, मनसबदारी या महत्त्वपूर्ण प्रशासकीय सुधारणा होत्या.
- भारतातील मध्ययुगीन काळात भारतात आर्थिक विकास झाला.
- भारतामध्ये मध्ययुगीन काळात सांस्कृतिक व सामाजिक जीवनात निरनिराळ्या रुढी, परंपरा यांचे एकत्रीकरण झाले.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. मध्ययुगीन कालावधी हा महत्त्वाचा असून मानवी समाजाच्या विकासाचे ज्ञान मिळविण्यासाठी त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे, हे विधान स्पष्ट करा.

२. रोमन साम्राज्याच्या अस्तानंतर पश्चिम युरोपातील राजकीय व आर्थिक जीवनात कोणते बदल झाले त्याचे वर्णन करा.

३. इस्लाम धर्माच्या शिकवणीचे (तत्त्वज्ञानाचे) वर्णन करा.

४. मध्ययुगीन भारतीय आर्थिक परिस्थितीची प्रमुख वैशिष्ट्ये लिहा.

५. मध्ययुगीन भारतीय संस्कृतीने निरनिराळ्या प्रथा, चालीरितींचे समतोल एकत्रीकरणाचे प्रतिनिधीत्व कशा प्रकारे केले ते उदाहरणांसह स्पष्ट करा.

## पाठांतर्गत प्रश्नांची उत्तरे

### २.१

१) सामंत आणि कुळ यांचे संबंध वैयक्तिक स्वरूपाचे असत. हे संबंध टिकविण्यासाठी समारंभ केले जात. या समारंभात कुळे सामंताची सेवा आयुष्यभर करण्याची शपथ घेत असत. त्याबदल्यात सामंत कुळांचे रक्षण करीत असत.

२) गुलाम सामंतांचे दास होते.

३)

अ) शेतीचे उत्पन्न वाढले होते त्यामुळे शेतकरी जादा झालेले उत्पन्न विकून त्याबदल्यात आवश्यक त्या वस्तू विकत घेऊ शकत असत.

ब) मजूरपुरवठ्यात झालेली घट, शेतीचे बदलते तंत्र, दुष्काळ यामुळे अर्थव्यवस्था घसरणीला लागली.

क) दहाव्या शतकापूर्वीचा काळ शिक्षण आणि कला यांचा भरभराटीचा काळ नव्हता. कारण या काळात फारच थोड्या लोकांना शिक्षणाची सोय उपलब्ध होई. शिक्षण अंधश्रद्धेवर व निष्ठेवर आधारित होते.

## २.२

१) मक्का हे शहर प्रमुख व्यापारी मार्गावर बसले होते. या शहरात काबा हे धार्मिक स्थळ होते. त्यामुळे हे शहर तीर्थस्थानही होते. अरब वंशांच्या टोळ्यांचे ते उपासना केंद्र होते. आणि नंतर इस्लामचेही ते प्रमुख केंद्र बनले.

२) खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, वाङ्मय, गणित, वास्तुशास्त्र

३) अ) चोला

ब) मनसबदारी, जहागिरदारी

क) बंजारा

ड) एकेश्वरवादाचा

३


# आधुनिक जग

युरोपातील मध्ययुगातील समाजाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य सामंतशाही हे होते. हे आपण मागील पाठात पाहिले आहे. तसचे इ.स . १४ व्या शतकाच्या पुढे युरोपात सांस्कृतिक व बौद्धिक जीवनात आमूलाग्र बदल झाले, त्यामुळे आधुनिक काळाची काहीशी ओळख करून देणारा हा काळ होता. हेही आपण मागे पाहिले आहे. हा प्रबोधनाचा काळ होता. या काळात सामाजिक, राजकीय क्षेत्रात प्रत्येक बाबतीत मानवाच्या जीवनात वैचारिक व प्रबोधन करणारे बदल झाले. या बदलांच्या कारणमीमांसा करण्याचा हा काळ होता. पूर्वी आपण पाहिल्याप्रमाणे अरब काळातच सारासार विवेकाची व शास्त्रीय कारणे शोधण्याची पद्धत सुरू झालेली होती. रुढीप्रियतेचा काळ ते सुसंस्कृती व प्रबोधनापर्यंतचा हा युरोपातील समाजजीवनाचा बदलता काळ होता. त्या काळात सुसंस्कृतपणा, कारण परंपरा शोधण्यासाठी अभ्यासवृत्तीला महत्त्व प्राप्त झाले होते. त्याचा संपूर्ण जगावर मोठाच परिणाम झाला. हे बदल झाल्यामुळे सामंतशाहीच्या पद्धतीचे विघटन झाले ती संपुष्टात येऊ लागली. या पाठात आपण हे बदल त्यांचा विकास कसा झाला, मध्ययुगाची २० व्या शतकाकडे वाटचाल कशी सुरू झाली, हे आपण पाहणार आहोत.

## उद्दिष्टे :

या पाठाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला खालील गोष्टी समजतील.

- सामंतशाहीच्या ऱ्हासाला कोणते घटक जबाबदार होते, याची यादी तयार करणे.
- प्रबोधनाचा अर्थ व वैशिष्ट्ये यांचे स्पष्टीकरण देणे.
- ख्रिश्चन धर्मातील सुधारणेची कारणे आणि त्या सुधारणांचे परिणाम यांचे स्पष्टीकरण देणे.
- प्रबोधन काळातील निरनिराळ्या शास्त्रातील सुधारणा, विकास यांचे वर्णन करणे.
- प्रमुख शास्त्रीय शोध, प्रमुख वाहतुकीतील प्रवासातील शोध / नवीन भूप्रदेशांचे प्रमुख शोध यांचे वर्णन करणे.
- औद्योगिक क्रांतीचे महत्त्व आणि तिचे युरोपावर व जगावर झालेल्या परिणामांचे स्पष्टीकरण करणे.







- ❖ अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध आणि फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे व परिणाम स्पष्ट करणे.
- ❖ जर्मनीचे व इटलीतील राष्ट्रीय ऐक्यासाठी झालेल्या प्रयत्नांची चर्चा करणे.
- ❖ समाजवादी विचारसरणीचा विकास आणि रशियन राज्यक्रांती यांची चर्चा करणे.

## ३.१ सामंतशाहीचा ऱ्हास :

मध्ययुगीन काळातील युरोपातील संस्कृतीमधील सामंतशाहीच्या पद्धतीबद्दल आपण माहिती मिळविली होती. आता आपण मध्ययुगीन काळाच्या अखेरीस या पद्धतीत काही बदल झाले त्यांची चर्चा करूया. सुमारे १४ व्या शतकात नवीन नगरांचा व शहरांचा उदय झाला, व्यापारात सुधारणा झाल्या. व्यापारातील सुधारणा, शहरांचा उदय यांच्यामुळे सामंतशाहीचा ऱ्हास सुरू झाला. नवीन विकसित शहरे ही उत्पदनाची प्रमुख केंद्रे बनली, त्या शहरांचे नियंत्रण निवडून आलेल्या प्रतिनिधींद्वारे केले जात असे. शहरातील वातावरण सामंतशाहीतील सर्व बंधनांतून व निमंत्रणातून मुक्त झाले. शहरातील लोक त्यांच्या मनास येईल तेथे येऊ जाऊ लागले, मनाला येईल तो व्यवसाय करू लागले. शहरांच्या वाढीमुळे ग्रामीण भागातील कारागीर व शेतकरी शहरांकडे आकर्षित होऊ लागला. कारण त्यांना शहरी भागात राहण्याच्या अनेक चांगल्या सुखसोयी व विकासाच्या अनेक संधी मिळत असत. तसेच सामंतांच्या शोषणापासून मुक्तता मिळत असे. दुसरे असे की, नगरे, शहरे यातून कापूस, ऊस आणि इतर बींबियाणांच्या उत्पादनांना प्रोत्साहन मिळत होते. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना रोख पैशांच्या स्वरूपात किंमत मिळत असे. उत्पादित पक्का मार्ल वस्तू बाजारात विकल्या जात असत. चलन (पैसा) हे वस्तुविनिमयाचे साधन बनल्यामुळे चलनी अर्थव्यवस्थेला उत्तेजन मिळाले. अशा अर्थव्यवस्थेचे दूरगामी परिणाम असे झाले की जमीनदार आपल्या कुळांकडून सेवांच्या स्वरूपात भाडे घेण्याऐवजी रोखे पैसे स्वीकारू लागले. निरनिराळ्या प्रकारच्या चैनीच्या वस्तूंच्या खरेदीसाठी त्यांनाही रोख पैशाची गरज होतीच. असे बदल वाढत गेल्यामुळे जमीनदार व कुळे यांच्यातील संबंधांचे जे पूर्वीचे स्वरूप होते ते पूर्णपणे बदलले. तिसरे म्हणजे व्यापारी वर्गाचा उदय आणि त्यांची समाजात उच्च स्थानी जाण्याची महत्त्वकांक्षा हे या बदलांचे आणखी एक कारण होते. आर्थिकदृष्ट्या प्रबळ असणाऱ्या व्यापारी वर्गाने धर्मगुरूंच्या प्रमाणे सामाजिक रचनेत उच्चस्थान व दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न केले. धर्मगुरूंनीही सामंतांचे वर्चस्व कमी करण्यासाठी प्रबळ व्यापाऱ्यांना पाठिंबा दिला. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे सामंतशाहीचा पूर्णपणे नाश झाला.

सामंतशाहीचा नाश झाल्यामुळे नवीन कल्पनांचा उदय झाला. या नवीन कल्पनांमुळे युरोपमध्ये नवीन जागृती झाली. या जागृतीने नवीन चळवळीला जन्म दिला. ही नवीन चळवळ प्रबोधन या नावाने ओळखली जाऊ लागली.

## ३.२ प्रबोधन :

श्रद्धेचे युग संपून बुद्धीचे युग सुरू झाले. या काळात प्रबोधन आणि सुधारणा या दोन चळवळी सुरू झाल्या. मानवधर्म, तार्किकता आणि चौकसवृत्ती या प्रबोधनाच्या मुख्य संकल्पना होत्या. या चळवळीमुळे सर्व जगातील लोकांच्या सांस्कृतिक, धार्मिक, बौद्धिक, सामाजिक आणि राजकीय जीवनामध्ये बदल

घडून आले. याचकालावधीत गावांचे झपाट्याने शहरीकरण झाले. जलद प्रवास साधने, संपर्क साधने निर्माण झाली. लोकशाही प्रशासन व्यवस्था अस्तित्वात आली आणि समानतेच्या तत्वावर आधारित कायदे तयार करण्यात आले.

प्रबोधन या शब्दाचा खरा अर्थ पुनर्जन्म असा होतो. ही चळवळ १४ व्या शतकात इटली मध्ये सुरू झाली. इटली हा देश अनेक लहान प्रांतात विभागला होता. हे प्रांत म्हणजे नगरेच होती. यापैकी बरीचशी नगरे प्राचीन रोमन इमारतींच्या अवशेषावरच बांधली होती. युरोपासंदर्भात ही नगरे भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ति ठिकाणी असल्यामुळे ही नगरे व्यापाऱ्यांची आणि प्रज्ञाशिक्षणांची मुख्य केंद्रे बनली. व्हेनिस शहर हे त्या काळातील सर्वात मोठे व्यापारी आणि शैक्षणिक केंद्र होते. व्यापाऱ्यांनी इतर देशांशी व्यापार करून पैशाबरोबरच जगभरातील अनेक नवीन कल्पना आपल्याबरोबर आणल्या.


नवीन सामाजिक आणि राजकीय संस्था उदयास आल्याने राजकीय स्वातंत्र्य मिळाले आणि शिक्षण, कलासंस्कृती यांच्या प्रगतीसाठी योग्य वातावरण तयार झाले. लोकांकडे शिकण्यासाठी व इतर गोष्टींसाठी भरपूर फावला वेळ उपलब्ध होता.

या काळात आर्थिक स्थितीसुद्धा चांगल्या प्रमाणात सुधारली. वित्त विनिमय आणि सार्वजनिक कर्ज तसेच हिशोब व्यवस्था या ठिकाणी नवनवीन व्यापारी आणि आर्थिक तंत्रे अवलंबण्यात आली. त्यामुळे इटली हे प्रबोधनाचे प्रमुख केंद्र बनले. या काळातील काही महत्त्वाच्या सुधारणा पुढीलप्रमाणे होत्या. ‘ शहरीकरणाची सुरुवात, खाजगी पैशावर राष्ट्रीय व्यापार, बँका उभारणी, नवीन रस्ते शोधण्यासाठी मोहिमा आणि स्थानिक भाषेत छापलेले आणि लोकप्रिय झालेले वाङ्मय.

जुन्या समाजामध्ये कर्मठपणा व अधिकारांची उतरंड होती परंतु नवीन व्यापारी समाजामध्ये अधिकाऱ्यांची उतरंड नव्हती. तर हा समाज मुख्यत: निधर्मी उद्दिष्टांवर काम करत होता. समाजातील संशोधकांनी आणि साहसी लोकांनी नवीन जगाचा ओळख करून देण्याच्या बाबतीत तसेच अर्थकारणाच्या बाबतीत महत्त्वाचा वाटा उचलला. नवीन व्यापारी मार्गांचा शोध लागल्यानंतर अनेक प्रकारचा व्यापारी माल आशिया, आफ्रिका आणि अमेरिका खंडातून युरोपमध्ये आला. या मालामुळे युरोपियन लोकांचे जीवन समृद्ध झाले आणि या वस्तू आपण तयार करून, त्यांचा व्यापार करून फायदा मिळवावा अशी त्यांची धारणा झाली. त्याचा परिणाम म्हणून उद्योजक, सावकार आणि व्यापारी एकत्र आले. यामुळे पैसा ही गोष्ट राजकारणात आणि इतर देशांच्या व्यापारातदेखील महत्त्वाची ठरली.

तेथील लोकांनी ग्रीस व रोम येथील प्रगत संस्कृतींच्या विकासाबाबत औत्सुक्याने माहिती मिळविली. प्रबोधन म्हणजे लोकांच्या विचार प्रणालीत झालेला गंभीर बदल होय. या विचार प्रणालीतील विचारांपैकी काही विचारांमध्ये मानवतावादी वृत्ती, सुधारक बुद्धी, चौकसवृत्ती यांना चालना दिली. मानव हा जागतिक घडामोडींचा केंद्रबिंदू बनण्याऐवजी नवीन विचारवंतांच्या समूहाचा केंद्रबिंदू बनला. या काळात अनेक विचारवंतांचा उदय झाला. या काळात मानवतावादास महत्त्व प्राप्त झाले. मानवतावादावरील विश्वास वाढला. माणसांना उपयुक्त ठरणारे कार्य व जागातील सुखसोयींचा लाभ व आनंद घेण्याचा मानवाला अधिकार आहे. यावर मानवतावादाने भर दिला. मानवतावादाचे मध्ययुगीन चर्चमधील (ख्रिश्चन धर्मातील) जगातील सुखांचा त्याग या सारख्या कल्पना नाकारल्या. भाषा, वाङ्मय, इतिहास, नैतिकता इत्यादींबद्दल अभ्यासात लोकांचे  औत्सुक्य जागृत होऊन अभ्यास करण्याची वृत्ती लोकांमध्ये वाढू लागली, या काळात मानवता मानणारा शिस्तबद्ध पंथ निर्माण झाला.

मानवतावादी वृत्ती कला व साहित्याच्या क्षेत्रातील अविष्कारात दिसून येते. कलेच्या विशेषत: चित्रकलेच्या प्रांतात प्रवोधनात फारच प्रगती झाली. चित्रकारांनी मानवी शरीराच्या अवयवांचा व त्यांच्या रेखीव मोजमापांचा पद्धतशीर अभ्यास केला. त्यामुळे त्या काळातील चित्रकारांनी मानवांचे वास्तववादी रेखीव व प्रमाणबद्ध चित्रण केले. काही कलाकार प्रमुख होते. ते म्हणजे लिओनार्दो 'दविन्सी, मायकेल एन्जेलो, राफेल बॉटीकेली व तितान. आजही त्यांच्या कलेचे कौतुक केले जाते. उदाहरणार्थ लिओनार्दो 'दव्हिन्सीचे मोनालिसा हे चित्र.


आकृती ३.१ : मोनालिसा 'लिआनार्दो' द विन्सी

शिल्पकलेतही शिल्पकारांनी मुक्तपणे मानवी पुतळे बनविण्यास सुरवात केली. जुन्या काळापेक्षा वेगळ्या पद्धतीने इमारतींचे बांधकाम करण्यास वास्तुशिल्प कलाकारांनी सुरुवात केली. प्रबोधन काळातील पहिला मोठा शिल्पकार डोनोल्लो हा होता. त्याने सर्वात प्रथम नग्न मानवाचा डेव्हिड हा पुतळा तयार केला.

प्रबोधनाच्या मनोवृत्तीमुळे युरोपात राष्ट्रवादाची सुरुवात झाली. कारण लोक मध्ययुगातील धार्मिक बंधनातून व मर्यादेतून मुक्त होऊ इच्छित होते. राष्ट्रीय ओळख तीव्र बनली. तिचे प्रतिबिंब आधुनिक युरोपियन भाषांमधील इटालियन, स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन, इंग्लिश' साहित्यात दिसू लागले. आता लेखकांनी लॅटिनचा त्याग केला आणि प्राकृत किंवा स्थानिक भाषांचा वापर काव्यात, नाटकांमध्ये, गद्यात सुरू केला. आधुनिक युरोपियन भाषांमध्ये प्रचंड साहित्य निर्माण झाले. या काळातील प्रसिद्ध साहित्यात डाटेचे डिव्हाइन कॉमेडी इरॅस्मसचे इन प्रेज ऑफ फॉली, मेकियाव्हेलीचे द प्रिन्स, सर्व्हान्टेचे डॉन क्विझोट यांचा समावेश होता.

माणसाच्या सकारात्मक कार्यपद्धतीवर प्रबोधनकाळातील विद्वानांचा विश्वास होता. प्रबोधनाच्या नंतरच्या काळात धार्मिक दृष्ट्या दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. त्यापैकी पहिली म्हणजे धर्मसुधारणा चळवळ या चळवळीमुळे ख्रिश्चन धर्मात फूट पडून दोन पंथ निर्माण झाले. ते म्हणजे रोमन कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट हे होत. दुसरी घटना म्हणजे कॅथॉलिक चर्चमध्ये सुधारणा चळवळ चालू झाली. या चळवळीस प्रतिचळवळ म्हणून ओळखतात.

## आपल्यासाठी एक उपक्रम ३.१

प्रबोधनकाळात तार्किकता, मानवधर्म, चौकसवृत्ती, निरीक्षण, प्रयोगशीलता, युक्तिवाद या नव्या संकल्पना उदयास आला. या संकल्पना समजावून घ्या. सध्याच्या काळात या संकल्पना कितपत संयुक्तिक आहेत यावर विचार करा.

टिपा

भारतातील धार्मिक चालीरिती, रुढींमधील विकृती, अनर्थ, कर्मठपणा यांच्याबद्दल आपण माहिती मिळविली. त्यात आपल्या सुधारकांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा कशा प्रकारे केल्या हेही पाहिले. त्याच काळात पश्चिम युरोपातही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती.

मध्यकालीन कॅथॉलिक चर्च हे अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, पैशाची हाव याचे केंद्रच बनले होते. अवैध मार्गांनी व लिलावात सर्वात मोठी बोली बोलणाऱ्याला चर्चमधील वरिष्ठ पदे मिळत असत. नवीन वाईट प्रकार म्हणजे क्षमापत्रांची विक्री आणि अंमल पत्र या चर्चच्या कृती मुळात क्षमापत्रे ही धर्मादाय संस्था धर्मयुद्धासाठी लढणारे यांना दिली जात. परंतु नंतरच्या काळात क्षमापत्रे हा नफा देणारा व्यवसाय बनला. क्षमापत्रे म्हणजे स्वर्गात जाण्याचा पासपोर्ट, अशी कल्पना रुढ झालीच. हे पत्र म्हणजे चर्चच्या शिक्षेपासून सुटकेचे प्रशस्तीपत्रक म्हणून विकले जाई. अंमल पत्रे म्हणजे चर्चचे काही नियम किंवा व्रतापासून मुक्ततेचे कागदपत्र होय. अशी कल्पना झाली. चर्च म्हणजे पैसा कमावण्याचे आदर्श स्मारक मानले जाऊ लागले. श्रद्धाळू शेतकऱ्यांनी खरा क्रूस चर्चकडून घ्यावा यासाठी त्यांना समजावले जाईल. लोक चर्चमधून खरा क्रूस म्हणून लाकडाच्या तुकड्यापासून बनविलेला क्रूसच चर्चकडून खरेदी करत. कारण त्या क्रूसमध्ये काही सुप्त शक्ती आहेत, असा लोकांचा विश्वास होता.

चर्च आणखी काही श्रद्धा, प्रभाव निर्माण करीत की, कोणत्याही कारणाशिवाय पैसे चर्चला श्रद्धेने देत असत. तेही एक पैसे जमा करण्याचे साधन बनले, पोप, बिशप हे धर्मगुरु धार्मिक बनण्याऐवजी राजकीय प्रतिष्ठित व्यक्ती बनू लागले. भरपूर पैसे मिळविणे हे त्यांचे प्रमुख ध्येय बनले. पाखंड किंवा थोतांड म्हणजे मार्गावरून भ्रष्ट होणे, असे चर्चमध्ये प्रवचनात सांगितले जात असे. मार्गावरून भ्रष्ट होणारा पाखंडी ठरविला जाऊन त्याला धर्म बहिष्कृत करण्यात येत असे. एखाद्याला दोषी ठरवून तो पाखंडी आहे असे ठरविण्याचे काम चौकशी समितीकडे किंवा न्यायसभेकडे असे. पाखंडी व्यक्तीची मालमत्ता जप्त करण्यात येत असे. ती त्याच्याबद्दल माहिती देणाऱ्यांमध्ये चौकशी करणाऱ्यांमध्ये, चर्च मध्ये वाटली जात असे.

प्रबोधनाच्या नवीन मनोवृत्तीत कारणाशिवाय कोणतीही गोष्ट स्वीकारली जात नव्हती. अर्थातच त्या काळात असे काही लोक होते की ज्यांनी चर्चच्या न पटणाऱ्या गोष्टी मान्य केल्या नाहीत. इ. स. १५१७ मध्ये जर्मन धर्म गुरु मार्टिन ल्यूथरने कॅथॉलिक चर्चच्या अधिकाराला व प्रभुत्वाला आव्हान दिले. त्यालाच धर्मसुधारणा म्हणतात. या अशा धर्मसुधारणांमुळे ख्रिश्चन धर्मात प्रॉटेस्टन्ट व रोमन कॅथॉलिक असे दोन पंथ निर्माण झाले.


आकृती ३.२ : मार्टिन ल्युथर

धर्म सुधारणांमुळे फार थोडी धार्मिक उन्नत्ती होऊन धर्माचे पुनरुज्जीवन झाले. कॅथॉलिक चर्चमध्येही सुधारणा चळवळ सुरु झाली. ही परिस्थिती ख्रिश्चन धर्मातील प्रतिचळवळ म्हणून ओळखली जाते. स्पेनमध्ये इग्नेशियस लॉयलने सोसायटी ऑफ जिझस या संस्थेची स्थापना करून या चळवळीची सुरुवात केली. या चळवळीत परमेश्वराची सेवा, धर्मादाय सेवा, शुद्धता आणि सेवाभावी कार्य यावर भर दिला जातो. प्रॉटेस्टन्टांच्या चळवळीस मार्टिन ल्यूथरने सुरुवात केली. ती युरोपमध्ये

इतर देशांमध्येही पसरली. त्यासाठी इंग्लंडचा राजा आठवा हेन्री, उल्‌रिघ झ्विंगली, जॉन केव्हिन यांनीही परिश्रम केले.

मार्टिन ल्यूथरने खालील गोष्टी केल्या. त्यामुळे चर्चमध्ये सुधारणा झाली.

१) चर्चवर आंधळी श्रद्धा ठेऊन मुक्ती मिळत नाही, तर येशूवर श्रद्धा ठेवल्यामुळेच मुक्ती मिळते.

२) बायबल हाच अधिकृत धर्मस्त्रोत आहे.

## पाठांतर्गत प्रश्न ३.१

१. रिकाम्या जागा भरा.

अ) माणसाच्या सकारक कार्यपद्धतीवर .............. विश्वास होता.

ब) इग्नोशियस लॉयलने ............. स्थापना केली.

२. सामंतशाही म्हणजे काय? तिची दोन वैशिष्ट्ये सांगा.

३. प्रबोधनाच्या मुख्य संकल्पना कोणत्या?

४. मार्टिन ल्यूथरने केलेल्या कोणत्या दोन गोष्टींमुळे चर्चमध्ये सुधारणा झाली?

## ३.४ विज्ञानाचा विकास :

प्रबोधनाच्या काळात शास्त्राच्या क्षेत्रात असामान्य शोध लागले. आपल्याला माहितच आहे की, प्रबोधनकारांनी नुसत्या विश्वासाऐवजी कारणांवर अधिक भर दिला. त्यांनी अंधश्रद्धा व रुढी, परंपरा यांना नकार देऊन शास्त्रशुद्ध विचारांवरील निष्ठांना महत्त्व दिले. निरीक्षण व प्रयोग यांच्यामुळे ज्ञान प्राप्त होते यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे शास्त्रीय कारणपरंपरा शोधण्याच्या प्रक्रियेचे पुनरुज्जीवन झाले. त्यापूर्वी काही शतकात ती बंदिस्त होती.

लिओनार्दो द व्हिन्सी या विख्यात चित्रकाराने शरीररचनेची व मानवी अवयवांची प्रमाणबद्ध चित्रे काढली. ही प्रमाणबद्ध चित्रे म्हणजे कला आणि विज्ञान या दोन्ही शाखांचा संगमच होय. त्याच कालावधीत शरीररचनाशास्त्र आणि वैद्यकशास्त्र यात महत्त्वाचे शोध लागले. स्पॅनिश डॉक्टर मायकेक सर्व्हेरसने रक्ताभिसरण क्रिया शोधून काढली. इंग्लिश डॉक्टर विल्यम हार्वेने रक्तशुद्धीकरणात आणि रक्ताभिसरणात हृदयाचे स्थान काय हे शोधून काढले. या काळातील शास्त्रज्ञांनी निरीक्षण आणि प्रयोग या जोरावर विद्वान विषयातील प्रगतीचा मार्ग खुला केला. त्यामुळे विज्ञानाखेरीज इतर विषयांमध्येही प्रयोग होऊ लागले.


प्रबोधन काळातील सर्वात लक्षणीय देणगी म्हणजे खगोलशास्त्रातील निरनिराळे असामान्य शोध होत. त्या काळात अत्यंत प्रज्ञावान खगोल-शास्त्रज्ञ होऊन गेले. कोपर्निकस, केपलर, गॅलिलिओ हे ते शास्त्रज्ञ होते. त्यांनी पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे शोधून काढले व सिद्ध केले.

कोपर्निकसने आपल्या ऑन द रेव्होल्युशन ऑफ द हेवनली स्फिअर या पुस्तकात असे प्रतिपादन केले की पृथ्वी व इतर ग्रह सूर्याभोवती समकेंद्रक (एकच केंद्र) असलेल्या वर्तुळात फिरत असतात. कोपर्निकसचा हा सिद्धांत जरी अपूर्ण असला तरी त्यामुळे शास्त्रशुद्ध विचार करणे, कारणे शोधणे ही प्रक्रिया सुरू झाली. केपलरने या सिद्धांतात भर टाकून असे मत मांडले की सूर्यापासूनच्या अंतरानुसार ग्रहांचे सूर्याभोवती फिरण्याचे वेग निरनिराळे असतात. पृथ्वी आणि इतर ग्रह सूर्याभोवती दीर्घवर्तुळाकार मार्गावरून फिरतात. त्याने असाही सिद्धांत मांडला की सूर्य व इतर ग्रह यातील चुंबकीय आकर्षणामुळे आपला आकार व आपली भ्रमण कक्षा कायम ठेवतात. त्यानंतर याच अनुमानावर आयझॅक न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा नियम मांडला. प्रबोधनाच्या आधीच्या काळात सूर्य पृथ्वीभोवती फिरतो असे मानले जात होते. त्याविरुद्ध बोलणाऱ्यास पाखंडी ठरवून धर्म बहिष्कृत केले जात असे. गॅलिलिओने स्वत:च एक दुर्बिण बनविली होती. तिच्या सहाय्याने गॅलिलिओने गुरु या ग्रहाचे चंद्र, शनीची कडी व सूर्यावरील डाग शोधले. त्याने कोपर्निकसचे सर्व शोध सत्य आहेत हे सांगितले.

प्रबोधनामुळे युरोपियन लोकांच्या मनात इतर देश आणि त्या देशात राहणारे लोक याबद्दल औत्सुक्य निर्माण झाले. हे कसे घडले ते आता आपण पाहू.

## ३.५ नवीन भूप्रदेशांचा शोध :

प्रबोधनकाळातील चौकस वृत्तीमुळे युरोपियन लोकांच्या मनात इतर भूप्रदेश व लोक यांच्याबद्दलचे कुतूहल वाढले. या कुतूहलामुळे आणखी साहस करण्यास तसेच नवीन भूप्रदेशांचे शोध लावण्यास उत्तेजन मिळाले. या सर्व शोधांच्या मागे देव, वैभव व सोने प्राप्त करणे हा मुख्य हेतू होता, असे म्हटले जाते. असे असले तरी सोने मिळविणे किंवा आर्थिक गरज हा महत्त्वाचा हेतू होता. भौगोलिक शोधांच्या अगोदर युरोपियन लोक मसाल्याचे पदार्थ, कापूस, मौल्यवान रत्ने, रेशीम इत्यादी वस्तू जगाच्या पूर्वेकडील प्रदेशांतून मिळवित असत. परंतु त्यांना अरब व इस्लामी प्रदेशातून प्रवास करावा लागत असे. त्यानंतर त्यांना या वस्तूंचा पुरवठा करता येत असे. हा व्यापार फायदेशीर नव्हताच पण अनिश्चित स्वरूपाचा होता. म्हणून आग्नेय आशियाकडे येण्यासाठी सरळ जलमार्ग शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कारण त्या मार्गाने व्यापार केल्यास तो भरपूर व फायदेशीर व्यापार होता. साहसी प्रवाशांना नवीन प्रदेशातील लोकांचे ख्रिश्चन धर्मात परिवर्तन करण्यासही उद्युक्त करण्यात आले. त्यांना असेही समजाविण्यात आले की असे करण्यामुळे ती देवाची सेवा होईल. नवीन प्रदेशांचा शोध लावल्यामुळे कीर्ती व प्रसिद्धी मिळते, अशी या साहसी प्रवाशांना आशा वाटत होत. त्यांच्यापैकी काही खरोखरच प्रसिद्ध झाले. आपल्याला माहीतच आहे की, वास्को-द-गामाने भारताकडे येण्याचा जलमार्ग शोधला. कोलंबस हा भारताकडे येण्यासाठी निघाला, परंतु त्याने अमेरिकेचा शोध लावला. मॅगेलिन, बार्थोलोम्यु डायस हे जलमार्गाचे साहसी प्रवासी प्रसिद्ध झाले.



आकृती ३.३ : वास्को द गामा

टिपा

या प्रमुख साहसी वीरांना व प्रवाशांना राजांनी आणि श्रीमंत लोकांनी आर्थिक पाठबळ दिले. त्यापैकी सर्वात प्रसिद्ध पोर्तुगीज राजा हेन्री याने या प्रवाशांना आर्थिक पाठबळ दिले. हा राजा नाविक हेन्री म्हणूनही प्रसिद्ध होता. या नवीन प्रदेशांचे शोध हे कंपास, ॲस्ट्रोलॅब, खगोलशास्त्रीय तक्ते, नकाशा तयार करणे या बाबतीतील शोधांवर आधारलेले होते. हे शोध नाविकांना फारच उपयुक्त होते.

या प्रवासांचे परिणाम दूरगामी होते. त्यामुळे परदेशात व्यापारी वसाहती स्थापन केल्या गेल्या आणि आफ्रिका, आशिया आणि अमेरिका या खंडांमध्ये साम्राज्ये स्थापण्यात आली. पूर्वी भूमध्य समुद्रापुरताच मर्यादित असणारा व्यापार अटलांटिक समुद्रावरूनही होऊ लागला. तंबाखू, काकवी, शहामृगाची पिसे, बटाटे इ. नवीन वस्तूंचाही व्यापार होऊ लागला. अमेरिकेमध्ये तर गुलामांचाही व्यापार होऊ लागला. आफ्रिकेमधून गुलाम खरेदी करून त्यांना उत्तर अमेरिकेतील मळ्यांमध्ये काम करण्यासाठी नेत असत. मळ्याचे मालक हे गुलाम खरेदी करत असत.


व्यापारातील फार मोठी वाढ, वसाहतवाद यांचा युरोपातील संपत्तीच्या वाढीवर फार मोठा परिणाम झाला. युरोपियन व्यापाऱ्यांनी प्रचंड संपत्तीचा साठा एकत्रित केला होता. त्यामुळे त्यांनी नवीन यंत्रांच्या विकासासाठी त्याचा उपयोग केला. यामुळेच औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली. यामुळे व्यापारी अधिक प्रबळ आणि अधिक श्रीमंत झाले.

### आपल्यासाठी एक उपक्रम ३.२

जगाचा नकाशा घ्या. जगाच्या नकाशात वास्को-द-गामा, फर्डिनंड मॅगेलन आणि ख्रिस्तोफर कोलंबस यांनी ज्या मार्गाने प्रवास करून नवीन भूप्रदेश शोधले, ते मार्ग दाखवा.

## ३.६ औद्योगिक क्रांती :

इ. स. १७५० मध्ये इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरवात झाली. इंग्रज व्यापाऱ्यांनी परदेशात व्यापार करून प्रचंड संपत्ति जमा केली होती आणि त्यांनी वसविलेल्या वसाहतींकडून कच्च्या मालाचा खात्रीशीर पुरवठा त्यांना होत होता. तयार मालासाठीसुद्धा याच वसाहती खात्रीशीर गिऱ्हाईक होत्या. याखेरीज उद्योगधंद्यासाठी अत्यावश्यक असणारा कोळसा आणि खनिज लोखंडाचा प्रचंड साठा इंग्लंडमध्ये होता. म्हणून भांडवलदारांनी उत्पादनवाढीसाठी नवीन यंत्रसामग्री बनविण्यासाठी पैसा खर्च केला. त्यातून अधिक नफा मिळावा हीच त्यांची इच्छा होता. आता उत्पादन क्षेत्रात माणसाची जागा यंत्राने घेतली आणि समाजात मोठा बदल झाला. त्यामुळे समाज असंतुलित होऊन समाजात दोन वर्ग निर्माण झाले. पहिला वर्ग भांडवलदारांचा (बोर्गेओसी) व दुसरा वर्ग कामगारांचा (प्रोलेटरिएट) त्यांना अनुक्रमे बोर्गे ओसी व प्रोलेटरिएट म्हणत. पुढील पाठात आपण औद्योगिक क्रांतिविषयी सविस्तर माहिती पाहू.



टिपा

## पाठांतर्गत प्रश्न ३.२

१. योग्य पर्याय निवडा.

अ) भारताकडे येण्याचा जलमार्ग कोणी शोधला?

१) बार्थोलेम्यू डायस    २) वास्को द गामा

३) कोलंबस    ४) यापैकी कोणीही नाही.

ब) खालीलपैकी भूप्रदेशाच्या शोधासाठी उपयुक्त नसलेले कारण कोणते?

१) आशिया व आफ्रिकेत वसाहतींची स्थापना

२) युरोपीय व्यापाराची वाढ

३) वसाहतीच्या उत्कर्षाचा उदय

४) गुलामांच्या व्यापाराची सुरुवात

२. प्रबोधनामुळे विज्ञानात झालेले दोन बदल सांगा.

३. इंग्रजांना नवीन समुद्रमार्ग शोधण्यासाठी ज्या शोधांची मदत झाली, असे तीन शोध सांगा.

४. औद्योगिक क्रांतीमुळे समाजात झालेला मोठा बदल कोणता?

## ३.७ क्रांतीचे युग :

इ. स. १८४८ मध्ये झालेल्या युरोपियन क्रांतिमुळे राजकारणात प्रचंड बदल घडून आला आणि प्रस्थापित शासन व्यवस्थेला विरोध होऊ लागला. प्रजा राजकीय पुढाऱ्यांवर अतिशय नाराज होती आणि ती सत्तेत प्रत्यक्ष वाटा मागत होती. मुद्रणालयांमधून बाहेर पडणाऱ्या छापील मजकुरामुळे राजकीय जागृती झाली होती. स्वतंत्रता, समानता आणि बंधुता यांचीही ओळख छापील मजकुरामुळेच झाली होती. ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली आणि रशिया या देशांमध्ये अगोदरच क्रांति होऊन गेली होती. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर अमेरिकन गणराज्य अस्तित्वात आले होते आणि रशियामध्ये आणले होते. या चळवळींमुळे लोकांमध्ये स्वातंत्र्यावद्दल आस्था निर्माण झाली. या सर्व क्रांतीकारी चळवळींची माहिती आपण घेऊ.

### ३.७.१ वैभवशाली राज्यक्रांती (The Glorious Revolution) :

जगातील सर्वच देशांमध्ये क्रांतिचा झेंडा फडकण्याच्या कितीतरी आधी म्हणजे इ. स. १६८८ मध्ये खुद्द इंग्लंडमध्ये क्रांती झाली. या क्रांतिचे नाव ' वैभवशाली राज्यक्रांती. या क्रंतिला हे नाव देण्याचे कारण असे की क्रांती यशस्वी झाली. परंतु रक्ताचा एक थेंबही सांडला नाही. या क्रांतिमुळे जगात पुढे झालेल्या सर्व क्रांतीकार्यांना प्रेरणा मिळाली.

इंग्लंडचा राजा जेम्स दुसरा हा लोकांशी अतिशय उद्धटपणे वागला असे. त्याने वारेमाप खर्च करून सैन्य उभे केले होते. शासन, सैन्य आणि विद्यापीठे यातील नोकऱ्यासुद्धा तो शक्यतो रोमन कॅथॉलिक लोकांनाच देत असे. त्यामुळे जनतेमध्ये त्याच्याविरुद्ध असंतोष होता. इंग्लंडच्या संसदेने राजा जेम्स दुसरा याला गादीवरून हटविले आणि त्यांनी त्याची मुलगी मेरी दुसरी आणि तिचा नवरा विल्यम तिसरा, प्रिन्स ऑफ ऑरेंज यांच्या हाती राज्यकारभार दिला. जेम्स दुसरा याच्या अनियंत्रित कारभाराऐवजी घटनात्मक शासनव्यवस्था अस्तित्वात आली. यावरून संसद राजाला सुद्धा बदलू शकते, हे सिद्ध होते.

### ३.७.२ अमेरिकन राज्यक्रांती :

आपण आजच्या काळात जे राजकीय हक्क उपभोगत आहोत, ते आपणास १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात झालेल्या दोन राज्यक्रांत्यांचे फलित आहे, हे ऐकून आपणास नवल वाटेल. या राज्यक्रांत्यां म्हणजे अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती होय. आधुनिक जगाचा चेहरामोहरा ठरविण्यामध्ये या दोन राज्यक्रांत्यांचा मोठा वाटा आहे. या राज्यक्रांत्यामुळेच लोकांचे शोषण थांबले आणि त्यांना हक्क मिळाले.

इ. स. १६ व्या शतकानंतर युरोपियन लोकांनी अमेरिकेत स्थायिक होण्यास सुरुवात केली. याच सुमारास ब्रिटन व फ्रान्स या देशातील नवे जग म्हणून ओळखले जाणाऱ्या अमेरिकेत बऱ्याच प्रमाणात लोकांनी स्थलांतर करण्यास सुरुवात केली. कारण त्यांना धार्मिक बंधनातून सुटका करून घ्यायची होती. तसेच त्यांना आर्थिक विकासाच्या संधीचाही लाभ घ्यायचा होता. त्यानंतरच्या काळात अमेरिकेत इंग्लंडची परकीय सत्ता तेथे प्रस्थापित झाली. उत्तर अमेरिकेत तेरा वसाहती होत्या. स्थानिक पातळीवर स्थानिक समस्यांसाठी, नियम कायदेकानून यासाठी स्थानिक समिती प्रत्येक वसाहतीत होती. या वसाहती त्यांचा मातृदेश इंग्लंडच्या बाबतीत समाधानी नव्हत्या. कारण त्या वसाहतींच्या संदर्भातील इंग्लंडचे कायदे वसाहतींच्या आर्थिक हितसंबंधांच्या विरोधात होते. म्हणून त्या वसाहतींनी ब्रिटिशांच्या वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी स्वातंत्र्ययुद्ध केले.

अमेरिकेकडे एक बाजारपेठ म्हणून व कच्च्या मालाचा पुरवठा करणारा प्रदेश म्हणून पाहिले जात होते. अमेरिकेतील तंबाखू, कापूस, नीळ इत्यादी माल इंग्लंडलाच निर्यात करण्याची अमेरिकेवर सक्ती केली जात असे. अमेरिकन वसाहतवाल्यांना लोह उद्योग, लोकरी मालाच्या वस्तू, कापड उद्योग इत्यादी काही निश्चित उद्योगधंदे सुरू करण्यावर इंग्लंडने बंदी घातली होती. कारण या उद्योग धंद्याबाबतीत ब्रिटनला स्पर्धेस तोंड द्यावे लागू नये, असा त्यामागचा हेतू होता.

१८ व्या शतकात इंग्लंडला फ्रेंचांविरुद्धचा लढा आणि भारतातील स्थानिक लोकांबरोबरचे लढे यासाठी पैशाची अत्यंत गरज होती. त्यासाठी ते अमेरिकन वसाहतींवर कर लादून पैसा जमा करत होते. इ. स. १७६५ मध्ये इंग्लंडच्या संसदेने स्टॅम्प ॲक्ट ला मान्यता दिली. हा कायदा अमेरिकेवर लादल्यामुळे अमेरिकेतील सर्वच व्यापारी करारांवर, व्यवहारांवर, गहाणखातांवर आणि वर्तमानपत्रांवर स्टॅम्प ड्युटी देणे सक्तीचे केले. या करातून मिळणारे उत्पन्न अमेरिकेमध्ये ठेवण्यात आलेल्या दहा हजार ब्रिटिश सैनिकांसाठी खर्च करण्यात आले. या कराला सर्वच थरातून प्रचंड विरोध झाला. वसाहतीमधील बंदरे असलेल्या शहरात दंगली उसळल्या. इंग्लंडच्या संसदेवर दबाव आणला. त्यामुळे हा कर रद्द झाला असे असूनही इंग्लंडने चहावर हा कर कायम ठेवला. १६ डिसेंबर १७७३ मध्ये बोस्टन या बंदरात थांबलेल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या जहाजावर काही क्रांतिकारक रेड इंडियन लोकांचे पोशाख घालून

चढले आणि त्यांनी जहाजावरील चहाच्या पेट्या समुद्रात फेकून दिल्या. ही घटना बोस्टन टी पार्टी म्हणून प्रसिद्ध आहे. इंग्लंडच्या संसदेने बोस्टन हे बंदर बंद केले. परंतु ती घटना अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाची नांदी ठरली.

इ. स. १७७४ मध्ये तेरा वसाहतींच्या प्रतिनिधींची फिलाडेल्फिया येथे पहिली अमेरिकन काँग्रेस भरली आणि वसाहतीतील लोकांच्या संमतीशिवाय कर लादले जाऊ नयेत, अशी विनंती त्यांनी इंग्लंडच्या राजाला केली. परंतु इंग्लंडने हे बंड आहे असा त्याचा अर्थ लावला आणि युद्ध घोषित केले. हे युद्ध झाले आणि इंग्लंडला हरवून वसाहतीच्या प्रतिनिधींनी ४ जुलै १७७६ या दिवशी फिलाडेल्फिया येथे भरलेल्या काँग्रेसमध्ये इंग्लंडपासून वेगळे होऊन स्वातंत्र्य जाहीर केले आणि वसाहत संघराज्य स्थापन केले. यालाच स्वातंत्र्याचा जाहीरनामा असे म्हणतात. या जाहीरनाम्यामुळे संपूर्ण जगाला समता, जगण्याचा हक्क, स्वातंत्र्य आणि समाधानी वृत्ती मागण्याचा हक्क प्राप्त झाला. हक्क विधेयकामुळे व्यक्ती स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, वृत्त स्वातंत्र्य न्याय मागण्याचा हक्क स्वातंत्र्य मिळाले.

अमेरिकन स्वातंत्र्य लढयामुळे तेरा वसाहती इंग्लंडपासून स्वतंत्र झाल्या आणि त्यांनी संयुक्त संस्थाने अमेरिका (United States of America) या अत्यंत प्रबल राष्ट्राला जन्म दिला.

### आपल्यासाठी एक उपक्रम ३.३

अशी कल्पना करा की तुम्ही बोस्टन टी पार्टी ही घटना घडताना घटना स्थळी वार्ताहर म्हणून उपस्थित आहात. तुम्ही इस्ट इंडिया कंपनी अधिकाऱ्यांच्या, पार्टीत प्रत्यक्ष भाग घेतलेल्या क्रांतिकारकांच्या आणि घटना पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. या तिघांचे दृष्टिकोन स्पष्ट करणारे वार्ता पत्र तयार करा. त्यावर आपलेही मत मांडा.

### ३.७.३ फ्रेंच राज्यक्रांती :

१८ व्या शतकामधील फ्रान्समध्ये सामंतशाही अस्तित्वात होती आणि राजा हा सार्वभौम सत्ताधारी होता. समाज तीन वर्गात विभागला गेला होता. पहिला वर्ग धर्मगुरूंचा, दुसरा वर्ग सरदारांचा होता. या दोन वार्गांना अनेक सवलती होत्या. त्यांना अनेक कर माफ होते. समाजात उच्च स्थान होते. तिसरा वर्ग सामान्य लोकांचा म्हणजे शेतकरी, कामगार आणि मध्यम वर्ग होता. त्यांच्यावर करांचे जबरदस्त ओझे होते.

फ्रान्सची अंतर्गत सामाजिक व राजकीय स्थिती क्रांतीसाठी अतिशय पोषक होती. फ्रान्सचा राजा सोळावा लुई आणि राणी मेरी अँटोनेट यांच्या विलासी राहणीमुळे फ्रान्सचा खजिना रिता झाला होता. फ्रान्सचे दिवाळे निघाले होते. इ. स. १७८९ मध्ये सोळाव्या लुईला तीनही वर्गातल्या प्रतिनिधींची (धर्मगुरु, सरदार आणि सामान्य लोक) सभा बोलावणे भाग पडले. सभेमार्फत त्याला नवीन करांसाठी मंजूरी घ्यावयाची होती. परंतु तिसऱ्या वर्गाच्या प्रतिनिधींनी समान कर पद्धतीची आणि पहिल्या दोन वर्गाच्या सवलती रद्द करण्याची मागणी केली. शेवटी तिसऱ्या वर्गाने स्वत:ला सार्वभौम संसद म्हणून जाहीर केले आणि राजाचे अधिकार स्वत:कडे घेतले. हा ऐतिहासिक दस्तऐवज व्यक्ती व नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा म्हणून प्रसिद्ध आहे. नंतर इ. स. १७९१ मध्ये तयार करण्यात आलेल्या फ्रान्सच्या घटनेमध्ये हा जाहिरनामा घटनेची प्रस्तावना म्हणून वापरण्यात आला आहे. या जाहिरनाम्यावर

अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्याचा प्रभाव होता. या जाहीरनाम्याने कायद्यापुढे सर्व व्यक्ती समान, समाजाचे सार्भौमत्व, स्वातंत्र्य, मालमत्ता, सुरक्षा, शिक्षण, भाषणस्वातंत्र्य, माहितीस स्वातंत्र्य, गरजूंना शासकीय मदत, गुलामगिरी आणि अत्याचार यावर बंदी, शासनप्रतिनिधी निवडीचे स्वातंत्र्य, सर्वांना शासकीय सेवेत मुक्त प्रवेश हे सर्व मान्य करण्यात आले.

इ. स. १७८९ पासून फ्रान्समध्ये सतत पंधरा वर्षे यादवी चालू होती. त्यातूनच फ्रान्स प्रजासत्ताकाचा जन्म झाला. फ्रान्सच्या क्रांतीने युरोपची मध्ययुगीन समाजरचना मोडीत काढली आणि रष्ट्राच्या आणि स्वातंत्र्याच्या नवीन कल्पना जगापुढे मांडल्या. फ्रान्स देशात तर शासन, प्रशासन, सैन्यव्यवस्था, समाज, संस्कृती या सर्वच क्षेत्रात अमूलाग्र बदल झाले. नेपोलियन बोनापार्टच्या अधिपत्याखाली फ्रान्स देश प्रजासत्ताक झाला. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही मूलभूत तत्वे अंमलात आणली.

या क्रांतीचा वैचारिक पाया फ्रेंच तत्वज्ञ वॉल्टेअर, मॉंटेस्न्यू रुसो या प्रतिभावंतांनी घातला.

अमेरिकन राज्यक्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांती यांनी संपूर्ण जगात राष्ट्रवादाची ज्योत पेटविली. अमेरिकन, फ्रान्स आणि ब्रिटन राष्ट्रवादामुळे इटालील प्रेरणा मिळाली. त्याचा परिणाम इ. स. १८६१ मध्ये इटलीचे एकीकरण होण्यात झाला.

## आपल्यासाठी एक उपक्रम ३.४


खाली फ्रान्स आणि अमेरिकेच्या राष्ट्रध्वजाची चित्रे छापली आहेत. फ्रान्सच्या राज्यक्रांतीत आणि अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धात या राष्ट्रध्वजांनी काय कामगिरी केली असेल?

ध्वजाच्या प्रत्येक रंगांमागील अर्थ समजावून घ्या.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आपल्या राष्ट्रध्वजाने अशी स्फूर्ती दिली असेल का? अमेरिकन राष्ट्र ध्वजातील ताऱ्यांची संख्या मोजा. तारे काय दर्शवितात? आजच्या अमेरिकन राष्ट्रध्वजातील ताऱ्यांची संख्या मोजा.



**आकृती ३.४ : फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळफ्रान्सचा राष्ट ध्वज**




**आकृती ३.५ : अमेरिकन स्वातंत्र्य लढ्याच्या काळातील अमेरिकेचा राष्ट्रध्वज**

### ३.७.४ इटलीचे एकीकरण :

१८ व्या शतकात इटली हा देश अनेक लहान लहान राज्यात विभागला गेला होता. प्रत्येक राज्याला स्वतंत्र राजा आणि स्वतंत्र शासनव्यवस्था असे व्हेनेशिया, सिसिली, पापल, सीर्डिनिया टुस्कानी ही त्यापैकी काही राज्ये होत. मध्ययुगीन काळात धर्मगुरू पोपने आपला प्रभाव धार्मिक तसेच राजकीय क्षेत्रातदेखील वाढविला. पापल या राज्यात पोपने स्वत:ची शासन व्यवस्था निर्माण केली. लवकरच इटलीचे महत्त्व वाढू लागले आणि इटली राजकारण, अर्थ आणि परदेश व्यापार यांचे केंद्र बनले. प्रबोधनकाळात इतर देशांपेक्षा इटलीचे महत्त्व अधिकच वाढले. इटलीचा ताबा मिळविण्यासाठी फ्रान्स आणि रोमन साम्राज्य यात बरेच दिवस युद्ध चालले. इटलीच्या इतिहासात इ. स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीला फार महत्त्वाचे स्थान आहे. इटलीमधील राज्यकर्त्यांना स्वत:च्या प्रजेची भीती वाटत असल्याने त्यांनी फ्रान्सचे शत्रू असलेल्या राजघराण्याशी मैत्री केली. जेव्हा फ्रान्स हे राष्ट्र प्रजासत्ताक झाले, यावेळी संपूर्ण इटलीभर इटली प्रजासत्ताक व्हावे, यासाठी संघटना स्थापन झाल्या. इ. स. १८१४ मध्ये नेपोलियन बोनापार्टचा युरोपियन देशांनी पराभव केला; तेव्हा इटलीमधील लोकसुद्धा बाह्यशक्तींपासून मुक्त असा एकसंघ इटली व्हावा, याबाबत आशावादी होते.

एकसंघ इटली करण्यासाठी मॅझिनी, गॅरीबाल्डी यांच्यासारखे क्रांतिकारक आणि इटली प्रजासत्ताक व्हावा यासाठी प्रयत्न करणाऱ्या संघटना काम करीत होत्या. इ. स. १८४९ पासून राजा व्हिक्टर इम्यॅनुएल याच्या अधिपत्याखाली असलेले पिडमाऊंट सार्डिनिया हे राज्य इटलीच्या एकीकरणासाठी झटत होते. त्यामुळे एकीकरणाची प्रक्रिया राजा व्हिक्टर इमॅन्युएल याच्याच हस्ते संपन्न झाली. याच्याच मार्गदर्शनाखाली कावूर या पंतप्रधानाने लोंबार्डी, तुस्कानी, मोडेना या प्रांतातून ऑस्ट्रियन बाहेर काढले. गॅरीबाल्डीने बंड केले आणि सिसिली व नेपल्स ही राज्ये स्वतंत्र केली. त्याने ही दोन राज्ये इमॅनुएलच्या हवाली केली. आणि त्याला इटलीचा राजा असे घोषित केले. त्यानंतर रोम आणि व्हेनेशिया ही दोन राज्ये इटलीयन् संघराज्यात सामिल झाली. इटलीच्या एकीकरणाची प्रक्रिया इ. स. १८१५ मध्ये व्हिएन्ना काँग्रेसमध्ये सुरू झाली आणि इ.स. १८७१ मध्ये झालेल्या प्रुशियन युद्धाने समाप्त झाली.

### ३.७.५ जर्मनीचे एकीकरण :

इ. स. १८१५ मध्ये नेपोलियनचा पराभव झाला. अनेक जर्मन लोकांची जर्मनी हा देश स्वतंत्र व्हावा, अशी प्रबळ इच्छा होती. जर्मन हा देश ३९ प्रांत एकत्र येऊन तयार झालेले संघराज्य होते. या संघराज्याचे नेतृत्व ऑस्ट्रिया आणि प्रुशिया हे दोन प्रांत करीत. हे प्रांत नेहेमी परस्परांशी कोणत्याही कारणावरून युद्धे करीत. त्यामुळे जर्मनीची आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावलेली होती. प्रुशियाचा

राजा कैसर विल्यम एक याने पंतप्रधान बिस्मार्कची नेमणूक जर्मनीच्या एकीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी केली. एकत्रित जर्मनीमधून ऑस्ट्रिया आणि फ्रान्स यांना वगळले होते. एकत्रित जर्मनी प्रुशियन नेतृत्वाखाली अंमलात येणार होता. बिस्मार्क हा शूर आणि निधड्या छातीचा होता. त्याचे एकसंघ जर्मनी हे स्वप्न होते. त्यासाठी त्याने त्याचे सैन्यदल आधुनिक शस्त्रांनी सुसज्ज केले. कर वसुली करताना त्याने संसदेचा सल्लासुद्धा धुडकावून लावला. त्याची राज्यनीती रक्त आणि लोखंड (श्रम आणि धन) अशी होती. म्हणून त्याला लोखंडी देशप्रमुख असे म्हणत असत. अत्याधुनिक सैन्याचा प्रमुख असणाऱ्या बिस्मार्कने इलेसविग आणि हेलास्टिन या प्रांतातील जर्मन लोकांना त्या प्रांतांचे मालक असलेल्या इटलीविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त केले.



आकृती ३.६ : ऑटो व्हॉन बिस्मार्क

इ. स. १८६४ बिस्मार्कने ऑस्ट्रिया बरोबर तह करून शत्रू राष्ट्र असलेल्या डेनमार्कला धक्का दिला. परंतु यानंतर बिस्मार्कचा रोख ऑस्ट्रियाकडेच होता. प्रुशियाने ऑस्ट्रियाचा पराभव केला आणि उत्तर जर्मन संघराज्य तयार केले. बिस्मार्कने इटली बरोबर तह केला आणि व्हेनिस शहराची मालकी देण्याचे कबूल केले. त्यामुळे इटलीने युद्धात भाग घेतला नाही. ऑस्ट्रियावर व्हेनिस शहर इटलीला देण्याची सक्ती करण्यात आली. त्यामुळे ऑस्ट्रियाचे इटलीवरील वर्चस्व संपुष्टात आले. तसेच त्याने फ्रान्सच्या नेपोलियन तिसरा याला राज्य देण्याचे कबूल केले. त्यामुळे तोही युद्धात तटस्थ राहिला. पोलंडचे वर्च स्व असलेल्या रशियन प्रदेशातील बंड शमवून त्याने रशियाचासुद्धा पाठिंबा घेतला.

प्रुशियाचे जर्मनीवर वर्चस्व घेण्याला दक्षिण जर्मनीमधील चार राज्यांचा विरोध हा मोठा अडथळा होता. तसेच फ्रान्सचा नेपोलियन तिसरा यालाही ते मान्य नव्हते. त्यामुळे फ्रान्सने प्रुशियावर चढाई करण्याचे ठरविले. परंतु १८७१ मध्ये प्रुशियानेच फ्रान्सवर चढाई केली आणि थोड्याच कालावधित फ्रान्सचा बराभव केला. नेपोलियन तिसरा याने पदत्याग केला आणि फ्रान्सला अलसेस आणि लोरेन या प्रांतांवरचे अधिकार सोडावे लागले. ऑस्ट्रियाखेरीज उरलेले जर्मन प्रांत एकच येऊन जर्मन संघराज्य तयार झाले. राजा कैसर विल्यम पहिला याच्या कारकीर्दीत एकसंघ जर्मनीचे स्वप्न साकार झाले. लवकरच जर्मनी युरोपमधील एक बलाढ्य राज्य बनले. जर्मनीने स्वत:चे आर्थिक हित लक्षात घेऊन आर्थिक साम्राज्य उभे केले व सर्व जगावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला.

### ३.७.६ समाजवादी चळवळ आणि रशियन राज्यक्रांती :

औद्योगिक क्रांतीमुळे समाजात विषमता निर्माण झाली. एका बाजूला गरीब, शोषित आणि हक्कांपासून वंचित कामगार वर्ग तर दुसऱ्या बाजूला सर्व सुखसोयी उपभोगणारे भांडवलदार अशी समाजाची दोन स्तरात विभागणी झाली. सामाजिक व आर्थिक बाबतीत समानता हाच पाया असलेला समाज निर्माण करावा, असा काही लोक विचार करू लागले. समता, स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, लोकशाही या संकल्पनामुळे या विचारास चालना मिळाली. सामाजिक समानता असणारी समाजवादी समाजाच्या निर्मितीची कल्पना मूळ धरू लागली. समाजवादाची अतिशय स्पष्ट आणि परिणामकारक संकल्पना कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंजल्स यांनी मांडली. कार्लमार्क्सने त्याच्या दास कॅपिटल या ग्रंथात असे

प्रतिपादन केले की ऐतिहासिक काळातील सर्व समाजाचा इतिहास हा वर्ग युद्धांचा इतिहास आहे. त्याने सांगितले की भांडवलदार नेहमीच आपला नफा वाढविण्यासाठी कामगाराचे वेतन कमी करतात. यातूनच वर्ग संघर्षाची ठिणगी पडते. या संघर्षात भांडवलशाहीचा अस्त होऊन समाजवादाचा उदय होईल, असे मार्क्सने सांगितले. त्याच्या सांगण्यानुसार समाजवादामध्ये उत्पादनसाधनांची मालकी शासनाच्या हाती असते आणि सामाजिक समानता असणाऱ्या समाजाची निर्मिती होते.

या सिद्धांताचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे रशियन राज्यक्रांती या क्रांतीमुळे रशियात जगातील पहिले समाजवादी शासन अस्तित्वात आले. रशिया औद्योगिकदृष्ट्या अतिशय मागासलेला होता. रशियाची अर्थव्यवस्था संपूर्णपणे शेतीवर अवलंबून होती. रशियन सम्राट झार हा अतिशय आत्मकेंद्रीत आणि अमानुष राज्यकर्ता होता. त्यामुळे शेतकरी आणि कामगार वर्गाची अतिशय पिळवणुक होत असे. इ. स. १९०५ मध्ये रशियामध्ये झालेल्या क्रांतीमुळे वैधानिक राजसत्ता अस्तित्वात आली आणि संसद (ड्युमा) अस्तित्वात आली. या संसदेचे सभासद शेतकऱ्यांचे प्रतिनिधी, नागरिकांचे प्रतिनिधी आणि सर्वसामान्यांचे प्रतिनिधी होते. १९०५ च्या क्रांतीमुळे मर्यादित प्रमाणावर हक्क आणि प्रतिनिधित्व दिले गेले. त्यामुळे असंतोष कायमच राहिला.

इ. स. १९१७ मध्ये रशियामध्ये दुसरी क्रांती झाली. क्रांती होण्याचे कारण रशियन शेतकऱ्यांची आणि कामगारांची स्थिती आणि विगर रशियन नागरिकांची स्थिती अत्यंत खालावलेली होती. या कालावधीत सम्राट झार निकोलस दुसरा याची निरकुंश सत्ता होती. कामगारांची पिळवणूक होत होती. त्यांच्या कामाच्या ठिकाणी परिस्थिती अत्यंत घाणेरडी होती. परंतु करांचे प्रमाण प्रचंड होते. लोकांना कोणतेही राजकीय अधिकार नव्हते. म्हणून जनता या राजवटीवर प्रचंड नाराज होती. त्यातच साम्राजशाहीचा फायदा मिळावा म्हणून रशियाने पहिल्या महायुद्धात भाग घेतला. परंतु त्या महायुद्धात भाग घेण्याइतकी



**आकृती ३.७ : पेट्रोग्राड या शहरातील दि. १८ जून १९१७ रोजी झालेली निदर्शने फलकावरील मजकूर ' दहा भांडवलदारी मंत्र्यांना काढून टाका, सर्व सत्ता कामगार आणि सैनिक आणि शेतकऱ्यांना प्रतिनिधींकडे आणि समाजवादी मंत्र्यांकडे द्या. सम्राट निकोलस दुसरा याची रवानगी पीटर्रपॉल किल्ल्यात करा.**

युद्धसामग्री रशियाकडे नव्हती. रशियन सैनिकांना सायबेरियन वाळवंटातील अत्यंत थंड वातावरणात राहण्यायोग्य पुरेसे उबदार कपडे नव्हते. तसेच लढण्यासाठी आवश्यक ती शस्त्रेदेखील नव्हती. त्यामुळे या युद्धात हजारो रशियन सैनिक मारले गेले. अनेक कुशल कामगारांना सक्तीने सैन्यात सैनिक म्हणून दाखल करण्यात आले आणि रणांगणावर पाठविण्यात आले. अननुभवी असल्याने त्यांची खूप मोठ्या प्रमाणावर हत्या झाली. सम्राट झार निकोलस दुसरा याच्या निरंकुश कारभारामुळे अमीर उमरावही त्याला कंटाळले होते. तशातच निसर्गाची अवकृपा झाल्याने दुष्काळ पडला. त्यामुळे शेतमजुरांनी दंगली आणि संप केले. संपकरी जनतेने, तुरुंग, न्यायालये आणि सरकारी कार्यालये यांच्यावर हल्ले केले. समाजाच्या सर्वच थरात प्रचंड असंतोष पसरला होता. शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचे (धान्याचे) योग्य भाव मिळत नव्हते. शहरात धान्यतुटवडा होता, सैनिकांकडे पुरेसा दारुगोळा नव्हता. तशातच सरकारने बेसुमार संख्येने रुबलच्या नोटा छापल्या त्यामुळे चलन फुगवटा वाढला.

मार्क्स आणि टॉलस्टॉय यांच्या लिखाणाचा लोकांवर विशेषत: कामगारवर्गावर फार प्रभाव पडला. त्यामुळे त्यांच्यामध्ये राजकीय जागृती निर्माण झाली. त्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडली. ही सर्व परिस्थिती सम्राट झारच्या हाताबाहेर गेली. त्यामुळे कामगारांची संसद तयार करण्यात आली. फेब्रुवारी १९१७ मध्ये सम्राट झार याला पदच्युत करण्यात आले. मेनशेविक पक्षातर्फे काळजी वाहू प्रशासनाची स्थापना करण्यात आली. परंतु शासन लोकांच्या मागण्या पूर्ण करू शकले नाही. ऑक्टोबर १९१७ मध्ये लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेविक पक्षाने सत्ता हातात घेतली. ऑक्टोबर राज्यक्रांती ही रशियन राज्यक्रांतीची शेवटची पायरी होती. यामुळे झारची सत्ता संपुष्टात आली आणि एक नवीन प्रबळ राष्ट्र (United States of Soviet Russia) – (USSR) उदयास आले आणि जगाची पुनर्रचना झाली.

पुढील पाठात तुम्ही औद्योगिककरण, साम्राज्यवाद जागतिक महायुद्धे यासंबंधी अभ्यास करणार आहात. औद्योगिकरणामुळे जगाचा चेहरा मोहरा कसा बदलला आणि जगातील सर्व समाजाच्या जीवनपद्धती किती अमूलाग्र बदल झाला हेही पाहणार आहात. उद्योगधंद्यात मागासलेल्या देशांवर औद्योगिककरणाचा काय परिणाम झाला आणि त्यामुळे असंख्य कलह कसे उत्पन्न झाले आणि त्याचे रुपांतर भयानक युद्धात कसे झाले हेही आपण पाहणार आहोत.

## पाठांतर्गत प्रश्न ३.३

१. **योग्य पर्याय निवडा.**

अ) अमेरिकेत किती वसाहती होत्या?

(१) १३ (२) १४ (३) १५ (४) १६

ब) खालीलपैकी कोणाचा समावेश थर्ड इस्टेटमध्ये होत असे?

(१) सरदार (२) धर्मगुरू

(३) सामान्य लोक (४) राजाचे नातेवाईक

क) जर्मनीचे एकीकरण कोणाच्या नेतृत्वाखाली यशस्वी झाले?

(१) काव्हूर (२) मॅझिनी (३) बिस्मार्क (४) गॅरीबाल्डी

२. इ. स. १६८८ मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या वैभवशाली क्रांतीमुळे पुढे झालेल्या सर्व क्रांतीकार्यांना प्रेरणा मिळाली. याचे स्पष्टीकरण ३0 शब्दात करा.

३. अमेरिकन स्वातंत्र्यलढा आणि फ्रेंच राज्यक्रांती यामधील दोन साम्यस्थळे सांगा.

४. रशियन राज्यक्रांतीची प्रेरणा समाजवादी समाजरचना होती याचे स्पष्टीकरण करा.

## आपणा काय शिकलो?

- सामंतशाही किंवा मध्ययुगीन युरोपातील परिस्थिती बदलली याची अनेक कारणे आहेत. ज्याप्रमाणे नगरे व शहरे यांची निर्मिती व्यापारीतील पुनरुज्जीवन किंवा नवीन बदल, शेतीच्या व्यापारीकरणाची वाढ, नवीन उदयाला येणाऱ्या व्यापारी वर्गाचे अस्तित्व ही त्यापैकी काही कारणे आहेत.

- युरोपात प्रवोधन सुमारे चौदाव्या शतकाच्या मध्यकाळात सुरू झाले. ग्रीक व रोमन संस्कृतीतील नवनिर्मिती, कला व साहित्यातील बदल, लोकांच्या विचारपद्धतीतील बदल याला कारणीभूत ठरते. मानवता व सुधारणावादी दृष्टीकोन ही त्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये होती.

- मानतावादाच्या कल्पनेने मानवांना उपयुक्त ठरणारे कार्य करण्यावर भर दिला. मानवतावाद्यांया दृष्टीने मानव, त्याचे कल्याण हा संशोधनाचा अभ्यासाचा विषय बनला.

- चर्चकडून होणारा भ्रष्टाचार, दुरुपयोग बाबतीत चर्चला प्रश्न किंवा जाब विचारण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे सुधारणा होय. जर्मनीतील मार्टिन ल्यूथरने सुधारणा सुरू केल्या. यामुळे ख्रिश्चन धर्मात कॅथॉलिक व प्रोटेस्टंट असे दोन पंथ निर्माण झाले.

- प्रबोधनाचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे सुधारणावादी व शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण झाला व आधुनिक शास्त्राची वाढ झाली. कोपर्निकस, केपलर, गॅलिलिओ व न्यूटन यांचे शास्त्राच्या क्षेत्रातील योगदान कायम स्मरणात राहील.

- प्रबोधनातील चौकस वृत्तीमुळे नवीन भूप्रदेशांचे शोध लावणारे सागरी प्रवास, नवीन जलमार्ग, नवभूप्रदेश यांचे शोध लागले. जगातील फार मोठे अप्रसिद्ध प्रदेश या सागरी प्रवासामुळे शोधले गेले.

- सुमारे १७५0 मध्ये इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती सुरू झाली. ही क्रांती कापड उद्योगात सुरू झाली. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. या क्रांतीमुळे कारखान्यांमधील मजूर वर्ग निर्माण झाला. या मजूर वर्गाचे भांडवलदारांकडून कारखानदारांकडून अत्यंत मोठ्या प्रमाणावर शोषण केले जात असे.

- १७७६ मध्ये अमेरिकेत अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध झाले. त्या राज्यक्रांतीने संपूर्ण जगातील देशांना समता, स्वातंत्र्य आणि लोकांचे अधिकार मिळविण्यासाठी स्फूर्ती, प्रेरणा दिली.

- फ्रेंच राज्यक्रांतीला, मॉन्टेस्न्यू, व्हॉल्टेअर, रुसो इत्यादी तत्त्वज्ञांच्या विचारांनी व कल्पनांनी स्फूर्ती व प्रेरणा दिली. आधुनिक जगावर त्या क्रांतीतील स्वातंत्र्य, समता, बंधुता या कल्पनांचा फार मोठा प्रभाव पडला.

- राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेमुळे इटली, जर्मनीसारख्या राष्ट्रांमध्ये एकीकरणाच्या चळवळी सुरू झाल्या.

- कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांच्या समस्या व संबंध यामुळे समाजवादाचा उदय झाला. रशियन राज्यक्रांती म्हणजे या मजुरांच्या समस्यांच्या जाणिवेचा परिणाम होय. या जाणिवेच्या परिणामामुळे पहिल्या समाजवादी सरकारची स्थापना व समाजवादी सरकारच्या कार्याची सुरुवात झाली.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. नवीन शहरांचा उदय आणि व्यापारातील वाढ यामुळे सामंतशाहीचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली. स्पष्ट करा.

२. प्रबोधनामुळे पूर्वीच्या विचार करण्याच्या पद्धतीत बदल झाला व नवीन विचार पद्धती अंमलात आली. या विधानाचे १00 शब्दात स्पष्टीकरण करा.

३. प्रबोधनाचा युरोपवर आणि इतर जगावर काय परिणाम झाला?

४. नवीन भूप्रदेशांच्या शोधामुळे आधुनिक जगाची अर्थव्यवस्था आणि समाज कशा पद्धतीने बदलली, ते स्पष्ट करा.

५. अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यातील मुख्य कल्पना सांगा.

६. फ्रेंच राज्यक्रांतीमधील कोणत्या कल्पनांचा जगावर प्रभाव पडला?

७. जर्मन व इटली यामधील पुढाऱ्यांनी राष्ट्रीय एकीकरणासाठी कोणत्या पद्धती वापरल्या?


८. रशियन क्रांती होण्यास कारणीभूत ठरलेल्या कामगारांच्या हलाखीच्या परिस्थितीचे वर्णन करा.

## पाठांतर्गत प्रश्नांची उत्तरे

### ३.१

१. अ) प्रबोधनकाळातील विद्वानांचा

ब) सोसायटी ऑफ जिझस



टिपा

२. सामंतशाहीमध्ये सामंत, अमीर, उमराव आपली जमीन लोकांना कसावयास देत. त्याबद्दल त्यांच्याकडून भरपूर कष्ट करून घेत. त्यांना गुलामासारखी वागणूक देत. या पद्धतीची वैशिष्ट्ये ˆ

१) कामगार आपल्या मालकासाठी काम करत असत व लढतही असत.

२) राजा हा सर्वात मोठा आणि सर्व सामंतशाहीचा प्रमुख असे.

३. प्रबोधनाच्या मुख्य संकल्पना ˆ मानवतावादी वृत्ती, सुधारक बुद्धी आणि चौकसवृत्ती

४. मार्टिनल्युथरने केलेल्या खालील गोष्टींमुळे चर्चमध्ये सुधारणा झाली.

अ) चर्चवर आंधळी श्रद्धा ठेऊन मुक्ती मिळत नाही, तर येशूवर श्रद्धा ठेवल्यानेच मुक्ती मिळते.

ब) बायबल हाच अधिकृत धर्मस्त्रोत आहे.

## ३.२

१. अ) २ ब) ३

२. अ) अंधश्रद्धेऐवजी कारणांवर भर

ब) निरीक्षण आणि प्रयोग यांच्याद्वारे शास्त्रशुद्ध विचारांवरील निष्ठा

३. कंपास, ॲस्ट्रेलॅब, खगोलशास्त्रीय तक्ते व नकाशे तयार करणे.

४. समाजात विषमता निर्माण झाली व समाज दोन गटात विभागला गेला. एक गट भांडवलदारांचा व दुसरा गट कामगारांचा होता.

## ३.३

१. अ) १ ब) ३ क) ३

२. इ. स. १६८८ मध्ये झालेल्या वैभवशाली क्रांतीमुळे पुढे झालेल्या संसदेने राजा जेम्स दुसरा याच्याविरुद्ध जनतेत असंतोष असल्याने त्याला गादीवरून हटविले आणि घटनात्मक शासनव्यवस्था अंमलात आणली. यावरून रक्ताचा एक थेंबही न सांडता संसद राजालासुद्धा काढून टाकू शकते. ही घटना इतरांसाठी प्रेरणा झाली.

३. अमेरिकन स्वातंत्र्यलढा आणि फ्रेंच राज्यक्रांती यामधील साम्यस्थळे ˆ

अ) दोन्ही ठिकाणी जनतेच्या पिळवणुकीला विरोध केला गेला आणि जनतेला न्याय्य हक्क मिळण्याची मागणी करण्यात आली.

ब) संपूर्ण जगात राष्ट्रप्रेम आणि सार्वभौमत्व याविषयी आस्था निर्माण झाली.

४. प्रबोधन काळातील आणि फ्रेंच राज्यक्रांतीमधील समानता, भाषणस्वातंत्र्य आणि लोकशाही आणि मार्क्स याचे लिखाण यामुळे समाजवादी समाजरचनेची संकल्पना मूर्त स्वरूपात येण्यास मदत झाली. समाजवादामध्ये उत्पादनसाधनांची मालकी शासनाच्या हाती असते. त्यामुळे सामाजिक समानता आणणे शक्य होते. त्यामुळे समाजामध्ये विशेषत: कामगारांमध्ये राजकीय जागृती झाली आणि त्याचा परिणाम म्हणून रशियन राज्यक्रांती घडून आली.

# ४

# आधुनिक जग (भाग दुसरा)

मागील प्रकरणामध्ये युरोपियन समाजात प्रवोधन काळात झालेले बदल अभ्यासलेले आहेत. शास्त्रीय ज्ञानात भर पडली. अंधश्रद्धा परंपरा झुगारुन निरीक्षण आणि अनुभूती यावर भर दिला. छपाईच्या तंत्रामुळे राजकीय सामाजिक जागृती निर्माण झाली. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या नवीन मूल्यांची जाणिव आली. जगाच्या विविध भागात जाण्यासाठी मार्ग शोधण्यासाठी युरोपियनांनी धाडस केले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसारासाठी प्रयत्न सुरू केले. व्यापाऱ्यांनी विविध भागातून वस्तू आणल्या. प्रामुख्याने इंग्लंडमध्ये तंत्रज्ञानाचा वापर सुरू झाल्याने औद्योगिक क्रांती घडून आली. त्याचा लाभ प्रामुख्याने श्रमजीवी वर्गाला झाला. आपण औद्योगिक क्रांती, साम्राज्यशाही, वसाहतवाद आणि आशिया व आफ्रिका खंडावर झालेले परिणाम अभ्यासणार आहोत. दोन जागतिक महायुद्ध तसेच UNO च्या स्थापनेची माहिती अभ्यासणार आहोत.


## उद्दिष्टे :

पाठ अभ्यासानंतर पुढील माहिती मिळेल.

- औद्योगिक क्रांतीचे वर्णन
- नवीन शोध व तांत्रिक ज्ञानामुळे होणारी औद्योगिक क्रांती यामुळे झालेले बदल.
- समाजावर औद्योगिक क्रांतीचा झालेला परिणाम
- साम्राज्यवाद व वसाहतवादाच्या उदयास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा शोध घेणे.
- आशिया व आफ्रिकेतील साम्राज्यवादाचा विकास व स्थिती अभ्यासणे.
- दोन्ही जागतिक महायुद्धास कारणीभूत असलेल्या घटकांचा मागोवा घेणे.
- संयुक्त राष्ट्रसंघ UNO ची उद्दिष्ट्ये

## ४.१ औद्यागिक क्रांती :

१८ व्या शतकामध्ये औद्योगिक क्रांती झाली. या क्रांतीमुळे सामाजिक आर्थिक स्थितीमध्ये बदल घडून आला व नवीन औद्यागिक संस्कृती निर्माण झाली. इतिहासामध्ये १७५0 ते १८५0 हा ब्रिटिश काळ म्हणून ओळखला जातो. या काळात कारखानदारी, यांत्रिक वापर व आर्थिक विशेषीकरण झाले. शेती व्यवसाय करणारे लोक शहरातील कारखान्यामध्ये काम करू लागले. याचे कारण काय? या पूर्वी व्यापारी कच्चा माल घरी कच्चा देत व तयार माल जमा करीत परंतु यामधून बाजारपेठेतील मालाची मागणीपूरी होत नसे यामुळे १८ व्या शतकामध्ये श्रीमंत व्यापाऱ्यांनी कारखानेच काढले. नवीन यंत्रे आणली व कामगारांना मासिक पगारावर कामावर ठोले. यातूनच कारखानदारीचा उदय झाला.



**आकृती ४.१ : प्रारंभीचे विणकाम यंत्र**

वाफेवर चालणाऱ्या यंत्राने ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांती घडवून आणली. १७६९ मध्ये जेम्स वॅटने वाफेच्या यंत्राचा शोध लावाला. १७३३ मध्ये जॉन की फ्लाईग शटलच्या शोधामुळे चौपट उत्पादन वाढले. जेम्स हरग्रिव्हच्या हाताने चालविल्या जाणाऱ्या कताई यंत्रामुळे अनेक धागे एकाच वेळी घेता आले. त्यामुळे कापडउद्योगात अमूलाग्र बदल झाला. लोह व दगडी कोळशाच्या खाणींमुळे ब्रिटनची औद्योगिक प्रगती झपाट्याने झाली. कालवे खोदाई, रर्स्तेलोहमार्ग, वाफेवरील बोटींमुळे उत्पादनास बाजारपेठेचा विस्तार झाला. वीजेमुळे व गॅसच्या वापरामुळे नवीन काळ उदयास आला. औद्योगिककरणासाठी ब्रिटनकडे आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी ब्रिटनकडे होत्या. सन १८५0 मध्ये ब्रिटिश जीवनशैलीत औद्योगिककरण हा अविभाज्य भाग झाला होता. औद्योगिक क्रांतीचे परिणाम जगभर झाले. फ्रान्समध्ये १८३0, जर्मनीत १८५0 आणि अमेरिकन नागरीयुद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिकेत परिणाम दिसले. औद्योगिककरणाबाबतची माहिती पुढील भागात पाहू.

इंग्लंडमध्ये संशोधनाचा परिणाम कृषीक्षेत्रावर झाला. वीज पेरणी करण्याचे जेथ्रो टूल आले. १७६0 ते १८३0 च्या दरम्यान लहान लहान शेतांचे मोठ्या सलग शेतात एकत्रिकरण करण्यात आले. यामुळे उत्पादन वाढ झाली. मात्र यातून अनेक शेतकरी भूमिहीन झाले. यातून शेतीसाठी फक्त मोजक्या लोकांना काम मिळाले. अन्य लोक शहराकडे स्थलांतरीत होवू लागले. यातूनच कारखान्यात काम करण्यासाठी स्वस्तात मजूर उपलब्ध झाले.

इंग्लंडमधील राजकीय स्थिती औद्योगिकरणास अनुकूल होती. व्यापाराच्या जाचक अटी रद्द करण्यात आल्या. वाहतुक सुविधांबरोबर इंग्लंडला बाहेर बाजारपेठ मिळविता आली. युरोपमधील अनेक देशांनी हाच मार्ग स्वीकारला. उद्योगांवर व व्यापारावर सरकारी नियंत्रण आले. यामुळे जास्तीत जास्त निर्यात व कमीत कमी आयातीचे धोरणामुळे राष्ट्राला बळकटी आली. व्यापारावर कमी नियंत्रण व सोने व चांदीचा राष्ट्रातील जास्तीत जास्त साठा यावर राष्ट्राची सांपतिक स्थिती अवलंबून आहे, अशी सर्वांची धारणा होती.

इंग्लंड हा देश औद्योगिक क्रांती कशी घडवून आणू शकला? इंग्लंडला त्यांच्या भौगोलिक स्थानाचा लाभ झाला. इंग्लंडला बेटाचे सुरक्षित सागरी स्थान लाभलेले आहे. तसेच इंग्लंडची भूमी युरोपच्या मुख्य भूमिपासून वेगळीही आहे. नद्या, कालवे, समुद्र मार्ग यामुळेही इंग्लंडला औद्योगिक क्रांती घडवून आणणे सुलभ झाले.

## ४.२ संशोधन ‘ तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्रांती :

या काळात अनेक संशोधने व तंत्रज्ञानात प्रगती झाली त्यामुळे उद्योग प्रधान देश अधिक प्रबळ झाले. उत्पादन जलद गतीने व मोठ्या प्रमाणात व स्वस्तात होवू लागले. कापड उद्योग आणि वाहतुक उद्योगामध्ये या संशोधनाचा मोठा उपयोग झाला.

### ४.२.१ कापड उद्योग :

लोह-पोलाद उत्पादन तंत्रामधील प्रगतीचा उपयोग वस्त्र उद्योगाला झाला. इंग्लंडमधून पक्का माल मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत येवू लागला त्याचे अनुकरण अन्य देश करू लागले. त्यामुळे इंग्लंडमधील तंत्रज्ञाची माहिती अन्यत्र जावू नये यासाठी इंग्लंडमधून कामगार अन्य देशात जाण्यावर बंदी घालण्यात आली. त्यासाठी कायदाही केला. परंतु १७८९ सॅम्युअल स्लाटरने इंग्लंडमधून बाहेर पडून अमेरिका गाठली व इंग्लंडचे तंत्रज्ञान अमेरिकेत आणले. अमेरिकेतील विस्तृत क्षेत्र कापूस लागवडीखाली आणले त्यामुळे अधिक गुलामांची गरज भासू लागली. याच तंत्राचा वापर फ्रान्स व जर्मनीने केला.

अर्कराईटला कारखानदारीचे जनक समजले जाते. हे आपणास माहित आहे का? कारखान्यासाठी स्वतंत्र बांधकाम करून करारावर नेमलेल्या कामगाराऐवजी कामगारांना नोकरीवर नेमण्यात आले. सन १७७९ मध्ये सॅम्युअल क्रॉम्प्टनने विणकामाच्या मागाचा शोध लावला. एडमंड कार्ट राईट ने पाण्यावर चालणाऱ्या पॉवर लूमचा शोध लावला. त्यामागोमागच कापड उद्योगात , डायींग, ब्लिंचिंग, प्रिंटिंग या आवश्यक असलेल्या तंत्राचाही शोध लावला.

### आपल्यासाठी एक उपक्रम ४.१

जवळपासच्या एखाद्या हातमाग कारखान्यास भेट द्या. तेथे कोणती कामे चालतात? स्त्रीपुरुषांच्या कामाबाबत वेगळेपण आहे का? तेथे कोणत्या तंत्राचा वापर केला जातो? त्यांना कोणत्या संमस्या भेडसावतात? मुलांना तेथे काम दिले जाते का? तुम्हास आलेला अनुभव लिहा.

नवीन संशोधन व तंत्र यांचा उत्पादनामध्ये व वाहतुक दळणवळण उद्योगामध्ये जसा झाला तसा रासायनिक, इलेक्ट्रीकल, पेट्रोलियम व स्टील उद्योगामध्ये झाला. नवीन व्यापारी मार्ग शोधले गेले त्याचा परिणाम औद्योगिक क्रांतीवर झाला तसा वसाहत विस्तार, साम्राज्यविस्तारावर झाला. कच्च्या मालाचा शोध, नवीन बाजारपेठ मिळविणे कामगार मिळविणे यावरही परिणाम झाला. साम्राज्यविस्तारातूनच श्रेष्ठत्व दर्शविण्यासाठीच दोन जागतिक महायुद्धे झाली. वसाहतीतून स्थानिकांचा सामाजिक आर्थिक राजकीय विनाश झाला. स्थानिकांनी परकीय सत्ता झुगारून देण्यास सुरुवात केली.

### ४.२.२ वाफेचे इंजिन :

औद्योगिक क्रांतीमध्ये वाफेच्या इंजिनचा शोध महत्त्वाचा ठरतो. या शोधामुळे पूर्वीच्या तंत्रामध्ये बदल करून नवीन उद्योग वाढले. त्यासाठी अधिक शक्तिसाधनांची गरज भासली. सन १७०५ मध्ये थॉमस न्यूकॉमनने कोळशाच्या खाणीतील पाणी उपसण्याचा पंप तयार केला. सन १७६४ मध्ये जेम्स वॅटने न्यूकॉमच्या इंजिनची कार्यक्षमता चौपटीने वाढविली. त्याने गार पाण्याचा फवारा वापरून आणि वाफेचे संघनन करून इंजिनमध्ये निर्वात प्रदेश निर्माण केला. या काळात एका क्षेत्रातील तंत्रज्ञान दुसऱ्या क्षेत्रात वापरले गेले. जेन्स वॅटने क्लिकिनसनने तयार केलेले गिरमिट (drillgan) इंजिनसाठी लागणारे सिलींडर तयार करण्याकरता वापरले. कोळशाच्या इंजिनची जागा वाफेच्या इंजिनने घेतली. त्यामुळे रेल्वेची मागणी वाढली. वाफेचे इंजिन इतर व्यवसायातही वापरले जाऊ लागले. आता कारखाने नदी किंवा तळी यांच्या काठावरच उभारण्याची गरज राहिली नाही.

या कामात सुधारणा झाल्या.

### ४.२.३ दगडी कोळसा व लोह :

लोह, दगडीकोळसा वाफेचे इंजिन हा आधुनिक उद्योगांचा पाया आहे. खाणीत काम करणे म्हणजे मरणच. खोल खाणीतून कोळसा काढून जमीनीवर आणणे हे श्रमाचे काम प्राणी, पुरुष, स्त्रिया, मुले यांवरच अवलंबून असते. हे काम अत्यंत धोकेदायक, मुलांचे शरीर लहान असल्याने त्यांचाच वापर होई. कोळशाची मागणी वाढली. खाणीमध्ये बोगदे खोदणे, वाहतुक करणे, सुरुंग लावणे या कामात सुधारणा झाल्या. संरक्षक दिव्यांचा वापर सुरू झाला. कोळसा खाण दारांना अनेक समस्या भेडसावल्या. त्यामध्ये कामगारांचा धुळीमुळे होणारा फुफुसाचा कॅन्सर होय.

लोहपोलाद व्यवसायाची या काळात भरमसाठ वाढ झाली. सन १७०९ मध्ये अब्राहम डर्बीने लोणारी कोळसा वापरून कच्चे लोखंड तयार केले. त्याचे यापूर्वी कोकींग कोलवर उत्पादन होत होते. त्यातून इंग्लंडमध्ये मोठी वृक्षतोड झाली. सन १७८४ मध्ये हेन्री कोर्टने कमी ठिसूळ लोखंडाची निर्मिती केली. त्याला घडीव लोखंड म्हणतात. याचा उपयोग कारखानदारीत झाला. सन १७७४ मध्ये जॉन विलकिसनने ड्रिलिंगमशीनचा शोध लावला त्यामुळे अचूक भोक घेता आले. सन १७८८ ते १८०६ लोह उत्पादनात प्रचंड वाढ झाली व त्याचा उपयोग कृषी यंत्रे, लोखंडी सामान, जहाज बांधणीसाठी झाला.

वस्त्र उद्योगासाठी आवश्यक ठरणाऱ्या वाहतुक साधनांमध्ये जलदगती व स्वस्तात वाहतुक साधनांच्या संशोधनाची गरज भासली. बाजारपेठेत मालाचा पुरवठा तसेच परकीय व्यापारासाठी ही गरज होती.

### ४.२.४ वाहतुक व दळणवळण साधने :

वाहतुक व दळणवळण साधनांमध्ये सुधारणा झाल्यामुळे औद्योगिक क्रांतीला प्रोत्साहन मिळाले. कच्चा माल, तयार माल, अन्न व खाद्य, तसेच लोकांसाठीही विश्वासार्ह वाहतुकीची आवश्यकता होती. सन. १७00 मध्ये पूल बांधणे रस्ते तयार करणे. या सुधारणा झाल्या होत्या. त्यामुळे कारखान्यांना कच्चा माल व तेथून पक्का माल पोहचविणे सुलभ झाले. सन १८१४ मध्ये स्टिफन्सनने रेल्वे इंजिन तयार केले. इंग्लंडमध्ये त्याचा लोहमार्ग वाहतुकीस उपयोग झाला तसेच कालव्यातूनही वाहतुक होत होती.



**आकृती ४.२ : जॉर्ज स्टिफन्सनचे रॉकेट १८२९**

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

सन १८२५ मध्ये पहिल्यांदाच माल आणि प्रवाशी वाहतूक रेल्वेने स्टॉकटोन ते डार्लिंगटन दरम्यान झाली.

१९ व्या शतकाच्या मध्यावर वाफेवर लाकडी जहाज चालविले गेले. त्यानंतर लोहाच्या जहाजावर वापर सुरू झाला. औद्योगिक क्रांतीची पहिला टप्पा वॉफेवर तर दुसरा टप्पा विजेवर अवलंबून होता. मायकेल फॅरडेने पहिल्या विद्युत मोहारीचा शोध लावला. वीज ही सध्या सर्व कारखान्यात आवश्यक बाब आहे. तशीच वाहतूक, संदेशवहन, व्यवसाय, लष्कराशीस संपर्क वसाहती तसेच सर्वसामान्यांसाठी वीज अत्यावश्यक आहे.

## ४.३ औद्योगिक क्रांतीचा प्रभाव :

औद्यागिक क्रांतीमुळे लोक शहराकडे धावू लागले. त्यामधून नागरीकरणाचा जन्म झाला. जेथे काम मिळते त्या कारखान्याजवळच लोक एकत्र राहू लागले. परंतु कामाच्या ठिकाणाची आणि घरे व आरोग्य स्थिती दयनीय होती. कारखान्याच्या मालकाचा केवळ नफा मिळविणे एवढाच उद्देश होता. कमी पगारावर १२/१४ तास करण्याची कारखानदाराकडून सक्ती असे. स्त्रिया आणि मुलांना कमी पगार दिला जाई. कामाचे ठिकाण अत्यंत कोंदट, गोंधळाचे, अंधारी दमट व घाणेरडे असे. परंतु ही स्थिती दीर्घ काळ कशी टिकेल? कामगारांनी आपली ताकत ओळखली. न्याय मिळविण्यासाठी कामगार संघटना निर्माण झाल्या. त्यासाठी कामगार कायदे तयार करण्यात आले. या संबंधीची माहिती पुढील भागात पाहू.

### आपल्यासाठी एक उपक्रम ४.२

आपल्या सभोवताली शेजारीपाजारी, दुकाने किंवा बाजारपेठेत पहा. १४ वर्षाखालील मुलांना कामावर घेतले जाते का? त्यांच्या शिक्षणासाठी काय करता येईल? त्यांना मदत देता येईल असा मार्ग काढा.

उत्पादनात अमूलाग्र वाढ झाल्याने मालाच्या किमती कमी झाल्या. माणसांऐवजी यंत्राचा वापर होवू लागला. शेतीमालाचे भाव कमी झाले. कारखानदारीतून समृद्धी आली. या मालकीतूनच जो गट तयार झाला त्याला भांडवलदार म्हणतात. त्यातूनच बँक ही संकल्पना आली. ज्यांच्याकडे जादा उत्पन्न असेल ते गरजूंना आहे त्यांना देण्यात आले. सन १७00 मध्ये सुवर्णकार, व्यापरी व उद्योजकांनी पहिली खाजगी बँक काढली.

औद्योगिक क्रांतीचा प्रसार अनेक देशात झाला. कारखान्यासाठी कच्चा माल, कारखान्यातील पक्क्या मालाला बाजारपेठ शोधणे, स्वस्तात मजूर मिळविणे. यासाठी वसाहतवाद व साम्राज्यविस्तार सुरू झाला. या वसाहतीसाठी इंग्लंड आणि फ्रान्समध्ये स्पर्धा सुरू झाली. इटली, जर्मनी आणि अन्य देशही या स्पर्धेमध्ये आले. साम्राज्यविस्तार व वसाहतीतून स्थानिक संस्कृती, आर्थिक आणि राजकीय पद्धतींचा विनाश झाला. स्थानिक लोकांनी मात्र या परकीय राजवटीस विरोध करून स्वातंत्र्यासाठी धडपड केली.

### पाठ्यांशावरील प्रश्न ४.१

१. इंग्लंडमधील औद्यागिक क्रांतीस कारणीभूत ठरलेल्या दोन नैसर्गिकसंपदा कोणत्या?

२. वाहतुक व दळणवळण साधनांच्या विकासामुळे व्यापाऱ्यांना कशी मदत झाली?

३. कोळसा खाणीत आणि कारखान्यात मुलांना कामावर घेण्याची कारणे कोणती होती?

**४. जोड्या जुळवा.**

| | |
|---|---|
| अ) जेम्स वॅट | १) लोह उद्योग |
| ब) सॅम्युअल क्रॉम्प्टन | २) वीजेची मोटार |
| क) हेन्री कोर्ट | ३) वाफेचे इंजिन |
| ड) मायकेल फॅरडे | ४) कापूसकताई |
| | ५) विणकाम माग |
| | ६) फ्लाईंग शटल |

## ४.४ साम्राज्यवाद व वसाहतवादाचा उदय :

मागील प्रकरणामध्ये औद्योगिक क्रांती आणि पश्चिमेकडील देशांमध्ये त्याचा झालेला प्रसार पाहिला. १९ व्या शतकाच्या अखेरीस पश्चिम युरोपीयन देशांमध्ये उद्योगधंदे निर्माण झाले. त्या देशांना कच्चा माल मिळविणे व उत्पादित मालाला बाजारपेठ शोधणे गरजेचे झाले. त्यामुळे जेथे औद्योगिकरण झालेले नाही असे प्रदेश काबीज करणे सुरू केले. भांडवलदारांना नवीन ठिकाणे नवीन उद्योग सुरू करून पैसा वापरावयाचा होता स्वदेशात किंवा लगतचा प्रदेश त्यांची गरज भागवू शकत नव्हता. राजकीय व आर्थिक विस्ताराला साम्राज्यवाद म्हणतात. हे लष्कर किंवा अन्य मार्गाने शक्य होते. वसाहत म्हणजे प्रदेश मिळविणे, त्यांना परावलंबी करणे जिंकणे किंवा इतर मार्ग वापरणे. साम्राज्य विस्तारासाठी लष्करी राजकीय राजवट किंवा अन्यमार्ग वापरणे. आपल्या साम्राज्यात वसाहतीतील संपदांची लूट करून घेवून जाणे हा हेतू होता. १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत आशिया व आफ्रिकेतील अनेक देश युरोपियन देशांच्या नियंत्रणाखाली आले.

उद्योगप्रधान देशांनी आशिया आणि आफ्रिकाच का निवडले असतील असा विचार तुम्ही केलात का? याचे कारण, राजकीय, हे देश नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध परंतु लष्करी दृष्ट्या दुर्बल औद्योगिक दृष्ट्या मागासलेले होते. संपर्क साधनांच्या अभावामुळे त्यांच्यापासून नफा मिळेल असे वाटत नव्हते. साम्राज्याचा विस्तार वाहतुकीच्या व दळणवळण साधनांनी झाला. उत्तम रस्ते, वाफेवर चालणारी जहाजे, लोहमार्ग, कालवे यांचा विकास उद्योगप्रधान देशांनी स्वतःच्या प्रदेशात तसेच वसाहतींमध्येही केला. लष्कराचा ताफा वसाहतीकडे पाठविता येणे शक्य झाले. टेलिग्राफ, टेलिफोन यामधून संदेश पाठविणे सुलभ झाले. साम्राज्यवादी देशांमध्ये हा विकास झालेला होता. प्रखर राष्ट्रभक्ती या साम्राज्यवादाला हुसकाविण्याचा प्रयत्न करीत होती. इटली, जर्मनी यांनी प्रतिष्ठा व वैभवासाठी आजूवाजूचे देश जिंकले. या काळात युरोपियन लोकांना आणि आशिया व आफ्रिकेपेक्षा श्रेष्ठ आहोत असे वाटत होते. या मागसलेल्या देशातील, लोकांना सुधारण्यासाठी गोऱ्या लोकांना ओझे असे वाटत होते. असे भासवून प्रदेश जिंकण्याचे समर्थन करीत होते.

धाडसी व जगाचा शोध घेण्यात अग्रणी असणाऱ्या युरोपिअनांना प्रदेश जिंकणे अवघड गेले नाही. संपत्ती व साधने विपूल प्रमाणात असल्याची माहिती या संशोधकांकडून मिळत होती. ख्रिस्तोकर कोलंबस, वास्को द गामा फर्डिनंड मॅगेलन या खलाशांची आपणास माहिती आहेच.

### ४.४.१ आफ्रिकेतील साम्राज्यवाद :

आफ्रिका हे काळे खंड होते. हे आपणास माहित आहे काय? या खंडाची अल्प माहिती आहे. मिशनरी आणि खलाशी यांनी अतंर्गत भागात जाण्याचे धाडस केले. त्यांना हस्तीदंत, सोने, हिरे, इमारत, लाकूड याचा शोध घेतला व लोकांना गुलाम बनविले. आफ्रिका राजकीय दृष्ट्या दुबळा, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेला होता तसेच त्यांचे लष्करही कमकुवत होते. युरोपियनांमध्ये प्रदेश मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. यासाठी त्यांनी प्रगत आयुधे वापरली. सन १८७५ पर्यंत काही प्रदेश, व्यापारी केंद्र, किल्ले आणि वसाहती युरोपियनांकडे होत्या. परंतु १८८० ते १९१० पर्यंत संपूर्ण आफ्रिकाच युरोपियनांनी विभागून घेतलेला होता. आफ्रिकेबाबतचे सर्व निर्णय हे लंडन, पॅरिस, लिस्बन मध्ये घेतले जात ही स्थिती पुढील ५० वर्षे टिकली.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

फ्रान्सने आफ्रिकामध्ये जास्तीत जास्त वसाहती केल्या तर ब्रिटिशांनी जास्तीत जास्त लोकांवर राज्य केले.

फ्रान्सने आपले साम्राज्य उत्तर व पश्चिम आफ्रिकेवर ताबा मिळविला. अल्जेरिया ट्युनिशिया, मोरोक्को, आयव्हरी कोस्ट, दहोमी, माली इत्यादी प्रदेश फ्रान्सच्या ताब्यात होता. ब्रिटिशांनी गॅम्बीया, सिएरा लिओन, गोल्ड कोस्ट, नायजोरया, दक्षिण आफ्रिका, ऱ्होडेशिया, युगांडा, केनिया, इजिप्त, सुदान, इरिट्रिया, सोमालीलँड, लिबिया यावर अधिपत्य मिळविले. जर्मनीने नैऋत्य अफ्रिका, टांझानिया, टोगोलँड यांच्यावर पहिल्या महायुद्धाच्या पराभवापर्यंत राज्य केले. पहिले महायुद्ध १९१४ ला सुरू झाले तेव्हा फक्त लायबेरिया आणि इथिओपिया हे दोनच देश स्वतंत्र होते. इथिओपिया. हा देश इटलीने १९३५ मध्ये ताब्यात घेतला.

या साम्राज्य विस्ताराची गंम्मत म्हणजे आफ्रिकेत गुलामगिरी सुरू झाली. अमेरिकेतील मळ्यामध्ये काम करण्यासाठी आफ्रिकेतील गुलाम पाठवित असत. लिस्बनमध्ये (पोर्तुगालची राजधानी) गुलामांची नियमित बाजरपेठ होती. सन १५०० ते १८०० पर्यंत दीड कोटी आफ्रिकन लोकांना गुलाम म्हणून विकले गेले होते.

**आपल्यासाठी एक उपक्रम ४.३**

मानसाला त्याच्या रंग, वंश, वर्ग, जात, प्रदेश यावरून भेदभाव करून वाईट वागणूक दिली जात होती. भारतातही असा भेदभाव झाल्याच्या अनेक घटना आहेत. परिपक्वतेच्या दृष्टीने विचार केल्यास हे तुम्हास योग्य आहे असे वाटते काय? इतरांना काय वाटेल? यावर तुम्ही काय उपाय सूचवाल?

### ४.४.२ आशियातील साम्राज्यवाद :

युरोपियनांनी आफ्रिकेप्रमाणेच आशियामध्ये वसाहती स्थापन केल्या. ब्रिटिश व फ्रेंच यांना पोर्तुगाल व हॉलंड यांनी वाढविलेला भारतातील व्यापार पसंत नव्हता म्हणून इंग्रजांनी त्यांना भारतातून बाहेर हुसकावून दिले. ब्रिटिश व फ्रेंचांनी भारतात वसाहती केल्या. सन १७६३ मध्ये फेंचाचा पाडाव करून ब्रिटिशांनी आपले स्थान पक्के केले. यासंबंधीची अधिक माहिती पुढील प्रकरणात मिळेल. जपान किंवा चीनने पाश्चात्य संस्कृती व जीवन पद्धती स्वीकारली नाही. कारण त्यांची जीवनपद्धती भिन्न होती. बॉक्सर बंड व अफूचे युद्धामुळे चीनमध्ये औद्योगिक देशांचा शिरकाव याला चीनने सुद्धा औद्योगिकरण आणि पश्चिमात्यांचा प्रभाव मान्य केला.

### ४.४.३ चीन :

चिनी मालाला युरोपिअन देशात चांगली मागणी होती परंतु युरोपियन मालाला चीनमद्ये मागणी नव्हती. असा एकतर्फी व्यापार युरोपियनांना फायदेशीर नव्हता म्हणून युरोपियन व्यापाऱ्यांनी चिनी तरुणांना व्यसनाधिन बनविण्यासाठी अफूचा चोरटा व्यापार सुरू केला. युरोपियन व्यापारी त्याच्या बदल्यात चिनी माल घेत असत. यातून पहिले अफूचे युद्ध सुरू झाले. त्यात चीनचा पराभव झाला. चीनकडून ब्रिटिशांनी अनेक सवलती उकळाल्या. ब्रिटिश व्यपाऱ्यांना पाच बंदरे वापरास परवानगी मिळाली. ब्रिटिश मालावर चीन कर लावू शकत नव्हते. चीनच्या कोर्टामध्ये ब्रिटिशांवर तक्रार दाखल करता येत नव्हती. हॉंगकॉंग बंदर ब्रिटनला देण्यात आले.

दुसरी अफूचे युद्ध हे ब्रिटिश राष्ट्रध्वजाचा अवमान आणि फ्रेंच मिशनरीच्या खुनामुळे झाले. ब्रिटिश आणि फ्रेंचांनी चीनमध्ये जादा सवलती व अधिकार मिळविले.


बॉक्सर बंड हे ख्रिश्चन मिशनरींच्या विरुद्ध तसेच चीनच्या शोषणातून झाले. चीनचा युवक वर्ग परदेशी नागरिकांना ठोसे मारून उपद्रव देई (बॉक्सिंग म्हणून बॉक्सर बंड) चीनच्या राजसत्तेचा या बंडाला गुप्त पाठींबाही होता.

### ४.४.४ जपान :

मेईजी सत्ता १८६८ मध्ये आली. यामधून औद्योगिक प्रगतीकडे देशाची वाटचाल सुरू झाली. नैसर्गिक संपदा अपुरी असल्याने कच्चा माल शोधणे व बाजारपेठ मिळविणे हे दोन्हीही त्यांच्या दृष्टीने गरजेचे होते. सन १८७१ मध्ये जपानच्या राजसत्ताधाऱ्यांनी युरोप व अमेरिकेत दौरा केला. सन १८७७ मध्ये बँक ऑफ जपानची स्थापना केली. अनेक ठिकाणी लोह पोलाद उद्योग स्थापन झाले. शिक्षणाचा प्रसार झाला. जपानचे विद्यार्थी शिक्षणासाठी युरोपमध्ये पाठविले. सन १९०५ मध्ये घोषवाक्य दिले. ‘देशाला समृद्ध करा व लष्कराला बळ द्या.’ त्यांनी जपान हा समृद्ध उद्योगांचा व लष्कराचा देश बनला. त्यांनी फोर्मोसा, दक्षिण साखलीन, कोरीया, मांचुरिया, इंडोचायना, ब्रह्मदेश (मॅनमार) मलाया, सिंगापूर इंडोनेशिया, फिलिपिन्स हे देश जिंकून घेतले.

### ४.४.५ दक्षिण आणि आग्नेय आशियातील साम्राज्यवाद :

दक्षिण व आग्नेय आशियामध्ये नेपाळ, ब्रह्मदेश (मॅनमार) श्रीलंका, मलाया, इंडोचायना, थायलँड, इंडोफिलिपिन्स यांचा समावेश होतो. नवीन साम्राज्यशाही पूर्वी देखील येतील अनेक देश युरोपियन





देशाच्या आज्ञेतच होते. श्रीलंकेवर प्रारंभी पोर्तुगीज नंतर डच व नंतर ब्रिटिशांनी राज्य केले. ब्रिटिशांनी चहा, रबर उत्पादन सुरू केले. श्रीलंकेच्या निर्यातीमधील चहा व रबर यांच्या निर्यातीचा वाटा ७/८ इतपत होता.

साम्राज्यशाहीचा प्रभाव अन्य देशावरही होता. ख्रिश्चन जमातीच्या संरक्षणासाठी फ्रेंचांनी व्हिएटनामवर हल्ला केला. हळूहळू व्हिएतनाम लाओस, कंबोडिया इत्यादी भाग फ्रेंच्याच्या ताब्यात आला. मलायावर नियंत्रण राखण्यासाठी ब्रिटिशांनी ब्रम्हदेश व सिंगापूर ताब्यता घेतले.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

सयाम देश इंडोचायना आणि म्यानमारच्या दरम्यान आहे. त्यामुळे ब्रिटिशांनी म्यानमार व फ्रेंचानी इंडो चायना जिंकला तर सयाम हे स्वतंत्र राष्ट्राच राहीले.

## ४.५ साम्राज्यशाहीचा परिणाम :

साम्राज्यशाहीमुळे काही सकारात्मक परिणाम झाले. त्यामुळे या भागात वाहतुक व दळवळण साधनांचा विकास झाला. लोहमार्ग, कालवे, टेलिफोन, टेलिग्राफ यांचा वापर सुरू झाला. राजकीय जागृती व राष्ट्रीय भावनांचा वसाहतीत उदय झाला. आधुनिक व शास्त्रीय शिक्षणाचा विकास झाला. त्याचा लाभ या वसाहतींना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांचा विकास होण्यासाठी झाला.

साम्राज्यवदाचा विघातक परिणाम वसाहतींवर झाला. वसाहतीमधील स्थानिक उद्योगधंदे बंद झाले. नैसर्गिक संपदेची बेजबाबदारपणे लूट झाली. चीनच्या मक्तेदारीचे विभाजन झाले. ती आंतरराष्ट्रीय बाजारपेठ झाली. लायबेरिया व इथिओपिया वगळता संपूर्ण आफ्रिकेचे युरोपिअन देशांनी वाटप करून घेतले. आफ्रिकेतून अनेकांची गुलाम म्हणून विक्री करण्यात आली. दक्षिण आफ्रिकेतील लोकांना गोऱ्यांकडून काळे म्हणून हीन वागणूक दिली गेली. वर्णद्वेष साम्राज्यशाहीचा सर्वात घातक परिणाम होता.

साम्राज्य विस्तारामुळे आशिया व आफ्रिकेतून साधन संपत्तीची लूट केली गेली पक्क्या मालाची विक्री करून वसाहतींची अर्थव्यवस्था नष्ट केली. वर्णद्वेषामुळे लोकांचा स्वाभिमान व आत्मविश्वास नष्ट केला गेला. भारतात युरोपिअन लोक व्यापारासाठी आले आणि राज्यकर्ते बनले. एकेकाळी भारत हा वस्त्र निर्यात करणारा देश होता. तो पक्का माल आपण करणारा देश बनला. कच्च्यामालाची युरोपिअनांनी लूट केली. गरीबांवर कर लादले गेले.

मानवी इतिहासामध्ये विसाव्या शतकात अनेक शास्त्रीय शोध लागले. याचा प्रारंभ वाफेच्या इंजिनने झाला आणि शेवट हा चंद्रावरील पाऊल कॅम्प्युटरचा वापर याने झाला. संदेश वहनामुळे जग जवळ आले. साम्राज्याची हाव आणि आर्थिक वर्चस्वाची स्पर्धा याचा जगावर परिणाम झाला त्यामुळे अमेरिका युरोपियन देश जपान यामध्ये तणाव निर्माण झाला आणि दोन जागतिक महायुद्धे झाली.

## पाठ्यांशावरील प्रश्न ४.२

१. साम्राज्यवाद म्हणजे काय?

२. वसाहतीमधील वाहतुकीच्या विकासाचे साम्राज्य विस्तारासाठी झालेले दोन लाभ लिहा.

**३. अचूक उत्तर निवडा.**

१) खालीलपैकी कोणत्या खंडाला काळे खंड म्हणतात.

अ) आफ्रिका ब) आशिया क) युरोप

२) मेईजी क्रांती कोणत्या देशात झाली?

अ) कंबोडिया ब) श्रीलंका क) जपान

३) अफुचे युद्ध कोठे झाले?

अ) भारत ब) चीन क) म्यानमार

४) खालीलपैकी फ्रेंच वसाहत कोठे नव्हती.

अ) व्हिएतनामा ब) मोरोक्को क) केनिया

## ४.६ पहिले जागतिक महायुद्ध :

औद्यागिकरण, वसाहतवाद व साम्राज्यविस्तार यामुळे युरोपिअन देशात आशिया आणि आफ्रिका यांच्या मधील वसाहतींवरून शत्रुत्व निर्माण झाले. १९ व्या शतकाच्या अखेरीस आशिया आणि आफ्रिका खंडात वसाहत योग्य देशच न राहिल्याने स्पर्धा अधिकच वाढली. परस्परांवरील अविश्वास आणि शत्रुत्व यामुळे आपापसामध्ये सामंजस्य शक्य नव्हते. सन १९१४ मध्ये युरोपमध्ये सुरू झालेले महायुद्ध संपूर्ण जगभर पसरले. त्यामध्ये जगातील प्रमुख देश आणि त्यांच्या वसाहती सहभागी होत्या. त्यामध्ये अपरिमित हानी झाली. इतिहासात प्रथमच युद्धाची सर्व आयुधे वापरली गेली. युद्धामध्ये पायदळ, नावीक दल, हवाई दलाचा वापर केला. बेछूट बॉम्बवर्षावामुळे सर्वसामान्य लोकांना प्रचंड त्रास झाला. प्रथम जगातील एवढ्या मोठ्या क्षेत्रावर युद्ध चालले होते. त्यामुळेच त्याला जागतिक महायुद्ध म्हणतात. महायुद्धामुळे जागतिक इतिहासाच्या वेगळे वळण मिळाले. महायुद्ध ही गोष्ट काही अचानकपणे घडलेली नव्हती. तर १९१४ पूर्वी घडलेल्या अनेक गोष्टींचा पहिले महायुद्द हा उद्रेक होता.

### ४.६.१ पहिल्या जागतिक महायुद्धाची कारणे :

इंग्लंड, फ्रान्स जर्मनी यांच्यामधील साम्राज्य स्पर्धा हे महायुद्धाचे मुख्य कारण आहे. यापूर्वीची युद्धे टळली होती. कारण त्याकाळी वसाहत वाढीसाठी देश उपलब्ध होणे परंतु आता परिस्थिती बदलली

होती. आशिया आणि आफ्रिका यामध्ये आणखी वसाहतींची शक्यता नव्हती. याउलट वसाहती असलेल्या देशांनी वसाहती सोडण्यासाठी प्रयत्न चाललेले होते. त्यामुळे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जर्मनीने आर्थिक आणि औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात केला व इंग्लंड फ्रान्सलाही मागे टाकले. जर्मनीलाही आणि इंग्लंडलाही वसाहती आवश्यक होत्या. वसाहत स्पर्धेमध्ये जर्मनी हा इंग्लंडचा प्रमुख स्पर्धक होता. ब्रिटिशांच्या नाविक दलाला जर्मनीने एंपरर युद्धनौका बनवून आव्हान दिले. जर्मनीने उत्तर समुद्र व बाल्टिक समुद्र जोडणारा कील कालवा खोदल्याने इंग्लंडच्या किनाऱ्यास धोका निर्माण केला होता. जर्मनीने बर्लिन ते बगदाद दरम्यान लोहमार्ग बांधल्याने अगदी पूर्वेकडे सैन्य व फौजा पोहचविणे जर्मनीला सोपे झाले त्याचीही भिती ब्रिटिश वसाहतींना होती.

जर्मनीप्रमाणे युरोपिअन देश आणि जपान यांनाही साम्राज्य वाढविण्याच्या महत्त्वाकांक्षा होत्या. इटलीला उत्तर आफ्रिकेतील त्रिपोली हा प्रदेश हवा होता. मोरोक्को हा आफ्रिकेतील देश साम्राज्याला जोडण्याचा फ्रान्सचा मानस होता. रशियाला इराण, जपानला अति पूर्वेकडील भागाची महत्वाकांक्षा होते. (१९०५ रुसो जॅपनीज युद्धात ती पूर्ण झाली.) ऑस्ट्रेलिया ऑटोमनचे राज्य हवे होते. याचवेळी अमेरिका एक प्रबल देशाचा हळूहळू उदय होत होता. अतिप्रबळ देशाचा जागतिक शांततेला नेहमीच धोका असतो.

## ४.६ मित्र राष्ट्रे :

वसाहतींच्या साम्राज्य सत्ता टिकविण्यासाठी राष्ट्रांराष्ट्रांमध्ये मैत्री करणे. गरजेचे झाले. १८८२ जर्मनी, ऑस्ट्रिया, इटली यांनी शत्रुराष्ट्राविरुद्ध लढण्यासाठी सैन्याची मदत करण्यासाठी त्रिराष्ट्र मैत्री करार केला. असाच करार इंग्लंड, रशिया, फ्रान्स यांनी १९०७ मध्ये केला. एकमेकांविरुद्ध गट निर्माण झाले. युरोपियन सत्ता संघर्ष सुरू झाला. युद्धासाठी लढणारी समग्री व सैन्य उभारण्याची स्पर्धा सुरू झाली. परस्परांमधील द्वेष आणि संशय यामुळे शांततेचा भंग झाला. युरोपमध्ये युद्ध सुरू होईल, असा प्रचार सुरू झाला.

### ४.६.३ पॅनस्लाव्ह चळवळ आणि बाल्कनचे राजकारण :

बाल्कन या पूर्व युरोपातील प्रदेशामध्ये यामध्ये ग्रीस, रुमानिया, बल्गेरिया, सर्बिया, मॉंटनेग्रो अशी अनेक राज्ये होती. प्रथमपासूनच ती आटोमन तुर्क सम्राटाच्या अधिपत्याखाली होती. २० व्या शतकाच्या प्रारंभी ऑटोमन तुर्कांच्या साम्राज्यास उतरतीकळा आली. युरोपीयन सत्ताधिश तसेच ऑस्ट्रिया व रशिया या प्रदेशात घुसू लागले. येथील परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली. मात्र लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाच्या भावना वाढीस लागल्या. येथील लोकांना स्लाव्ह म्हणत. युरोपमध्ये स्लाव्ह अनेक देशात विभागले होते. त्या लोकांनी चळवळ सुरू केली. या चळवळीला पॅनस्लाव्ह चळवळ म्हणून ओळखले जाते.

सर्बियाच्या अधिपत्याखाली स्लाव्ह लोकांनी एकत्र यावे अशी त्यांची मागणी होती कारण सर्बियात स्लाव्ह वंशाच्या लोकांची संख्या अधिक होती. परंतु ऑस्ट्रीयाने त्या चळवळीला विरोध केला मात्र रशियाने चळवळीला पाठींबा दिला. यामधून ऑस्ट्रिया व रशिया यामध्ये शत्रुत्व निर्माण झाले. ऑस्ट्रीयाच्या साम्राज्यविस्ताराला सर्बियामुळे धक्का पोहोचणार होता. ऑस्ट्रीयाने सन १९०८ मध्ये

बोस्निया व हर्जेगोविना हे स्लाव्ह लोकांचे प्रदेश जिंकून घेतले. त्यामुळे सार्बिया व ऑस्ट्रियात तेढ निर्माण झाली.

सन १९१२ ते १९१४ या काळात बाल्कनराज्यांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ऑटोमन सम्राटाविरुद्ध दोन युद्धे केली. तुर्कांचा पराभव झाला व तुर्कांचे युरोपमधील स्थान नष्ट झाले. ऑस्ट्रियाने अल्बानिया हे स्वतंत्र राज्य स्थापन केले. कारण सर्बियाचा विस्तार रोखण्याचे ऑस्ट्रियाचे धोरण होते. त्यामुळे ऑस्ट्रिया विरुद्द सर्बिया असे चित्र निर्माण झाले. सर्बियाला रशियाचा पाठिंबा होता.

सन १९१४ मध्ये युरोपमधील वातावरण स्फोटक बनलेले होते. ऑस्ट्रियाचा राजपूत्र आर्चड्यूक फ्रान्सिस फर्डिनांड हा बोस्नियाची राजधानी साराजिव्हा येथे राज्याच्या भेटीसाठी गेला. मोटारीतून उतरत असतानाच सर्बियन तरुणाने २८ जून १९१४ रोजी राजपूत्राचा खून केला. ऑस्ट्रियाने या घटनेस सर्बियाला जबाबदार धरले व विविध अटींचा खलिदा पाठविला. सर्बियाने तो स्विकारण्यास नकार दिला. सर्बियाने आपल्या लष्करी तुकड्या सीमेवर पाठविण्यास सुरुवात केली. ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्द २८ जुलै १९१४ रोजी युद्ध पुकारले. जर्मनीने १ ऑगस्ट १९१४ रोजी रशियाविरुद्ध युद्ध पुकारले. ३ ऑगस्ट रोजी जर्मनीने फ्रान्स विरुद्ध युद्ध पुकारले. जर्मनीच्या लष्करी तुकड्यांनी बेल्जियममध्ये पूर्वीचा करार मोडून प्रवेश केला. इंग्लंडने ४ ऑगस्ट १९१४ रोजी जर्मनी विरुद्ध युद्ध पुकारले अशा तऱ्हेने पहिले महायुद्ध सुरू झाले.

## ४.६.३ पहिले महायुद्ध घटना (सन १९१४-१९१९) :

पहिले महायुद्ध ऑगस्ट १९१४ मध्ये सुरू झाले आणि ते नोव्हेंबर १९१८ पर्यंत चालू राहिले. या काळात अनेक लढाया झाल्या. सन १९१४ ची मार्नची लढाई, व्हेर्डूची लढाई, सोमाची लढाई, जेटलंड लढाई (१९१६) सन १९१७ मध्ये दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. पहिली एप्रिलमध्ये अमेरिकेने प्रत्यक्ष युद्धात प्रवेश केला. आणि दुसरी नोव्हेंबरमध्ये रशियाने युद्धातून माघार घेतली.

सन १९१५ मध्ये जर्मनीच्या पाणवुडीने ब्रिटिश प्रवाशी जहाज लुसिटानिया बुडविले या जहाजातले अमेरिकेचे १२८ प्रवाशी बुडाले. अमेरिकन संसदेने या घटनेची गंभीर दखल घेतली. अमेरिकेच्या वर्चस्वाला जर्मनीने धक्का दिला. अमेरिका हा शस्त्रास्त्रे व दारुगोळा पुरवठा करणारा प्रमुख देश होता. आर्थिक दृष्ट्या युद्ध चालू ठेवणे अमेरिकेला किफायतशीर होते. या उद्देशाने अमेरिकेने सन १९१७ मध्ये पहिल्या महायुद्धात सामिल होण्याचा निर्णय घेतला.

रशियन राज्यक्रांती (सन १९१७) याबावत वाचलेले आपणास आठवत असेल. रशियन क्रांतीकारकांनी शांततेची मागणी केली होती. लेनीनच्या नेतृत्वाखालील शासनाने क्रांतीकारकांच्या मागणी मान्य केली व युद्धातून माघार घेतली. रशियाने जर्मनीबरोबर शांततेच्या करारावर १९१८ मध्ये सह्या केल्या.

जुलै १९१८ मध्ये जर्मनीच्या पराभवास सुरुवात झाली. बल्गेरिया व तुर्कस्थानने अनुक्रमे सप्टेंबर व ऑक्टोबरमध्ये शरणागती पत्करली. ३ नोव्हेंबर रोजी ऑस्ट्रीयाच्या सम्राटाने ऑस्ट्रियात पसरलेल्या असंतोषामुळे शरणागती पत्कारली. अशाच प्रकारचे बंड जर्मनीत झाले. त्यामुळे जर्मन सम्राट दुसरा विल्यम हॉलंडला गेला. जर्मन हे प्रजासत्ताक राष्ट्र जाहिर झाले. ११ नोव्हेंबर १९१८ रोजी नव्या सरकारने करारावर सह्या केल्या आणि पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला.

पहिल्या महायुद्धात अनेक नवीन लष्करी साहित्य सामग्री वापरली गेली. मशीनगन, विषारी वायु, द्रवरूप इंधन अग्नी, पाणबुड्या, रणगाडे इ. नवीन शस्त्रास्त्रे वापरली गेली. नवीन युद्ध तंत्र, लष्करी यंत्रे दोन्ही बाजूंनी वापरली गेली. इंग्लंडने नौदलाचा रणगाडे, विमानाचा वापर केला. आर्थिक नाकेबंदीदेखील केली. फ्रेंचानी खंदकातून लढाईची युद्धनीती वापरली तर जर्मनीनी यु बोटी वापरून पाणबुडीने जहाजे बुडविण्याचा प्रयत्न केला.

## ४.८ पहिल्या महायुद्धाचे तात्कालीक परिणाम :

पहिल्या महायुद्धामध्ये अनेक विनाशकारी आणि भितीच्या घटना घडल्या. लाखो लोक मारले गेले. युरोपियन देशातील संपत्तीची खूप हानी झाली. अंदाजे १८० अब्ज डॉलर्स इतका युद्धाचा खर्च झाला. आर्थिक स्थिती ढासळल्याने सामाजिक तणाव, बेरोजगारी आणि गरिबी वाढली.

जानेवारी ते जून १९१९ च्या दरम्यान मित्र राष्ट्रामध्ये व्हर्सायच्या राजवाड्यात (पॅरिसजवळ) परिषद भरली तिथे पराभूत राष्ट्रांच्या भवितव्याबाबत चर्चा झाली. परिषदेला २७ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स यांच्या प्रामुख्यांनी निर्णय घेतले.

रशियाला यातून वगळण्यात आले. पराभूत राष्ट्रांना उपस्थित राहाण्यास बंदी घातली होती. मित्र राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांशी वेगवेगळे तह केले. व्हर्सायचा तह हा जर्मनीच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. सेंट जर्माइनचा ऑस्ट्रीयाशी तह, तुर्कस्तानचा सेव्हर्नशी तह होता.

व्हर्सायच्या तहामुळे जर्मनीचे राजकीय, आर्थिक, लष्करी खच्चीकरण करण्यात आले. जर्मनीत आक्रमक ठरवून युद्धास कारणीभूत म्हणून दोषी ठरविण्यात आले. जर्मनीला युद्धाची नुकसान भरपाई देण्यास सांगण्यात आले. सन १८७१ मध्ये जर्मनीने घेतलेले अल्सेस व लॉरेन प्रांत फ्रान्सला परत देण्यास सांगण्यात आले. फ्रान्स व जर्मनी दरम्यानचा ऱ्हाईस प्रदेश मित्र राष्ट्रांच्या नियंत्रणाखाली नि:लष्करी करण्यास सूचविले.

जर्मनीमधील कोळशाच्या खाणीचा सार खोऱ्याचा प्रदेश १५ वर्षासाठी फ्रान्सला देण्यास सांगितले. जर्मनीतील लष्कर १ लक्ष पर्यंत ठेवण्यात आले. जर्मनीकडून सर्व वसाहती काढून घेण्यात आल्या. जर्मनीच्या ताब्यातील प्रदेश बेल्जियम व पोलंडला देण्यात आले.

सेंट जर्माइनच्या तहान्वये ऑस्ट्रीयापासून हंगेरी वेगळा करण्यात आला व हंगेरी व ऑस्ट्रीया हे दोन स्वतंत्र देश झाले. तसेच ऑस्ट्रीयाने जिंकलेला काही भूभाग झेकोस्लाव्हाकिया, रुमानिया युगोस्लाव्हिया यांना द्यावा लागला.

सेव्हर्सच्या तहान्वये ऑटोमन तुर्कांच्या साम्राज्याचे विभाजन करण्यात आले. व काही प्रदेश दोस्त राष्ट्रांच्या अधिपत्याखाली आले. उदा. पॅलेस्टाईन व मेसोपोटेमिया हे ब्रिटनला देण्यात आले. सिरिया फ्रान्सला देण्यात आला. हे प्रदेश स्वावलंबी होईपर्यंत त्या त्या प्रदेशाकडे राहतील व मित्र राष्ट्र त्याची काळजी घेतील असे ठरले.

युद्ध आणि शांततेच्या तहामुळे जगाचा नकाशा बदलला. रोमानोव्ह घराणेशाही रशियन क्रांतीकारकांनी घालवून दिली. जर्मनीमध्ये होहेनझोलर्न घराणे जर्मनीत आणि हॅप्सबर्ग घराणे ऑस्ट्रीयामधून घालवून प्रजासत्ताकराज्य आणले. तुर्कस्थानमधील अनागोंदी सन १९२२ मध्ये संपली. झेकोस्लाव्हकिया आणि

युगोस्लाव्हिया स्वतंत्र देश पराभूत राष्ट्राकडून काढून घेतलेल्या प्रदेशातून निर्माण झाले. हंगेरी हा स्वतंत्र देश निर्माण झाला. तसेच बाल्टिक देश इस्टेनिया, लिथुनिया, लॅटव्हिया, फिनलँड स्वतंत्र देश झाले. रुमानिया व पोलंड यांचे क्षेत्र वाढले. युरोपमध्ये अशा प्रकारे प्रचंड बदल झाले.

पराभूत राष्ट्रांवर तह लादला गेला. त्यांची भूमिका मांडण्याची त्यांना संधी दिली नाही. यातून अमेरिका आणि रशियाच्या शक्तिसामर्थ्याचा उदय झाला. याच काळात आशिया आणि आफ्रिकेत राष्ट्रीय चळवळी बळकट झाल्या.

महायुद्ध संपण्यापूर्वीच सन १९१८ नोव्हेंबर महिण्यात अमेरिकन राष्ट्राध्य वुड्रो विल्सन यांनी शांततेसाठी १४ कलमी योजना मांडली. जागतिक शांतता नांदावी हाच प्रमुख हेतू होता. या योजनेनुसार १९२० मध्ये राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

### ४.६.६ लिग ऑफ नेशन राष्ट्रसंघ :

सन १९२० मध्ये लिग ऑफ नेशन ही जागतिक पातळीवरील शांततेसाठी काम करणारी पहिली संघटना निर्माण करण्यात आली. राष्ट्रसंघाचे मुख्य केंद्र जिनिव्हा येथे होते. राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये :

१) जागतिक शांतता टिकविणे व सुरक्षितता वाढविणे.

२) भविष्यामध्ये युद्ध होवू नयेत त्यासाठी प्रतिवंध घालणे.

३) राष्ट्राराष्ट्रांमध्ये सहकार्य वाढविणे.

४) राष्ट्राराष्ट्रातील तंटे शांततेच्या मार्गाने सोडविणे.

५) सदस्य राष्ट्रातील मजूरांची स्थिती सुधारणे.


परंतु राष्ट्रसंघ हा युद्द आणि संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अपयशी ठरला. १९३५ मध्ये इटलीने इथिओपियावर हल्ला केला. जपानने १९३६ मध्ये मांच्युरियावर हल्ला केला. या बाबत राष्ट्रसंघ काही करू शकला नाही. वसाहत विस्ताराचे धोरण चालूच राहिले. हे राष्ट्रसंघाचे अपयश होते.

### आपल्यासाठी एक उपक्रम ४.४

मानवाच्या गरजा भाविण्यासाठी पृथ्वीने पुरेसे दिलेले आहे. परंतु मानसाचा हावरटपणा भागविण्यासाठी पुरेसे दिलेले नाही. महात्मा गांधींचे हे विधान सत्य आहे का नाही? विविध उदाहरणांनी स्पष्ट करा.

## ४.७ दोन महायुद्दांच्या दरम्यानच्या काळातील जग :

दोन महायुद्धांच्या दरम्यान च्या २० वर्षाच्या काळात जगात प्रचंड बदल झाले. एका बाजूला आशिया व आफ्रिकेमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण झाली. रशियामध्ये व इतर देशात समाजवाद लोकप्रिय झाला. इटली व जर्मनीने हुकुमशाही अनुभवलेली होती. सन १९२९ मध्ये अमेरिकेत महामंदीचे संकट निर्माण झाले. या भीषण परिस्थितीचा परिणाम संपूर्ण जगावर झाला.



टिपा

### ४.७.१ फॅसिझम व नाझिझमच्या वाढीची कारणे :

पहिल्या महायुद्धानंतर अनेक राजकीय चळवळी उभ्या राहिल्या त्यांना फॅसिझम म्हणतात. सर्व चळवळी थोड्या फार प्रमाणात सारख्याच होत्या. लोकशाही व समाजवाद याला प्रखर विरोध होता. हुकूमशाहीला पाठिंबा होता. या चळवळींना राज्यकर्त्यांचा पाठींबा तसेच, उच्च वर्गीय आणि भांडवलशाहीचा पाठींबा होता कारण त्याना समाजवादाचे धोके नको होते. चळवळ्या लोकांनी दहशतवाद आणि पूनसत्र चालू केले. त्याला राज्यकर्त्यांनी आळा घातला नाही.

मुसोलिनीने इटलीमध्ये सुरू केलेल्या हुकूमशाहीस फॅसिझम हा लॅटिन शब्द (Fasces) वापरला गेला. प्राचीन रोमन साम्राज्यामध्ये फॅसिस म्हणजे अधिकारचे चिन्ह असा अर्थ होता. सन १९२२ मध्ये जेव्हा मुसोलिनी सत्तेवर आला तेव्हा इटलीच्या बादशहाचा (१९२५ ते १९४३) त्याला पाठिंबा मिळाला. त्याने राजकीय पक्षांना बंदी घातली. लोकांच्या पाठिंब्यासाठी मुसोलिनीने काही सुधारणाही केल्या. विजयी राष्ट्रांची मगुरी, युद्धानंतर समस्या सोडविण्याची प्रचलित सरकारची अकार्यक्षमता, राष्ट्रसंघाची प्रश्न सोडविण्याची निक्रियता, लोकशाही शक्तींना फॅसिझम रोखू शकले नाही यातूनच हुकूमशाहीचा उदय झाला.


ॲडॉल्फ हिटलरने नाझिझम सुरू केला. फॅसिझमचे जर्मन भाषेत नाझिझम हे भाषांतर. पहिल्या महायुद्धात जर्मनीचे झालेले नुकसान भरून देण्याचे व जर्मनीला पुन्हा वैभव प्राप्त करून देण्याचे हिटलरने वचन दिले. जर्मनीची पुनर्बांधणी एका मोठ्या देशाच्या स्वरूपात करण्याचे त्याचे धोरण जर्म नांना आवडले. नाझीवादामुळे आर्थिक घसरण थांबले असे वाटल्याने बऱ्याच लोकांनी नाझीवादाला पाठिंबा दिला परंतु हा वादजर्मनीमधील जनतेबरोबरच युरोपातील बऱ्याच राष्ट्रांना त्रासदायक ठरला. यामुळे हंगेरी, रुमानिया, पोर्तुगाल स्पेन या देशात हुकूमशाही निर्माण झाली. अनेक देशातील लोकशाही विरोधी प्रशासनामुळे दुसरे महायुद्ध लढले गेले.

### ४.७.२ जगाच्या इतर ठिकाणची स्थिती :

इंग्लंड, फ्रान्स यांनाही आर्थिक झळ पोहचली. टंचाई, बेकारी या समस्याही होत्या. तरीही त्यांच्याकडे लोकशाही प्रशासन होते. कामगार संपामुळे आणि इतर अडचणींमुळे सरकार कोसळते व मजूर पक्ष लिबरल पक्ष व कॉंझरवेटीन्ट पक्ष यांचे संयुक्त सरकार १९३१ ला सत्तेवर आले. फ्रान्समध्ये १९३६ मध्ये डावी आघाडी सत्तेवर आली.

रशियामध्ये साम्यवादाचा जगात प्रथम उदय झाला. आर्थिक बबीत सामाजिक तत्त्वांचा अवलंब केल्याने १९२९ च्या जागतिक महामंदीचा परिणाम रशियावर झाला नाही.

अमेरिका हा पहिल्या महायुद्धात सामिल होऊनही त्यात अमेरिकेचे फारसे नुकसान झाले नव्हते. औद्योगिक संपन्नता, राजकीय स्थिरता आर्थिक विकास यामुळे अमेरिका महासत्ता (Super Power) ठरली. अतिरिक्त उत्पादन आणि पडलेल्या किमती यामुळे १९२९ मध्ये अमेरिकेस महामंदी आली. बाजारातील शेअर्सच्या किंमती कमी झाल्या. बँका बंद पडल्या. लोकांची बचत नष्ट झाली. पहिल्या महायुद्धात अमेरिकेने युरोपियन देशांना कर्ज दिले होते ते काढून घेतले. त्याचा परिणाम युरोपवर झाला. अमेरिकेत नवीन सरकार आले. फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी आर्थिक वसुली नवीन धोरण सुरू केले. शेतकऱ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या नव्या रोजगाराची निर्मिती केली.



जपान हा आशियातील साम्राज्यवादी देश म्हणून उदयास आला. जपानने रशियाचा १९०५ मध्ये पराभव केलेला होता. दोन महायुद्धांच्या दरम्यान जपान लष्करीदृष्ट्या प्रबळ बनला. त्यानी फॅसिझमला पाठींबा दिला. रोम बर्लिन टोकियो करारावर सह्या केल्या. जपान फॅसिस्ट शक्तीबरोबर सहभागी झाला. साम्यवादी रशियाच्या विरोधात जर्मनी व इटली यांच्याशी हातमिळवणी केली.

## ४.८ दुसरे जागतिक महायुद्ध :

लिग ऑफ नेशन राष्ट्र संघाच्या अपयशाबद्दल आपण पाहिले आहे स्थापन झाल्यानंतर वीस वर्षाच्या आतच युद्ध होवू नयेत हे उद्दिष्ट राष्ट्रसंघ गाठू शकले नाही. ३ सप्टेंबर १९३९ रोजी सुसरे महायुद्ध सुरू झाले. युद्धाची कारणे शोधू.

### ४.८.१ दुसऱ्या महायुद्धाची कारणे :

पहिल्या महायुद्धाप्रमाणे दुसरे महायुद्ध युरोपमध्ये सुरू झाले आणि त्याला जागतिक महायुद्धाचे स्वरूप आले. फॅस्टिस्ट देशांनी साम्राज्य विस्तारातून लाभ व्हावा त्यासाठी जगाची पुनर्विभागणी हवी होती. त्यातून सत्ता संघर्ष सुरू झाला. आपणस माहित आहे की व्हर्सिलिसच्या तहाने जर्मनी राजकीय, लष्करी व आर्थिक दृष्ट्या खच्ची झालेले होते, तरीसुद्धा जर्मनीने बदल होण्याची तयारी केली. इटलीची परिस्थिती त्यापेक्षा चांगली नव्हती. साम्राज्य मिळविण्यासाठी मित्र राष्ट्रांच्या जोरावर पहिल्या महायुद्धात इटली उतरलेली होती तर महायुद्धानंतर त्यांना एकही वसाहत मिळालेली नव्हती. युद्धात इटलीचे ६ लक्ष लोक मृत्यूमुखी पडलेले होते. परंतु फॅसिस्ट व नाझी पक्ष वैभवाचे दिवस युद्धाने आणू असे लोकांना पटवून देत होते. जर्मनीने ऱ्हाईन लैंड हा प्रदेश १९३६ मध्ये मिळविला. ऑस्ट्रीया १९३८ मध्ये, तर झेकोस्लाव्हाकीया १९३८ मिळविला. इटलीने इथिओपियावर हल्ला केला. या प्रकारे युरोपमध्ये तणाव होता.

जपानच्या उदयाबद्दल लष्कराचा विस्तार आणि फॅसिस्टांच्याबरोबर केलेला करार याबद्दल आपण वाचलेच असेल. रोम बर्लिन टोकियो करारान्वये तीन शक्ती एकत्र आल्या. जपानला आशियामध्ये पॅसिफिक क्षेत्रवर मोकळीक मिळाली तर जर्मनी व इटलीला यरोपमध्ये मोकळीक मिळाली.

रशियातील समाजवादी शासनाच्या यशाने पाश्चिमात्य राष्ट्रांना धक्काच बसला, पाश्चिमात्य भांडवलदार राष्ट्रांना समाजवादावर नियंत्रण ठेवावयाचे होते. त्यासाठी त्यांनी इटली व जर्मनीला जवळ केले. कारण इटली व जर्मनीचा समाजवादाला विरोध होता. शांतता राखण्याचे हे एक धोरण होते. जर्मनीने आपले सैन्यबल १ लाखापासून ८ लाखापर्यंत वाढविले. त्यांना कोणीही रोखले नाही हिटलरने व्हर्सि लिसचा तह फेटाळला आणि ऱ्हाईन लॅंड व ऑस्टिया हे देश ताब्यात घेतले. तरीही पश्चिमात्य शांत राहून बघ्याची भूमिका घेत होते. १९३७ मध्ये स्पेनमध्ये नागरी युद्ध झाले. स्पेनमध्ये लोकशाही सरकार होते. तरीसुद्धा जनरल फ्रँकोला मदतीसाठी हिटलरने दारू गोळा व लष्करी साहित्य पुरविले. जनरल फ्रँकोवर कार्यवाही करावी अशी रशियाने इंग्लंडकडे मागणी केली. प्रचिलित सरकारला जर जगाचा पाठिंबा असेल तर इंग्लंड व फ्रान्सने कार्यवाही तरी कशी करणार? शांततेच्या धोरणाने कळस गाठला. हिटलरने ब्रिटन व फ्रान्सच्या पंतप्रधानांना १९३८ मध्ये म्युनिच येथे निमंत्रित केले. १९३८ ला म्युनिच करारावर सह्या झाल्या. जर्मनीने झेकोस्लाव्हाकियाचा उत्तर भाग घेतला नंतर संपूर्ण झेकोस्लोवाकियाच घेतला. यातून फॅसिस्टचे बळ वाढले.

ब्रिटन व फ्रान्सला वाटत होते की इटली व जर्मनीने रशियाच्या विरुद्ध जावे. याच वेळी जर्मनीने रशियाशी युद्ध न करण्याचा करार केला. त्यामुळे काही काळ तरी रशिया शांत असणार होता दुसऱ्या महायुद्धाचे चित्र स्पष्ट झाले. जर्मनीने पोलंडवर १ सप्टेंबर १९३९ ला हल्ला केला आणि इंग्लंडने जर्मनीविरुद्ध ३ सप्टेंबरला युद्ध जाहीर केले.

## ४.८.२ दुसऱ्या युद्धाचे परिणाम :

दुसरे महायुद्ध सप्टेंबर १९४५ मध्ये संपले. हे युद्ध मानवी इतिहासातील सर्वात मोठे विनाशकारक युद्ध होते. अपरिमित जीवित व वित्तहाणी, संपदाचा विनाश झाला. मोठ्या इमारती जमिन दोस्त झाल्या. हजारो लोक बेघर झाले. जर्मनीतून ज्यूलोकांना कारागृहात पाठविले. जपानच्या हिरोशिमा नागासाकी या शहरावरील बॉम्ब हल्ल्यामुळे नष्ट झाली. आणुयुद्धाची भीति ही या युद्दाची सर्वात वाईट बाब आहे. जर्मनीचे चार तुकडे झाले. प्रत्येक तुकडा एका भाग विजयी राष्ट्राकडे देण्यात आला. नाझी सक्षावर बंदी घालण्यात आली. जर्मन लष्कर घरी पाठविले. जपानवर अमेरिकेची देखरेख राहिली. सन १९४९ पर्यंत अमेरिकन सैन्य जपानमध्ये होते.

साम्राज्यवाद कमकुवत झाला, अमेरिका आणि रशिया या महाशक्ती उदयास आल्या. पाश्चिमात्यांचे नेतृत्व अमेरिकेकडे तर समाजवादी सत्तेचे रशियाकडे नेतृत्व आले. दोन्ही बाजूंमध्ये दीर्घकाळ शीत युद्ध सुरू राहिले.

दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम म्हणून युनोची स्थापना झाली. त्या विषयीची माहिती पुढील भागात मिळेल. जागतिक स्तरावर मोठे बदल झाले. जगाचा नकाशा बदलला. आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देश वसाहतीतून मुक्त झाले. ते आत्ता स्वतंत्र झाले. एकत्रितरित्या जगातील मोठी शक्ती निर्माण झाली.

### आपल्यासाठी एक उपक्रम ४.५

जागतिक महायुद्धातून जगाचा विनाश होत असलेला पाहिलेला आहे. आजही त्याचा संघर्ष सुरू आहे. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यामध्ये येणाऱ्या पाच समस्यांची यादी करा. विविध उदाहरणाच्या सहाय्याने व्यक्तिगतरित्या जागतिक शांततेसाठी काय करता येईल ते नमूद करा.

जागतिक युद्धाचा थरार पाहून सर्व जगाला जागतिक शांततेसाठी संघटनेची आवश्यकता वाटली. ब्रिटिश पंतप्रधान विंस्टन चर्चील, रशियन नेते स्टॅलिन, अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट यांनी संघटनेबाबत चर्चा करून निर्णय घेतला. २४ ऑक्टोबर १९४५ या दिवशी सॅन्फ्रॅसिस्को येथे ५० सदस्य राष्ट्रांची बैठक होऊन संयुक्त राष्ट्रसंघाची घटना स्विकारली. जगभर २४ ऑक्टोबर हा दिवस युनोचा स्थापनादिन म्हणून साजरा केला जातो. सर्व राष्ट्रांचा सार्वभौमत्वात समानता असावी या तत्वावर युनो उभारलेली आहे. जागतिक शांतता टिकविणे, जागतिक राष्ट्रांची सुरक्षितता टिकविणे, भविष्य काळातील युद्ध रोखणे राष्ट्राराष्ट्रातील तंटे शांततेच्या मार्गाने सोडविणे, राष्ट्राराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे ही युनोची मुख्य उद्दिष्ट्ये आहेत.

### तुम्हास हे माहित आहे का ?

युनोच्या ध्वजावर काय आहे माहीत आहे का? निळ्या पार्श्वभूमीवर उत्तण ध्रुवाकडून दिसणारा पृथ्वीचा गोल, त्याभोवती ऑलिव्हची फांदी मध्यभागी पांढरा रंग

## ४.९.१ संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये :

पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली. त्याच धर्तीवर आंतरराष्ट्रीय शांततेच्या व सुरक्षिततेच्या हेतूने युनोची स्थापना केली. राष्ट्राराष्ट्रामध्ये मैत्रीचे संबंध निर्माण व्हावेत व आंतरराष्ट्रीय सहकार्याने आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक व मानवतेच्या दृष्टीने समस्या सोडवाव्यात. मानवी हक्क मूलभूत स्वातंत्र्ये लोकांना प्राप्त व्हावे हे युनोचे उद्दिष्ट आहे. युनोची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मानवी कल्याणासाठी राष्ट्राराष्ट्रांमधील सकारात्मक घडामोडींमध्ये एक वाक्यात निर्माण करणे हे युनोचे काम आहे.

### पाठ्यांशावरील प्रश्न ४.३

१. चार बाल्कन राष्ट्रांची नावे लिहा.

२. त्रिमैत्री करारातील देश कोणते?

३. पहिल्या जागतिक महा युद्धाची किमान तीन कारणे लिहा.

४. १९२0 नंतर हुकुमशाही स्वीकारणारे दोन देश लिहा.

५. सन १९२९ ची जागतिक महामंदिची प्रमुख कारणे कोणती?

६. युनोची स्थापना कधी व कोठे झाली?

### आपण काय शिकलो.

- १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात वसाहतवाद सुरू झाला त्यालाच नवा साम्राज्यवाद म्हणतात.
- वसाहत विस्ताराचे प्रमुख कारण म्हणजे औद्योगिक क्रांती. वाहतुक दळणवळण साधनांचा विकास, शक्तीचे प्रदर्शन व राष्ट्रप्रेम इत्यादी.
- जपान हा आशियातील एकमेव साम्राज्यवादी देश.
- साम्राज्यविस्ताराच्या अतिरेकामुळे युरोपियन देश परस्परांचे शत्रू बनले. राष्ट्राराष्ट्रातील लष्करी करारांचा परिणाम म्हणजे १९१४ जागतिक महायुद्ध होय.

- ❖ व्हर्सिलिसच्या तहानुसार जर्मनीला वाईट वागणूक दिली. काही वसाहती सोडाव्या लागल्या, युरोपमध्ये प्रादेशिक बदल झाले. ऑटोमॅन प्रदेशाचे विभाजन झाले. हंगेरी स्वतंत्र झाली. राष्ट्रसंघाची स्थापना झाली.
- ❖ मुसोलिनीने इटलीमध्ये फॅसिझमची तर जर्मनीत हिटलरने नाझीझमची वाढ केली व १९१९ ते १९३९ पर्यंत लोकशाही, स्वातंत्र्य, समाजवाद, दाबून टाकला.
- ❖ जर्मनीवर घातलेल्या बंधनामुळे दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटले.
- ❖ युनोची स्थापना, जर्मनीचे विभाजन, साम्राज्यवादी शक्तीचा घटता प्रभाव आशिया व आफ्रिकेत उदयास आलेली स्वतंत्र राज्ये हा दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम आहे.
- ❖ दोन्ही महायुद्धानंतर दोन महासत्ता निर्माण झाल्या. अमेरिका आणि रशिया यातून शीतयुद्ध सुरू राहिले.
- ❖ महायुद्दानंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना जागतिक शांतता व ऐक्य यासाठी झाली.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. सुती वस्त्र उद्योगामध्ये संशोधनातून कशी क्रांती घडून आली?

२. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून येण्यासाठी राजकीय, आर्थिक, भौगोलिक तांत्रिक घटकांचे सहकार्य कशा प्रकारे लाभले?

३. औद्योगिक क्रांतीचे समाजावर कोणते अनुकूल व प्रतिकूल परिणाम झाले?

४. ज्या देशात औद्योगिक क्रांती झाली ते देश जेथे औद्यागिक क्रांती झाली नाही त्या देशांवरील वर्चस्वासाठी का भांडत होते?

५. जपानला वसाहतींच्या स्पर्धेमध्ये का उतरावे लागले?

६. साम्राज्यशाहीचा वसाहतीवरील अनुकूल व प्रतिकूल परिणाम लिहा.

७. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या परिणामाचे परिक्षण करा.

८. इटलीतील फॅसिझम व जर्मनीतील नाझिमच्या उदयास कारणीभूत असलेल्या पश्चिमात्यांची धोरणे लिहा.

९. दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा घटना क्रम लिहा.

१०. संयुक्त राष्ट्रसंघाची प्रमुख उद्दिष्ट्ये लिहा.

११. जगाच्या नकाशा आराखड्यात पुढील ठिकाणे दाखवा.



**जगाचा नकाशा**

१) ब्रिटिश व फ्रान्सच्या दोन वसाहती

२) त्रिमैत्री राष्ट्रे आणि जागतिक महायुद्धातील तीन राष्ट्रांचा गट

३) मित्रराष्ट्र आणि संयुक्त शक्तींची दुसऱ्या महायुद्धातील देश

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

### ४.१

१) दगडी कोळसा व लोह

२) जलद व विश्वासार्ह वाहतुक साधनांनी कच्चा माल उत्पादन केंद्राकडे व तयार माल सुयोग्य ठिकाणी पोहचविल्याने व्यवसाय वाढला.

३) मुले शरीराने लहान असल्याने कोळशाच्या खाणीत अरुंद ठिकाणी जावू शकतात. तसेच त्यांना पगारही कमी द्यावा लागत असल्याने त्यांना प्राधान्य.


४) अ) ३ ब) ५ क) १ ड) २

### ४.२

१) साम्राज्यवाद म्हणजे दुसऱ्या देशातील राजकीय, आर्थिक नियंत्रण आणून वसाहत स्थापन करणे.

२) दोन लाभ

१) वसाहतीतून माल आपल्या साम्राज्यात आणणे सुलभ जाते.



२) सैन्य वसाहतीमध्ये पाठवून वसाहत आपल्या नियंत्रणाखाली ठेवता येते.

३) अ) १ १) ३ क) २ ड) ३

**४.३**

१) ग्रीस, रुमानिया, वल्गेरिया, सर्बिया, मोन्टेनिग्रो

२) जर्मनी, ऑस्ट्रीया, इटली

३) पहिल्या जागतिक महायुद्धाची कारणे ˊ

अ) जर्मनीचा औद्योगिक देश म्हणून उदय झाल्याने कच्च्या माल मिळविण्यासाठी इंग्लंड आणि फ्रान्सबरोबर साम्राज्य विस्तार व वसाहत स्पर्धा

ब) मित्र राष्ट्रांचे दोन गट पडले. त्रिमित्र आणि त्रिसदस्य राष्ट्र यातून संघर्ष व ताण निर्मा ण झाला.

क) बाल्कन प्रदेशातील देश प्रेमींची पॅनस्लाव्ह चळवळ करणाऱ्या लोकांना स्वातंत्र्य हवे होते.

४) इटली व जर्मनी

५) अतिरिक्त उत्पादनामुळे वस्तुच्या किंमती कमी झाल्या, शेअर्सच्या किमती कमी झाल्या. वँका वंद पडल्या, लोकांच्या ठेवी वुडाल्या ही स्थिती १९२९ मध्ये आली.

६) २४ ऑक्टोवर १९४५ या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना अमेरिकेतील सॅन फ्रॅन्सिस्को येथे झाली.

५

# भारताच्या आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर ब्रिटिश राजवटीचे परिणाम (१७५७-१९५७)

१८ व्या शतकाच्या दरम्यान जागतिक पातळीवर काही महत्त्वाच्या घटना घडल्या. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली ती क्रमाक्रमाने युरोपमधील अन्य देशात पोहचली. इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीबरोबर नवीन सागरी मार्गाचा शोध लागला. सन १४९८ मध्ये पोर्तुगीज खलाशी वास्को द गामाने भारतात पोहचण्याचा मार्ग शोधला. त्यामुळे ब्रिटिश, फ्रेंच, पोतुगीज, डच भारतात व्यापाराच्या निमित्ताने आले. त्यावरोबरच मिशनरींनी धर्म प्रसार केला. भारताचा आधुनिक इतिहास म्हणजेच युरोपियन लोक भारतात आल्यानंतरचा इतिहास होय. सदरच्या प्रकरणामध्ये ब्रिटिश लोकांचा भारतातील प्रवेश व त्याचा भारतीय आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थितीवरील परिणाम आपण अभ्यासणार आहोत.

## उद्दिष्टे :

सदरचा पाठ अभ्यासामुळे पुढील माहिती मिळेल.

- भारतात ब्रिटिश लोक का आले याची कारणे.
- भारतात ब्रिटिशांनी वसाहती कशाप्रकारे स्थापन केल्या हे अभ्यासणे.
- ब्रिटिश राजवटीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे.
- ब्रिटिशांचा भारतीय समाज व संस्कृतीवर झालेला परिणाम अभ्यासणे.
- १८५७ पूर्वी ब्रिटिशांनी भारतीय चळवळींना कसे थोपविले?

## ५.१ भारतात येण्याची कारणे :

ब्रिटिश आणि युरोपियन भारतात प्रामुख्याने व्यापाराच्या निमित्ताने आले. ब्रिटनमधील औद्योगिक क्रांती झाली व त्यामुळे कारखान्यांना कच्च्या मालाची गरज भासू लागली. त्याच्या जोडीलाच पक्क्या मालाला बाजारपेठेची गरज भासली. या दोन्हीसाठी भारत योग्य देश होता. भारतात त्या काळात

अंतर्गत सत्ता स्पर्धा चालू होती. मोगल साम्राज्याला उतरती कळा लागलेली होती ही ब्रिटिशांना चांगली संधी मिळाली. त्यासाठी त्यांना लढाया कराव्या लागल्या, करार करावे लागले. मैत्रीचा त्यांनी हात दाखवून देशभर सत्ता मिळविली. त्यांच्या नवीन प्रशासकीय व आर्थिक धोरणांमुळे त्यांनी देशभर राज्य मिळविले. गरीब शेतकऱ्यांकडून प्रचंड महसूल जमा केला जात असे. ब्रिटन मधील उद्योगधंद्यासाठी लागणारा कच्चा माल तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना व्यापारी पिके घेण्यासाठी राज्यकर्ते सक्ती करीत. राजकीय नियंत्रणामुळे भारतीय व्यापारामध्ये ब्रिटिशांची मक्तेदारी झाली. त्यांनी परकीय शत्रूंचा पराजय केल्याने स्पर्धक राहिला नाही. ब्रिटिश व्यापरी कच्च्या मालाची स्वस्तात खरेदी करीत परंतु तोच कच्चा माल भारतीय विणकाम कारागिरांना जास्त भावाने खरेदी करावा लागे. भारतीय व्यापाऱ्यांच्या मालावर ब्रिटनमध्ये कर द्यावा लागे. मात्र ब्रिटिशांच्या व्यापाऱ्यांना सवलत असल्याने त्यांचे रक्षण होत असे.

ब्रिटिश व्यापऱ्यांच्या मालाची शेतापासून बंदरापर्यंत किंवा बंदरापासून बाजरपेठेपर्यंत स्वस्तात वाहतूक होत असे. ब्रिटिशांनी भारतात. शिक्षणाचा प्रारंभ केला. कारण व्यापारास मदत करणारी माणसे हवी होती. अशाप्रकारे भारतात ब्रिटिशांनी भक्कम पाय रोवले.




**आकृती ५.१ : ईस्ट इंडिया कंपनीचे चलन**




**आकृती ५.२ : भारतात ईस्ट इंडियाचे चलन**

## ५.२ भारतातील वसाहत पद्धती :

युरोपचा नकाशा पहा त्यामध्ये लहानमोठे देश दिसतात. युरोपमधील लहान देशांमध्ये उद्योगधंद्यांना पुरविता येईल इतका कच्चा माल किंवा कारखान्यातील तयार मालासाठी बाजारपेठी पुरेशी नव्हती. युरोपियन देश आशिया आणि आफ्रिकेतील बाजारपेठ शोधू लागले. इंग्लंडने भारतातील व्यापारावर नियंत्रण मिळविले व इ. स. १६00 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. या कंपनीला ब्रिटिश सरकारचा पाठिंबा होता. ब्रिटिश शासनाकडून पाठींबा मिळाल्याने ईस्ट इंडिया कंपनीचा विस्तार भारतीय उपखंडापर्यंत पोहचला. सन १६१३ मध्ये पहिला सुरत येथे कारखाना काढला. इ. स. १६१५ मध्ये सर थॉमस रो ने मोगल सम्राट जहांगिरकडून आग्रा, अहमदाबाद, बडोदा येथे आणखी कारखाने काढण्यास परवानगी मिळविली. दक्षिणेकडे मद्रास येथे त्यांनी एका किल्ल्यात बंदिस्त कारखाना काढला. त्याला फोर्ट सेंट जॉर्ज म्हणून ओळखले जाते. भारतीय भूमिमध्ये हक्क असलेली ही ब्रिटिशांची पहिली कंपनी. त्यानंतर हळूहळू व्यापाराची व्याप्ती वाढली. एव्हाना ईस्ट इंडिया कंपनीला स्थिरता लाभली होती. प्रतिस्पर्ध्यांना भारतातून हुसकावून देण्यातही ते यशस्वी झाले. त्यांनी आता भारतीय राजकारणात ढवळाढवळ करण्यास प्रारंभ केला.




**आकृती ५.३ सध्याचा युरोपचा नकाशा**

### तुम्हास हे माहित आहे का ?

सन १६९६ मध्ये इस्ट इंडिया कंपनीने बंगालमध्ये तीन गावे वसविली त्याचे नाव कोलकता. तेथे किल्ला बांधला त्याला फोर्ट विल्यम म्हणून ओळखले जाते.

## भारताच्या आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक घटकांवर ब्रिटिश राजवटीचे परिणाम (१७५७-१९५७)

१९ व्या शतकातील भारताचा नकाशा पहा? काय पाहिलेत? त्यामध्ये लहानमोठी राज्ये होती. प्रत्येक राज्याला स्वतंत्र राजा होते, अर्थरचना भाषा प्रशासन, अर्थव्यवस्था आणि संस्कृती होती. त्यांच्यामध्ये आपापसात युद्धे होत. प्लासीची लढाई (१७५७) बक्सारची लढाई (१७६४) यामध्ये ब्रिटिश विजयी झाले. येथून पुढे ब्रिटिश राज्यसत्ता भारतात दीर्घकाळ राहिली.

प्लासीच्या लढाईमध्ये ब्रिटिशांनी बंगाल प्रांत जिंकला. त्यांनी मीर जाफरला बंगालचा नवा नवाब बनविला. त्याच्या बदल्यास ब्रिटिशांनी खूप पैसा घेतला तसेच नवाबाकडून २४ परगाना हा प्रदेश घेतला. यापुढे तो पैसे देवू शकला नाही त्यामुळे ब्रिटिशांनी मीरजाफर ऐवजी मीर काशीमची नेमणूक केली. त्याच्याकडूनही ज्यादा पैशाची मागणी पूर्ण होऊ शकली नाही त्यामुळे मीर जाफरला पुन्हा नवाब म्हणून पद दिले. चिडलेल्या मीर काशीमने अवधचा नवाब सीराज उद्यौल आणि मोगल बादशहा शहा अलम दुसरा याला मदतीला घेतले. ब्रिटिशांच्या बरोबर बक्सार येथे २ ऑक्टोबर १७६४ ला युद्ध झाले. यात ब्रिटिशांचा विजय झाला.




**आकृती ५.४ : १९ व्या शतकातील भारताचा नकाशा**

बंगाल प्रांत ब्रिटिशांच्या ताब्यात आलेला असला तरी संपूर्ण देशावर राज्य करणे ब्रिटिशांना अवघड होते. अनेक स्थानिक राज्यकर्ते ब्रिटिशांच्या विस्तारास विरोध करीत होते.

भारतीयांवर ब्रिटिशांनी लादलेल्या युद्धाबाबतची माहिती पाहू.

### १. ब्रिटिश म्हैसूर युद्ध :

म्हैसूर प्रबळ नेतृत्व असलेल्या हैदरअली आणि त्याचा मुलगा टिपू सुलतान यांच्या ताब्यात एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत होते. म्हैसूर आणि ब्रिटिश याच्यामध्ये चार युद्धे झाली. चौथ्या ब्रिटिश म्हैसूर युद्धामध्ये (१७९९) शूर टिपू सूलतानचा मृत्यू झाला व म्हैसूर ब्रिटिश युद्ध संपुष्टात आले. कॅनरा बंदर, कोईमतूर आणि श्रीरंगपट्टम ब्रिटिशांच्या ताब्यात आले.



आकृती ५.५ : टिपू सूलतान

### २. ब्रिटिशमराठा युद्ध :

अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत पश्चिम व मध्यभारतामध्ये मराठ्यांचे प्रबळ व वैभवशाली राज्य होते. परंतु त्यांच्यामध्ये आपापसातच सत्तेसाठी सतत संघर्ष चालू होता. त्याचा लाभ ब्रिटिशांनी घेतला व मध्यस्ती केली. ब्रिटिश व मराठा यांच्यामध्ये युद्दाचे कारण म्हणजे दुहेरी तह (विस्तृत माहिती ५.२.१ मध्ये) इंग्रज मराठी तिसरे युद्ध (१८१७१९) हे अन्तिम ठरले. ब्रिटिशांनी पेशव्यांचा पराभव केला व संपूर्ण प्रदेश काबीज केला व पेशव्यांना बिठूर (कानपूर) उत्तर प्रदेश येथे पाठविले.

### ३. ब्रिटिश शिख युद्ध :

वायव्य भारतामध्ये शीखांचे साम्राज्य होते. महाराजा रणजीत सिंह (१७९२१८३९) प्रभावी राजकीय व लष्करी व्यक्ती होती. भारतातील ब्रिटिश अधिकाऱ्यांना शिखांची सुप्त भीती होती. त्यासाठी शिखांवर नियंत्रण ठेवणे इंग्रजांना जरूरी होते. रणजित सिंहांच्या मृत्यूनंतर (१८३९) तेथे अंदाधुंदी

माजली. या घटनेचा ब्रिटिशांनी लाभ घेतला. १८४५ मध्ये इंग्रज शीख युद्दात शीखांचा पराभव झाला. १८४९ गुजरातच्या लढ्यातही शीखांचा पराभव झाला. (चिनाबनदीवरील गुजरात शहर) शीख सरदारांनी शरणागती पत्करली आणि लॉर्ड डलहौसीने पंजाब ताब्यात घेतले. महाराजा दिलिपसिंह (रणजितसिंहाचा मुलगा) यांसा तनखा देवून त्याची इंग्लंडला रवानगी करण्यात आली.



**आकृती ५.६ : महाराजा रणजित सिंह**

### ५.२.१ इतर मोहिमा :

पानिपतच्या तिसऱ्या युद्धात (१७६१) मराठ्यांचा पराभव झाला. आणि भारतात राज्य करण्यात ब्रिटिशांना यश मिळाले. अनेक राज्ये ब्रिटिशांच्या ताब्यात आली. त्यांनी राज्य खालसा करण्याचे धोरण अवलंबिले आणि ते प्रदेश आपल्या प्रदेशाला जोडले. जोडलेल्या प्रदेशाला ब्रिटिशांचे संरक्षण मिळे परंतु त्या राजाला वारस नसेल तर त्याच्या दत्तक पुत्रास वारस म्हणून मंजूरी मिळत नसे किंवा तनखा मिळत नसे. या ब्रिटिश धोरणाने (मराठी राज्य) सातारा (१८४८), संबळपूर (१८५0), उदयपूर (१८५२), नागपूर (१८५३), झांशी (१८५४), अवध (१८५६) राज्ये खालसा केली. त्यांचे सैन्यही निलंबित केले. इंग्रजांनी जिंकलेल्या प्रदेशावरील स्थानिकांचे अधिकार काढले. तसेच कोणत्या

परकीय राज्यावरोबर मैत्री करायचे यावरही ब्रिटिशांचे नियंत्रण आले. याच्या बदल्यात जोडलेल्या प्रदेशास फक्त त्या प्रदेशाच्या शत्रूपासून ब्रिटिशांनी संरक्षण दिले.

ब्रिटिशांनी जोडलेल्या प्रदेशाच्या राज्य कर्त्यावर गंभीर परिणाम झाला. त्याचे सैन्य, सर्वसामान्य माणूस, पारंपारीक व्यावसायिक धर्मगुरू जमिनदारही भिकेला लागले. राजघराण्यातील व्यक्तिबद्दलचा आदर कमी झाला. ब्रिटिशांना थोपविणारी एकही सत्ता एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर राहिली नाही.आसाम, अराकान ईशान्येकडील प्रदेश, नेपाळ, ब्रह्मदेश हे प्रदेश १८१८ ते १८२६ पर्यंत जोडले तर सिंध प्रांत १८४३ मध्ये ब्रिटिश साम्राज्याला जोडला गेला.



**आकृती ५.७ : झाशीची राणी लक्ष्मीबाई**

## आपल्यासाठी एक उपक्रम ५.१

अशी कल्पना करा की तुम्ही एकोणिसाव्या शतकातील राज्याचे पुतणे / पुतणी आहात. तुमचे वय १५ वर्षे आहे. राजाला पुत्र नसल्याने तुम्हाला वारसा म्हणून जवाबदारी दिली परंतु ब्रिटिशांच्या राज्य खालसा धोरणामुळे तुम्हाला तुमच्या चुलत्याकडून वारसाने राजपुत्र म्हणून पद स्वीकारता येणार नाही अशा परिस्थितीत तुम्ही कोणती भूमिका घ्याल?

## पाठ्यांशावरील प्रश्न ५.१

१. अचूक उत्तरावर बरोबर अशी √ खूण करा.

अ) भारतात ब्रिटिश लोक .......... म्हणून आले.

१) प्रदेश जिंकण्यासाठी २) प्रवाशी ३) लुटारू ४) व्यापारी

ब) मीर जाफर हा ......... चा नवाब होता.

१) म्हैसूर २) पंजाब ३) बंगाल ४) वऱ्हाड

२. ब्रिटिश भारतात का आले? कोणतीही दोन कारणे लिहा.

३. स्थानिक राज्ये जोडण्यासाठी ब्रिटिशांनी कोणती पद्धती अवलंबिली?

## ५.३ आर्थिक परिणाम :

औद्यागिक क्रांतीमुळे ब्रिटिश व्यापाऱ्यांनी आशियातून फार मोठी संपत्ती मिळविली. त्यामुळे त्याला असे वाटू लागले की आपणच भारतात उद्योगधंदे उभे करू व व्यापार करू. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धा त व एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्लंडमध्ये सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे घाऊक उत्पादन मिळू लागले. इस्ट इंडिया कंपनीने भांडवल पुरवठा केला. व्यापारापेक्षा उद्योग धंद्यातील नफा अधिक आहे. हे लक्षात आले त्यासाठी भारतातून अधिक कच्चा माल जमा करणे व तयार माल भारतात पाठविणे हे त्यांचे धोरण होते. सन १७९३ ते १८१३ ब्रिटिश उद्योजकांनी ईस्ट इंडिया कंपनीला बाजूला केले व भारतातील ब्रिटिश औद्योगिक वसाहत म्हणून उदयास आली.

भारतीय उद्योग व व्यापारावर काय परिणाम झाला ते पाहू.

### ५.३.१ सुती वस्त्र उद्योग व व्यापार :

भारतीय हातमाग उत्पादनास युरोपमधून मोठी मागणी असे. भारतीय कापड, रेशीम, लोकरी वस्त्रे ही आशिया व आफ्रिकेच्या बाजारपेठेत खपत होती. कारखान्यात मालाचे उत्पादन होवू लागल्याने सर्वत्र तोच माल दिसू लागला. कारखान्यातील माल व हातमागावरील माल याची तुलना करता कारखान्यातून आलेला माल स्वस्त होता. ब्रिटिश मालाला कर नसल्याने स्वस्त भावामुळे विक्री वाढली. भारतीय मालावर देशाबाहेर माल पाठविल्यास त्यावर अधिक कर द्यावा लागे. त्यामुळे उद्योगांच्या भारतीय व्यवसायावर दबाव होता. इंग्लंडने भारतीयमालावर कर लावला. यामुळे पूर्वी भारत कापड निर्यात करीत असे. त्याऐवजी कापसाचा कच्चा माल निर्यात करणे व कापड आयात करणे सुरू झाले. याचा परिणाम म्हणजे भारतीय हातमाग उद्योजक पूर्णपणे संपले. विणकाम कारागिर बेकार झाले व ते शेतमजूर म्हणून काम करू लागले. याचा परिणाम ग्रामीण जीवन व अर्थव्यवस्थेवर झाला. या स्पर्धे मुळे भारतीय हातमाग उद्योग संपुष्टास आला.

### तुम्हास हे माहित आहे का ?

**ड्यूटी :** खरेदी किंवा विक्रीवर लावलेला कर

**टॅक्स :** विशेष सेवेसाठी शासनाने उत्पन्न, मालमत्ता यावर ठरविलेली रक्कम

**टेरिफ :** वस्तू आयात किंवा निर्यात मालावर लावलेला कर

ब्रिटिशांचा मूळ उद्देश होता तो म्हणजे भारताला ग्राहक बनविणे. त्यामुळे देशातील कापड उद्योग, धातू उद्योग, काच आणि कागद उद्योग नष्ट झाले. सन १८१३ मध्ये हस्तकला उद्योगाची स्थानिक व परकी बाजारपेठही संपली. ब्रिटिशवस्तूची निर्मिती कारखान्यात होत असल्याने भारतीय वस्तू स्पर्धेत टिकू शकल्या नाहीत. ब्रिटिशांनी ती बाजारपेठ काबीज केली व देश निर्यातदार ऐवजी आयातदार बनला. यातून भारतीय राज्यकर्ते, व्यापारी, जमिनदार यांकडूनही ब्रिटिशांनी संपत्ती मिळविली. यातून ईस्ट इंडिया कंपनी आणि नंतर ब्रिटिश साम्राज्यासाठी फायदेशीर आर्थिक धोरण राबविले गेले.

### आपल्यासाठी एक उपक्रम ५.२

**बेहरीयार ' गरेरिया या भटक्या जमातीचा अभ्यास प्रकल्प**

The Sundery Tribune - Spectrum या वर्तमानपत्रातील दि. ११ मार्च २०१२ ची बातमी विहारमधील गया जिल्ह्यातील झारखंड या गावातील ७५ धनगरांनी पैशाचे पाठबळ नसल्याने घोंगड्या विणरे बंद केले. एकजण म्हणाला बाजारातील घोंगड्यावरोबर आम्ही स्पर्धा करू शकत नाही. तर दुसरा म्हणाला आम्हाला शहराची बाजारपेठ उपलब्ध नसल्याने या परिस्थितीची ब्रिटिशकालीन परिस्थितीशी तुलनका करा. ही परिस्थिती सुधारण्याचा मार्ग सुचवा.

अशी ही स्थिती ब्रिटिश काळात होती. आजच्या स्थितीशी तुलना करा व यातून सुधारणेचा मार्ग सूचवा.

### ५.३.२ महसूल कराचे धोरण :

प्राचीन काळापासून लोकांचा शेती हाच व्यवसाय आहे. त्यामुळे जगभरच राज्यकार्याचे प्रमुख उत्पन्नाचे साधन म्हणजे जमीन महसूल १८ व्या शतकामध्ये शेती हाच व्यवसाय होता. ब्रिटिश राजवटीमध्ये अनेक कारणांनी तो वाढत राहिला. प्रारंभी भारतात ब्रिटिशांचे आगमन व्यापारासाठी झाले होते नंतर मोठा भूप्रदेश ताब्यात घेतला व त्यासाठी आणखी पैसा आवश्यक होता. व्यापारासाठी तसेच कंपनीचे काही प्रकल्प आणि प्रशासनासाठी पैसा हवा होता. शेतसारा प्रायोगितत्त्वावर ठरविला तो भरणे शेतकऱ्याला अवघड गेले. ब्रिटिश सरकारच्या धोरणासाठी व युद्धासाठी लोकांकडून पैसा जमा केला. प्रत्यक्ष शेती करणाऱ्यांना जीवन जगणेही कठीण झाले. स्थानिक प्रशासकाला त्यात सवलत देणे किंवा न्याय देणे या बावत अपयश आले.

सन १७९३ मध्ये लॉर्ड कॉर्नवॉलिसने बंगाल व बिहारमध्ये कायमधारा करपद्धती केली. या करपद्धतीनुसार जमिनदारांना ठराविक रक्कम सरकारी तिजोरीत भरावी लागे. त्यामुळे ते जमिनीचे कायमचे वारसदार बनले. यामधून आर्थिक दृष्ट्या ब्रिटिश नि:श्चित झाले. किती कर मिळणार आहे हे नक्की माहीत झाले. व जमिनदाराला ही सरकारला किती कर द्यायचा हेही माहीत झाले. मात्र अधिक कर मिळविण्यासाठी, शेतकऱ्यांनी अधिक उत्पादन मिळविण्यासाठी जमीनदार आग्रही राहिले जमिन दारानी जर शेतसारा सरकारकडे भरला नाही तर सरकार ही जमिनदारी दुसऱ्या जमिनदाराकडे देत असे. ब्रिटिशांनी हा जमिनदाराचा वर्ग निर्माण केला ही राजकीय खेळी होती. शेतकरी व सरकार यामधील जमिनदार हा दुवा होत. जमीनदरांनीच स्वातंत्र्य युद्धाच्या काळात ब्रिटिशानाच मदत केली.

सन १८२२ मध्ये ब्रिटिशांनी वायव्य प्रदेश, पंजाब, गंगाखोरे, मध्य भारतात महालवारी पद्दती सुरू केली. जमिनीचा शेतसारा हा उत्पादनावर ठरत असे. तो संपूर्ण महाल (इस्टेट) एकत्रितरित्या हा कर ब्रिटिशांकडे भरीत असे. त्यामध्ये सरकारचा वाटा मोठा असल्याने शेतकऱ्याला काही फायदा झाला नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी मुंबई व मद्रासच्या इलाख्यात रयतवारी पद्धती राबविली गेली. ब्रिटिश सरकारने महसूल थेट शेतकऱ्याबरोबर ठरविला. शेतकरी हा जमिनीचा मालक असे परंतु जोपर्यंत तो कर असतो तोपर्यंत परंतु करच डोईजड होता यातून शेतकऱ्यांची पिळवणूक होत राहिली.

### ५.३.३ शेतीचे व्यापारीकरण :

ब्रिटिश धोरणाचा भारतीय शेतीवर जो परिणाम झाला तो व्यापारी पिकांमुळे चहा, कॉफी, नीळ, अफू, कापूस, ताग, ऊस आणि तेलबिया ही व्यापरी पिके. या पिकांचे उत्पादन विविध हेतूने घेतले जाई. अफूचे उत्पादन चीनला चहाच्या बदल्यात दिले जाई. अफूचा व्यापार हा पूर्णपणे ब्रिटिशांच्या ताब्यात होता. ब्रिटिशांचे धोरण उत्पादकाला नफा होणार नाही या पद्धतीचे असे. निळीचे उत्पादन फक्त ब्रिटिश व्यापाऱ्यांनाच विकावे लागे. त्याचा उपयोग ब्रिटनमधील रंग उद्योगामध्ये होई. शेतकऱ्याने जमिनीच्या ३/२० क्षेत्रामध्ये नीळ पिकविणे सक्तीचे होते. निळीचे पीक घेतल्यानंतर पुढे काही वर्षे ती जमीन नापिक होत असे. चहाच्या मळ्यात कामगाराची आवश्यकता असते परंतु तेथे काम करणे अतिशय कष्टाचे असे.

### ५.३.४ सावकारी वर्गाचा उदय :

ब्रिटिश सरकारच्या कराच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना कर्ज घेण्याशिवाय पर्याय नव्हता. सावकार मोठ्या व्याजदराने शेतकऱ्यांना कर्ज देत तसेच अन्यायकारक मार्गांचाही अवलंब करीत खोटा हिशेब, खोट्या सह्या किंवा खोटे अंगठे इ. मार्ग वापरत. हे सावकार म्हणजे व्यापारी किंवा जमिनदार असत. अनेक वेळा कर्जदार कर्जाची फेड करू शकणार नसत. त्या कर्जाच्या बदल्यात सावकार कर्जदाराकडून जमिनी ताब्यात घेत. ब्रिटिशांनी सावकाराच्या हिताचे धोरण अवलंबिले.

### ५.३.५ नवीन मध्यमवर्गीयांचा उदय :

ब्रिटिशराजवटीमध्ये ब्रिटिशांच्या व्यापारी धोरणातून नवीन मध्यमवर्गीय गटाचा उदय झाला. ब्रिटिश व्यापाऱ्यांना मध्यस्थी करणारा वर्ग उदयास आला तो ब्रिटिशांनी कायमधारा महसूल सुरू केल्याने जुन्या

जमिनदारांची मक्तेदारी संपती व नवीन जमीन मालक आले त्यांना काही प्रमाणात इंग्रजी येत होते त्यमुळे ते श्रेष्ठ होत होते. ब्रिटिशांची सत्ता बळकट झाली आणि नवीन संधी प्राप्त झाली. न्यायालय, शासकीय अधिकारी आणि व्यापारी असा वर्ग तयार झाल्या. ब्रिटिशांनी त्यांना आश्रय दिला व यातूनच ब्रिटिश हिताचा वर्ग तयार झाला.

### ५.३.६ वाहतुक व संदेशवहन :

त्या काळात बैलगाडी, उंट किंवा वाहतुकीसाठी प्राणी वापरीत. ब्रिटिशांना कच्चा माल उत्पादन केंद्रापासून निर्यात बंदरापर्यंत तसेच कारखान्यातील माल देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचविण्यासाठी लोहमार्गाची गरज होती. ब्रिटिशांनी १९ व्या शतकाच्या मध्यावर लोहमार्गाचा पाया घालून लोहमार्गा चे जाळे तयार केले. यासाठी ब्रिटिश बैंका आणि भांडवलदारांना पैसा गुंतवण्याचे आवाहन केले. ब्रिटिशांना लोहमार्गाचे दुहेरी लाभ झाले. एक म्हणजे व्यापारी माल अंतर्गत भागापासून बंदरापर्यंत आणता आला आणि ब्रिटनमधून रेल्वे इंजिन, डबे, भांडवली वस्तू आणता आल्या. ब्रिटिश भांडवलदारांना सरकारकडून ५% नफ्याची खात्री मिळाली व कंपनीला ९९ वर्षाच्या करारावर मोफत जमीन मिळाली.

जरी लोहमार्ग हा ब्रिटिशांच्या व्यापारासाठी होता तरी राष्ट्रीय तो जागृतीसाठी देशाला महत्त्वाचा ठरला. वाहतुकीचे जाळे आणि सुधारित शिक्षणपद्धती यामुळे देशातील लोक एकत्र आले. (स्वातंत्र्यलढ्यासाठी) अर्थात इंग्रजांनी या दृष्टीने कधीही विचार केला नव्हता.

ब्रिटिश काळात भारताला स्वातंत्र्य समता, मानवी हक्क, विज्ञान व तंत्रज्ञान यांची जाणीव झाली होती. हे सर्व आधुनिकरणाचे घटक होते. या या जाणीवांचा भारतीयांवर झालेला परिणाम पाहू.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**


भारतात पहिले रेल्वे रुळ रेडहिल, मद्रास येथे १८३७ मध्ये घातले गेले. ही रेल्वे ग्रॅनाईट दगड वाहतूक करण्यासाठी वापरली. पहिली प्रवाशी वाहतुक रेल्वे मुंबई ते ठाणे १८५३ मध्ये सुरू झाली. लॉर्ड डलहौसीने त्याच वर्षी कलकत्ता ते आग्रा दरम्यान पहिली टेलिग्राफ लाईन व पोस्टाचा प्रारंभ केला.

### पाठ्यांशावरील प्रश्न ५.२

**१. पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहून त्याचे कारण लिहा.**

अ) भारतीय अर्थव्यवस्थेला कारमुक्त ब्रिटिश मालाचा प्रवेश फायदेशीर होता.

________________________________________





ब) सर्व वसाहती ब्रिटिशांच्या फायद्यासाठी होत्या.

---

क) नीळ, तांदूळ, गहू, चहा, अफु ही व्यापारी पिके ब्रिटिशांनी भारतात आणली.

---

ड) काही सावकार मळ्याने जमिन मालक झाले.

---

२. ब्रिटिशांनी भारतात कोणत्या दोन कारणामुळे रेल्वेमार्गाचे जाळे विणले?

## ५.४ ब्रिटिशांचा भारतीय समाज व संस्कृतीवरील परिणाम :

भारतात ब्रिटिश आल्यानंतर भारतीय समाजात अमुलाग्र बदल झाले. एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्री भूणहत्या, बालविवाह, सती, बहुपत्नीत्व जातियता अत्यंत बळकट होती. मानवाच्या दृष्टीने या प्रथा अत्यंत वाईट प्रथा होत्या. स्त्रियांना दुय्यम वागणूक असे. त्यांना दर्जामध्ये सुधारणेस वाव नव्हता. शिक्षणची संधी ही वरच्या वर्गातील पुरुषांनाच असे. ब्राह्मणांना संस्कृतीचे शिक्षण वेदापुरते होते. जन्म व मृत्यूचे महागडे विधी धर्मगुरुंकडे होते.

ब्रिटिश भारतात आले आणि नवीन प्रबोधन झाले. स्वातंत्र्य, समता, मानवी हक्काची ब्रिटिशांनी कल्पना आणली. अनेक सुधारणावादी चळवळी आणि क्रांती युरोपमध्ये झाल्या. त्याचा काही प्रमाणात परिणाम भारतापर्यंत पोहचला. त्याचे प्रणेते राजाराम मोहन रॉय, सर सय्यद अहमद खान, अरुणा असफ अली, पंडित रमाबाई इत्यादी होते. सामाजिक एकता, स्वातंत्र्य, समता बंधुत्व यासाठी चळवळी झाल्या. स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी सरकारने कायदेशीर मार्ग अवलंबले. उदा. सन १८२९ मध्ये लॉर्ड बेंटिंगने सतीच्या चालीवर बंदी घातली. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा झाला. सन १८७२ मध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता दिली. शारदा कायदा काढून १९२९ मध्ये बालविवाहास बंदी घातली. १४ वर्षाच्या आतील मुलीचा व १८ वर्षाआतील मुलाचा विवाह बेकायदेशीर ठरविला. जातीयता आणि अस्पृश्यता याबाबत चळवळी झाल्या.

या सर्वांचा परिणाम राष्ट्रीय चळवळीवर झाला. स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली. त्या नोकरीसाठी बाहेर पडू लागल्या. कॅप्टन लक्ष्मी सेहगल (इंडिअन नॅशनल आर्मी) सरोजनी नायडू, ॲनी बेझंट, अरुणा असफअली यांचे भारतीय स्वातंत्र्यामध्ये मोलाचे कार्य आहे.



आकृती ५.८ : कॅप्टन लक्ष्मी सहगल (पहिली रांग मध्यभागी) आणि इतर नेताजी सुभाषचंद्र बोस (पहिली रांग डावीकडे)

### ५.४.१ सामाजिक व धार्मिक धोरण :

भारतामध्ये ब्रिटिशांचे आगमन केवळ नफा मिळविण्यासाठी होते. याचाच अर्थ स्वस्तात कच्चा माल खरेदी करायचा व भारी किमतीने पक्क्यामालाची विक्री करायची. भारतीयांनी शिकावे आणि ब्रिटिशाचा आधुनिक माल खरेदी करावा. परंतु ब्रिटिशांच्या स्वार्थी हेतुला धक्का लावू नये अशी ब्रिटिशांची धारणा होती. इंग्रजांचा विश्वास होता की ब्रिटिश म्हणजे पश्चिम विचाराचे आधुनिक आणि श्रेष्ठ व भारतीय म्हणजे जुनाट व दुय्यम. हे खरे तर सत्य नव्हते. भारतीयांना पारंपारीक ज्ञान उत्तम होते. इग्लंडमध्येही भारताविषयी सहानुभूती बाळगणारा वर्ग होता. परंतु ब्रिटिश सरकार आधुनिकीकरास त्वरित तयार नव्हते. धार्मिक व सामाजिक सुधारणा केल्या तर लोकांच्या प्रतिक्रिया बद्दल सरकारला भिती होती. ब्रिटिशांना भारतामध्ये अनंत काळपर्यंत राज्य करावयाचे होते. लोक क्षोम होऊ द्यावयाचा नव्हता. त्यामुळे सुधारणांबद्दल जरी चर्चा झाली तरी त्यापैकी फक्त मोजक्या सुधारणाच आणि त्यासुद्धा अगदी सौम्य करून अमलात आणल्या गेल्या.

### ५.४.२ शैक्षणिक धोरण :

भारतीयांना इंग्रजी शिकविण्यात ब्रिटिशांना रस होता. त्याला अनेक कारणे आहेत. भारतीयांना इंग्रजी यावी ही राजनीती होती. इंग्रजी शिकल्यानंतर त्यांना कारकून म्हणून कमी पगारावर घेता येईल त्याच कामासाठी ब्रिटिश क्लार्कची जास्त पगाराची मागणी होती. यामुळे प्रशासकीय खर्च वाचणार होता. तसेच या लोकांचा एक वेगळा वर्ग हा ब्रिटिशांच्या विचारसरणीचा होईल अशी अपेक्षा होती तसेच ब्रिटिशांचा माल वापरणारी बाजारपेठ तयार होईल. ब्रिटिशांची मक्तेदारी शिक्षणातून वाढावी अशी अपेक्षा होती. काही मोजक्या शिकलेल्या लोकांकडून इंग्लीश संस्कृती सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचेल

ब्रिटिश वस्तूची मागणी वाढेल व यांच्यामार्फत राज्य चालविता येईल त्यामुळे ज्याला इंग्रजी येते त्यालाच नोकऱ्या दिल्या गेल्या. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाशिवाय पर्याय नव्हता. तरीही इंग्रजी शिक्षण केवळ श्रीमंत व शहरातील लाकांचीच मक्तेदारी राहिली. भारतातील इंग्रजांची सत्ता बळकट करण्यासाठी इंग्रजीचा वापर केला गेला.

भारतासाठी ब्रिटिश पार्लमेंटने १८१३ मध्ये एक लाख रुपये पाश्चिमात्य शास्त्र शिकण्यासाठी मंजूर केले. परंतु हे पैसे खर्च करून मतभेद झाले. काहींनी मतव्यक्त केले की हा पैसा फक्त पाश्चिमात्य कल्पना शिकविण्यासाठी खर्च करावा तर काहींनी भारतीय पारंपारिक शिक्षणासाठी खर्च करण्याचा आग्रह धरला. काहींनी स्थानिक भाषेतील शिक्षणाचा आग्रह धरला तर काहींनी इंग्रजीचा आग्रह धरला. इंग्रजी माध्यमातून शिक्षण का इंग्रजी हा विषय म्हणून शिकावा यातील मूलभूत फरक लोकांना समजला नाही. ब्रिटिशांनी पाश्चिमात्य कल्पनांचे शिक्षण इंग्रजीतून देण्याचा निर्णय घेतला. सन १८५४ मध्ये वूडचा खलिदा प्रसिद्ध झाला. सार्वत्रिक शिक्षणाची जबाबदारी भारतीय सरकारने घ्यावी असे त्यात सांगितले होते. त्यानुसार सर्व प्रांतात शिक्षण खात्यांची स्थापना केली गेली आणि इ. स. १८५७ मध्ये कलकत्ता, मद्रास आणि मुंबई विद्यापीठाची स्थापना केली गेली. प्राथमिक शिक्षणाच्या शाळांऐजी काही इंग्रजी माधयमाच्या शाळा महाविद्यालये काढली. त्यांनी सार्वत्रिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केले. त्यांनी जे केले त्यानी भारतीयांची शैक्षणिक गरज भागू शकली नाही.

ब्रिटिशांचे शिक्षण विषयक धोरणपरिपक्व नव्हते तरीसुद्धा इंग्रजी भाषा आणि पाश्चात्य कल्पना यातून समाजावर काही विधायक परिणाम झाले. राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामीदयानंद सरस्वती, सर सय्यद अहमदखान आणि स्वामी विवेकानंद यांनी पाश्चिमात्य विचारसरणीतील स्वातंत्र्य, लोकशाही या कल्पना स्वीकारल्या आणिक ही भारतीय अमानुष धार्मिक वार्बीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण सर्वापर्यंत पोहचले नाही पण साम्राज्याच्या विरोधी, राष्ट्रीय विचारसरणी, सामाजिक, आर्थिक विषमतेच्या राजकीय कल्पना पक्षाच्या माध्यमातून चर्चेमधून सभांमधून वर्तमानपत्रातून लोकांपर्यं त पोहोचल्या. इंग्रजीचा प्रसार आणि पाश्चात्य शिक्षण यातून आधुनिकता लोकशाही, देशभभक्तीची दिशा मिळाली. विज्ञान, मानवता, साहित्याचे ज्ञान मिळाले. शिक्षणातून आपल्या हक्कांची जाणीव झाली. इंग्रजी ही सुशिक्षितांची संपर्क भाषा झाली. त्यांना इंग्लंडमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. जॉन लॉक, रस्कीन, मील, रुसो विचारसरणीमुळे यांच्या स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्त्व, मानवीहक्क आणि स्वयंशासन इत्यादींची प्रेरणा मिळाली. फ्रेंच व अमेरिकन क्रांती तसेच इटलीचे व जर्मनीच्या वाढलेल्या बळ या प्रेरणेस पूरक ठरतो. काहूर, गॅरीवाल्डी, मॅझीनी हे आवडते नेते झाले आणि यांच्यामुळे भारतीयांना स्फूर्ती मिळाली.

पाश्चिमात्य विचारवंत मॅक्सम्युलर, ॲनी बेझंट यांनी स्थानिक भाषा, साहित्याला चालना दिली. भारतीय वारसा, संस्कृती यांचे त्यातून त्यांना दर्शन झाले. राजकीय जागृती व विचारांची देवाणघेवाण वर्तमानपत्रामुळे शक्य झाली. लोकांना वर्तमानपत्रातून कल्पना व समस्या मांडण्याची संधी मिळाली. कादंबरी, नाटक, लघुकथा , कविता, गीत, नृत्य, कला, सिनेमा यामधूल वसाहत वादाला विरोध करण्यासाठी जागृती झाली. लोकांचा आत्मविश्वास वाढला. देशभक्तीची जाणीव झाली.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

इंडिअन पिपल थिअटर असोशिएशन (IPTA) ची १९४३ मध्ये स्थापना झाली. त्यांनी संगिताच्या माध्यमातून अनिष्ट रुढी आणि परंपरांना विरोध केला. स्वातंत्र्यानंतरही ही सांस्कृतिक चळवळ चालू आहे. पिवळणुकीच्या संदर्भातील गीते, शेतकऱ्यांचे बलिदान १८५७ चे समर, जालिवान बागची घटना यावरील गीते गातात. निरर्थक हिंसा व लढाया, तसेच भारताचे विभाजन याबाबत गीतातून संदेश देतात.

ब्रिटिश राजवट प्रभावी करण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारची त्यांनी व्यूहरचना केली. वॉरन हेस्टिंग्ज, विल्यम जोन्स, जोनाथन डंकन यांनी भारताच्या वैभवशाली परंपरांची दखल घेतली. त्यांना पौरात्य समजले जाते. भारतीय भाषा, साहित्य व संस्कृती समजावून घेतली तर भारतात राज्य करणे सुलभ होईल. असे त्यांना वाटत होते. वॉरन हेस्टिंग्जने १७८१ मध्ये कलकत्ता येथे मदरसा ही महत्त्वाची संस्था काढली. एसिएटिक सोसायटी ऑफ बंगाल विल्यम जोन्सने १७८४ मध्ये स्थापन केली. जोनानाथ डंकनने बनारस येथे संस्कृत कॉलेज (१७९४) काढले. वेलस्लीने १८00 मध्ये फोर्ट विल्यम कॉलेज काढले. भारतीय संस्कृती, भाषा व साहित्याच्या अभ्यासाची केंद्रे म्हणून एसिएटिक सोसायटी व फोर्ट विल्यम कॉलेज नावाजली होती. कालिदासाच्या साहित्याचे इंग्रजीमध्ये भाषांतर केल्याने त्याची ख्याती जगभर पसरली.

**आपल्यासाठी एक उपक्रम ५.३**

भारतीय संस्कृती, ज्ञान व परंपरा वैभवशाली करण्यासाठी व्यक्तीगत प्रयत्न झाले. खालील व्यक्ती आणि त्यांचे कार्य यांची माहिती ग्रंथालय किंवा इंटरनेटवरून मिळवा.

१. आर्यभट्ट : ____________________

२. चरक : ____________________

३. मैत्रेयी ____________________

४. गार्गी ____________________

५. प्राचीन भारतीय वैभवशाली परंपरेचा अभिमान वाटावा यासाठी या व्यक्तीगत प्रयत्नांची कशी मदत झाली यासंबंधी विचार करा.

### ५.४.३ सुधारणावादी चळवळींचा परिणाम :

सामाजिक सुधारणांचा परिणाम राष्ट्रीय चळवळींवर कसा झाला? सुधारणावादींनी केलेल्या सततच्या प्रयत्नांचा प्रभव समाजावर झाला. त्यामुळे स्वाभिमान, आत्मविश्वास, देशाभिमान वाढला. यातून आधुनिक जगाची आपल्याला ओळख झाली. आधुनिक सर्वच कल्पना या भारतीय संस्कृती आणि

मूल्ये यांच्या माध्यमातून शिकता येतील हा विश्‍वास आला. शिक्षणामुळे भारतीयांना शास्त्रीय व सारासार विचार करण्याची दृष्टी आली. भारतीय म्हणून आपले अस्तीत्व टिळविण्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्य चळवळ उभारण्यात आली.

### ५.४.४. ब्रिटिश प्रशासन आणि न्यायालयीन व्यवस्था :

ब्रिटिशांच्या प्रशासकीय पद्धतीशी भारतीयांना जुळवून घेणे अवघड गेले. भारतीयांना राजकीय हक्क डावलले जात. ब्रिटिश अधिकारी भारतीयांची बेआदबी करीत. भारतीयांना नागरी प्रशासन व लष्करामध्ये वरच्या जागा देत नसत.

ब्रिटिशांनी भारतात नवी कायदा आणि न्यायव्यवस्था स्थापन केली. त्यांनी नागरी आणि गुन्हेगारी न्यायालये स्थापन केली. न्यायव्यवस्था व कार्यकारी व्यवस्था स्वतंत्र केली. भारतात कायद्याचे राज्य स्थापन करण्याचे प्रयत्न केले. परंतु या प्रयत्नात ब्रिटिशांनाच जास्त अधिकार मिळाले. भारतीयांच्या हक्कांमध्ये व स्वातंत्र्यात ढवळाढवळ करण्याचा हक्क ब्रिटिशांना होता. सर्वसामान्य माणूस न्यायालयापर्यंत जाऊच शकत नव्हता. न्यायालयात जाणे खर्चिक होते. न्यायव्यवस्था ही भारतीय व युरोपियन, यांच्यात भेदभाव करणारी होती.

### पाठ्यांशावरील प्रश्‍न ५.३

१. **जोड्या जुळवा.**

| | |
|---|---|
| अ) विधवा पुनर्विवाह कायदा | १) १८५७ |
| ब) चार्टर ॲक्ट | २) १७९४ |
| क) शिक्षण विभाग | ३) १८१३ |
| ड) संस्कृत महाविद्यालय बनारस | ४) १८५६ |
| | ५) १८५५ |

२. ब्रिटिशांनी स्थापना केलेल्या कोणत्याही सांस्कृतिक दोन सांस्कृतिक व भाषा केंद्राची नावे लिहा.


३. ब्रिटिश काळातील भारतीय स्त्रियांच्या दर्जामध्ये सुधारणा घडवून आणणाऱ्या दोन कायद्यांची माहिती लिहा.

## ५.५ चळवळी :

ब्रिटिश कायद्याचा भारतीयांच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम झाला त्यामुळे देशभर ब्रिटिशांविरोधी वातावरण निर्माण झाले. त्यामुळे संपूर्ण देशभर ब्रिटिशांविरुद्ध अनेक चळवळी झाल्या. पिळवणूक करणाऱ्या प्रशासनाविरुद्ध शेतकरी आदीवासींनी बंड पुकारले. एकामागून

एक असे दुष्काळ पडले. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी ७ दुष्काळ पडले त्यामध्ये १५ लक्ष लोक मृत्यूमुखी पडले. तर एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या भागात २४ दुष्काळ पडले. त्यात २ कोटी लोक मृत्यूमुखी पडले. १९४३ मध्ये बंगालमधील दुष्काळात ३0 ते ४0 लाख लोक मृत्यू पावले. शेतकऱ्यांवर पडणारा कराचा बोजा, यामुळे जमीन काढून घेणे, बंगालमध्ये संन्याशी व फकिरांच्या बरोबरीने जनता बंडात सामिल झाली. सन १७८३ मध्ये बंडखोरांनी कंपनी एजंटला कर देणे बंद केले. तरी शेवटी बंडखोरांना शरणागती पत्करावी लागली. तशाच प्रकारे तामिळनाडू मलबार, आंध्रची किनारपट्टी येथील पोलिगारांनी, मलबारच्या मोपिलांनी सरकार विरुद्ध बंड केले. १८२४ मध्ये उत्तर प्रदेश व हरियानामधील जाटांनी बंड केले. महाराष्ट्र आणि गुजरातच्या कोळी समाजाने बंड पुकारले.

भारतातील अनेक जमातीच्या लोकांनी कायद्याविरुद्ध बंड पुकारले. जमातीच्या लोकांची पिळवणूक होई. भिल्ल (खानदेश), कोळी (सिंगभूम) यांनी ब्रिटिशांविरुद्ध उठाव केला. ब्रिटिशांना अतिशय क्रूरपद्धतीने हा उठाव शमविला. संथाळ हे बंगाल, बिहार आणि ओरिसाच्या सरहद्दिवरील प्रदेशात रहात. त्यांना त्याची भूमी सोडण्याचे आदेश दिले. त्यांनी त्यांचे सरकार बनविले तेही बंड ब्रिटिशांनी मोडीत काढले. जरी विविध उठाव अपयशी झाले असले तरी ब्रिटिश शासन लोकांना नकोसे आहे. याची जाणिव त्यांनी करून दिली. आजही आपण समाजामध्ये असमानता पाहतो. देशातील एक तृतीयांश लोक कसेबसे जगतात. आपण जरी बरीच प्रगती केलेली असली तरी आपल्याला अजून पुष्कळ पल्ला गाठावयाचा आहे.



**आकृती ५.९ : संथळांचा उठाव : रेल्वे इंजिनिअर आणि संथळ (१८५६ मधील लंडन न्यूज) या वर्तमानपत्रातील चित्र**

टिपा

### आपल्यासाठी एक उपक्रम ५.४

तज्ञांच्या मतानुसार सन २००२ ते २००६ या काळात १७५०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यात प्रामुख्याने महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात, पंजाब, छत्तीसगड, तामिळनाडूमधील शेतकरी होते. यामागे शेती न पिकणे कर्जबाजारीपणा ही दोन कारणे होती. बरेचसे शेतकरी शेती व्यवसाय सोडून देऊ लागले आहेत. अधिक माहितीसाठी वर्तमानपत्र, मासिके यातून माहिती मिळवा किंवा ५/६ शेतकऱ्यांशी चर्चा करा. शेतकऱ्यांनी टोकाची भूमिका घेण्याचे कारण काय? तुमचे मत लिहा.

पिपल लाईव्ह हा चित्रपट पाहिला आहे का? शक्य झाल्यास अवश्य पहा.

### ५.५.१ १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याचे परिणाम :

सन १७७० ते १८५७ च्या दरम्यानच्या काळात एकूण १२ लहानमोठे दुष्काळ पडले. याबाबीचा परीणाम ब्रिटिश राजवटीच्या विरुद्ध असंतोष निर्माण होण्यात झाला. त्यांचाच प्रत्यक्ष परिणाम म्हणजे १८५७ च्या स्वातंत्र्य संग्राम होय. ब्रिटिश निर्दयपणे राज्य करीत होते. ब्रिटिशांकडून केल्या जाणाऱ्या सुधारणा म्हणजे ख्रिश्चन धर्मातर करण्याची योजना असे लोकांना वाटे. त्यामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला विरोध झाला. १८५७ चा संग्राम हा संपूर्ण देशातील विविध जाती, धर्म, पंथाचे व वर्गा मधील लोकांनी दिलेले पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्राम होता.

या स्वातंत्र्य लढ्यामुळे ब्रिटिश ईस्ट इंडियाचे नियंत्रण संपले. भारताबाबत ब्रिटिशांचे धोरण बदलते. यामधून भारतीयांमध्ये राष्ट्रभावना जागृत झाली. ज्यांनी बलिदान दिले त्यांच्याबद्दल आदराची भावना. निर्माण झाली परंतु हिंदूमुस्लीम संबंध बिघडले. त्यांनी फोडा आणि राज्य करा ही नीती वापरली. हिंदू-मुस्लीम फूट पडल्यास आपल्याला बराच काळ राज्य करता येईल, अशी ब्रिटिशांची भावना होती.

### ५.५.२ सध्यास्थितीतील परिणाम :

या पाठाच्या वाचनानंतर लक्षात आले असले की ब्रिटीश अमलाचा भारतीय समाज जीवनावर फार खोलवर परिणाम झाला आहे. ब्रिटिशांचा शासकीय अंमल म्हणजे दोन भिन्न संस्कृतींचा समन्वय होय. काही सुधारणा ब्रिटिशांच्या राजकीय आणि व्यापारी फायद्यासाठी करण्यात आल्या परंतु आणखी काही सुधारणा दोन संस्कृतीच्या समन्वयातून झाल्या. या काळात बरेचसे ब्रिटिश भारतात राहत होते. त्यामुळे सांस्कृतिक बदलही घडून आले.

आपले आजचे जीवन लगतच्या भूतकाळाशी संबंधित आहे. ब्रिटिशांनी दीर्घकाळ राज्य केले. सांस्कृतीक, कायद्यामधील बदलाचा परिणाम आजच्या जीवनपद्धतीवर झालेला आहे. रेल्वे, राष्ट्रपती भवन सारखी इमारत, पार्लमेंट इत्यादी गोष्टी या ब्रिटिशांच्या आठवणी आहेत. ब्रेड, चहा, केक तसेच आपला पेहराव या गोष्टी हा ब्रिटिश संस्कृतीचाच भाग आहे. कोट आणि टाय हा सुद्धा त्यांच्याकडूनच स्वीकारलेला आहे. ब्रिटिशकालीन ICS परीक्षेच्या धर्तीवरच IAS परीक्षा घेण्यात येते. लष्करातील प्रशिक्षण ब्रिटिश धर्तीवरच चालते. आजही शिक्षणामध्ये इंग्रजी भाषेचे महत्त्व आहे. सुप्रिम कोर्टाचे निकाल इंग्रजीतच तयार होतात. इंग्रजी भाषेवरच तुमच्या नोकऱ्या अवलंबून असतात.

## पाठ्यांशावरील प्रश्न ५.४

१. भारतातील शेतकरी व जमाती यांच्या चळवळी होण्यासंबंधीची दोन कारणे लिहा.

२. फोडा आणि राज्य करा हे तत्त्व ब्रिटिशांनी कसे राबविले? ३0 शब्दात लिहा.

## आपण काय शिकलो?

❖ ब्रिटिश भारतात व्यापारासाठी आले परंतु त्यांना प्रदेश काबीज करण्याचीही महत्त्वकांक्षा होती. त्यांनी हळूहळू संपूर्ण भारतावर विजय मिळविला, थेट प्रदेश जिंकला काही प्रदेश जोडला व चातुर्याने मिळविला.

❖ प्लासीच्या लढाईने (१७५७) ब्रिटिशांची भारतात राजकीय कारकीर्द सुरू झाली. त्याचा भारतीय राजकीय सामाजिक स्थितीवर परिणाम झाला.

❖ ब्रिटिश राजवटीचा भारताच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम झाला. त्यांने भारताची परंपरागत अर्थव्यवस्था मोडकळीस आली आणि भारतीय संपत्तीचा ओघ ब्रिटनकडे वाहू लागला. ब्रिटनच्या आर्थिक धोरणाचा शेतकरी आणि कारागिरांवर प्रतिकूल परिणाम झाला.

❖ ब्रिटिश राजवटीच्या नाराजीने ब्रिटिशांच्या विरोधी चळवळी झाल्या. संन्यासी आणि फकीरांचा उठाव, फराशी चळवळ वहाबी चळवळ संथाळांचे बंड ही काही उदाहरणे होत.

❖ लष्करी आणि राजकीय दुर्बलतेमुळे १८५७ मध्ये अपयश मिळाले.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. ब्रिटिशांच्या महसूल पद्धतीमुळे शेतकऱ्याच्या जीवनावर कसा परिणाम झाला?

२. कायमधारा व महालवारी पद्धतीतील फरक काय?

३. इंग्रजीच्या शिक्षणामुळे राष्ट्रीय भावनेच्या उदयावर कोणता परिणाम झाला?

४. देशामध्ये इंग्रजी भाषा शिक्षण यशस्वी होण्याचे कारणे कोणती?

५. ब्रिटिश राजवटीचा परिणाम आजही आहे या विधानाशी आपण सहमत आहात का? उत्तर होय असल्यास कारण लिहा.

## पाठ्यांशांवरील प्रश्नांची उत्तरे

### ५.१

१. अ) ४ ब) ३

२. कच्च्या मालाचा शोध आणि कारखान्यातील पक्क्यामालाला बाजारपेठ शोधणे.

३. राज्य खालसा धोरण आणि दुय्यम तह

### ५.२

१.

१) अ) नाही. स्वस्त परकीय मालाचा भारतीय हातमागाच्या मालावर परिणाम झाला त्यातून भारतीय विणकारांचे नुकसान झाले.

२) नाही. महसूलकर वाढविल्याने अनेक शेतकऱ्यांनी बंड पुकारले. आर्थिक दृष्ट्या ब्रिटिशांना लाभ झाला तरी त्याचा राजकीय स्थितीवर दीर्घकाळ परिणाम झाला.

३) नाही. तांदूळ व गहू ही अन्नधान्य पिके आहेत.

४) होय. सावकाराकडील कर्जफेड शेतकऱ्याने केली नाही तर तो जमीन ताब्यात घेत असे.

२. मुख्य हेतू हा व्यापारी बंदरे व औद्योगिक नगरे व कच्चा माल पुरवठा करणारी खेडी जोडण्याचा होता. सुलभ व गतीमान वाहतुकीची खात्री होती. तसेच तयार माल बंदरापासून बाजारपेठेपर्यंत पोहचविण्याचा हेतू होता.

### ५.३

१. अ) ४ ब) ३ क) १ ड) २

२. एसिएटिक सोसायटी ऑफ बंगालची स्थापना विल्यम जोन्सने १७८४ मध्ये केली. फोर्ट विल्यम्स कॉलेज १८00 मध्ये लॉर्ड वेलस्लीने काढले.

३. १८२९ मध्ये सतीच्या चालीवर बंदी घातली. पतीच्या निधनानंतर पत्नीला चितेमध्ये उडी घ्यावी लागे. शारदा कायद्यान्वये मुलीचे विवाहयोग्य वय वर्षे १४ आणि मुलाचे वय वर्षे १८ या कायद्याने १९२९ ला ठरविल्याने बालविवाह प्रतिबंधक कायदा आला.

५.४

१. अ) ब्रिटिशांचे शोषणाचे धोरण आणि महसूल करामध्ये ब्रिटिशांनी वाढ केली.

ब) पिळवणूकीचे राजकारण आणि आदीवासी जमाती भूभागापर्यंत ब्रिटिशांचा राज्यविस्तार

२. फोडा आणि राज्य करा. विभाजन करा आणि राज्य करा हे ब्रिटिशांचे राजकीय धोरण होते. हिंदू मुस्लीमांमध्ये ब्रिटिशांनी दरी पाडली त्यामुळे दोन देश वेगळे झाले.

# ६

# वसाहतकालीन भारतातील धार्मिक व सामाजिक चळवळी

तेरा वर्षाची मिमी आणि आजी यांचा संवाद वाचा.

मिमी : आजी तू कोणत्या कॉलेजमध्ये जात होतीस ग?

आजी : लाडके मी कधीच कॉलेजमध्ये गेले नाही. मी सहावीपर्यंत शिकले आणि तुझ्या वयातच लग्न झालं.

मिमी : (आश्चर्यचकीत होवून) ‘ वयाच्या तेराव्या वर्षी! आजी ते बेकायदेशीर होते. ते लग्न तू थांबविले नाहीस का?

आजी : त्या वेळेचा काळ वेगळा होता. माझ्या अनेक मैत्रिणींची लग्न या वयात झालीत.

या बाबत मिमीला अधिक उत्सुकता वाटली. अशा प्रथा समाजात होत्या? काळाच्या ओघात कसे बदल होतात? असा बदल घडविणारे कोण लोक होते? मिमिला अधिक माहिती हवी होती. या पाठात एकोणिसाव्या व विसाव्या शतकात भारतीय स्थिती आणि समाजात झालेल्या सुधारणांचा परिणाम अभ्यासता येईल.

## उद्दिष्टे :

पाठ अभ्यासानंतर पुढील गोष्टींची माहिती होईल.

- एकोणिसाव्या शतकातील सामाजिक रुढी
- एकोणिसाव्या व विसाव्या शतकापूर्वीच्या प्रचलीत रुढी बाबत सामाजिक व धार्मिक चळवळींचे महत्त्व
- बालविवाह सतीची चाल, जातीयता या समस्या सोडविण्यासाठी कायदेशीर व अन्य उपायांद्वारे केलेल्या सुधारणा.
- शालेय शिक्षणामध्ये एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांनी केलेल्या सुधारणा
- सामाजिक चळवळींचा भारतीय समाजावरील परिणामांचे परीक्षण

## ६.१ १९ व्या शतकापूर्वीचा भारतीय समाज :

सन २०१२ चा भारतीय समाज तुम्ही पहात आहात. हा समाज १९ व्या शतकाचा पूर्वार्धात वेगळा होता. समाजाचा विकास थांबण्यास दोन घटक कारणीभूत होते. ते म्हणजे शिक्षण आणि स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान. सामाजिक काही बाबी इतक्या अमानुष होत्या की त्या मानवतेला काळीमा लावणाऱ्या होत्या.

### ६.१.१ शिक्षणाचा अभाव :

समाजातील अनेक लोक निरक्षर होते. जगभर समाजातील फार थोड्या लोकांच्या हातात शिक्षणव्यवस्था होती. उच्च जातीतील लोकांनाच भारतात शिक्षणाची संधी होती. वेद संस्कृतमध्ये असल्याने ब्राह्मणांना शिकणे सुलभ होते. ती भाषा त्यांनाच समजत होती. धार्मिक पुस्तकेही त्यांच्याकडे होती. त्यामुळे त्याचा लाभ त्यांना मिळाला. खर्चिक कार्ये विधी त्यांच्याकडे होते. मृत्युनंतर मृतासाठी धार्मिक विधी सक्तीचा होता. ब्राह्मणांना कोणीही त्या पुस्तकात काय लिहलं आहे हे विचारात नव्हते. अशीच स्थिती युरोपमध्ये होती.

बायबल लॅटिनमध्ये लिहिलेले होते आणि लॅटिन ही फक्त धर्मगुरुंनाच येत असल्याने पुस्तकात काय लिहिले आहे ते धर्मगुरुंनाच कळत असे त्यामुळे ही भाषा चर्चची भाषा समजली जात असे. त्यामुळे युरोपमध्ये तीव्र सामाजिक प्रतिक्रिया उमटल्या. त्याबरोबर स्वातंत्र्य, समता मानवी हक्क यांची जाणिव झाली यातूनच तेथे सामाजिक क्रांती घडून आली.

### ६.१.२ स्त्रियांची स्थिती :

हल्ली स्वत:च्या विकासासाठी मुली आणि स्त्रियांना उत्तम संधी आहेत. त्यांना शिकून घरावाहेर पडण्याचे स्वातंत्र्य आहे. एकोणिसाव्या शतकात अनेक स्त्रियांची स्थिती कठीण होते. स्त्री भृणहत्या, वालविवाह, सतीची प्रथा, वहुपत्नीत्व या प्रथा होत्या. स्त्री भृण हत्या या सर्रास होत्या. अल्पवयीन मुलीचा विवाह तिच्यापेक्षा खूप जास्त वयाच्या पुरुषाबरोबर विवाह होत. अनेक जाती व धर्मात पुरुषांना अनेक विवाह करण्यास मान्यता होती. पतीच्या निधनानंतर स्त्रीने चितेमध्ये उडी घेणे ही प्रथा देशातील अनेक भागात होती. ज्या स्त्रियांची सती जाण्यातून सुटका होत त्यांचे जीवन अतिशय वाईट होते. स्त्रियांना संपत्तीचा हक्क नव्हता. शिक्षणाचा हक्क नव्हता. त्यामुळे समाजातील त्यांचे स्थान दुय्यम होते. दुष्टांकडून भिती आणि कुटुंबांतील तिरस्कार याही बाबी होत्या. हुंडा पद्धती आणि पूर्वा पार संपत्तीचा हिस्सा या गोष्टीही नंतरच्या काळात स्त्रियांच्या स्थितीस कारणीभूत होत्या.

या विविध गोष्टींच्या परिणामामुळे समाज मागे पडला. सामाजिक आणि धार्मिक स्थिती सुधारणांची गरज भासली.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

भृणहत्या : जन्माला आलेले बाळ मारून टाकणे.

बालकांचे लिंग प्रमाण : ० ते ६ वयोगटातील जन्माला येणाऱ्या दर हजारी मुलांमध्ये मुलींचे प्रमाण. भारतात १९६१ मध्ये हे प्रमाण दरहजारी मुलांमागे ९७६ होते तर सन २०११ मध्ये हे प्रमाण ९१४ वर आले. जागतिक निकषानुसार हे प्रमाण ९५० किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे.

### आपल्यासाठी एक उपक्रम ६.१

सन २०११ च्या जनगणनेनुसार केरळमध्ये दर हजारी पुरुषांमागे १०८४ स्त्रियां हे प्रमाण होते तर हरयानामध्ये ८७७ स्त्रियांचे प्रमाण होते.

www. censusindia.gov.in या वेबसाईटवर अधिक माहिती मिळवा.

## ६.२ सामाजिक व धार्मिक जागृतीतून सुधारणा :

लोकांना भेदभाव, असमानतेची जाणीव करून देणे. गरजेचे आहे असे तुम्हास वाटत नाही का? समाजाच्या विकासामध्ये अडथळ्यांची जाणीव समाज सुधारकांनी करून दिली त्यामध्ये राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती, ज्योतिबा फुले, सरसय्यद अहमद खान, पंडिता रमावाई इ. होते. पाश्चिमात्यांशी जेव्हा संपर्क आला तेव्हा लक्षात आले की आपल्यापेक्षा इतर जग फार भिन्न आहे. जेव्हा ब्रिटिश मिशनरी ख्रिश्चन धर्माचा प्रसार करीत तेव्हा येथील सामाजिक व धार्मिक बाबींवर टीका करीत. त्यांच्या काही गोष्टी समाज सुधारकांनी स्वीकारल्याही. कर्मट भारतीयांच्या अडथळ्यांशी संघर्ष करून त्यातून आवश्यक त्या बदलासाठी चळवळी सुरू केल्या.

स्वामी दयानंद सरस्वती, राजा राममोहन रॉय यांनी पवित्र ग्रंथाचे वाचन करून प्रचलित धर्म व सामाजिक स्थितीवर प्रहार केला. स्वातंत्र्य व समतेच्या तत्त्वावर समाजाचा पाया असावा. स्त्रियांमध्ये आधुनिक आणि वैज्ञानिक शिक्षणामुळेच समानता येईल यावर त्यांचा भर होता. या चळवळींना सामाजिक धार्मिक चळवळी म्हणतात. कारण धार्मिक सुधारणांशिवाय समाज सुधारणार नाही. यावर त्यांचा विश्वास होता. शिक्षण इतर संधी फक्त वरच्या वर्गासाठीच का होती याची माहिती पुढील भागात समजेल.

### ६.२.१ जात व्यवस्था :

प्राचीन काळापासूनच भारतीय समाज हा व्यसायावरून ओळखला जात होता. धार्मिक बाबी या वरच्या वर्गासाठीच उपलब्ध होत्या. धार्मिक विधीचे अधिकार खालच्या वर्गांना नव्हते. त्यामुळेच समाजाची सर्व सत्ता वरच्या वर्गाकडे गेली व खालच्या वर्गाची पिळवणूक झाली.

हिंदू समाजात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण होते. हे वर्ण व्यवसायावर आधारित होते. पूजा करण्याचे काम ब्राम्हण करीत, क्षत्रिय युद्ध करीत तर शेतीचे काम व व्यापार वैश्य करीत. वरील तिनही वर्गाची सेवा करणाऱ्या लोकांना शूद्र समजत. व्यवसायावरून ठरलेली वर्ण व्यवस्था अनुवंशिकतेमुळे पुढे जात व्यवस्था झाली. पुढे व्यवसाय बदलला तरी ज्या जातीत जन्माला आला तीच जात लागत असल्याने लोकशाही आणि प्रगत समाजासाठी जात व्यवस्थाचा अडथळा येत राहिला.

जात व्यवस्थेच्या बाबतीत सामाजिक धार्मिक सुधारणा घडवून आणणाऱ्या अनेक सुधारक व संघटनांनी प्रयत्न केले. ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन यांनी प्रयत्न केले. ज्योतिबा फुले, पंडिता रमाबाई, श्रीनारायणगुरु, पेरियार, विवेकानंद, महात्मा गांधी यांनी प्रयत्न केले. अनेकांनी

वेद पुराणांवर टीका केली. जात व्यवस्थेमध्ये मानवतेच्या विरूद्ध अनेक बाबी होत्या. त्या दूर करण्यासाठी यांनी कठोर परिश्रम घेतले.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

घटनेच्या १४ व्या कलमानुसार कोणत्याही व्यक्तिच्या बाबतीत तिच्या धर्म, वर्ग, जात, लिंग, जन्म ह्या नावावरून भेदभाव करता येणार नाही. या तरतुदीमुळे सामाजिक आर्थिक, राजकीय बाबींमध्ये सामान्य लोकांना सहभागाची संधी प्राप्त झाली.

### ६.२.२ प्राचीन धार्मिक प्रथा :

धर्माच्या नावाखाली अनेक सामाजिक प्रथा होत्या. त्यामुळे धार्मिक बदलाशिवाय सामाजिक बदल होणार नाही. हे सुधारकांच्या लक्षात आले. सुधारकांनी भारतीय परंपरा व तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यास केला. त्यांनी पाश्चिमात्य परंपरांची भारतीय परंपरांशी सकारात्मक तुलना केली. त्यांनी धर्मा तील कर्मठपणा व अंधश्रद्धांना विरोध केला. मूळ धर्मामध्ये कोठेही १९ व्या शतकातल्या चालीरितींना मान्यता नाही हे त्यांनी दाखवून दिले. सर्वसामान्य माणसाला धर्मगुरुंनी पिळलेले होते. समाजाने शास्त्रीय दृष्टीने पहावे असे सुधारकांचे म्हणणे होते. स्त्रीपुरुषांना मानवतेच्या दृष्टीने समानता असली पाहिजे यावर सुधारकांचा आग्रह होता.

### ६.२.३ शैक्षणिक स्थिती :

एकोणिसाव्या शतकामध्ये अनेक मुले शाळेत जात नव्हती विशेषत: मुलींना शाळेत पाठविले जात नव्हते. त्यावेळी पारंपारिक पद्धतीने पाठशाळा, मदरसा, मशीदी, गुरुकूल यामध्ये शिक्षण दिले होते. धार्मिक शिक्षणामध्ये संस्कृत व्याकरण, अंकगणित धर्म आणि तत्त्वज्ञान शिकविले जाई. त्यात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा समावेश नव्हता. समाजामध्ये अनेक चालीरिती होत्या. शिकलेल्या मुली लग्नानंतर विधवा होतात असा समज होता. याचे मुख्य कारण म्हणजे सामाजिक व धार्मिक मागासलेपणा हेच होते. त्यासाठी आधुनिक शिक्षणाची गरज होती.

मुस्लिम, हिंदू, शीख किंवा पारशी सामाजिक व धार्मिक सुधारक आधुनिक शिक्षणाचा प्रसार करीत होते. शिक्षण हाच समाज जागृतीचा मार्ग आहे यावर विश्वास होत्या.

**पाठ्यांशावरील प्रश्न ६.१**

१. कोणत्या दोन कारणामुळे सामाजिक सुधारणांच्या चळवळी सुरू झाल्या?

२. जातीयता ही अशास्त्रीय आणि अयोग्य कशी होती?

३. धर्म सुधारकांनी धर्माच्या कर्मठपणावर केलेल्या टीकेचा पाया कोणता होता?

४. खालील परिच्छेद वाचा आणि त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.

## वसाहतकालीन भारतातील धार्मिक व सामाजिक चळवळी

डॉ. भीमराव आंबेडकर हे गरीब महार व अस्पृश्य समाजात जन्माला आले होते. त्याचे कॉलेज पर्यंतचे शिक्षण भारतात झाले नंतर पदवी आणि पी. एच. डी आणि संशोधनाचे शिक्षण कोलंबिया विद्यापीठ व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिकस मध्ये झाले. धर्मग्रंथामध्ये व अंधश्रध्दांना थारा नाही हे त्यांनी दाखवून दिले. त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. त्यांना सामाजिक आणि आर्थिक संकटांना सामोरे जावे लागले. सामाजिक विषमतेच्या विरुद्ध लढावे लागले. त्यांना मरणोत्तर भारतरत्न किताब १९९० मध्ये देण्यात आला.

शिक्षणाशिवाय कोणत्या अन्य गुणांमुळे डॉ. आंबेडकर समाजातील विषमतेविरुद्ध लढा देवू शकले?

### आपल्यासाठी एक उपक्रम ६.२

जातीयतेच्या आधारावर विषमतेच्या तुम्हास माहिती असणाऱ्या घटना ५० शब्दात लिहा.

## ६.३ एकोणिसाव्या शतकातील सामाजिक व धार्मिक सुधारक :

अनेक भारतीय विचारवंतांनी पुढाकार घेवून समाजातील सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. समाज आणि धर्म एकमेकांशी संबंधित गोष्टी आहेत. देशाच्या विकासासाठी दोन्ही गोष्टींमध्ये सुधारणा आवश्यक असते. सामाजिक जागृतीसाठी काहींनी संघटना स्थापन केल्या. तसेच शैक्षणिक क्षेत्रासाठीही काय केले.


### ६.३.१ राजा राममोहन रॉय :




चित्र ६.१ : राजा राममोहन रॉय

यांचा जन्म बंगालमधील एका ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. त्याचे कुराण, बायबल तसेच हिंदू धर्म ग्रंथांचे सखोल वाचन झाले होते. उच्च शिक्षणामुळे विविध धर्म संस्कृती व तत्त्वज्ञानाचे त्यांना ज्ञान होते. भावाच्या मृत्यूनंतर त्याच्या बायकोने सती जाण्याचा आग्रह समाजाने धरला. या घटनेनंतर समाजातील आणि धर्मातील वाईट प्रथाचे निर्मूलन करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले. त्यांनी १८२८ मध्ये ब्राम्होसमाजाची स्थापना केली. त्यांना सतीच्या प्रथेविरुद्धची केलेली चळवळ शेवटपर्यंत करीत रहावी लागली. हिंदू धर्माच्या कोणत्याही ग्रंथामध्ये ज्या प्रथेबद्दल पुरावा नाही ही माहिती त्यांनीच लोकांपर्यंत पोहचवली. कर्मठ हिंदूंकडून त्याचा प्रचंड त्रास त्यांना सहन करावा लागला. गव्हर्नर जनरल यांनीही त्यांना पाठींबा दिला सर विल्यम बेंटिंक यांनी सन १८२९ मध्ये सतीची चाल ही बेकायदेशीर आणि गुन्ह्यास पात्र ठरविली. त्यांनी बालविवाहावर बंदी आणि विधवा पुनर्विवाहासाठी प्रयत्न केले.





टिपा








त्यांनी पौर्वात्य व पाश्चिमात्य विचारांचे पृथःकरण करून विचार मांडले ते वेद, वेदान्त आणि उपनिषदांचे जाणकार होते. त्यांनी अनेक धर्मातील गुणदोष स्पष्ट केले. त्यांनी वेदामध्ये सर्व धर्मातील सार आहे हे स्पष्ट केले. त्यांनी परमेश्वर एक आहे ही भूमिका मांडली व धर्मातील अनेक अनिष्ट प्रथांवर टीका केली. हिंदूंच्या प्राचीन धर्मग्रंथात एकेश्वरवाद आहे म्हणून त्यांनी अनेक ईश्वरवाद नाकारला. मूर्तिपूजा आणि अर्थहीन प्रथांना त्यांनी विरोध केला.

त्यांनी इंग्रजी, साहित्य, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून अनेक मासिकात लिखाण केले. स्वतःच एक इंग्रजी माध्यमाची शाळा चालविली. इतर विषयाखेरीज तेथे यंत्रशास्त्र आणि तत्वज्ञान शिकवले जात असे. त्यांनी १८२५ मध्ये वेदान्त महाविद्यालयाची स्थापना केली. उच्च शिक्षणासाठी कलकत्यामध्ये हिंदू महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी मदत केली.

### ६.३.२ ईश्वरचंद्र विद्यासागर :

सामाजिक सुधारणांसाठी ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी आयुष्यभर काम केले. त्यांनी सन. १८५६ च्या हिंदू विधवा पुनर्विवाह कायद्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी बालविवाह प्रथा, बहुपत्नीत्वास प्रखर विरोध केला. धर्माच्या नावाखाली सुधारणांना विरोध करणारांना विरोध केला.



**चित्र ६.२ : ईश्वरचंद्र विद्यासागर**

ते संस्कृत पंडित होते, तरीही पाश्चिमात्य संस्कृतीमधील उच्च विचारसरणीसाठी ते आग्रही होते. शैक्षणिक क्षेत्रातील त्याचे योगदान मोठे आहे ते संस्कृत व बंगाली भाषेसाठी आग्रही होते. त्यांनी संस्कृत महाविद्यालयात पाश्चिमात्य विचारले अभ्यास केंद्र सुरू केले. त्यांनी शिक्षणातूनच स्त्रियांचा उद्धार व्हावा त्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी बंगालमध्ये मुलींसाठी ३५ शाळा सुरू केल्या. ब्राह्मणेतरांना संस्कृत माविद्यालयातील प्रवेश त्यांच्यामुळेच शक्य झाला.

### ६.३.३ स्वामी दयानंद सरस्वती :

स्वामी दयानंद सरस्वतींनी उत्तर भारतातील हिंदू धर्म परिवर्तनासाठी १८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली. त्यांच्या मते वेद हे अचूक असून इतर ज्ञानाचा पाया आहेत. त्यांनी वेदांशिवाय अन्य धर्मियांची विचारसरणी फेटाळली. प्रत्येकाला परमेश्वराजवळ जाण्याचा अविष्कार आहे यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी शुद्धिकरण चळवळ सुरू करून इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मात गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मामध्ये आणले. सत्यार्थ प्रकाश हे त्यांचे महत्त्वाचे पुस्तक आहे.

आर्य समाजाची शिकवण सामाजिक चळवळ आणि स्त्रियांची स्थिती सुधारण्यासांठी होती. सामाजिक समतेसाठी अस्पृश्यता आणि जातियता नष्ट झाली पाहिजे. यासाठी त्यांनी धडपड केली. उत्तर भारतातील लोकांना समजण्यासाठी त्यांनी हिंदी भाषेत लिखाण केले. आर्य समाजाने स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतला. स्वाभिमान आणि स्वावलंबनाची शिकवण लोकांमध्ये पोहचविली. सर्व लोकांपर्यंत शिक्षण पोहोचावे यासाठी आर्य समाजाने दयानंद अँग्लो वेदीक महाविद्यालय सुरू केले. त्यामध्ये

वेदांमधील शिकवणुकीस बाधा न आणता पाश्चिमात्य धर्तीवर महाविद्यालये सुरू केली. इंग्रजी आणि आधुनिक शास्त्र, संस्कृत आणि वेदांचा अभ्यास यावर भर दिला.



**चित्र ६.३ : स्वामी दयानंद सरस्वती**

### ६.३.४ रामकृष्ण परमहंस आणि विवेकानंद :

रामकृष्ण परमहंस (१८३६-१९८६) यांनी आध्यात्माला धर्माची जोड दिली. सर्व धर्मिय परमेश्वर प्राप्तीसाठी विविध मार्गाने प्रयत्न करतात असे त्यांचे म्हणणे होते. **स्वामी विवेकानंद (१८६३-१९०२)** हे रामकृष्ण परमहंसांचे शिष्य.

> जगाचा इतिहास म्हणजे आत्मविश्वास असलेल्या काही व्यक्तींचा अभ्यास होय. श्रद्धा ही आत्मशक्ती जागृत करते. तुम्ही कोणतेही काम करा. तळमळ असल्याशिवाय आत्मशक्ती मिळणार नाही. माणूस किंवा राष्ट्राकडे श्रद्धा नसेल तर विनाश होतो. प्रथम स्वत:वर विश्वास ठेवा नंतर परमेश्वरावर विश्वास ठेवा. ' स्वामी विवेकानंद





**चित्र ६.४ : रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद**


विवेकानंदांनी धर्मापलिकडे जावून अध्यात्माचे विचार मांडले. भारतीयांना आत्मविश्वासासाठी अध्यात्माची गरज आहे. रामकृष्ण परमहंस हे त्यांचे गुरु त्यांच्या नावाने विवेकानंदांनी रामकृष्ण मिशन स्थापन केले. हिंदू संस्कृती आणि धर्म यावर त्यांनी अनेक व्याख्याने दिली व लिखाण केले. सर्व धर्मियांमध्ये वेदांतामुळे समता आणि एकता प्राप्त होईल, यावर त्यांचा विश्वास होता. धार्मिक प्रथा, प्रतिगामी विचार आणि कालबाह्य परंपरा नष्ट करणे यावर यांचा भर होता. जातीयता आणि अस्पृश्यता दूर करण्याचा विवेकानंदांनी प्रयत्न केला. त्यांनी स्त्रियांच्या सन्मानासाठी जागृती केली. त्यांचे सामाजिक स्थान व शिक्षणासाठी प्रेरणा दिली.

### ६.३.५ सर सय्यद अहमदखान :

हे मुस्लिम समाजातील थोर समाज सुधारक. मुस्लिम धर्मात आणि सामाजिक जीवनात फक्त आधुनिक पाश्चात्य शिक्षण व संस्कृतीनेच सुधारणा होवू शकेल असे त्यांचे मत होते. मुस्लीमाच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणासाठी काम केले. त्यांनी स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केले. बुरखा, बहुपत्नीत्व, सुलभ घटस्फोट मुलींच्या शिक्षणाचा अभाव याविरुद्ध ते होते. कर्मठ मुस्लीमांनी विरोध केला तरी स्त्रियांच्या शिक्षणासाठी ते प्रयत्न करीत राहिले. कुराणाचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला. त्यांनी अज्ञान व धर्मवेडेपणा याला विरोध केला. मुस्लीम समाजाच्या उन्नतीसाठी पुढाकार घेतला.

मुस्लीम समाजाचा विरोध असतानाही त्यांनी इंग्रजीचा आग्रह धरला. मुस्लीम समाजाच्या प्रगतीसाठी आधुनिक शिक्षण हेच उपयुक्त ठरेल. असे त्यांचे मत होते. सन १८६४ मध्ये गाझीपूर (उत्तर प्रदेश) येथे त्यांनी इंग्रजी शाळा काढली. सन १८७५ मध्ये त्यांनी मोहम्मद अँग्लो ओरिएंटल कॉलेज (MAO)


अलिगड येथे काढले हेच पुढे अलिगड मुस्लीम विद्यापीठ झाले. येथे मानवता आणि विज्ञानातील शिक्षण इंग्रजीतून सुरू केले. इंग्रजी पुस्तकांचे भाषांतर करण्यासाठी सायन्टिफिक सोसायटीची स्थापना केली. त्यांनी काही पुस्तके प्रकाशित केली. मुस्लिम समाजशिक्षणासाठी व जाणिवासाठी प्रयत्न केले. व पुरोगामी विचाराचा प्रसार करण्यासाठी यांनी परिषदा आयोजित केल्या. त्यांचा अलिगड चळवळी म्हणून त्याचा उल्लेख केला जातो. मुस्लीम समाजाच्या उन्नतीसाठी सामाजिक राजकीय जागृतीसाठी त्यांचा उपयोग झाला.



**चित्र ६.५ : सर सय्यद अहमदखान**


## ६.३.६ ज्योतिबा गोविंदराव फुले :

हे महाराष्ट्रातील समाजसुधारक, त्यांनी शेतकरी आणि मागसलेल्या जातीच्या समान हक्कासाठी काम केले. स्वत: त्यांनी त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षण व मागासलेल्या समाजासाठी खूप परिश्रम घेतले. त्यांनी पत्नीला प्रथम साक्षर केले व नंतर दोघांनीही स्त्री शिक्षणासाठी काम केले. त्यांनी सन १८८४ मध्ये पहिली मुलींची शाळा काढली. पुण्यात पहिली मुलींची शाळा १८५१ मध्ये सुरू केली. त्यांनी विधवा विवाहासाठी प्रयत्न केले. सप्टेंबर १८७३ मध्ये, काही अनुयायींच्या सहाय्याने सत्यशोधक समाजाची स्थापना केली. दलितांना पिळवणूक व जातीयतेतून मुक्त करण्याचे त्यांचे उद्दिष्ट होते.









चित्र. ६.६ : ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले

### ६.३.७ न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे :


सन १८६७ मध्ये धार्मिक सुधारणेसाठी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडेंनी पुण्यामध्ये सार्वजनिक सभा आणि मुंबईमद्ये प्रार्थना समाजाची स्थापना केली. जातीय बंधने, बालविवाह, मुलांच्या विवाहावरील खर्च व अनिष्ट सामाजिक प्रथा याविरूद्ध त्यांनी काम केले. स्त्री ही शिक्षण, विधवा पुनर्विवाह यासाठी त्यांनी काम केले. ब्राह्मो समाजाप्रमाणे एकेश्वरावादाचा पुरस्कार केला. भारतीयांना उच्च शिक्षण स्वभाषेत मिळावे यासाठी प्रयत्न केला. भारतीय उच्च सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवून सामाजिक सुधारणा करण्याचे त्यांचे ध्येय होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ते संस्थापक सदस्य होते.



चित्र ६.७ : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

### ६.३.८ पंडिता रमाबाई :

महाराष्ट्रामध्ये पंडिता रमाबाईनी महिलांचे हक्क मिळविण्यासाठी आणि बालविवाह प्रथेविरुद्ध लढा दिला. त्यांनी पुण्यामध्ये सन १८८१ ला आर्य महिला समाजाची मुलींच्या शिक्षणासाठी स्थापना केली. पुण्यात सन १८८९ मध्ये कुटुंबातील विधवेला नाकारलेल्या महिलांसाठी मुक्ती मिशनची स्थापना केली. अशा महिलांसाठी शारदा सदन सुरू करून विधवा, निराधार आणि अंधांसाठी घर आणि शिक्षणाची व्यवसाय शिक्षण वैद्यकीय सुविधांची सोय केली. त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केले. त्यामध्ये स्त्रीयांचे कष्टमय जीवन, बालवधु, बालविधवा या विषयांवर प्रकाश टाकला. त्यांनी रमाबाई मुक्ती मिशनची स्थापना केली. त्यांचे कार्य अजूनही चालू आहे.



चित्र ६.८ : पंडिता रमाबाई

### ६.३.९ ॲनी बेझंट :

ॲनीबेझंट या सन १८९३ मध्ये थिऑसॉफिकल सोसायटीच्या सदस्य म्हणून भारतात पहिल्यांदाच आल्या. थिऑसॉफिकल सोसायटी ही पाश्चिमात्य लोकांकडून चालविण्यात येत होती. या पाश्चिमात्य लोकांना भारतीय परंपरा आणि संस्कृती यावद्दल आस्था होती. त्यांनी स्थानिक भाषेतून शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले. त्यांनी राजकीय जागृतीतून भारतीयांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी प्रयत्न केला. सोसायटी आंतरराष्ट्रीय वंधुत्वाची शिकवण देत होती. सन १९०७ मध्ये त्यांच्याकडे थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्षपद आले. नवीन नेतृत्वाची निर्मिती व्हावी यासाठी त्यांनी सेंट्रल हिंदू कॉलेज, बनारस ची स्थापना केली. प्राचीन ग्रंथांच्या बरोबरच आधुनिक विज्ञानाचा अभ्यासक्रमामध्ये समावेश होता. सन. १९१७ पासून हे महाविद्यालय म्हणजे बनारस हिंदू विद्यापिठाचा एक भाग झाला.



चित्र ६.८ : ॲनी बेझंट

### आपल्यासाठी एक उपक्रम ६.३

शासकीय नियम, सामाजिक चळवळी होवूनही काही सामाजिक प्रथा अंधश्रद्धा अजून अस्तित्वात आहेत अशा दोन या प्रथा लिहा. या प्रथा अंधश्रद्धा यांचा प्रभाव कमी व्हावा अंधश्रद्धा यासाठी आपल्याला व्यक्ति म्हणून काय करता येईल?

**मार्गदर्शन :** सामाजिक प्रथा ‍ हुंडा, स्त्रीपुरुष भेदभाव, निरक्षरता, बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या.

**आपली प्रतिक्रिया :** व्यक्तिगत उदाहरण, गटातील चर्चा, वाचकांच्या पत्रव्यवहार, जनसंपर्क इत्यादी प्रथेला / अंधश्रद्धेला बळी पडलेल्यांना मदत.

### ६.३.१० मुस्लीम सुधारकांच्या चळवळी :

मुस्लीम जनतेत आधुनिक शिक्षण आणि बहुपत्नीत्व यासाठी चळवळी झाल्या. अब्दुल लतिफ यांनी १८६३ मध्ये "महम्मद साक्षरता संस्थेची" कलकत्त्याला स्थापना केली. उच्च व मध्यमवर्गीय मुस्लीमांसाठी आधुनिक शिक्षणासाठी प्रयत्न करणाशी ही पहिली संस्था होती. या संस्थेने हिंदूमुस्लीम ऐक्यासाठी प्रयत्न केले. तसेच हिंदुमुस्लिम ऐक्यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांच्या समस्येसाठी शरीअतुल्ला यांनी बंगालमध्ये कराझी चळवळ सुरू केली. त्यांने मुस्लिमांमधील जातीयता नष्ट होण्यासाठी प्रयत्न केले. अनेक मुस्लीमसंघटना धार्मिक व सामाजिक सुधारण्यासाठी कार्यरत होत्या. मिझागुलम अहमद यांनी १८९९ मध्ये अहमदीया चळवळ स्थापन केली. चळवळीतून अनेक शाळा व महाविद्यालये सुरू झाली. त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यासाठी प्रयत्न केले. इस्लामधर्माच्या वैश्विक आणि मानवधर्माच्या बाजूवर त्यांनी भर दिला.




**चित्र ६.१० : महम्मद इक्बाल**

महम्मद इक्बाल (१८७६-१९३८) या महाकवीने अनेक कवितातून पुढील कित्येक पिढीसाठी तात्त्वीक व धार्मिक दृष्टीकोनातून मार्गदर्शन मिळेल असे कार्य केले.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

सारे जहाँ से अच्छा हिंदुस्थान हमारो हे गीत महम्मद इक्बाल यांनी रचलेले आहे?





### ६.३.११ अकाली सुधारक चळवळी

अमृतसर आणि लाहोर येथे सिंग सभेची स्थापना १८७0 मध्ये सीखाच्या धार्मिक चळवळीसाठी झाली. याच वर्षापासून शिखांमधे धार्मिक सुधारणांसाठी चळवळ चालू झाली. सन १८९२ मध्ये गुरु मुखी भाषा आणि पंजाबी साहित्य अध्ययनासाठी अमृतसर येथे खालसा कॉलेजची स्थापना केली. सन १९२१ मध्ये महंतांच्या विरोधी आंदोलन केले त्यामुळे १९२५ मध्ये गुरुद्वार कायदा केला. या कायद्यामुळे आणि प्रत्यक्ष कृति कार्यक्रमातून गुरूद्वारांची भ्रष्ट महंतापासून सुटका झाली.

### ६.३.१२ पारशी समाजाच्या चळवळी :

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर नौरोजी फरदोजी, दादाभाई नौरोजी, एस्. एस्. बंगाली या पारशी लोकांनी मुंबईमध्ये धार्मिक सुधारणा चळवळी सुरू केल्या. त्यांनी १८५१ मध्ये 'राहन्यूमार्ट मझदयास्नान सभा' (Religious Reform Association) ची स्थापना केली. मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी पारशी समाजातील कर्मठ प्रथा बंद करण्यासाठी काम केले. त्या काळात भारतातील सर्वात जास्त प्रगतीशील समाज म्हणून समाजाची ख्याती होती.



**चित्र ६.११ दादाभाई नौरोजी**

### आपल्यासाठी एक उपक्रम ६.४

समाजाच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य खर्च करणाऱ्या कोणत्याही दहा थोर व्यक्ती निवडा आणि त्यांच्या योगदानाची माहिती मिळवा.

## पाठ्यांशावरील प्रश्न ६.२

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) ............... ने पौरात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचे पृथःकरण केले नाही.

अ) स्वामी विवेकानंद　　ब) राजा राममोहनरॉय

क) दयानंद सरस्वती　　ड) ईश्वरचंद्र विद्यासागर

२) त्यांनी वेदांच्या अचूकतेबद्दल भाष्य केले नाही ...............

अ) स्वामी विवेकानंद　　ब) रामकृष्ण परमहंस

क) दयानंद सरस्वती　　ड) सैयद अहमद खान

३) महंतांच्या भ्रष्ट कारभारापासून पवित्र ठिकाणांना वाचविण्यासाठी केलेली चळवळ ..........


अ) अकाली चळवळ　　ब) जातीय सुधारणा चळवळ

क) शुद्धी चळवळ　　ड) सत्याग्रह चळवळ

**२. खालील जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| १) ब्राह्मो समाज | अ) स्वामी विवेकानंद |
| २) आर्यसमाज | ब) ॲनी बेझंट |
| ३) रामकृष्ण मिशन | क) स्वामी दयानंद सरस्वती |
| ४) थिऑसॉफिकल सोसायटी | ड) जोतिबा फुले |
| ५) अकाली चळवळ | इ) पंडित रमाबाई |
| ६) सत्यशोधक समाज | ई) राजा राममोहन रॉय |
| ७) अलिगड चळवळ | ग) शीख |
| ८) आर्य महिला समाज | ह) न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे |
| | फ) सर सय्यद अहमद खान |
| | ण) दादाभाई नौरोजी |

३. सुधारक चळवळींच्या कोणत्याही दोन मर्यादा लिहा.





**४. खालील परिच्छेद वाचा आणि उत्तरे लिहा.**

रामवती ही NIOS मध्ये शिपाई म्हणून काम करीत होती. तिचे २१ व्या वर्षी लग्न झाले आणि तिच्या २८ व्या वर्षी तिच्या पतीचे निधन झाले. NIOS च्या कार्यालयात तिला आपल्या पतीच्या जागी कामावर घेतले. कारण तिचे माध्यमिक पर्यंतचे शिक्षण झालेले होते. त्यामुळे ती स्वत:चे घर चालवू शकते. तिला तिच्या कामामुळे समाजात मान आहे तसाच आईबद्दल मुलांनाही अभिमान आहे.

१. जर रामवतीच्या बाल विवाह झाला असता. तर काय घडू शकले असते?

२. जर रामवती घराबाहेर पडली नसती तर तिचे आणि तिच्या कुटुंबाचे काय झाले असते?

## ६.४ भारतीय समाजावर सामाजिक चळवळींचा परिणाम :

एकोणिसाव्या शतकात सुधारक चळवळींमुळे भारतीय समाज जागृत झाला. त्यामधून समाजामध्ये सारासार विचारसरणी आणि शास्त्रीय व मानवतावादी दृष्टी आली. आधुनिक नवीन कल्पना आणि संस्कृती आणि जुनी भारतीय संस्कृती यांचा चांगला मिलाफ होऊ शकेल अशी चळवळीच्या पुढाऱ्यांची धारणा होती. नवीन शिक्षणपद्धतीमुळे भारतीयांना शास्त्रीय दृष्टिकोण व बुद्धि प्रामाण्यवादाची माहिती झाली. सर्वच चळवळींनी स्त्री शिक्षणासाठी जागृती दर्जा मध्ये सुधारणा, जातीयतेवर, अस्पृश्यतेवर टीका केली. या चळवळींमुळे स्वातंत्र्य समता व बंधुता याकडे वाटचाल सुरू झाली.

स्त्री शिक्षण आणि कायदेशीर मार्गांमुळे स्त्रियांच्या दर्जात सुधारणा झाली. सतीची प्रथा आणि भ्रूणहत्या बेकायदेशीर ठरविल्या गेल्या. १८५६ च्या कायद्यान्वये विधवा पुनर्विवाह शक्य झाले. १८७२ च्या कायद्याने आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता मिळाली. १८६0 च्या कायद्याने मुलीचे लग्नाचे वय दहा वर्षे करण्यात आले. १९२९ च्या शारदा कायद्याने विवाहाचे मुलींचे १४ वर्षे व मुलांचे १८ वर्षे ठरविण्यात आले. हा सर्व परिणाम राष्ट्रीय चळवळींचा आहे. स्त्रीयांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग त्यामुळेच वाढला. कॅप्टन लक्ष्मी सेहगल (इंडियन नॅशनल आर्मी) सरोजनी नायडू, ॲनी बेझंट, अरुणा असफअली यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आता तर महिला पडद्यातून बाहेर पडून नोकऱ्या करू लागल्या आहेत.

समाज सुधारकांच्या सततच्या प्रयत्नामुळेच समाजावर हा सकारात्मक परिणाम झाला. धार्मिक चळवळीमुळे स्वाभिमान, आत्मविश्वास आणि देशाभिमान रुजला. भारतीय म्हणवून घेण्याची जागृती लोकांमध्ये निर्माण झाली या चळवळींमुळे बरेचसे भारतीय लोक आधुनिक जगाच्या बरोबरीस आले. या सर्वांचा एकत्रित परिणाम झाल्याने ब्रिटिशांपासून देश स्वतंत्र झाला.

सन १९१९ नंतर राष्ट्रीय चळवळ ही समाज सुधारणा करणारी प्रमुख चळवळ झाली. झाली. भारतीय भाषामधून लोकांपर्यंत पोहोचली. कादंबरी, कथा, नाटक, कविता, वर्तमान पत्रे आणि १९३0 नंतर सिनेमाच्या माध्यमातून लोकांना आपल्या विचारांचा प्रसार करता आला. आत्मविश्वास, आत्मसन्मान, जाणिवा, देशभक्ती, यातून राष्ट्रीय जागृती झाली. राष्ट्रीय चळवळीविषयी एखादी कादंबरी वाचली किंवा एखादा चित्रपट पाहिलात का? अशा लेखकांची व पुस्तकांची यादी तयार करा. काही चित्रपट

आणि त्यातील गीते यांचीही यादी करा. 'इन्साफ की डगरपे, बच्चे दिखाओ चलके, यह देश है तुम्हाला, नेता तुमही हो कलके' किंवा 'वन्दे मातरम' हे गीत लता मंगेशकरांनी गायलेले आहे.

या स्वातंत्र्य चळवळींना मर्यादा होत्या. त्यांचा परिणाम भारतीय समाजातल्या काही मोजक्याच सुशिक्षित लोकांना जाणवत होता. ही चळवळ परंतु शेतकरी किंवा शहरातील गरीब वस्तीपर्यंत पोहचलेली नव्हती. त्याचे दैनंदिन जीवन तसेच चालू राहिले.

**मानवतावादी :** आपल्या इच्छेनुसार विचार किंवा कृती करणे.

**स्वातंत्र्य :** काही साम्यस्थळे असणाऱ्या लोकांचा गट

**बंधुता :** गटातील लोकांमध्ये काही तरी साम्य असणे.

## आपण काय शिकलो?

- भारतीय समाजामध्ये समजूती, मागासलेपणा, सतीची चाल, विधवांचा छळ, अस्पृश्यता इ. होत्या.
- राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, जोतिबा फुले, स्वामी दयानंद सरस्वती, सर सैयद अहमदर खान, स्वामी विवेकानंद यानी प्रथमतां धार्मिक रुढी बदलण्याचा प्रयत्न केला.
- आधुनिक शिक्षण शास्त्रीय ज्ञान, यावर सर्वच समाज सुधारकांनी भर दिला. शिक्षणामुळेच स्त्रियांच्या सामाजिक दर्जामध्ये सुधारणा झाली.
- सामाजिक चळवळींमुळे समाज आमूलाग्र बदलला. समाज सुधारकांच्या अथक प्रयत्नाने सतीचे प्रथा, अस्पृश्यता या अनिष्ट प्रथा कायदा करून बदलल्या. विधवा पुनर्विवाहास मान्यता मिळाली. आधुनिक शिक्षणामुळे समाजजीवन बदलले.
- आजही सुशिक्षितांचा समाज जागृतीसाठी सहभाग आवश्यक आहे. या बाबतीमध्ये प्रसार माध्यमांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक प्रथा स्पष्ट करा.

२. समाजाला जागृत करण्यासाठी समाजसुधारकांची गरज होती का याबद्दल तुम्हाला काय वाटते?

३. धार्मिक सुधारणांशिवाय सामाजिक चळवळींना अर्थ नसतो यावर तुम्हाला काय वाटते?

४. भारतीय समाजात बदल घडवून आणण्यासाठी समाज सुधारक सक्षम होते असे वाटते काय?

५. सामाजिक व धार्मिक चळवळी यातून राष्ट्रीय चळळी का व कशा निर्माण झाल्या?

६. खालील समाजसुधारकांनी जातियता व विधवा पुनर्विवाहासाठी कोणते काम केले?

१) राजाराममोहन रॉय २) ईश्वरचंद्र विद्यासागर ३) जोतिबा फुले

७. खालील समाजसुधारकांमध्ये कोणते साम्य होते?

अ) थिऑसोफकल सोसायटी व रामकृष्ण मिशन ब) अकाली चळवळ व आर्य समाज

८. भारतीय स्त्रीशिक्षणामध्ये एकोणिसाव्या शतकात कोणकोणत्या अडचणी होत्या ?

९. मुस्लीम समाजामध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार कोणी केला? त्याबाबतीतल्या व्यक्तीचे योगदान सांगा.

१०. नकाशाचा अभ्यास करून खालील ठिकाणे दाखवा.

१) ब्राह्मो समाज, आर्यसमाज आणि प्रार्थना समाज यांचे कार्य असणारी ठिकाणे, M.A.O. कॉलेज ज्या शहरात आहे ते शहर.

२) पश्चिम भारतात सामाजिक चळवळी करणारे समाज सुधारक सांगा आणि त्यांचे कार्य ज्या ठिकाणी भरभराटीस आले ती ठिकाणे दाखवा.



**आकृती ६.१२ : भारताचा नकाशा**

टिपा

## पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे

**६.१**

१. सती, जातीयता, बालविवाह, विधवांची स्थिती

२. ते मानवी तत्त्वांच्या विरुद्ध होते.

३. शौर्य, दृढइच्छा, प्रेरणा, ध्येयप्राप्तीसाठी दृष्टी

४. धर्म ग्रंथांमध्ये प्रथांना आणि अंधश्रद्धांना मान्यता नाही हे दाखवून दिले.

**६.२**

१. १) क  २) ड  ३) अ

२. १) ई  २) क  ३) अ  ४) ब
५) ग  ६) ड  ७) फ  ८) इ

३.

अ) फार कमी लोक संख्येवर परिणाम प्रामुख्याने सुशिक्षित वर्ग

ब) ते सर्वापर्यंत पोहचू शकत नाही.

४.

अ) अशिक्षित असती तर तिची बालविवाह झाला असता आणि अनेक मुले असती तर, तिला ती बालविवाहामुळे सक्षम राहिली नसती तिला पालकांवर किंवा सासूसासऱ्यांवर अवलंबून रहावे लागले असते त्यामुळे जगण्याचा प्रश्न आला असता.

ब) परावलंबी झाली असती आणि जगण्याचा प्रश्न निर्माण झाला असता

७

# ब्रिटिश राजवटीला जनतेचा विरोध

संपूर्ण भारतात ब्रिटिश राजवटीचा परिणाम झालेला होता. वर्षानुवर्षे एखाद्या राजवटीने राज्य करणे याची कल्पना करता येईल का? नाही. आपल्यामधील बऱ्याच जणांचा १९४७ नंतर जन्म झालेला आहे. त्यावेळी भारताला स्वातंत्र्य मिळालेले होते. ब्रिटिशांनी जेव्हा भारतावर विजय मिळविला त्यावेळी त्यांनी देशातील अर्थव्यवस्था वसाहतमय केलेली होती. त्यांना प्रखर विरोध झाला. अनेक नागरी उठाव झाले. अनेकांना त्यांनी ताब्यात घेतले, जमिनदारांनाही भिकेस लावले. अनेक धर्म, पंथाचे लोक एकत्र आले. ब्रिटिश राजवटीच्या विरुद्द उभे राहिले. आपण सदरच्या पाठ अभ्यासामध्ये १८५७ चा उठाव आणि राष्ट्रीय चळवळी याची माहिती पाहणार आहोत.

## उद्दिष्टे :

पाठ अभ्यासानंतर पुढील गोष्टींची माहिती होईल.

- ❖ वसाहत वादाविरुद्ध १८५७ पूर्वीचा संघर्ष
- ❖ शेतकरी आणि जमातींचे बंड
- ❖ १८५७ च्या उठावाची कारणे
- ❖ १८५७ च्या उठावाचे परिणाम

## ७.१ वसाहत कायद्यापूर्वी जनतेचा उठाव :

जनतेचा उठाव हा शब्द का वापरला असेल? याचे कारण म्हणजे मोठ्या संख्येने लोक या संघर्षात उतरलेले होते. ज्या कारणांसाठी एकत्र आले ते यश मिळाले का? सदरचा भाग अभ्यासल्यानंतर आपण त्याबद्दल मत व्यक्त करा.

### ७.१.१ जनतेच्या चळवळीची कारणे :

जनतेने विरोध का केला? जेव्हा त्यांचे हक्क हिरावले गेले तेव्हा प्रखर विरोध केला. सर्व संघर्ष हा पिळवणूकीच्या विरोधी होता.

ब्रिटिश राजवटीमध्ये लोकांच्या हक्कांची पायमल्ली केली. त्यांचा दर्जा आणि आर्थिक स्तिती रसातळाला गेली. हा विरोध प्रामुख्याने संस्थानिकांनी शेतकऱ्यांनी आणि आदिवासींनी केला. उदा. जेव्हा वॉरन हेस्टिंग्जने बनारसवर हल्ला केला व चेतसिंगला कैद करून सैन्य व पैशाची मोठी मागणी केली तेव्हा बनारसमधील लोकांनी उठाव केला. मद्रासमध्ये प्रेसिडन्सी पॉलिगर्सने उठाव केला. कारण ब्रिटिशांनी त्यांचे सैन्य व जमीन हिसकावून घेतली. ब्रिटिशांनी धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप केला हे देखील जनतेच्या उठावाचे कारण ठरले. अर्थातच लोकांचा उठाव हा ख्रिश्चनांविरुद्धही होता. कारण ब्रिटिशांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा सुरू केलेल्या होत्या.

राज्यकर्त्यांचा धर्म आणि प्रत्यक्ष राजवटीतील लोकांचा धर्म भिन्न असल्यानेही काही ठिकाणी बंड पुकारले गेले. मलबार क्षेत्रामद्ये मोपला उठावामागे हेच कारण होते. मुस्लीम शेतकरी हे हिंदू जमिनदार आणि सावकारांविरुद्ध उठले. पुढील भागात या चळवळींचे स्वरूप पाहू.

### ७.१.२ जनतेच्या चळवळींचे स्वरूप :

जुलमी राजवटी विरुद्द प्रखर विरोध करताना हिंसा आणि लूट हे मार्ग आंदोलकांनी वापरले. कनिष्ठ वर्गातील लोकांनीही त्यात भाग घेतला. ब्रिटिश असोत किंवा जमीनदार किंवा महसूल कर्मचारी असो त्यांनी हल्ले चढविले. संथळ हल्ल्यामध्ये जमाखर्चाची पुस्तके तसेच शासकीय इमारतीं जाळल्या गेल्या.

मागील पाठामध्ये ब्रिटिशांचे जमिनविषयक धोरण पाहिले. शेतकऱ्याकडून जास्तीत जास्त महसूल मिळाला पाहिजे हे धोरण ठेवले त्यामुळे लोकांमध्ये असंतोष पसरला व त्यातून शेतकरी व जमातींनी तात्काळ विरोध केला.

जनतेच्या आंदोलनाचा हेतू हा प्रामुख्याने पूर्वीचे हक्क आम्हास मिळावेत की जे ब्रिटिशांनी काढून घेतलेले होते. प्रत्येक समाजातील गटाची आंदोलनाची कारणे भिन्न होती. जमिनदारांना आपल्या जमीनी परत हव्या होत्या. राजवट असणाऱ्यांना त्यांच्या जमीनी व मालमत्ता परत हवी होती. तसेच जमातींना व्यापाऱ्यांचा आणि सावकारांचा दैनंदिन जीवनात हस्तक्षेप नको होता.

## ७.२ एकोणिसाव्या शतकातील शेतकरी व जमातींचा उठाव :

सन १७६० मध्ये बंगाल आणि बिहारमध्ये संन्यासी आणि चौरांचे बंड झाले. १७६३ ते १८५६ किमान ४० मोठे उठाव झाले आणि शंभरपर्यंत लहान उठाव झाले होते. प्रत्येक उठावाची कारणे भिन्न होती. याबाबतची माहिती पुढे पाहू.




**आकृती ७.१ : १९ व्या शतकातील शेतकरी आणि आदिवासी उठावाची ठिकाणे दर्शविणारा नकाशा**

## ७.२.१ गरीब शेतकऱ्यांचे बंड :

आधीच्या प्रकरणामध्ये कायमधारा पद्धतीची माहिती वाचलेली असेल त्याचे प्रतिकूल परिणाम भारतीय शेतकऱ्यावर झाले. या प्रकाराने जमीनदार हे जमिनीचे मालक झाले. जर शेतसारा एकरकमी भरला

नाही तर जमिनदार जमीन विकून टाकत असे. पिक आले किंवा गेले तरी शेतसारा दिला पाहिजे ही सक्ती होती. शेतसारा भरण्यासाठी कर्ज काढायला सावकाराकडे जावे लागे. त्या सावकारांना महाजन म्हणत. मूळचा दरिद्री शेतकरी कर्जाची फेड करू शकत नसे त्यामुळे तो दारिद्र्यातून बाहेर पडू शकत नसे. त्यामुळे महाजनाकडे त्याला सालीना चाकर म्हणून रहावे लागे म्हणूनच या बंडामध्ये गरीब शेतकरीही सहभागी झाला. जमिनदाराने जर कर दिला नाही तर जमिनदारांच्या जमिनी ब्रिटिश लोक काढून घेत व त्याच्या जमिनी लिलावाच्या बोलीने दुसऱ्याला देत. हे पैसेवाले प्रामुख्याने शहरातून येत. त्यांना जमीनीमध्ये खते बी वियाणे यांची गुंतवणूक करायची नव्हती. फक्त त्याच्यापासून कर मिळवायचा होता यामुळे मुळचा कष्टकरी हा अगदी दारिद्र्यात पछाडलेला होता.

या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी शेतकऱ्यांनी व्यापारी पिके घेण्यास प्रारंभ केला. निळ, ऊस, ताग, कापूस, अफू इ. उत्पादने सुरू केली. शेतीमध्ये व्यापारीकरण आले. पिक काढणीनंतर शेतकऱ्यांना व्यापरी किंवा मध्यस्तांवर अवलंबून रहावे लागणारच होते. व्यापारी पिके घेतल्याने अन्नधान्य उत्पादन घटले. त्यामुळे तर अन्नधान्याची दुष्काळामध्ये टंचाई झाली. उपासमार झालेले शेतकरीही बंडामध्ये उतरले. अधिक माहिती नंतरच्या भागात घेवू.

### १) फकीर, संन्याशांचा उठाव (१७७०१८२०) :

१७५७ मध्ये ब्रिटिशांनी बंगालमध्ये आपले पाय घट्ट रोवले. शेतसारा वाढवला आणि शेतकऱ्यांचे शोषण सुरू झाले. सन १७७० मध्ये बंगालमध्ये दुष्काळ पडला. जमीनदारांनी जमीनी हडप केल्या. त्यामुळे सैन्यातून काढून टाकलेले सैनिक आणि गरीब शेतकऱ्यांनी बंड पुकारले. त्याला साथ दिली संन्याशी आणि फकीरांनी.


फकीर म्हणजे मुस्लीम साधू. त्यांना साथ दिली ती हिंदू नेते भवानी पाठक व देवी चौधुराणीने. त्यांनी इंग्रजी कारखान्यावर हल्ला केला. कंपनीचा माल हत्यारे व दारुगोळा ताब्यात घेतला. मझनुम शाह हा त्यांचा नेता होता. परंतु ब्रिटिशांनी १९ व्या शतकाच्या प्रारंभी या सर्वांना नियंत्रणाखाली आणले.

सन १७७० ते १८२० च्या दरम्यान संन्याशांनीही उठाव केला. १७७० च्या दुष्काळामुळे दारिद्र्य वाढले. अनागोंदी वाढली. त्याच दरम्यान ब्रिटिशांनी फतवा काढून हिंदू व मुस्लीम लोकांवर धार्मिक ठिकाणांना भेटी देण्यास बंधने घातली. याचाही परिणाम उठावामध्ये सहभागी होण्यामध्ये झाला.

### २) नळि उत्पादकांना उठाव (१८५९१८६२) :

ब्रिटिशांनी नफा मिळविण्याचे अनेक मार्ग शोधले. दैनंदिन जीवनातही ढवळाढवळ सुरू केली. नवीन पिकेच फक्त सुरू केली नाही तर शेतीचे नवे तंत्र आणले. शेतकऱ्यांनी व्यापारी पिके घ्यावीत अशी सक्ती केली आणि जास्तीतजास्त शेतसारा भरावा. त्यापैकी नीळेचे उत्पादन हे एक व्यापारी पीक आहे. नीळ हे इंग्लंडच्या व्यापारी कापड उद्योगासाठी आवश्यक असणारे उत्पादन. नीळ उत्पादकाच्या नाराजीची तीन कारणे होती.

- नीळीच्या मालाला कमी किंमत दिली जात असे.
- अन्नधान्य पिकापेक्षा ते पीक समाधानकारक नव्हते.
- नीळीच्या उत्पादनामुळे शेतीची उत्पादकता कमी होत होती.




**आकृती ७.२ : बंगालमधील नीळ उत्पादक क्षेत्राचा नकाशा**

निळीच्या वाढत्या उत्पादन क्षेत्रामुळे अन्नधान्याचे उत्पादन घटले. नीळ व्यापारी किंवा मध्यस्थांमार्फत विकावी लागे. अनेक वेळा त्याची कमी किंमत येत असे. जमिनदार मात्र आपला अधिकार गाजवत राहिले.

नीळ उत्पादकांनी बंगालमध्ये निळीच्या उत्पादनावर बहिष्कार घातला. हिंदू मुस्लीम शेतकरी संपावर नेले. वार्ताहर आणि मिशनरींनी त्याला पाठिंबा दिला. निळीच्या उत्पादकांना थोडा दिलासा मिळाला १८६० मध्ये सरकारने एक आदेश काढला की यापुढे नीळ उत्पादकांवर नीळ उत्पादन घेण्याची सक्ती करणे म्हणजे बेकायदेशीर आहे. त्यामुळे नीळीच्या उत्पादकांनी एक लढा जिंकला.



**आकृती ७.३ : पश्चिम बंगालमधील नीळ उत्पादन**

### ३) फरैझी चळवळ (१८३८-१८४८) :

शरियालखान आणि दादूमिया यांनी कर देणार नाही अशी चळवळ सुरू केली. जमिनदार आणि नीळमळेवाल्यांविरुद्ध चळवळ सुरू केली. मोठा लढा दिला परंतु ब्रिटिशांनी सैन्याच्या व आयुधांच्या जोरावर ही चळवळ दडपली.

### ४) वहाबी चळवळ (१८३०-१८६०) :

सय्यद अहमद (रायबरेली) यांच्या नेतृत्वाखाली वहाबी चळवळ सुरू झाली. अरेबियाचा अब्दुल वहाबा आणि दिल्लीचा वलीउल्लाह यांचा अनुयायी, प्रथम ही धार्मिक चळवळ होती. बंगालमध्ये तिचे वर्ग कलहात रुपांतर झले. शेतकरी वर्गाने जमिनदारांच्या विरुद्ध उठाव केला.

### ७.२.२ शेतकऱ्यांच्या उठावाचा परिणाम :

भारतीय शेतीची परंपरा असणाऱ्या देशात ब्रिटिश राजकीय व आर्थिक धोरणांमुळे शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली. या धोरणांविरुद्ध शेतकऱ्यांनी बंड पुकारले. अगदीच ब्रिटिशांना हाकलून देण्याची त्यांची भूमिका नव्हती. परंतु लोकांमध्ये जागृती करावी हा हेतू होता. लोकांनी संघटीत होवून संघर्ष करावा व पिळवणूक थांबविण्यासाठी लढा द्यावा अशी भूमिका तयार झाली. यातूनच शीख समाज पंजाबमध्ये एकत्र आला आणि शेवटी १८५७ चे स्वातंत्र्य संग्राम झाले.

### आपल्यासाठी एक उपक्रम ७.१

आपल्या दैनंदिन जीवनात संघर्ष करावा लागतो. चळवळीमधील संघर्ष हा या संघर्षापेक्षा वेगळा कसा होता? लोकांच्या चळवळींनी काय साध्य केले? आपल्या मित्रमंडळींबरोबर चर्चा करा आणि ५० शब्दांपर्यंत टिपण तयार करा.

### ७.२.३ आदिवासी चळवळी :

ब्रिटिश राजवटीच्या विरुद्ध काही जमातींनी बंड पुकारले. भारतीय जीवनपद्धतीमध्ये आदिवासी जीवन हा अविभाज्य भाग आहे. ब्रिटिश राजवटीला जोडण्यापूर्वी आदिवासींची स्वतंत्र जीवन पद्धती होती. त्यांची जीवनपद्दती पारंपारिक आणि मर्यादित होती. टोळीचा प्रमुख हा सुरक्षेची काळजी घेत असे. वनक्षेत्र हे जगण्याचे साधन. ते वनांमध्ये मुख्य भागापासून अलग रहात.

ब्रिटिश राजवटीमध्ये आदिवासी जीवनपद्धतीला आणि त्यांच्या स्वावलंबी जीवनाला धक्का दिला. आदिवासी जमातींनी ब्रिटिशांविरुद्ध बंड पुकारले आणि वसाहत वादाशी संघर्ष केला. आदिवासींकडे असलेले धनुष्य व बाण ही पारंपारिक हत्यारे वापरली. ब्रिटिश त्यांच्याशी क्रूरपणे वागले. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. मालमत्ता जप्त केली. अनेकांना तुरुंगात पाठविले तर काहींना फाशी दिली. आदिवासींचा लढा हा काही मोजक्याच ठिकाणी थोड्या लोकांच्या बळावरचा असला तरी ब्रिटिश राजवटीला धक्का देण्यात त्यांचा ही मोठा वाटा आहे.

#### १) संथळाचे बंड (१८५५१८५७) :

संथळ हा भाग दमन इकोह किंवा संथळ परगणा. हे क्षेत्र बिहारमधील भागलपूर (ओरिसाच्या उत्तरेस) ते हजारी बाग (बंगालची सरहद्द) या दरम्यानचे क्षेत्र. संथळ हे आदिवासी जंगलामध्ये उपजीविका करीत. ते शेती करून शांतपणे जीवन जगत होते. ब्रिटिशांनी व्यापार, सावकार, जमीनदार ही पद्धती आणली आणि अमूलाग्र बदल झाले. व्यापारी माल उधारीवर देत आणि परतफेड मात्र पीक आल्यावर मोठ्या व्याज दराने वसूल करीत. अनेक वेळा महाजन (जमीनदार) यांना नांगर, बैल प्रसंगी जमीनही द्यावी लागे. हे पुढे लोक मजूर म्हणून राबू लागले किंवा फक्त जमीनदारासाठीच राबू लागले. हेच संथळ अन्यायाविरुद्ध उठले. सिंधू व कान्हू यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सरकार विरुद्ध लढले. संथळांचा त्याच्यामध्ये पराभव झालेला असला तरी त्यापुढील स्वातंत्र्य संग्रामातील त्यांच्या प्रेरणेची दखल घेणे आवश्यक आहे.

टिपा





**आकृती ७.४ : तीरका मांझी**

## २) मुंडा उठाव (१८९९१९००) :

मुंडा उठाव हा १८५७ नंतरचा मोठा उठाव समजला जातो. मुंडाना विशिष्ट वनाच्या भागात त्यांचेच अधिकार होते. ते अन्य जातींना शिरकाव करू देत नसत. वनांची तोड तेच करीत. ब्रिटिश राजवट आल्यानंतर ही पद्धती मोडून टाकली. त्यांनी व्यापारी आणि कॉंट्रॅक्टर आणले. या कॉंट्रॅक्टरांना मजूर लागते ते संथळांचा वापर करीत. मुंडाच्या चळवळीचा उदय यातून झाला. विरसा मुंडा हा त्यांचा नेता त्याचे काही शिक्षण झालेले होते. पवित्र अशा वनांची पूजा करा असे त्याच्या जमातीतील लोकांना आवाहन केले. ब्रिटिशांनी जमिनी ताब्यात घेण्यापासून परिवर्तन करण्याची विरसा मुंडाची चाल होती. विरसा मुंडाने सावकार, महाजन आणि इंग्रजी अधिकाऱ्यांबरोबर लढा दिला. पोलिस चौक्या, चर्च, मिशनरीवर हल्ले चढविले. या युद्धात ते हरले आणि मुंडाचा सन १९०० मध्ये तुरुंगातच मृत्यू झाला.



आकृती ७.५ : बिरसा मुंडा

त्याचे बलिदान वाया गेले नाही. छोटानागपूर कूळकायदा १९०८ मध्ये आदिवासी वेठ बिगर मजूरांना मालकी हक्काने काही जमीन देण्यात आल्या. आजही अनेकांना त्याच्या आठवणी ताज्या आहेत.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

**वेठ बिगार :** वेठ बिगार, मजूर म्हणजे विशिष्ट काळ पर्यंत दुसऱ्याकडे कामाला रहाणे या नवीन ठिकाणी केलेल्या कामाची मजूरी म्हणजे जाण्यायेण्यासाठी पैसे, राहण्याची व्यवस्था आणि जेवण पुरविले जाते.

### ३) जैतिया गारो बंड (१८६०१८७०) :

ॲग्लो वर्मा युद्धानंतर ब्रह्मपुत्रा खोरे व सिल्हेट जोडणारा रस्ता करण्याची ब्रिटिशांची योजना होती. भारताच्या ईशान्येकडील भाग जोडण्यास तेथील जैतिया आणि गारो टोळ्यांचा विरोध होता. १८२७ मध्ये जैतिया टोळ्यांनी हे काम बंद पाडले. ही वार्ता गारो टेकड्यांपर्य

ंत पोहचली. ब्रिटिशांनी जैतिया आणि गारो खेडी जाळली. १८६० मध्ये ब्रिटिशांनी घरावरील कर आणि आयकर लावला त्यामुळेही असंतोष पसरला. जैतियांचा नेता पाटोगन संगमा याचाही ब्रिटिशांनी पराभव केला.



**आकृती ७.६ : युकियांग नोंगबा स्मारक**

## ४) भिल्लांचा उठाव (१८१८-१८३१) :

महाराष्ट्र व गुजरातच्या दरम्यान भिल्लाचे वास्तव्य होते. खानदेश १८१८ मध्ये ब्रिटिशांच्या ताब्यात आले. भिल्लानी ब्रिटिश लोक हे बाहेरचे आहेत म्हणून त्यांच्या विरुद्ध संघर्ष केला. दुसऱ्या बाजीरावांचा सेनानी त्रिंबकजी यांनी ब्रिटिशांच्या विरोधी उठाव केला.

## ५) कोळांचा उठाव (१८३७-३२) :

सिंगभूम आणि छोटा नागपूर क्षेत्रामध्ये कोळांचे स्वतंत्र राज्य होते परंतु ब्रिटिशांच्या आगमनानंतर त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आली. ब्रिटिश कायदा सावकार, व्यापारी आले त्यामुळे तेथे तणाव वाढला. तो उठाव सैन्य बळावर दडपला.

### ६) मोपला उठाव (१८३६१८५४) :

मोपला हे मुस्लिम शेतकरी, भूमिहिन, मजूर व मच्छिमारी करणारे मलबार किनाऱ्यावरील लोक. ब्रिटिशांनी लावलेल्या तेथील जमिनीवरील कायद्यामुळे मोपलांना उठाव करावा लागला. लढा संपविण्यासाठी ब्रिटिशांनाही अनेक वर्ष लागली.

## पाठ्यांशावरील प्रश्न ७.१

१. एका वाक्यात स्पष्टीकरण करा.

अ) फकीर    २) महाजन    ३) मोपला

२. भारतीयांची पिळवणूक करणाऱ्या तीन गटांची नावे लिहा.

अ) ______

ब) ______

क) ______

३. लोकांच्या उठावाची तीन कारणे लिहा.

अ) ______

ब) ______

क) ______

## ७.३ १८५७ चा उठाव ' कारणे, शमन आणि परिणाम :

१0 मे १८५७ मिरत मध्ये भारतीय सैन्यानी उठावाला प्रारंभ केला. ब्रिटिशांनी त्याचे शिपायांचे बंड म्हणून वर्णन केले हे आपण पाहिले. आता त्याला आपण स्वातंत्र्य युद्ध समजतो. भारतीय सैनिकांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार मारले आणि दिल्लीकडे प्रयाण केले. त्यांनी लाल किल्ल्यात प्रवेश केला आणि अधिकारशुन्य असलेल्या मोगल बादशहा बहादूर शहा जाफर याला भारताचा राजा म्हणून जाहीर केले. हे सर्व बंडखोर वसाहत वादाच्या विरुद्ध होते तसेच ब्रिटिशाची साम्राज्यवादाची जी भूमिका होती त्याच्या विरोधी भूमिका होती. हा सगळा राग वसाहतीच्या विरोधी होता. सदरच्या प्रकरणामध्ये असमाधानी भारतीय लोक, ब्रिटिश राजवटीच्या विरोधी बंड करून का उभे राहिले याची माहिती मिळेल.

## अ) राजकीय कारणे :

ब्रिटिशांनी भारतातील ब्रिटिश साम्राज्याला प्रदेश जोडून विस्तार केला व भारतीयांची राजवट संपविली. ब्रिटिशांचा भूमीसंपादन करणे व त्यातील संपत्ती इंग्लंडला घेवून जाणे हाच हेतू होता. त्यांनी राज्य खालसा करणे आणि आपल्या अधिपत्याखाली आणणे आणि त्याच्या बदल्यात ब्रिटिशांनी त्या प्रदेशाचे रक्षण करणे हे धोरण राबविले. राज्य खालसा करून तनखा सुरू केला. परंतु ज्याला वारस नसेल त्या राजाचा दत्तक राजपूत्र हा हक्कदार किंवा तनख्यास अपात्र ठरविला. लॉर्ड डलहौसिने मराठ्यांचे सातारा, नागपूर, झांशी, ब्रिटिशांनी आणि इतर लहान राज्ये खालसा केली. दुसरा बाजीराव याला तनखा मंजूर केला परंतु त्याच्या दत्तक पुत्रास मात्र (नानासाहेब) हा तनखा नाकारला. ईस्ट इंडिया कंपनीचा हा हस्तक्षेप भारतीय राज्यकर्त्यांना आवडला नाही. राज्य खालसा नियमापूर्वी निपुत्रिक राजाला दत्तक घेण्याचा अधिकार होता. परंतु त्यासाठी नव्या नियमाप्रमाणे ब्रिटिशांकडून त्याला मान्यता द्यावी लागत होती.

ब्रिटिशांच्या प्रदेश जोडण्याच्या धोरणामुळे केवळ राज्यकर्तेच नव्हे तर त्याच्या जीवावर जगणारे आश्रीत सैन्य, कलाकार, सर्वसामान्य लोकही हे नाराज झाले.




**आकृती ७.७ : १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये सहभागी झालेली नगरे**

राज्यकर्त्यांकडून सन्मान मिळणाऱ्या विद्वान लोक आणि धार्मिक विधी करणारांचे महत्त्व संपले. जमिनदारांना कर मिळेनासा झाला. त्यांच्या बाजूने असणारे अवधचे संस्थान खालसा केले. लोक बेकार झाले. शेतकऱ्यांना शेतसारा भरणे सक्तीचे करण्यात आले.

लोकांच्या दैनंदिन जीवनात ब्रिटिशांची ढवळाढवळ सुरू झाली. पारंपारिक श्रद्धा, मूल्ये आणि सर्व सामान्य माणसांच्या धार्मिक जीवनामध्येही दडपण निर्माण झाले. ब्रिटिश अधिकारी उर्मट होते. त्यामुळे सर्वसामान्य माणूस व अधिकाऱ्यात दरी निर्माण झाली.

### ब) आर्थिक कारणे :

भारतीय आर्थिक घडामोडींची वाताहात झाली. ब्रिटिश वसाहतीमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्व दुय्यम झाले. ब्रिटिश लोक व्यापारासाठी भारतात आले आणि त्यांनी पिळवणूक सुरू केली. घेवून जाता येईल इतकी संपत्ती भारतातून ब्रिटनला घेवून गेले. ब्रिटिश नोकरदारांना उच्च पदाच्या आणि जास्त पगाराच्या नोकऱ्या होत्या. परकी मालाच्या व्यापारावर त्यांचेच नियंत्रण होते. त्यामुळे भारतावरील आर्थिक नियंत्रण त्यांच्याच हातात आले.. भारतीय व्यापार, उद्योग हस्तकला वाढीला त्यांचा विरोध होता. त्यामुळे हे सर्व व्यवसाय नष्ट झाले. हस्तकला व्यावसायिकांचा राजकीय वरदहस्त संपला. ब्रिटिश माल यंत्रावर होत असल्याने भारतीय व्यावसायिक त्या मालाशी स्पर्धा करू शकत नव्हते. त्यामुळे भारत हा ब्रिटिशांना कच्च्या मालाचा पुरवठादार आणि पक्क्या मालाचा ग्राहक बनला. भारतीय हातमाग कापड व्यवसाय नष्ट झाला कारण त्यांचे स्वस्तात व उत्तम कापड बाजारात येवू लागले. त्यातून हातमाग कामगार बेकार झाले. कच्चा मालही इंग्लंडला जावू लागल्याने फार थोडा माल विणकरांसाठी शिल्लक राहू लागला. त्यातही भारतीय कारागिर वापरत असलेल्या कच्च्या मालावर कर लादले. बाजारपेठेत स्पर्धक नसल्याने त्यांनी प्रचंड नफा मिळविला आणि भारतीय संपदेची लूट केली.

भारतीयांची आणखी किती तरी पिळवणूक केली. कच्चा माल खरेदी आणि पक्क्या मालाची विक्री यासाठी रेल्वे आणि वाफेवर चालणाी जहाजे वापरण्यात येऊ लागली. रेल्वेचा विकास हा राष्ट्रीय जागृतीसाठी कसा उपयुक्त झाला याची माहिती आहे का? रेल्वेमुळेच लोकांपर्यंत विविध कल्पना पोहचल्या हे नाकारता येणार नाही. सन १८५३ मध्ये डलहौसीने कलकत्ता ते आग्रा टेलिग्राफ लाईन सुरू केली. तसेच भारतीय टपालसेवा सुरू केली.

प्रारंभी शेतसारा हेच ब्रिटिशांचे उत्पन्नाचे साधन होते. त्यावर त्यांनी विविध कल्पना राबविल्या. अनेकांच्या जमिनी जमीनदार आणि सावकारांकडे आल्या. रयतवारी व महालवारी सुरू केली. कायमधारापद्धतीने बंगाल, बिहार, ओरिसामधील शेतकऱ्यांची जमीन मालकी नष्ट झाली. उत्पन्नाच्या दहावा, अकरावा हिस्सा शेतसारा म्हणून भरावा लागे. तो देवू शकले नाहीत, त्यांना जमिनी विकाव्या लागल्या. सावकारांकडून कर्ज घ्यावे लागले ते फेडू न शकल्यामुळे सावकारांनी जमिनी ताब्यात घेतल्या. पुढील संकट टाळण्यासाठी कोर्टात गेले तर त्यातून त्यांना न्याय मिळत नव्हता. नवीन जमीनदारांचा वर्ग तयार झाला आणि त्यांनी सर्वसामान्य माणूस आणि ब्रिटिश यांच्यामधील दुवा म्हणून भूमिका केली. काहींनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये ब्रिटिशांना मदत केली. सन १७७० ते १८५७ पर्यंत जवळपास १२ दुष्काळी

वर्षांनी शेतकऱ्यांना होरपळून काढले. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून १८५७ चे स्वातंत्र्य संग्राम घडून आला.

## क) सामाजिक व धार्मिक कारणे :

भारतीय जनतेच्या वेदना समजण्याइतपत ब्रिटिश संवेदनशील नव्हते. सामाजिक सुधारणांमध्ये सतीची प्रथा, स्त्रीभूण हत्या, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण या सुधारणांमुळे अनेक लोक नाराज होते. ब्रिटीशांनी ख्रिश्चन धर्मप्रसार करण्यासाठी शाळांकॉलेज काढली, हा त्यांचा समज होता. ब्रिटिश राजवटीला विरोध करणारे लोक नको होते. परंतु ब्रिटिश माल खरेदी करणारा ग्राहक हवा होता. या सर्व बावतीत लोकांना या सुधारणा म्हणजे ब्रिटिशांचे ख्रिश्चन धर्मामध्ये धर्मांतर करण्याची ही योजना आहे, अशी खात्री वाटू लागली. सन १८५० चा २१ वा कायद्यान्वये धर्मांतर करणारांनाही वारसा हक्काने मालमत्ता मिळणे मंजूर झाले. त्यातूनच लोकांना धर्मांतराची भिती वाटू लागली.

सन १८०६ मध्ये मद्रास प्रांतामध्ये शिपायास धार्मिक कारणाने शिक्षा झाली. ब्रिटिशांनी हिंदूंनी गंध लावू नये. मुस्लीमांनी दाढी वाढवू नये अशा सूचना दिल्या. त्यातून शिपायांची मानहानी केली. ब्रिटिशांनी भारतीय सैन्याची कधीही काळजी घेतली नाही. प्रामाणिक शिपायांना युद्ध नौकेवर पाठविले. त्यांच्या धार्मिक भावना पायदळी तुडविल्या.

## ड) सैन्यातील असंतोष :

ईस्ट इंडिया कंपनीमध्ये असलेले सैनिक मूळचे शेतकरी कुटुंबातील होते. ब्रिटिश धोरणांचा त्यांच्यावर परिणाम झाला. भारतीय सैनिकांना सुभेदार पदापेक्षा वरची जागा देत नसत. जेव्हा भारतीय सैनिकांना युद्ध नौकेवर पाठविले जाई तेव्हा त्यांना विशेष भत्ता दिला जात असे अनेक वेळा तो दिला जात नसे. ते शिपाई त्याच्या अधिकाऱ्यांवरील असंतोष व्यक्त करीत. त्यामुळे १८५७ ला सैनिकांनी स्वत: होवून भाग घेतला. इंग्लिश सैन्यापेक्षा भारतीय सैन्याला कमी पगार दिला जात असे. हिंदू धर्माप्रमाणे समुद्र ओलांडणे निषिद्ध समजले जात असे ते त्यांच्यावर लादले गेले.

## ई) तात्कालिक कारण :

भारतीयांच्या भावना उफाळून आलेल्या होत्या. बंडासाठी फक्त निमित्त पुरे होते आणि त्याला निमित्त झाले व क्रांतीची ठिणगी पडली. सन १८५६ पासून रॉयल इन्फिल्ड बंदुकीच्या काडतुसाला गाई व डुकराच्या चरबीचा वापर केलेला असे व काडतूसाचे आवरण दाताने तोडावे लागत असे. जानेवारी १८५७ मध्ये सैनिकांमध्ये ही बातमी पसरली आणि सैनिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या. गायही हिंदूच्या दृष्टीने पवित्र तर डुक्कर हे मुस्लीमांना निषिद्ध यामधून हिदूं मुस्लिमांच्या भावना दुखाविण्यासाठी हे ब्रिटिशांनी कृत्य केले अशी भावना पसरली. यामधून २९ मार्च १८५७ रोजी शिपायांनी क्रांतीची ठिणगी पेटविली.

### ७.३.२ १८५७ च्या क्रांतीचा प्रारंभ :

२९ मार्च १८५७ चा दिवस मंगल पांडे नावाच्या शिपायाने बराकपूर (कलकत्याजवळ) येथे दोन ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार केले. त्याला पकडले परंतु बराकपूर रिजमेंटमध्ये प्रचंड गोंधळ उडाला. ही बातमी देशातील विविध भागात पोहचली.



**चित्र ७.८ : मंगल पांडे**

मीरतमध्ये छावणीमध्ये काडतुसाला लावलेल्या ग्रीसमुळे त्याचा वापर करण्याविषयीची ऑर्डर न पाळल्यामुळे तेथील ८५ शिपायांना २ ते १0 वर्षे पर्यंतची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे १0 मे १८५७ या दिवशी तीन छावण्यामध्ये उठाव झाला आणि उठाव करणाऱ्यांनी अधिकाऱ्यांचा खून करून तुरुंग फोडून कैद केलेल्या सैनिकांना बाहेर काढले. आणि दिल्लीकडे प्रयाण केले. तेथील पायदळ आणि अनेक नागरीक त्यांच्यामध्ये सहभागी झाले. दिल्ली काबीज केली. उठाव करणाऱ्यांनी अनेक अधिकाऱ्यांना ठार करून मोगल बादशहा बहादूर शहाला दिल्लीच्या तक्तावर बसविले.

दिल्लीच्या उठावाचे लोण सर्वत्र पोहचले. कानपूरमध्ये नानासाहेबांना पेशवा म्हणून जाहीर करण्यात आले. त्यांचे अधिकारी तात्या टोपे आणि अझिमुल्ला नेतृत्त्व करीत होते. लखनौमध्ये बेगमनझरत महल, मौलवी अहमदुल्ला झाशी मध्ये राणी लक्ष्मीबाई, बरेलीमध्ये खानबहादूर खान यांनी या उठावामध्ये भाग घेतला.



चित्र ७.९ : बेगम नझरत महाल

ब्रिटिशांच्या ताब्यातून दिल्ली गेली. त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला होता. त्यासाठी त्यांनी पंजाबमधून सैन्य आणले. चार महिने लढा देवून त्यांनी १0 सप्टेंबर १८५७ ला दिल्लीचा ताबा मिळविला. त्यापुढेही दहा महिने गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंगला लढा द्यावा लागला व या उठावाचा शेवट १८ जुलै १८५८ ला झाला.

या लढ्यामध्ये शौर्य दाखविले ते राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कन्वरसिंग यांनी. राणीलक्ष्मीबाईने घोड्यावर स्वार होवून ब्रिटिशांबरोबर लढा दिला. जेव्हा घोडा कोसळला तेव्हा राणीला ठार करण्यात आले. त्याबाबत ब्रिटिश सेनापति सर ह्यू रोज यांच्यामते झाशीची राणी ही सर्वात उत्तम आणि सर्वात शूर सेनापति होती. कन्वर सिंगला बिहारच्या युद्धात ठार केले तर तात्या टोपे यांना झोपेतच असतानाच पकडले आणि पुढे फाशीवर लटकविले. ब्रिटिशांनी अशा प्रकारे १८५७ च्या संघर्षाचा विमोड केला.

## ब्रिटिश राजवटीला जनतेचा विरोध

ब्रिटिशांनी वृद्ध बहादूर शहा आणि त्याच्या दोन मुलांना कैदेत टाकले. नंतर बादशहाची रवानगी रंगूनला केली. तेथेच १८६२ मध्ये वयाच्या ८७ वर्षी त्याचे निधन झाले आणि ब्रिटिशांनी त्याच्या मुलांना दिल्ली येथेच ठार करून टाकले. येथे आपल्याला १८५७ च्या उठावाच्या अपयशाची कारणे शोधावी लागतील.

### आपल्यासाठी एक उपक्रम ७.२

१८५७ च्या उठावामधील कोणत्या दोन क्रांतीकारकांपासून स्फूर्ती घ्याल? त्यांच्यातील कोणते दोन गुण घ्याल?

### ७.३.३ : १८५७ च्या उठावाचे स्वरूप :

१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाबद्दल दोन भिन्न मते आहेत. ब्रिटिश लोक याला १८५७ शिपायांचे बंड म्हणतात. परंतु १८५७ पूर्वीही अनेक वेळी शिपायांनी उठाव केला होता. उदा. १८०६ मध्ये वेल्लोर येथेही ईस्ट इंडिया कंपनीच्या विरुद्ध असा उठाव केलेला होता. परंतु हा उठाव छावणीच्या बाहेरही पोहचला नव्हता.

परंतु १८५७ च्या उठावाकडे बारकाईने पहा. बंड शिपायांचे झाले परंतु त्यामध्ये अनेक नागरिकही सहभागी झालेले होते. शेतकरी, कारागीर यांचाही त्याच्यात सहभाग होता. अनेक ठिकाणी तर सैनिकांच्या आधीच जनतेने उठावास सुरुवात केलेली होती. त्यामुळे हा जनतेचा उठाव म्हणता येईल. त्यामध्ये हिंदूमुस्लिम एकता दिसून आली तसेच प्रांताप्रांतामध्येही एकजूट दिसून आली. एका प्रांतातील क्रांतीकारक दुसऱ्या प्रांतामध्येही संघर्ष करीत होते. एकूणच संपूर्ण देशपातळीवरील उठाव परकीय सत्ता घालवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी हा लढा होता असे म्हणावे लागेल.

लक्षात घ्या की संघर्ष १८५७ लाच झाला असे नसून अनेकवेळी संघर्ष झालेला होता असे दिसून येईल. शेतकऱ्यांनी जमीनदाराविरुद्ध बंड पुकारले नव्हते. त्यांनी हल्ला चढविला तो सावकारांवर, धान्य व्यापाऱ्यांवर तसेच ब्रिटिश अधिकाऱ्यांवर हल्ले केले. त्याचे पडसाद सर्वत्र पसरले. अवध मध्ये झालेला उठाव हा जनतेचा होता. लोकांनी एकत्र येवून लढा दिला. परंतु १८५७ मध्ये हिंदू, मुस्लिम, जमीनदार, शेतकरी यांनी दिलेला लढा हा ब्रिटिश सत्तेच्या विरोधी एकत्रितरित्या होता. यातून हे सिद्ध होते की हा ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा होता.

### ७.४ १८५७ च्या उठावाचे अपयश ः

भारतीय इतिहासामध्ये १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाचे विशेष महत्त्व आहे. यात प्रबळ शत्रूच्या विरुद्ध यश मिळणे अवघड होते. या उठावाला वर्षभरामध्ये दडपले गेले. या लढ्याच्या अपयशाची अनेक कारणे आहेत. उठावकर्त्यांमध्ये एकजूट नव्हती. बंगालमधील सैनिकांना मोगल कारकीर्दीतील वैभव मिळवावयाचे होते. नानासाहेब पेशवे आणि तात्या टोपेंना मराठ्यांचे राज्य मिळवावयाचे होते. राणी लक्ष्मीबाईचा लढा झाशीसाठी होता. कारण झाशीचा वारस नाकारून ब्रिटिशांनी ते संस्थान खालसा केलेले होते. सदरची क्रांती उत्तरेत व मध्य भारतापुरतीच मर्यादित होती. परंतु त्यातही उत्तरेकडील

काश्मीर, पंजाव, सिध, राजपुताना हे या उठावापासून दूर होते. ब्रिटिशांना मद्रास, मुंबई आणि शीख प्रांतातील सैन्याची मदतही झाली. अफगाण आणि गुरख्यांनी ब्रिटिशांना सहकार्य केले. अनेक भारतीय सत्ताधिशांनी उठावाला मदत केली नाही तर व काहींनी खुलेपणाने ब्रिटिशांनाच मदत केली. मध्यमवर्गीय आणि उच्च वर्गीय, सुशिक्षित वर्गानेही या उठावाला मदत केली नाही.

चळवळीला नेतृत्व नव्हते. जे नेतृत्व होते ते दुबळे व संघटना आणि नियोजनात दुर्बल होते. चळवळीच्या नेत्यांची तुलना ब्रिटिश सैन्याशी होवू शकत नाही. स्वत:च्या हितासाठीच काहीजण लढले किंवा आपल्या प्रदेशासाठीच लढले. राष्ट्रीयनेता त्या मागे नव्हता. लक्ष्मीबाई, तात्या टोपे, नानासाहेब यांचे शौर्य वाखाणण्यासारखे आहे. परंतु लष्करी अधिकारी म्हणून त्यांच्यातील गुण अपुरे होते. शेवटी ब्रिटिशांनी पेशवाई आणि मोगल राज्य संपुष्टात आणले.

क्रांतीकारकांकडे लढावू साहित्य नव्हते. जी काही लष्करी सामग्री होतीत ती जुनी आणि टाकावू होती. ब्रिटिशांच्या आधुनिक शस्त्रास्त्रांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. उठावकर्त्यांमध्ये संघटन नव्हते. किंबहुना शिपाईसुद्धा योग्य पद्धतीने वागत नव्हते. त्याच काळात टेलिफोन, टपाल सेवा सुरू झालेली होती याचा ब्रिटिशांना लाभ झाला. इंग्लंडकडून बोटीतून मदत येत गेली म्हणूनच भारतीयांचा हा उठाव त्यांना चिरडून काढता आला.

## ७.५ १८५७ च्या उठावाचे परिणाम :

ब्रिटिशांची भारतातील राजवट संपावी या हेतूने १८५७ चा लढा होता. जरी या लढ्यात अपयश आलेले होते तरीही त्यामधून राष्ट्रीय भावनेचे बीज पेरले गेले. नेतृत्त्वाबावत काळजी घेवून क्रांतीकारक पाऊल उचल्यास सुरुवात झाली. हिंदू मुस्लीम एकतेत तेढ निर्माण करून ब्रिटिशांनी पुढे असेच पिळवणुकीचे धोरण चालू ठेवले.

## ७.६ उठावाचा मागोवा :

१८५७ च्या उठावामुळे जाती, धर्म वंश वर्ग यांच्या भिंती दूर झाल्या आणि ब्रिटिश सरकारविरुद्ध भारतीयांनी एकत्रित लढा पुकारला. उठाव जरी यशस्वी झाला नाही तरी ब्रिटिश सरकारवर दबाव आला आणि त्यांनी भारताविषयी धोरणे बदलली. ऑगस्ट १८५८ मध्ये कायद्याने भारतीय प्रशासनाची जबावदारी ब्रिटिश सरकारने स्वीकारली. पूर्वीचे बोर्ड ऑफ कंट्रोल, बोर्ड ऑफ डायरेक्टर रद्द केले आणि व्हाईसरॉयची नेमणूक करून सेक्रेटरीचे १५ सदस्यांचे बोर्ड बनविले सन १८७७ मध्ये व्हिक्टोरिया राणीच्या अधिपत्याखाली भारत आला आणि ईस्ट इंडिया कंपनीचे अधिपत्य संपविण्यात आले. १ नोव्हेंबर १८५८ मध्ये कंपनीची धोरणे जाहीर केली गेली. भारत ही ब्रिटनची वसाहत झाली. भारतीय राज्यकर्त्यांना वारसाचे हक्क प्राप्त झाले. राज्यकर्त्यांना दिला जाणारा सन्मान कायम राहिल असे ठरविण्यात आले.

ब्रिटिशांनी हिंदूमुस्लिमांमध्ये तेढे राहिल असेच धोरण चालू ठेवले. Divide and Rule फोडा आणि राज्य करा ही नीती चालू ठेवली. लष्करी प्रशासनाने परिस्थितीवर नियंत्रण ठेवले सन १८६१ चा

## ब्रिटिश राजवटीला जनतेचा विरोध

सिव्हिल सर्व्हिस ॲक्ट नुसार लंडनच्या प्रशासकीय परीक्षेला भारतीयांना बसता येईल असे मान्य करण्यात आले.

हा उठाव इंग्रजंभारतीय यांच्या संघर्षाचा इतिहास असून त्यांची नोंद घेण्यासारखी आहे. ब्रिटिश हे भारतीय प्रदेशावर नजर ठेवून होते तर भारतीयांना ब्रिटिशांचा कडवट अनुभव आलेला असल्याने भारतीय त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास तयार नव्हते. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. गांधीजींचे नेतृत्व लाभले आणि होमरुल चळवळीचे रूपाने उठावाचे पुनर्जीवन झाले. इंग्रजी शिक्षित गट ब्रिटिशांच्या चळवळी विरुद्ध तयार झाला. त्या मध्ये बंगाली वारसाहक्काने जमीनदार होते त्यांचा कायमधारा पद्धतीला त्यांचा पाठिंबा होता. हा गट १८५७ नंतर तीस-चाळीस वर्षांनी ब्रिटिशांच्या विरोधी उभा राहिला.

१८५७ च्या संग्रामास खरे तर लष्करच जबाबदार होते. त्यामुळे भारतातील ब्रिटिश सैन्याची पुनर्रचना करण्यात आली. सैन्यामध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांची संख्या वाढविली गेली व १८५७ च्या भारतीय सैन्य संख्येत कपात केली गेली. काही दारुगोळा निर्मिती केंद्रे बंद करण्यात आली. जात, धर्म, प्रादेशिक अंतर्गत वाद तसेच तेवत ठेवले. त्या आधारावर सैन्याच्या तुकड्या ठेवल्या. महत्त्वाच्या जागा ब्रिटिश लोकांना देण्यात आल्या. भारतीय आणि ब्रिटश यांच्यामध्ये भितीचे वातावरण व तेढ कायम राहिली.

१८५७ च्या महासंग्रामामध्ये मुख्य कारण म्हणजे प्रजा आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसंवाद नव्हता. त्यासाठी सन १८६१ मध्ये इंडियन कौंसिल ॲक्ट अंमलात आणला. या महासंग्रामाचा जनतेवरील मानसिक परिणाम अतिशय दुर्दैवी होता. त्यातूनच जातीय कटूता वाढीस लागली.

## पाठ्यांशावरील प्रश्न ७.२

१. ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध भारतीय सैनिकांच्या कोणत्या दोन तक्रारी होत्या?

२. सन १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यातील कोणत्याही तीन नेत्यांची नावे लिहा.

३. ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकार कधी आणि कसे संपुष्टात आले?

४. सन १८५७ च्या उठावाच्या अपयशाची कोणतीही तीन प्रमुख कारणे लिहा.

## आपण काय शिकलो?

- जुलमी पिळवणूक या कारणांमळे भारतीयांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध पाऊल उचलले.
- जमीनीची मालकी काढून त्यांच्याच शेतावर शेतकरी आणि आदीवासांना मजूर म्हणून राबविले. अनेक प्रकारच्या करामुळे त्यांचे जीवन अतीशय दु:खमय झाले.
- घरगुती उद्योग पूर्णपणे नष्ट झाले. ब्रिटिश व्यापारी यंत्रनिर्मित माल विकू लागले. यामुळे ब्रिटिश प्रशासनाविरुद्ध कारागीर उठावात सामिल झाले.

टिपा

- ❖ ब्रिटिश शिस्तीतल्या सैन्यांपुढे उठावकर्त्यांना यश मिळाले नाही परंतु त्याचे आव्हान यापुढे स्वीकारले गेले.
- ❖ १८५७ चा स्वातंत्र्य संग्राम हे ब्रिटिशांना आव्हान होते. शिपायांनी हे बंड केले व जनतेने त्याला पाठींबा दिला.
- ❖ १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याला आर्थिक, राजकीय, सामाजिक धार्मिक आणि लष्करी कारणे कारणीभूत होती. काडतुसावरील चरबी हे उठावाचे तात्कालिक कारण होते.
- ❖ क्रांतीचा प्रभाव देशातील अनेक भागात होता. मीरत, दिल्ली, कानपूर, लखनौ, झाशी, बरैली ही प्रमुख केंद्र होती. या उठावाचे नेते होते, बख्त खान, नानासाहेब, तात्या टोपे, अझिमुल्ला, बेगम हजत महाल, मौलवी अहमदुल्ला, राणी लक्ष्मीबाई, खानबहादुरखान, कन्वरसिंह इत्यादी.
- ❖ ब्रिटिशांना भारतातून घालून देण्यात उठाव अपयशी ठरला. अपयशाची मुख्य कारणे म्हणजे उठावाचे स्थानिक व असंघटित स्वरूप, दुर्बल नेतृत्व आणि शस्त्र आणि पैसा यांची कमतरता ही आहेत.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. शेतकरी व आदिवासी यांच्या उठावाची कोणतेही दोन समान वैशिष्ट्ये सांगा.

२. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामास राजकीय व आर्थिक व सामाजिक घटक कसे कारणीभूत ठरले.

३. १८५७ च्या उठावाचे परिणाम स्पष्ट करा.

४. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये सहभागी असणारे नेते आणि सहभागी होण्याची कारणे याची यादी करा.

५. १८५७ च्या उठावामुळे ब्रिटिश भारतीय प्रशासनामध्ये बदल झाला असे तुम्हास वाटते का? कोणत्या परिस्थितीमध्ये ते स्पष्ट करा.

६. लोकांच्या दैनंदिन जीवनावर जर परिणाम झाला तर लोक संघर्ष करतात. हा इतिहास आहे. हे सद्य स्थितीत सत्य आहे काय?

वर्तमान पत्र किंवा मासिकातून माहिती मिळवून अशा एखाद्या प्रसंगाचा ५० शब्दापर्यंत अहवाल तयार करा.

७. अ) भारताच्या नकाशा आराखड्यात उठावाची ठिकाणे दाखवा.



**भारताचा नकाशा**

१) फकीर व संन्याशांचा उठाव

२) संथळ उठाव

३) मुंडा उठाव

४) जैतिया व गारो उठाव

ब) वरील प्रत्येक उठावाचे एकएक कारण लिहा.

## पाठवरील प्रश्नांची उत्तरे

**७.१**

१. अ) फकीर हे मुस्लीम समाजाचे भटकंती करणारे धर्मगुरू

ब) महाजन ही संज्ञा सावकारांसाठी वापरली जाते.

क) मोपला हे मुस्लीम शेतकरी, भूमिहीन मजूर, मच्छिमारी करणारे मलबार भागातील लोक

२. तीन गटाकडून पिळवणूक होत होती.

अ) ब्रिटिश अधिकारी

ब) जमीनदार

क) सावकार

३. जनतेच्या चळवळीची कारणे

अ) ब्रिटिशांकडून होणारी पिळवणूक

ब) जास्त शेतसारा

क) व्यापारी पीक घेण्याची सक्ती

ड) ब्रिटिशांचा धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप

## ७.२

१.

अ) कमी पगार आणि भत्ता देणे बंद केले. युद्ध नौकेवरील कामासाठी मिळणारा जास्त पगार नाकारणे.

ब) वढती, पेन्शन आणि सेवेमध्ये जातीय भेदभाव

क) गाई आणि डुकरांच्या चरबीचा काडतुसाला केलेला वापर धार्मिक भावनेला धक्का लागला.

२. राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, बेगम हजरत महल, नानासाहेब, कन्वरसिंग

३. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीची बरखास्ती आणि ब्रिटिश पार्लमेंटचा सहभाग. राणीचा जाहिरनामा कार्यान्वीत.

४. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाच्या अपयशाची कारणे.


अ) भारतीय इतिहासातील मोठा लढा परंतु प्रबल शत्रुमुळे या लढ्याला यश मिळाले नाही.

ब) हा लढा फक्त उत्तर व मध्य भारतातच होता.

क) उठावकर्त्यांमध्ये एकजूट नव्हती.

ड) दुर्बल नेतृत्व

इ) उठाव कर्त्यांकडे शस्त्रास्त्रे व पैसाही अपुरा होता.





८

# भारतीय राष्ट्रीय चळवळ

मागील काही पाठांमध्ये आपण संस्कृतीचा इतिहास पाहिलेला आहे. प्राचीन मानवापासून ते आधुनिक इतिहास अगदी भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीपर्यंत माहिती घेतलेली आहे. हा इतिहास अगदी माहितीपूर्ण इतिहास होता. लोक जंगलामध्ये रहायचे, दगडांचा रक्षणासाठी उपयोग करायचे, प्राण्यांना मारून उपजीविका करायचे. ब्रॉंझ युगामध्ये धातुचा शोध लागल्याने धातुची हत्यारे वापरून लोक झाडे तोडत व मानवी जीवन सुखी कसे होईल याचा विचार करीत. लोह युगामध्ये औद्योगिकरण याचा विचार करणे आवश्यक झाले. समाजाची निर्मिती झाली. त्यातील काही लोक इतरांपेक्षा अधिक प्रबळ झाले. पैसा आणि भूमी हे हाव आणि लालसा याचे साधन बनले. त्यासाठी परकीयाच्या मोहिमा सुरू झाल्या. नैसर्गिक संपदा मिळविण्यासाठी राज्य काबीज करणे तेथील मानवी संपदा वापरणे सुरू झाले. आपल्या भारतातही हेच घडले. सदरच्या प्रकरणामध्ये स्वातंत्र्याच्या संघर्षाची माहिती मिळेल.



## उद्दिष्टे :

पाठ अभ्यासानंतर पुढील माहिती मिळेल.

- भारतीय राष्ट्रभक्तीच्या उदयांची कारणे.
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा उदय
- भारतीय राष्ट्रीय चळवळी
- गांधीजींच्या चळवळीचे महत्त्व

## ८.१ राष्ट्रभक्तीचा उदय :

युरोपमध्ये विद्येचे पुनरुज्जीवन झाले आणि त्याचा परिणाम राष्ट्रभक्तीवर झाला. त्यातून फ्रेंच राज्यक्रांती झाली. भ्रष्ट राजवटीपासून लोक मुक्त झाले. स्वातंत्र्य, समता आणि बंधूभाव या ब्रीद वाक्याचे पडसाद जगभर उमटले. उदा. अमेरिकन राज्यक्रांती किंवा रशियन राज्यक्रांती यातूनच राष्ट्रभक्तीची

ताकत वाढली. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामानंतर १९ व्या शतकात भारतात राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय झाला. याची माहिती या पाठामध्ये आपण अभ्यासणार आहोत.

### ८.१.१ भारतातील राष्ट्रभक्तीचा उदय :

राष्ट्र म्हणून सम्राट अशोक, सम्राट समुद्रगुप्त हे प्राचीन राजे होवून गेले. अकबर, औरंगजेब हे मध्ययुगीन काळात राज्यकर्ते होवून गेले. परंतु एकोणिसाव्या शतकामध्ये राष्ट्रीय जागृतीचा उदय झाला. या उदयाला कारण ठरले ते म्हणजे वसाहत वादाला विरोध. म्हणून जागृती झाली. हे चौथ्या प्रकरणात आपण पाहिलेले आहे. लोकामधील एकजुटीचा वसाहतींच्या विरुद्ध संघर्ष सुरू झाला. ब्रिटिशांनी वसाहतींचे नियम कडक करून प्रत्येक गटाला दावून ठेवले. प्रत्येक वसाहतीला नियमांचे भिन्न भिन्न परिणाम भोगावे लागले. स्वातंत्र्याची धडपड ही सुद्धा भिन्न भिन्न होती. इतरही कारणे राष्ट्रीय भावनेला कारणीभूत ठरलेली आहेत. ब्रिटिशांनी कायदा करून राजकीय व प्रशासकीय पकड मिळविली. जनतेचा उठाव या पाठामध्ये आपण वाचले की जमीनीवरील हक्क काढून घेतले व जगण्याचे साधन काढून घेतले ह्यातून शेतकरी व आदिवासींनी बंड पुकारले. उठावासाठी आर्थिक कारणेही घडली. १९ व्या शतकात सामाजिक व धार्मिक चळवळी झाल्या. त्यातून राष्ट्रीय भावनांची जागृती झाली. स्वामी विवेकानंद, ॲनी बेझंट, हेन्री डेरोझिओ इत्यादींनी प्रेरणा दिली. मातृभूमीचे वैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी धर्म व संस्कृतीवर विश्वास संपादन करण्याचे अवाहन केले. बंकीमचंद्र चतर्जी, स्वामी दयानंद सरस्वती, अरविंद घोष इत्यादींनी बौद्धिक आणि अध्यात्मिक बाबींवर भर दिला. बंकीमचंद्र चतर्जींनी वन्दे मातरम हे देशभक्तीवर गीत लिहिले. त्यातून आत्मत्यागाची भावना निर्माण झाली. या सर्वामुळे ब्रिटिशांवर दडपण आले. त्यांनी या गीतावर बंदी घातली. उठा, जागे व्हा आणि ध्येयाकडे वाटचाल करा हा संदेश स्वामी विवेकानंदांनी दिला. यातून राष्ट्रीय भावना प्रेरित झाली. छपाईच्या तंत्राचा शोध लागल्याने स्वातंत्र्य समता आणि बंधुता या विचारांचा प्रसार झाला, यामुळे भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली.

भारतीय बंगाली असोशिएशन, बंगाल प्रेसिडन्सी असोसिएशन, पुणे पब्लिक मिटिंग यातील अनेक संघटना या स्थानिक स्वरूपाच्या होत्या. त्यातील काही संघटनांनी एकत्र काम करण्याची गरज होती तरच ब्रिटिश राजवटीविरुद्ध आवाज उठवता येणे शक्य होते. यातूनच राष्ट्रीय काँग्रेसची १८८५ मध्ये स्थापना झाली.

## ८.२ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा उदय १८८५ :

१८८५ मध्ये ॲलन ऑक्टविअन ह्युम यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना केली. ह्युम हे निवृत्त सनदी अधिकारी होते. भारतीयांमध्ये राजकीय जागृती होत होती हे ते पहात होते. परंतु सुरक्षित आणि घटनात्मक मार्ग मिळावा, लोकांच्या भावनांना ब्रिटिशांकडून अपमानास्पद वागणूक मिळू नये हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचा हेतू होता. या योजनेला व्हाईसरॉय लॉर्ड डफरिनने आणि जाणकारांनी पाठींबा दिला होता.

कलकत्त्याचे उमेश चंद्र बॅनर्जी हे काँग्रेसचे पहिले अध्यक्ष झाले. भारतीयांमध्ये राजकीय जागृतीची खरी गरज होती या पुढाऱ्यांचा ब्रिटिश सरकारच्या न्यायप्रियतेवर पक्का विश्वास होता. लोकांची गाऱ्हाणी

सरकारपुढे मांडावीत ब्रिटिश त्यांची नक्की दखल घेतील असे त्यांना वाटत होते. फिरोजशहा मेहता, गोपाळकृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी, रास बिहारी बोस, बद्रुद्दीन तैयाबजी हे पुढारी या मताचे होते. सन १८८५ ते १९०५ दरम्यान भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उद्दिष्ट फार मर्यादित होते. त्याचा प्रसार फक्त सुशिक्षित शहरी भारतीयांपुरताच मर्यादित होता.



**आकृती ८.१ : १८८५ ची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सभा**

प्रारंभी काँग्रेसचे उद्दिष्ट लोकांच्या तक्रारी सरकारच्या कानावर घालणे एवढेच होते. म्हणजेच काँग्रेसची भूमिका ही सरकार व जनता यांच्यातील मध्यस्थाची होती.

### ८.२.१ राष्ट्रीय काँग्रेसचा प्रारंभ :

राष्ट्रीय काँग्रेस हे सरकारकडे आपल्या मागण्या अर्ज विनंत्या करून मांडीत असे. त्यामुळे काँग्रेसला लोक मवाळ समजत असत. त्यांच्या मागण्या अशा होत्या.

अ) कायदे मंडळामध्ये प्रतिनिधित्व

ब) प्रशासनामध्ये भारतीयांचा सहभाग

क) लष्करावरील खर्च कमी करणे.

ड) शिक्षण, शासनामध्ये नोकरी, IAS परीक्षा भारतात घेणे.

इ) शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी करणे.

ई) नागरी सुरक्षा हक्क मिळावेत.

प) न्यायव्यवस्था व कार्यकारी व्यवस्था वेगळी असावी.

फ) कुळाचे कायदे बदलावेत.

म) शेतसारा व मिठावरील कर कमी करावा.

य) भारतीय उद्योग वाढीचे धोरणा राबवावे.

र) जनहिताचे कार्यक्रम राबवावेत.

या विविध मागण्यांमध्ये ब्रिटिशांच्या विरोधी एकही मागणी नव्हती. प्रारंभीच्या काळात ब्रिटिशांच्या मनामध्ये काँग्रेस बद्दल आकस नव्हता. परंतु १८८७ पासून ब्रिटिशांचा दृष्टीकोन बदलला. या मवाळ किंवा नेमस्तांच्या मागण्या पूर्ण करता येणार नाहीत असे त्यांना वाटू लागले. यातून एक मात्र झाले की १८९२ कायद्यानुसार नागरीकांना कायदेमंडळाचे सदस्यत्व देण्यात आले त्याच प्रमाणे सिव्हिल सर्व्हिस परीक्षा ही इंग्लंडबरोबरच भारतात घेण्याचा ठराव मंजूर झाला. अनेकांना हा सनदशील मार्ग आवडला नाही. देशाचे अखंडत्व प्रस्थापित करण्यासाठी काँग्रेसला फार मोठे यश मिळाले नाही तरी राजकीय विषयातील मोठ्या प्रश्नांशी चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले. सरकारवर टीका करण्यासाठी एक प्रकारे लोकांना प्रशिक्षण मिळाले. प्रारंभी काँग्रेसने टोकाची भूमिका घेतली नसली तरी सरकार विरोधी मत तयार करण्यासाठी याचा उपयोग झाला. राष्ट्रीय चळवळ उभी करण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसचा निश्चितच उपयोग झाला.

प्रारंभी ब्रिटिशांचा मवाळ मतवादींना पाठिंबा होता. नंतर ब्रिटिशांच्या लक्षात आले की मवाळही राष्ट्रीय प्रवाहात सामील होत आहेत त्यामुळे आपल्याला ते देशाबाहेरच घालवून देतील असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे त्यांची भूमिका बदलली. शिक्षणावर नियंत्रण ठेवले, तसेच वृत्तपत्रावर करडी नजर ठेवली. त्यांनी काँग्रेसच्या नेत्यांना काही सवलती देवून आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड कर्झन हा साम्राज्यवादी होता त्यामुळे त्याने ब्रिटिशांचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. १८९८ मध्ये त्याने जनतेला ब्रिटिशांच्या विरुद्ध भडकविणे हा गुन्हा आहे असा कायदा केला. सन १९०४ ला भारतीय विद्यापीठ कायदा करून विद्यापीठ शिक्षणावर नियंत्रण ठेवले. तसेच कर्झनने राष्ट्रीय चळवळी दडपण्याचा प्रयत्न केला.

## ८.३ बंगालची फाळणी (१९०५) :

प्रशासनाला सुलभ व्हावे यासाठी कर्झनने बंगालची फाळणी केली, परंतु फाळणीचे खरे कारण होते. फोडा आणि राज्य करा. मुस्लीम समाजाचा वेगळा प्रदेश करून जातीय भावनेचे विष पेरण्याचे धोरण होते. कर्झनला बंगालच्या राष्ट्रीय उठावाला दडपण्यासाठी हिंदूमुस्लीम तेढ निर्माण करायची होती. फाळणीविरुद्ध वर्तमनपत्रात तसेच लोकांमधूनही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. फाळणीस विरोध करण्यासाठी अनेक बैठका, मोर्चे निदर्शने करण्यात आली. हिंदू, मुस्लिम भाईभाई ही एकता दाखविण्यासाठी एकमेकांना राखी बांधण्यात आल्या.

### आपल्यासाठी एक उपक्रम ८.१

आपल्याला राखी म्हणजे काय माहीत आहे का? रक्षा बंधन या भारतीय सणाबद्दलची माहिती घ्या.

स्वदेशी (स्वदेशातील लोकांनी देशातील लोकांसाठी तयार केलेले उत्पादन) मालाचा वापर करण्यासाठी शिक्षणातून सर्व भाषेमधून प्रेरणा देण्यात आली. यावर ब्रिटिशांनी चांगलीच नजर ठेवली. लोकमान्य टिळकांनी परकीय मालावर बहिष्काराची चळवळ उभी केली. त्यामुळे ब्रिटिश सरकार हतबल झाले. टिळकांनी स्वदेशी कापडगिरण्या, बँका, रासायनिक कारखाने, विमाकपंन्या काढण्यास प्रोत्साहन दिले.

स्वदेशी मालाची दुकाने निघाली. घरोघरी कार्यकर्ते स्वदेशी मालाची विक्री करू लागले. ही चळवळ देशभर पसरली. अगदी महिला, मुलेही सरसावली. शाळा, कॉलेजमध्येही ही चळवळ पोहचली. त्यामुळे सन १९११ मध्ये बंगालची फाळणीचा आद्यादेश ब्रिटिशांना मागे घ्यावा लागला. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची एक गरम दल (जहाल गट) नावाची चळळ उभी राहिली. त्यांनी शेतकरी कामगार विद्यार्थी, महिला यांना सामावून घेतले. तरुणांनी स्वावलंबन चळवळ पसरविली त्यातून पुन्हा भारतीय घरगुती उद्योग सुरू झाले.

## ८.४ जहाल गटाचा उदय ः

मवाळांच्या मवळ धोरणांमुळे जहाल गटाचा उदय झाला. ही चळवळ गरम दल म्हणून ओळखली जाते. यामधून राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये सन १९०७ मध्ये फूट पडली. १९०५ ते १९१८ पर्यंतचा काळ हा जहाल गटाचा समजला जातो. त्याला लजपतराय, बाळगंगाधर टिळक, बिपिन चंद्र पाल (लार्लबार्लपाल) हे जहाल गटाचे नेते समजले जातात. मवाळ गट पुढे येवून कायदेशीर, सहनशील मार्गाने काम करीत होता त्यांनीही प्रत्यक्ष झोकून घेतले व त्यांनीही देशाच्या स्वातंत्र्यासाठी नवीन पद्धतीचा अवलंब केला. परंतु त्याचे प्रयत्न बिनकामी ठरले. त्याखेरीज मवाळ लोक फक्त श्रीमंत, जमिनदार यांच्याशीच निगडीत होता. त्यांना सर्वसामान्य लोकांचा पाठिंबा मिळू शकला नाही.



**चित्र ८.२ : लार्लबार्लपाल**

जहाल नेत्यांची खात्री झाली की ब्रिटिशांकडून भारतीयांची पिळवणूक होत आहे. भारतीयांचा विनाश करून संपत्तीची देशातून मोठी लूट चालविलेली आहे. ब्रिटिश राजवटीतून देशाला मुक्त केले पाहिजे. व आमचे आम्ही सरकार चालविले पाहिजे. त्यासाठी अर्जविनेत्यांची भीक मागण्याची गरज नाही. जनतेने प्रखर विरोध केला पाहिजे. परकीय मालावर बहिष्कार आणि स्वदेशीचा वापर हा प्रचार सुरू केला. आमच्या हक्कासाठी स्वातंत्र्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि आम्ही तो मिळविणारच ही घोषणा लोकमान्य टिळकांनी केली.







सन १९१६ मध्ये मिसेस ॲनी बेझंट यांच्या प्रयत्नाने जहाल व मवाळ हे दोन गट एकत्र आले. सन १९१४ ला होम रुल नावाची स्वातंत्र चळवळ त्यांनी सुरू केलेली होती. सन १९१६ मध्ये मुस्लिम लिग आणि कॉंग्रेस यांच्यामध्ये समझोता करार सिमला येथे झाला. पुढे महात्मा गांधी जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस यांनी स्वातंत्र्याची यशस्वी चळवळ पुढे झालू ठेवली.

### आपल्यासाठी एक उपक्रम ८.२

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या घटनांची क्रमाने नोंद करा. या घटनांची छायाचित्रे मिळवून ती कालानुक्रमे तक्त्यावर लावा.

## ८.५ मुस्लिम लिगची स्थापना १९०६ :

जहाल पक्षाची वाढती ताकद पाहून भारतीयांमध्ये फूट कशी पडेल याचे कारण ब्रिटिश पहात होते. बंगालची फाळणी करून भारतीयांना धार्मिक दृष्ट्या फूट पाडली. त्यासाठी मुस्लिमांच्या हितासाठी संघटना स्थापन करण्यास त्यांनी मुस्लिमांना प्रोत्साहन दिले. डिसेंबर १९०६ मध्ये डाक्क्यात मुस्लिम शैक्षणिक परिषद घेण्यात आली. मुस्लिमांच्या हितासाठी नवाब उल्लाह खान यांनी सेंट्रल मुहम्मद असोसिएशन ची स्थापना केली.

३० डिसेंबर १९०६ रोजी ऑल इंडिया मुस्लिम लिगची स्थापना केली. आणि आगाखान यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. मुस्लीमांना संरक्षण मिळावे तसेच मुस्लीमांना भारताचे आगामी भारतीय राजकारणामध्ये प्रतिनिधीत्व मिळावे अशी त्यामागची भूमिका होती. मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीस पाठिंबा देऊन ब्रिटिशांनी जातियतेचे आणि फुटीरतेचे बीज पेरले. मुस्लीम लिगची स्थापना झाल्याने ब्रिटिशांना फोडा आणि राज्य करा या नीतीचा अवलंब करता आला. या संघटनेमध्ये मोहम्मद अली जीना नंतर या संघटनेमध्ये आले.

## ८.६ मोर्लेमिंटो सुधारणा (१९०९) ः

इंडियन कौन्सिल ॲक्ट १८९२ नुसार कायदेमंडळातील सदस्यांची संख्या वाढविलेली आपण वाचलेले असेल. कौन्सिल ॲक्ट १९०९ ही १८९२ चीच सुधारित आवृत्ती होती. या सुधारणा मोर्ले (सेक्रेटरी ऑफ स्टेट) आणि मिंटो (व्हाईसरॉय) यांच्या कारकीर्दित झाल्या त्यामुळे या सुधारणांना मोर्लेमिंटो सुधारणा म्हणतात. त्यानुसार सदस्यांची संख्या १६ वरून ६० पर्यंत वाढविण्यात आली. त्यामध्ये निवडून न आलेल्या सदस्यांची संख्याही वाढली. खरी सत्ता लोक प्रतिनिधीकडे नव्हती. त्याची भूमिका फक्त सल्ला देणे इतकीच होती. कायदेमंडळ कोणतेही विधेयक थांबवू शकत नव्हते. किंवा त्याचे बजेटवर नियंत्रण नव्हते.

ब्रिटिशांनी पुन्हा एकदा हिंदू मुस्लीम वादाचे बीज पेरले, मुस्लीम मतदार संघ स्वतंत्र करण्यात आला. मुस्लिमांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी मुस्लिम प्रतिनिधीच असणार होते. हिंदूंनी हिंदू उमेदवारांना

तर मुस्लिमांनी मुस्लीम प्रतिनिधीला निवडून देता येत होते. त्यामुळे या ब्रिटिश नीतीचा अनेक नेत्यांनी फोडा आणि राज्य करा या धोरणांचा निषेध केला.

## ८.७ पहिल्या महायुद्ध काळातील राष्ट्रीय चळवळी :

मागील पाठामध्ये पहिल्या महायुद्धाचा प्रारंभ १९१४ साली झाला होता हे पाहिलेले आहे. हे युद्ध युरोपियन देशांच्या वसांहतीच्या मक्तेदारीसाठी होते. युद्धाच्या काळात ब्रिटिश सरकारला भारतीयांनी मदत करावी असे ब्रिटिशांनी आवाहन केलेले होते. भारतीय नेत्यांनी काही अटींवर मदत करण्याची सहमती दर्शविली, युद्द संपताच ब्रिटिश सरकारने भारतीयांना कायदेमंडळात प्रतिनिधीत्व दिले जावे, ही अट होती. युद्धाच्या काळातच ब्रिटिशांनी भारतीयांना असह्यत्रास दिला. युद्ध काळात ब्रिटिश सरकारने कर्ज काढलेले होते आणि त्याची परत फेड करावयाची होती. त्यांनी जमिनीवरचा शेतसारा वाढविला. त्यांनी सक्तीने भारतीयांची सैन्यात भरती केली. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढविल्या, त्यांनी व्यक्तिगत व व्यवसायावर कर बसवला. या कारणांमुळे त्यांना भारतीयांच्या विरोधाचा सामना करायचा होता. चंपारन, बार्डोली, खेडा अहमदाबाद येथील शेतकरी, शेतमजूरांनी ब्रिटिश धोरणास विरोध केला. लाखो मुलांनी शाळा कॉलेजमध्ये जाणे बंद केले. वकीलांनी त्यांचे काम बंद केले. महिलांचाही समावेश हा जाणण्याइतका होता. याच काळात गांधीजींचे कार्य उदयास येत होते. परदेशी मालावर बहिष्कार, या काळातच परदेशी मालाच्या होळी करण्यात आल्या.

### आपल्यासाठी एक उपक्रम ८.३

भारतीय राष्ट्रीय चळवळीमध्ये संपर्क साधनांना विशेष महत्त्व आहे. त्या काळातील वर्तमान पत्राची नावे लिहा. त्या काळात कोणती संपर्क साधने होती?

**मवाळ व जहाल मतवादींचा एकोपा :**

सन १९१६ मध्ये लखनौ येथील काँग्रेसच्या अधिवेशनात जहाल व मवाळगट समोरासमोर आले. मुस्लिमांच्या स्वतंत्र मतदारसंघांस मुस्लिम लीग व काँग्रेसने मान्यता दिली. स्वतंत्र सरकारची मागणी मात्र ब्रिटिश सरकारने बाजूला टाकली. १९०७ नंतर पहिल्यांदाच काँग्रेसचे जहाल नेते अधिवेशनास उपस्थित राहिले होते. लो. टिळकांनी जहाल मतवाद्यांचे प्रतिनिधित्व केले. व हा पक्ष टिळकांच्या मृत्यूपर्यंत म्हणजेच सन १९२० पर्यंत त्यांच्या नेतृत्त्वाखाली काम करीत होता. काँग्रेस व मुस्लिम लिग यांच्यामध्ये झालेल्या करारामुळे देशाला काही आशा होत्या. होमरूल चळवळीमुळे लोकांच्या आत्मविश्वासात भर पडली. जनतेस खुष करण्यासाठी सन १९१९ ला मॉंटेग्यूचेम्सफर्ड सुधारणा जाहीर झाल्या. या सुधारणांमुळे द्विस्तरीय शासनपद्धती अमलात आली. त्यापैकी एक स्तर कायदेमंडळामार्फत जनतेला तर दुसरा स्तर गर्व्हनरला जबाबदार होता.

पहिले महायुद्द ब्रिटिश आणि मित्र राष्ट्रांनी जिंकले. युद्धामध्ये मुस्लिमांनी ब्रिटिश सरकारला मदत केली होती. कारण खलिफांना त्यांची पवित्र स्थाने त्यांच्या ताब्यात मिळतील अशी आशा होती. परंतु युद्धानंतरच्या तहामध्ये ओटोमन राज्याचे विभाजन झाले आणि तुर्की मुस्लिमांमध्ये नाराजी पसरली.

यातूनच शौकत अली आणि मोहम्मद अलींनी ब्रिटिश सरकारच्या विरोधात खिलाफत चळवळ सुरू केली.

पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटिश सरकारने आणखी एक कायदा मंजूर केला. त्याला रौलॅक्ट ॲक्ट असे ओळखले जाते. या कायद्यान्वये ब्रिटिश सरकार कोणत्याही व्यक्तीला अटक करून कोर्टासमोर न आणता थेट तुरुंगामध्ये पाठवू शकत असे. कोणत्याही व्यक्तीने शस्त्र बाळगू नये. हा कायदाही केला. शीख धर्मियांना त्याची चीड आली. त्यांना धार्मिक परंपरेनुसार कृपाण जवळ बाळगावे लागत असे. या कायद्याने भारतीयांचा अवमान झाल्याची जाणिव झाली यासाठी १३ एप्रिल १९१९ रोजी जालियनवाला बाग या ठिकाणी या कायद्याच्या निषेधार्थ बैशाखीच्या निमित्ताने लोक शांततेच्या मार्गाने एकत्र जमले. या जमावावर जनरल डायरने सैनिकांच्या तुकडीला मशिनगनच्या सहाय्याने गोळीबाराचे आदेश दिले. या जमावाला कसलीही पूर्वसूचना दिलेली नव्हती. प्रथम बागेची सर्व द्वारे बंद केली त्यामुळे स्त्रीपुरुष त्यातून बाहेर पडू शकले नाहीत. काही मिनटांच्या आत हजारो लोकांना ठार केले गेले. या दुर्घटनेमुळे भारतीयांमध्ये चीड निर्माण झाली तत्वज्ञ आणि कवी रविंद्रनाथ टागोरांनी ब्रिटिश सरकारने दिलेला नाईट (Knight) हा किताब ब्रिटिशांकडे परत केला.

## पाठ्यांशांवरील प्रश्न ८.१

१. ब्रिटिश राजवटीमध्ये भारतीयांमध्ये निर्माण झालेल्या जाणिवांची कोणतीही तीन कारणे स्पष्ट करा.

२. सन १८८५ मध्ये बिटिश सरकारनेचा राष्ट्रीय काँग्रेस स्थापन करण्यामागील हेतू कोणता?

३. मवाळ आणि जहाल नेत्यामध्ये फरक कोणता?

४. पहिल्या महायुद्धाकाळात ब्रिटिश सरकारला भारतीय नेत्यांनी पाठिंबा का दिला ?

५. ब्रिटिश राजवटीच्या विरोधामध्ये खिलापत चळवळ का उभी राहिली ?

## ८.८ महात्मा गांधी युग :

मोहनदास करमचंद गांधी यांनी ब्रिटनमध्ये कायद्याची पदवी घेतलेली हती. सन १८९३ मध्ये ते दक्षिण आफ्रिकेत गेले व तेथेच त्यांनी २१ वर्षे वास्तव्य केले. दक्षिण आफ्रिकेमध्ये भारतीयांना ब्रिटिशांकडून वाईट वागणूक दिली जात असे तेथे वांशिक भेद-भाव होत होता. न्यायासाठी त्यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये सत्याग्रहास प्रारंभ केला आणि तेथे त्यांना यश मिळाले सन १९१५ मध्ये ते भारतात आले. गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यांना भारत भ्रमण करून लोकांची स्थिती समजून घेण्याचा सल्ला दिला. त्यांचा पहिला सत्याग्रह सन १९१७ मध्ये बिहारमधील चंपारण्य येथील शेतकऱ्यांवर ब्रिटिशांनी निळीच्या शेतीसाठी जो अत्याचार केला त्याविरूद्ध होता. गुजरात मध्ये खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सत्याग्रह

केला. रोगांमुळे पिकांचे झालेले नुकसान यामुळे शेतकरी शेतसारा भरू शकत नव्हते. तसेच अहमदाबाद येथेही कापड गिरणी कामगारांसाठी सत्याग्रह केला.



**चित्र ८.३ : मोहनदास करमचंद गांधी**

## आपल्यासाठी एक उपक्रम ८.४

कल्पना करा की गांधीजींना चंपारण्यमध्ये निमंत्रण देण्याची विनंती तुमच्या मार्फत करण्यासाठी शेतकरी तुमच्याकडे आलेले आहेत. शेतकऱ्यांची परिस्थिती गांधीजींना पत्राद्वारे तुम्ही कळविणार आहात आणि गांधीजींनी त्यांच्यासाठी काय करावे हे सुद्धा तुम्ही सुचविणार आहात.

## ८.८.१ असहकार चळवळ (१९२०-२२) :

ब्रिटिश सरकारला पाठींबा देवून हेतू साध्य होत नव्हता, हे गांधीजींच्या लक्षात आले. बिहारमधील यशस्वी आंदोलनामुळे गांधीजींचे धैर्य वाढले. त्यांनी रौलॅक्ट ॲक्ट १९१९ च्या विरोधासाठी देशभर आंदोलन करण्याचे ठरविले.

ब्रिटिश सरकारला धमकविण्यासाठी त्यांनी असहकार आंदोलन करण्याची धमकी दिली. गांधीजींचा रौलॅक्ट ॲक्टला विरोध का होता माहीत आहे? या कायद्यान्वये कोणत्याही राजकीय व्यक्तीला कोणतीही चौकशी न करता दोन वर्षे तुरुगांमध्ये पाठविण्याचा अधिकार सरकारला देण्याचा तो कायदा होता. यासाठी गांधीजींनी असहकार आंदोलन करण्याचे ठरविले होते. सरकारला त्याची फिकीर नव्हती. त्यामुळे गांधीजींनी ऑगस्ट १९२० मध्ये असहकार आंदोलन पुकारले. याच वेळी मुस्लीमांची खिलापत चळवळही सुरू होती. दोन्ही चळवळी एकत्रितरित्या सरकारच्या विरोधात सुरू झाल्या.

यासाठी गांधीजींनी पुढील आवाहन केले.

१. आपली पदे सरकारजमा करणे तसेच ज्या काही नियुक्त्या आहेत त्यांनीही आपले राजीनामे देणे.

२. शासकीय अथवा अशासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमास हजर न रहाणे.

३. शाळा-कॉलेजमधून आपली नावे काढून घेणे.

४. ब्रिटिश कोर्टावर वकिलांनी आणि फिर्यादिंनी बहिष्कार टाकणे.

५. लष्करातील सैनिकांनी व लेखानीकांनी तसेच कर्मचाऱ्यांनी मेसोपोटामियात जाण्यास नकार देणे.

६. संसदीय निवडणूकावर उमेदवार किंवा मतदार म्हणून बहिष्कार घालणे.

७. परकीय मालावर तसेच सरकारी शाळा कॉलेजमध्ये जाण्यावर बहिष्कार टाकणे.

**वरील कार्यक्रमाबरोबरच पुढील तीन तत्त्वे घालून दिली होती.**

१. स्वदेशीचा पुरस्कार करणे. उदा. हातमागावरील कापड

२. हिंदूमधील अस्पृश्यता नष्ट करणे.

३. हिंदू मुस्लीम एकता घडवून आणणे.

गांधीजींचा हा संदेश देशभर पसरला. लोकांनी आपआपसातले भेद विसरून या चळवळीत भाग घेतला. नोव्हेंबर १९२० च्या कायदे मंडळाच्या निवडणुकीत दोन तृतीयांश मतदारांनी भाग घेतला नाही. सरकारी शाळातून शिक्षक, विद्यार्थी बाहेर पडले. व त्यानी स्वदेशी शाळा सुरू केल्या.



**चित्र ८.४ : राष्ट्रीय चळवळीमध्ये गांधीजी**

मोतीलाल नेहरू, सी. आर. दास, सी रोजगोपालचारी आणि असिफअली या वकीलांनी कोर्टावर बहिष्कार घातला. सभासदांनी संसदेवर बहिष्कार घातला. परदेशी मालाची होळी केली.

याच काळात काही दुर्देवी घटना घडल्या त्या गांधीजींच्या विचारसरणीला न पटणाऱ्या होत्या. गांधीजींची चळवळ असहकार चळवळ होती आणि हा अहिंसात्मक मार्ग होता. सन १९२१ मध्ये चळवळीस हिंसात्मक रूप प्राप्त झाले. सरकारने त्याविरूद्ध कार्यवाही सुरू केली. त्यांनी प्रमुख नेत्यांना पकडले. दोन महिन्यात जवळपास ३0,000 लोकांना तुरुंगात पाठविले. १ फेब्रुवारी १९२२ या दिवशी उत्तर प्रदेशात गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा खेड्यामध्ये हिंसक जमाव झाला. ते आंदोलन बरैली पर्यंत पोहचले. त्यामुळे गांधीजींनी १४ फेब्रुवारी १९२२ रोजी असहकार आंदोलन मागे घेतले. ब्रिटिशांनी गांधीजींना १८ मार्च १९२२ ला अहमदाबाद येथे पकडून सहा वर्षासाठी तुरुंगामध्ये पाठविले. गांधीजींचे असहकार आंदोलन अयशस्वी झाले. तरीही पुढील चळवळीचा तो पाया होता. गांधीजींनी सुरू केलेल्या असहकार आंदोलन मागे घेवून ग्रामीण भागात कार्यास प्रारंभ केला. तसेच जातीयता नष्ट करण्याचा संदेशही दिला.

## आपल्यासाठी एक उपक्रम ८.५

गांधीजींनी १९२२ मध्ये चौरीचौराची असहकार चळवळ यशाजवळ पोहचली असतानाच मागे घेतली. या निर्णयावर अनेकांनी गांधीजींच्यावर टीका केली. कल्पना करा. तुम्ही एक पत्रकार आहात असे समजून गांधीजींचे हे आंदोलन मागे घेतल्यानंतर गांधीजींच्या आणि तुमच्या मुलाखतीतील संवाद शब्दामध्ये लिहा.

सी. आर. दास, मोतीलाल नेहरू आणि अनेकांनी कायदेमंडळातून बाहेर पडण्याचे ठरविले आणि १ जानेवारी १९२३ मध्ये स्वराज पक्ष स्थापन केला. या पक्षाचे अध्यक्ष सी. आर. दास तर सेक्रेटरी म्हणून मोतीलाल नेहरू होते. हा एक राष्ट्रीय काँग्रेसचाच घटक पक्ष होता त्यांचा काँग्रेसला विरोध नव्हता. परंतु ते १९१९ चा कायदा बदलू किंवा नष्ट करू शकले नाहीत.

सन १९२७ मध्ये ब्रिटिश सरकारने सर जॉन सायमनच्या अध्यक्षातेखाली एक समिती नेमली. सन १९१९ च्या सुधारणांबाबत अभ्यास करण्यासाठी ही समिती काम करीत होती. त्या समितीमध्ये एकही भारतीय नव्हता. या गोऱ्या लोकांच्या समितीचा भारतीयांनी निषेध केला. जेव्हा ही समिती भारतात आली तेव्हा सर्व देशभर तिचा धिक्कार केला गेला. लोकांनी काळे झेंडे दाखवून 'सायमन गो बॅक' अशा घोषणा दिल्या. या निदर्शकांवर ब्रिटिश पोलिसांनी लाठी हल्ला केला. त्याला लजपतराय यामध्ये धारातीर्थी पडले. याचे पडसाद देशभर उमटले.

याच काळात भारतीय घटना तयार करण्याचे काम राजकीय नेते करीत होते. याला नेहरू रिपोर्ट या नावाने ओळखले जाते. या शिफारशीमध्ये लोकांचे हक्क, संसदीय कार्यपद्धती, मतदानाचा अधिकार, न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य इत्यादी बाबी होत्या. यामधील बऱ्याचश्या शिफारशी २0 वर्षानंतर झालेल्या स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत घेतल्या गेल्या. सन १९२९ मध्ये लाहोर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले

आणि काँग्रेसने पूर्ण स्वराज्यांची मागणी केली. २६ जानेवारी १९३० या दिवशी स्वातंत्र्यदिन साजरा केला. हाच दिवस स्वतंत्र भारताचा प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो.

## ८.८.२ दांडी यात्रा :

याच काळात ब्रिटिश सरकारने नवीन कायदा केला आणि मिठावर कर बसविला. मीठ ही प्रत्येकाची मूलभूत गरज आहे. त्यामुळे त्या कराला लोकांनी विरोध केला पण ही मागणी ब्रिटिशांनी फेटाळली. गांधीजींनी साबरमती आश्रम ते गुजरातच्या किनाऱ्यावर असलेल्या दांडी पर्यंत पदयात्रा काढली. ब्रिटिशांना हे आव्हान होते. ६ मार्च १९३० रोजी गांधीजींनी कायद्याचा भंग करून मीठ उचलले. या पदयात्रेमध्ये अनेक शेतकरी महिला सामील झालेल्या होत्या. त्यात गांधीजींना अटक करून पुण्यातील येरावडा तुरुगांमध्ये मे १९३० मध्ये पाठविले.



**चित्र ८.५ : मिठाच्या सत्याग्रहामध्ये गांधीजी**

सदरची घटना ब्रिटिशांच्या भारताविरोधी धोरणावर प्रकाश टाकते. यानंतर सन १९३१ मध्ये गांधी आयर्विन करार झाला गांधीजींना इंग्लंडला दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले. काँग्रेसचे ते एकमेव प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. परंतु त्यामधून काहीही निष्पन्न झाले नाही. देशभर जनतेचा परकीय मालावर बहिष्कार सुरूच होता.

नागरी असहकार हा काही प्रमाणात अयशस्वी होत होता तरी स्वातंत्र्यासाठी संघर्ष हा सुरू होता. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली देशातील विविध भागामध्ये संघटना एकत्र येत होत्या. त्यामध्ये तरुणांचा सहभाग वाढत होता. सन १९३७ च्या प्रांतिक सरकारच्या निवडणुकामध्ये काँग्रेसला भरघोस यश मिळाले आणि खेड्यापाड्यापर्यंत राजकीय जागृती पोहचली.

## ८.९ क्रांतीकारक :

ब्रिटिशांच्या विरोधी लढा देण्यासाठी तरुण पिढी पुढे आली. क्रांतितूनच स्वातंत्र्य मिळू शकेल असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांच्या विरोधी कारवाया करण्यासाठी छुप्या संघटना उभ्या राहिल्या. त्यासाठी तरुणांना प्रशिक्षण दिले. ब्रिटिश अधिकाऱ्यांना ठार करणे, शस्त्रसाठा लुटणे अशा प्रकारचा मार्ग ज्यांनी निवडला, त्यांना क्रांतीकारक म्हटले जाते. या मार्गाचा अवलंब पंजाब, महाराष्ट्र, बंगाल, विहार,उत्तर प्रदेश आणि ओरिसा येथील तरुणांनी केला. या क्रांतीकारकांमध्ये खुदीराम बोस, प्रफुल्ल चाकी, भूपेंद्रनाथ दत्त, विनायक सावरकर, सरदार अजितसिंग, लाला हरदयाल आणि त्यांची गदर पार्टी , सरदार भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, इत्यादी नेते होते. या क्रांतीकारकांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून केले. रेल्वे वाहतूक विस्कळीत केली. ब्रिटिशांच्या तिजोरीवर हल्ला करून ब्रिटिशांना जेरीस आणले. रामप्रसाद विस्मील, अश्फाकउल्ला खान आणि अन्य जणांनी १९२५ मध्ये हिंदुस्तान रिपब्लिक संघटनेची स्थापना केली. सन १९२८ मध्ये चंद्रशेखर आझादांनी हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिक असोशिएशनची स्थापना केली. त्यामध्ये भगतसिंग, बटुकेश्वर दत्तही होते. भगतसिंग व बटुकेश्वरदत्तने ८ एप्रिल १९२९ ला संसदेमध्ये बॉम्ब टाकला, इन्कलाब जिंदाबाद च्या घोषणा दिल्या. या हल्ल्यामध्ये कोणी मारले गेले नाही किंवा जखमीही झाले नाही. तरीही भगतसिंग, राजगुरू यांना सन १९३१ मध्ये फासावर लटकविले. त्यांचे बलिदान देशाच्या स्वातंत्र्यासाठी कारणी लागले. या हुतात्म्यामुळे देशाच्या स्वातंत्र्याची ज्योत पेटली.



**चित्र ८.६ : भगतसिंग, सुखदेव, राजगुरु चंद्रशेखर आझाद**

### आपल्यासाठी एक उपक्रम ८.६

क्रांतीकारकांवर तयार केलेचे चित्रपट पहा त्यामधील माहितीचा संग्रह करा. त्यांच्यामार्फत जनतेपर्यंत स्वातंत्र्याच्या लढ्याची जाणीव लोकांपर्यंत कशी पोहोचली याबावत आपले कुटुंवीय, मित्र यांच्याशी चर्चा करून टिपण करा. आपले राष्ट्रप्रेम जागृत व्हावे याबाबतीत हे चित्रपट खरोखरच काही कामगिरी बजावतात का यावर विचार करा.

## ८.१० समाजवादी विचारसरणीचा विकास :

विसाव्या शतकाचे वैशिष्ट्य म्हणजे समाजवादी विचारसरणी काँग्रेस आणि काँग्रेसेत्तरांमध्ये निर्माण झाली. जमिन धारणेमध्ये सुधारणा व्हावी, जमिनदारी पद्धती नष्ट व्हावी, शेतसारा कमी व्हावा, कर्जा मध्ये सवलती मिळाव्यात ही शेतकऱ्यांची मागणी होती. ऑल इंडिया काँग्रेसची स्थापना १९२० मध्ये झाली आणि कामगारांची स्थिती सुधारणासाठी प्रयत्न सुरू झाले. वैचारिक पायावर आधारित कामगारांमुळे पूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीस बळ मिळाले. काही समाजवादी आणि कम्युनिष्ट नेते एम्. एन्. रॉय, एस्. ए. डांगे, अबनी मुखोपाद्याय, नलिनी गुप्ता, मुझफर अहमद, शौकत अस्मानी, गुलाम हुसेन, सिंगरावेलू चेतैर, जी. एम. अधिकारी आणि पी. सी. जोशी यांनी नेतृत्त्व केले. त्यांनी व्यक्तीगत लढ्याला राजकीय स्वरूप दिले. यामध्ये शेतकऱ्यांनी उत्फुर्तपणे सहभाग घेतला. ही चळवळ देशव्यापी झाली. सदरची माहिती पोलिस आणि सैन्यापर्यंत पोहचली. साम्राज्यवादी धोरणांच्या विरोधात मोर्चे काढण्यात आले. जेव्हा नेहरू हे काँग्रेसचे अध्यक्ष झाले तेव्हा त्यांनी लखनौच्या अधिवेशनामध्ये भारतीय समस्या सोडविण्यासाठी समाजवादी धोरण स्वीकारल्याचे जाहीर केले. नेहरुंवर कार्ल मार्क्स चा प्रभाव होता. इतकेच नव्हे तर सुभाषचंद्रबोस यांनीही समाजवादी धोरणांचा पुरस्कार केलेला होता. गांधीजींच्या विचारांशी मतभेद झाल्यानेच पुढे बोस यांनी काँग्रेसचा राजीनामा देवून फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना केली.

## ८.११ जातीय भेद :

'फोडा आणि राज्यकरा' ही ब्रिटिशांची नीति ईस्ट इंडिया कंपनीच्या स्थापनेपासूनच होती. भारतीय राज्यकर्त्यांमध्ये आपापसात भांडणे लावून ब्रिटिशांनी स्वत:सत्तेचे पाय रोवले. आपण पाहिले असेल की १९ व्या शतकाच्या मध्यावर देशभक्तीचा विकास होत होता. परंतु हिंदू-मुस्लिमांमध्ये दरी निर्माण करण्याचे ब्रिटिशांचे धोरण होते. सन १८५७ पासूनच ब्रिटिशांना मुस्लिमांची विश्वासहार्यता वाटत नव्हती. मुस्लिमांना खूष करण्याची ही वेळ आहे, हे ब्रिटिशांनी ओळखले. हिंदू-मुस्लिम धार्मिक वाद पेटत राहील याकडे ब्रिटिशांचे लक्ष होते. त्यासाठीच मुस्लिम स्वतंत्र मतदारसंघ स्थापन केले. मुस्लिम लिग स्थापन करण्याचे बीज ब्रिटिशांनीच पेरले होते. हेही आपणास माहीत आहे. १९३२ च्या जातीय निवाडा हा ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचाच पुढचा भाग होता. कारण या निवाड्यानुसार मागासवर्गीयांनासुद्धा राखीव मतदारसंघ व कायदेमंडळात राखीव जागा ठेवण्यात आल्या होत्या. इ. स. १९०६ मध्ये मुस्लिमांनी पहिल्यांदा राखीव मतदारसंघाची मागणी केली. आणि इ.स. १९०७ मध्ये मोर्ले मिंटो सुधारणांमध्ये ती पुरीही केली गेली. भारतीय राष्ट्रवादाला छेद देण्यासाठी जातीयवादी मुस्लिम संघटनेची बांधणी करण्यात आली. इ. स. १९१९ मध्ये मॉंटफोर्ड सुधारणेनुसार शिख, युरोपियन, अँग्लो इंडियन, भारतीय ख्रिश्चन यांनासुद्धा वेगळे मतदारसंघ देण्यात आले. इ. स. १९३५ च्या कायद्यानुसार मतदारांचे तब्बल सतरा गटात विभाजन करण्यात आले. जातीयवादी मतदारसंघ राष्ट्रीय एकात्मतेला अतिशय घातक होते. इ. स. १९३८ मध्ये प्रथमच दोन राष्ट्राची कल्पना उदयास आली आणि इ. स. १९४० मध्ये बॅ. जिनांनी या कल्पनेला मूर्त रूप दिले. पाकिस्तानची मागणी पुढे आल्यानंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या मागणीस प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पाठिंबा दिला. इ. स. १९३७ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर काँग्रेसने संयुक्त मंत्रिमंडळ बनविले नाही, त्यामुळे पाकिस्तानची मागणी पुढे करण्यात आली. देशभर असंतोष आणि संतापाची लाट उसळली. केवळ

यामुळेच नाईलाज म्हणून फाळणी मान्य करण्यात आली. फाळणीमुळेच देशावरील ब्रिटिशांची सत्ता संपुष्टात आली. देशामध्ये कायदा व सुव्यवस्था टिकून राहिली.

## पाठ्यांशावरील प्रश्न ८.२

१. इतर निषेधमार्गांपेक्षा सत्याग्रहाचा मार्ग वेगळा कसा होता?

२. भारतीयांनी सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचे कारण सांगा.

३. गांधीजींनी असहकार चळवळ मागे का घेतली?

४. स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांचा मार्ग इतरांपेक्षा वेगळा कसा होता?

५. पूर्व स्वराज्य म्हणजे काय?

६. ब्रिटिशांनी जातियवाद वाढविण्यासाठी काय उपाय केले?

## ८.१२ स्वातंत्र्यप्राप्ती (१९३५१९४७) :

मार्च १९३३ मध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांनी एक श्वेतपत्रिका तयार केली. या श्वेतपत्रिकेनुसार एक ठरावाचा मसुदा तयार करून तो ठराव डिसेंबर १९३४ मध्ये ब्रिटिशपार्लमेंटमध्ये मांडला. अखेर २ ऑगस्ट १९३५ या दिवशी हा ठराव (गर्व्हमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५) मंजूर झाला. या ठरावाचा महत्त्वाचा भाग म्हणजे यामध्ये ब्रिटिशांच्या ताब्यात असलेला हिंदुस्थान आणि सर्व संस्थाने मिळून एक संघराज्य बनविणेही संकल्पना मांडण्यात आली होती. या संघराज्यात सामिल होण्याची सक्ती ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या हिंदुस्थानला होती. परंतु संस्थानांनी या संघराज्यात सामील होणे किंवा न होणे, हे त्यांच्या मर्जीवर अवलंबून ठेवले होते. ब्रिटिशांच्या ताब्यातील हिंदुस्थानामधील कायदेमंडळातील सभासद निवडणूकीने ठरणार होते. तर संस्थानिक या कायदेमंडळात आपल्या मर्जीनुरूप सभासद नेमू शकणार होते. ब्रिटिश हिंदुस्थानातील फक्त १४ टक्के लोकांनाच मतदानाचा अधिकार होता. कायदेमंडळाचे अधिकार देखील सीमित आणि मर्यादित होते. कायदेमंडळाला संरक्षण आणि परराष्ट्र धोरण याबाबतीत काहीही अधिकार नव्हते. १९३५ च्या कायद्याने ब्रिटिशांचे हितसंबंध अबाधित राखले गेले. या कायद्याने फुटीरतेला आणि जातियतेला खतपाणीच मिळाले. या कायद्याने राष्ट्रीय एकात्मतेला सुरूंग लावला गेला. नेहरुजिना यासारख्या राष्ट्रवादी नेत्यांनी या कायद्याचा निषेधच केला.

२५ एप्रिल १९३५ मध्ये लखनौचे अधिवेशन झाले. राष्ट्रीय धोरणाला बाधा करणारे जाचक नियम अटी लादणारे ब्रिटिश धोरण फेटाळले आणि ब्रिटिश साम्राज्यवादी धोरणाला रोखण्यासाठी निवडणूकात भाग घेण्याचे ठरविले. १९३७ च्या निवडणुकांमध्ये अकरा प्रांतापैकी सात ठिकाणी काँग्रेस विजयी झाली. १८ मार्च १९३८ च्या ऑलइंडिया काँग्रेस कमिटीने कायदेशीर धोरण ठरविले. नव्या घटनेचा निषेध केला कारण त्यासाठीच निवडणुका लढविलेल्या होत्या. त्या स्वातंत्र्य मिळविण्यासाठीच होत्या आणि त्यांनी भारतीय राज्य घटना तयार करण्यासाठी मागणी केली. १९३५ चा कायद्याचा लढा हा शेवटपर्यंत राहील असे काँग्रेसने जाहीर केले. काँग्रेसच्या नव्या मंत्रिमंडळाचा चांगला परिणाम दिसून

आला. राजकीय कैद्यांची सुटका झाली. नागरी स्वातंत्र्य मिळाले. शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. मूलभूत शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले.

### ८.१२.१ दुसऱ्या महायुद्धकाळातील राष्ट्रीय चळवळी :

दुसरे महायुद्ध १९३९ ला सुरू झाले. काँग्रेसचे सहानुभूतीचे धोरण असले तरी काँग्रेसने विनाअट सहकार्य करण्याचे नाकारले. भारताला स्वतंत्र राष्ट्र म्हणून लवकरात लवकर दर्जा देण्यात यावा ही त्यांची मागणी होती. ब्रिटिशांनी ही मागणी फेटाळली. परिणामी १९३९ ला सर्व मंत्र्यांनी निषेध म्हणून राजीनामे दिले. १९४० मध्ये सी राजगोपालाचारी यांनी प्रांतिक सरकारची केंद्रस्थानी नेमणूक करण्याची मागणी केली. त्याकाळात व्हाईसरॉय म्हणून लॉर्ड लिनलिथगो होते. त्यांनी ती मागणी फेटाळली. १९४० च्या ऑक्टोबर मध्ये नागरी बहिष्कार घालण्यात आला आणि आचार्य विनोबा भावे यांची पहिला वैयक्तिक सत्याग्रही म्हणून निवड करण्यात आली.

भारतीय मंत्रिमंडळाची बैठक श्री. ॲटली यांच्या अध्यक्षतेखाली झाली आणि मसुदा तयार करण्याचे ठरविण्यात आले. मार्च १९४२ मध्ये सर स्टॅफोर्ड क्रिप्स भारतात आल्यानंतर मसुदा जाहीर झाला. त्यामध्ये भारताला ब्रिटिश साम्राज्यातील स्वसत्ताक राज्य म्हणून युद्धानंतर जाहीर करण्याची इच्छा आहे, परंतु पूर्ण स्वातंत्र्य अभिप्रेत नाही असे ब्रिटीशांनी जाहीर केले. भारतीयांचे राष्ट्रीय सरकार बनविण्याची घोषणा त्यामध्ये नव्हती. काँग्रेसने सदरची बाब फेटाळून लावली. मुस्लिम लीगनेही ही गोष्ट फेटाळून लावली. अशा प्रकारे क्रिप्स मिशन हे अयशस्वी झाले.

स्वातंत्र्यासाठी लढा देण्यासाठी सुभाषचंद्रबोस यांनी परकीयांची मदत घेण्याचा निर्णय घेतला. दुसरे महायुद्ध ही स्वातंत्र्याचा लढा देण्यासाठी चांगली संधी आहे असे त्यांना वाटले. सन १९४० मध्ये बोस यांना अटक केली परंतु २८ मार्च १४४१ रोजी सुटका करून घेऊन त्यांनी बर्लिन गाठले. तेथे त्यांना भारतीय समुदायाचा पाठिंबा मिळाला. त्यांनी 'जयहिंद' ही घोषणा दिली. त्यांनी तेथे भारतीय सैन्य उभे करून ब्रिटिशांच्या विरुद्ध लढा देण्याचे ठरविले. भारताला स्वतंत्र करण्यासाठी १९४२ मध्ये भारतीय राष्ट्रीय आर्मी (INA) ची स्थापना केली. रासविहारी बोसनी सुभाषचंद्रबोसना १३ जून १९४३ रोजी पूर्व आशियामध्ये बोलाविले आणि भारतीय स्वातंत्र्य संघाचे नेतृत्व दिले. ही सेना आझाद हिंद सेना म्हणून ओळखली जाते. त्यांनी चलो दिल्लीची घोषणा दिली. भारतीय जनतेला सुभाषचंद्रबोसांनी आवाहन केले की, 'तुम मुझे खून दो मै तुम्हे आझादी दुंगा' त्यांनी मार्च १४४४ मध्ये कोहिमा या ठिकाणी भारतीय ध्वज फडकविला.

दुर्देवाने ही चाल फसली. ऑगस्ट १९४५ च्या विमान अपघातामध्ये नेताजींचा मृत्यू झाला असे समजण्यात येते. त्याबद्दल खरे तर खात्री देता येत नाही भारतीय राष्ट्रीय सेना (INA) बद्दल भारतीयांच्या मनामध्ये नेहमीच स्थान आहे. नेताजींच्या देशभक्तीबद्दल आणि त्यांच्या सैन्याबद्दल प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये आदराचे स्थान आहे.



चित्र ८.७ : सुभाषचंद्र बोस आणि भारतीय राष्ट्रीय सेना

### ८.१२.२ चलेजावची घोषणा आणि त्यानंतर :

क्रिप्स मिशनमुळे भारतीयांमध्ये नैराश्य आले. त्यासाठी भारतीयांना ब्रिटिशांच्या विरूद्ध लढा देण्यासाठी वेगळी चाल करणे आवश्यक वाटले. भारतीयांना टंचाई, युद्धजन्य परिस्थिती आणि बेकारीचे संकट वाटत होते. जपानच्या हल्ल्याचा धोका होता. भारतीय नेत्यांनाही असेच वाटत होते, कारण ब्रिटिशांचे राज्य भारतात होते. त्यामुळे जपान भारतावर हल्ला करेल व भारताचा त्यामध्ये निष्कारण बळी जाईल अशी होती. गांधीजी म्हणाले, 'ब्रिटिशांचे भारतात असणे म्हणजे जपानला भारतावर हल्ला करण्याचे निमंत्रण दिल्यासारखे होईल.' सुभाषचंद्रबोस यांनी १९४१ मध्ये सुटका करून घेतली आणि बर्लिनच्या रेडिओवरून वारंवार भाषणे देऊन ब्रिटिश विरोधी भावना निर्माण केली. त्यामुळे भारतीयांमध्ये जपानविषयी सहानुभूति निर्माण झाली.

गांधीजी म्हणाले ब्रिटिशांनी भारतीयांच्या मागण्यांची पूर्तता करावी किंवा भारतातून त्यानी चालते व्हावे. १४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे राष्ट्रीय सभेच्या कार्यकारणीची सभा झाली. त्यामध्ये 'छोडो भारत' चळवळीचा ठराव संमत झाला. मुंबई काँग्रेसच्या ८ ऑगस्टच्या सभेत वर्धा येथे झालेला ठराव संमत झाला. राष्ट्रीय सभेने हे जन आंदोलन अहिंसेच्या मार्गाने राष्ट्रीय पातळीवर चालविण्याचा निश्चय केला.

८ ऑगस्टच्या रात्री राष्ट्रीय काँग्रेसच्या सभासदांसमोर गांधीजी तळमळीने हृदयाला भिडणाऱ्या भाषणात म्हणाले, "मला आता तावडतोब स्वातंत्र्य हवे आहे. ते सुद्धा पहाटेपूर्वीच. पूर्ण स्वातंत्र्याशिवाय कशानेही माझे समाधान होणार नाही. मी एक छोटा मंत्र तुम्हाला देतो. तो मंत्र तुमच्या हृदयावर कोरून ठेवा व प्रत्येक श्वासाबरोबर त्याचा मन:पूर्वक जप करा. तो मंच आहे.' 'करा किंवा मरा' आपण भारताला स्वतंत्र तरी करू किंवा स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नामध्ये मृत्यू पत्करू. आपण आता गुलामगिरीच्या कायमच्या बंधनात राहणार नाही."

ब्रिटिश सरकारने ९ ऑगस्ट १९४२ च्या पहाटेच, राष्ट्रीय सभेच्या नेत्यांना ही चळवळ सुरू करण्यापूर्वी च अटक केली. राष्ट्रीय सभेवर बंदी घालण्यात आली. वर्तमानपत्रावरही बंदी घालण्यात आली.

राष्ट्रीय नेत्यांना पकडल्याच्या बातमीने सर्व देशालाच धक्का बसला. भारतीयांचा राग उफाळून आला. लोकांना निदर्शने, हरताळ, मोर्चे काढून आपला असंतोष व्यक्त केला. महत्त्वाचे नेते तुरुंगात होते. त्यामुळे चळवळीने आपापल्या ठिकाणी निरनिराळ्या स्वरूपात असंतोष व्यक्त केला. काहींनी सरकारी इमारती, पोलिस स्टेशन, पोस्ट ऑफिस, ब्रिटिशांचे प्रतिक समजून आगी लावल्या आणि आपल्या असंतोष व्यक्त केला. रेल्वेलाईन, टेलिफोन लाईन्स तोडून टाकल्या. उत्तर प्रदेशात बालियाजिल्हा, पश्चिम बंगालमध्ये मिदनापूर, मुंबई इलाख्यात साताऱ्यात उठावाने उग्र स्वरूप धारण केले. गांधीजींच्या मंत्राने लोकांना स्फुरण चढले ब्रिटिशांनी पोलिस व सशस्त्र दलाच्या सहाय्याने विरोध मोडण्याचा प्रयत्न केला. चले जावची चळवळ ही इतिहासामध्ये संस्मरणीय आहे. भारतीय लोकांचे त्यागाचे सामर्थ्य आणि जीवापाड लढा देण्याचे सामर्थ्य दर्शविणारा, भारतात खोलवर रुजलेला हा लढा होता. या लढ्यातून माघार न घेण्याचे लोकांनी ठरविले. भारतीय स्वातंत्र्य आता आटोक्यात आले होते. आता स्वातंत्र्य मिळणार याची खात्री वाटत होती.



**चित्र ८.८ : चले जावची चळवळ (ऑगस्ट १९४२)**

सन १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपले. ब्रिटिश सरकारने भारतीय हिंदू-मुस्लीम यांना सत्ता देण्याविषयी बोलणी सुरू केली. पहिली गोलमेज परिषद निष्फळ ठरली कारण मुस्लीम लिगला वाटले की भारतीय मुस्लिमांचे प्रतिनिधी म्हणून फक्त आपल्यालाच मान्यता मिळालवी. काँग्रेसची त्याला सहमती नव्हती. १९४0 मध्ये कॅबिनेट मिशन भारतातील लोकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आले. या मिशनने प्रमुख पक्षाच्या नेत्यांशी चर्चा केली आणि संघराज्याची कल्पना मांडली प्रारंभी सर्वच नेत्यांनी ही कल्पना फेटाळली पण नंतर सर्वांनी त्याला संमती दिली. घटना समितीच्या निवडणूका घेण्यात आल्या त्यामध्ये काँग्रेसचे १९९ उमेदवार जिंकून आले तर ७२ ठिकाणी मुस्लिम लीगचे उमेदवार निवडून आले.

### ८.१२.३ फाळणी आणि भारताचे स्वातंत्र्य ः

संविधान समितीमध्ये काँग्रेस आणि मुस्लीम लिग यांच्यात दुही मजली. सन १९४६ च्या मध्यास आलेल्या कॅबिनेट मिशन प्लॅनला लिगने नकार दिला. काँग्रेसने सप्टेंबर १९४६ ला केंद्रीय सरकार स्थापन केले. मुस्लिम लिगने सहभाग घेण्यास नकार दिला. व त्यांनी तो दिवस 'थेट कार्यवाही दिवस' म्हणून (Action Day) जाहीर केला. स्वतंत्र पाकिस्तान मिळविण्याचा १६ ऑगस्ट १९४६ दिवस निश्चित केला. त्याचा परिणाम देशभर उद्रेक होण्यात झाला. यामध्ये लाखो लोक मारले गेले. लाखोंची घरे उध्वस्त झाली. या काळात लॉर्ड मौंटबॅटनची नेमणूक व्हाईसराय म्हणून झाली. जून १९४७ मध्ये एक योजना तयार केली गेली. त्यामध्ये भारताची फाळणी हा विषय होता. गांधीजींच्या प्रखर विरोधाला न जुमानता अन्य सदस्यांनी भारतीय स्वातंत्र्य कायदा १९४७ हा स्वीकारला. त्यामधून दोन स्वतंत्र देश निर्माण झाले. भारतीय उपखंडात भारत आणि पाकिस्तन हे दोन देश निर्माण झाले. तो दिवस होता. १५ ऑगस्ट १९४७ (१४ ऑगस्ट व १५ ऑगस्ट १९४७ ची मध्य रात्र)

### अभ्यास ८.७

ब्रिटिश सरकारच्या कॅबिनेट मिशनचे आपण सदस्य आहात अशी कल्पना करा आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि मुस्लिम लिग यांचे बरोबर स्वातंत्र्यानंतर सत्ता हस्तांतरण बाबत चर्चा कशी कराल. त्यांच्या समोर प्रस्ताव कशा प्रकारे सादर कराल याचा मसुदा तयार करा.

### पाठ्यांशावरील प्रश्न ८.३

१. सन १९३५ च्या कायद्याची दोन वैशिष्ट्ये लिहा.

२. मुस्लिम लिगच्या मागण्या कोणत्या होत्या?

३. १९३५ च्या नंतर निवडणुकांमध्ये काँग्रेसने का भाग घेतला?

४. दुसऱ्या महायुद्ध काळात भारतीय नेत्यांनी भारतात ब्रिटिश राजवट असण्याबाबत कोणती भीति वाटत होती?

५. भारताच्या फाळणीची प्रमुख कारणे कोणती?

### आपण काय शिकलो?

❖ प्रवोधनकाळ, फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन राज्य क्रांती, रशियन राज्यक्रांती यामुळे जगात राष्ट्र वादाची प्रेरणा उदयास आली.

- ❖ वसाहतींच्या विरोधामध्ये १९ व्या शतकामध्ये भारतामध्ये राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय झाला. याला सामाजिक आणि धार्मिक चळवळींची साथ मिळाली.
- ❖ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली. स्थापनेचा हेतू भारतीय लोकांची गाऱ्हाणी ब्रिटिश सरकारच्या कानावर घालणे हा होता.
- ❖ १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी जाहीर केली. बंगालमध्ये राष्ट्रीय चळवळी वाढत होत्या. त्याला आळा घालणे आणि हिंदू मुस्लिम दुही निर्माण करणे हा हेतू होता.
- ❖ १९०६ मध्ये ढाक्क्यामध्ये मुस्लिम लिगची स्थापना केली. भारतीय मुस्लिमांना त्यांचे अधिकार मिळावेत तसेच सरकारमध्ये आपले प्रतिनिधीत्व असावे यासाठी मुस्लिम लिगची स्थापना केली.
- ❖ १९०७ मध्ये काँग्रेसमध्ये वैचारिक मतभेद झाले व मवाळ गट व जहालगट अशी फूट पडली.
- ❖ पहिल्या महायुद्धात सहभाग घेण्यासाठी भारतीय नेते तयार झाले. कारण युद्धानंतर भारतीयांना घटनात्मक अधिकार मिळण्याची अट घातली होती.
- ❖ गांधीजींच्या सत्याग्रहाचा उपक्रम दक्षिण आफ्रिका, चंपारान, खेडा व अहमदाबात येथे यशस्वीपणे पार पडला.
- ❖ ब्रिटिश धोरणांच्या विरोधात गांधीजींनी प्रारंभ केला. त्यांनी त्यांच्या चळवळीमध्ये सर्व थरातील लोकांना सहभागी करून घेतले.
- ❖ भगतसिंग चंद्रशेखर आझाद, सुखदेव या क्रांतीकारकांनी ब्रिटिश सरकारवर हल्ले चढविले.
- ❖ जातीय तेढ निर्माण करून ब्रिटिशांनी भारताचे विभाजन केले.
- ❖ स्वातंत्र्यासाठी सुभाषचंद्र बोस यांनी भारताबाहेरील मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. ब्रिटीशांपासून देश स्वतंत्र होण्यासाठी इंडिअन नॅशनल आर्मीची स्थापना केली.
- ❖ स्वातंत्र्यासाठी चले जाव चळवळ ही गांदीजींची चळवळ पुढे करा किंवा मरा (Do or Die) पर्यं‌त पोहचविली.
- ❖ मुस्लिम लिगने मुस्लिमांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केली. भारताला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले.

## संकीर्ण प्रश्नसंग्रह

१. ब्रिटिश सरकार समोर काँग्रेसच्या प्रारंभीच्या कोणत्या मागणी होत्या?

२. बंगालची फाळणी करण्यामागे कर्झनचा कोणता हेतू होता?

३. आफ्रिकेमध्ये गांधीजींनी सत्याग्रह का केला होता? भारतातील सत्याग्रहाचे स्वरूप कसे होते?

४. ध्येय साध्य करण्यासाठी गांधीजींचे असहकार आंदोलन उपयुक्त ठरले असे वाटते का? तुमच्या उत्तराच्या समर्थनासाठी दोन कारणे द्या.

५. भारतीयांनी सायमन कामिशनला भारतातून परत जा असे का म्हटले?

६. दांडी यात्रेमध्ये गांधीजींना अटक का झाली?

७. विधीमंडळ सभागृहावर क्रांतीकारकांनी बॉम्ब का फेकला?

८. सुभाषचंद्र बोस यांनी अझाद हिंन्द फौजेचे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्व स्पष्ट करा.

९. चले जाव चळवळीचे भारतीय स्वातंत्र्यातील महत्त्व स्पष्ट करा.

१०. विसाव्या शतकामध्ये ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले याला कारणीभूत असणारी तीन कारणे शोधा.

## पाठावरील प्रश्नांची उत्तरे

### ८.१

१. वसाहत विरोधी चळवळी, राजकीय प्रशासकीय एकता. ब्रिटिशांचे धोरण, भारतीय वैभवाची लूट.

२. ब्रिटिशांच्या विरोधामध्ये भावना भडकू नयेत यासाठी भारतीयांना घटनात्मक मार्गाने प्रतिनिधित्व देणे.

३. मवाळाचे धोरण म्हणजे दया, विनंती करून ब्रिटिशांकडून गुन्ह्यामधून सुटणे आणि जहालांचे धोरण म्हणजे सामुहिक विरोध, सरकारी धोरणावर टीका करणे, परकीय मालावर वहिष्कार घालणे, स्वदेशी मालाचा वापर करणे.

४. युद्धामध्ये जिंकल्यानंतर भारतीयांना घटनात्मक अधिकार देण्याची आशा होती.


५. ऑटोमन प्राताचे विभाजन व खलिफांचा अपमान हे कारण होते.

### ८.२

१. सत्याग्रह म्हणजे असहकार, सत्य आणि न्याय.

२. त्या कमिशनमध्ये एकही भारतीय नव्हता.

३. कारण तिला हिंसक वळण लागले होते.



टिपा



४. ब्रिटिशांवर सशस्त्र हल्ला करण्याचे धोरण होते. इतरांचे तसे मत नव्हते.

५. पूर्ण स्वराज्य म्हणजे सार्वभौमत्व

६. मुस्लिम, शीख इ. वेगळे मतदार संघ दिले. मुस्लिम लीगच्या जातीय मागण्यांना पाठिंबा दिला. त्या पूर्ण केल्या.

## ८.३

१. ब्रिटिश साम्राज्याचा भाग. कायदेमंडळावरील मर्यादा, संरक्षणाचे नियंत्रण नाही, परकीय देशाशी करार करता येणार नाही.

२. मुस्लिम लिगने स्वतंत्र देशाची मागणी केली म्हणजेच पाकिस्तान

३. घटनात्मक अधिकार मिळावेत आणि ब्रिटिश कायदे बदलवित, यासाठी निवडणूकांमध्ये काँग्रेसने भाग घेतला.

४. दुसऱ्या महायुद्धात जपानचा सहभाग, ब्रिटिशांचे भारतावर राज्य होते. त्यामुळे जपान भारतावर हल्ला करील अशी भीति होती.

५. धार्मिक व जातीय पायावर विभाजन, मुस्लिम लिगची मागणी, राजकीय पक्षांमध्ये एकमत नव्हते.

# ९

# भारताची प्राकृतिक रचना

**शिक्षक :** विद्यार्थी मित्रांनो, आपण ज्या भागातून आलेलो आहोत तेथील आचार विचारांचा आपल्यावर परीणाम होतो याच्याशी आपण सहमत व्हाल. आपण कोठून आलो हे पाहू.

**नताशा :** मी हिस्सार येथून आलेली आहे. फराह ही फत्तेबाद येथून आणि राजींदर हा भिवाणी येथून आलेला आहे.

**शिक्षक :** ही सर्व ठिकाणे कोठे आहेत हे तुम्हाला माहीत आहे काय?

**राजींदर :** होय, ही हरयानामध्ये म्हणजेच भारतात आहेत. परंतु भारत नक्की कोठे आहे?

**फराह :** पण भारताच्या स्थानाची कशाला माहिती हवीय?

**शिक्षक :** स्थान ही देशाची मुख्य ओळख असते. त्यावरूनच आपल्याला हवामान, वनस्पती, शेती, साधनसंपदा यांची माहिती होते. त्याचाच परिणाम मानवी जीवन पद्धती, आहार, जागतिक स्थानावरील त्यांचे महत्त्व समजते. म्हणूनच भारताच्या विविध अंगांची माहिती घ्यायची असेल तर भारताचे स्थान माहीत असणे आवश्यक आहे त्यासंबंधी अधिक माहिती मिळवू.

## उद्दिष्टे :

सदरच्या पाठामधून पुढील बावी माहीत होतील.

- ❖ अक्षवृत्त आणि रेखावृत्त यांच्या संदर्भाने भारतीय स्थान
- ❖ नकाशाच्या सहाय्याने भारताच्या शेजारील देशांचे भारताच्या संदर्भातील स्थान
- ❖ भारताच्या राजकीय नकाशावरून, घटक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश ओळखणे.
- ❖ भारताचे प्रमुख प्राकृतिक विभाग स्पष्ट करणे.
- ❖ भारताच्या जलप्रणालीचे वर्णन करणे.
- ❖ हिमालयीन आणि द्विपकल्पीय नद्यांची तुलना करणे.
- ❖ नद्यांच्या स्वच्छतेसाठी लोकांच्या सहभागाचे महत्त्व स्पष्ट करणे.

## ९.१ स्थान


**शिक्षक :** विद्यार्थी मित्रांनो, एखाद्याने भारताच्या स्थानाबद्दल विचारले तर आपल्याला दोन प्रकारे स्थान सांगता येईल, एक म्हणजे निरपेक्ष स्थान आणि दुसरे म्हणजे सापेक्ष स्थान, निरपेक्ष स्थान आणि सापेक्ष स्थान म्हणजे काय हे आपण समजावून घेवू. अक्षांश व रेखांश यांच्या सहाय्याने व्यक्त केलेले स्थान म्हणजे निरपेक्ष स्थान होय, सापेक्ष स्थान सांगताना जवळ लांब इत्यादी संदर्भाने स्थान व्यक्त केले जाते.


### ? तुम्हास हे माहित आहे का ?

**अक्षांश :** विषुववृत्ताच्या उत्तरेस व दक्षिणेस भूपृष्ठाशी असलेली कोनात्मक अंतरे

**रेखांश :** ग्रीनीच या मूळ रेखावृत्ताच्या पूर्वेकडे व पश्चिमेकडे असलेले कोनात्मक बिंदू होत.

**कोनात्मक अंतर :** पृथ्वीच्या मध्यापासून काढलेले बिंदू होत.





**शिक्षक :** अक्षवृत्त व रेखावृत्ताच्या आकृतीवरून भारताच्या मुख्य भूमीचे अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय स्थान शोधता येईल.

**नताशा :** भारताचा दक्षिणोत्तर विस्तार ८°४2 उत्तर ते ३७°६2 उत्तर अक्षरवृत्ताच्या दरम्यान आहे आणि पूर्वपश्चिम विस्तार ६८°७2 पूर्व ते ९७°२५2 पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. म्हणजेच दक्षिणोत्तर अक्षवृत्तीय विस्तार ३२१४ कि. मी. आणि पूर्व पश्चिम विस्तर २९३३ कि. मी. आहे. जागतिक क्षेत्रफळाच्या २.४२% क्षेत्र भारताने व्यापलेले आहे.

**शिक्षक :** भारताचा विस्तार उत्तर गोलार्धात तसेच पूर्व गोलार्धामध्ये आहे. देशाच्या मध्यवर्ती भागातून कर्कवृत्त (२३$\frac{1}{2}^{\circ}$ उ.) जाते. यामुळेच देशाचे उत्तर भारत आणि दक्षिण भारत असे दोन भाग पडलेले आहेत.




**आकृती ९.४ भारतीय मुख्य भूमिखंडाचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार**

त्याचप्रमाणे ८२°.३02 पूर्व रेखावृत्त देशाच्या मध्यवर्तीभागातून जाते त्याला भारताचे प्रमाण रेखावृत्त असे म्हणतात.

**शिक्षक :** शेजारील जागेमध्ये भारताचे सापेक्ष स्थान लिहा; सापेक्ष स्थान म्हणजेच इतर ठिकाणांचा (उत्तरेस, दक्षिणेस, पलिकडे, शेजारीच) संदर्भ असतो. भारत हा आशिया खंडातील एक भाग आहे. भारताच्या तीन बाजूंनी पाणी आहे. पश्चिमेस अरबी समुद्र, पूर्वेस बंगालचा उपसागर तर दक्षिणेस हिन्दी महासागर आहे. वायव्येस पाकिस्तान आणि अफगाणिस्तान आहे. चीन, भूतान, तिबेट, नेपाळ उत्तरेस आहेत. बांगलादेश आणि म्यानमार पूर्वेस आहेत. दक्षिणेस हिन्दी महासागरात श्रीलंका आणि मालदिव आहे. भारताच्या अती दक्षिणेकडील स्थान इंदिरा पॉईट (निकोबार बेट) असून त्याचे स्थान ६°४° उ. अक्षरवृत्तावर आहे. कन्याकुमारी हे मुख्य भूमीचे अति दक्षिणेकडील ठिकाण ८°४° अक्षवृत्तावर आहे.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**


देशाच्या मध्यवर्ती भागातून ८२°३02 रेखावृत्त मिर्झापूर (उत्तर प्रदेश) वरून जाते. ते देशाचे प्रमाण रेखावृत्त समजले जाते. कारण गुजरात आणि अरुणाचल प्रदेशांच्या स्थानिक वेळेत दोन तासांचा फरक टाळण्यासाठी संपूर्ण देशाच्या एकाच वेळेसाठी मध्यवर्ती असलेल्या रेखावृत्तावरील वेळही प्रमाणवेळ मानण्यात आलेली आहे.

### ९.१.१. स्थान महत्त्व

आकृती क्र. ९.२ चे निरिक्षण केल्यास कोणती गोष्ट लक्षात येते?

भारत हा दक्षिण आशियातील क्षेत्रफळ आणि लोकसंख्येने मोठा देश आहे. व्युहरचनेच्या दृष्टीने हिन्दी महासागरातील भारताचे स्थान महत्त्वाचे आहे.

युरोप, आफ्रिका, आशिया आणि अतिपूर्वेकडील मार्गावर भारताचे वर्चस्व आहे. त्यामुळेच अतीप्राचीन काळापासून अनेक देशांशी भारताचे व्यापारी संबंध होते. भारताच्या सीमा सागरी तसेच भूभागाशी जोडलेल्या आहेत. नथू ला (सिक्कीम) सिप्की ला (हिमाचल प्रदेश) झोजी ला, बुर्जी ला (जम्मू आणि काश्मीर) या खिंडींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारत आणि तिबेटच्या मुख्य व्यापारी मार्गावरील दार्जिलिंग जवळील कालिमपाँग आणि ल्हासा ही ठिकाने जेलेप ला खिंडीने जोडलेले आहे. प्राचीन काळातील अनेक प्रवाशांनी या खिंडीतून जाये केलेली आहे. या मार्गानी केवळ व्यापारी हेतूच साध्य केलेला नसून विचारांची आणि संस्कृतीची देवाणघेवाणही झालेली आहे.




**आकृती ९.२ महत्त्वाच्या व्यापारी मार्गाचे भारताचे स्थान**

## पाठावरील प्रश्न ९.१

**१. नकाशा क्र. ९.२ चे निरीक्षण करून उत्तरे लिहा.**

१. भारताच्या पूर्वेकडील दोन देशांची नावे शोधा.

२. भारताच्या पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील समुद्रांची नावे लिहा.


३. पाल्कच्या सामुद्रधुनीने भारताशी कोणता देश जोडलेला आहे?

४. भारताच्या भूमीशी सीमा असलेले दोन देश लिहा.

## ९.२ भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश

क्षेत्रफळाने भारत हा जगातील सातव्या क्रमांकाचा देश आहे. देशाची १५२00 कि. मी. लांबीची भूसीमा आहे तर ६१00 कि. मी. लांबीची सागरी सीमा आहे. भारतीय भूमीचे ३.२८ दशलक्ष चौ. कि. मी. क्षेत्रफळ असून जगाच्या क्षेत्रफळाच्या २.४२ टक्के क्षेत्रफळे भारताने व्यापलेले आहे.

प्रशासकीय दृष्टीने भारताचे २८ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेशामध्ये विभाजन केलेले आहे. आकृती क्र. ९.३ वरून माहिती घेवू.




**आकृती ९.३ : भारताचा राजकीय नकाशा**

या नकाशावरून लक्षात येईल की प्रत्येक राज्याला आणि केंद्रशासित प्रदेशाला स्वतंत्र राजधानी आहे. विशेष म्हणजे नवी दिल्ली ही भारताची तसेच दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाची राजधानी आहे. अशाचप्रकारे अन्य राजधानी आपणास ओळखता येतील का? होय, चंदिगड ही हरयाना आणि पंजाबची राजधानी तसेच केंद्रशासित प्रदेशाचीही राजधानी आहे.

### कृती ९.१ :

खालील ठिकाणे जोडताना कमीत कमी किती राज्यातून प्रवास करावा लागेल (आकृती क्र. ९.५ चा संदर्भ वापरा.)

अ) काश्मीर ते मिझोरम    ब) पंजाब ते बिहार    क) दिल्ली ते बंगलूरु

ड) मुंबई ते कोलकाता    इ) चेन्नई ते रायपूर

### पाठावरील प्रश्न ९.२

१. नकाशा क्र. ९.३ चे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. दक्षिण भारतातील दोन राज्यांची नावे लिहा.

२. आंतरराष्ट्रीय सरहद्द असणारी दोन राज्ये लिहा.

३. सिक्कीमशी सरहद्द असणारी दोन राज्ये लिहा.

४. अरबी समुद्र किनारी असणारे दोन केंद्रशासित प्रदेश

## ९.३ भारताचे प्राकृतिक विभाग

**नताशा :** भूप्रदेश म्हणजे काय?

**शिक्षक :** भूप्रदेश म्हणजे विशेष भूवैशिष्ट्ये असणारी भूमी

**फराह :** उदाहरणार्थ मुंबईचा किनारा वाळूचा तर शिलाँग टेकडीचा आहे.

**शिक्षक :** बरोबर तुम्हाला माहीत आहे का? भारत हा विस्तृत देश असून विविध भूवैशिष्ट्ये व भूमिस्वरूपाचा देश आहे?

**राजींदर :** भूमिस्वरूप म्हणजे काय?

**शिक्षक :** भूमिस्वरूप म्हणजे निसर्गनिर्मित भूमीचे स्वरूप. भूमीचे विविध रूपे आपल्याला पृथ्वीवर आढळून येतात.

भारत ही विविधतेची भूमी आहे. त्यामध्ये बृहद् हिमालय, उत्तरेकडील मैदान, थरचे वाळवंट, किनारपट्टीवरील मैदाने, द्वीपकल्पीय पठार इत्यादीचा समावेश आहे. या विविधतेचे कारण म्हणजे


❖ खडकाच्या निर्मितीमध्ये विविधता. भूवैशिष्ट्यांची निर्मिती विविध काळात झालेली आहे.

❖ विदारण, क्षरण आणि संचयन या प्रक्रीयेमुळे मूळच्या भूमीस्वरूपात बदल घेवून आजचे भूमीस्वरूप दिसत आहे.

**विदारण :** भूभागावरील मूळखडकांच्या स्वरूपात प्राकृतिक, रासायनिक, जैविक घटकांच्या क्रियेमुळे बदल घडून येणे म्हणजे विदारण होय. वारा, पाणी, हवामान यांच्यामुळे हा बदल घडून येतो.

**क्षरण :** विदारण क्रीयेतून निर्माण झालेल्या पदार्थांचे वारा, नदी, हिमनदी इ. कारकांच्या सहाय्याने वहन होणे म्हणजे क्षरण होय. विदारणाच्या क्रियेत भूकवचाच्या पदार्थांचे वहन होत नाही. क्षरण व विदारण यामधील हा मूलभूत फरक आहे.

भारत हा प्राकृतिक विविधतेचा देश आहे. एका बाजूला उंच पर्वत तर दुसऱ्या बाजूस नद्यांनी निर्माण केलेले मैदानी प्रदेश आहेत. प्राकृतिक वैशिष्ट्यांवरून भारताचे सहा विभागामध्ये वर्गीकरण करता येईल.




**आकृती ९.४ भारताचे प्राकृतिक विभाग**

१. उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश   २. उत्तरेकडील मैदाने

३. द्वीपकल्पीय पठार   ४. भारतीय वाळवंट

५. किनारपट्टीवरील मैदाने   ६. बेटे

१. उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश : त्याचे तीन गटामध्ये विभाजन करता येईल. ते खालीलप्रमाणे,

१. हिमालय


२. बाह्य हिमालय

३. पूर्वांचल टेकड्या

## १. हिमालय पर्वत :

हिमालय हा अर्वाचीन वलीपर्वत आहे. ही जगातील सर्वोच्च पर्वतरांग आहे. हिमालय हा नैसर्गिक अडथळा आहे. अती थंड हवा, वर्फाचे आवरण, उंचसखल प्रदेश, शत्रूपक्षाला हिमालय ओलांडून हल्ला करण्याची हिंमतही होणार नाही. सिंधु नदीपासून ब्रह्मपुत्रेपर्यंत पश्चिम पूर्व पसरलेला हिमालय ही भारताची उत्तरेकडील २५०० कि. मी. लांबीची सीमा आहे. साधारणपणे पश्चिमेकडे ४०० कि.

**१. खिंड** : पर्वत रांगेतील कमी उंचीचा भाग, यातून मार्ग काढला जातो.
**२. रांग** : पर्वताचा सलग भाग यामध्ये कटक, पर्वत शिखरे असतात.
**३. शिखर** : पर्वत रांगामधील सर्वोच्च ठिकाणे.
**४. दरी** : खोलगट भाग किंवा दोन उंच भूप्रदेशाच्या दरम्यानचा सपाट भाग.
**५. ड्युन** : हिमाचल व शिवालिक रांगांच्या दरम्यानची विस्तृत दरी.




आकृती ९.५ : हिमालय पर्वत

मी रुंदी असून पूर्वेकडे १५० कि. मी. आहे. हिमालयाच्या समांतर रांगांचे तीन भाग पाडता येतात.

अ) बृहद् हिमालय किंवा हिमाद्री

ब) मध्य हिमालय किंवा हिमाचल

क) बाह्य हिमालय किंवा शिवालिक

**अ)** **बृहद् हिमालय किंवा हिमाद्री :** हा भागा अगदी उत्तरेकडील पर्वत रागांचा आणि शिखरांचा आहे. साधारणपणे ६000 मीटर उंच आणि १२0 ते १९0 कि. मी. रुंदीचा भाग आहे. यामध्ये अनेक रांगा या सलग आहेत. यातील बहुतेक सर्व भाग बर्फाने अच्छादलेला असून अनेक ठिकाणे ही हिमनद्यांची उगमस्थाने आहेत. माऊंट एव्हरेस्ट, कांचनगंगा, मकालू, धवलगिरी, नंगा पर्वत इत्यादी. पर्वत शिखरे ८000 मीटरपेक्षाही अधिक उंचीची आहेत. माऊंट एव्हरेस्ट (८८४८ मी.) हे जगातील सर्वाधिक उंचीचे शिखर आहे तर कांचनगंगा हे भारतातील सर्वाधिक उंचीचे शिखर आहे. या पर्वतात अनेक खिंडी आढळतात. बारा लाप्चाला, शिप्की ला, नथू ला, झोजी ला, बोमिडी ला इत्यादी खिंडी आहेत. गंगा आणि यमुना नद्या याच हिमालयातच उगम पावतात.

**ब)** **मध्य हिमालय किंवा हिमाचल :** या रांगांची उंची साधारणपणे १000 मी. ते ४५00 मीटर आहे आणि ५0 कि. मी. रुंदी आहे. पीर पांजाल, धवल धार, महाभारत या प्रमुख रांगा आहे. सिमला, डलहौसी, दार्जीलिंग, चक्राता, मसूरी, नैनीताल ही प्रसिद्ध थंड हवेची ठिकाणे आहेत. काश्मीर, कुलू, कांग्रा ही प्रसिद्ध खोरी आहेत.

**क)** **बाह्य हिमालय किंवा सिवलिक रांगा :** हिमालय पर्वतातील सर्वात बाह्य रांग असून साधारणपणे या रांगेची उंची ९00 ते ११00 मीटर असून या रांगेची रुंदी १0 ते ५0 कि. मी. आहे. जम्मूच्या सारख्या टेकड्या कमी उंचीच्या आहेत. शिवलिक रांगा आणि हिमाचल किंवा मध्य हिमालयाच्या दरम्यानचा खोऱ्याचा प्रदेश डून नावाने ओळखला जातो. उदा. डेहराडून, कोटलीडून, पाटलीडून यापैकीच आहेत.

## २. ट्रान्स हिमालयातील रांगा :

बृहद् हिमालयाच्या उत्तरेकडील आणि हिमालयाच्या रांगांना समांतर असणाऱ्या रांगाना झास्कर रांगा म्हणतात. या झास्कर रांगाच्या उत्तरेकडे लडाख रांग आहे. झास्कर आणि लडाख रांगेच्या दरम्यान सिंधु नदीचे खोरे आहे. देशाच्या बाहेर काराकोरम रांग आहे. काराकोरम रांगेतील $K_2$ हे जगातील सर्वाधिक उंचीचे शिखर आहे.

## ३. पूर्वाचल टेकड्या :

पूर्वेकडील मिशमी, पतकोई, मागा आणि मिझो टेकड्या हिमालयाच्या पूर्वेकडे असून मेघालय पठार याच टेकड्यांचा भाग असून गारो खाँशी आणि जैतीया या टेकड्या येथे आहेत.

## पाठावरील प्रश्न ९.३

१. हिमालयाच्या तीन रांगांची नावे लिहा.

२. नकाशाचे (आकृती ९.५) निरीक्षण करून पुढील उत्तरे शोधा.

१. नंगा पर्वत आणि नंदादेवी कोणत्या राज्यात आहेत?

२. होकारार्थी किंवा नकारार्थी उत्तरे लिहा.

अ) एव्हरेस्ट पर्वत भारतात आहे.

ब) सिप्की ला खिंड शिवालिक रांगांमध्ये आहे.

क) मान समरोवर हे कैलास रांगेत आहे.

३. बृहद हिमालयामध्ये असणाऱ्या दोन देशांची नावे लिहा.

४. दोन पूर्वाचल टेकड्या ओळखा.

### २. उत्तरेकडील मैदाने :

उत्तरेकडील मैदानामधील कोणकोणती राज्ये आहेत. आकृती क्र. ९.५ वरून निरिक्षण करू. हिमालयाच्या दक्षिणेस व द्विपकल्पीय पठारांच्या उत्तरेस हे मैदान आहे. या मैदानाची निर्मिती सिंधूगंगाब्रह्मपुत्रा या प्रमुख नद्यांच्या गाळापासून झालेली आहे. सुमारे २४०० कि. मी. लांबीचे हे मैदान असून पश्चिमेस पंजाब पासून पूर्वेस आसामपर्यंत पसरलेले आहे. मैदानाच्या रुंदीमध्ये विविधता आहे. पश्चिमेस ३०० कि. मी. रुंदी आहे तर पूर्वेस १५० कि. मी. रुंदी आहे. या मैदानात पंजाब, हरयाना, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि आसाम ही राज्ये येतात. हिमालयातून नद्यांनी आणलेल्या गाळापासून ही मैदाने तयार झालेली आहेत. हे मैदान जगातील मोठे मैदान समजले जाते. यथे गहू, तांदूळ, ऊस कडधान्ये, तेलबिया, ताग यासारखी उत्पादने घेतली जातात. जलसिंचन सुविधांमुळे अन्नधान्य उत्पादन हमखास मिळते. उत्तरेकडील मैदानांचे दोन प्रमुख भाग पडतात.

अ) पश्चिमेकडील मैदान

ब) गंगा ब्रह्मपुत्रा मैदान

### अ) पश्चिमेकडील मैदान :

हे मैदान सिंधु नदीने निर्माण केलेले आहे. हा सर्व प्रदेश अरवली रांगांच्या पश्चिमेस असून सतलज, बियास व रावी नदीने आणलेल्या गाळापासून तयार झालेला आहे. त्या प्रदेशास दुबाव म्हणून ओळखले जाते.

### ब) गंगाब्रह्मपुत्रेचे मैदान :

गंगा आणि ब्रह्मपुत्रा या प्रमुख नद्यांच्या गाळापासून तयार झालेला आहे. मोहनजोडडो आणि हराप्पा

संस्कृतीचा उगम नद्यांच्या खोऱ्यात झालेला होता. याचे कारण म्हणजे सुपिक मृदा आणि पाण्याची उपलब्धता हेच कारण आहे.


**दुआब :** दोन नद्यांच्या संगमावरील क्षेत्रास दुआव म्हणतात. उदा. पंजावमध्ये असलेले दुआव

**खादर :** दरवर्षी येणाऱ्या पुराचे क्षेत्र होय.

**भांगर :** ज्या क्षेत्रापर्यंत पुराचे पाणी पोहचू शकत नाही असे क्षेत्र.

**३. द्विपकल्पीय पठार :**

याचा आकार त्रिकोणाकृती विस्तृत उंचावरील सपाट प्रदेश आहे हे आकृती क्र. ९.६ च्या निरीक्षणावरून आपल्या लक्षात येईल. हा सर्व प्रदेश गोंडावणा या नावाने ओळखला जातो. पठाराणे सुमारे ५ लक्ष चौ. कि. मी. क्षेत्र व्यापलेले असून गुजरात, महाराष्ट्र, विहार, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश पर्यंत या पठारांचा बराचसा भाग पसरलेला आहे.




**आकृती ९.६ : दख्खनचे पठार**

नर्मदा नदीमुळे या पठाराचे मध्यवर्ती पठार आणि दख्खनचे पठार असे दोन भाग झालेले आहेत.

१. **मध्यवर्ती पठार :** या पठाराचा विस्तार नर्मदा नदीपासून उत्तरेकडील मैदानापर्यंत आहे, अरवलीच्या रांगा गुजरात मधून सुरू होतात व राजस्थानातून दिल्लीपर्यंत जातात. गुरुशिखर (१७२२ मी.) अरवली पर्वतातील माऊंट अबू जवळील सर्वोच्च शिखर आहे, माळव्याचे पठार, छोटा नागपूरचे पठार हा प्रदेश मध्यवर्ती पठाराचाच भाग आहेत. माळव्याच्या पठारावरील बेटवा, चंबळ व केन या नद्या असून छोटा नागपूर पठारावरील महादेव, कैमूर आणि मैकलच्या टेकड्या आहेत. नर्मदा नदी ही विंध्यच्या रांगा आणि सातपुडा पर्वत यांच्या दरम्यान वाहणारी पश्चिमवाहिनी नदी अरबी समुद्रास मिळते.

२. **दख्खनचे पठार :** दख्खनचे पठार भूपटलभ्रंशामुळे छोटा नागपूर पठारापासूए भिन्न स्वरूपाने निर्माण झालेले आहे. लाव्हारसापासून दख्खनच्या पठाराची निर्मिती झालेली असल्याने तेथे काळी मृदा तयार झालेली आहे. हे पठारा डेक्कन ट्रॅप म्हणून ओळखले जाते. कापूस आणि ऊस पिकांसाठी ही मृदा उत्तम समजली जाते.

दख्खनच्या पठाराचे प्रामुख्याने दोन विभाग पाडता येतात.

अ) पश्चिम घाट

ब) पूर्व घाट

**अ) पश्चिम घाट :** नकाशा क्र. ९.६ निरिक्षण केल्यानंतर असे लक्षात येईल की पश्चिम घाट किंवा सह्याद्रीच्या रांगा दख्खनच्या पठाराच्या पश्चिमेस आहेत. पश्चिम घाट देशाच्या पश्चिम किनारपट्टीस जवळजवळ समांतर आहे. याची लांबी सर्वसाधारणपणे १६00 कि. मी. असून त्याची सरासरी उंची सुमारे १000 मीटर आहे. पश्चिम घाटातील अनाईमुडी (२६९५ मीटर) हे सर्वाधिक उंचीचे शिखर आहे. पश्चिम घाट सलग असला तरी काही ठिकाणी कमी उंचीचा भाग पालघाट, थळ घाट, बोर घाट यामधून घाट पश्चिम ओलांडता येतो. गोदावरी, भीमा, कृष्णा याच घाटात उगम पावून पूर्वेकडे वाहतात. तापी नदी मात्र पश्चिमवाहिनी आहे. नद्यांच्या प्रवाहामध्ये अनेक धबधबे आहेत. शरावती नदीवर जोग धबधबा तर कावेरी नदीवर शिवसमुद्र धबधबा आहे.

**बा) पूर्व घाट :** पूर्वघाट हा खंडित आणि कमी उंचीचा आहे. साधारणपणे याची सरासरी उंची ६00 मीटर दरम्यान आहे. हा पूर्व किनाऱ्यास समांतर असून याची सुरूवात महानदीपासून होते तर निलगिरी पर्वतात शेवट होतो. महेंद्रगिरी (१५0१ मी) हे येथील सर्वोच्च शिखर आहे. महेंद्रगिरी टेकड्या, निमाईगिरी टेकड्या या ओरिसामध्ये आहेत तर नल्लामल्ला टेकड्या दक्षिण आंध्र प्रदेशात आहेत. कोल्लीमलाई आणि पंचमलाई या तामिळनाडूमध्ये आहेत. महानदी, गोदावरी, कृष्णा, कावेरी या येथील नद्या आहेत. दक्षिणेस निलगिरीच्या टेकड्या पश्चिम व पूर्व घाटाला जोडलेल्या आहेत.

## अभ्यास ९.२

पश्चिमघाट व पूर्व घाट यामधील फरकाचे पाच मुद्दे लिहा.

| | | |
|---|---|---|
| १. सलगता | | |
| २. सरासरी उंची | | |
| ३. विस्तार | | |
| ४. सर्वाधिक उंचीचे शिखर | | |
| ५. नद्या | | |

### ४. भारतीय वाळवंट :

अरवलीच्या रागांच्या पश्चिमेस भारतीय वाळवंट आहे. याला थरचे वाळवंट म्हणून ओळखले जाते. हे जगातील नवव्या क्रमांकाचे वाळवंट समजले जाते. या वाळवंटाने गुजरात, राजस्थानचा भाग व्यापलेला आहे. हा निमओसाड प्रदेश आहे. वार्षिक पर्जन्याचे सरासरी प्रमाण १५० मि. मी. असते. या प्रदेशात काटेरी वनस्पती आढळतात. लुनी ही येथील प्रमुख नदी असून पावसाळा सोडला तर अनेक प्रवाह वाळूमध्ये लुप्त होतात.



**आकृती ९.७ : भारतीय वाळवंट**

**मी थरचे वाळवंट "भारतीय वाळवंट"**

१. मी वर्षभर शुष्क असतो. बाष्पयुक्त वारे अरवलीच्या बाजूने जातात त्यामुळे माझ्याकडे पाऊस कमी मिळतो.

२. निवडुंग आणि काटेरी झुडपे माझ्यावर आहेत.

३. तुम्हाला जर तहान लागली तर अनेक कि. मी. चा प्रवास करून ओयासिस (हिरवळीच्या जागा) पर्यंत पोहचावे लागेल.

४. वाळूच्या टेकड्या माझ्या सौंदर्यात भर टाकतात.

५. माझी माणसे संस्कृती आणि परंपरांचे जतन करीत आहेत.

## ५. किनारपट्टीवरील मैदाने :

भारतीय किनारपट्टीवरील मैदाने ही द्वीपकल्पीय पठारालगत असून अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावर आहेत. अरबी समुद्र किनाऱ्यावर सुमारे १०/२० कि. मी. ची अरूंद किनारपट्टी आहे. कच्छच्या रणपासून ते कन्याकुमारीपर्यंतचे क्षेत्र व्यापलेले आहे. पश्चिमकिनारपट्टीचे तीन भाग पडतात.

१. कोकण किनारपट्टी – मुंबई ते गोवा

२. कर्नाटकची किनारपट्टी – गोवा ते मंगलोर

३. मलबार किनारपट्टी – मंगलोर ते कन्याकुमारी

बंगालच्या उपसागराची किनारपट्टी पूर्व किनारपट्टी समजली जाते. पश्चिम किनारपट्टीपेक्षा ही रूंद आहे. तिची सरासरी रूंदी १२० कि. मी. आहे. या किनारपट्टीचा उत्तरेकडील प्रदेश उत्तर सरकार म्हणून ओळखला जातो. तर दक्षिणेचा किनारा कोरोमंडल किनारा म्हणून ओळखला जातो. पूर्व किनारपट्टीवर महानदी, गोदावरी, कृष्णा आणि कावेरी या नद्यांनी त्रिभूज प्रदेश तयार केलेला आहे. महानदीच्या त्रिभुज प्रदेशाच्या दक्षिणेस चिल्का हे भारतातील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर ओरिसामध्ये आहे. किनारी प्रदेश हा मसाल्याचे पदार्थ, भात, नारळ, मिरी इ. च्या उत्पादनाचा प्रदेश आहे. या प्रदेशात त्याचा व्यापार चालतो. किनाऱ्यावर मच्छिमारांच्या वस्त्या असून मत्स्य व्यवसाय चालतो. मलबारच्या किनाऱ्यावर वेम्बनाड हे सरोवर आहेत.

## ६. बेटे :

भारतीय बेटांचे दोन समुह आहेत. बंगालच्या उपसागरातील अंदमान निकोबारची २०४ बेटे आहेत. तर अरबी समुद्रामध्ये ४३ बेटांचा समुह लक्षद्वीप म्हणून ओळखला जातो. अंदमान आणि निकोबार बेटे उत्तर दक्षिण पसरलेली आहेत. ती बेटे आकाराने मोठी आहेत. अंदमान बेटावर बॅरन हा जीवंत ज्वालामुखी आहे. लक्षद्वीप बेटे मलबार किनाऱ्याजवळ केरळच्या किनाऱ्यावर अरबी समुद्रामध्ये आहेत. त्याचे क्षेत्रफळ ३२ चौ. कि. मी. असून लक्षद्वीपची राजधानी कवारती येथे आहे. या बेटांची निर्मिती प्रवाळ खडकापासून झालेली असून वनस्पती व प्राणी वैविध्य आढळते. ही बेटे पर्य टकांचे आकर्षण आहे. विविध जलक्रिडा प्रकार येथे चालतात.

### पाठावरील प्रश्न ९.४

**१. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (फक्त दोन वाक्ये)**

१. दख्खनच्या पठाराची निर्मिती कशाप्रकारे झाली?

२. किनारपट्टीवरील कोणतेही दोन व्यवसाय नमूद करा.

३. अंदमान निकोबार बेटे पर्यटकांचे आकर्षण का आहे ?

४. पश्चिमेकडील मैदानाच्या निर्मितीस कारण ठरलेल्या नद्यांची नावे लिहा.

## ९.४ भारतीय जलप्रणाली ः

नदीच्या मुख्य प्रवाहात एकत्र येणाऱ्या भूपृष्टीय प्रवाहास जलप्रणाली म्हणतात. मुख्य नदी आणि तिच्या उपनद्या मिळून नदीचे खोरे ओळखले जाते. जलप्रणालीवर विविध घटकांचा परिणाम होतो. प्रदेशाचा उतार, खडकांची रचना, पाण्याचे प्रमाण, पाण्याचा वेग इ. घटकांचा परिणाम होतो. नदीच्या प्रवाहामुळे अनेक कार्य घडतात. नदी प्रवाहाबरोबर गाळाचे वहन होते. नैसर्गिक जलसिंचन होते तसेच भूगर्भजल पातळी राखली जाते. पारंपारिकरित्या पाणीपुरवठा, वाहतूक ही नदीची प्रमुख कार्ये होत. अलिकडच्या काळात नद्यांचा उपयोग जलविद्युत निर्मिती आणि उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा करणे यासाठी नद्यांचे महत्त्व वाढलेले आहे. नद्या या पर्यटकांचे आकर्षण असून बोटिंग करणे, जलक्रीडा प्रकार यासाठी नद्यांचा उपयोग होत आहे. मानवी जीवनाच्या दृष्टीने नद्यांना महत्त्व असल्यानेच, नद्यांना जीवनरेषा म्हणून ओळखले जाते. नदीच्या तीरावरच अनेक मोठी शहरे वसलेली असून तेथे दाट लोकवस्ती स्थापन झालेली आहे. यमुनेच्या तिरावर दिल्ली हे शहर आहे तर गंगेच्या तीरावर पाटणा शहर आहे आणि ब्रह्मपुत्रेच्या तीरावर गुवाहटी शहर आहे. गोदावरीच्या तीरावर नाशिक तसेच महानदीच्या तीरावर कटक शहर आहे हे आकृती क्र. ९. ८ वरून लक्षात येईल.

भारतीय नद्यांचे उगमावरून दोन प्रकारात वर्गीकरण करता येईल.

अ) हिमालयात उगम पावणाऱ्या नद्या

ब) द्वीपकल्पीय पठारावर उगम पावणाऱ्या नद्या

**उपनदी :** मुख्य नदीच्या प्रवाहास मिळणारी नदी उदा. यमुना

**त्रिभूज प्रदेश :** नदीच्या मुखाशी गाळ, रेती, माती, खडकाचे तुकडे यांच्या त्रिकोणाकृती संचयनास त्रिभूज प्रदेश म्हणतात.

**खाडी :** नदीचे पाणी आणि भरती बरोबर येणारे समुद्राचे खारे पाणी समुद्र किनारपट्टीवर ज्या एका बंदिस्त ठिकाणी मिसळले जाते असा भूभाग.

उदा. नर्मदेची खाडी

## ९.५ प्रमुख जलप्रणाली :

आधी उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय जलप्रणालीचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. त्या जलप्रणालीची तुलना करू.

### हिमालयात उगम पावणाऱ्या नद्या :

१. या नद्या बारमाही वाहणाऱ्या असून त्यांचा उगम हिमनदीतून होतो.

२. नद्यांच्या खनन कार्यामुळे नद्यांनी दऱ्यांची निर्मिती केलेली आहे.

३. नद्या मैदानात प्रवेश करीत असल्याने जलसिंचनास उपयुक्त आहेत.

४. नद्या नागमोडी आकाराने वाहतात त्यामुळे त्या पात्र बदलतात.

### हिमालयीन जलप्रणाली :

हिमालयात उगम पावणाऱ्या बहुसंख्या नद्या बारमाही आहेत. म्हणजेच या नद्या वर्षभर वाहतात. याचे

कारण म्हणजे या नद्यांचे उगमस्थान हिमनद्या किंवा बर्फाच्छादित शिखराच्या ठिकाणी आहे. तसेच पावसापासूनही नद्यांना पाणीपुरवठा होतो.

**प्रमुख नद्या व उपनद्या ः**


१. **सिंधु नदी :** झेलम, रावी, बियास सतलज

२. **गंगा नदी :** यमुना, रामगंगा, घागरा, गोमती, गंडक आणि कोसी

३. **ब्रह्मपुत्रा :** दिबांग, लोहित, तीस्ता आणि मेघना

### ९.५.२. द्वीपकल्पीय पठारावरील नद्या ः

आपण द्वीपकल्पीय पठाराचा अभ्यास केलेलाच आहे. पठारावरील नद्या पूर्ववाहिन्या असून बंगालच्या उपसागरास जावून मिळतात. नर्मदा आणि तापी नद्या पश्चिमघाटाच्या पश्चिमेकडे वाहतात. नद्यांच्या पात्रामध्ये धवधवे असल्याने जलविद्युत निर्मितीसाठी उत्तम स्थान आहे. महानदी, गोदावरी, कृष्णा आणि कावेरी या पठारावरील प्रमुख नद्या आहेत.




**आकृती ९.८ : भारतातील प्रमुख नदया**

## अभ्यास ९.३

**भारताच्या प्राकृतिक आणि राजकीय नकाशामध्ये पहा आणि पुढील चार मुद्यांची उत्तरे शोधा.**

| नदी | प्रमुख उपनदी | उगमस्थान | कोणत्या राज्यातून वाहते | कोठे मिळते |
|---|---|---|---|---|
| गंगा | | | | |
| ब्रह्मपुत्रा | | | | |
| सिंधु | | | | |
| सतलज | | | | |
| कावेरी | | | | |
| गोदावरी | | | | |
| कृष्णा | | | | |

## अभ्यास ९.४

नकाशा संग्रहातील नकाशातून निरिक्षण करून प्राकृतिक नकाशात गंगेच्या तीरावरील शहरांचे स्थान दाखवा.

## ९.६ नद्या स्वच्छ ठेवा :

पृथ्वीवरील ९७% पाणी क्षारमिश्रीत आहे हे तुम्हास माहीत आहे काय? ३% पाणी बर्फाच्या स्वरूपात आहे. उरलेले १ टक्के पेक्षाही कमी पाणी नद्या, सरोवर, भूगर्भजल या स्वरूपात आहे. हेच पाणी जगाच्या पाण्याची गरज भागविते म्हणूनच हे पाणी मौल्यवान आहे आणि त्यासाठी नद्या आणि सरोवर प्रदुषणापासून वाचविण्यासाठी धोक्याची घंटा आहे.

शहरे, खेडी किंवा इतरत्र नदी वाहताना आपण पाहिलेल्या असतील. भारत हा नद्यांच्या संख्येत जगातील प्रमुख देश आहे. लाखो लोक नद्यांच्या तीरावर राहतात. या नद्यांचे चार भागात वर्गीकरण करता येते.

१. हिमालयातील उगमपावणाऱ्या नद्या बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत. या नद्या वर्षभर कधीही कोरड्या पडत नाहीत.

२. दख्खनच्या पठारावरील पर्जन्यावर अवलंबून असणाऱ्या नद्या.

३. प्रामुख्याने पश्चिम किनारपट्टीवरील अखूड आणि वर्षभर न वाहणाऱ्या हंगामी नद्या.

४. राजस्थानच्या पश्चिम भागातील पावसावर अवलंबून असणाऱ्या, वाळवंटात व खाऱ्या सरोवरात लुप्त होणाऱ्या नद्या.

## नद्यांमुळे एखाद्या ठिकाणाला आलेले महत्त्व व जीवनपद्धती :

अनेक शहरे नद्यांच्या तीरावर वसलेली असून नद्यांना धार्मिक महत्त्व वाढलेले आहे. गंगा आणि यमुना या नद्या लाखोंचे श्रद्धा स्थान झालेले आहे. या नद्यांतून पर्यावरणाला घातक असणारे पदार्थ वाहून आणल्याने नद्यांची परिस्थिती भयावह झालेली आहे. जवळपास ७०% जलप्रदुषण सांडपाण्याच्या स्वरूपात भारतीय नद्यांच्या मार्गातून होते. जैविक आणि रासायनिक प्रदुषके प्रवाहाच्या वरच्या भागात मिसळतात व त्याच पाण्याचा वापर पिण्यासाठी त्याखालील लोक करतात. त्यामधून आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. शहरी लोक या नद्यांकडे हताशपणे पाहतात. देशाची राजधानी नवी दिल्ली यमुनेच्या तीरी असून यमुनेच्या प्रवाहातील काळपट प्रदुषित पाणी हे उदाहरण पुरेसे आहेच.

आपापल्या प्रदेशातून वाहणाऱ्या नदीचे पाणी प्रदुषण रहित वाहणे आवश्यक आहे. परिस्थितीकी विज्ञान अभ्यासक आणि संवर्धनशास्त्रज्ञ यांचा नद्यांच्या स्वच्छतेचा सातत्याने आग्रह आहे. शासनाकडून गंगा कृती योजना (GAP) राष्ट्रीय नद्या संरक्षण योजना (National river conservation plan) यांच्या प्रयत्नातून नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता सुधारणा होईल अशी आशा आहे. जलपुनर्भरण योजनेस उत्तम प्रतिसाद मिळत असून मान्सूनच्या काळात नदीपात्रास पुन्हा चांगले दिवस येतील. अनेक व्यक्ती आणि सामाजिक संस्थांच्या पुढाकाराने प्रदुषित नद्यांबाबत जागृती निर्माण करून या संवेदनील विषयांबाबत सहभाग घेतील.

### अभ्यास ९.५

१. आपल्या परिसरातील पाण्याचे नैसर्गिक स्रोत शोधा व तेथे चालणाऱ्या कार्याचे निरीक्षण करा.

२. नदीच्या प्रदुषणास कारणीभूत ठरणारे कोणते व्यवसाय चालतात?

३. स्थानिक प्रशासनाला तुम्ही आणि तुमच्या मित्रांनी नदी प्रदूषण उपाय सूचविणारे पत्र लिहा. त्यासाठी कोणत्या मदतीची आवश्यक आहे. तेही सूचित करा.

४. जलप्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाय आहेत. जल प्रदुषण थांबविण्याचे उपाय सूचवा.

### पाठावरील प्रश्न ९.५

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. ज्स्रूेम्घरत्रऋगंगेला उत्तर दिशेकडून मिळणाऱ्या दोन उपनद्यांची नावे लिहा.

२. महानदीच्या जवळ असणारे सरोवर कोणते?

३. गोदावरी ज्या राज्यांतून वाहते त्यांची नावे लिहा.

४. तुंगभद्रेची उपनदी कोणती?

## आपण काय शिकलो ?

- ❖ भारताचे स्थान ८°४2 उत्तर अक्षवृत्त ते ३७°६६2 उत्तर अक्षरवृत्त आणि ६८°७2 पूर्व ते ९७°२५2 पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. भारताची भूसीमा १५,२00 कि. मी. लांबीची आहे तर देशाला ६१00 कि. मी. लांबीचा किनारा लाभलेला आहे. भारताने ३.२८ दशलक्ष चौ. कि. मी. क्षेत्रफळाची भूमी व्यापलेली आहे.

- ❖ भारताचे सहा प्रमुख प्राकृतिक विभाग पाडले जातात. उत्तरेकडील पर्वतीयप्रदेश, उत्तरेकडील मैदान, द्वीपकल्पीय पठार, भारतीय वाळवंट, किनारपट्टीची मैदाने आणि बेटे.

- ❖ हिमालयाच्या समांतर अशा तीन रांगा आहेत. बृहद हिमालय किंवा हिमाद्री, मध्यहिमालय किंवा हिमाचल प्रदेश, बाह्य हिमालय किंवा शिवालिक रांगा.

- ❖ उत्तरेकडील मैदानांमध्ये पंजाब, हरीयाना, उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिमबंगाल या राज्यांचा समावेश होतो. येथील मृदा अत्यंत सुपिक आहे. येथे विविध पिके चांगली येतात.

- ❖ द्वीपकल्पीय पठार अरवलीच्या रांगांपासून भारताच्या दक्षिण टोकापर्यंत पसरलेले आहे. हा सर्व भाग सपाट व अतिप्राचीन असून येथे रूपांतरित खडक आढळतात.

- ❖ भारतीय वाळवंट राजस्थान व गुजरात राज्यात आहे. येथील हवामान शुष्क व निमशुष्क स्वरूपाचे आहे.

- ❖ किनारपट्टीवरील मैदाने ही अरबी समुद्र व बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावर आहेत. पश्चिमकिनारपट्टीवरील मैदान आणि पूर्व किनारपट्टीवरील मैदान म्हणून हा प्रदेश ओळखला जातो.

- ❖ भारतीय बेटे दोन भागात आहेत. बंगालच्या उपसागरामध्ये २0४ बेटे असून त्यांना अंदमानंनिकोबारची बेटे म्हणून ओळखतात. अरबी समुद्रामध्ये ४३ बेटे आहेत. ही लक्षद्वीप बेटे म्हणून ओळखली जातात.

- ❖ भारतीय नद्यांचे दोन भागात वर्गीकरण केले जाते. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्या व द्वीपकल्पीय क्षेत्रामधील नद्या, हिमालयीन प्रमुख नद्या म्हणजे सिंधु, गंगा आणि ब्रह्मपुत्रा द्वीपकल्पीय पठारावरील नर्मदा, तापी, गोदावरी, कृष्णा, कावेरी आणि महानदी.

## सत्रांत अभ्यास

१. भारताचे स्थान आणि विस्तार स्पष्ट करा.

२. भारतीय वाळव

टाच्या तीन वैशिष्ट्यांचे वर्णन करा.

३. हिमालयाच्या तीन रागांची माहिती प्रत्येकी दोन मुद्यांच्या सहाय्याने लिहा.

४. कोणत्याही चार फरकांच्या मुद्यांनी हिमालयातील नद्या आणि द्वीपकल्पीन नद्यांची माहिती लिहा.

५. कारणे लिहा.

१. उत्तरेकडील मैदान सुपिक गाळाचे आहे.

२. भारतीय वाळवंटामध्ये नैसर्गिक वनस्पतींचे अच्छादन आहे.

**प्रकल्प ः**

❖ तुमच्या परिसरात भेट देणाऱ्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका तयार करा.

❖ परीसरातील वैशिष्ट्यपूर्ण प्राकृतिक रचना आणि मानवी वैशिष्ट्ये

❖ प्राकृतिक घटकातील, हवामान, भूमिस्वरूप, वनस्पती, प्राणी आणि मानवी घटकातील व्यावसायिक संधी, आर्थिक व्यवसाय, करमणुकीची ठिकाणे, स्थानिक भाषा आणि लोकांचा आहार.

❖ मार्गदर्शक पुस्तीकेमध्ये, छायाचित्रे, चित्रे तसेच तुम्हास महत्त्व वाटत असणाऱ्या वैशिष्ट्यांचा त्यामध्ये समावेश असावा.

## पाठावरील प्रश्नांची उत्तरे

**९.१**

१. अ) बांगला देश आणि म्यानमार

ब) बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्र

क) श्रीलंका

**९.२**

१. अ) केरळ, तमिळनाडू

ब) जम्मू आणि काश्मिर, अरुणाचल प्रदेश

क) नेपाळ, भूतान

ड) दमन आणि दीव, दादरा नगर हवेली.

**९.३**

१. हिमालय आणि अरुणाचलप्रदेश, शिवालिकरांगा

२. अ) जम्मू आणि काश्मिर

ब) (अ) नाही

(ब) नाही

(क) होय

३. भारत, नेपाळ, भूतान

४. पतकोई, मिझो टेकड्या

**९.४**

१. लाव्हारसापासून निर्मिती

२. १. शेती २. मासेमारी ३. व्यापार (कोणतेही दोन)

३. कारण बेटांवर पर्यटन व्यवसाय, जलक्रीडा

४. सतलज, बीयास, रावी नद्या


**९.५**

१. गंडक, कोसी

२. चिल्का

३. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि छत्तीसगड

४. कृष्णा






# १०

# हवामान

पालकांच्या सोबत सिमला या थंड हवेच्या ठिकाणी सहल जाण्याचे ऐकून मोना आणि राजू यांना आनंदच झाला. प्रवासाचे कपडे भरणे चालू होते तेव्हा आई म्हणाली लोकरीचे पण काही कपडे भरा. दक्षिण भागातील तामिळनाडूची राजधानी चेन्नई येथे ते रहात होते. चेन्नईमधील मे महिना म्हणजे अतिशय उष्ण. भारतातील हा मान्सूनचा काळ असला तरी सिमला हे थंड हवेचे ठिकाण आहे. त्यांच्या मनात अनेक प्रश्न येत होते. हवा म्हणजे काय? हवा आणि हवामानात फरक काय आहे? भारतात हवामानाचे विविध प्रकार का आढळतात? या सर्व प्रश्नांची उत्तरे सदरच्या पाठामध्ये मिळविणार आहोत.



## उद्दिष्टे :

सोबतच्या पाठ्य अभ्यासानंतर पुढील क्षमता प्राप्त होतील.

- ❖ भारतीय हवामानावर परिणाम करणाऱ्या घटकांची यादी
- ❖ मान्सूनची प्रक्रीया आणि त्याच्या वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण
- ❖ मान्सूनचे चक्र आणि त्याच्या विशेषत्त्वाची माहिती
- ❖ भारतातील पर्जन्याच्या वितरणाचे वर्णन
- ❖ आपले सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन मान्सून चक्रावर कसे अवलंबून आहे याची चिकित्सा
- ❖ संपूर्ण पृथ्वीवरील पर्यावरणात होत असलेले बदल आणि भारतीय हवामानावर होणाऱ्या परिणामाचे स्पष्टीकरण

## १०.१ भारतीय हवामानावर परिणाम करणारे घटक :

मोना आणि राजू पालकांबरोबर रेल्वेतून प्रवास करीत असताना हवा आणि हवामानातील फरक पालकांना विचारतात. गाडीत इतर प्रवाशांमध्ये सौ. रुपा या शिक्षिका होत्या त्या हवामानाबद्दल माहिती देतात. हवामान ही संकल्पना विस्तृत क्षेत्र किंवा देशाशी संबंधित असून ती सर्वसाधारण आहे. त्यामध्ये बदल होत नाही. उदा. भारताचे हवामान मान्सून प्रकारचे आहे. एखाद्या

शहरातील, खेड्यातील किंवा एका छोट्या प्रदेशात सकाळी पाऊस, दुपारी लख्ख ऊन असा बदल होत असतो. सिमल्यापर्यंतच्या प्रवासात हवा कशी कशी बदलते याचे निरीक्षण करण्यास सौ. रुपानी सांगितले आणि त्याचा अनुभवही आला. दक्षिणेकडील हवा उष्ण आणि आर्द्र स्वरूपाची आहे तर जसजसे उत्तरेकडील मैदानात जावू तसतशी हवा उष्ण आणि कोरडी होत गेली आणि सिमल्याजवळ मात्र थंड होत असताना जाणवले. असे का होत असते हे मुलांनी विचारले. हवामानावर किंवा हवेवर विविध घटकांचा परिणाम होतो असे शिक्षिकेने सांग्मितले.

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

**हवामान :** हवेच्या अंगांचे ३० वर्षे किंवा अधिक वर्षांचे निरीक्षण करून काढलेले अनुमान म्हणजे हवामान होय. तर हवा म्हणजे हवेची अल्पकालीन, छोट्या क्षेत्रातील हवेच्या अंगाची स्थिती होय. ऋतुंच्या निर्मितीमध्ये हवेची दीर्घकालीन स्थिती महत्त्वाची असते.

### १०.१.१ भारतीय हवामानावर परिणाम करणारे घटक ः

१. **स्थान :** विषुववृत्तापासून कमी अंतर असणाऱ्या ठिकाणी तापमान अधिक असते. विषुववृत्तापासून ध्रुवाकडे जावे तसतसे तापमान कर्मीकमी होत जाते. भारताचे स्थान विषुववृत्ताच्या उत्तरेस ८°४2 अक्षवृत्त असून २३$\frac{१}{२}^{0}$ उत्तर अक्षवृत्त म्हणजे कर्कवृत्त भारताच्या मध्यातून जाते. म्हणजेच कर्कवृत्ताच्या दक्षिणेकडे उष्ण हवामान असते तर त्याच्या उत्तरेस उपोष्ण हवामान असते. उदा. आंध्रप्रदेश हे हरयानापेक्षा उष्ण आहे. म्हणजेच कर्कवृत्ताच्या दक्षिणेस सौर ऊर्जा अधिक मिळते तर त्याच्या उत्तरेस कमी प्रमाणात मिळते.

२. **समुद्रापासून अंतर :** दक्षिण भारतातील निम्म्या प्रदेशाच्या सभोवताली तीन बाजूंनी पाणी आहे. पश्चिमेस अरबी समुद्र पूर्वेस बंगालचा उपसागर आणि दक्षिणेस हिन्दी महासागर आहे. त्यामुळे या प्रदेशात उन्हाळे आणि हिवाळे देखील तीव्र नसतात. उत्तरभारत हा सागरी किनाऱ्यापासून दूर आहे. त्यामुळे उन्हाळे आणि हिवाळ्यांची तीव्रता अधिक आहे मात्र दक्षिण भारतातील हवा मात्र सम आढळते. टेबल क्र. १०.१ चे निरीक्षण करून तापमान आणि पर्जन्य स्थिती पहा.

३. **प्रदेशाची उंची :** म्हणजेच समुद्रसपाटीपासूनच्या उंची नुसार हवेच्या घनतेत तसेच तापमानात घट होत जाते. सिमल्याचे स्थान उंचावर आहे म्हणून तेथे थंड हवा आहे. लुधीयाना हे मैदानावर आहे त्यामुळे तेथील हवा उष्ण आहे.

४. **पर्वतरांगा :** हवामानावर पर्वतरागांचा परिणाम मोठ्या प्रमाणात होतो. हिमालयाच्या रांगा भारताच्या उत्तरेस असून त्यांची सरासरी उंची ६००० मी. दरम्यान आहे. त्यामुळे मध्यआशियातून येणाऱ्या थंड वाऱ्यापासून बचाव होतो. तसेच नैऋत्यमोसमी वाऱ्यांना अडथळा झाल्याने

भारतात पाऊस पडतो. तसेच पश्चिमघाटामुळे बाष्पयुक्तवारे आडविले जातात. त्यामुळे पश्चिमघटाच्या पश्चिमेकडे खूप पाऊस पडतो.

५. **भूपृष्टीय वाऱ्याची दिशा :** भारतीय हवामानावर वाऱ्यांचा परिणाम होतो. मान्सून वारे, खारे व मतलई वारे आणि स्थानिक वाऱ्यांचा परिणाम होतो. हिवाळ्यात वारे भूभागाकडून सागरी भागाकडे वाहतात ते थंड आणि कोरडे असतात. तर उन्हाळ्यात सागराकडून भूभागाकडे वाहणाऱ्या वाऱ्यामध्ये बाष्पाचे प्रमाण अधिक असते त्यामुळे देशभर पाऊस मिळतो.

६. **वातावरणाच्या वरच्या थरातील हवेचे प्रवाह :** भारतीय हवामानावर भूपृष्टीय वाऱ्याबरोबरच वातावरणाच्या वरच्या थरातून वाहणाऱ्या जेट प्रवाहाचा परिणाम होतो. समुद्रसपाटीपासून १२००० मीटर उंचीवरून परंतु हे वेगाने वाहणारे वारे असतात. त्याचा परिणाम पश्चिमेकडील आवर्ताच्या स्थितीवर होतो. भूमध्य सागरावरील आवर्त पूर्वेकडे सरकत असतात. त्यामध्ये इराणच्या आखाती भागातून प्रवास करताना त्यामध्ये बाष्प मिसळले जाते व त्यातूनच हिवाळ्यामध्ये वायव्य भारतात पाऊस पडतो. जेट प्रवाहांचे स्थान उन्हाळ्यात उत्तरेकडेमध्ये आशियात सरकते व त्यातूनच मान्सूनची सुरुवात होते.


## कार्य १०.१

**लेन, चेन्नई या ठिकाणाचे तापमान (T) पर्जन्य (R) अम्हे. दर्शविलेले आहे.**

| ठिकाण | | महिने | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जा. | फे. | मा. | ए. | मे | जू. | जु. | ऑ. | स. | ऑ. | नो. | डि. |
| लेह | T | ८ | ७ | १ | ९ | १० | १४ | १७ | १७ | १२ | ६ | ० | ६ |
| | R | १० | ८ | ८ | ५ | ५ | ५ | १३ | १३ | ८ | ५ | ० | ५ |
| चेन्नई | T | २५ | २६ | २८ | ३१ | ३३ | ३३ | ३१ | ३१ | ३० | २० | २६ | २५ |
| | R | ४ | १३ | १३ | १८ | ३८ | ४५ | ८७ | ११३ | ११९ | ३०६ | ३५० | १३५ |

१. दोन्ही ठिकाणाच्या वार्षिक तापमान कक्षा लिहा.

२. दोन्ही ठिकाणच्या सर्वाधिक पर्जन्याचा महिना कोणता?




आकृती १०.१

## पाठावरील प्रश्न १०.१

**सोबतच्या नकाशाचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) भारताचे दोन स्वतंत्र औष्णिक विभाग करणारे व देशाच्या मध्यातून जाणारे अक्षवृत्त कोणते? हे अक्षवृत्त किती अंशाचे आहे?

ब) सागरी सानिध्य लाभलेली दोन शहरे व सागरी सानिध्य न लाभलेल्या दोन शहरांची नावे लिहा.

क) मध्य आशियातील थंड वाऱ्यांपासून कोणत्या पर्वतरांगांमुळे देशाचे रक्षण होतो?

ड) वाऱ्यांच्या दिशाचे निरीक्षण करून भारतातील हिवाळे कोरडे का असतात याचे कारण लिहा.

पाच दिवसांनंतर मोना आणि राजू सिमल्यावरून परत आले. या दिवसांचा अनुभव मित्रांना सांगताना खूप आनंद झाला. काही दिवसातच त्यांनी मान्सून वेळेवरच येणार अशी वर्तमानपत्रात बातमी वाचली. मान्सून म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर शिक्षकांकडून मिळविण्याची वाट पहात होते.







## १०.२ मान्सूनचे चक्र ः

मान्सून हा पारिभाषिक शब्द अरबी भाषेतील "मौसम" या शब्दावरून आलेला आहे. मान्सून म्हणजे ऋतू. वर्षातील ऋतुपरत्त्वे बदलणाऱ्या वाऱ्याची दिशा म्हणजे मान्सून. उन्हाळ्यात उत्तर भारतातील राजस्थान, पंजाब, हरीयाना, पश्चिम उत्तर प्रदेशात तापमान खूप असते काही ठिकाणी तर ४५° ते ४७° से. पर्यंत असते. टेबल १०. १ वरून भारतातील हवामानातील विविधता लक्षात येईल. भारतातील काही ठिकाणच्या तापमानात कशी विविधता आहे ते लक्षात घ्या.


**टेबल क्र. १०. १ भारतातील काही ठिकाणचे तापमान (अंश से) आणि पर्जन्य (से. मी.)**

| | | महिने | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जा. | फे. | मा. | ए. | मे | जू. | जु. | ऑ. | स. | ऑ. | नो. | डि. |
| लेह | तापमान | ‘ ८ | ‘ ७ | ‘ १ | ९ | १० | १४ | १७ | १७ | १२ | ६ | ० | ‘ ६ |
| | पर्जन्य | १० | ८ | १६ | ५ | ५ | ५ | १३ | १३ | ८ | ५ | ० | ५ |
| शिलाँग | तापमान | १० | ११ | ५६ | १९ | १९ | २१ | २१ | २१ | २० | १७ | १३ | १० |
| | पर्जन्य | १४ | २९ | २३ | १४६ | २९५ | ४७६ | ३५९ | ३४३ | ३०२ | १८८ | ३६ | १० |
| दिल्ली | तापमान | १४ | १७ | १३ | २९ | ३४ | ३५ | ३१ | ३० | २९ | २१ | २० | १५ |
| | पर्जन्य | २१ | २४ | २५ | १० | १० | ६८ | १८६ | १७० | १२५ | १४ | २ | ९ |
| जैसलमेर | तापमान | १६ | २० | ०.३ | ३० | ३३ | ३४ | ३२ | ३१ | ३० | २८ | २२ | १७ |
| | पर्जन्य | ०.२ | ०.१ | २४ | ०.१ | ०.५ | ०.७ | ०.९ | ८६ | १४ | ०१ | ०.५ | ०.२ |
| मुंबई | तापमान | २४ | २४ | २४ | २८ | ३० | २९ | २७ | २७ | २७ | २८ | २७ | २५ |
| | पर्जन्य | ४ | २ | २ | २ | १८ | ४६५ | ६१३ | ३२९ | २८६ | ६५ | १८ | २ |
| चेन्नई | तापमान | २५ | २६ | २८ | ३१ | ३३ | ३३ | ३१ | ३१ | ३० | २८ | २६ | २५ |
| | पर्जन्य | ४ | १३ | १३ | १८ | ३८ | ४५ | ८७ | ११३ | ११९ | ३०६ | ३५० | १३५ |
| तीरुअनंत पूरम | तापमान | २७ | २७ | २८ | २९ | २९ | २७ | २६ | २६ | २७ | २७ | २७ | २७ |
| | पर्जन्य | २३ | २१ | ३९ | १०६ | २०८ | ३५६ | २२३ | १४६ | १३८ | २७३ | २०६ | ७५ |

### तुम्हास हे माहित आहे का ?

- ❖ हवेला वजन असते आणि त्याचा दाब आपणावर पडतो. हवेचा दाब म्हणजे काय?
- ❖ तापमान आणि हवेचा भार यांचा संबंध आहे. एखाद्या प्रदेशामध्ये तापमान अधिक असेल तर हवेचा दाब कमी असतो आणि तापमान कमी असले तर हवेचा दाब अधिक असतो.
- ❖ हवेच्या दाबाच्या तफावतीवर वारा अवलंबून असतो.


मे महिन्यातील दिल्ली आणि जोधपूर येथील सरासरी तापमान ३३° से. पेक्षाही अधिक असते. या जास्त तापमानाामुळे तेथील भूपृष्ठ तापते त्यालगतची हवा तापते व तापलेली उष्ण हवा वर जाते त्यामुळे तेथे हवेचा कमी दाब प्रदेश तयार होतो. यालाच मान्सून द्रोणी असे म्हणतात ही द्रोणी पश्चिमेकडील जैसलमेर पासून पूर्वेकडे ओरिसामधील बलसोर पर्यंत असते.




**आकृती १०.२ : मे महिन्यातील तापमान**

याउलट हिन्दीमहासागरावर तापमान कमी असते. तेथील पाण्याचे तापमान वाढण्यासाठी भूभागापेक्षा जास्त उष्णता आवश्यक असते, त्यामुळे तेथे हवेचा जास्त दाब तयार होतो. (नकाशा क्र. १०.२ पहा) आणि पुढील स्थिती लक्षात घ्या.

उत्तर भारतातील तापमान आणि हवेच्या दाबाची स्थिती आणि हिंदी महासागरीय स्थिती यामध्ये तफावत आढळते. हिंदी महासागरावरील हवेच्या जास्त दाबाकडून उत्तरेकडील कमी दाबाच्या हवेच्या क्षेत्राकडे वारा वाहू लागतो. साधारणपणे जून महिन्याच्या मध्यापासून ते विषुववृत्तीय हिंदीमहासागरावरील क्षेत्राकडून भारतीय उपखंडाकडे नैऋत्येकडून ईशान्येकडे वारे वाहू लागतात. या वाऱ्यांची दिशा व्यापारी वाऱ्याच्या दिशेच्या (ईशान्य ते नैऋत्य) बरोबर उलटी असते. हिवाळ्यातील वाऱ्याच्या दिशेच्या बरोबर उलट असते. यालाच मान्सून असे म्हणतात.




आकृती १०.३ : जून महिन्यातील तापमान

उबदार सागरावरून वाऱ्याची निर्मिती होते. त्यामुळे तेथील हवेत बाष्पाचे प्रमाण अधिक असते. हे बाष्पयुक्त वारे भारतीय उपखंडाकडे वाहताना जवळजवळ देशभर त्यांपासून पाऊस मिळतो हा पर्जन्य जून ते सप्टेंबर काळात ८० ते ९०% पर्यंत याच चार महिन्याच्या काळात मिळतो.

## १०.२.१ मान्सूनची वैशिष्ट्ये :

१. मान्सून हे कायमस्वरूपी स्थीर वारे नाहीत. हवामानाच्या विविध घटनांचा त्यांच्यावर परिणाम होतो. उदा. प्रादेशिक हवामान स्थिती. काही वेळेस मान्सूनचे आगमन नेहमीच्या वेळेच्या आधी तर काही वेळेस खूप उशीरा आगमन होते.

२. मान्सूनच्या पर्जन्याचे सर्वत्र सारख्या प्रमाणात वितरण होत नाही. केरळ किनारपट्टी, पश्चिम बंगाल ओरिसा येथे खूप पाऊस पडतो तर हरीयाना मध्य प्रदेशमध्ये कमी प्रमाणात पाऊस पडतो.

३. मान्सूनचे आगमन प्रथम केरळमध्ये होते. आगमनाबरोबर मुसळधार पडतो तो काही काळ स्थिरावतो. त्यालाच मान्सून वर्षाव असे म्हणतात.

## १०.२ कार्य :

सोबतच्या चित्रांचे निरीक्षण करा आणि त्यावरील उत्तरे लिहा.



**आकृती १०. ४**

१. अ, ब, क चित्रांतील ऋतू ओळखा.

२. एकामागे एक घडणाऱ्या घटनाचा क्रम लावा.

३. तुम्हास कोणता ऋतू आवडतो आणि का? ३० शब्दांत उत्तर लिहा.

## पाठावरील प्रश्न १०.२

**नकाशा क्र. १०.२, १०.३ मधील मान्सूनची प्रगती आणि त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. हवेच्या कमी दाबाची राज्ये लिहा.

२. नैऋत्य मान्सूनचे आगमन प्रथम कोणत्या राज्यात होते?

३. बंगालच्या उपसागरामध्ये मान्सूनचे वारे केव्हा पोहचतात आणि त्यांची दिशा कोणती असते?

४. खालील चार शहरांच्या पर्जन्याचे निरिक्षण करा आणि मान्सूनचा सरासरी कालावधी शोधा.

अ) मुंबई    ब) दिल्ली    क) जैसलमेर    ड) शिलाँग

मोना आणि राजूच्या वडिलांची दिल्लीला बदली झाली. भारताच्या राजधानीत त्यांना राहायला मिळणार याचा आनंद झाला. ते सर्वजण दिल्लीला राहायला आले. नवीन घर, नवीन शाळा, नवीन मित्र आणि नवीन वातावरण, सर्व काही त्यांना नवीनच होते. पुस्तकांतच फक्त ऋतुंमध्ये बदल होतो हे वाचलेले होते. पण आता खरा अनुभव ते घेत होते. ऋतुंमध्ये कसा बदल होतो ते सदरच्या पाठामध्ये पाहता येईल.

## १०.३ ऋतु चक्र :

भारताच्या स्थानामुळे देशात विविध ऋतु आढळतात. भारतीय हवामानच्या विविध वैशिष्ट्यांची माहिती आता होईल. भारतात चार प्रमुख ऋतु आढळतात.

अ) हिवाळा ऋतु (डिसेंबर ते फेब्रुवारी)


ब) उन्हाळा ऋतु (मार्च ते मे)

क) मान्सून ऋतु (जून ते सप्टेंबर)

ड) मान्सूनचे पुनर्गमन (ऑक्टोबर ´ नोव्हेंबर)


**प्रत्येक ऋतूंची सविस्तर माहिती आपण पाहू.**

**अ)** **हिवाळा ऋतु :** या ऋतूचा कालावधी डिसेंबर ते फेब्रुवारी दरम्यान असतो. या काळात दक्षिणेकडून उत्तरेकडे तापमान कमीकमी होत जाते. डिसेंबर, जानेवारी हे जास्त थंडीचे महिने असून उत्तरेकडील हिवाळ्यातील सरासरी तापमान १२° ते १५° से. असते तर दक्षिणेस २५°




**आकृती १०.५ : जानेवारी महिन्यातील सरासरी तापमान**

टिपा




**आकृती १०.६ : म**


से. पर्यंत असते. उत्तरेस व वायव्येस हिमवर्षाव होतो. पश्चिमेकडील आवर्तांमुळे काही प्रमाणात येथे पाऊस पडतो. हिमालयाच्या उतारावर बर्फवृष्टी होते. ईशान्य व्यापारी वारे देशभर वाहू लागतात. त्यांची दिशा भूभागकडून सागरी भागाकडे असते त्यामुळे हा कोरडा ऋतु असतो. परंतु याच वाऱ्यापासून हिवाळ्यात तामिळनाडूच्या किनारपट्टीवर पाऊस पडतो, कारण बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्याचा प्रभाव असतो. इतरत्र मात्र देशभर हवा कोरडीच असते. उत्तरेकडे निरभ्र आकाश, कमी तापमान आणि कमी आर्द्रता अशी स्थिती असते. हिवाळी पावसाचा लाभ देशातील रबी हंगामातील पिकांना होतो.

ब) **उन्हाळा ऋतु :** फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस तापमानात वाढ होऊ लागते. त्यामुळे मार्च ते मे हा कालावधी उष्ण हवेचा समजला जातो. उत्तरेकडील मैदान, देशाचा पश्चिम भाग तसेच द्वीपकल्पीय पठाराच्या मध्यवर्ती भागात तापमान अधिक आढळते. उत्तरेकडील मैदानात लंबवर्तुळाकृती कमी दाबाचा प्रदेश निर्माण होतो. त्यास मान्सून द्रोणी म्हणतात. हा कमी दाबाचा प्रदेश राजस्थानमधील जैसलमेर ते झारखंड आणि पूर्वेकडे ओरिसापर्यंत असतो. विषुववृत्ताच्या दक्षिणेकडे हिंदी महासागरावर या काळात जास्त हवेच्या दाबाचा प्रदेश तयार होतो.

वायव्येकडील प्रदेशात दुपारी धुळीची वादळे निर्माण होणे हे नियमित घडते. उत्तरेकडील मैदानात उन्हाळ्यामध्ये अतीउष्ण आणि कोरडे वारे वाहतात. त्यांना स्थानिक भाषेमध्ये "लू" नावाने ओळखले जातात. अनेक वेळा या वादळात बाहेर पडणे कठीण होते. उष्माघात होण्याची शक्यता असते. याच काळात गडगडाटी व अशांत वादळे, आकस्मित पर्जन्य व गारांची वृष्टी होते. पश्चिम बंगालमध्ये या वादळांना काल बैशाखी (वैशाख महिन्यातील आपत्ती) म्हणून ओळखले जाते. उन्हाळ्याच्या उत्तरार्धात पूर्व हंगामी (मान्सून पूर्व) पाऊस केरळ व कर्नाटकमध्ये होतो आंब्यासाठी तो उपयुक्त ठरतो. म्हणून या पर्जन्यास "अर्‘≪गर" (mango shower) असे म्हणतात.

क) **मान्सून ऋतु :** अतितीव्र उष्णतेचा उन्हाळा संपून लोक पर्जन्याची वाट पाहतात. शेतकरी खरीपाच्या पिकांची तयारी करण्यासाठी पावसाची वाट पाहतो. जूनपासून सप्टेंबरपर्यंत नैऋत्य मान्सूनचा कालावधी असतो. मे अखेरीपर्यंत तापमान जास्त असल्याने उत्तरेकडे कमी दाबाचा विस्तृत पट्टा असतो. वाऱ्याची सर्वसाधारण दिशा नैऋत्येकडून ईशान्येकडे असते.

या काळात वाऱ्याचा वेग अधिक असून ताशी सरासरी वेग ३० कि. मी. पर्यंत असतो. मे महिन्याच्या अखेरीस मान्सून वारे प्रथमत: अंदमान निकोबार पर्यंत पोहचतात. जूनच्या पहिल्या




आकृती १०.७ : मान्सूनची वाटचाल

आठवड्यात केरळच्या किनाऱ्यापर्यंत येतात. मेघांचा गडगडाट आणि वीजांचा कडकडाट होतो. मान्सूनच्या आगमनाबरोबर देशातील बहुसंख्य भागात हवेमध्ये बदल घडून येतो. मान्सूनच्या दोन मुख्य शाखा तयार होतात. एक शाखा अरबी समुद्रावरून जाते तर दुसरी बंगालच्या उपसागरावरून जाते.


अरबी समुद्रावरून वाहणाऱ्या शाखेस पश्चिम घाटाचा प्रतिरोध झाल्याने तेथे मुसळधारपाऊस पडतो. मान्सूनचे मुंबईपर्यंत आगमन होण्यास १० जून येतो. (आकृती १०.७) पाश्चिम घाट ओलांडून ही शाखा दख्खनच्या पठारावर तसेच मध्य प्रदेशाच्या भागात पोहचते. तो प्रदेश पर्जन्य छायेचा म्हणून ओळखला जातो. हीच शाखा पुढे २० जूनपर्यंत उत्तर भारतीय मैदानात पोहचते.

बंगालच्या उपसागरावरून पुढे गेलेली मान्सूनची शाखा अंदमान निकोबार बेटांवरून ईशान्येकडील राज्यात पोहचते. पश्चिम बंगालचा किनारा व पुढे १५ जुलैपर्यंत देशभर मान्सूनचा प्रभाव असतो. अर्थातच पर्जन्याचे प्रमाण पूर्वेकडून पश्चिमेकडे कमी कमी होत जाते. उदा. कोलकताला १२० से. मी. पाऊस पडतो. अलाहाबाद ९१ से. मी.तर दिल्ली येथे ५६ से. मी. पाऊस पडतो. मान्सूनच्या काळातच मान्सूनच्या मिळणाऱ्या पर्जन्यात खंड पडतो त्यास मान्सून खंड म्हणतात. पर्जन्याच्या विषमतेमुळे कुठे ओला काळ तर कुठे दुष्काळ अशी स्थिती निर्माण होते. उन्हाळ्याच्या उत्तरार्धात मान्सूनचा प्रारंभ होतो त्या काळात तापमान जून ते जुलैमध्ये ५° ते ८° से. ने कमी होते. मुसळधार पावसामुळे येणाऱ्या पुराचे नियंत्रण पद्धतशीरपणे न केल्याने याच काळात अनेक ठिकाणी नद्यांना पूर येतात. तर दुसऱ्या एखाद्या प्रदेशामध्ये अवर्षण स्थिती निर्माण होते.

## १०.३ कार्य :

वर्तमानपत्रे आणि इतर साहित्यातून देशातील कायम पूर आणि अवर्षण स्थिती निर्माण होणाऱ्या प्रदेशांची माहिती घ्या. वर्तमानपत्रातील कात्रणे, नमुने, जमा करून त्याची कारण मीमांसा शोधा व नवीन माहितीचे संकलन करा.

ड) **मान्सूनचे पुनर्गमन :** ऑक्टोबर नोव्हेंबर या महिन्यात मान्सूनचा प्रभाव कमी होतो. हा मान्सूनचा पुनर्गमन काळ समजला जातो. सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यात तापमानात घट होवू लागते. उत्तरेकडील मान्सून द्रोणी निष्प्रभ होते व त्या ठिकाणी जास्त भार प्रदेश निर्माण होतो. ऑक्टोबर महिना आर्द्र आणि उष्ण असतो. भूभागातील आर्द्रतेमुळे हवाही आर्द्र असते. उत्तरेकडील मैदानातही उष्णता आणि आर्द्रता अधिक जाणवते त्यामुळे हा काळ ऑक्टोबर उष्मा (october Heat) म्हणून समजला जातो. ऑक्टोबर अखेर तापमानात घट होते. ऑक्टोबर महिन्यातील रात्री अत्यंत अल्हाददायक समजल्या जातात. याच काळात उत्तरेकडील कमी दाबाचा प्रदेश, दक्षिणेकडे बंगालच्या उपसागराकडे सरकतो त्यामुळे बंगालच्या उपसागराच्या किनारी भागात चक्री वादळे होतात. ओरिसा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू राज्यात विशेषत: महानदी, गोदावरी. कृष्णा खोऱ्यामध्ये जनजीवन विस्कळीत होते.




आकृती १०.८ : मान्सूनचे पुनर्गमन

## पाठावरील प्रश्न १०.३

**अचूक उत्तरे निवडा.**

१. उत्तरेकडील मैदानातील उष्ण आणि कोरड्या वाऱ्यांना ....... म्हणतात.

(अ) कालबैशाखी (ब) व्यापारी वारे

(क) लू (ड) वरील सर्व

२. अरबी समुद्रावरून वाहणाऱ्या वाऱ्यांना कोणत्या पर्वताचा प्रतिरोध होतो?

(अ) अरवली (ब) पश्चिम घाट
(क) पूर्व घाट (ड) राजमहल टेकड्या

३. उष्णप्रदेशीय वादळे बंगालच्या उपसागरावर कोणत्या काळात निर्माण होतात?
(अ) नैऋत्यमान्सून (ब) उन्हाळ्यामध्ये
(क) मान्सून पुनर्गमन (ड) हिवाळ्यामध्ये

४. कोणत्या ठिकाणी मार्च महिन्यात सर्वाधिक तापमान असते?
(अ) दिल्ली (ब) दख्खनचे पठार
(क) शिलाँग (ड) पंजाब

५. मान्सून वारे ............ नावाने ओळखले जातात.
(अ) ऋतुपरत्त्वे वाहणारे वारे (ब) तात्कालिक वारे
(क) कायमस्वरूपी वाहणारे वारे (ड) स्थानिक वारे

मोना आणि राजू यांना ऋतू हे चक्र आहे, त्याची कारणे आणि परिणाम स्पष्ट झाले. परंतु एक प्रश्न मात्र अनुत्तरीत राहिला. मान्सून विशिष्ट प्रदेशात विशिष्ट काळात पाऊस देतो परंतु पर्जन्याचे वितरण मात्र असमान असते. पर्जन्याच्या वितरणावरून त्याची उत्तरे शोधा.

## १०.४ पर्जन्याचे वितरण :

भारतामध्ये वर्षातील पर्जन्याचे वितरण असमान आढळून येते. उत्तरेकडील मैदानांमध्ये पर्जन्याचे प्रमाण पूर्वेकडून पश्चिमेकडे कमी कमी होत जाते. द्वीपकल्पीय पठारावरही पर्जन्याचे प्रमाण किनारपट्टी पासून जसजसे दूर जावू तसतसे पर्जन्याचे प्रमाण कमी होत जाते. ईशान्य भारतामध्ये वाढत्या उंचीनुसार जर्नन्याचे प्रमाण वाढत जाते. पर्जन्य प्रमाणातील विविधता आणि विषमता हे भारतीय प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. जगातील सर्वाधिक पर्जन्याचे ठिकाण आणि सर्वात कमी पर्जन्याचे ठिकाणही भारतात आहे. याबावत आणि विचार केलेला आहे काय? पर्जन्यातील क्षेत्रीय विविधता खालील मुद्यांच्या सहाय्याने निर्देशित केलेली आहे. सदरच्या वर्गीकरणातून विविध राज्यांचे नकाशातून निरीक्षण करा.

अ) जास्त पर्जन्याचे प्रदेश (२00 से. मी. पेक्षा अधिक) भारताच्या पश्चिम किनारी, हिमालयाच्या रांगा, ईशान्य भारत, गारो, खासी, जैतीया या मेघालयातील पर्वतरांगा.

ब) मध्यम पर्जन्याचे प्रत्येश (१00 ते २00 से. मी.) पश्चिम घाट, पश्चिम बंगाल, ओरिसा, विहार आणि इतर राज्ये

क) कमी पर्जन्याचे प्रदेश (६0 ते १00 से. मी.) उत्तर प्रदेशाचा काही भाग, राजस्थान आणि दख्खनच्या पठाराचा अंतर्गत भाग.


ड) अती कमी पर्जन्याचा प्रदेश (६0 से. मी. पेक्षा कमी) हा पश्चिम राजस्थान, गुजरात, लडाख, दक्षिण भारतातील मध्यवर्ती भाग येथे वार्षिक पर्जन्य २0 से. मी. पेक्षाही कमी मिळतो.

## कार्य : १०.४

सोबतच्या सारणीमध्ये भारतीय सण आणि ऋतू प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या कोणत्या प्रदेशात आणि का आढळतात.

| सण | कोणत्या प्रदेशात साजरे केले जातात. | तारीख व महिना | ऋतु | आर्थिकदृष्ट्या महत्त्व |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

सण आणि ऋतु यांचा सहसंबंध पहा. कोणतेही एक कारण द्या.




आकृती १०.९ : भारतातील सरासरी पर्जन्य

## १०.५ सामाजिक व सांस्कृतिक जीवन :

ऋतूंचे चक्र आपणास माहीत झालेले आहे. आता मनामध्ये दुसरा विचार येतो की ऋतु आणि आपली जीवनशैली यांचा संबंध काय आहे? आपल्या जीवनात ऋतूंचे महत्त्व आहे काय? त्याचे उत्तर होय असे आहे. आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर परिणाम होतो. भारत हा शेती प्रधान देश आहे. भारतीय शेती ही ऋतूंवर अवलंबून आहे. खरीप हंगाम म्हणजे मान्सूनच्या प्रारंभीपासून व मान्सूनच्या उत्तरार्धापर्यंतचा काळ तर रबी हंगाम म्हणजे हिवाळ्यातील हंगाम. मान्सूनच्या उत्तरार्धापासून हिवाळ्याच्या उत्तरार्धापर्यंतचा काळ. आपली अर्थव्यवस्था ही कृषि उत्पादनाच्या पायावरच आधारित आहे. त्यामुळे पूर, दुष्काळ याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो.

आपले विविध व्यवसाय ऋतूंवर अवलंबून असतात. हिवाळ्यात दिनमान कमी असल्याने थंडीसाठी लोकरी कपडे खरेदी केली जातात. शेंगदाणे, बदाम यापासून जास्त कॅलरी मिळतात त्यामुळे आहारात त्यांचे महत्त्व आहे. मकर संक्रांत हा सण हिवाळ्यात अनेक राज्यात साजरा केला जातो. जानेवारी महिन्यात पंजाबमध्ये लोहरी तर तामिळनाडूमध्ये पोंगल हा सण साजरा केला जातो. फेब्रुवारी महिन्यात वसंतपंचमी साजरी केली जाते. उत्तम पिक यावे यासाठी ती परमेश्वराला प्रार्थना असते. उन्हाळा हा आपल्याकडे तीव्र असतो या काळात रसदार फळे, आईस्क्रीम आणि विविध पेये घेतली जातात. उन्हाळ्यामध्ये कोणती फळे उपलब्ध असतात? होळी आणि वैशाखी हे सण उन्हाळ्यात येतात. उन्हाळ्यात शेतीची मशागत करून ठेवतात व पर्जन्याची वाट पाहतात. केरळमधील लोक ओनम सण हा पिकाच्या कापणीच्या वेळी साजरा करतात. मान्सूनचा उत्तरार्ध हा हंगामाचा काळ असतो. दसरा, दुर्गापूजा, दिवाळी हे सण भारतभर साजरे केले जातात.

## १०.६ पृथ्वीवरील पर्यावरणातील बदल आणि त्याचा भारतीय हवामानावरील परिणाम :

सदरच्या पाठाच्या अध्ययनातून आपणास लक्षात आलेले असेल की भारतात हिवाळा, उन्हाळा, मान्सून असे स्पष्ट ऋतु आढळतात. या ऋतूचक्रामध्ये काही बदल होतात हे लक्षात आले असेल. पृथ्वीच्या तापमानात होत असलेला बदल हा ज्वलंत विषय आहे. आपले जीवन, जीवनपद्धती, राजकीय, आर्थिक सामाजिक या सर्वच घटकावर त्याचा परिणाम दिसून येत आहे. पृथ्वीचे वाढते तापमान त्यामुळे होणारे पृथ्वीवरील परिणाम त्यामधून भारतही सुटू शकणार नाही. प्रत्येकाने त्यावर विचार करणे गरजेचे असून त्याची तीव्रता कमी करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पृथ्वीचे वाढते तापमान म्हणजे काय? गेल्या दशकापासून वाढते नागरिकरण वाढते औद्योगिकरण वाढती लोकसंख्या यामुळे वातावरणाचे प्रदूषण होत आहे. मानवी व्यवसायांमुळे कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण वाढत आहे. क्लोरोफ्लुरो कार्बन (CFC) आणि घातक वायुंचे प्रमाण वाढत आहे. सौर ऊर्जेच्या ५१% ऊर्जा भूपृष्ठात शोषली जाते त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. उर्वरित ऊर्जा वातावरणात उत्सर्जीत केली जाते. त्यामधून पृथ्वीच्या तापमानाचे संतुलन टिकते परंतु परावर्तीत उर्जेतील काही उर्जा प्रदुषकांमार्फत शोषली जाते त्याला हरित गृह परिणाम (greenhouse gas) म्हणतात. त्यामध्ये प्रामुख्याने कार्बन हा घटक आहे. त्यामुळेच पृथ्वीचे

तापमान वाढत आहे. कार्बनच्या ($CO_2$) प्रमाणातील वाढ याचे अनेक पुरावे आहेत. GHGs कमी करण्यावर अनेक देशांनी करार केलेले आहेत. सध्याचे आंतरराष्ट्रीय करार सध्याची परिस्थिती नियंत्रणाखाली आणण्यास सक्षम नाहीत.

आपणास माहीत आहे की देशातील ७०% लोक शेतीशी संबंधित व्यवसायात आहेत. तापमानात झालेले बदल शेतीस घातक आहेत. भारतीय सामाजिक व आर्थिक स्थितीवर थेट परिणाम होत आहे. मानवी जीवनात हवामानाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपला आहार, आपले सण, आपली अर्थ व्यवस्था ऋतूचक्रावर अवलंबून आहे. हंगाम जर अनुकूल असेल तर मानवी जीवन सुखी व संपन्न असेल. हवामानस्थितीचा शेती, आरोग्य, वाहतूक यावर परिणाम होतो. त्यासाठीच CFC च्या धोक्यापासून वाचण्यासाठी आपण आपली जीवन पद्धती बदलू.

## १०.५ कार्य :

भूकंप, वादळे, भौगोलिक घटना, यासारख्या आपत्तीच्या घटनाची डायरी करा. घटना, तारीख व त्याचे परिणाम यांची नोंद करा.

## पाठावरील प्रश्न १०.४

१. भारतीय पर्जन्याच्या वितरणामध्ये असमानता का आढळते?

२. भारतातील कमी पर्जन्य मिळत असलेल्या तीन प्रदेशांची नावे लिहा.

३. खरीप व रब्बीहंगामाचे महिने लिहा.

४. झैद ऋतूचा कालावधी कधी असतो?

५. कोणत्या प्रकारच्या मानवी व्यवसायामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे?

## आपण काय शिकलो?

- भारतीय हवामानावर प्रामुख्याने स्थान, समुद्रापासून अंतर, समुद्र सपाटीपासून उंची, पर्व तरांगा, भूपृष्ठीय वाऱ्याची दिशा तसेच वातावरणाच्या वरच्या थरातील हवेचे प्रवाह इत्यादी घटकांचा प्रभाव असतो.
- ऋतूप्रमाणे बदलणाऱ्या वाऱ्याची दिशा म्हणजे मान्सून.
- भारतामध्ये चार ऋतूंचे चक्र आहे. हिवाळा, उन्हाळा, मान्सून, मान्सूनचे निर्गमन
- ऋतूंचा दैनंदिन जीवनाशी संबंध असतो अगदी मानवी आहार, व्यवसाय यावरही ऋतूंचा परिणाम होतो.
- जागतिक तापमान वाढीचा परिणाम भारतीय हवामानावर होतो.

## सत्रांत अभ्यासक्रमावरील प्रश्न

१. हवामानावर परिणामकरणाऱ्या कोणत्याही पाच घटकांचे वर्णन करा. प्रत्येक घटकांचे वर्णन करताना उदाहरणे द्या.

२. हवा आणि हवामान यातील फरक लिहा.

३. हवामानावर वाऱ्याचा वेग आणि दिशा कशा प्रकारे परिणाम करतात? विविध उदाहरणाच्या सहाय्याने लिहा.

४. "मान्सून" व्याख्या लिहा. व्यापारी वाऱ्यांची दिशा बदलण्याचे प्रमुख कारण लिहा.

५. हिवाळा ऋतूची चार वैशिष्ट्ये लिहा.

६. उन्हाळा ऋतूची कोणतीही चार वैशिष्ट्ये लिहा.

७. जागतिक तापमान वाढीचा परिणाम भारतीय हवामानावर कशाप्रकारे होतो ते उदाहरणासह लिहा. त्याची कारणे कोणती?

## पाठावरील प्रश्नांची उत्तरे

**१०. १**

अ) $२३\frac{१}{२}^{\circ}$ उ. अक्षरवृत्तावरील कर्कवृत्त

ब)

सागरांसह

१. मुंबई

२. चेन्नई

सागरीसंबंध नसलेली

३. लखनौ

४. दिल्ली

क) हिमालयाच्या रांगा

ड) ईशान्य दिशेने भूभागावरून येणारे वारे कोरडे असल्याने पर्जन्य देत नाहीत.

**१०.२**

१. राजस्थान, पंजाब, हरियाना, उत्तरप्रदेश, विहार, झारखंड, प. बंगाल, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड व ओरिसाचा काही प्रदेश

२. केरळ

३. दक्षिणोत्तर, ईशान्य, वायव्य

४. (अ) मुंबई : ४ महिने (ब) नागपूर : ४ महिने
(क) दिल्ली : ४ महिने (ड) शिलाँग : ६ महिने

**१०.३**

१. १. (ब) लू

२. (क) पश्चिम घाट

३. (क) मान्सून निर्गमन

४. (क) दख्खनचे पठार

५. (अ) हंगामी वारे

**१०.४**

१. जेव्हा मान्सून वारे किनारपट्टीवरून भूभागाकडे प्रवेश करतात तेव्हा जास्तीतजास्त पर्जन्य देतात परंतु जेव्हा मध्य भारतीय भागात तसेच उत्तर भारतीय क्षेत्रापर्यंत पोहचतात तेव्हा ते कोरडे होतात व कमी पर्जन्य देतात.

२. कमी पर्जन्याचे प्रदेशˊ

१. उत्तरेकडील प्रदेशˊ लेहˊ लडाख

२. पश्चिम राजस्थान

३. दक्षिणेकडील मध्यवर्ती भाग

३. खरीपˊ जून आणि जुलै, रबीˊ ऑक्टोबरˊ नोव्हेंबर

४. हिवाळ्याच्या नंतरˊ मार्च ते मे

५. नागरिकरण, औद्योगिकरण, निर्वनीकरण, जैविक इंधनाचा वापर, इत्यादी.

# ११

# जैव विविधता

आपल्या सभोवताली विविध प्रकारचे, गवत, झाडे, वृक्ष, झुडपे, कीटक, पक्षी, प्राणी असा सुंदर परिसर आहे. आपल्यासाठी लागणारे अन्न असो किंवा दैनंदिन लागणारे इंधन किंवा औषधे असोत इतरही अनेक गोष्टी विविध प्रकारच्या वनस्पती आणि प्राण्यापासूनच मिळवितो अन्यथा आपण जगूच शकलो नसतो. सुमारे ४० कोटी वर्षापासून आपणास या गोष्टी मिळत आहेत. मानवी व्यवसायांमुळे जैवविविधता संपण्याच्या मार्गावर आहे. वनस्पती, प्राणीजीवन व सजीव यांचे प्रत्येकाचे काहीना काही कार्य आहे. आपल्या प्रत्येकाला काही ना काही करून जैव विविधता टिकविण्यासाठी करता येणे शक्य आहे. वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीवसृष्टी या संकल्पना समजून घेणे महत्त्वाचे आहे. प्रस्तुत पाठामध्ये आपण भारतातील वनस्पती, व प्राणी जीवनाचे महत्त्व, त्यांचे संवर्धनाची गरज अभ्यासणार आहोत.

## उद्दिष्टे :

सदरचा पाठ अभ्यासानंतर पुढील माहिती मिळेल.

- जैवविविधता संकल्पना स्पष्ट करणे.
- भारतातील जैवविविधतेची स्थिती
- जैवविविधतेचे महत्त्व
- भारतीय वनस्पती व वन्य प्राणी जीवनाचे वर्णन
- भारताच्या नकाशा आराखड्यात वने, वन्यजीवसृष्टी, अभयारण्ये व त्यांची स्थाने
- आपल्या प्रदेशातील वनस्पती आणि प्राणी जीवनाच्या संवर्धनाची आपली भूमिका तयार करणे

## ११.१. जैवविविधता :

पृथ्वीवरील विविध जीवसृष्टी आणि त्यांच्या संबंधित असणारे प्राकृतिक पर्यावरणातील तापमान, मृदा, पाणी इ. घटक म्हणजेच जैवविविधता होय.

एखाद्या प्रदेशातील परिसंस्थेतील प्राणी व वनस्पतींचा अनुवंश आणि त्यांचे प्रकार म्हणजे जैवविविधता असे सांगता येईल त्यामध्ये (१) अनुवांशिकाविविधता (२) त्यांच्या प्रकारातील विविधता (३) परिसंस्थेतील विविधता. प्राणी आणि वनस्पती यांच्यामध्ये असलेली विविधता अगदी सूक्ष्म असते. सूक्ष्म स्वरूपात असलेली ही विविधता मोठ्या प्रमाणातील विविधतेचाच भाग आहे.



**आकृती ११.१**

**पेशी :** अनुवंशातील महत्त्वाचा जैविकघटक आहे. या पेशीमुळे प्रत्येक प्रकारची वैशिष्ट्ये धारण केलेली असतात.

**वर्ग :** समान अनुवंशीय गुणधर्म धारण करणारा गट त्यांच्यामध्ये संकरण करण्याची क्षमता असते.

**परिसंख्या :** जैविक आणि अजैविक घटकांचा वापर करून अस्तित्व टिकविणारा गट

## ११.१.१. भारतातील जैवविविधता स्थिती :

ध्रुवीय प्रदेशाकडून विषुववृत्तीय प्रदेशाकडे जैविविधता वाढत जाते. भारताचे स्थान ८°४2 उत्तर ते ३७°६2 उत्तर अक्षवृत्ताच्या दरम्यान असून ६८°७2 पूर्व ते ९७2 २५° पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. वैशिष्ट्यपूर्ण स्थानामुळे भारतातील जैवविविधता समृद्ध आहे. भारताला जगाच्या केवळ २.४% भूमी लाभलेली आहे. परंतु जागातील १.७५ दशलक्ष जैव प्रकारातील, ८% जैवविविधता भारतात आहे. (UNEP – GLOBAL BIODIVERSITY 1995) भारतात ६% जैव प्रकार





आढळतात. भारतीय वनांत ४५000 वनस्पती प्रकार हे जगाच्या वनस्पती प्रकारापैकी १२% भारतात आढळतात. जगातील १२ लक्षवेधक ठिकाणापैकी भारतात ईशान्य भारत व पश्चिम घाटात २ अशी लक्षवेधक ठिकाणे (Hot spots) आहेत.

- ❖ लक्षवेधक ठिकाणे म्हणजे विशिष्ट वनस्पती प्रकार एकाच विशिष्ट क्षेत्रामध्ये साम्यता आढळणारी ठिकाणे.
- ❖ विशेष लक्षवेधक ठिकाणे ˆ वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती आणि प्राणी प्रकार अन्यत्र न आढणारी ठिकाणे.


## ११.२ जैवविविधतेची स्थिती ः

पृथ्वीवर मानवाच्या अस्तीत्वाचे मूळ म्हणजे जैवविविधता त्यामुळे त्यांचे महत्त्व दुर्लक्षित करण्यासारखे नाही. प्राकृतिक घटकातील त्यांचे अस्तित्व नष्ट होत आहे. परस्परांतील परावलंबित्व आणि परस्परांवर अवलंबून असण्यामुळेच परिसंस्था निर्माण झालेली आहे. एकाच प्रकारच्या हवामान परिस्थितीमध्ये आढळणारे वनस्पती प्रकार एकाच गटातील असतात हे आपणास माहीत आहे का? प्राणीजीवन हे एखाद्या प्रदेशातील वनस्पती प्रकारावर अवलंबून असते. एखाद्या प्रदेशातील वनस्पतीजीवन बदलून टाकले की प्राणीजीवनातही बदल घडून येतो व त्याचा परिणाम अर्थातच मानवी जीवनावर होतो. एकदा घटक नष्ट झाला तर पर्यावरणातील अन्य घटकावर परिणाम होतो. मानवाची भूमिका ही मध्यस्थाची आहे. आपण परिसंस्थेतील अविभाज्यघटक आहोत. वृक्षांची तोड, प्राण्याची हत्त्या करून मानवाने परिस्थितीकीचे संतुलन बिघाडविले आहे. मानवाने कशाप्रकारे परिस्थितीकीचे संतुलन बिघडविले आहे? वर्तमानपत्रे, मासिके यामधून अधिक माहिती मिळवा. पर्यावरणातील प्राणी आणि वनस्पती यांचे पर्यावरण परस्परावलंवी तसेच सहसंबंधीत आहे. मानवी जीवनाच्या दृष्टीने या परिसंस्था महत्त्वाच्या आहेत. त्याचे महत्त्व पुढील प्रमाणे :

- ❖ अन्न, पाणी, वस्त्र, इंधन पुरवठा
- ❖ हवामान आणि रोगराई यांचे नियमन (उदा. हिवाळ्यात थंडी, ताप, खोकला तर मान्सूनच्या काळात पोटाचे विकार)

### ११.२.१. जैवविविधतेच्या ऱ्हासाची कारणे :

वाढती लोकसंख्या आणि बदलती जीवनपद्धती यामुळे नैसर्गिक संपदांचा व्यापारी पद्धतीने ऱ्हास झाला. यातूनच जैवविविधता ऱ्हास पावत आहे. निसर्गाकडून मिळणारी साधने आणि सेवा यांचा पुरवठा कमी झाला. जैवविविधतेचा ऱ्हास झाल्याने केवळ नैसर्गिक पर्यावरणावरच नव्हे तर मानवाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, अध्यात्मिक बाबींवरही परिणाम झाला आहे.




आकृती ११.२

## तुम्हास हे माहित आहे का ?

- सन २०१० हे वर्ष राष्ट्रसंघाने जैवविविधतेचे वर्ष म्हणून जाहिर केले.
- आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघ IUCN (International Union for Conservation of Nature) यांच्या २०१० च्या माहितीनुसार ५२०१७ वनस्पती प्रकारांपैकी १८७८८ प्रकार नामशेष होण्याच्या मार्गावरण आहेत. जगातील ५४९० सस्तन प्राण्याच्या प्रकारातील ७८ प्रकार नामशेष झाले, १८८ प्राणी धोक्याच्या स्थितीत तर ५४० प्रकार धोक्याच्या पातळीवर तर ४९२ धोक्याच्या मार्गावर आहेत. ६२८५ उभयाचर प्राण्यांपैकी १८९५ या पृथ्वी तलावरून नष्ट होण्याच्या मार्गावरण आहेत.
- अनेक प्रकारच्या जाती नष्ट होणे, प्राण्याची नैसर्गिक स्थाने नष्ट होणे, भूमि उपयोजन संवर्धन हवामानातील बदल, प्रदूषण यांना धोक्याचा संदेश आहे. यासाठी आपली काय भूमिका आहे यावाबत आपण काही विचार केलेला आहे का?

## कार्य : ११.१

आपल्या परिसरातील तीन वनस्पती, तीन प्राणी, तीन पक्षांची नावे लिहा आणि तुमच्या परिसरातील त्यांचे महत्त्व सांगता येईल का? तुमच्याशी संबंधित असणारे एखादे उदाहरण द्या.

**जैवविविधता**

| अ. न. | वृक्ष | महत्त्व | अ.न. | प्राणी / पक्षी | महत्त्व |
|---|---|---|---|---|---|
| १. | लिंब | औषधे, लाकूड, ऑक्सिजन छाया | १. | गिधाड | पर्यावरणातील मोफत टाकावू पदार्थाची काळजी, रोगराईवरील नियंत्रक, उंदीर, घुशीवरील नियंत्रक |
| २. | | | २. | | |
| ३. | | | ३. | | |
| ४. | | | ४. | | |

## ११. १ पाठावरील प्रश्न

1. "जैवविविधता सजीवांचे पृथ्वीवरील अस्तीत्त्वाचे मूळ आहे." या विधानाच्या समर्थनासाठी कोणतीही दोन कारणे लिहा.

२. लक्षवेधक ठिकाणे ३0 शब्दात लिहा.

## ११.३ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणीजीवन ः

परिस्थितीकीमध्ये नैसर्गिक वनस्पतीजीवन आणि वन्यजीवसृष्टी एक महत्त्वाचा ठेवा आहे. मानव व प्राण्यांना वनस्पतींकडून या लाकूड, घराचे साहित्य पुरवितात, ऑक्सिजनचे नियमन, मृदेचे रक्षण, पूरासारख्या आपत्तीपासून रक्षण, वाऱ्याच्या वेगावरील नियंत्रण, भूगर्भजल साठा, फळे, फुले, कंदमुळे, रंगासाठी लागारो पदार्थ, डिंग, औषधी वनस्पती तसेच आपल्याला लिहिण्यासाठी लागणारा कागदही वनस्पतींकडूनच मिळतो. हे सर्व लाभ दृष्यस्वरूपातील आहेत. वन्यजीसृष्टीमध्ये प्राणी, पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी, जलचर प्राणी यांचाही समावेश होतो. प्राण्यांपासून दुध, मांस, हाडे, लोकर इत्यादी बावी आपल्याला मिळतात. मधमाशांपासून आपल्याला मध मिळते. फुलांचे परागीभवनामध्ये मदत होते. कीटकच पर्यावरणात विघटनाचे काम करतात. कीटक हे पक्षाचे भक्ष आहे. गिधाड हे मृत प्राण्यावर जगतात. पर्यावरणामधील गिधाड हा स्वच्छता करणारा घटक आहे. त्यामुळे परिस्थितीकीमधील लहान मोठे जैविक घटक पर्यावरण संतुलनाचा प्रयत्न करीत असतात.

### ११.३.१. भारतातील नैसर्गिक वनस्पती :

जगातील विविध प्रदेशाप्रमाणे भारतातीलही नैसर्गिक वनस्पतींवर हवामान, प्राकृतिक रचना, मृदा यांचा परिणाम झालेला आहे. नकाशा ११.३ चे निरीक्षण केल्यानंतर लक्षात येते की तापमान, पर्जन्य प्राकृतिक रचनेचा परिणाम, भारतीय वनस्पतीच्या वितरणावर झालेला आहे. ही विविधता पुढीलप्रमाणे सांगता येईल. ईशान्य भारत, पश्चिमघाट, अंदमान निकोबार बेटांवर घनदाटवने आहेत. उत्तरेकडील

मैदान व वायव्येकडील प्रदेशात खुरटी वने आढळतात व तेथे शेतजमीनीचे प्रमाण अदिक जास्त, तर दख्खनच्या पठारी भागात खुरट्या वनस्पती व पानझडी वने आढळतात.

**भारतीय वनांचे पुढील प्रकारात वर्गीकरण करता येईल.**

१. उष्णप्रदेशीय सदाहरित वने

२. उष्णप्रदेशीय पानझडी वने

३. काटेरी वने

४. भरतीओहोटी क्षेत्रातील वने

५. हिमालयातील वने

> नागरीभागात वनीकरणाच्या सहाय्याने मानवाने लागवड करून वने तयार केलेली आहेत. प्रस्तुत पाठात फक्त नैसर्गिक वने यांचाच विचार केलेला आहे.

### १. उष्णप्रदेशीय सदाहरित वने :

या वनामध्ये वर्षभर हिरवी वने आढळतात येथील उष्ण आणि आर्द्र हवामानामुळे वर्षभर हिरवीगार वने आहेत. एखाद्या विशिष्ट हंगामात झाडांची पाने गळून पडत नाहीत म्हणूनच ती सदाहरित समजली जातात. सर्व साधारणपणे सरासरी वार्षिक पर्जन्य २०० से. मी. असून कोरड्या ऋतूचा कालावधी अल्प असतो. साधारणपणे वृक्षांची उंची ६० मी. पेक्षाही अधिक असते. ही वने घनदाट व मिश्र स्वरूपाची असून झुडपे, वेली यांच्यामुळे वनस्पतीची विविध स्तरांची रचना दिसते. गुंतागुंतीच्या मिश्र वाढीमुळे आर्थिक दृष्ट्या त्यांची तोड करणे शक्य नसते. अगदी कमी जागेतही वृक्षांची विविधता आढळते. रोजवूड, एबनी, महोगनी, रबर, फणस, बांबू या येथील प्रमुख जाती आहेत. पश्चिम घाट, आसामच्या उंचवट्यांच्या भागात, अंदमान, निकोबार, लक्षद्वीपच्या क्षेत्रात ही वने आढळतात. येथील कठीण प्रकारच्या लाकडाचा उपयोग फर्निचर, हस्तकला व्यवसायासाठी केला जातो. या वनांमुळे मृदेचे रक्षण होते तसेच भूमिपात थांबविण्यास मदत होते.

### २. उष्ण प्रदेशीय पानझडी वने :

येथील वनांची पाने वर्षातून एकदा झडतात. म्हणूनच त्यांना पानझडी म्हणतात. देशात विस्तृत क्षेत्रामध्ये ही वने आढळतात. साधारणपणे ७५ ते २०० से. मी. पर्जन्य क्षेत्रात ही वने आहेत. दख्खनचे पठार, ईशान्य भारत, पश्चिम घाट, पूर्व किनारपट्टी वगळता सर्वत्रच ही वने आहेत. शेतीसाठी येथील वने नष्ट केलेली आहेत. हिमालयाचा पायथा, द्वीपकल्पीय क्षेत्रातील पर्वतरांगा, या क्षेत्रामध्ये ही वने काही ठिकाणी आहेत. पर्जन्याच्या प्रमाणानुसार आद्रपानझडी आणि शुष्क पानझडी असे प्रकार पाडले जातात..


अ) **आर्द्र पानझडी वने** : साधारणपणे १०० ते २०० से. मी. पर्जन्य क्षेत्रामध्ये आढळतात. देशाच्या पूर्व भागात, ईशान्येकडील भागात हिमालयाचा पायथा, झारखंड, ओरिसा छत्तीसगड,

पश्चिमघाटाच्या पूर्व उतारावर ही वने आहेत. साग, बांबू, साल, शिसव, चंदन, खैर, कुसुम, अर्जून, महू, जांभूळ, तुती येथील वृक्ष प्रकार आहेत.

ब) **शुष्क पानझडी वने :** वार्षिक पर्जन्य साधारणपणे ७५ ते १०० से. मी. असणाऱ्या द्वीपकल्पीय पठार क्षेत्राच्या अंतर्गत भागामध्ये, उत्तर प्रदेशातील मैदान, मध्यप्रदेश, बिहार राज्याच्या भागात साग, साल, पिंपळ, लिंब हे वृक्ष आढळतात.

## ३. काटेरी वने :

वार्षिक सरासरी पर्जन्य ७५ से.मी. पेक्षा कमी असणाऱ्या क्षेत्रात काटेरी वनस्पती व झुडपे आढळतात. दीर्घकाळ कोरडे हवामान व कधीतरी पडणारा पाऊस यामुळे वृक्षांची वाढ होत नाही. वायव्येकडील प्रदेश, द्वीपकल्पीय पठारावरील शुष्क सदृश्य क्षेत्रातील गुजराथ, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तरप्रदेश, हरियाना, कर्नाटक, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र येथे ही वने आढळतात.




**आकृती ११.३ : भारतातील नैसर्गिक वनस्पती**

येथील वृक्षांची उंची कमी असते तसेच मुळे खोलवर गेलेली असतात. वृक्षांच्या बुध्यामध्ये पाणी साठविलेले असते. पाने लहान आणि जाड असतात. त्यामुळे पानाद्वारे होणारे बाष्पिभवन कमी होते. बाबूळ, निवडुंग, खैरे, खजूर, ताड या येथील वृक्षांच्या जाती आहेत.

### ४. भरतीओहोटी वने ः

दलदल क्षेत्र, भरती ओहोटीचा प्रभाव असणाऱ्या खाडीच्या क्षेत्रामध्ये ही वने आढळतात. चिखल, रेती, वाळू व पाणी यांच्या संयोगाने त्यांची वाढ होते. वनस्पतींची मुळे, फांद्या या पाण्याखाली काही काळ असतात. त्यांना मॅनग्रुव्ह वने असेही म्हणतात. मॅनग्रुव्ह हा प्रकार सदाहरित, तेलकट पाने असलेला चिवट वनस्पती प्रकार आहे. सुंदरवन वनात याप्रकारची वने आढळतात. महानदी, गोदावरी, कृष्णा, कावेरी नदीच्या मुखाशी तसेच आंदमान, निकोबार बेटांच्या भागात ही वनस्पती आढळते. सुंदरी किंवा मॅनग्रुव्ह वनस्पती सुंदरवन येथे आढळत असली तरी, ताड, नारळ, केवडा या प्रकारचे वृक्ष आढळतात. या वनांचा व्यापारी वापर नसल्याने सुरक्षित आहेत. वृक्षांच्या किनाऱ्यावरील स्थानामुळे मोठी वादळे व लाटांपासून भूभागाचे रक्षण होते.

### ५. हिमालयीन वने ः

नावावरूनच हिमालयाच्या पर्वतीय भागात ही वने आढळतात हे लक्षात येते. वाढत्या उंचीनुसार तापमानात घट होते. तसेच सूर्याच्या दिशेकडील उताराचाही परिणाम वनस्पतींच्या विविधतेवर होतो. परिस्थितीकीमध्ये पटकन होणारा बदल जाणवतो. गेल्या दशकात वनांचा वापर मोठ्या प्रमाणात झालेला आहे. साधारणपणे १००० मी. पेक्षा कमी उंचीच्या भागात चांगला पाऊस पडतो. तेथे घनदाट वने आढळतात. ही उष्णप्रदेशीय वनांसारखीच दिसतात. साग, बांबू हे प्रकार प्रामुख्याने आहेत. साधारणपणे १००० मी. ते २००० मी. दरम्यान सदाहरीत रुंदपर्णी ओक, चेस्टनट ही वने आहेत. पूर्व हिमालयात याच उंचीवर पाईनची वने आहेत. चीर हा प्रकार येथील प्रमुख प्रकार आहे. समशीतोष्ण आर्द्र हिमालयीन वने १५०० ते ३५०० मी. दरम्यान सुमारे १०० ते २५० से. मी. पाऊस पडतो. ओक, लॉरेल चेस्टनट, सीडार, सिल्व्हर, फर, स्प्रुस, ऱ्होडोडेंड्रॉन आणि देवदार या प्रमुख जाती आढळतात.

हिमालयीन वनांमध्ये लाकूडतोड होवू लागली आहे. वाढत्या उंचीनुसार अंतीम टप्प्यामध्ये ३००० ते ३८०० मीटरवर अल्पाईन वने आहेत. विस्तृत उंचावट्याच्या भागात तुरळक पाईन, बर्च सिल्व्हर, फर आणि ऱ्होडोडेंड्रॉन वनस्पती आहेत.

### ११.२ पाठावरील प्रश्न

१. उष्ण प्रदेशीय वनांना सदाहरित वने म्हणतात ३० शब्दात वर्णन करा.

२. कारणे लिहा.

१. अलिकडच्या काळात वादळांमुळे पूर्व किनारपट्टीवरील भरतीच्या वनांचे खूप नुकसान होते.

________________________________________

________________________________________

२. उष्ण प्रदेशीय सदाहरित वनांपेक्षा हिमालय वनांचा व्यापारी हेतूने मोठ्या प्रमाणात वापर झालेला आहे.

________________________________________

________________________________________


## ११.३.२. भारतीय वन्यजीवन ः

भारतीय प्राकृतिक रचना वैशिष्ट्यपूर्ण असल्याने वन्य प्राणी जीवनही वैविध्यपूर्ण आढळते. भारतीय वन्य प्राणीजीवन हा भारतीय वारसा आहे. जगातील ८0% वनस्पती व प्राणी प्रकार भारतात आढळतात. मानवास व प्राण्यांसाठी उपयुक्त वनौषधी भारतात आढळतात. अलिकडच्या दशकात भारतीय वन्यजीवांना मानवी हस्तक्षेपामुळे धोका निर्माण झालेला आहे. त्यासाठीच राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये आणि सुरक्षित क्षेत्र म्हणून सन १९३५ ला प्रारंभ केला. त्याला अनुसरूनच १९७२ मध्ये वन्यप्राणी सुरक्षा कायदा केला. विविध उपायांद्वारे जैवविविधता टिकावी हाच हेतू आहे. प्राण्याची नैसर्गिक वस्तीस्थाने, पक्षी आणि वनस्पती यांच्यासाठी उपाययोजना केलेली आहे. देशात ५५१ अभयारण्ये, ९६ राष्ट्रीय उद्याने, २५ पानथळ, १५ जैवसुरक्षा केंद्र देशभर स्थापन केलेली आहेत. देशात ३३ बॉटनीकला गार्डन, २७५ प्राणी संग्राहलये हरीण अभयारण्ये, सफारी पार्क, मत्स्यालय स्थापन केलेली आहेत. प्राण्यांच्या नामशेष होत जाण्याचा धोका समजून जणजागृती निर्माण व्हावी असाच हेतू आहे. याच हेतूने देशात, मध्ये व्याघ्र प्रकल्प १९७३, हत्ती प्रकल्प १९९२ वर्षी सुरू केले. अनेक प्रजाती नष्ट होवू नयेत व जैवविविधता टिकविण्यासाठी प्रत्येकाची जबाबदारी आहे. अन्यथा सर्व प्रयोग निष्फळ आहेत.

१. **अभयारण्ये :** वन्य प्राण्यांची घटती संख्या टिकविण्याच्या हेतूनेच हा प्रकल्प राबविला आहे. या वन्यजीवांच्या रक्षणासाठी सुमारे २000 पक्षी, ३५00 सस्तन प्राणी, ३0,000 कीटक आणि १५,000 प्रकारच्या वनस्पतींचे रक्षण करण्याचे उद्दिष्ट ठरविलेले आहे. धोक्याच्या स्थितीमध्ये असणाऱ्या प्राण्यांमध्ये आशियायी हत्ती, बंगाली वाघ, बर्फाळ प्रदेशातील चित्ता, सैबेरियन बगळे इ.साठी प्रामुख्याने अभयारण्यांची योजना आहे. भारतातील अशी सुरक्षित वने विशिष्ट प्राण्यासाठी प्रसिद्ध आहेत. उदा. आसामचे काझिरंगा हे गेंड्यासाठी प्रसिद्ध आहे. केरळमधील पेरियार हे हत्तींसाठी प्रसिद्ध आहे. देशात ५५१ अभयारण्ये आहेत. अनेक स्थलांतरित प्राण्यांचे देखील भारतीय प्रदेशाचे हे निवासस्थान आहे. उदा. सागरी कासव, सैबेरियन बगळे, करकोचा.

२. **राष्ट्रीय उद्याने :** प्राण्यांची नैसर्गिक व गतकालीन वैशिष्ट्ये ठिकविण्यासाठी पुढील पिढ्यांसाठी राष्ट्रीय उद्याने निर्माण केलेली आहेत. सन १९७० मध्ये देशात फक्त ५ राष्ट्रीय उद्याने होती. सन १९७२ मध्ये वन्य प्राणी सुरक्षा कायदा मंजूर झाला. या कायद्याने शिल्लक राहिलेल्या प्राण्याना तरी अभय मिळावे हा हेतू होता. अशा नामशेष होणाऱ्या प्राण्याची यादी करण्यात आली आणि या प्राण्यांना संरक्षण देण्यासाठी कायद्याने पाठबळ मिळाले.

| | **राष्ट्रीय उद्याने (वन्यप्राणी अभयारण्ये)** | **दुर्मिळ वन्य प्राणी** |
|---|---|---|
| १. | दाचिग्राम (जर्म्मूकाश्मीर) | हंगुल कस्तुरी मृग |
| २. | कॉर्बेट (उत्तरांचल) | वाघ, हत्ती, चित्ता, हरिण |
| ३. | दुधवा (उत्तरप्रदेश) | हत्ती, वाघ |
| ४. | कान्हा (मध्य प्रदेश) | वाघ, बारासिंगा |
| ५. | बंदिपूर (कर्नाटक) | वाघ, बारासिंगा |
| ६. | पेरियार (केरळ) | हत्ती |
| ७. | भरतपूर (राजस्थान) | पाणपक्षी |
| ८. | डेझर्ट पार्क (राजस्थान) | वाळवंटातील घुवड, कोल्हे |
| ९. | गीर (गुजरात) | सिंह, चित्ता |
| १०. | काझिरंगा (आसाम) | गेंडा, रानटी गवा |
| ११. | मानस (आसाम) | हत्ती, गेंडा, गवा |
| १२. | नाम दफा (अरूणाचल प्रदेश) | वाघ, गवा |
| १३. | सुंदरवन (प. बंगाल) | रॉयल बंगाली वाघ |




आकृती ११.४ : भारतातील राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, पक्षालयै

३. **पानस्थळे :** पानथळ म्हणजे एखाद्या हंगामात किंवा वर्षभर दलदल असणारी ठिकाणे होत. अशा ठिकाणी उथळ पाण्याची ठिकाणे संरक्षण करणे आवश्यक आहे. पानस्थळे ही दलदल, सखल व चिखलाची स्थाने होत. येथील पाणी एकतर खारे किंवा काळपट किंवा क्षारहीनही असते. अशी पानथळ ठिकाणे नैसर्गिकरित्या पाणी स्वच्छ होणारी ठिकाणे असू शकतात. परिसंस्थेतील जैविक विविधता येथे आढळून येते. मॅनगुव्ह पाण्यातील लिली, लव्हाळे, काळास्पुस, सायप्रस, हिरडा इत्यादी प्रकारच्या वनस्पती आढळतात. प्राण्यांमध्ये उभयचर, सरपटणारे प्राणी, पक्षी, कीटक, सस्तन प्राणी आढळतात. पानथळ ठिकाणे हवामान बदलामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. कार्बनचे शोषण होते व पाण्यातील त्याचे प्रमाण टिकविले जाते. अशी ठिकाणे टिकविणे आवश्यक आहे. रामसर अंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अशा स्थळाचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे.

अशा प्रकारच्या पानस्थळां साठी जनजागृतीची आवश्यकता असून ही स्थाने म्हणजे निरुपयोगी नव्हेत हे पटवून देणे गरजेचे आहे.

## तुम्हास हे माहित आहे का ?

**भारतातील १५ पानस्थळे (रामसर)**

**टेबल ११.२ भारतातील पानस्थळे**

| अ.न. | नाव | राज्य | क्षेत्रफळ चौ.कि.मी. |
|---|---|---|---|
| १ | अष्टमुडी | केरळ | ६१४ |
| २ | भींतर कनिका मॅन्गुव्ह | ओडिसा | ६५० |
| ३ | चिल्का सरोवर | ओडिसा | ११६५ |
| ४ | पूर्व कोकता पानथळ | पं. बंगाल | १२५ |
| ५ | कोल्लेरू सरोवर | आंध्रप्रदेश | ९०१ |
| ६ | लोकटक सरोवर | मणिपूर | २६६ |
| ७ | पॉईट कलिमर | तामिळनाडू | ३८५ |
| ८ | पाँग सरोवर | हिमाचल प्रदेश | १५७ |
| ९ | सांभर सरोवर | राजस्थान | २४० |
| १० | तोमोरी | जम्मू आणि काश्मीर | १२० |
| ११ | उत्तर गंगा कालवा | उत्तर प्रदेश | २६६ |
| १२ | वेम्बनार्डकोल पानस्थळ | केरळ | १५१२ |
| १३ | वूलर सरोवर | जम्मू आणि काश्मीर | १८९ |
| १४ | हरिके सरोवर | पंजाब | ४१ |
| १५ | भोज पानस्थळ | मध्य प्रदेश | ३२ |


४. **जैविक संपदा :** परिस्थितीकेत पेशीय वैविध्य हा जीवावरणातील महत्त्वाचा घटक आहे. भारत सरकारने अशा १५ जैविक साठ्यांची स्थापना केलेली आहे. त्यांची नैसर्गिक अवस्था टिकविण्यासाठी (राष्ट्रीयउद्याने आणि अभयारणे) प्रयत्न सुरू आहेत. त्याच्या लगतच्या प्रदेशामध्ये लोकांच्या वापरासाठी काही क्षेत्र विकसित केलेले आहे. त्या ठिकाणी असणारी माणसे, तेथील वनस्पती व प्राणी यांनाही संरक्षण मिळाले पाहिजे. यातील प्रमुख उद्देश म्हणजे

१. वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांची विविधता व आंतरक्रीया टिकविणे.

२. जैविक सहचर्य चिरकाल टिकविणे.

३. परिस्थितीकीचे रक्षण संशोधन आणि जाणीव निर्माण करून त्यासाठी प्रशिक्षण देणे.

टिपा




आकृती ११.५ : भारतीय जैविक संपदा

टेबल क्र. ११.३ भारतीय जैवसंपदा

| अ.न. | नाव | राज्य |
|---|---|---|
| १ | निलगिरी | तामिळनाडू, केरळ, कर्नाटक |
| २ | मानारचे आखात | तामिळनाडू |
| ३ | सुंदर वन | पश्चिम बंगाल |
| ४ | नंदा देवी | उत्तरांचल |
| ५ | दिहँग दिबाँग | अरुणाचल प्रदेश |
| ६ | पंचमढी | मध्य प्रदेश |
| ७ | सिमलीपाल | ओरिसा |
| ८ | अचानकमल अमरकंटक | मध्यप्रदेश छत्तीसगड |

| | | |
|---|---|---|
| ९ | मानस | आसाम |
| १० | कांचनगंगा | सिक्कीम |
| ११ | अगस्थिमल | केरळ |
| १२ | ग्रेट निकोबार | अंदमान आणि निकोबार |
| १३ | नॉक्रेक | मेघालय |
| १४ | दिब्रु साईखोवा | आसाम |
| १५ | कच्च्छचे वाळवंट | गुजरात |

## ११.४ जैवविविधता संवर्धनाची आवश्यकता :

याच पाठातील ११.१ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे जैवविविधता म्हणजे एकूण असणाऱ्या पेशी, विविध प्रकार यांची एक परिसंस्था. पृथ्वीवर आपल्या अस्तीत्त्वासाठी जैविविधता आवश्यक आहे. आपणास अन्न, पाणी, निवारा आणि तंतूमय पदार्थांची आवश्यकता असते. या सर्व बावी परस्पर संबंधी आणि परस्परांवर अवलंबून असतात. यातील एखादा घटक जरी विचलित झाला तरी त्याचा विपरित परिणाम अन्य घटकावर होतो. जर आपण नैसर्गिक वनस्पती व वन्यप्राणीजीवन सुरक्षित ठेवले तर त्यांचा आपल्याला उपभोग घेता येईल. निसर्गाशी सुसंवाद साधण्याची हीच वेळ आहे. वनस्पती हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. तो कशाप्रकारे आहे ते पाहू.

१. वनस्पती या जैवविविधतेतील मूलभूत घटक आहेत. वनस्पतीशिवाय अन्न आणि ऑक्सिजन नसल्यास प्राणी आणि सूक्ष्म जीवसृष्टी ही नष्ट होईल.

२. वाहते पाणी आणि वाऱ्याबरोबर होणारी धूप थांबते. वनस्पतींची मुळे मृदेचे कण घट्ट राखतात.

३. जलचक्रामध्ये वनस्पतींचे महत्त्व अनन्यसाधारण हे जमीन आणि वातावरणामधील वनस्पती या दुवा आहेत. जमिनीतून घेतले जाणारे बाष्प पानांद्वारे वातावरणाला पुरविले जाते.

४. वनस्पतींच्या आच्छादनामुळे भूपृष्ठीय प्रवाहाचा वेग कमी केला जातो.

५. कार्बनचे शोषण आणि ऑक्सिजनचा पुरवठा वनस्पतींमुळेच होतो. अनेक प्रदुषके वनस्पतींमुळेच कमी होतात.

६. हरितगृहरिणाम हा वनस्पतींमुळे स्थीर होतो. वनस्पती संपुष्टात आल्या तर हरितगृहवायुची भर पडेल.

७. वन्य प्राण्यांच्या अस्तीत्वामुळे समतोल अन्न शृंखला तयार होते त्यातूनच परिसंस्थेचे संतुलन टिकते.

८. काही सूक्ष्मजीव पर्यावरण स्वच्छतेचे तसेच मृदेची उत्पादनक्षमता वाढविण्याचे काम करतात. काही वनस्पतीचे औषधी महत्त्व आहे.

आता तुमच्या लक्षात आलेले असेल की जैविविधता ही काही राष्ट्रीय किंवा जागतिक वारसा म्हणून नाही तर पृथ्वीवरील सर्वसामान्य माणसांच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग आहे.

जगाचे नागरिक म्हणून आपली जबाबदारीची सकारात्मक भूमिका पहिजे. संपूर्ण जगानेच जैव संवर्धनाची जबाबदारी उचलली पाहिजे.

### जैवविविधतेतील जन सहभाग
### (एक अभ्यास)

राजेंद्रसिह या पंचवीस वर्षाच्या युवकाने नोकरीचा त्याग करून खेड्याच्या विकासासाठी स्वत:ला झोकून घेतलं. सोबत चार जणांना घेवून बसमधून निघाले ते अलवार नजीकच्या खेड्यात पोहचले. अलवार येथे मुक्त खाणी आणि मुक्त वने होती. वनांची तोड करून पाणलोट क्षेत्राला धोका निर्माण केला. नदी प्रवाह कोरडे पडले तसेच तेथील शेती विचलित केली. मान्सूनमुळे पुराची भिती निर्माण झाली. ही संकटे झेलत तेथील पुरुष मंडळी शहरात नोकरीच्या शोधात गेली व स्त्रीया पाण्यासाठी दिवसभर मैलोनमैल वणवण फिरू लागल्या व कोरडवाहू शेतीत जमेल ते उत्पादन घेवू लागल्या. हे चित्र सन १९८५ मध्ये राजेंद्रसिह जेव्हा पहिल्यांदा त्या खेड्यात आले तेव्हाचे ते चित्र होते. यापूर्वी राजेंद्रसिह आदिवासींच्या बरोबर काम करताना नैसर्गिक संपदा आणि त्यांचे नियोजन करण्याचा प्रयत्न करीत होते.

तेथील जुन्या जाणकार ग्रामस्थांशी विचार विनिमय केला आणि जुने जोहाड दुरुस्त कसे कसे करता येतील याबाबतचा विचार समजून घेतला. ग्रामस्थांमध्ये जनजागृती करून ग्रामस्वावलंबन योजनेअंतर्गत उन्हाळ्यामध्ये चाळीस दिवस शंभर खेड्यात ही जागृती केली. यामध्ये ग्रामस्वावलंबन, मृदासंधारण, आधुनिक बियाणे, वनौषधी, श्रमदान इ. कार्यक्रम राबविले गेले. हे सर्व करताना परंपरांचा समन्वय साधला. ८६०० जोहाड (जल पुनर्भरण) तयार करून क्रांती घडविली व जलसंधारण केले. १०५८ खेड्यांच्या सुमारे ६५०० चौ. कि. मी. क्षेत्रामध्ये हा बदल घडवून आणला. त्यापैकी ३५०० जोहाड TBS च्या माध्यमातून केली. उरलेली उत्फुर्तपणे ग्रामस्थांनीच तयार केली.

अरवलीच्या भागातील १०५८ खेड्यांना दिलेले हे वरदान लोकांचे जीवनमान बदलून गेले. राजेंद्रसिहची दृष्टी, कठोर परिश्रम व अपाण कष्ट करण्याच्या वृत्तीमुळेच हे शक्य झाले. वाळवंटातील जमिनीचे उत्तम शेतीमध्ये, घनदाट अरण्यांमध्ये रुपांतर झाले. तेथेच अभयारण्ये झाली, तेथील कोरड्या नद्या खळखळ वाहू लागल्या. पाण्यामुळेच जलचर, पक्षालये उभी राहिली. शुष्क वाळवंट सजीव झाले.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

निसर्ग वाचविण्यासाठी आपण खूप काही करू शकतो. जे काही निसर्गाकडून हिरावून घेतलेले आहे ते निसर्गाला परत देण्याचा पयत्न करा. एक झाड जर तोडले तर त्या जागी दोन रोपटी लावा. प्राणी ज्यांना तोंडही लावत नाहीत. अशा गोष्टी खरेदी करा. कागदाचा दुरुपयोग करू नका. कागदाचा पुनर्वापर करा.

## ११.२ कार्य :

राज्यातील पाणथळ जागा तुमच्या ठिकाणापासून किती अंतरावर आहेत त्याचा शोध घ्या.

## पाठावरील प्रश्न ११.३

**१. कंसात दिलेल्या शब्दांमधून अचूक शब्द घेवून विधाने पूर्ण करा.**

१. सध्या अभयारण्यांची संख्या .......... इतकी आहे. (४४१ / ५५१)

२. आसाममध्ये .......... हे भारतीय गेड्यांचे प्रसिद्ध ठिकाण आहे. (मानस / काझिरंगा)

३. हरिके पाण्यथळ ठिकाण .......... राज्यात आहे. (पंजाव / हिमाचल प्रदेश)

४. तामिळनाडूमधील .......... येथे जैवसंग्रह आहे. (मनारचे आखात / पंचमढी)

**२. व्याख्या लिहा. पाणथळ ठिकाण**

______________________________

३. तुमच्या परिसरातील जैवविविधता टिकविण्यासाठी तुम्ही केलेले कोणतेही तीन प्रयत्न लिहा.

१. ______________________________

२. ______________________________

३. ______________________________

## आपण काय शिकलो?

- ज्या ग्रहावर प्रचंड जैवविविधता आहे. त्या ग्रहावर आपण आहोत हे आपले भाग्य आहे.
- निसर्गातील अविभाज्य घटक म्हणून आपण तो टिकविला पाहिजे.
- जैविक विविधता आणि त्याची पुनर्निर्मिती करता येत नाही. यासाठी सर्वांनीच काळजी घ्यावी.
- नैसर्गिक वनस्पती व वन्यप्राणीजीवन हे जैवविविधतेतील महत्त्वाचे घटक आहेत.
- भारत हा जगातील १२ महा जैवविविधता असणाऱ्या देशातील समृद्ध नैसर्गिक वनस्पतींचा वारसा लाभलेला देश आहे.
- नैसर्गिक संपदांचे रक्षण करणे गरजेचे आहे. त्यासाठी धोका वाटणारी ठिकाणे शोधा.

## सत्रांत अभ्यासक्रमावरील प्रश्न

१. व्याख्या लिहा. "जैवविविधता" नैसर्गिक वनस्पती, वन्य प्राणी जीवन व सूक्ष्मजीव सृष्टी यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

२. भारतातील उष्ण सदाहरीत वनांची वैशिष्ट्ये लिहा आणि त्यांचे वितरण स्पष्ट करा.

३. भारतातील आर्द्र पानझडी आणि शुष्क पानझडी वनांमधील कोणतेही दोन फरक स्पष्ट करा.

४. भारतातील जैवसंग्रह स्थापन करण्याचे तीन प्रमुख हेतू स्पष्ट करा.

५. जैवविविधता ऱ्हासाची कोणतीही चार कारणे लिहा.

६. नैसर्गिक वनस्पती, वन्य प्राणी जीवन व सूक्ष्म जीवसृष्टीचे संवर्धन करण्याची गरज सुयोग्य कारणांसह लिहा.

७. खालील सारणीचा अभ्यास करून उत्तरे लिहा.

| नैसर्गिक क्षेत्र / अभयारण्ये | प्राण्यांचे संरक्षित क्षेत्र |
|---|---|
| १. काझिरंगा | १. वाघ |
| २. मानस | २. हत्ती |
| ३. पेरियार | ३. कस्तुरी मृग |
| ४. कॉर्बेट | ४. सिंह |
| ५. दाचिग्राम | ५. गेंडा |
| ६. गवा | |
| ७. पँथर | |
| ८. अस्वल | |

अ) अभयारण्ये आणि प्राणी यांच्या जोड्या जुळवा.

ब) कोणत्या प्राण्याचा समावेश अभयारण्यात होत नाही त्याभोवती वर्तुळ काढा.

क) एकापेक्षा अधिक अभयारण्यात समावेश असलेल्या प्राण्यांची नावे लिहा.

८. नकाशा क्र. ११.३ च्या संदर्भानुसार उत्तरे लिहा.

अ) आपल्या राज्यातील नैसर्गिक वनस्पतींचे प्रकार लिहा.

ब) कोणत्या राज्यात काटेरी वने आढळतात.

क) भरती ओहोटीची वने कोठे आढळतात आणि त्याच भागात ती मर्यादित क्षेत्रात का आढळता?

## पाठावरील प्रश्नांची उत्तरे

**११.१**

१. जैवविविधता हे पृथ्वीवरील सजीवसृष्टीचे मूळ आहे. सजीवाला अन्न, पाणी, धागे, इंधन इ. चा पुरवठा होतो तसेच हवामान रोगराई यांचे नियमन होते.

२. लक्षवेधक ठिकाणे जेथे काही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यापैकी काही ठिकाणी तुरळक अशा प्रजाती टिकून आहेत.

**११.२**

१. ज्या प्रदेशातील तापमान आणि आर्द्रता अधिक आहे तेथे वनस्पती वर्षभर हिरव्या आढळतात. तेथील वृक्षांची पाने एकाच हंगामात गळत नाहीत म्हणून त्यांना सदाहरित म्हणतात.

२. १. भरती ओहोटीची वने देशाच्या पूर्वकिनारपट्टीवर असून वादळांपासून किनारपट्टीचे रक्षण होते. अलिकडच्या काळात झालेल्या निर्वनीकरणामुळे वादळांपासून मोठ्या प्रमाणात हानी होत आहे.

२. उष्ण प्रदेशीय सदाहरित वने घनदाट आणि मिश्र स्वरूपाची असतात. एकाच जागेवर विविध प्रकारचे वृक्ष आढळतात. त्यामुळे व्यापारी तत्त्वावर त्यांची तोड करता येत नाही. हिमालयीन वने कमी गर्दीची तसेच तेथे एकाच प्रकारच्या जाती एका जागेवर आढळतात.

**११.३**

१. अ) ५५१

ब) पंजाब

क) मानारचे आखात

२. पाणथळ जागा म्हणजे ज्या भूमिवर कायम किंवा विशिष्ट काळात दलदल असते. अशी ठिकाणे उथळ सरोवर आहेत.

३. आपल्या परिसरातील जैव विविधता टिकविण्यासाठी काही उपाय

१) वृक्षतोड थांबविणे, २) अधिक वृक्षांची लगवड करणे, ३) सर्व प्राण्यांचे रक्षण करणे. ४) प्राणी व पक्षांची औषधालये स्थापन करणे, ५) पर्यावरणाची हानी होईल असा कचरा फेकू नका.

# १२
# भारतीय शेती

मागील पाठामध्ये आपण भारतीय प्राकृतिक रचना, हवामान, नैसर्गिक वनस्पती यांची माहिती घेतलेली आहे. सदरच्या प्रकरणामध्ये आपण भारतीय शेती बद्धल माहिती मिळवू. भारतीय शेती ही देशाच्या आर्थिक विकासाचा कणा समजला जाते. भारतीय लोकसंख्येतील ७०% लोक शेतीवर आपली उपजीविका करतात. शेती हा भारतीय लोक संख्येचा अविभाज्य घटक आहे. मानवाची आणि प्राण्यांची प्राथमिक गरज शेतीतूनच भागविली जाते. अनेक उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा केला जातो. भारतीय भौगोलिक परिस्थिती ही वैशिष्ट्यपूर्ण असून शेतीस सुयोग्य आहे. सुपिक मैदानी प्रदेश, पिकांसाठी आवश्यक असणारा दीर्घकाळ, तसेच देशामध्ये हवामानाची विविधता आहे. या बरोबरच उत्पादन वाढीसाठी शास्त्रीय आणि तांत्रिक ज्ञानाचा अधिक उत्पादनवाढीसाठी प्रयत्न सुरू आहे.

या प्रकरणामध्ये आपण शेतीचे विविध प्रकार, पिकांचे प्रकार आणि प्राकृतिक घटकांचा असलेला सहसंबंध पाहू. तसेच भारतीय शेतीला भेडसवणाऱ्या विविध आव्हानांचाही अभ्यास पाहू.

## उद्दिष्टे :

सदरच्या पाठ्यअभ्यासानंतर पुढील गोष्टी समजतील.

- ❖ भारतीय शेती प्रकारांचे स्पष्टीकरण
- ❖ भारतीय शेतीच्या वैशिष्ट्यांचे वर्णन
- ❖ पिकांची उपयोगिता आणि प्रमुख पिके
- ❖ मृदेचे प्रकार आणि हवामान स्थितीचा भारतीय पिकांशी संबंध
- ❖ नकाशा आराखड्यात प्रमुख पिके दर्शविणे.
- ❖ भारतीय शेतकऱ्यांना जाणवणाऱ्या समस्यांचे परीक्षण

## १२.१ भारतीय शेतीचे प्रकार :

आपणास माहीत आहे की भारतीय भूमी विविधतेची आहे हे आपण प्राकृतिक रचनेच्या प्रकरणामध्ये शिकलेला आहात. देशाच्या उत्तरेस हिमालयाच्या रांगा जर्म्मूकाश्मिरपासून ते अरुणाचल प्रदेशापर्यंत आहेत. पूर्वेस पूर्व घाट तर पश्चिमेस पश्चिम घाट आहे. गंगेचे मैदान हे जगातील सर्वात मोठे मैदान

आहे हे आपणास माहीत आहे? देशाचा मध्यवर्ती भाग हा पठाराचा आहे. प्राकृतिक रचनेबरोबर हवामानातही विविधता आहे; तसेच मृदेच्या प्रकारात विविधता आहे. ही विविधता केवळ प्राकृतिक घटकातच आहे असे नसून जलसिंचन, यांत्रिक वापर, हायब्रीड प्रकारच्या जास्त उत्पादन देणारी बियाणे, कीटक नाशकांचा वापर अशा प्रकारे शेती क्षेत्रामध्ये नव्याने बदल होत आहे. देशातील प्रमुख शेतीचे प्रकार खालील प्रकारे.

१. **उदरनिर्वाहक आणि व्यापारी शेती :** देशातील शेतकरी प्रामुख्याने उदरनिर्वाह शेती करतात. म्हणजेच मिळणारे उत्पादन स्वत:साठीच वापरले जाते. थोडक्यात शेतीतील उत्पादन शेतकरी स्वत:च्या कुटुंबासाठीच उपयोगात आणतात मात्र विक्रीसाठी उत्पादन शिल्लक नसते. उदरनिर्वाहक प्रकारच्या शेतीतील शेतांचा आकार लहान असतो. जमिनीचे तुकडीकरण झालेले आहे. शेतीचे पारंपारिक व साधे तंत्र वापरले जाते. म्हणजेच आधुनिक ट्रॅक्टरसारख्या यंत्रांचा अभाव असतो. रासायनिक खते, औषधे, जंतुनाशके, कीटक नाशके वापरली जात नाहीत. शेतीमधून अन्नधान्ये, तेलबिया, द्वीदल धान्ये, भाजीपाला, ऊस अशी पिके घेतली जातात.

२. **व्यापारी शेती :** ही शेती उदरनिर्वाह शेतीपेक्षा भिन्न स्वरूपाची आहे. या शेतीतील उत्पादने बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी घेतली जातात. शेतीमध्ये जलसिंचन, रासायनिक खते, कीटकनाशके, जंतुनाशकांचा तसेच अधिक उत्पादन देणाऱ्या बियाण्यांचा वापर केला जातो. कापूस, ताग, ऊस, भूईमूग ही व्यापारी पिके आहेत. हरियानातील भात शेतीही व्यापारी हेतूने केली जाते. प्रत्यक्षात लोकांच्या आहारामध्ये सर्वाधिक प्रमाण हे गव्हाचे आहे. पूर्व आणि ईशान्य भारतात भात पिक हे उदरनिर्वाहक स्वरूपाचे आहे.

३. **सखोल शेती आणि विस्तृत शेती :** या शेतीतील मूलभूत फरक हा जमिनीचे क्षेत्र आणि उत्पादन यामध्ये आहे. समशीतोष्ण क्षेत्रातील यु. एस. ए. कॅनडा आणि सध्याचा रशिया या देशातील विस्तृत शेतीशी भारतीय शेतीची तुलना होवू शकत नाही. ज्या शेती प्रकारात शेताचा आकार मोठा असतो. त्या शेतीला विस्तृत शेती म्हणतात. एकूण मिळणारे उत्पादन अधिक असले तरी दर हेक्टरी उत्पादन कमी असते. विस्तृत शेती ही पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश या ठिकाणी केली जाते. सखोल शेतीतून दर हेक्टरी उत्पादन अधिक घेतले जाते. जपानमध्ये शेतजमिनीचे क्षेत्र कमी असल्याने सखोल शेती केली जाते. भारतामध्येही केरळ राज्यात अशीच स्थिती आहे.

४. **मळ्याची शेती :** ही कृत्रिम शेती असून, स्थापन केलेली शेती आहे. विक्रीच्या हेतूनेच संपूर्ण शेतामध्ये एकाच प्रकारचे पिक घेवून शेती केली जाते. असे उत्पादन घेवून त्यावर प्रक्रीया करून विक्री करण्यासाठीच उत्पादन घेतले जाते. चहा, कॉफी, रबर, केळी, मसाल्याचे पदार्थ ही मळ्याच्या शेतातील पिके आहेत. १९ व्या शतकात ब्रिटिशांनी भारतात या पिकांचा प्रारंभ केला.

५. **मिश्र शेती :** एकाचवेळी पिके घेणे आणि पशुपालन करणे या हेतूने शेती केली जाते. इतर प्रकारापेक्षा मिश्र शेती ही आर्थिक दृष्ट्या उत्तम समजली जाते.

## भारतीय शेती

वरील सर्व वर्गीकरण शेतीचे स्वरूप आणि उत्पादकाचा हेतू या आधारावर आहे. अनेकवेळी त्यांची सरमिसळही होते. उदा. केळीचे उत्पादन हे मळ्याच्या शेतात होते. परंतु त्याचे वर्गीकरण व्यापारी शेती असेही होईल.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

हरितक्रांती : भारतामध्ये कृषीक्षेत्रामध्ये अमूलाग्र बदल घडविणारे तंत्र यामध्ये (१) अधिक उत्पादन देणाऱ्या सुधारित बींबीयाणांचा वापर (२) आवश्यक व खात्रीशीर जलसिंचन सुविधा (३) अधिक उत्पादनासाठी आवश्यक तेवढ्या रासायनिक खतांचा वापर

श्वेतक्रांती : ही दूध उत्पादनाशी संबंधीत आहे. उत्पादन वाढ, राष्ट्रीय दुग्ध उत्पादनाचे जाळे स्थापन करणे, प्रादेशिक आणि हंगामी असमतोल दूर करणे यासाठी ही योजना आहे. तांत्रिक सहाय्याची गुंतवणूक करून (१) युरोपीय जातीच्या संकरणाचा देशीय गाईवर वापर करणे. (२) दूध दीर्घ काळ टिकविण्यासाठी पाश्चरायझेनशन तंत्राचा वापर करणे. (३) ग्रामीण भागातून उत्पादकाकडून दर्जेदार दूध संकलन करणे. (४) दुध शीतकरण वाहनातून रस्ते व लोहमार्गावरून दूरपर्यंत दूध पाठविणे.

**नीलक्रांती** : गोड्या पाण्यात तसेच सागरी पाण्यातील मासेमारीत वाढ करणे.

**पीतक्रांती** : कुक्कुटपाल उत्पादनातील वाढ करून खात्रीशीर पुरवठा करणे.

**गुलाबी क्रांती** : सफरचंद उत्पादन हिमाचल प्रदेश जम्मूकाश्मीर क्षेत्रातील उत्पादनात वाढ करणे.

### १२.१ कार्य :

तुमच्या घरापासून १ कि. मी. क्षेत्रामध्ये कोणकोणती पीके घेतली जातात. व तेथेच ती का घेतली जातात याचे सर्वेक्षण करा आणि सोबतच्या सारणीमध्ये दिल्याप्रमाणे माहिती भरा.

| पीक प्रकार | राज्य | शेती प्रकार | कारण |
|---|---|---|---|
| उदा. सफरचंद | हिमाचल | प्रदेश | व्यापारी हवामान अनुकूलता, बाजारपेठेतील मागणीमुळे मोठ्या प्रमाणातील उत्पादन |
| | | | |

## १२.२ भारतीय शेतीची वैशिष्ट्ये :

अ) **उदरनिर्वाहक शेती :** यापूर्वीच माहिती दिल्याप्रमाणे, भारतीय शेती ही उदरनिर्वाहक स्वरूपाची आहे. देशात शेकडो वर्षापासून या प्रकारची ती केली जाते. आजही देशात मोठ्या प्रमाणात याचा अवलंब केला जातो. अगदी स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही शेती तंत्रामध्ये बदल होवूनही उदरनिर्वाहक क्षेत्र मोठे आहे.

ब) **कृषिक्षेत्रातील लोकसंख्येचा भार :** नागरीकरण, औद्योगिकरण मोठ्या प्रमाणात होत असले तरी शेतातील ७०% लोक थेट शेती क्षेत्राी संबंधित आहेत.

क) **शेतीमधील यांत्रिकीकरण :** हरितक्रांतीचा प्रारंभ सहाव्या दशकाच्या उत्तरार्धात आणि सातव्या दशकाच्या प्रारंभी झाला. सुमारे चाळीस वर्षाच्या हरितक्रांतीमधून कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान, यांत्रिक साधनांचा संपूर्ण वापर हे स्वप्न अजूनही दूर आहे.

ड) **मान्सूनवर परावलंबन :** स्वातंत्र्यानंतर जलसिंचनामध्ये प्रचंड विस्तार झाला. तरी प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्रापैकी एक तृतीयांश एवढेच क्षेत्र जलसिंचनाखाली आहे. याचाच अर्थ की दोन तृतीयांश क्षेत्र मान्सूनवर अवलंबून आहे. आपणास माहीत आहे की मान्सून बद्दल खात्री नाही. हवामान तसेच बदलामुळे अनिश्चितता वाढली आहे.

इ) **विविध पिके :** तुम्ही अंदाज करा की भारतात पिकांची विविदता का आहे? या पाठाच्या प्रारंभीच माहिती दिल्याप्रमाणे, भारतीय प्राकृतिक रचनेतील विषमता, हवामान, मृदा यामध्ये विषमता आहे. जगातील फक्त काही देशातच एवढी विविधता पहावयास मिळेल. पिकांची सविस्तर माहिती घेतल्यानंतर खरे स्वरूप पहावयास मिळेल. टेबल क्र. १ चे निरीक्षण करून कल्पना येईल.

फ) **अन्नधान्य पिकांना प्राधान्य :** देशातील सर्वच भागामध्ये अन्नधान्य पिकांना प्राधान्य दिले जाते. याचे कारण म्हणजे मोठ्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवावे लागते. अलिकडे मात्र अन्नधान्य पिकाखालील क्षेत्र कमी होत आहे कारण इतर व्यापारीकरणांसाठी शेत जमीनीचा वापर वाढत आहे.

ग) **हंगामी स्वरूप :** देशामध्ये पिकांचे तीन प्रमुख हंगाम आढळून येतात. खरीप, रबी आणि इतर. भारतात विशिष्ट पिके तीनही हंगामात पिकविली जातात. प्रामुख्याने भात हे खरीपातील पिक आहे तर गहू हे रब्बी हंगामातील पिक आहे.

### पाठावरील प्रश्न १२.१

१. सखोल शेती आणि विस्तारित शेती यामधील फरक दोन मुद्यांच्याद्वारे स्पष्ट करा.

## भारतीय शेती

२. भारतीय शेतीच्या वैशिष्ट्यांपैकी तुमच्या परिसरातील शेतीसाठी कोणते कारण लागू पडते ते शोधा. (हरियानातील शेती ही यंत्राच्या सहाय्याने केली जाते तसेच जलसिंचन सुविधा असल्याने ती मान्सूवर फारशी अवलंबून नाही.)

## १२.३ भारतातील प्रमुख पिके

भारतात जवळजवळ सर्वच पिके घेतली जातात. याचे काय कारण असेल? जम्मू काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत किंवा पश्चिमेकडे गुजरातच्या किनाऱ्यापासून अरुणाचल प्रदेशापर्यंत शेकडो प्रकारची पिके घेतली जातात. या पिकांचे चार प्रकारामध्ये वर्गीकरण करून त्यांची सविस्तर माहिती घेवू.

**टेबल १२.२**

| अ.न. | पिकांचा प्रकार | उपयुक्तता | प्रमुख पिके |
|---|---|---|---|
| १ | अन्नधान्य पिके | या पिकांचा उपयोग माणसांना अन्नधान्य म्हणून वापरासाठी होतो. | तांदूळ, गहू, मका भरडधान्ये, द्विदल धान्य |
| २ | पैशाची पिके | विक्रीसाठी घेतली जाणारी पिके आहेत तशी किंवा अपूर्ण प्रक्रियेद्वारे विक्रीसाठी पिकविली जातात. | कापूस, ताग, गूळ, तंबाखू, तेलबिया |
| ३ | मळ्यातील पिके | विस्तृत क्षेत्रामध्ये ही पिके घेतली जातात. | चहा, कॉफी, नारळ, रबर इ. |
| ४ | फळफळावळी | फळे आणि भाजीपाला यांचे उत्पादन घेतले जाते. | फळे आणि भाजीपाला. |

### १. अन्नधान्याची पिके :


**भात :** अन्नधान्य पिकांपैकी तांदूळ हे महत्त्वाचे पीक आहे. हे पिक खरीपामध्ये किंवा रब्बी हंगामात घेतात. देशातील लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी एक तृतीयांश क्षेत्रामध्ये हे पीक घेतले जाते आणि भारतीय लोकसंख्येच्या सुमारे निम्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा होतो. देशातील सर्वाधिक लोकसंख्या तांदूळ खाणारी आहे. तांदूळ पिकासाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती तुम्हाला माहीत आहे? उत्पादक प्रदेशाचे भारताच्या नकाशाचे निरीक्षण केल्यास त्यामध्ये तुम्हाला विविधता आढळते. ती पुढीलप्रमाणे.

भात पिकासाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती

अ) **तापमान :** भात पिकासाठी आर्द्र हवामान लागते. तापमान २४° से. पर्यंत मासिक सरासरी तापमान २२° से. ते ३२° से. दरम्यान असावे.

ड) **पर्जन्य :** १५० से.मी. ते ३०० से.मी. पर्यंत पर्जन्य आवश्यक परंतु पंजाब हरियाना किंवा पश्चिम उत्तर प्रदेशात १०० से. मी. पेक्षाही कमी असतो तेथे जलसिंचनावर भात शेती केली जाते.

क) **मृदा :** विविध प्रकारच्या मृदेमध्ये भात शेती होत असली तरी गाळाची, लोम प्रकारची मृदा उत्तम ठरते. सर्वसाधारणपणे मैदानी प्रदेशात हे पिक घेतले जात असले तरी कुट्टीनाड केरळ या केरळमधील समुद्रपातळीपेक्षाही खाली असलेल्या क्षेत्रात तसेच ईशान्यकडील पायऱ्याच्या उतारावर आणि काश्मीरच्या खोऱ्यातही पिक घेतले जाते.




आकृती १२.१ : भारतभात उत्पादक क्षेत्र

ड) **मजूर :** भात पिकासाठी सहज उपलब्ध होणारा मजूर वर्ग लागतो त्यामुळे मजूर उपलब्ध असणाऱ्या क्षेत्रामध्ये पिक घेतले जाते. यांत्रिकीकरणाचा उपयोग या पिकासाठी होत नाही.

इ) **वितरण :** भात शेती जवळपास सर्वच राज्यांमध्ये कली जाते. प्रामुख्याने तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, बिहार, झारखंड, उत्तरांचल, छत्तीसगड, पंजाब, ओरिसा, उत्तरप्रदेश, कर्नाटक, आसाम, महाराष्ट्र ही भात उत्पादक राज्ये आहेत. हरियाना, मध्यप्रदेश, केरळ, गुजरात, काश्मीरचे खोरे यामध्येही भाताचे उत्पादन घेतले जाते.

### २. गहू :

भाताच्या खालोखाल भारतात गहू उत्पादन घेतले जाते. गहू हे रब्बी किंवा हिवाळ्यातील पिक आहे. हिवाळ्याच्या प्रारंभी पिकाची पेरणी करतात आणि उन्हाळ्यापूर्वी कापणी होते. पिकाची पेरणी उत्तरेकडे ऑक्टोबर, नोव्हेंबर या महिन्यात होते तर कापणी मार्चएप्रिल महिन्यात होते. भारताच्या उत्तर तसेच वायव्य क्षेत्रातील लोकांचे प्रमुख अन्न आहे. हे पिक तांदळासारखे नसून गव्हाचे उत्पादन रब्बी किंवा हिवाळ्यामध्येच घेतले जाते.

गव्हासाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती

अ) **तापमान :** गहू हे मध्य कटिबंधातील गवताळ प्रदेशातील पिक आहे. यासाठी थंड हवामान लागते. साधारण तापमान १०° ते १५° से. पर्यंत पेरणीच्या काळात आणि कापणीच्या वेळी २१ ते २६° से. तापमान आवश्यक असते.

ब) **पर्जन्य :** साधारणपणे ७५ से. मी. पर्यंत पर्जन्य असलेल्या प्रदेशात पिक घेतले जाते. १00 से. मी. सरासरी पर्जन्य ही मर्यादा आहे. १00 से. मी. पेक्षा अधिक पर्जन्य असणाऱ्या प्रदेशात तांदूळ हे पिक घेतले जाते. ७५ से. मी. पेक्षा कमी पर्जन्य असलेल्या प्रदेशात जलसिंचनावर पिक घेतले जाते. पिकाच्या वाढीच्या काळात हलका पाऊस उत्तम ठरतो. पिकाचा बहर असताना गोठणारे हवामान अथवा परीपक्व होण्याच्या काळात गारांच्या वृष्टीमुळे पिकांचे नुकसान होते.

क) **मृदा :** गहू हे विविध मृदेमध्ये येत असते. तरी पाण्याचा निचरा होणारी सुपिक लोममृदा आणि गाळीची मृदा पिकास उत्तम ठरते. गव्हाच्या पिकासाठी मैदानी प्रदेश अधिक अनुकूल ठरतात.


ड) **मजूर :** गहू हे पिक विस्तृत शेतीमधील व यांत्रिकी करणाने घेता येत असल्याने कमी मजूर लागतात.

इ) **वितरण :** उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाना, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र ही राज्ये आहेत. यु. पी., पंजाब, हरियाना मिळून एकूण उत्पादनाच्या ६६% उत्पादन मिळते. (आकृती १२.२)

### ३. भरड धान्ये :

उबदार हवामानातील अल्पकाळात येणारी पिके आहेत. ही अन्नधान्य आणि जनावरांसाठीही उपयोगी असणारी धान्य पिके आहेत. प्रामुख्याने खरीप हंगामात घेतली जाणारी पिके आहेत. मे ते ऑगस्टपर्य

त पेरणी केली जाते तर ऑक्टोबर नोव्हेंबरपर्यंत कापणी होते. भारतात विविध प्रकारची भरडधान्य पिके घेतली जातात. भरडधान्ये हे गरीबाचे अन्नधान्य असून या पिकांना स्थानिक वेगवेगळ्या नावाने ओळखतात. ज्वारी, बाजरी, रागी, कोरा, कोडाम, हटका, भौरी, राजगिरा इत्यादी. भारतात ज्वारी, बाजरी, नाचणी इत्यादी पिके विविध ठिकाणी घेतली जात असली तरी या पिकाखालील क्षेत्र फार मोठ्या प्रमाणात कमी होत आहे.




आकृती १२.२ : भारत गहू उत्पादक क्षेत्र

**भरड धान्ये पिकासाठी आवश्यक असणारी परिस्थिती**

अ) **तापमान :** साधारणपणे २५° ते ३२° से. तापमान असलेल्या ठिकाणी हे पिक घेतले जाते.

ब) **पर्जन्य :** ५० ते १०० से. मी. पर्जन्य चालतो त्यामुळे ही पिके कोरड वाहू क्षेत्रातील आहेत.

क) **मृदा :** हे पिक कोणत्याही मृदेमध्ये येते अगदी सर्वसाधारणपणे गाळाच्या मृदेपेक्षा लोम प्रकारच्याही मृदेत येते.

ड) **वितरण :** ज्वारीबाजरीचे पिक उत्तर आणि दक्षिण भारतात होते. परंतु नाचणी मात्र दक्षिण भारतात होते. ज्वारी बाजरीचे उत्पादन मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, हरियाना, पंजाब या राज्यात मिळते. तर नाचणीचे उत्पादन तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र या दक्षिणेकडील राज्यात मिळते.

### ४. द्विदल धान्ये :

शाकाहारी लोकांच्या आहारात प्रोटिन्स देणारी डाळवर्गीय अन्नधान्ये आहेत. मांस आणि मासे खाणाऱ्या लोकांच्या आहारात जाणाऱ्या प्रोटिन्सपेक्षा डाळींच्या आहारातून कमी प्रोटिन्स जातात. जनावरांना याचा पुरक आहार दिला जातो. द्विदल वर्गातील पिकांमुळे मृदेला नत्राचा पुरवठा होतो व मृदेची उत्पादकता टिकविण्याचा प्रयत्न केला जातो. द्विदल धान्ये प्रकारची विविध पिके भारतात घेतली जातात. हरभरा, तूर उडिद, मूग, मसूर, कुळीथ, वाटाणा इत्यादी पिके डाळ वर्गीय आहेत. वरीलपैकी हरभरा आणि तूर ही अधिक महत्त्वाची पिके आहेत.

हरभरा : सर्व द्विदल धान्य प्रकारात सर्वात महत्त्वाचे पिक आहे. या पिकाखाली एकूण कडधान्य पिकांपैकी ३०% क्षेत्र असून एकूण द्विदलधान्य प्रकारात ३७% उत्पादन हरभऱ्याचे आहे. हे रब्बी हंगामातील पीक असून सप्टेंबर दरम्यान पेरणी करून फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान कापणी होते. हे पिक स्वतंत्रपणे घेतले जाते किंवा गहू, सातू किंवा मोहरीच्या पिकाबरोबर घेतले जाते.

पिकांसाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती

अ) **तापमान :** तापमानाच्या विविधतेमध्ये पिक घेतले जात असले तरी मध्यम व कोरडे हिवाळे व तापमान सरासरी २०° ते २५° से पर्यंत असावे.

ब) **पर्जन्य :** सरासरी ४० ते ४५ से. मी. पर्जन्य पुरेसा असतो.

क) **वितरण :** देशातील विविध भागात हरभरा पिक येत असले तरी देशातील ९०% उत्पादन पाच राज्यांमधून मिळते. मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, राजस्थान, हरियाना, महाराष्ट्र ही प्रमुख राज्ये आहेत.

### तुम्हास हे माहित आहे का ?

१. भात आणि गहू ही पिके संवेदनशील असून भरड धान्ये ही सहनशील पिके आहेत.

२. भरड धान्यांचा भारतातील लोकांच्या आहारातील समावेश ही परंपरा होती पण सध्या तांदूळ आणि गव्हाचा समावेश वाढलेला आहे.

३. लोकांची जीवनशैली बदलल्याने अनेक आजार वाढत आहेत. या रोगांवर उपचार म्हणून भरड धान्याचा आहारात समावेश करण्याची शिफारस केली जात आहे कारण त्यामध्ये तंतुमय पदार्थांचा समावेश आहे.

### १२.२ कार्य :

१. भात, गहू व भरडधान्यांचा आहारात समावेश असणाऱ्या भारतातील राज्यांचा शोध घ्या. व खालील राज्यांसमोर प्रमुख अन्नधान्यांची नावे लिहा.

| राज्य | प्रमुख धान्य |
|---|---|
| राजस्थान | गहू, बाजरी |
| कर्नाटक | |
| तुमचे राज्य | |

२. भारताचा नकाशा आराखड्यामध्ये (दोन छटांचा वापर करून) तांदूळ आणि गहू यांचा प्रमुख अन्नधान्ये म्हणून वापर करणारा प्रदेश दाखवा.

## २. रोख पैशाची पिके :


या प्रकरणाच्या प्रारंभीच पैशांची पिके म्हणजे ज्या पिकांची उत्पादने बाजारपेठेत कच्च्या स्वरूपात किंवा अर्धप्रक्रीया करून विक्री केली जाते. या प्रकरणामध्ये काही निवड पिकांची माहिती पहाणार आहोत. ऊस कापूस, ताग आणि चहा कॉफी ही पेय पिके आणि भूईमूग, मोहरी, तीळ या तेलबिया.

१. **ऊस :** ऊस हे साखरेशिवाय दैनंदिन जीवन शक्य आहे काय? जवळजवळ अशक्य आहे. ऊस हे बांबू वर्गातील पीक आहे. त्याचे मूळ भारत असावे. खरीपातील पिक असून गुळ, साखर, खांडसरी उत्पादनाचा कच्चा माल आहे. अल्कोहोलसाठी लागणारा कच्चा माल यातूनच तयार होतो. ऊसाच्या गाळपानंतरच्या चौथ्यापासून बायोगॅस मिळतो तसेच त्याचा उपयोग कागद उद्योगामध्ये होते. पेट्रोलियम उत्पादनाचा पर्याय म्हणून वापरात येतो तसेच अनेक रासायनिक उत्पादने तयार केली जातात. ऊसाचा काही भाग जनावरांना चारा म्हणून उपयोगी पडतो.

ऊस उत्पादनासाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती

अ) **तापमान :** साधारणपणे उष्ण आणि दमट हवामान उत्तम व सरासरी तापमान २१° ते २७° से. पर्यंत असावे.

ब) **पर्जन्य** ः ७५ ते १५० से. मी. पर्जन्य ऊस उत्पादनास अनुकूल ठरतो. आवश्यक असणारा पर्जन्य नसल्यास जलसिंचन सुविधा करावी लागते.




आकृती १२.३ : भारत प्रमुख ऊस उत्पादक क्षेत्र

**क)** **मृदा :** ऊस हे पिक विविध प्रकारच्या मृदेतून येते. फक्त ओलावा टिकवून ठेवणारी मृदा आवश्यक असते. लोम प्रकारची मृदा पिकाच्या वाढीसाठी सुयोग्य ठरते. नायट्रोजन, फॉस्फरस कॅल्शियम प्रमाणाधिक्य असणाऱ्या मृदा उत्तम परंतु ॲसिड किंवा अल्कलीचे प्रमाण अधिक असणाऱ्या मृदा नसाव्यात. सपाट मैदानी मृदा जलसिंचन आणि ऊस वाहतुक करण्यास सुयोग्य असतात. ऊसासाठी भरपूर सेंद्रिय आणि रासायनिक खते लागतात. कारण मृदेच्या उत्पादक घटकाचे मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते.

**ड)** **मजूर :** ऊस शेतीसाठी स्वस्त मजूर आवश्यक असतो. ऊस तोडणी, ऊस वाहतुक इत्यादीसाठी मनुष्यबळ आवश्यक असते.

**इ)** **वितरण :** जगात भारतातील सर्वाधिक क्षेत्र ऊस पिकाखाली आहे. ब्राझिल नंतर भारताचा ऊस उत्पादनात क्रमांक लागतो. भारतात पिकांचे वितरण तीन भौगोलिक विभागात स्पष्टपणे दिसून येते.

१. सतलज गंगाखोऱ्याचा पंजाबपासून बिहारपर्यंत देशातील ऊसाचे ५१% क्षेत्र व्यापलेले असून सुमारे ६0% ऊस उत्पादन मिळते.

२. कापसाच्या काळ्या मृदेचे महाराष्ट्र ते तामिळनाडूपर्यंत आणि पश्चिम घाटाच्या पूर्व उताारावरील क्षेत्र

३. कृष्णा नदी काठचा प्रदेश आंध्र प्रदेशातील किनारपट्टीचे क्षेत्र

## २. कापूस :

कापसाचे भारतातील प्रमुख पिक असले तरी जगामध्ये अनेक देशात उत्पादन घेतले जाते. कापड गिरण्यांसाठी कच्च्या मालाचा पुरवठा होतो त्याचप्रमाणे कापसाच्या बियांचा उपयोग वनस्पती तूप उद्योगामध्ये केला जातो. दूध उत्पादन वाढीसाठी कापसाच्या बियांचा जनावरांचे खाद्य म्हणून उपयोग केला जातो. दूध उत्पादन वाढीसाठी कापसाच्या बियाचा उपयोग सरकी पेंड म्हणून केला जातो. कापसाचे उत्पादन उष्ण व उपोष्ण प्रदेशात घेतले जाते.

**भौगोलिक परिस्थिती :**

**अ)** **तापमान :** कापूस हे उष्ण व उपोष्ण हवामानातील पिक असून वर्षभर जास्त तापमान सरासरी २१° से. ते ३0° से. पर्यंत असावे.


**ब)** **पर्जन्य :** ज्या क्षेत्रामध्ये वर्षातील २१0 दिवसांपेक्षा अधिक दिवस गोठणमुक्त असावेत.

सरासरी पर्जन्य ५0 ते १00 से. मी. आवश्यक असला तरी ५0 से. मी. पेक्षाही कमी पर्जन्य क्षेत्रामध्ये जलसिंचनावर पिक घेतले जाते. पिक लागवडीच्या काळात भरपूर पर्जन्य आणि पिक परिपक्वतेच्या काळात प्रखर सूर्यप्रकाश लागतो.

**क)** **मृदा :** कापसाची लागवड काळ्या मृदेमध्ये होते. दख्खनच्या पठारी भागात तसेच माळव्याच्या पठारावर अशा मृदा आहेत. गाळाची मृदा सतलज गंगेच्या मैदानात तसेच द्विपकल्पीय क्षेत्रामध्ये तांबडी व जांभी मृदा आहे तेथेही पिक घेतले जाते.

ड) **मजूर :** कापूस वेचणी ही सध्या तरी यंत्राने शक्य नाही. त्यामुळे कापूस वेचणीसाठी स्वस्त व कार्यक्षम मजूरांची आवश्यकता असते.

इ) **वितरण :** भारताचे कापूस पिकाखालील जगात सर्वाधिक क्षेत्र असून चीन आणि यु, एस. ए. नंतर भारताचा उत्पादनात तीसरा क्रमांक लागतो. देशातील चार राज्यांमध्ये दोन तृतीयांश क्षेत्र असून दोन तृतीयांश उत्पादन मिळते. पंजाब, महाराष्ट्र, गुजरात, हरयाना ही प्रमुखे उत्पादक राज्ये आहेत.




आकृती १२.४ : भारत प्रमुख कापूस उत्पादक क्षेत्र

## ३. तेलबीया :

भारतातील महत्त्वाचे व्यापारी पिक आहे. प्रत्यक्षात जगात भारताचे तेलबिया उत्पादनाखालील सर्वाधिक क्षेत्र आहे. तेलबियांपासून खाद्यतेल मिळतेच परंतु त्याशिवाय हायड्रोजनेटेड ऑईल, पेन्ट, वॉर्निश, सावण, वंगण इत्यादी उत्पादनाचा कच्चा माल म्हणून वापरला जातो. तेल काढल्यानंतरचा भाग हा जनावरांची पेंड म्हणून उपयोगात आणला जातो. तसेच त्याचा उपयोग खतासाठीही होतो.

**भूईमूग :** भारतातील महत्त्वाचे पिक आहे. खरीप आणि रब्बी हंगमाध्ये उत्पादन घेतले जात असले तरी खरीपातील उत्पादन ९० ते ९५% मिळते.

**भौगोलिक परिस्थिती ः**

अ) **तापमान :** उष्ण प्रदेशीय हवामान अनुकूल ठरते. साधारणपणे २०° से. ते ३०° से. तापमान असावे लागते.

ब) **पर्जन्य ः** सर्वसाधारणपणे ५० ते ७५ से. मी. पर्जन्य भूईमूग उत्पादनास अनुकूल ठरतो. धुके, दीर्घकाळ कोरडा हंगाम, सतत पाऊस किंवा पाणी साठवणारे क्षेत्र याचा परिणाम होतो. परिपक्वतेच्या काळात कोरडा हिवाळा हा उत्तम समजला जातो.

क) **मृदा :** पाण्याचा निचरा होणारी वालुकामय मृदा, तांबडी किंवा पिवळ्या तसेच काव्या मृदेत पिक उत्तम येते.

ड) **वितरण :** तेलबिया प्रकारामध्ये भारतातील निम्मे उत्पादन भूईमूगाचे आहे. जगात भूईमूग उत्पादनात भारताचा प्रमुख क्रमांक लागतो. जगातील उत्पादनापैकी एक तृतीयांश उत्पादन भारतात होते. आंध्र प्रदेश, तामिळनाडू, गुजरात या तीन राज्यांतून ६० टक्के उत्पादन मिळते तर महाराष्ट्र कर्नाटक ओरिसा राज्यांतून ३० टक्के उत्पादन मिळते.

## ३. मळ्याची पिके :


१. भारत हा चहाच्या मळ्यावावत प्रसिद्ध आहे. आसाम पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग यावावत आपण ऐकून असाल. अशी माहिती उपलब्ध आहे की सन १९२३ मध्ये ब्रिटिशांना रानटी चहाच्या रोपट्याचा आसाममध्ये शोध लागला. चहाच्या नाजूक पानांना वाळवून चहाचे उत्पान घेतले जाते. भारत हा चहाच्या उत्पादनातील प्रमुख देश असून चीन श्रीलंका हे अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाचे देश आहेत.

**चहाच्या उत्पादनासाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती**

अ) **तापमान :** चहासाठी आर्द्र आणि उष्ण हवामान लागते. चहाच्या रोपट्यांच्या योग्य वाढीसाठी २०° ते ३०° से. तापमान अनुकूल ठरते. ३५° से. पेक्षा अधिक किंवा १०° से. पेक्षा कमी तापमान रोपट्यांच्या आणि पानांच्या वाढीसाठी प्रतिकूल ठरते.

ब) **पर्जन्य :** चहासाठी १५० ते ३०० से. मी. पाऊस लागतो तसेच पावसाचे वर्षभर प्रमाण विभागलेले असावे. चहाच्या वाढीसाठी दीर्घ कोरडा काळ हा हानीकारक असतो.

क) **मृदा :** पाण्याचा निचरा होणारी, खोल आणि लोम प्रकारची मृदा उत्तम. वनातील न वापरलेली लोह मिश्रीत सेंद्रीय मृदा सर्वात्तम समजली जाते. चहाची लागवड ही सावलीच्या आधाराने केली जाते.




**आकृती १२.५ : भारत चहाउत्पादक क्षेत्र**

ड) **मजूर :** स्वस्त आणि कार्यक्षम मजूराची चहा उत्पादनासाठी आवश्यकता असते.

इ) **वितरण :** देशातील एकूण उत्पादनापैकी आसाममध्ये ५०% उत्पादन होते. डोंगर उतारावरील जमीन आणि ब्रह्मपुत्रा व सुरमा खोऱ्यांचा प्रदेश हे उत्पादक क्षेत्र आहे. आसाम नंतर पश्चिम बंगालच्या उत्पादनात क्रमांक लागतो. दार्जिलिंग, सिलिगुडी, जलपैगुडी, कुचविहार या जिल्ह्यात उत्पादन घेतले जाते. तामिळनाडू राज्याचा उत्पादनात तिसरा क्रमांक लागतो. निलगिरीच्या टेकड्यांवर हे उत्पादन घेतले जाते.

## २. कॉफी :

भारतात कॉफी कोठून आली हे माहीत आहे का? कॉफीचे मूळ इथिओपिया (ॲबिसिनिया पठार) आहे. ११ व्या शतकात ते अरेबियामध्ये पोहचले व तेथून १७ व्या शतकात कर्नाटकातील बाबा बुदान टेकड्यापर्यंत बावाबुदानने आणले. ब्रिटिशांनी उत्पादनात पुढाकार घेतला व कॉफीच्या लगवडीचे मळे पश्चिम घाटामध्ये स्थापन झाले.

### कॉफीच्या उत्पादनासाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती

अ) **तापमान :** साधारणपणे कॉफीसाठी उष्ण आणि आर्द्र हवामान लागते. तापमान १५° ते २८° से. पर्यंत असावे. कॉफीची लागवडे मोठ्या वृक्षांच्या सावलीमध्ये केली जाते. प्रखर सूर्यप्रकाश, ३०° से. पेक्षा अधिक तापमान किंवा हिमवष्टी ही पिकास हानीकारक असते. कॉफीच्या बेरी परिपक्व होण्याच्या काळात कोरडी हवा आवश्यक असते.

ब) **पर्जन्य :** साधारणपणे १५० ते २५० से. मी. पर्यंतचा पर्जन्य उपयुक्त असतो.

क) **मृदा :** पाण्याचा निचरा होणारी सुपिक लोम प्रकारची व सेंद्रीय घटक द्रव्यांची आणि लोह व कॅल्शियमयुक्त मृदा कॉफीच्या लागवडीस उत्तम असते. मृदेची उत्पादकता टिकवून ठेवणारी किंवा वाढविणारी मृदा सुयोग्य होय.

ड) **मजूर :** चहाप्रमाणेच कॉफीसाठी स्वस्त व कुशल मजूरांची आवश्यकता असते. पेरणी, पुनर्रोपण, छाटणी, वेचणी, वाळवणे, वर्गीकरण करणे, पॅकिंग करणे या कामासाठी कुशल मजूर आवश्यक असतात.

इ) **वितरण :** कर्नाटक, केरळ, तामिळनाडू ही राज्ये कॉफीचे उत्पादन घेतात.

## पाठावरील प्रश्न १२.२

१. कापूस उत्पादनासाठी आवश्यक असणारी भौगोलिक परिस्थिती स्पष्ट करा.

२. कापूस उत्पादनात दरवर्षी मिळणारे अपयश कोट्यावधी भारतीय लोकांना वस्त्र कसे पुरविणार?

३. व्यापारी पिकांना पैशाची पिके म्हणून का ओळखले जाते?

## १२.४ भारतीय शेतीची प्रमुख आव्हाने

भारतीय शेतीच्या समोर जी आव्हाने आहेत त्यांचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येईल. एक म्हणजे काही समस्या दूरगामी आहेत तर दुसऱ्या समस्या या नवीन आहेत. तसेच त्या कृषी पद्धती, हवामान बदल व आर्थिक स्वरूपाच्या आहेत. त्यामधील प्रमुख समस्यांचा सविस्तर विचार करू.

१. **प्रमुख पिकांच्या उत्पादनातील स्थिरता :** भात, गहू यासारख्या अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये स्थिरता दिसून येते. अशी स्थिती ही कृषी शास्त्रज्ञ, नियोजनकार आणि धोरण ठरविणाऱ्याच्या दृष्टीने चिंताजनक आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर उत्पादनाची तुलना करता दोहोतील दरी वाढत आहे. हरित क्रांतीपूर्वीच्या स्थितीकडे भारताची वाटचाल व्हावी असे कोणालाही वाटत नाही. हरितक्रांतीपूर्वीच्या स्थितीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करा.

२. **कृषीक्षेत्रातील साधनांच्या वाढत्या किमती :** शेतीमधील भांडवली गुंतवणूकीचा खर्च वाढला आहे. खते, कीटकनाशके, जंतूनाशके, हायब्रिड बियाणे, शेतमजूरी यांच्या सर्वांचा खर्च वाढला आहे. या सर्वांचा परिणाम अल्प व मध्यम भूधारक शेतकऱ्यांवर झालेला आहे.

३. **मृदेचा विनाश :** एका बाजूला हरित क्रांतीमुळे भारतीयांची अन्नधान्याची भूक भागविली गेली ही जमेची बाजू आहे. त्याच बरोबर दुसरी बाजू म्हणजे अनेक दुष्परिणाम जाणवू लागले आहेत. मृदेचा विनाश हे त्यापैकी एक आहे. तेच तेच पिक शेतामध्ये घेतले गेल्याने उत्पादक घटकांचे शोषण होत आहे. प्रामुख्याने ही स्थिती आर्द्र वनक्षेत्रामध्ये आढळते.

४. **भूमिगत पाण्याची पातळी खालावली :** दुसरा दुष्परिणाम म्हणजे हरित क्रांतीमुळे भूमिगत स्वच्छ पाण्याचा साठा कमी झाला. हे लक्षात घ्या की जेथे जेथे हरितक्रांती यशस्वी झाली तेथे रासायनिक खतांचा वापर वाढला, जलसिंचन राबविले गेले. पंजाबच्या कोरडवाहू प्रदेशात, हरियाना व पश्चिम उत्तर प्रदेशामध्ये भूमिगत पाण्याचा अतिरिक्त वापर केला जातो. जलसिंचनासाठी भूमिगत पाण्याचा अतिरिक्त वापर केला जातो. स्वच्छ भूमिगत पाण्यास धोक्याची स्थिती आहे. ही योजना अशीच वापरात राहिली तर पाण्याचा दुष्काळ जाणवेल.

५. **पृथ्वीवरील हवामान बदलाचा उलट परिणाम :** विविध आव्हानांमध्ये पृथ्वीच्या हवामानात झालेला बदल हे शेतीस मोठे आव्हान आहे. देशाची ७0% टक्के लोकसंख्या जर शेतीवर अवलंबून आहे तर त्याचे गांभिर्य लक्षात घ्या. पृथ्वीचे तापमानात २° ते ३° से. ने वाढ झाली तर समुद्राची पातळी वर येईल. वादळांची संख्या वाढेल आणि पर्जन्याचा अंदाज चुकेल इ. भात आणि गव्हासारख्या उत्पादनावर परिणाम होईल. हिवाळ्यातील वाढत्या तापमानाचा परिणाम उत्तरेकडील गहू उत्पादनावर होईल. समुद्राच्या पाण्याची पातळी वाढल्यास किनाऱ्यावरील भातशेतीमध्ये खारट पाणी शिरल्यास उत्पादनावर परिणाम होईल व वादळांची संख्या वाढेल.

६. **जागतिकीकरणावर परिणाम :** भारतीय शेतीवर जागतिकीकरणाचा परिणाम होत असल्याचा दिसून येईल. विकसनशील देशांवर त्याचा परिणाम झालेला आहे. शेतीमधून घटते उत्पन्न यामुळे शेती क्षेत्र अनिश्चित बनले आहे. शेतीतील आदान (गुंतवणूक) खर्च वाढला आणि

प्रदान (उत्पादन) किमतीत घट झाली. त्यामधून शेतकऱ्यांना मिळणारी सबसिडी आणि संरक्षण कमी झाले. विकसित देशातील कमी किमतीमध्ये तयार झालेल्या मालाशी स्पर्धा करणे मुक्त बाजारपेठेमुळे अवघड झाले.

**जागतिकीकण** : (ग्लोबलायझेशन) म्हणजे संपूर्ण पृथ्वीवरील संस्कृती लोक आणि व्यवसाय यामधील संबंध वाढविणे.

**सबसिडी** : व्यवसायासाठी किंवा व्यक्तीला मिळणारी शासकीय अर्थसहाय्य

**मुक्त बाजारपेठ** : कोणताही आर्थिक व्यवसाय कोणीही कोठेही केव्हाही कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक बंधनाशिवाय सुरू करणे.

७. **अन्न सुरक्षा सुविधा :** हरितक्रांतीपूर्वी भारत हा अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी नव्हता. सन १९४७ भारत पाकच्या फाळणीमुळे, जलसिंचनक्षेत्र कापूस आणि गहू उत्पादक प्रदेश पाकिस्तानकडे गेला. ताग उत्पादकक्षेत्र आणि तांदूळ उत्पादकक्षेत्र पूर्व पाकिस्तान (आत्ताचा बांगला देश) ला देण्यात आला. हरित क्रांतीने भारतात अन्नधान्यात वाढ झाली व देश अन्नधान्यामध्ये स्वावलंबी झाला. गेल्या दशकामध्ये अन्नधान्य उत्पादन स्थीर आहे. याच काळात १६ ते १८ कोटी लोकसंख्येत वाढ झाली. अन्नधान्यात स्वावलंबी देश झालेला असला तरी, अन्नधान्याची सहज सुरक्षितता अन्नधान्यातील पोषक घटकांची सुरक्षितता ही महत्त्वाची आहे. देशाच्या प्रचंड लोकसंख्येसाठी अन्नधान्य सुरक्षितता हे आव्हान आहे.

८. **शेतकऱ्याच्या आत्महत्त्या** : प्रत्येक आत्महत्येमागे अनेक कारणे असतात. जेव्हा २,00,000 लोकांची आत्महत्या होते तेव्हा त्यामागे असणाऱ्या कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. आत्महत्येमागे एखाद्या प्रदेशातील शेतीचे व्यापारीकरण आणि शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे कारण समोर येते. अन्नधान्य पिकापेक्षा व्यापारी पिक हे कारणीभूत आहे. मूळ कारणांचा शोध घेणे बाजूला पडले. व्यापारीकरणामुळे शेतीतील गुंतवणूक कमी पडली. बँकाकडून कर्ज घेवूनवाढत्या महागाईने शेतीत गुंतवणूक केली परंतु शेतीतून आलेल्या उत्पादनाची मेळच न बसल्याने अनेक समस्या निर्माण झाल्या. अन्नधान्य पिकाकडून पैशाच्या पिकाकडे शेतकऱ्यांनी धोका पत्करला. खाजगीकरणामुळेही काही समस्या निर्माण झाल्या.

महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तीसगड या पाच मोठ्या राज्यातील शेतकऱ्यांनी त्याग केला. २00३ ते २00८ या दरम्यान शेतकऱ्यांच्या आत्महत्येपैकी २/३ आत्महत्त्या या पाच राज्यातील आहेत. कर्जबाजारीपणा हे त्यातील महत्त्वाचे कारण आहे. पिक न येणे किंवा आर्थिक स्थिती खालावणे ही कारणे आहेत. सामाजिक स्थिती खालावणे, खाजगी सावकाराकडून पिळवणूक यामुळे शेतकरी दुबळा बनला. त्यातून शेतकऱ्याचे जीवन अवघड झाले.

## १२.३ कार्य :

तुमच्याकडे राजकीय नेतृत्व दिलेले असते तर वरीलपैकी दिलेली कोणती आव्हाने आपण राबविणार कोणत्याही दोन आव्हानांना आपण कसे सामोरे जाल?

## पाठावरील प्रश्न १२.३

१. हवामानाच्या बदलाचा भारतीय शेतीवर कसा परिणाम झालेला आहे? कोणतीही दोन उदाहरणे स्पष्ट करा.

## आपण काय शिकलो?

- भारतात विविध प्रकारची शेती केली जाते. त्यापैकी उदरनिर्वाहक आणि व्यापारी शेती, सखोलशेती आणि विस्तृत शेती मळ्याची शेती आणि मिश्र शेती.
- उदरनिर्वाहक शेती हे भारतीय शेतीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. शेती ही मान्सूवर अवलंबून आहे. प्राणी आणि पिकांची विविधता. अन्नधान्यपिकांना प्राधान्य
- भारतीय पिकांचे चार प्रकारात वर्गीकरण करता येईल. अन्नधान्यपिके, पैशाची पिके, मळ्याची पिके आणि फळ उत्पादन
- भारतीय शेती समोरील काही आव्हाने शेतीतील उत्पादनस्थीर आहे हे एक आव्हान आहे. शेतीत केलेल्या गुंतवणूकीचा खर्च वाढत आहे. मृदेचे शोषण, भूगर्भीय जलसाठ्यात होणारी

घसरण, हवामानातील बदल, जागतिकीकरण, मुक्त आर्थिक धोरण, अन्नधान्य सुरक्षा, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या.

## सहामाही अभ्यास

१. भारतीय शेतीची चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. तांदूळ व गहू पिकांसाठी आवश्यक असलेल्या भौगोलिक परिस्थितीची तुलना करा.

३. चहा आणि कॉफीच्या उत्पादनासाठी आवश्यक असणारी चार समान भौगोलिक परिस्थिती लिहा.

४. भारतीय शेतीसमोरील कोणत्याही चार आव्हानांचे परिक्षण करा.

५. अन्नसुरक्षा ही संकल्पना स्पष्ट करा. स्वावलंबनापेक्षा ही संकल्पना भिन्न कशी आहे?

६. भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी भरा.

१. मजूर प्रधान पिके

२. भिन्न परिस्थितीमध्ये घेतली जाणारी दोन पिके

## पाठावरील प्रश्नांची उत्तरे

### १२.१

१. दोन प्रकारच्या शेतीमध्ये फरक जो आहे तो म्हणजे दर हेक्टरी मिळणारे उत्पादन यु.एस.ए., कॅनडा, सध्याचा रशिया हे मोठे देश आहेत. जेथे विस्तारित शेती केली जाते मात्र जपान हे सखोल शेतीचे उदाहरण आहे.

२. विद्यार्थ्यांच्या अनुभवानुसार उत्तर

### १२.२

१. सतत जास्त तापमान २१° से. ते ३०° से.

२. वर्षातील साधारणपणे २१० पेक्षा अधिक दिवस हिममुक्त असावेत.

३. साधारण पर्जन्य ५० ते १०० से. मी. असावा परंतु ५० से. मी. पेक्षा कमी पर्जन्याच्या ठिकाणी जलसिंचनावर कापसाचे पिक घेतले जाते.

४. पिक लागवडीच्या काळात जास्त पाऊस व नंतर परिपक्वतेच्या काळात सूर्यप्रकाश व कोरडी हवा लागते.

५. काळ्या मृदेचे कापसाचे पिक चांगले येते परंतु सतलज गंगा खोऱ्यामध्ये गाळाच्या मृदेमध्ये तसेच तांबड्या आणि जांभ्या मृदेच्या द्विपकल्पीय क्षेत्रातही पिक येते.

६. सध्यातरी यंत्राचा कापूस वेचणीसाठी उपयोग होत नाही.

(कोणतेही तीन)

२. विद्यार्थ्यांच्या अनुभवानुसार उत्तर

७. व्यापारी पिकांना पैशांची पिके म्हणतात. कारण ही उत्पादने बाजारपेठेत विक्रीच्या हेतूने पैशासाठीच पिकविली जातात.

**१२.३**

हवामानातील बदल, तापमानात २ ते ३° से. ने वाढ झाल्यास समुद्राची पातळी वाढेल, वादळांची तीव्रता वाढेल. अचानक पाऊस इ. बदल होतील. याचा परिणाम भारतातील तांदूळ व गव्हाच्या उत्पादनावर होईल. किनाऱ्यावरील खारे पाणी शेतामध्ये येईल तसेच वादळांची संध्या वाढेल.

# १३

# वाहतूक व संदेशवहन

राकेश आणि त्याची पत्नी एक छोट्या खेड्यात राहतात. एका सायंकाळी गडगडाटी वादळासह मुसळधार पाऊस पडतो. त्याच्या पत्नीच्या खूप पोटात दुखत होते. खेड्यातील नर्सने मोठ्या दवाखान्यात घेवून जाण्याचा सल्ला दिला. त्यावेळी संदेशवहनाची साधने उपलब्ध नव्हती. त्यामुळे राकेशला डॉक्टरांशी, हॉस्पिटल किंवा ॲम्बुलन्सशी संपर्क साधने शक्य झाले नाही. राकेशने आम्हा दोघांना दवाखान्यात घेवून जाण्याची मित्राला विनंती केली. दुर्दैवाने त्याचा ट्रॅक्टर १00 मीटर ही जावू शकला नाही कारण रस्ता वाहून गेलेला होता आणि तो पाण्याखाली बुडालेला होता. राकेशने काय करावे? या समस्येला उत्तर काय? ही घटना वाहतुक आणि संदेशवहन याचे आपल्या जीवनातील महत्त्व स्पष्ट करते. सदरच्या प्रकरणामध्ये वाहतुक आणि संदेशवहनाचे प्रकार त्यांचे महत्त्व आणि राष्ट्राच्या विकासातील महत्त्व अभ्यासणार आहोत.

## उद्दिष्टे :

सदरच्या पाठ अभ्यासानंतर पुढील गोष्टीची माहिती होईल.

- वाहतुक व संदेशवहनामुळे लोकांचा संपर्क वाढेल. प्रदेशाचा सामाजिक व आर्थिक विकास होईल.
- रस्त्याचे वर्गीकरण करता येईल. दैनंदिन जीवनातील त्यांचे महत्त्व तसेच राष्ट्रीय विकासातील महत्त्व.
- भारतातील लोहमार्गाच्या जाळ्याच्या वितरणावर परिणाम करणारे घटक तांत्रिक बाबींचा त्यामध्ये झालेला वापर यांचे परिक्षण
- जल वाहतुकीच्या प्रकारांचे महत्त्व स्पष्ट करणे.
- हवाई वाहतुकीचे वाढते महत्त्व, आर्थिक विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.
- संदेशवहनामुळे लोक एकमेकांच्या जवळ येतात. त्यांच्यातील अंतर कमी होते.

## १३.१ वाहतूक आणि संदेशवहन राष्ट्राच्या जीवनरेषा

वाहतूक आणि संदेशवहन हा आजच्या जीवनाचा अविभाज्यघटक आहे. त्यांच्या शिवाय आपण राहू शकू का? अशी कल्पना करा की वाहतूक दळणवळण साधनांना आवश्यक असलेले इंधनच मिळालेले नाही म्हणून सर्व काही ठप्प झालेले आहे. मग त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांची कल्पना करा.

### १३.१ कार्य :

**समस्यांची यादी**

- ❖ ____________________
- ❖ ____________________
- ❖ ____________________
- ❖ ____________________
- ❖ ____________________

### १३.१.१ वाहतूक आणि संदेशवहनाचे कार्य :

वाहतूक साधनांमुळे उत्पादक केंद्रापासून ग्राहकापर्यंत माल पोहचविणे शक्य होते. जेथे उत्पादनाचा वाढावा आहे. तेथून गरज असणाऱ्या भागाकडे माल पोहचविला जातो. रोजगारासाठी लोकांची होणारी वाहतूक, शिक्षणासाठी होणारा प्रवास असो अथवा तातडीची गरज वाहतूकीमुळे भागविली जाते. संदेशवहनामुळे जागतिक घटनांची माहिती मिळते. या सर्वांमुळे लोकांच्या जीवनामध्ये सकारात्मक बदल होतो. आर्थिकदृष्ट्या विकासाला सहाय्य मिळते.

## १३.२ वाहतुकीचे प्रकार

वाहतुकीमुळे लोक एकमेकांना जोडले जातात तसेच वाढ आणि विकास कसा होतो ते खालील प्रमाणे.

**वाहतूक साधने**

- **जमिनीवरील**
  - रस्ते
  - लोहमार्ग
- **जलवाहतूक**
  - महासागरीय जलवाहतूक
  - अंतर्गत जलाशयातील जलवाहतूक
- **हवाई वाहतूक साधने**
  - स्थानिक
  - अंतरराष्ट्रीय

## १३.२.१ जमिनीवरील वाहतुकीचे पुढील प्रकारात वर्गीकरण करता येते.

### १. रस्तेवाहतूक

चित्र क्र. १३.१ च्या निरीक्षणातून लक्षात येत असेल की प्राचीन कालीन वाहतुकीपासून आजच्या आधुनिक काळातील वाहतुकीमध्ये कसा बदल घडून आलेला आहे? अशी कल्पना करा की तुम्हाला तुमच्या घरापासून ५00 मीटर दूर अंतरावर असलेल्या तुमच्या मित्राच्या घरी जायचे आहे किंवा २00 कि. मी. अंतरावर असलेल्या तुमच्या नातेवाईकाकडे जायचे आहे. खेड्यातील व्यक्ती गावापासून शहरापर्यंत बसने येईल. त्यामुळे रस्त्यांचाच वापर केला जाईल. आत्ता लक्षात आलेले असेल की रस्ते हे वाहतुकीच्या दृष्टीने सर्वांनाच वापरावे लागतात.



**आकृती १३.१ : वाहतुक प्रकार**

रस्ते हे माणसे जोडणारे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे देशाच्या सामाजिक आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत ते खालीप्रमार्णे

१. रस्ते तुमच्या दारापर्यंत सेवा देतात. रिक्शा, कार, सायकल, बस, स्कूटर असो किंवा ट्रक त्यांच्यापासून थेट सेवा मिळते.

२. रस्ते बांधणे, त्याची दुरुस्ती, देखभाल खर्च इतर वाहतूक प्रकारापेक्षा कमी येतो.

३. रस्ते तर अतिशय स्वस्त आणि सोईस्कर वाहतुक साधन आहे. कमी अंतर आणि कमीत कमी माल असेल तर फारच सोईस्कर असतात.

४. रस्तेच फक्त लोहमार्ग स्टेशन, हवाई केंद्र, बंदर जोडू शकतात.

५. रस्ता वाहतुकीनेच दूध, फळे, भाजीपाला यासारखा नाशवंत माल खेड्यातून शहराकडे किंवा महानगरपालिकांपर्यंत पोहचविला जातो.

६. खेडी आणि शहरे रस्त्यांनीच जोडली जातात. पर्वत, वाळवंट, पठारे यासारख्या विविध प्रकारच्या भूभागावर रस्ते काढणे शक्य असते.

### रस्त्यांचे वर्गीकरण :

सर्वत्रच सारख्या प्रकारचे रस्ते आपण कधी पाहिलेत का? निश्चितच नाही. काही ठिकाणी कच्चे रस्ते काही ठिकाणी पक्के तर कोठे अरुंद तर कोठे रुंद रस्ते आहेत. रस्त्यांचे वर्गीकरण पुढील प्रकारत करता येईल.

१. रस्ते तयार करताना वापरलेले साहित्य

२. रस्ते तयार करणे त्याची देखभाल करणारे प्रशासन

### १. रस्ते तयार करताना वापरलेले साहित्य ः

पक्के रस्ते आणि कच्चे रस्ते अशा प्रकारात वर्गीकरण केले जाते. पक्के रस्ते तयार करताना सिमेंट कॉंक्रीट, वीटा डांबर यांचा वापर केला जातो. तर कच्चे रस्ते तयार करताना वाळू, राडारोड चिखल यांनी बनलेले असतात.


### १३.१ कार्य :

रस्ते तयार करताना वापरलेल्या सातिहत्याचे निरिक्ष करा.

| पक्के रस्ते | कच्चे रसते |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

३. स्ते तयार करणे व त्यांची देखभाल करणारे प्रशासन रस्ते तयार कोण करते याला पैसे कोठून येतात. याचे आपणाला आश्‍चर्य वाटत नाही काय? लोकांच्याकडून जाणारे कर, हा सार्वजनिक पैसा रस्त्यांसाठी खर्च केला जातो. रस्त्यांचा समतोल विकास करण्यासाठी शासनाचे विविध विभाग जबाबदार असतात.

❖ **ग्रामीण रस्ते** ः ही योजना पंतप्रधान ग्राम सडक योजना ही केंद्रशासनाच्या अखत्यार्‍यातील ही योजना आहे.





**आकृती १३.२ : भारत सुवर्ण चतुष्क मार्ग©**

या योजनेअंतर्गत खेडी एकमेकांना रस्त्यांनी जोडणे तसेच खेडी मुख्य रस्त्याला जोडणे हा उद्देश आहे. देशातील ग्रामीण रस्त्यांची लांबी सुमारे ८०% इतकी आहे.

- **जिल्हा रस्ते** या योजने नुसार जिल्ह्याची प्रमुख केंद्र मोठ्या शहरांना जोडणारे रस्ते असून त्याची जवाबदारी जिल्हा परिषदावर असते. हे सुमारे १४% रस्ते आहे.

- **राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग** याअंतर्गत राज्य रस्ते तयार करून हे रस्ते राज्याच्या राजधानी या जिल्हा मुख्यालयाला जोडणे हा हेतू असतो. देशाच्या एकूण रस्त्याच्या लांबीच्या ४% लांबी या प्रकारच्या रस्त्यांची आहे.




**आकृती १३.३ : दक्षिर्णउत्तर आणि पूर्वपश्चिम मार्ग©**

❖ **भारतीय राष्ट्रीय महामार्ग विभाग :** राष्ट्रीय महामार्ग (National Highway ) N.H. यामार्फत देशातील महत्त्वाच्या राज्याच्या राजधान्या आणि महत्त्वाची शहरे जोडली जातात. देशाच्या एकूण रस्त्यांच्या लांबीपैकी राष्ट्रीय महामार्गाची २% लांबी असून देशातील एकूण वाहतुकीपैकी ४0% वाहतुक या प्रकारच्या रस्त्यांवरून होते. देशांच्या पूर्व पश्चिम, दक्षिणउत्तर जोडणारे राष्ट्रीय मार्ग असून यामुळे वेळ आणि इंधन यांची बचत होते. दोन मोठ्या शहरांमधील वाहतूक वेगाने व्हावी हा हेतू आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग विभाग या विभागाकडून याचे काम पाहिले जाते... देशातील सुपर हायवे पुढील प्रमाणे

अ) **सुवर्ण चतुष्कक राष्ट्रीय महामार्ग :** दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता या शहरांना जोडणारा मार्ग सुवर्ण चतुष्कक म्हणून ओळखला जातो.

ब) **दक्षिणोत्तर मार्ग :** श्रीनगरपासून कन्याकुमारीपर्यंत आहे.

क) पूर्वपश्चिम किनारा जोडणारा मार्ग पूर्वेस सिल्वर ते पश्चिमेस पोरबंदर पर्यंत जोडतो.

❖ **सरहद रस्ते :** संपूर्ण देशाच्या सरहद्दीवर हे रस्ते असून संरक्षण खात्यासाठी लागणारे साहित्य आणि वस्तू पुरवठा करता यावा, युद्धकाळ किंवा तातडीच्या मदतीसाठी तसेच त्या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या लोकांसाठी हे रस्ते उपयुक्त असतात. BRO (Border Road Organization) सरहद रस्ते संस्थेमार्फत याची देखभाल केली जाते...

**? तुम्हास हे माहित आहे का ?**

देशाच्या वायव्येकडून पूर्वेकडे जाणारा अती प्राचीन लांब रस्ता १६ व्या शतकामध्ये शेरशहा सूरी या बादशहाने तयार केला. याच रस्त्याला नंतर ग्रँडट्रंक रोड म्हणून ओळखला जातो. ज्या रस्त्याचे सध्या दोन क्रमांकामध्ये विभाजन केलेले आहेत. $NH_1$ (अमृतसर ते दिल्ली) आणि $NH_2$ (दिल्ली ते कोलकाता) भारतात सध्या सुमारे ३३0 लक्ष कि. मी. रस्त्यांचे जाळे आहे. स्वातंत्र्य काळात सन १९४७ पर्यंत फक्त ४ लक्ष कि. मी. लांबीचे रस्ते होते.

**कार्य १३.३**

नकाशा क्र. १३.२ आणि १३.३ चे निरीक्षण करा व तुमच्या घरापासून जवळ असलेला राष्ट्रीय महामार्गाचे नाव लिहा. त्याची देखभाल कोण करते याची माहिती द्या.

## लोहमार्ग :

वर्तमानपत्र वाचता वाचता अनुच्या वडिलांनी सूचविले की कोणालाही शिक्षा होणार नाही आपण आपली मागणी करा. अनुने विचारले, पप्पा काय झालं? पप्पा म्हणाले नेहमीचेच आहे नवीन काही नाही. विरोधकांनी रेल्वे मार्ग आडविला. त्या लोकांनी रेल्वे अडविली आणि दिल्ली, आग्रा मार्गा वरील रेल्वेचे दोन डबे जाळले. अनुने विचारले की त्यात काय निराश व्हायचं. रेल्वे मार्ग तयार करणे,

रेल्वेचे डबे तयार करणे त्यासाठी लाखो रुपये लागतात, हजारो लोक राबलेले असतात. माल आणि प्रवाशी वाहतूक यासाठी असणारी सुविधा ही केवळ आपल्यासाठीच आहे. ही वाहतूक थांबली तर आपलीच गैरसोय होणार आहे. अनुला रेल्वे वाहतूकीचे महत्त्व पुढील मुद्यांमुळे समजते.

- ❖ देशाच्या एका कान्याकोपऱ्यातून दुसऱ्या टोकापर्यंत लोक अनेक कारणांसाठी प्रवास करतात. शिक्षण व्यवसाय, परीसर पहाणे धार्मिक स्थळे पहाणे, मित्र नातेवाईकांच्या गाठीभेटी घेणे यासाठी प्रवास करतात.
- ❖ सर्वसाधारण, डबे स्लीपरकोच, ए.सी. या विविध वर्गीकरणामुळे सर्व प्रकारच्या वर्गातील लोक गाडीतून प्रवास करतात.
- ❖ रात्रीचा प्रवासही बर्थवर स्लीपिंग कोचवर होवू शकतो.
- ❖ देशातील अवजड मालाची जास्तीत जास्त वाहतूक रेल्वे मार्गानेच होते. दगडी कोळसा, सिमेंट अन्नधान्ये, खते, पेट्रोलियम, गाड्या यांची वाहतूक असेल किंवा खाण क्षेत्रापासून कारखान्याकडे किंवा कारखान्यापासून ग्राहकाकडे मालाची वाहतूक लोह मार्गानेच होते.

लोहमार्ग ही महत्त्वाचे साधन असून प्रवासी आणि माल वाहतूक करणारी मोठी यंत्रणा आहे. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत त्याचा महत्त्वाचा हिस्सा आहे.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

- ❖ भारतातील पहिली रेल्वे १८५३ या वर्षी मुंबई ते ठाणे दरम्यान ३४ कि. मी. अंतर सुरू झाली.
- ❖ भारतातील लोहमार्गाचे जाळे अतिशय सर्वात मोठे असून जगातील चौथ्या क्रमांकावर आहे. एकूण लोहमार्गाची लांबी ६४000 कि. मी. पेक्षाही अधिक आहे.
- ❖ देशातील शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांचा विचार करता १.६ दशलक्ष कर्मचारी रेल्वे खात्यामध्ये आहेत. रेल्वेचे स्वतंत्र बजेट सादर केले जाते.
- ❖ सुलभ प्रशासनासाठी लोहमार्गाचे १६ प्रशासकीय विभाग पाडलेले आहेत.

रेल्वेच्या महत्त्वाविषयी अनु आणि पप्पांची चर्चा चालू असताना जीया ही मैत्रीण तेथे येते. दिल्ली विद्यापीठामध्ये ती शिकत असली तरी मूळची सिक्कीममधील. सिक्कीम हे देशातील विविध ठिकाणांना सहजरित्या का जोडले जावू शकत नाही हा प्रश्न जीयाच्या डोक्यात होताच पण त्यातले तर्कशास्त्र तिला कळालेले होते. जीयाने मध्येच विचारले, काका, मला हे कळत नाही की माझ्या राज्यात अल्प रेल्वे सेवा आहे परंतु इतर राज्यांमध्ये मात्र रेल्वे उत्तम सुविधा उपलब्ध आहे?

लोहमार्गाच्या विकासासाठी कोणते घटक आवश्यक असतात. याचे त्यांनी स्पष्टीकरण केले.

- पर्वतीय क्षेत्रामध्ये रेल्वेमार्ग काढणे अवघड आणि खर्चीक असते, तुलनेने मैदानी भागामध्ये ते काम सुलभ असते. त्यामुळेच गंगेच्या मैदानात लोहमार्गाचे जाळे आहे. परंतु वाळवंटामध्ये, दलदलीच्या क्षेत्रामध्ये, पूर क्षेत्रात किंवा वनक्षेत्रात, नद्यांच्या पात्रात किंवा धवधब्याच्या क्षेत्रामध्ये लोहमार्गाचा विकास झालेला नसतो.
- उत्तर प्रदेश विहार, पश्चिम बंगाल, पंजाब, हरयाना ही राज्ये लोहमार्गांनी जोडलेली आहे. कारण ती राज्ये मैदानामध्ये आहेत. हे सर्व प्रदेश अन्नधान्याची कोठारे समजली जातात. शेतीतील विविध उत्पादने अन्य राज्यांना तेथून पुरवठा केला जातो.
- खाण क्षेत्र, औद्योगिक क्षेत्रासाठी लोहमार्ग सुविधा ही मालवाहतुकीसाठी आवश्यक असते. औद्योगिकदृष्ट्या मागे राहणाऱ्या प्रदेशात लोहमार्ग काढण्याचा खर्च परवडत नाही त्यामुळे तेथे लोहमार्गाची लांबी कमी असते.
- लोकसंख्येची घनता अधिक असेल तर तो प्रदेश लोकांसाठी लोहमार्गाने जोडला जातो.
- मोठ्या शहरात किंवा नागरी वस्त्यामध्ये नोकरी व्यवसायांच्या संधी अधिक मिळतात. धंदे, शिक्षण, व्यापार, बँका इत्यादींचा विकास झाल्याने जलद प्रवासी वाहतुकही महत्त्वाची असते.

अनुचे पप्पा हसले आणि म्हणाले, नाही जीया अंतर्गत भागही लोहमार्गाने जोडावा याची शासनाकडून काळजी घेतली जाते. किंबहुना त्याला प्राधान्य दिले जाते. इंटरनेटमुळे तर जग जोडले गेलेले आहे. हे जीयाच्या लक्षात आले.

## भारतीय लोहमार्ग तांत्रिक सुविधांचा लाभ

देशातील अगदी उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत (जम्मू ते कन्याकुमारी) लोहमार्गाने देश जोडलेला आहे. ७१ तासामध्ये ३७५१ कि. मी. अंतर पार करता येते. फस्ट क्लास एसी, सेकंड क्लास एसी, थर्ड क्लास एसी, एसी चेअर कार, सेकंडक्लास स्लिपर क्लास, जनरल क्लास इत्यादी सुविधा असून गाडीमध्ये भोजनाची व्यवस्था आर्थिक स्तराप्रमाणेही पुरविली जाते. प्रदुषणमुक्त प्रवासासाठी गाड्यांना डिझेल इंजिन तसेच विजेवर चालणाऱ्या ब्रॉडगेज मार्गावरील गाड्या आहेत.

इलेक्ट्रॉनिक्स तिकिटे घरवसल्या मिळू शकतात. मालाने भरलेले ट्रक रेल्वे वॅगनमद्ये भरून मालाची थेट वाहतूक ग्राहकापर्यंत होवू लागली आहे.

### कार्य १३.४

खालील चौकटीतून लोहमार्ग विभागीय कार्यालयाच्या नावाचा शोध घ्या.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| P | O | R | I | T | S | M |
| U | P | N | K | J | O | U |
| K | L | M | Y | R | P | M |
| Q | U | W | A | I | T | B |
| K | O | L | K | A | T | A |
| J | A | I | P | I | N | I |
| Z | V | D | U | X | Y | R |
| C | H | E | N | N | A | I |
| T | K | L | J | Q | R | J |
| I | T | H | Q | X | Z | U |
| N | P | I | T | O | J | K |

## पाठावरील प्रश्न १३.१

**१. पुढील विधाने पूर्ण करा.**

१. पूर्वपश्चिम किनारे जोडणारी ........... आणि ........... ही ठिकाणे आहेत.

२. सुपर राष्ट्रीय महामार्ग, देशातील चार प्रमुख शहरांन जोडणारा मार्ग ........... नावाने ओळखला जातो. त्याचा आकार ........... सारखा आहे.

२.

अ) लोहमार्गाच्या घनतेवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा. लोहमार्गाची अधिक घनता आणि कमी घनता असणारे प्रदेश शोधा आणि त्याला कारणीभूत असणाऱ्या घटकांची चर्चा करा.

ब) रस्ते आणि लोहमार्ग यांचे दोन महत्त्वाच्या बाबी आणि दोन समस्या लिहा.

३. "भारतातील काही राज्यांमध्ये उत्तमरित्या लोहमार्गाचे जाळे आहे" तीस शब्दांमध्ये स्पष्ट करा.

## कार्य १३.५

सोबतचा रेल्वे रिझर्वेशन फॉर्म तुमच्या कुटुंबियांना दाखवा. त्यामध्ये असलेल्या रकान्यातील बाबींचा हेतू आणि महत्त्व लिहा...

१. डॉक्टर

२. जेष्ठ नागरिक

३. प्राधान्याने बर्थ

४. काही गाड्यात भोजनाची व्यवस्था असते.

### RAILWAY RESERVATION / CANCELLATION REQUISITION FORM

If you are a Medical Practitioner Please tick ( ) in Box Dr. [ ] (You could be of help in an emergency)

If you want Sr. Citizen concession, please write Yes/No in box [ ] (if yes, please carry a proof of age during the journey to avoid inconvenience of penal charging under extant Railway Rules)

Do you want to be upgraded without any extra charge? Write [ ] Yes/No in the box. (If this option is not exercised, full fare paying passengers may be upgraded automatically)

| | |
|---|---|
| Train No & Name: | Date of Journey: |
| Class: | No.of Berth / Seat: |
| Station From: | Station To: |
| Boarding At: | Reservation Upto: |

| S.No. | Name in Block Letters (not more than 15 chars) | Sex (M/F) | Age | Concession / Travel Authority No. | Choice if any |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | Lower / Upper Berth |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | Veg / Non-veg Meal for Rajdhani / Shatabdi Express only |
| | | | | | |
| | | | | | |

CHILDREN BELOW 5 YEARS (FOR WHOM TICKET IS NOT TO BE ISSUED)

| S.No. | Name in Block Letters | Sex | Age |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**ONWARD / RETURN JOURNEY DETAILS**

Train No & Name ______________________ Date ________________

Class ____________ Station From ______________ To ______________

Name of Applicant ________________________________________

Full Address ____________________________________________

**Signature of the Applicant**

**FOR OFFICE USE ONLY**

S.No. of Requisition________________ PNR No.____________________

Berth/Seat No.____________________ Amount Collected ______________

**Signature of Reservation Clerk**

Note: 1. Maximum permissible passengers are 6 per requisition.
2. One person can give one requisition form at a time.
3. Please check your ticket and balance amount before leaving the window.
4. Forms not properly filled or in illegible forms shall not be entertained.
5. Choice is subject to availability.

### ३.२.२. जलवाहतूक

प्राचीन काळी नद्यांच्या तीरावर लोक आपले वास्तव्य करीत होते. याचे आपणास आश्चर्य वाटत नाही का? दूरच्या अंतरावर व्यापार कसा चालत असेल? होय, अगदी नद्या आणि समुद्रातूनही व्यापार होत होता. अगदी प्राचीन काळापासून ते आत्तासुद्धा जलमार्गास वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्व आहे. कारण



**आकृती १३.४ : जलवाहतूक**

इतर वाहतुक साधनांपेक्षा हा वाहतूक प्रकार अत्यंत स्वस्त आहे. कारण

- ❖ जलमार्गाचा बांधकाम खर्च नसतो केवळ देखभाल खर्च त्यामध्ये समाविष्ट असतो.
- ❖ अवजडमालाची वाहतूक करण्यासाठी हा वाहतूक प्रकार उपयुक्त ठरतो. एकाच वेळी लाखो टन मालाची वाहतूक होवू शकते.
- ❖ पेट्रोलिम आणि त्यासंबंधी असणाऱ्या मालाची वाहतूक करण्यासाठी जलवाहतूक हा सार्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय वाहतूक प्रकार आहे. भारताला लागणारे पेट्रोलियम देशात गरज इतके मिळत नसल्याने मध्यपूर्वेकडील देशांतून आयात केले जाते.
- ❖ इंधन क्षमता अधिक असणारा आणि पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्व असणारा वाहतुक प्रकार आहे.

जलवाहतूकीचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. हे आपणास माहीत आहे का? अंतर्गत जलवाहतूक आणि खुल्या महासागरातील जल वाहतूक का म्हणतात? याचा शोध घ्या.

१. **अंतर्गत जलवाहतूक :** भारताला सुमारे १४५०० कि. मी. लांबीचे अंतर्गत जलमार्ग उपलब्ध आहेत. कालवे, नद्या, धरणांमधील जलसाठा, उथळ अखात यापैकी ३७०० कि. मी. लांबीचे मार्ग यांत्रिक बोटींसाठी सोईस्कर आहेत. गंगा, ब्रह्मपुत्रा या उत्तरेतील नद्या तर दक्षिणेस गोदावरी, कृष्णा, कावेरी या नद्या वहातुकीस उपयुक्त आहेत. अंतर्गत जलवाहतूक मार्गांमुळे रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होतो. तसेच मालाच्या वाहतुकीस मदत होते.


२. **अंतर्गत जलवाहतूक प्राधिकरण :** याची स्थापना १९८६ मध्ये झाली. या अन्वये अंतगत जलमार्ग विकास, देखभाल व व्यवस्थापन पाहिले जाते. खालील तीन जलमार्ग राष्ट्रीय जलमार्ग म्हणून ओळखले जातात.

वायव्य NW 1 : गंगा अलाहावादपासून (उत्तर प्रदेश) ते हल्दिया (प. बंगाल) लांबी १६२० कि. मी.

NW 2 : ब्रह्मपुत्रा प्रवाह– सादिया ते धुब्री लंबी ८९१ कि. मी.

NW 3 : कोलुम ते कोटापुरम– केरळ लांबी २०५ कि. मी.

**महासागरीय जलवाहतूक :** भारताच्या नकाशाकडे पाहिल्यास तुमच्या लक्षात येईल की देशाच्या तीन बाजूंनी समुद्र आहे अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागर मिळून ७५१६ कि. मी. लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. सन १९४६ मध्ये ४९ जहाजे होती व त्यांची क्षमता १२७०८३ मे. टनाची होती. स्वातंत्र्यानंतर २००४ मध्ये देशाची ६१६ जहाजे झाली. व त्यांची क्षमता ७०० ००० मे. टनापर्यंत पोहचली.




आकृती १३.५ : ???

सागरी जलवाहतूक दोन प्रकारची आहे.

अ) **किनारपट्टीवरील जलवाहतूक :** किनारपट्टीवरील वाहतूकीमध्ये प्रवासी वाहतूक आणि माल वाहतूक ही किनारपट्टीवरून केली जाते. देशातील १०० जलवाहतूक कंपनी आहेत व त्या सुमारे ७ लक्ष मे. टनाची वाहतूक करतात. देशाची १२ प्रमुख बंदरे असून लहान आणि मध्यम वाहतूकीची १८९ बंदरे आहेत.

ब) **आंतरराष्ट्रीय वाहतूक :** आंतरराष्ट्रीय वाहतूकीसाठी व्यापारी बोटींचा वापर केला जातो. पूर्व किनारपट्टीवरील बंदरे ही म्यॅनमार, मलेशिया, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया, चीन, जपान या दरम्यान वाहतूक चालते. पश्चिम किनारपट्टीवरून यु.एस. ए., युरोप आणि आशियायी देशांशी आयात निर्यात चालते.

## पाठावरील प्रश्न १३.२

अ) **सोबतच्या नकाशावरून सारणी पूर्ण करा.**

| बंदर | राज्य | किनारा |
|---|---|---|
| मुंबई | महाराष्ट्र | पश्चिम |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

ब) बंदर कोणत्या प्रदेशात नाहीत याचे निरीक्षण करून कारण लिहा.

### १३.२.३ हवाई वाहतूक :

आपल्याला पक्षाप्रमाणे भरारी मारता येईल का? हवाई वाहतूकीने तुम्हाला कोणताही अडथळा न येता लवकरात लवकर पोहचता येईल. सन १९०३ मध्ये राईट बंधू (write Brothers) यांनी विमानाची रचना केली. भारतीय हवाई वाहतूक १९११ मध्ये सुरू झाली. रस्ते किंवा लोहमार्गाप्रमाणेच हवाई वाहतुकीस सध्या महत्त्व प्राप्त झाले आहे. देशाची अंतर्गत हवाई वाहतूक आणि आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक अशा सुविधा आहेत. हवाई वाहतूकीचे आधुनिक काळातील महत्त्व पाहू.



आकृती १३.६ हवाई वाहतूक

- ❖ ग्लोबल व्हिलेज ह्या संकल्पनेचे मूळ हवाई वाहतूकीत आहे. हा जलद वाहतूक प्रकार असून शेकडो कि. मी. चे अंतर काही तासात पार केले जाते.
- ❖ भूभागावरील विविध अडथळे टाळता येतात. उदा. पर्वत, घनदाट वने, दलदल क्षेत्र किंवा पूरक्षेत्र
- ❖ राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ही वाहतूक महत्त्वाची आहे.
- ❖ दोन खंडामधील देश अगदी ग्लोबल व्हिलेज संकल्पनेप्रमाणे जवळचे वाटायला लागतात.
- ❖ फळे भाजीपाला मौल्यवान वस्तू, यंत्रे, औषधे यांचा पुरवठा काही क्षणात करता येतो.
- ❖ नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य आपत्ती काळात जीवित हानी टाळण्यासाठी या वाहतुकीचा उपयोग होतो. अत्यावश्यक असणाऱ्या वस्तूंचा तातडीने पुरवठा करता येतो.

महत्त्वाची समस्या म्हणजे ही प्रवाशी अथवा मालाची वाहतूक अत्यंत महागडी आहे त्यामुळे सर्व सामान्यांना ती परवडत नाही. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये हवाई वाहतूकीमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे.

भारतातील हवाई वाहतूकीचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येईल.

### १३.२.४ स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय हवाई सेवा

स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक सेवा शासनाकडून तसेच खाजगी क्षेत्रातूनही केली जाते. पवनहंस हॅलिकॉप्टर लि. (शासकीय) ही सेवा तेल आणि नैसर्गिक वायू मंडळ तसेच भारतीय तेल कंपन्या आणि ईशान्य भारतीय क्षेत्रासाठी वापरली जाते.

### पाठावरील प्रश्न १३.३


१. कोणत्या राज्यामध्ये एकापेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत?

२. आंतरराष्ट्रीय विमानतळ नसलेली दोन राज्ये कोणती?

३. तुमच्या ठिकाणापासून जवळ असलेले स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ कोणते?

## १३.३ संदेशवहन आणि त्यांचे महत्त्व

तुमच्या बहिणीचा विवाह निश्चित झालेला आहे आणि त्यासाठी तुमचे मित्रमंडळी नातेवाईकांनी या विवाहास उपस्थित रहावे यासाठी आपण हे निमंत्रण कसे देणार? तुमच्या आजोबांना हार्ट ॲटॅक आलेला आहे आणि बाबा तर ऑफिसमध्ये आहेत. तर त्यांना तातडीने कसे कळवाल? जपानमध्ये सुनामी आलेल्या आहेत याची माहिती आपणास कशी मिळते? इजिप्तच्या राष्ट्राध्यक्षांना हजारो लोकांचा धिक्कार आहे हे कसे माहीत होते?




आकृती १३.७

आत्ता तुमच्या लक्षात आलेले असेल की संदेश वहनाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व किती आहे. संदेशवहन म्हणजे विचारांची माहितीची आणि कल्पनांची देवाणघेवाण. आपली सुख, दु:ख आपले नातेवाईक मित्रमंडळी यांच्यापर्यंत पोहचविणे म्हणजेच संदेशवहन.

संदेशवहन हे कशासाठी वापरत आहोत. त्यानुसार संदेश वहनाचा प्रकारात बदल होतो. संदेशवहनाची विविध माध्यम आहेत. काही लोक पत्राद्वारे संपर्क साधतात, टेलिग्राम पाठवितात, रेडिओ, टी. व्ही., कॉम्प्युटर, वर्तमानपत्र, मासिके, हँडवील्स, फॅक्स मशीन, ईमेल, (व्यावसायासाठी अथवा अन्य कारणांसाठी) इ. ईमेल बहुतेक सर्वाधिक वापरला जात असून तो जवळजवळ मोफतच आहे.

हे लक्षात घ्या की साधला जाणारा संपर्क हा कशासाठी आहे त्यावर त्याचा प्रकार अवलंबून आहे.

विविध संदेशवहनाचे वर्गीकरण

१. व्यक्तिगत संदेशवहन

२. सार्वजनिक संदेशवहन

### १. व्यक्तिगत संदेश वहनाचे दोन प्रकार

१. पोस्ट सेवा            २. टेलिफोन सेवा

**१. पोस्ट :** पोस्टाची सेवा हा अत्यंत जुना प्रकार आहे. पत्राद्वारे संदेश पाठविणे हा प्रकार दीर्घकाळ लोकप्रिय असा असून सध्या तरी इतका महत्त्वाचा राहिलेला नाही. भारतीय टपालसेवा ही जगातील सर्वात मोठी समजली जाते. सन. २00१ मध्ये दशात १,५५,000 पोस्ट ऑफिसकडून पत्र, मनीऑर्डर्स, पार्सल, पोस्टल सेव्हिंग इ. सेवा पुरविल्या जात आहेत.

**२. टेलिफोन :** सध्याच्या युगात अती महत्त्वाचे संपर्क साधन उदयास आले. ही सेवा सर्वा ंना परवडणारी व तातडीची सेवा आहे.

### २. सार्वजनिक संदेश वहन :

एकाच वेळेस अनके लोकापर्यंत संदेश पोहचविणारे साधन म्हणजे सार्वजनिक संदेशवहन होय. रेडियो टी. व्ही., वर्तमानपत्र, सिनेमा, पुस्तके, मासिके, पारंपारिक साधने आणि उपग्रहाद्वारे साधला जाणारा संपर्क ही र्साजनिक संदेश वहन माध्यम आहेत.

१. **रेडियो :** रेडियो ट्रान्समिशन हे देशात सन १९२७ मध्ये मुंबई आणि कोलकत्त्यामध्ये सुरू झाले. करमणूक कार्यक्रम, शिक्षणाच्या व त्याचबरोबर लोकांपर्यंत माहिती पोहचविणे हा हेतू होता. ऑल इंडिया रेडियोद्वारे (AIR) देशाच्या ९0 विभागामधून ९८.८% लोकांपर्यंत ही सेवा पुरविली जाते.

२. **टेलिव्हिजन :** भारतात टी. व्ही. चा प्रारंभ सन. १९५९ या वर्षी झाला. संदेश वहन प्रसारणातील जगातील मोठी संस्था समजली जाते. सुमारे ८७% लोक टी. व्ही. पाहतात. राष्ट्रीय प्रसारण, स्थानिक दूरदर्शन आणि असंख्या खाजगी प्रसारण करणारे चॅनल्स शैक्षणिक, माहिती आणि करमणूक इत्यादी कार्यक्रम दर्शवित आहेत.

३. **संगणक (माहिती तंत्रज्ञान) :** कॉम्प्युटर सेवा ही सध्या मूलभूत संदेशवहनाचे साधन असून आर्थिक विकासामध्ये त्याला अतिशय महत्त्व आहे. जगभर ही सेवा पोहचलेली असून अगदी घरापासून, कार्यालय, दुकाने, रेल्वे सेवा, हवाई वाहतूक, सेवा,बँका, शैक्षणिक संस्था त्याचा वापर करीत आहेत.

### १३.३.१ नवीन तंत्रज्ञानाची संपर्क साधने

अलीकडच्या काळात तंत्रज्ञानात झालेली क्रांती यामुळे लोकांना अधिक उत्तम सेवा देत आहे.

अ) **इंटरनेट :** याद्वारे विविध प्रकारची माहिती उपलब्ध होते. एका बटनाद्वारे जगभराची माहिती उपलब्ध होवू शकते.

बा) **व्हिडिओ कॉन्फरसिंग :** टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर द्वारे दूरवरच्या ठिकाणावरून आपले विचार समोरासमोर बसून व्यक्त करता येतात.

क) **ईकॉमर्स :** वस्तूची खरेदी किंवा विक्री इंटरनेट आणि फॅक्स द्वारे करण्याची सुविधा उपलब्ध केली जाते.

ड) **टेलिफोन इंटरनेट :** याद्वारे कॉम्प्युटर हा टेलिफोनप्रमाणेच काम करतो. ही सेवा स्वस्तामध्ये उपलब्ध होते.

इ) **ईमेल :** इंटरनेटद्वारे माहिती किंवा पत्र क्षणामध्ये जगभर पाठवण्याची सुविधा आहे.

फ) **टेलिमेडिसिन :** हजारो कि. मी. दूर अंतरावर असलेल्या डॉक्टरांसमोर असून त्यांच्या सल्ल्याचा लाभ रुग्णांना येतो.

अशा प्रकारे शास्त्रीय आणि तांत्रिक प्रगतीची संदेशवहन क्षेत्रामध्ये क्रांती झालेली आहे. याद्वारे जगभराची माणसे जवळ आणली गेलेली आहेत. त्यामुळे संपूर्ण जग हे ग्लोबल व्हिलेज बनलेले आहे.

### कार्य १३.६ :

जुनी पत्त्यांची पाने घ्या. विविध संदेशवहनाची वर्तमानपत्रातील किंवा मासिकातील चित्रे एकएक पत्त्यावर चिटकवा व त्याआधारे एक एक प्रश्न त्या पत्त्याच्या मागील बाजूस लिहा. संदेशवहनाच्या खेळण्याचा तुमचा एक सेट तयार होईल. मित्र किंवा परिवारामध्ये या खेळाचा आनंद घ्या.

सूचना : संपूर्ण देशात एकाच वेळी सर्वापर्यंत संदेश पोहचविण्याचे साधन कोणते? (उत्तर टि. व्ही.)

### पाठावरील प्रश्न १३.४

१. व्यक्तीगत संपर्क साधने, सार्वजनिक संदेश वहनाची साधने आणि इतर साधने आणि इतर यांचे वर्गीकरण करा.

इलेक्ट्रॉनिक्स मॉनिटर, सार्वजनिक वाहन, ट्रॅक्टर, टेलिग्राम, मेट्रोरेल्वे, मोबाईल, पोस्ट कार्ड, फॅक्स, ताजी बातमी, ॲम्बुलन्स, फेसबूक, मासिके, एकाचवेळी अनेकांना एस एम एसग्स

२. पुढील वाक्यांसाठी एका शब्दात उत्तर लिहा.

अ) ज्ञान आणि माहिती विचार यांची देवार्णघेवाण होणारी यंत्रणा

ब) पत्र, पार्सल, मनिऑर्डर पाठविण्याची सुवधिा असणारी सेवा.

क) इंटरनेटद्वारे पत्र पाठविण्याची सुविधा

ड) भारतात रेडिओमार्फत माहिती प्रसारण करणारी संस्था

इ) सध्या भारतात सर्वाधिक लोकप्रिय असणारे व्यक्तिगत संदेश वहन

## आपण काय शिकलो?

- वाहतूक आणि संदेशवहनाची गरज आणि महत्त्व.
- भारतातील रस्त्यांचे विविध प्रकार
- राष्ट्राच्या विकासातील लोहमार्गाचे महत्त्व
- जलवाहतुकीचे प्रकार आणि त्यांचे व्यापारातील महत्त्व
- हवाई वाहतुकीची गरज आणि भारतासारख्या देशातील त्याचे महत्त्व
- आधुनिक संपर्क साधने आणि त्याचा दैनंदिन जीवनावरील परिणाम

## सत्रांत अभ्यास

१. वाहतूक आणि संदेशवहन या राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या जीवन रेषा का म्हणतात?

२. रस्ता वाहतुकीचे तीन गुणदोष लिहा.

३. भारतातील जलवाहतुकीचे महत्त्व कोणते?

४. नकाशातील बंदराच्या वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

अ) पूर्व किनार पट्टीवर असलेल्या बंदराची संख्या किती आहे?

ब) दोन बंदरे असणारी राज्ये कोणती?

क) पराद्वीप बंदर कोणत्या राज्यात आहे?

ड) गोव्यामध्ये असलेल्या बंदराचे नाव लिहा.

इ) भारताच्या अतिदक्षिणेकडील बंदराचे नाव लिहा.


५. इतर वाहतुक साधनांपेक्षा हवाई वाहतूक अधिक महत्त्वाची कशी आहे?

६. दैनंदिन कामकाजामध्ये संदशवहनाचे महत्त्व स्पष्ट करा.

७. व्यक्तिगत संदेशवहन आणि सार्वजनिक संदेशवहन यातील फरक स्पष्ट करा.

८. अलिकडेच तुम्ही केलेल्या रेल्वे प्रवासातील पाच समस्या लिहा. प्रत्येक समस्येवरील उपाय सूचवा.

९. लोहमार्गाची अधिक घनता, मध्यम घनता व कमी घनता असणारी राज्ये शोधून नावे लिहा. अशा प्रकारच्या घनतेतील विविधता का आढळते. (मुद्दे : अडचणीचा भूप्रदेश, हवामान, आर्थिक कारण इ.)




नकाशा : भारत (लोहमार्ग विभाग)

**प्रोजेक्ट :** नवीन रस्ता किंवे रेल्वे मार्गामुळे झालेला बदल जाणून घेण्यासाठी आपल्या परिसरात १0 वर्षे राहाणाऱ्या पाच लोकांच्या मुलाखती घ्या.

किंवा

आपल्या परिसरातील रस्ते तयार करणारी संस्था कोणती? त्याच्या कार्यालयात जावून अधिक माहिती घ्या.

## १३.१ पाठावरील प्रश्नांचय उत्तरे

१. अ) सिल्वर व पोरबंदर ही देशाच्या पूर्व व पश्चिमेकडील टोकावर आहेत.

ब) सुवर्ण चतुष्कक भौमितिकदृष्ट्या त्याचा आकार चतुष्कक स्वरूपाचा आहे. देशातच प्राकृतिक रचनेत विविधता आहे.

२.

अ) लोहमार्गाचे घनदाट जाळे असलेले खालील प्रदेश

पंजाब व हरयाणा ˆ शेतीमालाच्या उत्पादनामुळे

महाराष्ट्र व गुजरात ˆ औद्योगिकरणामुळे

झारखंड व छत्तीसगड ˆ खनिजांमुळे

ब) दोन्हीही महत्त्वाची वाहतुक साधने आहेत.

दोन्ही वाहतुक प्रकार प्रदेशाच्या विकासासाठी महत्त्वाची आहेत.

दूरच्या अंतरासाठी रेल्वे वाहतूक वापरली जाते.

कमी अंतरासाठी रस्त्यांचा प्रामुख्याने वापर केला जातो.

लोहमार्गावरून मोठ्या प्रमाणात मालाची वाहतूक होते.

रस्त्यावरून कमी प्रमाणात वाहतूक होते.

लोहमार्गासाठी मार्ग तयार करणे त्याची देखभाल याचा खर्च अधिक असतो.

रस्ते तयार करणे त्यांची देखभाल करणे यासाठी खर्च कमी येतो.

३. उंच पर्वत रांगा, खडवडीत भूप्रदेश, उदा. सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेश

१३.२.२

| बंदर | राज्य | किनारा |
|---|---|---|
| कांडला | गुजरात | पश्चिम |
| मुंबई | महाराष्ट्र | पश्चिम |
| जवाहरलाल नेहरू | महाराष्ट्र | पश्चिम |
| मार्ग गोवा | गोवा | पश्चिम |
| नवीन मगलोर | कर्नाटक | पश्चिम |
| कोची | केरळ | पश्चिम |
| तुतीकोरीन | तामिळनाडू | पूर्व |
| चेन्नई | तामिळनाडू | पूर्व |
| विशाखापट्टणम् | आंध्र प्रदेश | पूर्व |
| परादीप | ओरिसा | पूर्व |
| हल्दिया | प. बंगाल | पूर्व |
| कोलकाता | प. बंगाल | पूर्व |

ब) राजस्थान हरयाना, पंजाब, बिहार इ. जी. राज्ये किनाऱ्यापासून दूर आहेत त्यांना बंदरे नाहीत.

**१३.३**

१. महाराष्ट्र

२. हरयाना आणि राजस्थान

३. विद्यार्थ्यांच्या अनुभवानुसार लिहावे.

१३.४

१. **वाहतुक साधने :** गरजेनुसार वाहने, ट्रॅक्टर, मेट्रोरेल्वे अँब्युलन्स, ट्रॉली, फेसबूक आणि विविध प्रकार

२. अ) संदेशवहन

ब) पोस्ट

क) ईमेल

ड) ऑल इंडिया रेडिओ

इ) मोबाईल

# १४

# लोकसंख्या : आपली सर्वोच्च संपदा

भारताची लोकसंख्या ही समस्या आहे असे अनेकांकडून आपण ऐकतो आणि तुम्हालाही तसेच वाटत असणार. भारताची लोकसंख्या शंभर कोटीपेक्षा अधिक असून ती वाढतच आहे. येत्या काही दशकात चीनची लोकसंख्येला ओलांडून जाईल व भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश असेल. हा लोकसंख्येचा भार आपल्या विकासातील अडथळा व जीवनमानाच्या दर्जावर परिणाम करेल. पण हे सत्य आहे काय? हा विचार करा आणि लक्षात घ्या की, लोकसंख्या ही संपदा नाही का? सर्वाधिक मनुष्यबळ असणारा भारत हा जगातील प्रमुख देश आहे. लोकसंख्याही जगातील तरुण, सुशिक्षित आणि उत्पादकतेत हातभार लावणारी संपदा आहे. देशातीलच नव्हे तर जागतिक उत्पादनात भर टाकणारी संपदा आहे. या प्रकरणामध्ये लोकसंख्या ही समस्या न समजता आर्थिक विकासातील हातभार लावणारा घटक या अर्थाने पाहणार आहोत. ती संपदा कशी आहे हे आपण या प्रकरणात पाहणार आहोत.

## उद्दिष्टे :

प्रस्तुत प्रकरणाच्या अभ्यासानंतर पुढील गोष्टीची माहिती होईल.

- लोकसंख्या ही केवळ माणसांची संख्या किंवा समस्या नसून ती देशाची संपदा आहे या दृष्टीने परीक्षण करणे.
- लोकसंख्या ही संसाधन निर्मितीच्या घटकांचे स्पष्टीकरण
- भारताच्या नकाशा आराखड्यात घनदाट, मध्यम व विरळ लोकसंख्या दाखविणे
- लोकसंख्येच्या वितरणावर आणि घनतेवर परिणाम करणाऱ्या घटकांचे परीक्षण करणे.
- लोकसंख्येत झालेला बदल, लोकसंख्या रचना, ग्रामीण व नागरी लोकसंख्या, वयोरचना, लिंग रचना आणि साक्षरता याचे परीक्षण करणे.
- कुमार अवस्थेतील लोकसंख्या गट ही उद्याच्या लोकसंख्या संपदेतील महत्त्वाची गरज आहे.

- ❖ महिला सक्षमीकरण ही भारतात गरज आहे.
- ❖ भारत सरकारणे स्विकारलेल्या लोकसंख्या विषयक धोरणाचे विशेषत: साधन संपदा अशा दृष्टीने परीक्षण करणे.

## १४.१ लोकसंख्या ही संपदा

सर्वसाधारणपणे लोकसंख्या म्हणजे लोकांची बेरीज असे सर्वजण समजतात. चौकटीत दर्शविलेल्या मुद्यांनुसार त्याचा अर्थ पाहू. ही संज्ञा विविध दृष्टीने पाहिली जाते. विज्ञानाच्या दृष्टीने किंवा जीवशास्त्राच्या दृष्टीने लोकसंख्येचा अर्थ हा इतर सामाजिक शास्त्रे, भूगोल, अर्थ शास्त्र किंवा समाजशास्त्रातील क्रमीक पुस्तकातील अर्थाने ती भिन्न आहे. संख्याशास्त्रीय दृष्टीने त्याचा अर्थ वेगळाच आहे. हे नंतर समजेलच. तो काय अर्थ आहे? ते संख्याशास्त्राच्या आधारे पहा. एखाद्या प्रदेशातील लोकांची संख्या इतकीच माहिती लोकसंख्येच्या प्रमाणात माहिती घेवू. जनगणनेमध्ये माणसांची मोजदाद केली जाते परंतु लोकसंख्या हे एक साधन व मानवी संसाधन आहे.

**लोकसंख्या म्हणजे काय?**

- ❖ लोकसंख्या म्हणजे विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या. (उदा. खेड्याची, शहराची, राज्याची, देशाची लोकसंख्या इ.)
- ❖ विशिष्ट गट, पंथ किंवा वर्गातील लोकांची संख्या (उदा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, धार्मिक गट उदा. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख इ.)
- ❖ जैविकदृष्ट्या, विशिष्ट संवर्गातील जैविक गटाची माहिती (उदा. वाघांची संख्या किंवा हरणांची संख्या)

संपदा म्हणजे काय?

ज्या घटकाचा वापर आणि पुनर्वापर करता येतो. उदा. खोलीच्या आजूबाजूला पहा तुम्हाला फर्निचर, वह्या, पुस्तके, पेन, कप आणि विविध वस्तू दिसतील त्यांना आपण संपदा म्हणतो त्याचा वापर पुर्नवापर दैनंदिन जीवनामध्ये करतो.

आपण त्याचे मूळ शोधण्याचा प्रयत्न करू. निसर्गातूनच त्याची निर्मिती होते. फर्निचर लाकडापासून बनते लाकूड वनांमध्ये मिळते. वह्यापुस्तकांचा कागद लगद्यापासून तयार होतो. लगदा हा वनातील लाकडापासून मिळतो. पेन हा प्लॅस्टिकपासून तयार होतो. प्लॅस्टिक हे पेट्रोलियमचे उपउत्पादन आहे. कप हा रेतीपासून तयार होतो व रेती हा मातीतील घटक आहे. दैनंदिन वापरातल्या अनेक गोष्टी या निसर्गातील संपदे पासूनच बनविल्या जातात. मानवी परिश्रम आणि बौद्धीक गोष्टींचा वापर करून नैसर्गिक संपदातून वापरायोग्य वस्तूंचे उत्पादन घेतले जाते.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

भारत सरकारने सन १९८५ मध्ये मानव संसाधन विकास हे मंत्रालयाने सुरू केले. या पूर्वी हे कामकाज शिक्षण आणि सांस्कृतिक मंत्रालय सांभाळत होते. हीच पद्धती अनेक राज्यात सुरू केली. मानव हे संसाधन आहे हे यातून सूचित होते.

जर संसाधनातील वस्तूंचा वापर आणि पुनर्वापर होत असेल तर लोकसंख्येला संसाधन म्हणता येईल काय? सर्वांना माहीत आहे की पिकासाठी शेतात धान्याची पेरणी केली जाते. खाणीतून खनिजे घेतली जातात. कारखान्यातून वस्तूंचे उत्पादन घेतले जाते. हे सर्व काही माणसेच करतात. लोकांच्या सुखी आणि संपन्न जीवनासाठी देशातील लोक विविध सोयी व सेवा उपलब्ध करतात. वाहतूक आणि संदेशवहन, शाळा, कॉलेज, दवाखाने, वीज निर्मिती केंद्र, जलसिंचन सुविधा यांचा राष्ट्राच्या विकासामध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

विविध उत्पादने, सोयी सुविधा या आपल्या उपयोगासाठीच आहेत. त्यामध्ये मानवी घटक महत्त्वाचे संसाधन आहे. माणसांशिवाय या विविध संपदांचा विकासही होणार नाही आणि व्यवस्थितपणे वापरही होणार नाही. त्यामुळे लोकांची संख्या आणि गुणवत्ता ही एकत्रितपणे खऱ्या अर्थाने देशाची संपदा आहे.

वरील विधानांमध्ये जगनगणना म्हणजे विशिष्ट काळातील लोकांची मोजदाद म्हणजे केवळ एकूण लोकसंख्या हा भार आहे. परंतु लोकांची गुणवत्ता ही राष्ट्राची संपदा असू शकते. हीच लोकसंख्येचे जर भांडवल म्हणून रुपांतर करावयाचे असेल तर लोकांचे आरोग्य, आहार स्थिती, शिक्षण, विशिष्ट क्षेत्रातील प्रशिक्षण, जीवनमानाचा दर्जा इत्यादीसाठी राष्ट्राला मोठी गुंतवणूक करावी लागेल. लोकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी देशाने आणि समाजाने लक्ष देणे गरजेचे आहे. राष्ट्राच्या विकासामध्ये व्यक्ती व्यक्तीने आपल्या क्षमतेप्रमाणे कार्यरत रहाणे आवश्यक आहे. त्यामुळे मानवी संसाधन हे विकास आणि विकासातील लोकांचा सहभाग या दुहेरी भूमिका आहेत. केवळ माणसांची संख्या म्हणजे संपदा अशी नसून त्याचा वापर हा उपयोगी संपदा अशा दृष्टीने पहाणे आवश्यक आहे.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

मानवी भांडवल : एखाद्या व्यवसायातील कर्मचारी ही संज्ञा काही वर्षापूर्वी वापरली जात होती ती आत्ता बदलली आहे. मानवी संख्येकडून आपण मानवी भांडवलाकडे वळालेलो आहोत. आर्थिक भाषेत मानवी भांडवल हा उत्पादक घटक आहे. कामगाराची कौशल्ये आणि तंत्रज्ञान हा एक प्रकारे संचय आहे असा संदर्भ अपेक्षित आहे.

**जनगणना :** जनगणना म्हणजे लोकांची पद्धतशीरपणे मिळविलेली माहिती आणि मिळालेल्या माहितीची नोंद असते. राष्ट्रीय जनगणनेसह घरोघरची माहिती दर १0 वर्षातून घेतली जाते. भारत सरकारकडून राज्यांच्या सहकार्याने सांख्यिकी माहितीचे संकलन केले जाते. जनगणनेतून भारत सरकार विविध राज्यांच्या सहाय्याने जर्न्मृत्यू, सामाजिक व आर्थिक माहिती मिळवित असते.

### लोकसंख्येला मानवी संसाधन बनविणारे घटक :

लोकसंख्येला मानवी संसाधन बनविणारे घटक कोणते? वरील चर्चेतून लक्षात आलेले असेल की लोकांचे शिक्षण, आरोग्य, जीवनसत्त्वांची स्थिती, लोकसंख्येची गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षण यावरून लोकसंख्येची गुणवत्ता ठरते. वरील घटकांशिवाय लोकसंख्या संसाधन हे सामाजिक स्थिती. जर्न्मृत्यू प्रमाण यावर अवलंबून आहे. त्यामुळे पुढील घटक महत्त्वाचे आहेत. (१) लोकसंख्येचे वितरण (२) लोकसंख्येतील बदल (३) लोकसंख्या रचना इत्यादी घटकांचा सविस्तर अभ्यास पाहू. त्यापैकी प्रथम लोकसंख्येचे वितरण पाहू.

### पाठावरील प्रश्न १४.१


१. संसाधन म्हणजे काय?

२. मानवी संपदेला संसाधन बनविण्यासाठी कोणते गुण लागतात?

## १४.२ लोकसंख्येचे वितरण

लोकसंख्या संपदा म्हणजे काय ते लक्षात आलेले असेल. नैसर्गिक असो किंवा कशीही तिचे वितरण मात्र विषम झालेले आहे. उदा. नैसर्गिक संपदा वने, लोहखनिज, दगडी कोळसा, सर्वत्रच सापडत नाही. आपल्याही देशात तसेच आहे. मानवी संसाधनाचेही असेच आहे. लोकसंख्या ही जगभर सारख्याच प्रमाणामध्ये विखुरलेली नाही तसेच ती सतत बदलतही आहे. एखाद्या राज्यात असलेली लोकसंख्या किंवा देशातील लोकसंख्या म्हणजे लोकसंख्येचे वितरण होय.

सोबतच्या नकाशा क्र. १४.१ मध्ये पाहिल्यानंतर लक्षात येईल की विविध राज्यांमधील आणि केंद्रशासित प्रदेशातील लोकसंख्येचे वितरण दर्शविलले आहे. एक टिंबाशी पाच लक्ष लोक या प्रमाणात वितरण दर्शविलेले आहे. काही राज्याचे क्षेत्रफळ मोठे असूनही टिंबांची संख्या कमी आहे. याचा अर्थ लोकसंख्या विखुरलेली आहे, मध्यम स्वरूपात विखुरलेली आहे. परंतु काही राज्यात मात्र टिंब एकमेकांच्या जवळ आहेत. याचा अर्थ तेथील लोकसंख्या घनदाट आहे. टिंबांच्या वितरणावरून विरळ लोकसंख्या, मध्यम आणि घनदाट लोकसंख्येचे राज्यांप्रमाणे केंद्रशासित प्रदेशाची यादी करा.




आकृती १४.१ : भारतातील लोकसंख्या वितरण

## १४.३ लोकसंख्येची घनता :

वरील नकाशाच्या आधारे कोणत्याही दोन राज्यातील लोकसंख्येच्या वितरणाची तुलना करता येईल. महाराष्ट्र आणि पश्चिम बंगालच्या राज्यांकडे नकाशामध्ये पहा (नकाशा १४.१) लोकसंख्येच्या वितरणामध्ये फरक दिसेल. पश्चिम बंगालमध्ये महाराष्ट्रापेक्षा लोकसंख्या जास्त आहे असे वरवर पहाता लक्षात येईल परंतु तसे नाही. पश्चिमबंगालपेक्षा महाराष्ट्राची लोकसंख्या अधिक आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये लोकसंख्या पश्चिमबंगालपेक्षा क्षेत्र जास्त असल्याने विरळ आहे त्यामुळे क्षेत्राचा विचार केल्याशिवाय आपण लोकसंख्येची तुलना करू शकत नाही. त्यामुळे लोकसंख्येची प्रादेशिक किंवा देशातील तुलना ही घनतेशिवाय करू शकत नाही.


### तुम्हास हे माहित आहे का ?

लोकसंख्येची घनता : दर चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये राहणाऱ्या लोकांची संख्या म्हणजे लोकसंख्येची घनता होय. ती खालीलप्रमाणे काढली जाते.

$$\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{विशिष्ट भूप्रदेशातील एकूण लोक}}{\text{त्या प्रदेशाचे क्षेत्रफळ चौ. कि. मी.}}$$

लोकसंख्येची घनता काढताना त्या प्रदेशात राहणारे लोक आणि त्या प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ यांचे गुणोत्तर असते. यामधून आपणास त्या प्रदेशातील सरासरी दरचौरस कि. मी. मध्ये किती लोक राहतात. हे उत्तर मिळते उदा. एखाद्या जिल्ह्यात २,५0,000 लोक आहेत व त्या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १000 चौ. कि. आहे. तर लोकसंख्येची तेथील घनता खालील प्रमाणे काढता येईल.

$$\text{लोकसंख्येची घनता} = \frac{\text{२,५0,000 लोक}}{\text{१000 चौ. कि. मी.}} = \text{लोकसंख्येची घनता २५0 दर चौ. कि. मी. ला}$$




**आकृती १४.२ : भारत लोकसंख्येची घनता**

नकाशामध्ये (क्र. १४.२) दर्शविल्याप्रमाणे भारताच्या लोकसंख्येच्या घनतेत राज्याराज्यामध्ये फरक आढळतो.

**कार्य १४.१ :**

**भारत लोकसंख्येची घनता**

आकृती १४.२ मध्ये पाहून दर चौ. कि. मी ला ५०० लोक जास्त लोकसंख्येची घनता, दर चौ. कि. मी.ला १०० ते ५०० लोक मध्यम लोकसंख्येची घनता, दर चौ. कि. मी.ला १०० पेक्षा कमी लोक विरळ लोकसंख्येची घनता.

जास्त लोकसंख्येच्या घनतेची राज्ये

मध्यम लोकसंख्येच्या घनतेची राज्ये


कमी लोकसंख्येच्या घनतेची राज्ये


लोकसंख्येच्या घनतेतील राज्यनिहाय स्थिती अशी का आहे याचे कारण सांगता येईल का?

**मुद्दे :**

प्रतिकूल आणि विषम हवामान स्थिती, उंचसखल भूप्रदेश, हलक्या मृदा इ. कारणामुळे लोकसंख्येची कमी घनता आढळते. सुपिक मृदा, पुरेसा पाऊस, जलसिंचन सुविधांचा विकास, मध्यम हवामान आणि नागरीकरण, जास्त लोकसंख्येच्या घनतेस कारणीभूत आहे. मध्यम सुपिकता, मध्यम पर्जन्य, जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा, वालुकामय भूमी यामुळे लोकसंख्येचे वितरण सर्वसाधारण असते.

आकृती १४.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भारतीय लोकसंख्येच्या घनतेत बदल होत आहे. सन १९०१ मध्ये द. चौ. कि. मी. ला ७७ लोक होते. सन १९३१ मध्ये हे प्रमाण द. चौ. कि. मी. ९० ला झाले. तर सन २००१ मध्ये हे प्रमाण ३२५ पर्यंत पोहचले. सर्वाधिक लोकसंख्येच्या घनतेचे राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश कोणता हे समजल्यास मोठी गंमत वाटेल. जनगणना अहवाल २००१ पाहून लक्षात येईल की भारताची राजधानी दिल्ली येथील लोकसंख्येची घनता द. चौ. कि. मी.ला ९३४० होती. त्याखालोखाल चंदीगड या दर चौ. कि.मीला केंद्रशासित प्रदेशात ७९०० लोक तर अरुणाचल प्रदेशात दर चौ. कि. मी.ला १३ लोक सर्वात कमी घनतेचे राज्य होते. राज्याचा विचार करता पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक लोकसंख्येची घनता द. चौ. कि. मी.ला ९०३ इतकी होती.




**आकृती १४.३ : लोकसंख्येची दशकानुसार घनता (१९०१२००१)**


## लोकसंख्येच्या घनतेच्या वितरणावर परिणाम करणारे घटक :

लोकसंख्येच्या घनतेचे विषम वितरण का आहे? ज्या ठिकाणी संपदा सहजपणे उपलब्ध होतात तेथे मनुष्याचा वास्तव्य करण्याचा कल असतो. पाणी, सुपिक मृदा, निवाऱ्याची जागा कामाच्या संधी आणि इतर विविध कारणे आहेत. वरील घटकांची उपलब्धता भौगोलिक घटकावर अवलंबून असते व भौगोलिक घटकांचे वितरण असमान झालेले आहे. त्यामुळे लोकसंख्येची घनता ही देखील विषम आहे. या वितरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचे प्राकृतिक आणि सामाजिक व आर्थिक घटकांमध्ये वर्गीकरण करू.

### अ) प्राकृतिक घटक

प्राकृतिक घटकांमध्ये प्राकृतिक रचना, हवामान मृदा या प्रमुख घटकांचा लोकसंख्येचे वितरण आणि घनता यावर परिणाम होतो.

१. **प्राकृतिक रचना :** आपण एखाद्या पर्वतीय भागात किंवा दरीमध्ये गेलेला असाल तर लक्षात येईल की मैदानापेक्षा पर्वतीय क्षेत्रामध्ये लोकसंख्या कमी आढळते. प्राकृतिक रचना म्हणजे प्रदेशाचा उंचसखलपणा उतार हा उंचीतील फरकाचा परिणाम होय. सहज जा ये करता येणाऱ्या प्रदेशात वास्तव्यासाठी लोक प्राधान्य देतात. त्यामुळे मैदानी प्रदेशात लोकसंख्येची घनता अधिक असते परंतु उंच सखल प्रदेश किंवा पर्वतीय प्रदेश, पठारी प्रदेश मात्र सुलभ नसतात तेथे घनता कमी असते. उत्तरेकडील मैदानांमध्ये असणाऱ्या लोकसंख्येची घनता आणि हिमालयाच्या क्षेत्रामधील लोकसंख्येची घनता याची तुलना करताच लोकसंख्येच्या वितरणावर प्राकृतिक रचनेचा होणारा परिणाम लक्षात येईल.




**आकृती १४.४ : लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक**

> **भूरचना :** कमी अधिक उंचीच्या प्रदेशास भूरचना म्हणतात. त्यातून पर्वत दऱ्या तयार होतात.

२. **हवामान :** लोकसंख्येच्या वितरणावर आणि घनतेवर हवामान या घटकाचा सर्वाधिक परिणाम होतो. मानवी जीवनास अनुकूल हवामान सुलभ असते. अनुकूल हवामान प्रदेशात लोकसंख्येची घनता अधिक असते. याउलट प्रतिकूल हवामान उदा. अती उष्ण, अती थंड, अती कोरडे किंवा अती आर्द्र हवामान स्थितीत लोकसंख्येची घनता कमी असते. भारतात कोरड्या हवामानाची स्थिती राज्यस्थानामध्ये तर तीव्र थंडी असणाऱ्या जर्मूकाश्मीर किंवा हिमाचल प्रदेश, उत्तरांचल प्रदेशात लोकसंख्येची घनता कमी आहे.

३. **मृदा :** मानवास शेतीच्या दृष्टीने मृदेची गुणवत्ता महत्त्वाची असते. सुपिक मृदेचे क्षेत्र जास्तीत जास्त लोकांचे पोषण करू शकते. म्हणूनच उत्तर प्रदेशातील सुपिक मृदेच्या क्षेत्रामध्ये किंवा किनारी प्रदेशात लोकसंख्येची घनता अधिक आहे. याउलट मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगडमध्ये मृदेची कमी सुपिकता असल्याने लोकसंख्येची घनता कमी आहे.

## ब) सामाजिक व आर्थिक घटक

लोकसंख्येची घनता आणि वितरणावर पुढील सामाजिक व आर्थिक स्थितीचा परिणाम होतो.

१. **औद्योगिकरण आणि नागरीकरण :** आपणास माहीत आहे की औद्योगिक परिसरामध्ये फार मोठ्या प्रमाणात लोक राहतात. लोकांचे नागरी भागात, नगरामध्ये किंवा शहरामध्ये राहण्यास प्राधान्य असते. खनिज क्षेत्रामध्येही लोकांचे प्राधान्य असते. झारखंडमध्ये लोकसंख्येची घनता अधिक आहे. याचे कारण तेथे विविध प्रकारच्या व्यवसायांची संधी असते तसेच शैक्षणिक आणि आरोग्याच्या सुविधाही उत्तम असतात. दिल्ली, मुंबई, बंगलूरु, हैदराबाद, चेन्नई, कोलकाता ही भारतातील जास्त लोकसंख्येची शहरे आहेत.

२. **वाहतूक व संदेशवहन :** देशातील काही भागात वाहतुक व संदेश वहन आणि अन्य सुविधा इतर प्रदेशापेक्षा अधिक आहेत. उत्तरेकडील मैदानी प्रदेशात या विविध सुविधा आहेत तर ईशान्येकडील भागात अत्यंत कमी आहेत. या विविध सुविधा प्रामुख्याने जास्त लोकसंख्येच्या घनतेच्या प्रदेशात आहेत. काही वेळा सांस्कृतिक आणि धार्मिक कारणांमुळेही एखाद्या ठिकाणच्या लोकसंख्येची घनता अधिक असते.

वरील विविध कारणांचा एकत्रितही परिणाम होतो. गंगेचे मैदान जास्त लोकसंख्येच्या घनतेचे आहे. हे एक उदाहरण आहे. सपाट भूप्रदेश, सुपिक मृदा, अनुकूल हवामान, औद्योगिकीकरण, नागरिकरण, वाहतूक व संदेशवहनाच्या उत्तम सुविधा यांचा लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम झालेला आहे. याउलट उंचसखल टेकड्यांचा प्रदेश, प्रतिकूल हवामान, साधारण वाहतूक व दळणवळण साधनांची कमतरता यामुळे विरळ लोकसंख्येची घनता आहे. उदा. अरुणाचल प्रदेश

## कार्य १४.२

भारताचे प्राकृतिक विभाग प्रकरण क्र. ११ मध्ये पहा. उत्तरेकडील पर्वतीय प्रदेश, दख्खनचे पठार आणि त्यावरोवर १४.१, १४.२, १४.४ लोकसंख्येची घनता याचा एकत्रित अभ्यास करा.

मानवी जीवनास अनुकूल असणाऱ्या प्राकृतिक घटकाचा सहसंबंध अभ्यासून परीक्षण करा.

## पाठावरील प्रश्न १४.२

१. सन २००१ च्या जनगणनेनुसार सर्वाधिक लोकसंख्येच्या घनतेचे राज्य कोणते?

अ) पश्चिम बंगाल     ब) केरळ

क) तामिळनाडू     ड) उत्तर प्रदेश

२. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३,००,००० आणि भूप्रदेश १००० चौ. कि. मी. असेल तर लोकसंख्येची घनता किती असेल?

अ) द. चौ. कि. मी. ला १५० लोक     ब) द. चौ. कि. मी.ला २०० लोक

क) द. चौ. कि. मी. ला २५० लोक     ड) द. चौ. कि. मी. ला ३०० लोक

३. दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई या शहरांच्या जास्त लोकसंख्येच्या घनतेस कारणीभूत असणाऱ्या कोणत्याही चार घटकांची नावे लिहा.

४. उत्तरांचलमध्ये लोकसंख्येची घनता का कमी आहे? दोन कारणे द्या.

## १४.४ लोकसंख्योतील बदल

एखाद्या देशातील मानवी संसाधन हे लोकसंख्येच्या गुणवत्तेवर अवलंबून असते त्यातून लोकसंख्येत बदल होतो. हा बदल लोकसंख्या वाढ किंवा घट या स्वरूपात असतो. जगभरची लोकसंख्या वाढत असली तरी काही देशात मात्र घट होते. दोन्ही स्थितीमध्ये लोकांच्या गुणवत्तेमध्ये बदल होते. जर लोकसंख्येची वाढ वेगाने झाली तर लोकसंख्या वाढ आणि संपदा यांचे संतुलन बिघडते यांचा उलट परिणाम हा लोकसंख्येच्या गुणवत्तेवर होतो.


भारतीय लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. सन १९०१ मध्ये २३.८ कोटी असलेली लोकसंख्या २००१ मध्ये १०२.८ कोटीपर्यंत पोहचली व ती सातत्याने वाढत आहे. या शंभर वर्षात लोकसंख्या चौपटीने वाढली. या उलट पश्चिम युरोपियन राष्ट्रांमध्ये लोकसंख्येत घट होत आहे असे का व्हावे? या बदलाची कारणमिमांसा अभ्यासू.

**लोकसंख्या बदलाचे घटक :**

कोणत्याही देशाच्या लोकसंख्येत वाढ किंवा घट प्रामुख्याने तीन कारणांनी होते. :१) जन्मदर २) मृत्यूदर ३) स्थलांतर. सामाजिक आर्थिक घटकांचा ही परिणाम जर्न्ममृत्यूदरावर होतो. पर्यायाने लोकसंख्येत बदलावरही होतो. आकृती १४.५ मध्ये निरीक्षण केल्यानंतर लक्षात येईल की आपल्या देशातील लोकसंख्या वाढीचे कारण म्हणजे जास्त जन्मदर आणि कमी मृत्यूदर हेच आहे. राष्ट्रीय पातळीचा विचार करता लोकसंख्या वाढीवर स्थलांतराचा फारसा परिणाम होत नाही.

लोकसंख्या ः जर्न्ममृत्यू आणि वाढीचा दर

(१९६१ ते २००१)




**आकृती १४.५ लोकसंख्येची वाढ**

आकृती क्र. १४.५ च्या निरीक्षणावरून लक्षात येईल की सन १९२१ पासून मृत्यू दरात घट होत आहे. जन्मप्रमाणही त्याच काळापासून कमी होत आहे परंतु दोन्हीतील घट विचारात घेता मृत्यूदर घट ही जन्म दरापेक्षा जास्त आहे. जन्मदर व मृत्यूदरातील तफावत लोकसंख्या वाढीस कारणीभूत आहे.

आकृती क्र. १४.६ मधील दशकातील लोकसंख्या वाढ दृष्टीक्षेपात येते. लोकसंख्येची दशकातील वाढीतील घट सन १९८१ ते १९९१ आणि सन १९९१´ २००१ या दरम्यानची वाढीतील घट तुलना करता ते आशादायक चित्र आहे. वाढीमध्ये घट झाली तरी लोकसंख्या सातत्याने वाढतच आहे. सन १९०१ ते २००१ हा शंभर वर्षाचा कालावधीमध्ये जन्ममृत्यूच्या आधारावर स्थीर, हळूवार बदल, वेगाने बदल व घटता दर अशी विभागणी करता येईल.

## तुम्हास हे माहित आहे का ?

**जन्मदर :** एक विशिष्ट कालावधीमध्ये एखाद्या प्रदेशातील दर हजारी लोकसंख्येत जन्मला येणाऱ्या अर्भकाची संख्या म्हणजे निव्वळ जन्मदर होय.

$$\text{जन्मदर} = \frac{\text{वर्षातील जन्माला येणाऱ्या बालकांची संख्या}}{\text{तेथील प्रदेशाची एकूण लोकसंख्या}} \times १०००$$

उदा. एखाद्या जिल्ह्यात वर्षामध्ये ८०० बालके जन्माला आली आणि तेथील लोकसंख्या २५००० असेल तर,

$$\text{जन्मदर} = \frac{८००}{२५००} \times १००० = ३२. \text{ दरहजारी जन्मदर}$$

**मृत्यूदर =** एक हजार लोकसंख्येतील विशिष्ट वर्षामध्ये विशिष्ट प्रदेशात मृत्यूमुखी पडलेल्या लोकांची संख्या म्हणजे ढोबळ मृत्यूदर होय.

$$\text{मृत्यूदर} = \frac{\text{विशिष्ट वर्षामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या}}{\text{त्या प्रदेशातील एकूण लोकसंख्या}} \times १०००$$


उदा. एखाद्या जिल्ह्यात वर्षामध्ये ६०० मृत्यू झाले असतील आणि त्या वर्षी २५००० लोकसंख्या असेल तर मृत्यूदर...

$$\text{मृत्यूदर} = \frac{६००}{२५\,०००} \times १००० = २४ \text{ मृत्यूदर दरहजारी}$$

**नैसर्गिक वाढदर** ः नैसर्गिक लोकसंख्या वाढदर म्हणजेच जन्मदर आणि मृत्यूदर यांच्यातील फरक.

नैसर्गिक वाढदर = जन्मदर´ मृत्यूदर

उदा. एखाद्या वर्षामध्ये त्या प्रदेशातील जन्मदर ३२ आहे आणि मृत्यूदर २४ आहे तर नैसर्गिक वाढदर = ३२´ २४ = ८ हा दर हजारी लोकसंख्या वाढीचा दर आहे.




**आकृती १४.६ भारत दशकातील लोकसंख्या वाढ (१९०१ ´ २००१)**

**सन १९०१ ते २००१ दशकानुसार लोकसंख्या वाढ ः**

भारताची लोकसंख्या विसाव्या शतकापासूनच वाढते आहे त्याला सन १९२१ चा अपवाद आहे. लोकसंख्येत वाढीचे सातत्य आहे. सन १९२१ नंतर वाढीत सातत्य आहे. त्यामुळे सन १९२१ हे लोकसंख्येच्या विभाजनाचे वर्ष म्हणून समजले जाते.

लोकसंख्या वाढीस कारणीभूत असणाऱ्या घटकांची कारणमिमांसा पाहू. निरक्षरता हे प्रमुख कारण आहे. शैक्षणिक मागासलेपण, असमाधानकारक आरोग्य व आहार स्थिती आणि दारिद्र्य ही प्रमुख कारणे आहेत. सामाजिक कारणेही तितकीच महत्त्वाची आहेत. उदा. मुलगा म्हणून प्राधान्य दिले जाते, बालवयात विवाह, धार्मिक पगडा, स्त्रीयांचे दुय्यम स्थान इ. घटकांचा परिणाम होतो.

## पाठावरील प्रश्न १४.३

१. एखाद्या प्रदेशातील जन्मदर दरहजारी ४५ आहे आणि दर हजारी मृत्यूदर २५ असेल तर नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा दर काय?

(अ) हजारी १५ (ब) हजारी १८ (क) हजारी २० (ड) हजारी २५

२. भारतीय लोकसंख्या वाढीस कारणीभूत असणारा प्रमुख घटक´

(अ) जास्त जन्मदर आणि जास्त मृत्यूदर (ब) कमी जन्मदर आणि कमी मृत्यूदर

(क) जास्त जन्मदर आणि कमी मृत्यूदर (ड) कमी जन्मदर आणि जास्त मृत्यूदर

३. सन १९२१ हे वर्ष लोकसंख्या विभाजनाचे वर्ष का समजले जाते?

## १४.५ लोकसंख्या रचना

लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येची घनता आणि लोकसंख्या वाढ इत्यादी आपण शिकलेलो आहोत. जन्म व मृत्यूदरातील तफावतीवरून लोकसंख्या बदलाची स्थिती तुमच्या लक्षात तुमच्या लक्षात आलेली असेल. याचा परिणाम हळूवार होणारी लोकसंख्येची वाढ आणि गुणात्मक मानवी संसाधन यावर परिणाम होतो. लोकसंख्या रचना म्हणजे काय? तर लोकसंख्येची वयोरचना, स्त्रीपुरुष प्रमाण, ग्रामीण आणि नागरी लोकसंख्या, साक्षरतेची स्थिती ही वैशिष्ट्ये म्हणजे लोकसंख्या संरचना होय. भारतीय लोकसंख्येची संरचनेची आपण माहिती घेवू.

१. वयोरचना


२. लिंगरचना

३. ग्रामीण आणि नागरीरचना

४. साक्षरता

### १. वयोरचना ः

राष्ट्राच्या विकासाची सध्या स्थिती आणि भविष्यकालीन विकासाची स्थिती यावर परिणाम करणारा घटक आहे. लोकसंख्या रचनेचे तीन गट करता येतील मुले (0 ते १४ वर्षे), तरुण (१५ ते ६0 वर्षे), वृद्ध (६0 पेक्षा अधिक वर्षाचे लोक) आकृती १४.७ मध्ये हे गट दिलेले आहेत. सन १९७१ च्या जनगणनेनुसार मुलांच्या प्रमाणात घट होत असून तरुणांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे वृद्धांच्या संख्येमध्येही वाढ होत आहे.




**आकृती १४.७ : वयोगटानुसार विभाजन**

अशाप्रकारे परावलंबी लोकसंख्येत वाढ होत आहे. मुले आणि अधिक वृद्ध यांची बेरीज परावलंबी लोकसंख्या समजली जाते. यासाठी देशाला मुलांवरील गुंतवणूक आणि वृद्धांच्या स्वास्थ्यावर गुंतवणूक करावी लागते. अन्यथा तोच गुंतवणूकीचा खर्च विकासावर खर्च करता आला असता.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

**परावलंबीत्व गुणोत्तर**

$$\text{परावलंबीत्व गुणोत्तर} = \frac{\text{परावलंबी लोकसंख्या (0 ते १४ वर्षे) + (६0 पेक्षा अधिक वर्षांचा गट)}}{\text{कामकरी लोकसंख्या (१५ ते ५९ वर्षे)}} \times १00$$

उदा. एखाद्या जिल्ह्यातील 0 ते १४ वयोगटाची लोकसंख्या अधिक ६0 वर्षावरील लोकसंक्या ७000 आहे आणि कामकरी वयोगटाची (१५ ते ५९ वर्षे) १८000 आहे. तर

$$\text{परावलंबीत्व गुणोत्तर} = \frac{७000}{१८000} \times १00 = ३८.८९$$

याचाच अर्थ १00 लोकसंख्येपैकी ३८.८९ लोक परावलंबी आहेत आणि ६१.११ लोक प्रत्यक्ष कामकरी लोक आहेत.

### विचार करा आणि चिंतन करा

तुमचे आजोबा आणि आजी ६0 पेक्षा अधिक वयाचे आहेत ते परावलंबी वयोगातील आहेत. ते कुटुंबाला भार आहेत तुम्हास वाटते का? कुटुंबाच्या आणि समाजाच्या कल्याणाचा भाग नाही का? उत्तर होय असेल तर त्यांचा सहभाग कसा? आणि उत्तर नाही असे असेल तर ते सहभागी का नाहीत?

## तरुण : लोकसंख्येचा विशेष गट

वयोरचनेच्या या गटाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन असून हा विशेष वयोगट आहे. परंपरागत लोकसंख्या विभाजनानुसार मुले तरुण आणि वृद्ध असे तीन गट करतो. परंतु प्रत्यक्षात व्यक्तीगत स्वरूप पाहता काहींचा समावेश ना बालगटात किंवा ना तरुण गटामध्ये समावेश करता येतो. तुमचेच उदाहरण घेतल्यास लक्षात येईल की तुमचे पालक किंवा तरुण म्हणतील हे तू लहान मुलांसारखे काय करतोस? तर दुसऱ्या बाजूस हेच तरुण सांगतील तू हे कसे करू शकशील? तू अजून प्रौढ झालेला नाहीस. प्रत्यक्षात ही अवस्था बाल्यावस्थेतून तारुण्यावस्थेत जाताना येते. साधारण वय वर्षे १0 ते १९ किंवा त्यापेक्षा किंचीत जास्त हा काळ कुमार अवस्थेचा असतो या वयोगटाला कुमार गट म्हणतात. कुमारावस्थेचा चौकटीतील अर्थ पहा. मग लक्षात येईल.

### तुम्हास हे माहित आहे का ?

**कुमारावस्था म्हणजे काय?**


संयुक्त संघाने पुढील वयोगटाच्या आधारावर केलेली व्याख्या ´

- ❖ कुमारावस्था १० ´ १९ वर्षे
- ❖ युवक १५ ´ २४ वर्षे
- ❖ तरुण लोक १० ´ २४ वर्षे

कुमारावस्थेचे वय नक्की किती ते निश्चित सांगता येत नाही. हा कालावधी व्यक्तींव्यक्तींमध्ये विविध असतो. कुमारावस्था म्हणजे बालवयोगटानंतर आणि युवकापूर्वीचा कालावधी होय.

कुमारावस्थेमध्ये प्राकृतिक, मानसशास्त्रीय आणि सामाजिक परिपक्वता हा बाल्यावस्थेपासून तारुण्यापर्यंतचा कालावधी यामध्ये वयात येण्यापासून ते प्रजोत्पादन सक्षमतेचा कालावधी आहे.

टेबल क्र. १.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कुमार वयोगटातील भारतीय लोकसंख्या २२ टक्के आहे. हे प्रमाण सन २००१ चे आहे. सन २००० मध्ये हे प्रमाण वाढलेले आहे. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० प्रमाणे सेवेखालील लोकसंख्या असे समजले जाते. कारण त्यांच्या गरजा निश्चित झालेल्या नसतात. या धोरणामध्ये कुमाराच्या गरजा दर्शविलेल्या आहेत. (१) प्राकृतिक, मानसशास्त्रीय शरीरशास्त्रीय आणि सामाजिक परिवर्तने आणि विकास यांची अचूक माहिती कुमारवयात देण्यात यावी. (२) जीवन कौशल्याचा विकास करावा भविष्यातील धोके टाळण्यासाठी सक्षम व्हावे. प्राकृतिक मानसिक, सामाजिक आरोग्याचा विकास करावा. (३) पुरक आहार व जीवनसत्त्वे पुरवावीत (४) आरोग्य आणि मार्गदर्शनाची सोय करणे.




आकृती १४.८ (अ) : स्त्रीपुरुष प्रमाणातील बदल

टेबल १.१ कुमार गट (१० ते १९ वर्षे) दर हजारी, स्त्रीपुरुष प्रमाण सन १९९१ ते २००१

| जनगणना | कुमारावस्थेतील संख्या | लोकसंख्येतील टक्केवारी | पुरुष | पुरुष टक्केवारी | स्त्रीया | स्त्री टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९१ | १८१,४१९ | २१.४ | ९५९६९ | २१.९ | ८५,४५० | २१.० |
| २००१ | २२५०६१ | २१.९ | ११९५७१ | २२.४ | १०५४९० | २१.२ |

### कार्य १४.३

टेबल क्र. १.१ पहा. आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. मुलींच्या कुमारवस्थेतील संख्या मुलांपेक्षा कमी का आहे?

स्त्रियांची संख्या जीवशास्त्रीय दृष्टीने अधिक असणे अपेक्षित आहे?


२. सन १९२१ आणि २००१ च्या जनगणनेनुसार स्त्री आणि पुरुष यांच्या टक्केवारीत फरक का पडला आहे?

३. कुमार गटातील लोकसंख्या ही सेवेखालील लोकसंख्या का समजली जाते?

४. कुमार गटातील संस्कारांच्या मार्गदर्शनाची समाजाने कशी दखल घ्यावी.

## २. लिंग प्रमाण (स्त्रीपुरुष प्रमाण)

मानवी संसाधनातील स्त्रीपुरुष प्रमाण हे लोकसंख्येची गुणवत्ता निदर्शक आहे. किंवहुना स्त्रीपुरुष प्रमाण किती आहे याची माहिती करून घ्यावी. दर हजारी पुरुषांमागे असलेले स्त्रीयांचे प्रमाण म्हणजे स्त्रीपुरुष प्रमाण होय. एक विशिष्ट कालावधीमध्ये असलेले स्त्रीपुरुष प्रमाण हे समान असेल तर अनुकूल लिंग प्रमाण समजले जाते.




आकृती १४.८ (ब) : स्त्रीपुरुष प्रमाणातील बदल

परंतु आपल्या देशात स्त्रीपुरुष प्रमाण हे कायम प्रतिकूल राहिलेले आहे. स्त्रीयांचे प्रमाण कमी असून त्यामध्ये सातत्याने घट होत आहे. सन १९०१ मध्ये स्त्रीयांची दरहजारी पुरुषांमागील संख्या ९७२ इतकी होती तर २००१ मध्ये हे प्रमाण ९३३ पर्यंत खाली आहे हे आकृती १४.८ (अ) आणि (ब) मध्ये पहावयास मिळेल.

**तुम्हास हे माहित आहे का ?**

स्त्रीपुरुष प्रमाण खालील प्रमाणे काढले जाते.

$$\text{स्त्रीपुरुष प्रमाण} = \frac{\text{एखाद्या प्रदेशातील स्त्रीयांची एकूण संख्या}}{\text{त्याच प्रदेशातील पुरुषांची एकूण संख्या}} \times १०००$$

उदा. एखाद्या जिल्ह्यातील स्त्रीयांची संख्या १२००० आणि पुरुषांची संख्या १३००० असेल तर

$$\text{स्त्रीपुरुष प्रमाण} = \frac{१२०००}{१३०००} \times १००० = \text{स्त्रीपुरुष प्रमाण हजारी पुरुषांशी ९२३}$$

आपल्या देशामध्ये स्त्रीपुरुष प्रमाण व्यस्त का आहे? प्रामुख्याने स्त्रीयांच्या बाबतीमध्ये समाजात भेदभाव केला जातो. देशामध्ये अनुकूल स्त्रीपुरुष प्रमाण एका राज्यात व एका केंद्रशासित प्रदेशात आहे. स्त्रीपुरुष प्रमाण केरळ या राज्यात १००० पुरुषांशी १०५८ स्त्रीया असे आहे तर केंद्रशासित प्रदेश पौंडिचेरी (पुदुचेरी) येथे १००१ स्त्रीया इतके आहेत.

### बालक स्त्रीपुरुष प्रमाण

बालकांचे घसरते स्त्रीपुरुषप्रमाण दिसून येत आहे. ० ते ६ वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाणात घसरण होत आहे. सन १९९१ ते २००१ या जनगणनेमध्ये अल्प सुधारणा झालेली आहे. २८ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेशांपैकी केरळ, मिझोरम, सिक्कीम त्रिपुरा ही चार राज्ये आणि लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशात स्त्रीपुरुष प्रमाणामध्ये बदलाचे संकेत आहेत. हिमाचल प्रदेश, हरियाना गुजरात पंजाब, उत्तरांचल राज्यांमध्ये आणि चंदीगड, दिल्ली यामध्ये स्त्रीयांची संख्या खूपच कमी आहे. स्त्री बालहत्त्या या राज्यामध्ये होते हे आदर्श समाजाच्या विरोधी कार्य आहे.


### ३. ग्रामीण आणि नागरी लोकसंख्या रचना ः

भारत हा खेड्यांचा आणि शेतकऱ्यांचा देश आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी १० पैकी ९ लोक खेड्यात रहात होते. आजही देशाची तीन चतुर्थांश लोकसंख्या खेड्यात राहते.

नागरी लोकसंख्या म्हणजे ज्या लोकसंख्येतील तीन चतुर्थांशपेक्षा अधिक लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शेतीशिवाय अन्य व्यवसायात असतात. तेथील लोकसंख्या किमान ५००० आहे आणि लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी ला ४०० पेक्षा अधिक आहे त्या लोकसंख्येला नागरी लोकसंख्या म्हणतात.

आकृती क्र. १४.९ नुसार आपली वाटचाल ही नागरी करणाकडे होत आहे त्याचे परिणाम म्हणजे घरांची कमतरता, पाणी, वीज यांची टंचाई पर्यावरणावर केलेले अतिक्रमण आहे.

**ग्रामीण आणि नागरी लोकसंख्या (१९५१२००१)**






| वर्षे | Rural (लोकसंख्या दशलक्ष) | Urban (लोकसंख्या दशलक्ष) | Rural (शेकडा प्रमाण) | Urban (शेकडा प्रमाण) |
|---|---|---|---|---|
| 1951 | 299 | 62 | 82.7 | 17.3 |
| 1961 | 360 | 79 | 82.0 | 18.0 |
| 1971 | 439 | 109 | 80.1 | 19.9 |
| 1981 | 524 | 159 | 76.77 | 23.3 |
| 1991 | 629 | 218 | 74.3 | 25.7 |
| 2001 | 742 | 285 | 72.2 | 27.8 |

**आकृती १४.९ : ग्रामीण आणि नागरी लोकसंख्येतील बदल**

**४. साक्षरता ः**

साक्षरता ही सामाजिक विकासाचे निर्देशक आहे. साक्षरतेची जनगणना अहवालानुसार केलेली व्याख्या अशी आहे. वय वर्षे ७ किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या व्यक्तीला कोणतीही भाषा लिहिता आणि वाचता येणे व समजणे म्हणजे ती व्यक्ती साक्षर होय.

सन १९५१ मध्ये देशात साक्षरचे प्रमाण १८.८३ टक्के इतके होते तर सन २००१ मध्ये हे प्रमाण ६५.३८ टक्के पर्यंत पोहचले. केरळमध्ये सर्वाधिक साक्षरता (९०.८६ टक्के) त्याखालोखाल मिझोरम (८८.४९ टक्के) आणि लक्षद्वीपमध्ये ८७.५२ टक्के होते. स्त्री साक्षरतेचे प्रमाण पुरुष साक्षरतेपेक्षा कमी आहे हे आपणास (आकृती १४.१० वरून) दिसून येईल.





**आकृती १४.१० साक्षरता**

## कार्य १४.४

तुमच्या जवळच्या १०.१५ घरातील खालीलप्रमाणे माहिती जमा करा.

१. मुलाखत देणाऱ्याचे नाव : ................

२. वय : ................ वर्षे

३. शैक्षणिक पात्रता : ................

४. घरामध्ये कमवित्या व्यक्तींची संख्या : ................

५. घरातील एकूण लोक : पुरुष ..... स्त्रीया ................

६. कुटुंबातील व्यक्तींचा वयोगट

अ) वय वर्षे १४ पर्यंत ................

ब) वय १५ ते ६० वर्षे ................

क) ६० वर्षांपेक्षा अधिक वय ................

७. वरील सांख्यिकी माहितीच्या आधारे परीक्षण करा.

अ) स्त्रीपुरुष प्रमाण

ब) परावलंबी लोक

अ) वय वर्षे १४ पेक्षांकमी ........ त्याची टक्केवारी ......

ब) ६० पेक्षा अधिक वयाचे लोक ...... . त्यांची टक्केवारी .......

आपल्या लक्षात आलेले असेल की देशाची केवळ लोकसंख्येची आकडेवारी म्हणजे मोठे संसाधन असे नसून लोकसंख्येच्या गुणवत्ता वाढीसाठी किती गुंतवणूक केली त्यावर संसाधन अवलंबून आहे. जगातील इतर देशांप्रमाणेच भारत सरकार लोकसंख्या गुणवत्ता वाढीसाठी आणि महिला सबलीकरणासाठी विविध धोरणे आणि कार्यक्रम राबवित आहे. ते कोणते हे पुढील भागात पाहू.

## पाठावरील प्रश्न १४.४

१. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील स्त्रीपुरुष प्रमाण .........

(अ) ९२० (ब) ९२७ (क) ९३३ (ड) ९४३

२. सन २००१ च्या जनगणनेनुसार नागरी लोकसंख्येचे प्रमाण ..............

(अ) २७.८ (ब) २६.७ (क) २५.७ (ड) २४.०

३. परावलंबी लोकसंख्येचे प्रमाण अधिक असेल तर काय परिणाम होईल?

४. भारतातील स्त्रीपुरुषप्रमाण प्रतिकूल असण्याची कोणतीही दोन कारणे लिहा.

## १४.६ भारताचे लोकसंख्या विषयक धोरण

आपणास माहीत आहे की भारतीय लोकसंख्या वाढ आणि त्यावरील लोकसंख्या धोरणांचा प्रारंभ स्वातंत्र्यापूर्वीच झालेला आहे. सन. १९३८ मध्ये सरकारने लोकसंख्येसाठी राष्ट्रीय नियोजन मंडळाचे एक उपसमिती नेमलेली होती. समाजाच्या आर्थिक हितासाठी, सुखी कुटुंबासाठी आणि राष्ट्रीय नियोजन, कुटुंब नियोजन आणि मर्यादित मुलांची संख्या मर्यादित असावी. याबाबत सन १९४० मध्ये समितीने ठराव सादर केला

सन १९५२ या वर्षी भारत हा जगातील पहिल्यांदाच कुटुंबनियोजनाची शिफारस करणारा देश आहे. या कार्यक्रमात राष्ट्रीय आर्थिक स्थितीनुसार जन्मदर कमी करणे तसेच तो स्थीर ठेवणे हे उद्दिष्ट ठरविले. त्यावेळेपासून लोकसंख्या धोरणात वेळोवेळी बदल करण्यात आला. यासंबंधी अधिक माहिती अन्य संदर्भ पुस्तकात मिळू शकेल सदरच्या प्रकरणात राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० संबंधी काही माहिती मिळवू.

### राष्ट्रीय लोकसंख्याधोरण (National Population Policy) 2000

राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० नुसार गुणवत्ता प्रधान लोकसंख्या दृष्टीकोन ठेवण्यात आला. लोकसंख्या नियंत्रण हा विषय थेट घेण्याचे टाळले. सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांनी लोकांच्या जीवनमानात सुधारणा होईल आणि लोकसंख्या ही उत्पादक बनेल. चीरकाल विकासासाठी स्थीर लोकसंख्या आवश्यक आहे. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २००० चे तातडीचे उद्दिष्ट म्हणजे आरोग्य सुविधा, व्यक्तीगत आरोग्य, जन्माला येणाऱ्या बाळासाठी तसेच मुलांच्या आरोग्यासंबंधी शिफारशी केलेल्या आहेत. मध्यम कालावधीचे उद्दिष्ट म्हणजे सक्तीने कार्यवाही करणे आणि दीर्घकालीन उद्दिष्टांनुसार लोकसंख्या सन २०४५ पर्यंत लोकसंख्या स्थीर ठेवणे त्यामुळे आर्थिक व सामाजिक विकास होवून पर्यावरणाचे रक्षणही होईल.

### ? तुम्हास हे माहित आहे का ?

**जनन क्षमता पुनरुज्जीवन पातळी** : जन्माला आलेली मुलगी सरासरी एका मुलीला जन्म देवू शकण्यास जननक्षमता असते, प्रत्येक स्त्रीने आपली जागा भरून काढण्यासाठी आवश्यक तेवढ्या बाळांना जन्म दिला तर लोकसंख्या वाढीचा दर शुन्यावर येईल.

**स्थीर लोकसंख्या** : विशिष्ट कालावधीमध्ये जननदर आणि मृत्यूदर सारखाच असेल तर अशी लोकसंख्या सारख्याच दराने वाढत राहील. अशी लोकसंख्या स्थीर असेल.

### भारतातील महिला सबलीकरण

मानवी संसाधनामध्ये, लोकसंख्येच्या गुणवत्तेसाठी स्त्रीयांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे. जर भारतात स्त्रीयांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ५०% आहे तर स्त्रीयांकडे पाहण्याची दृष्टी बदलणे गरजेचे आहे.

स्त्रीया या मानवी संसाधनातील आर्धा हिस्सा आहेत. विकसित देशामध्ये याबाबतचे चित्र भिन्न आहे. कुटुंबातील स्त्रीयांची भूमिका आपल्या देशात मर्यादित आहे. हे सर्व बघ्याच्या भूमिकेतून पाहिले जाते. त्यावर दुर्बल उपाय आणि स्त्रीयांबाबत अत्याचारही होत आहेत.

भारतीय घटनेचा आधार घेतला तर तुमच्या लक्षात येईल. कलम क्र. १४, १५, १६, १९, ३0, ४२, ५१ अन्वये प्रत्येकाला समानतेचा न्याय्य हक्क प्रदान करण्यात आलेला आहे. अनेक कायदे मंजूर करण्यात आलेले आहेत. उदा. विशेष विवाह कायदा १९५४, गरोदरपणाचा कायदा १९७१, बालविवाह बंदी कायदा (दुरुस्ती) १९७८, असे असतानाही स्त्रीयांच्या स्थानाबाबत आजही असेच चालू आहे.

स्त्रीयांबाबत योग्य पाऊले उचलली जात असून सकारात्मक बदल होईल असे वाटते. संसदेने ७३ आणि ७४ व्या कलमांमध्ये सुधारणा करून स्त्रीयांना पंचायतराजमध्ये आणि स्थानिक नागरी प्रशासनामध्ये ३३% राखीव जागा देण्याचा महत्त्वाचा कायदा मंजूर केलाला आहे. राज्यसभेत आणि लोकसभेतही ३३% प्रतिनिधित्वासाठी राखीव जागांची तरतूद केलेली आहे. सन १९९0 च्या मंजूरीन्वये सन १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केलेली आहे. महिला तक्रारींची दखल घेतली जाईल त्याबाबतचा शोध महिला आयोग घेवून हक्क अबाधित राहतील याची काळजी घेईल.

स्त्रीयांच्या विकासासाठी प्रगतीसाठी आणि महिलांच्या सबलीकरणासाठी, विविध क्षेत्रातील भेदभाव दूर करण्याचे उद्दिष्ट आहे. ही पावले उचलल्यानंतर विविध क्षेत्रात त्यांचा क्रीयाशील सहभाग वाढेल. वंचित घटकाचा सामाजिक आणि आर्थिक सहभाग या प्रकरणामध्ये महिला सबलीकरणासाठी गरज आणि उपाय हे आपल्या वाचनात येईल.

## पाठावरील प्रश्न १४.६

१. २00 चौ. कि. मी. क्षेत्रफळ असलेल्या जिल्ह्यामध्ये १७४00, २६,२00, ४७,२00, ५९,८00, ७५,२00 अशी लोकसंख्या जनगणना वर्षे अनुक्रमे १९५१, १९६१, १९७१, १९८१, १९९१, आणि २00१ मध्ये असेल तर्र

अ) सहा जनगणना वर्षातील लोकसंख्येची घनता काढा.

ब) दशकातील घनतेतील बदल काढा.

क) तुम्हास घनतेमध्ये विशिष्ट क्रम दिसतो का?

## आपण काय शिकलो?

❖ विशिष्ट काळात देशात वास्तव्य करणारे एकूण लोक म्हणजे लोकसंख्या. शासनाकडून दर दशकाच्या प्रारंभी आर्थिक सामाजिक आणि लोकसंख्येच्या विविध घटकांची माहिती घेतली जाते त्याला जनगणना म्हणतात.

- सन २००१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १०२.८७ कोटी होती. सन १९०१ च्या जनगणनेनुसार असलेल्या लोकसंख्येच्या (२३,८३) चौपट लोकसंख्या आहे. जन्मप्रमाण आणि मृत्यूप्रमाण यांच्या फरकाला नैसर्गिक वाढ दर म्हणतात.

- लोकसंख्येची घनता म्हणजे दर चौ. कि. मी. असणाऱ्या लोकांचे सरासरी प्रमाण. भारतात लोकसंख्येच्या घनतेचे वितरण विषम झालेले आहे. दिल्ली या केंद्र राजधानीच्या ठिकाणी लोकसंख्येची घनता सर्वाधिक म्हणजे द. चौ. कि. मीला ९२९४ आहेत तर अरुणाचल प्रदेशात सर्वात कमी म्हणजे द. चौ. कि. मी ला केवळ १४ लोक इतकेच आहे.

- स्त्रीपुरुष प्रमाण म्हणजे एकूण लोकसंख्येतील दरहजारी पुरुषांमागे असलेल्या स्त्रीयांचे प्रमाण म्हणजे स्त्रीपुरुष प्रमाण होय. भारतात स्त्रीपुरुष प्रमाण प्रतिकूल आहे. सन २००१ मध्ये हे प्रमाण ९३३ होते. महिला सबलीकरणामुळे या प्रमाणात वाढ होईल अशी आशा आहे.

- भारतातील लोकसंख्येचे वयोगटानुसार तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. (१) बालके (० ते १४ वर्षे) (२) तरुण (१५ ते ६० वय) आणि (३) वृद्ध (६० पेक्षा अधिक वय). बालके आणि वृद्ध यांची बेरीज ४३ टक्के ही लोकसंख्या परावलंबी आहे.

- जागृत समाजातील साक्षरता हा निर्देशांक आहे. जणगणनेतील व्याख्येप्रमाणे वय वर्षे ७ आणि त्यापेक्षा अधिक वयाच्या व्यक्तीला लिहिता वाचता येणे आणि समजणे म्हणजे साक्षर. भारतातील लोकसंख्येतील साक्षरतेच्या दरात वाढ झालेली आहे. सन १९५१ मध्ये १८.३ टक्के होते. सन २००१ मध्ये ६५.८६ टक्के पर्यंत पोहोचलेले आहे. केरळमधील साक्षरतेचा दर ९०.८६ टक्के इतका आहे.

- राष्ट्रीय जनसंख्या धोरण २००० चे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे लोकांच्या जीवनाचा दर्जा वाढविण्यासाठी जन्मदर व मृत्यूदर कमी करणे, कुटुंब कल्याण, लोकसंख्या स्थिर ठेवणे, आर्थिक विकास, सामाजिक विकास आणि पर्यावरण रक्षण इ. आहेत. जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी सुयोग्य गुंतवणूक करणे आवश्यक आहे. तसे केल्यास मोठी असणारी लोकसंख्या ही संसाधन म्हणून परिवर्तन करता येईल.

## सहामाही अभ्यास ः

१. व्याख्या लिहा. स्त्रीपुरुष प्रमाण भारतीय लोकसंख्येतील स्त्रीपुरुष प्रमाण प्रतिकूल का आहे?

२. व्याख्या लिहा. "लोकसंख्या वाढ दर" तो कसा काढला जातो?

३. वयोरचनेवरून भारतीय लोकसंख्येचे काय अनुमान काढाल?

४. आपल्या मोठ्या लोकसंख्येचे साधन संपदेमध्ये परिवर्तन कसे करता येईल?

५. स्पष्ट करा.

१. लोकसंख्येची घनता

२. जन्मदर प्रमाण, मृत्यू प्रमाण आणि लोकसंख्या वाढ

३. साक्षरता

६. राष्ट्रीय लोकसंख्या धोरण स्पष्ट करा.

७. महिला सबलीकरण म्हणजे काय? महिलांच्या सबलीकरणाचा संपूर्ण समाजाला सबल कसे करता येईल?

## पाठावरील प्रश्न उत्तरे

### १४.१

१. काही गोष्टींचा वापर आणि पुनर्वापर आपल्यासाठीच करणे.

२. शिक्षण, आरोग्य, उत्तम आहार आणि विशेष प्रशिक्षण

### १४.२

१. अ. प. बंगाल

२. ड. चौ. कि. मी. ला ३00 लोक

३. (१) औद्योगिकीकरण (२) नागरीकरण (३) नोकरीच्यासंधी (४) वाहतूक संदेशवहन

४. (१) उंचसखल भूप्रदेश (२) प्रतिकूल हवामान स्थिती

### १४.३

१. क. हजारी २0 प्रमाण

२. क. जास्त जन्मदर आणि कमी मृत्यूदर

३. सन १९२१ मध्ये लोकसंख्येत घट झाली त्यानंतर मात्र सातत्याने वाढत आहे.

### १४.४

१. क. ९३३

२. अ. २७.८

३. समाजाच्या कल्याणासाठी परावलंबी लोकसंख्येवर शासनाला खर्च करावा लागतो त्यामुळे मोठ्या विकासासाठी शासनाकडे पैसा उपलब्ध होत नाही.

४. (१) स्त्री विरोधी भेद (२) भ्रुण हत्या

**१४.५**

| **वर्षे** | **अ घनता** | **ब दशकातील वाढ** | **क** |
|---|---|---|---|
| १९५१ | ८७ | | लोकसंख्येच्या घनतेत वाढ होत आहे. |
| १९६१ | १३१ | ४४ | |
| १९७१ | १८१ | ५० | |
| १९८१ | २३६ | ५५ | |
| १९९१ | २९९ | ६३ | |
| २००१ | ३७६ | ७७ | |

# माध्यमिक स्तरावरील सामाजिक विज्ञान अभ्यासक्रम

मानवी समाजाचा अभ्यास हा गुंतागुंतीचा विषय आहे. त्यामध्ये सामाजिक संबंधाचा सामवेश आहे. समाज समजून घेण्यासाठी विविध विषयाचा समावेश आहे. त्यामुळेच समाजशास्त्राच्या अभ्यासाच्या जोडीला मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी शास्त्रांची जोड द्यावी लागते.

समाजशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी इतिहास, सामाजिक सांस्कृतिक, अर्थशास्त्रीय, राजकीय, प्राकृतिक दृष्टीकोन ठेवावा लागतो. संबंधित माहितीमुळे सामाजिक सत्यस्थिती कळते. अशा प्रकारच्या प्रायोगिक अध्ययनातून महत्त्वाची मूल्ये आत्मसात होतात. त्याचा उपयोग हा जबाबदार नागरिक म्हणून घडणीसाठी होतो. राष्ट्राच्या निर्मितीमध्ये सहभागी होण्याची ही प्रक्रिया असून अध्ययन करणारे प्रेरणा घेवून सहभाग होतात.

## उद्दिष्ट्ये

### अभ्यासक्रम उद्दिष्टे

- ❖ जुन्या पिढीने केलेला संघर्ष आणि त्यांचा अनुभव यांची माहिती सुयोग्य पद्धतीने दिलेली आहे.
- ❖ नैसर्गिक संपदा त्यांचे संवर्धन या गोष्टींचा वापर कायदेशीररित्या करणे आवश्यक आहे.
- ❖ भारतीय घटनेचे पावित्र्य, कार्यात्मक लोकशाहीसाठी टिकविले पाहिजे.
- ❖ सामाजिक राजकीय समस्येचा समन्वय साधून त्या सोडविण्याचे प्रत्येकाची जबावदारी आहे.

### मूल्यामापन

मूल्यमापनासाठी औपचारिक (वेळोवेळी) आणि एकत्रित असा वापर केलेला आहे. ट्युटर मार्क असायनमेंटच्या पद्धतीचा अवलंब केलेला आहे. तसेच बाह्य परीक्षेप्रमाणे वापर केलेला आहे. मार्च ऑक्टोबर अशा दोन परीक्षा घेतल्या जातात. २० गुणांचे TMA (Tutor Marked Assignment) असून स्वयंमूल्यमापनासाठी पाठावरील प्रश्न, सत्रात परीक्षेचे प्रश्न आणि कार्य इ. बाबी प्रत्येक पाठावर दिलेले आहे.

| घटक क्र. | अभ्यासक्रम रचना | गुण | अभ्यास तासिका |
|---|---|---|---|
| घटक १ | कालावधीनुरूप - भारत आणि जग | ३२ | ७६ तास |
| घटक २ | भारत : नैसर्गिक पर्यावरण संसाधने व विकास | २७ | ६४ तास |
| घटक ३ | लोकशाही कार्यपद्धती | २८ | ६८ तास |
| घटक ४ | समकालीन भारत : संघर्ष आणि ध्येय | १३ | ३२ तास |
| एकूण | १०० | २४० तास | |

# अभ्यासक्रम माहिती

## घटक १ ´ काळानुसार भारत आणि जग

**गुण ´ ३२** **अभ्यासाचे तास ´ ७६**

विद्यार्थ्यांना भारत आणि जगाची माहिती ही काळानुरूप मिळते. काही घटना आणि प्रक्रिया नव्या राजकीय आणि आर्थिक शक्तीने वेगवेगळ्या असतात. फ्रेंच राज्यक्रांती उदारमतवाद आणि लोकशाहीसाठी होती. रशियन राज्यक्रांतीने समाजवादी विचारसरणी आली. जर्मनीतील नाझीझम हा लोकशाही आणि समाजवाद दोन्हीनाही नाकारणारा होता. अध्ययन करणारांना हेही लक्षात येईल की भारतातील वसाहतवाद आणि त्यामधून सामाजिक चळवळींनी जन्म घेतला व ब्रिटिशांविरुद्ध जनमत तयार झाले. सार्वभौमत्व व समान नागरिकत्व हा सुद्धा स्वातंत्र्य संग्रामात सहभागी असणाऱ्यांनी उचलून धरला. त्यामध्ये सहभागी असणाऱ्यांनी भारताला दृष्टी दिली. यापाठामधून काही जीवन कौशल्ये, विचार कौशल्ये, संवाद कौशल्ये इत्यादी उद्दिष्ट्ये साध्य होतात. गृहकार्या ने आपापसातील चर्चेमुळे सुसंवाद साधण्याची कला, सर्वेक्षण सारख्या प्रकरणातून साध्य झाली.

प्रस्तावन : सामाजिक शास्त्र

१. प्राचीन जग

२. मध्ययुगीनजग

३. आधुनिक जग १

४. आधुनिक जग २

५. भारतावरील ब्रिटिशाचे राज्य आर्थिक आणि सामाजिक, सांस्कृतिक परिणाम (१७५७ ते १८५७)

६. भारतातील वसाहतवाद ´ धार्मिक आणि सामाजिक जागृती

७. ब्रिटिश राजवटीस विरोध

८. भारतीय राष्ट्रीय चळवळी

## घटक २ ´ भारत नैसर्गिक पर्यावरण संसाधने आणि विकास

**गुण ´ २७** **अभ्यास तासिका ´ ६४ तास**

**दृष्टीकोन ः**

विद्यार्थ्यांना नैसर्गिक पर्यावरण, संसाधने आणि विकास याचा सहसंबंध कळावा हा अभ्यासक्रमाचा दृष्टीकोन आहे. विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे घटक आणि त्यातील परिवर्तन लक्षात यावे हा हेतू आहे. पृथ्वीवरील मानवाचे अस्तित्व पोसले जाते. त्या पृथ्वीवर परिस्थितीकीचा समतोल राखला जावा यावर दृष्टीक्षेप टाकला आहे.

नैसर्गिक साधन संपदा हे एकूणच विकासाचे मूळ आहे. त्यामुळे शास्त्रीय विकास हा चीरंतर रहावा ही अध्ययनातून समज यावी या दृष्टीने अभ्यासक्रम तयार केलेला आहे. नैसर्गिक व मानवी संसाधने त्यांचे वितरण, वापर आणि संवर्धन व्यवस्थापन यावर भर दिलेला आहे. भारतीय नैसर्गिक आणि सांस्कृतिक घटकातील विविधतेत एकता ही विद्यार्थ्यांच्या लक्षात यावी. नैसर्गिक घटकात प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, वनस्पती वन्यजीव संपदा यामध्ये असलेली विविधता, सांस्कृतिक घटकातील विविधतेमध्ये आणि नैसर्गिक विविधतेमध्ये असलेला सहसंबंध भारताच्या संदर्भात दिलेला आहे. देशाचा समृद्ध वारसा नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढीसाठी करून ठेवणे गरजेचे आहे. जीवन कौशल्यांचा विकास व्हावा या पाठामागील उद्देश आहे. विचारांचे कौशल्ये, संवाद कौशल्य चर्चेचे कौशल्यातून उदाहरणे देता यावीत. विद्यार्थ्या ना दिलेले गृहकार्य, सर्वेक्षण, नमुना अभ्यास देण्याचा हाच उद्देश आहे.

१. भारत प्राकृतिक रचना

२. हवामान

३. जैवविविधता

४. भारतातील शेती

५. वाहतुक व संदेशवहन

६. लोकसंख्या आणि सर्वोत्तम संपदा

## घटक ३ - लोकशाही कार्यपद्धती

**गुण - २८** **अभ्यास तासिका - ६८ तास**

**दृष्टीकोन ः**

नागरिकांचे हक्क कर्तव्ये देश आणि नागरिक यांचे संबंध यावर या प्रकरणात भर दिलेला आहे. राष्ट्राच्या कल्याणासाठी विविध योजना यावर दृष्टीक्षेप टाकलेला आहे. स्थानिक स्वराज्यसंस्था आणि त्यावरील सरकारे यांची माहिती आहे. स्थानिकसरकार यामध्ये पंचायतराज, महानगरपालिका जिल्हा प्रशासन यांची माहिती आहे. राज्य आणि केंद्रशासन याची माहिती आहे. जीवनकौशल्ये यामधून संपादन होतात. विचार कौशल्ये, संवाद कौशल्ये ही संपादन करण्यासाठी गृहकार्य, सर्वेक्षण आणि नमुना अभ्यास दिलेला आहे.

१. भारतातील घटनात्मक मूल्ये आणि राज्यपद्धती

२. मूलभूत हक्के आणि कर्तव्ये

३. भारत कल्याणकारी राज्य

४. स्थानिक स्वराज्यसंस्था आणि प्रशासन

५. राज्य शासन

६. केंद्रशासन

७. राजकीय पक्ष आणि दबावगट

८. लोकशाही प्रक्रियेत जनतेचा सहभाग

## घटक ४ - समकालीन भारत संघर्ष व ध्येय

**गुण - १३** **अभ्यास तासिका - ३२ तास**

**दृष्टीकोन ः**

सदरच्या भागामध्ये देशातील आणि बाहेरील राजकीय सामाजिक आणि आर्थिक आव्हाने यांचा अभ्यास आहे. विद्यार्थ्याला देशाच्या समस्या आणि त्यातील मार्ग यांची जाणीव व्हावी. त्यामध्ये काही जीवन कौशल्ये संपादन करता यावीत. उदा. विचार करण्याचे कौशल्ये, संवाद कौशल्य समस्या सोडविण्याचे कौशल्य इ. त्यासाठी काही उदाहरणे आहेत गृहकार्य आणि सर्वेक्षण व नमुना अभ्यास दिलेला आहे.

१. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

२. राष्ट्रीय एकात्मता आणि निधर्मी राष्ट्र

३. सामाजिक आर्थिक विकास आणि वंचित घटकांचे सबलीकरण

४. पर्यावरणाचा ऱ्हास आणि आपत्ती व्यवस्थापन

५. शांतता आणि सुरक्षितता

Complete and Post the feedback form today

शेवटची घडी व चिटकविणे

पहिली घडी

## प्रतिसाद पाठ क्र. १ ते १४

| पा. क्र. | पाठाचे नाव | पाठ्यांश | | | | भाषा | | चित्रे आकृत्या | | आत्मसात केलेले ज्ञान | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सोपा | अवघड | मनोरंजक | संदिग्ध | सोपी | अवघड | उपयोगी | निरुपयोगी | अतिशय उपयोगी | थोडे फार उपयोगी | निरुपयोगी |
| १ | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | |
| १0 | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | |
| १२ | | | | | | | | | | | | |
| १३ | | | | | | | | | | | | |
| १४ | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

चौथी घडी

तिसरी घडी

विद्यार्थी मित्रांनो,

आपण या पुस्तकाचा अभ्यासपूर्ण केला आहे. आपला अभ्यासक्रम जीवनाशी निगडीत व मनाला समाधान देणारा असावा असा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. पाठ्यपुस्तके तयार करणे ही द्विमार्गी प्रक्रिया आहे. पाठ्यपुस्तकांबाबतचा आपला प्रतिसाद अभ्यासविघटक सामग्रीत सुधारणा करताना उपयोगी पडणार आहे. आपल्या अभ्यासातील काही वेळ खर्च करून सोबतचा प्रतिसाद कृपया पूर्ण करा. त्याचा उपयोग उत्तम प्रकारचे अभ्यास साहित्य तयार करताना होईल.

कळावे,
अभ्यासक्रम समन्वयक
सामाजिक विज्ञान

### प्रश्नांवरील प्रतिसाद

| पा. क्र. | पाठाचे नाव | पाठ्यांशावरील प्रश्न | | सहामाही प्रश्न | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | उपयोगी | निरुपयोगी | सोपे | अवघडउ | अतिअवघड |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |
| ९ | | | | | | |
| १0 | | | | | | |
| ११ | | | | | | |
| १२ | | | | | | |
| १३ | | | | | | |
| १४ | | | | | | |
| | | | | | | |

दुसरी घडी

आपल्या सूचना

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

आपण या विषयासाठी इतर पुस्तके वापरील का? होय / नाही

जर उत्तर होय असेल तर त्याची कारणे सांगा.

________________________________________

________________________________________

नावनोंदणी ____________________

क्रमांक ____________________

पत्ता ____________________

____________________

विषय ____________________

पुस्तक क्र. ____________________

**Course Coordinator,**
**Social Science**
**National Institute of Open Schooling**
**A-24-25, Institutional Area**
**Sector-62, NOIDA (U.P.), Pin-201309**

Postage
Stamp

No Enclosures allowed